विवेकानंद

१

विवेकानंद.

प्रथम खंड.

स्वामी विवेकानंद

यांचे

समग्र ग्रंथ.



प्रथम खंड.

१९१२.

किंमत रुपये १।.

Printed and published by G. N. Kulkarni
at his Karnatak Press, No. 7, Girgaon
Back Road, Bombay.

आतां अवधारा कथा गहन ।
जे सकळ कौतुकां जन्मस्थान ।
कीं अभिनव उद्यान ।
विवेकतरूंचें ॥
ना तरी सकळ धर्मांचें माहेर ।
सज्जनांचें जिव्हार ।
लावण्यरत्नभांडार ।
शारदेचें ॥

भगवान् ज्ञानेश्वर.

प्रकाशकाची प्रस्तावना.

स्वामी विवेकानंद यांची ओळख आतां आमच्या वाचकांस नव्यानें करून द्यावयास पाहिजे असें नाहीं. अर्वाचीन पाश्चात्य संस्कृतीचें केवळ माहेरघर अशी जी अमेरिका तेथें जाऊन ज्यांनीं सनातनधर्माचें वर्चस्व स्थापिलें व थोड्याच वेळांत आपलें नांव सर्वतोमुखीं करून टाकलें, त्यांच्या कीर्तीत आमच्या स्तुतीनें कांहीं विशेष भर पडणार आहे असें नाहीं. त्यांनीं बजावलेल्या कामगिरीचें खरें स्वरूप भगिनी निवेदिता यांनीं आपल्या उपोद्घातांत स्पष्ट करून दाखविलेंच आहे; तेव्हां त्यासंबंधींहि कांहीं सांगण्याचें प्रयोजन आह्मांस उरलें नाहीं.

पाश्चात्य संस्कृतीच्या जबर धक्क्यानें कित्येक शतकांच्या मोहनिद्रेंतून आम्ही जागे झाल्यावर कांहीं काळ आमची स्थिति फार चमत्कारिक झाली होती. गाढ अंधारांतून एकदम उजेडांत आलेल्या मनुष्याचे डोळे दिपून त्यास जसें कांहीं काळ यथार्थ वस्तुज्ञान होत नाहीं, तशीच आमची स्थिति झाली होती. जड-वादाच्या अत्यंत मोहक स्वरूपामुळें विकृत झालेल्या आमच्या बुद्धीस ' पुराणें ह्मणजे शिमगा ' वाटूं लागलीं होतीं. ' **अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता । सर्वार्थान् विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥**' असें भगवंतांनीं सांगितलेलें तामसी बुद्धीचें लक्षण आमच्या ठिकाणीं पूर्णत्वानें प्रत्ययास येऊं लागलें होतें. कांहीं काळानें आमचे डोळे हळू हळू स्थिरावूं लागले ही गोष्ट खरी; तथापि आमच्या बुद्धीची विकृति साफ बरी झाल्याचा प्रत्यय अद्यापिहि येत नाहीं. ' वेदांतानें आह्मी नेभळे झालों; ' ' साधुसंतांनीं आह्मांस धारकऱ्यांचे वारकरी केलें; ' समाधि ह्मणजे ·बेशुद्धि; ' इत्यादि अनेक प्रकारचे जे उद्गार आह्मी काढतों, त्यांवरून आमच्या बुद्धीच्या शुद्ध स्थितीबद्दल सत्पुरुषांस शंका आली तर त्यांत नवल नाहीं. स्वतःच्या देहस्वास्थ्याचाहि विचार न करतां ज्यांनीं केवळ परोप-कारार्थ आपलें आयुष्य वेंचलें, लोकांस सन्मार्गाचा उपदेश करणें हीच ज्यांची इतिकर्तव्यता, लोकसेवा हेंच ज्यांचें ब्रीद, ' राहिलों उपकारा पुरता ' हाच ज्यांचा जप, आणि 'बुडतें हें जन न देखवे डोळां' ह्मणून आमचा कळवळा येऊन ज्यांनीं आह्मांस मोक्षमार्ग दाखविला त्या सत्पुरुषांस अशीं शेलकीं फुलें वाहून त्यांचा उपकार आह्मीं चांगलाच फेडला ! परंतु संत दयासागर आहेत. आमच्या कृतघ्नपणाकडे लक्ष्य न देतां ते आह्मांस पुनःपुनः बोधामृत पाजीत आहेत. ते कधीं तुकारामादि रूपानें, तर कधीं त्रैलोक्यविजयी विवेकानंदरामतीर्थादि रूपानें

अवतरून आह्मांस सन्मार्गाचा उपदेश करतात. विवेकानंद ह्मणतात ' अनेक सद्गुरूंचा आजवर उपमर्द करून सांप्रतची कर्मदशा तुह्मीं आपणांवर ओढवून घेतली आहे !' हें त्यांचें ह्मणणें अक्षरशः खरें आहे. आमच्या धर्मांत काय सांगितलें आहे याचें ज्ञान आह्मांस आज इतरांपासून प्राप्त करून घ्यावें लागत आहे ! ' धर्म ' ' धर्म ' ह्मणून हजारों खुळसट गोष्टींस आह्मी मिठी मारून बसलों आहों. आमचा धर्म कशांत आहे, त्याचें स्वरूप काय, धर्म ह्मणजे काय, इत्यादि गोष्टी आह्मांस आज कोड्यासारख्या होऊन बसल्या आहेत. आमचे जुने धर्म-ग्रंथ समजण्याजोगी आमची स्थिति राहिली नाहीं व खऱ्या धर्माचरणाच्या अभावीं आह्मी एकसारखे अवनतीस जात आहों हें पाहून आमचे पूर्वकालीन ऋषि आणि संत विवेकानंदरामतीर्थादि रूपानें अवतरले व जुना सनातनधर्म नव्या रूपानें त्यांनीं आह्मांस पुन्हां सांगितला.

अत्यंत तीव्र अशा विवेचकबुद्धीच्या साहाय्यानें ज्यांना धर्मशास्त्राचा अभ्यास करावयाचा असेल, त्यांनीं विवेकानंदांच्या ग्रंथांचा सतत अभ्यास केला पाहिजे. त्यांचा अभ्यास मन:पूर्वक केला तर आपले प्राचीन ग्रंथहि समजण्यास सुलभ होतील. विवेकानंदांच्या विचारमौक्तिकांचा लाभ निवळ मराठी वाचकांसहि करून द्यावा, या हेतूनें आम्हीं हा प्रस्तुतचा उद्योग आरंभिला आहे. परमेश्वराच्या कृपेनें व आमच्या मराठी वाचकवर्गाच्या साहाय्यानें हें काम तडीस गेलें तर अशाच प्रकारचे इतर आचार्यांचे ग्रंथ व कांहीं स्वतंत्र ग्रंथहि मराठी वाचकांस अर्पण करण्याची प्रस्तुत लेखकास उमेद आहे. ही त्याची उमेद योग्य आहे कीं नाहीं हें ठरविणें मराठी वाचकवर्गाचें काम आहे. त्यांनीं योग्य प्रोत्साहन दिलें तर पुढील कामगिरीस तो हात घालील; न दिलें तर आपली तितकी योग्यताच नाहीं असें समजून तो स्वस्थ बसेल.

स्वामी विवेकानंद यांचे समग्र ग्रंथ अजमासें दहा खंडांत पूर्ण होतील असें वाटतें. प्रत्येक वर्षी तीन किंवा चार खंड प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे. अशा व्यवस्थेनें ग्रंथांचा संग्रह करण्यास ग्राहकांस द्रव्यदृष्ट्या सुलभ होईल.

स्वामी विवेकानंद यांचें चरित्र प्रथम खंडांत प्रसिद्ध करण्याविषयीं कित्ये-कांनीं पत्रद्वारा सूचना केली होती, परंतु स्वामीजींचें चांगलें जीवनचरित्र आ-ह्मांस उपलब्ध झालें नसल्यामुळें तें प्रसिद्ध करतां आलें नाहीं, त्यास आमचा नाइलाज आहे. स्वामीजींचें चरित्र मिळविण्याची आह्मी खटपट करीत आहों व ती यशस्वी झाल्यास तें आह्मी शेवटच्या खंडाच्या वेळीं प्रसिद्ध करूं.

पुस्तकप्रकाशनाच्या बाबतींत हा आमचा पहिलाच प्रयत्न आहे. आमच वाचकवर्गांनें मनापासून साहाय्य केलें तर त्यांच्या द्रव्याचा मोबदला त्यांस चांगल्या पुस्तकांच्याद्वारें देण्याची आह्मी शक्य तितकी खबरदारी घेऊं. मराठी वाङ्मयांत चांगल्या ग्रंथांची भर पडण्यासाठीं कायावाचामनानें झटण्यास आह्मी मागें पुढें पाहणार नाहीं असें आश्वासन देतों. अनेक कारणांमुळें प्रसिद्ध केलेल्या मुदतींत हा खंड वाचकांच्या हातीं आह्मांस देतां आला नाहीं, याबद्दल आह्मी दिलगिर आहों. तथापि अनेक अपरिहार्य अडचणींची शिळी झालेली सबब पुढें न करतां प्रांजलपणें वाचकांची क्षमा मागून यापुढें अधिक नियमितपणा दाखवावा हें बरें. पुढील खंड जानेवारीच्या पहिल्या आठवड्यांत वाचकांस मिळेल.

प्रस्तुत पुस्तक फार घाईनें छापावें लागल्यामुळें त्याच्या छपाईत व बांधणींत कांहीं दोष असतील ते पुढें राहूं नयेत याबद्दल शक्य तितकी खबरदारी आह्मी घेऊं.

आमच्या या यत्नांत उदारबुद्धीनें साहाय्य करण्यास व मनोभावें आह्मीं केलेली सेवा गोड करून घेण्यास आमच्या प्रिय वाचकवर्गास विनंति करून त्यांची सध्या रजा घेतों.

मुंबई, ता. १५ सप्टेंबर १९१२. — प्रकाशक.

भगिनी निवेदिता यांचा उपोद्धात.

स्वामी विवेकानंद यांनीं दिलेल्या व्याख्यानांच्या योगें साऱ्या जगाला धर्म-मार्गाचा खरा बोध होईलच; पण खुद्द भरतभूमीच्या लेंकरांनाहि स्वतःच्या धर्माचें खरें स्वरूप कळण्यास त्यांचा आदर्शवत् उपयोग होईल. नवयुगाघातानें भरत-भूमि शतधा विदीर्ण झाली आहे अशा वेळीं तिच्या धर्मांचें तारूंहि कोणीकड-च्याकोणीकडे भडकावें यांत नवल नाहीं. प्रचंड वादळांत सांपडून इतस्ततः भडकणाऱ्या नौकेला चांगल्या बंदराच्या आश्रयाची अत्यंत जरूर असते. त्याच प्रमाणें हिंदुधर्मरूपी नौकेलाहि सध्याच्या काळीं अशाच प्रकारच्या बंदराची अत्यंत आवश्यकता होती; ती उणीव स्वामी विवेकानंदांनीं पूर्णपणें भरून काढली आहे. हिंदुधर्माचें वास्तविक स्वरूप काय आहे याचा बोध या व्याख्यानांत उत्तम रीतीनें होईल.

हिंदुस्थानांत जन्मलेल्या आणि हिंदुधर्मानें दर्शविलेल्या अत्युच्च पदावर आरूढ झालेल्या एका हिंदु महात्म्यानें हिंदुधर्माचा प्रसार करीत साऱ्या जगभर फिरावें ही गोष्ट इतिहासकालानंतर तरी प्रथमच घडून आली आहे. आपल्या धर्मांत काय सांगितलें आहे याचें ज्ञान करून घेण्याची इच्छा कोणाहि हिंदूस झाली, आपल्या मुलांस धर्मज्ञान देण्याची इच्छा कोणा मातेस झाली, तर अशीं स्त्रीपुरुषें विवेकानंदांच्या ग्रंथांकडे वळतील यांत संशय नाहीं. इंग्रजी भाषा हिंदुस्था-नांतून समूळ नष्ट होण्याची वेळ कधीं काळीं आलीच तर त्यावेळींहि त्या भाषें-तून स्वामीजींनीं केलेलें ज्ञानदान शिल्लक राहून साऱ्या जगास फलद्रूप होईल यांत तिळमात्र संदेह नाहीं. सांप्रतकाळीं विस्कळित झालेलीं हिंदुधर्मतत्वमौक्तिकें एका सूत्रांत गुंफून त्यांचा पक्का हार बनविण्याची अत्यंत आवश्यकता उत्पन्न झाली होती; तसेंच भौतिकशास्त्रांच्या प्रखर भट्टींतहि टिकून राहणारा धर्म जगाला सध्या हवा होता. हीं दोन्हीं कामें स्वामीजींनीं आपल्या अमोघ सामर्थ्यानें तडीस नेलीं. सनातनधर्मांत जें चिरंतन सामर्थ्य वास करीत आहे, त्याचीहि साक्ष आपणांस येथें पटते. अत्यंत बिकट परिस्थितींतहि स्वामीजीं-सारखें नररत्न उदयास येऊन सनातनधर्माचा जिवटपणा जगास पटवितें, यावरून त्या धर्मांतील चिरकाल टिकणाऱ्या सामर्थ्याचा पूर्ण प्रत्यय येतो.

मानवी जीविताचें रहस्य इतरांस कथन करण्यांत स्वतःचेंहि हित आहे, ही गोष्ट आर्यभूमीस आजच प्रथम समजली असें नाहीं. आपणांस जें ज्ञान प्राप्त झालें

आहे तें इतर देशांतील लोकांस सांगून त्यांसहि सुखाचा मार्ग खुला करून द्यावयाचा हें आर्यभूमीचें ब्रीदच आहे.

जगांतील इतर देश अज्ञाननिद्रेंत घोरत पडले असतां भगवान् बुद्धानें आपल्या शिष्यांच्याद्वारें त्यांस जागृति आणिली. आपलें ज्ञान, इतरांस दिल्यानें दुणावतें, ही गोष्ट आर्यभूमीच्या लक्ष्यांत आल्यास पुष्कळ काळ लोटून गेला आहे. आपल्या ज्ञानाचा देशोदेशीं प्रसार केल्यामुळें हिंदुधर्मास अभेद्यरूप प्राप्त झालें आहे. पाश्चात्य देशांतील एका व्याख्यानांत स्वामी विवेकानंद ह्मणाले 'जर एक धर्म खरा असेल तर इतर धर्महि खरे असलेच पाहिजेत. सर्व धर्मांचें साध्य एकच असल्यामुळें सर्व जग वस्तुतः एकधर्मीच आहे. याकरितां हिंदुधर्म जितका माझा ह्मणतां येईल तितकाच तो तुह्मां सर्वांचाहि आहे.' आपले शिष्य इतर देशांत पाठविण्यांत भगवान् बुद्धाच्या मनांत एकंदर मानवजातीबद्दल जें प्रेम वसत होतें, त्याचीच पुनरावृत्ति स्वामीजींच्या या उद्गारांत आपणांस आढळून येते. दुसऱ्या एका व्याख्यानांत स्वामीजी ह्मणतात 'आह्मी हिंदुलोक इतर धर्मांशीं विरोध तर करीत नाहींच; पण नुसते उदासीनहि न राहतां त्यांच्या मूल-तत्वांशीं एकजीव जाऊन राहतों. धर्म ह्मटला कीं तो महंमदानें सांगितलेला असो, जरदुष्ट्रानें सांगितलेला असो अथवा येशु ख्रिस्तानें सांगितलेला असो; त्यांतील सार ग्रहण करण्यास आह्मी नेहमीं तयार असतों. अगदीं रानटी देशांतल्या धर्मा-पासून तों अत्युच्च धर्मांपर्यंत सर्व धर्म, हे परमेश्वरप्राप्तीचे—अनंताशीं एकरूप होण्याचे—मार्ग आहेत, ही गोष्ट आजपर्यंत आमच्या लक्ष्यांतून कधींहि गेली नाहीं. याकरितां सर्व धर्मरूप पुष्पें प्रेमसूत्रानें एकत्र करून अनंताच्या चरणीं अर्पण करणें हाच आमचा पूजाविधि आहे.' अमुक मनुष्य परका अथवा परदेशचा असा भाव स्वामीजींच्या चित्तास कधीं शिवलाहि नाहीं. एकंदर मनुष्यजाती-बद्दल त्यांच्या चित्तांत आपलेपणा वसत होता. सत्यमार्गाचा उपदेश त्यांनीं सर्वांना एकसारखाच केला.

अमेरिकेंतील सर्व धर्मांच्या परिषदेपुढें त्यांनीं 'हिंदुधर्म कल्पना' या विषया-वर व्याख्यान दिलें, तेव्हां हिंदुधर्मतत्वांचें सामान्य निरूपण करावयाचें इतकाच त्यांचा उद्देश होता; पण त्यांच्या अमोघ वाणीचा प्रवाह सुरू झाल्याबरोबर सामान्य निरूपणाचें स्वरूप बदलत जाऊन शेवटीं हिंदुधर्म आपल्या संपूर्ण तेजानें प्रकाशमान् झाल्याचें आढळून आलें! तो प्रसंगच तसा होता! मिचिगन सरो-वराच्या कांठीं वसलेल्या त्या शिकागो शहरांत पाश्चात्य संस्कृतीचें स्वरूप जणुं

एकवटून दिसत होतें. या स्वरूपांत जसा कांहीं मनोहर भाग आहे त्याचप्रमाणें कांहीं विषादोत्पादकभागहि आहे. यच्चयावत् पाश्चात्य देशांतील संस्कृतींतील उत्तमोत्तम तत्वांचा ज्याप्रमाणें अमेरिकेनें संग्रह केला आहे त्याचप्रमाणें त्या संस्कृतींतील कांहीं विषादकारक तत्वांचा संग्रहहि तिनें केला आहे. विशेषतः शिकागो शहरांत युरोपियन संस्कृतीचें संकलित स्वरूप जितक्या उत्तम रीतीनें दिसतें तितक्या रीतीनें तें अमेरिकेंत इतर ठिकाणीं आढळत नाहीं. एखादा नवखा मनुष्य प्रथमच शिकागो शहरीं आला तर तेथील जनसंमर्द आणि अविरत गडबड पाहून तो गोंधळून जातो. साऱ्या जगांतले बाजारबुणगे जणुं काय एकत्र झाले आहेत असें त्यास वाटतें. पण ही उथळ दृष्टि बाजूस ठेवली, तर या प्रचंड घोटाळ्यांतहि अत्यंत अंतवर्ती अशी एकतानता असून एकंदर जगास बंधुभावाचा धडा याच शहरानें घालून द्यावा असा परमात्म्याचा स्पष्ट उद्देश दिसतो.

स्वामी विवेकानंद भाषण करण्यास उभे राहिले तेव्हां त्यांजपुढें असलेला श्रोतृसमूह कोणत्या प्रकारच्या विचारांनीं भरलेला असावा याचा अंदाज वरील वर्णनावरून होण्याजोगा आहे. आपल्या धर्माहून उच्च धर्म नाहीं आणि आपल्या संस्कृतीहून उच्च संस्कृतीहि जगांत दुसऱ्या कोठें नाहीं ही कल्पना त्यांस एका बाजूस ओढीत असतां कुतूहल त्यांस दुसऱ्या बाजूस ओढीत होतें. स्वामीजी आपणांस नवीन असें काय सांगणार तें ऐकण्यास त्यांच्या पुढील श्रोतृगण अत्यंत उत्सुक झालेला दिसत होता. स्वामीजीसमोर अशा प्रकारचा श्रोतृसमूह असतां त्याच वेळीं त्यांच्या पाठीमागें अत्यंत शांत व ज्ञानानें तृप्त झालेला असा प्राचीन ऋषिसमूह होता. हा समूह केवळ चैतन्यरूप असल्यामुळें अर्थातच बाह्यनेत्रांस गोचर होत नव्हता. हा चैतन्यसागर अत्यंत प्राचीन आहे; इतका कीं त्याच्या तुलनेनें बौद्धधर्महि परवांचा असें ह्मणतां येईल. या सागरस्वरूप सनातनधर्मांत अनेक शाखा आणि पंथ यांचा समावेश झाला आहे. थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं स्वामीजींच्या पाठीमागें हजारों वर्षांचा ज्ञानवृद्ध आणि तपोवृद्ध असा भारतीय राष्ट्रपुरुष उभा होता.

अशा रीतीनें दोन चैतन्यसागर तेथें एकमेकांस भेटूं पाहत होते. अत्यंत प्राचीन आणि अत्यंत अर्वाचीन संस्कृतींचा संयोग होण्याची ही वेळ होती आणि तें कार्य स्वामीजींच्या हस्तें व्हावयाचें या ईश्वरी संकेताची तेथें पूर्तता होत होती. अशा रीतीनें हा संधि होतांच त्यांतून सर्व जगास मान्य अशा नव्या स्वरूपाचा सनातनधर्म तेथें उत्पन्न झाला हें योग्यच झालें. स्वामीजींनीं तेथें स्वतःचें असें

कांहींच सांगितलें नाहीं; इतकेंच नव्हे तर आपल्या गुरूसंबंधींहि कांहीं सांगितलें नाहीं. मागें उभ्या असलेल्या राष्ट्रपुरुषाच्या प्रेरणेस अनुसरून पासिफिक समुद्राच्या तीरावरील घोरत पडलेल्या जनतेस त्यांनीं जागें केलें. कित्येक सहस्रकांचें आपलें अनुभवजन्य ज्ञान भारतीय राष्ट्रपुरुष, जणुं काय, त्यांच्या मुखानें बोलत होता ! आणि तरुण असा पाश्चात्त्य पुरुष तें दिव्य ज्ञान, मोठ्या औत्सुक्यानें आपल्या हृदयसंपुटांत सांठवीत होता. आपलें खरें मोठेपण आणि सामर्थ्य कशांत आहे, याचें रहस्य समजण्यास हा तरुण पुरुष अत्यंत उत्सुक झाला होता.

स्वामीजी ज्या उच्चासनावर उभे होते, तेथेंच दुसरेहि अनेक पंथांचे आणि धर्मांचे आचार्य विराजमान झाले होते; परंतु विश्वव्यापी धर्मरहस्य कथन करण्याचा अधिकार एकट्या स्वामीजींसच प्राप्त झाला होता. स्वामीजींनीं सांगितलेला धर्म एखाद्या महासागरासारखा असून इतर आचार्यांचे पंथ, हे त्या महासागरास मिळूं पाहणाऱ्या लहान मोठ्या नद्यांसारखे होते. 'अनेक धर्म आणि अनेक पंथ हे मजकडे येण्याचेच अनेक मार्ग आहेत.' 'मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ।' हा भगवान् श्रीकृष्णांचा निरोप स्वामीजींनीं तेथें कथन केला. 'यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥' हें भगवंताचें वचन कथन करून, अनेक पंथांची आणि धर्मांची स्वामीजींनीं जणुं एकवाक्यताच केली. 'मनुष्य पापांतून पुण्याकडे प्रवास करीत नाहीं; दुःखांतून सुखाकडे जात नाहीं; अथवा असत्यांतून सत्यांत प्रवेश करीत नाहीं; तर कमी पुण्यांतून अधिक पुण्यांत, कमी सुखांतून अधिक सुखांत व अंधुक सत्यांतून पूर्ण प्रकाशमान् सत्यांत प्रवेश करतो. चैतन्याचा अनुभव घेऊन तो स्वतः पूर्ण चैतन्यस्वरूप होतो. ज्या दिवशीं मनुष्य प्राणी स्वतः सच्चिदानंदरूप होईल त्या दिवशींच त्याच्या धर्मजीवनाचा शेवट झाला असें म्हणतां येईल. सकल विश्वांत मृत्यूचें साम्राज्य असतां अविनाशी स्वरूप सांपडणें, विश्वाच्या स्वरूपांत दरक्षणीं बदल होत असतां त्याच्या स्थिर अधिष्ठानावर आपण आरूढ होणें व अनेकतेनें भासमान् होणाऱ्या विश्वचैतन्याची एकतानता अनुभविणें ही जीविताची इतिकर्तव्यता आहे;' असा निरोप त्या दिवशीं भारतीय राष्ट्रपुरुषानें तरुण पाश्चात्य राष्ट्रपुरुषास स्वामीजींच्या मुखानें कथन केला.

सर्व जगाला धर्मज्ञान सांगण्याचा जो हक्क भरतभूमीला आहे त्याचा जणुं ताम्रपटच स्वामींच्या हस्तें कोरला गेला आहे. स्वामींनीं उभारलेली धर्माची

इमारत वेदांच्या पायावर आहे; पण खुद्द 'वेद' या शब्दाची व्याख्याहि त्यांनीं धार्मिकस्वरूपाची केली आहे. ते ह्मणतात 'वेद ह्मणजे पुस्तकें नव्हत. निरनिराळ्या ऋषींनीं जे धार्मिक सिद्धांत ठरविले, त्या सर्वांस समुच्चयेंकरून वेद अशी संज्ञा आहे. जें कांहीं सत्य असेल तें सर्व वेद या संज्ञेस पात्र आहे.' सनातनधर्माचें स्वरूप सांगतांना ते ह्मणाले 'वेदांताच्या अत्युच्च तत्वांपासून तों पौराणिक स्वरूपाच्या मूर्तिपूजेपर्यंतचे सर्व पंथ, तसेंच बुद्धाचा शून्यवाद व जैनांचें निरीश्वरमत या सर्वांचा सनातन धर्मांत अंतर्भाव होतो. हिंदूंतील अनेक मतें व मूर्तिपूजादिकांचे प्रकार इतरांच्या दृष्टीनें वेडगळपणाचे दिसले तरी तीं परिस्थित्यनुरूप झालेलीं एकाच सनातनधर्माचीं अनेक रूपें आहेत.' प्रत्येकाची इष्ट देवता वेगळी असली ह्मणून त्याचा धर्म वेगळा होत नाहीं असें स्वामींचें मत होतें. किंबहुना स्वतःची स्वतंत्र इष्टदेवता व इष्टमार्ग असणें हा प्रत्येकाचा हक्कच आहे असें ते ह्मणत. सनातनधर्माची ही व्याख्या मान्य केली ह्मणजे हिंदुधर्माइतकें विस्तृत साम्राज्य दुसऱ्या कोणत्याहि धर्माचें नाहीं असें दिसून येईल. किंबहुना तें विश्वव्यापी साम्राज्यच होय. खुद्द ब्रह्माची भेट होईपर्यंत सनातनधर्माचा मार्ग संपत नाहीं. प्रत्येक व्यक्तीला त्यानें पूर्ण स्वातंत्र्य दिलें आहे परमात्म्याची भेट कोणत्या मार्गानें घ्यावी हें ज्याचें त्यानें ठरवावें. धर्मस्वातंत्र्याचें हें अत्यंत परिणत रूप आहे.

पण सनातनधर्माची प्रौढी केवळ इतक्यानेंच संपते असें नाहीं. प्रत्येक व्यक्तीस धर्माचें पूर्ण स्वातंत्र्य त्यानें ठेविलें आहे; इतकेंच नव्हे तर प्रत्येक व्यक्ति पूर्ण स्वतंत्र–मुक्त–आहे, मृत्यूच्या पलीकडे आहे आणि केवळ आनंदरूप आहे, असें तो उच्चघोषानें सांगत आहे. 'सच्चिदानंद' या एका शब्दांत अनेक धर्मांचा आणि अनेक पंथांचा अंतर्भाव होतो. या एका शब्दाच्या अनुभवाकरितांच हे अनेक धर्म आणि अनेक पंथ इतका काल खटपट करीत आहेत. एका व्याख्यानांत स्वामी ह्मणाले, 'देवळाची एक नवी इमारत बांधण्याचें काम सध्या आपणा सर्वांस करावयाचें आहे. त्या ठिकाणीं येण्यास प्रत्येक व्यक्तीस पूर्ण अधिकार असावा. त्याच्या गाभाऱ्यांत फक्त ॐ या एका अक्षराचीच स्थापना करावयाची. या कामीं आपणा सर्वांच्या मदतीची मी याचना करतों.' स्वामीजींचे हे शब्द ऐकून आह्मांपैकीं कित्येकांच्या मनांत भरतभूमिरूपी विश्वदेवालयाची कल्पना उभी राहिली. जगांतील सर्व धर्मांचे लोक या प्रचंड देवालयांत एकवटले आहेत. नामरूपातीत अशा स्वरूपाची भेट घ्यावयाची हाच त्यांचा उद्देश आहे.

आह्मी अनंत मार्गांनीं चालत असलों, तरी सर्वांच्या भेटीचें ठिकाण सनातनधर्मांतच आहे. दृश्यांतून अदृश्यांत प्रवेश करणें, आकारांतून निघून निराकारांत जाणें आणि अनंतत्वांत एकत्व अनुभविणें हाच सर्वांचा उद्देश आहे. याविरुद्ध कोणीहि मार्ग आक्रमण करीत नाहीं, असें सांगणाऱ्या धर्माची इतर सर्व उच्च धर्मांशीं एकवाक्यता असली तर त्यांत नवल काय? इतर मोठया धर्मांत आणि सनातनधर्मांत फरक असला तर तो इतकाच कीं स्वतःस पवित्र व इष्ट वाटणाऱ्या मार्गानें जाण्याची त्यानें प्रत्येकास पूर्ण परवानगी दिली आहे.

स्वामीजींनीं निवळ आपल्या पदरचें असें कांहींसुद्धां सांगितलें नाहीं. भगवान् श्रीकृष्णाप्रमाणें, अथवा भगवान् श्रीशंकराचार्यांप्रमाणें त्यांनीं प्रत्येक वाक्य श्रुति आणि उपनिषदें यांच्या आधारानेंच उच्चारलें आहे. सनातनधर्म नव्या परिस्थितीस अनुकूल अशा स्वरूपानें सांगावयाचा इतकीच कामगिरी त्यांनीं केली. स्वामीमहाराज जन्मास आले नसते तरी त्या प्रमेयांस कांहीं उणीव आली असती असें नाहीं. फरक इतकाच कीं, नव्या परिस्थितीमुळें त्यांचें स्पष्ट स्वरूप आह्मांस समजलें नसतें. त्यांतील विरोधाभासानें आमचा गोंधळ झाला असता. आह्मासारख्या आर्तांस मोक्षमार्ग आज पूर्ण उघडला गेला आहे, तो स्वामीजींच्या अभावीं बंद राहिला असता. सनातनधर्माचें प्रवचन स्वामींनीं पूर्ण अधिकारयुक्त वाणीनें केलें आहे; पण तें केवळ वाक्पटु पंडिताप्रमाणें नसून अनुभवी ब्रह्मनिष्ठाप्रमाणें केलें आहे. स्वामी श्रोत्रीय असून ब्रह्मनिष्ठहि होते. चैतन्यरत्नाकराच्या तळापर्यंत बुडी मारून तेथील संपूर्ण कोश त्यांनीं प्रथम हस्तगत केला आणि नंतर आह्मां पामरांच्या करुणेस्तव तो मार्ग त्यांनीं प्रकट केला. हा आप्त, हा परका, हा ब्राह्मण आणि हा चांडाळ असा भेद मनांतहि न आणतां त्यांनीं हें गुह्य सर्वांस सारखेंच प्रकट केलें.

त्यांनीं नवें असें कांहींच सांगितलें नाहीं असें ह्मटलें, तथापि तसें ह्मणणेंहि थोडेंसें अयुक्त आहे. अद्वैतसिद्धांत हा यच्चयावत् धर्ममार्गांचा मुकुटमणि आहे, असें सांगतांना त्यांनीं द्वैत आणि विशिष्टाद्वैत या अद्वैतसिद्धांताच्या पायऱ्या आहेत असेंही सांगितलें, हें विसरतां कामा नये. परमेश्वर साकार आहे आणि निराकारहि आहे, असें भगवान् श्रीरामकृष्ण ह्मणत असत. एकाच ब्रह्माचीं व्यक्त आणि अव्यक्त अशीं दोन स्वरूपें असून निरनिराळ्या दर्जाच्या भावनेनुरूप त्यांचा अनुभव होतो, आणि सर्वत्र एकरूपच पाहणें 'एकमेवाद्वितीयम्' असा अनुभव होणें ही अत्युच्च अनुभवाची भावना आहे, असें श्रीरामकृष्ण यांचें मत

आह्मी अनंत मार्गांनीं चालत असलों, तरी सर्वांच्या भेटीचें ठिकाण सनातनधर्मांतच आहे. दृश्यांतून अदृश्यांत प्रवेश करणें, आकारांतून निघून निराकारांत जाणें आणि अनंतत्वांत एकत्व अनुभविणें हाच सर्वांचा उद्देश आहे. याविरुद्ध कोणीहि मार्ग आक्रमण करीत नाहीं, असें सांगणाऱ्या धर्माची इतर सर्व उच्च धर्मांशीं एकवाक्यता असली तर त्यांत नवल काय ? इतर मोठ्या धर्मांत आणि सनातनधर्मांत फरक असला तर तो इतकाच कीं स्वतःस पवित्र व इष्ट वाटणाऱ्या मार्गानें जाण्याची त्यानें प्रत्येकास पूर्ण परवानगी दिली आहे.

स्वामीजींनीं निवळ आपल्या पदरचें असें कांहींसुद्धां सांगितलें नाहीं. भगवान् श्रीकृष्णाप्रमाणें, अथवा भगवान् श्रीशंकराचार्यांप्रमाणें त्यांनीं प्रत्येक वाक्य श्रुति आणि उपनिषदें यांच्या आधारानेंच उच्चारलें आहे. सनातनधर्म नव्या परिस्थितीस अनुकूल अशा स्वरूपानें सांगावयाचा इतकीच कामगिरी त्यांनीं केली. स्वामीमहाराज जन्मास आले नसते तरी त्या प्रमेयांस कांहीं उणीव आली असती असें नाहीं. फरक इतकाच कीं, नव्या परिस्थितीमुळें त्यांचें स्पष्ट स्वरूप आह्मांस समजलें नसतें. त्यांतील विरोधाभासानें आमचा गोंधळ झाला असता. आह्मासारख्या आर्तांस मोक्षमार्ग आज पूर्ण उघडला गेला आहे, तो स्वामीजींच्या अभावीं बंद राहिला असता. सनातनधर्माचें प्रवचन स्वामींनीं पूर्ण अधिकारयुक्त वाणीनें केलें आहे; पण तें केवळ वाक्पटु पंडिताप्रमाणें नसून अनुभवी ब्रह्मनिष्ठाप्रमाणें केलें आहे. स्वामी श्रोत्रीय असून ब्रह्मनिष्ठहि होते. चैतन्यरत्नाकराच्या तळापर्यंत बुडी मारून तेथील संपूर्ण कोश त्यांनीं प्रथम हस्तगत केला आणि नंतर आह्मां पामरांच्या करुणेस्तव तो मार्ग त्यांनीं प्रकट केला. हा आप्त, हा परका, हा ब्राह्मण आणि हा चांडाळ असा भेद मनांतहि न आणतां त्यांनीं हें गुह्य सर्वांस सारखेंच प्रकट केलें.

त्यांनीं नवें असें कांहींच सांगितलें नाहीं असें ह्मटलें, तथापि तसें ह्मणणेंहि थोडेंसें अयुक्त आहे. अद्वैतसिद्धांत हा यच्चयावत् धर्ममार्गांचा मुकुटमणि आहे, असें सांगतांना त्यांनीं द्वैत आणि विशिष्टाद्वैत या अद्वैतसिद्धांताच्या पायऱ्या आहेत असेंही सांगितलें, हें विसरतां कामा नये. परमेश्वर साकार आहे आणि निराकारहि आहे, असें भगवान् श्रीरामकृष्ण ह्मणत असत. एकाच ब्रह्माचीं व्यक्त आणि अव्यक्त अशीं दोन स्वरूपें असून निरनिराळ्या दर्जाच्या भावनेनुरूप त्यांचा अनुभव होतो, आणि सर्वत्र एकरूपच पाहणें ‘ एकमेवाद्वितीयम् ’ असा अनुभव होणें ही अत्युच्च अनुभवाची भावना आहे, असें श्रीरामकृष्ण यांचें मत

अनुक्रमणिका.

आह्मी अनंत मार्गांनीं चालत असलों, तरी सर्वांच्या भेटीचें ठिकाण सनातनधर्मांतच आहे. दृश्यांतून अदृश्यांत प्रवेश करणें, आकारांतून निघून निराकारांत जाणें आणि अनंतत्वांत एकत्व अनुभविणें हाच सर्वांचा उद्देश आहे. याविरुद्ध कोणीहि मार्ग आक्रमण करीत नाहीं, असें सांगणाऱ्या धर्मांची इतर सर्व उच्च धर्मांशीं एकवाक्यता असली तर त्यांत नवल काय ? इतर मोठ्या धर्मांत आणि सनातनधर्मांत फरक असला तर तो इतकाच कीं स्वतःस पवित्र व इष्ट वाटणाऱ्या मार्गानें जाण्याची त्यानें प्रत्येकास पूर्ण परवानगी दिली आहे.

स्वामीजींनीं निवळ आपल्या पदरचें असें कांहींसुद्धां सांगितलें नाहीं. भगवान् श्रीकृष्णाप्रमाणें, अथवा भगवान् श्रीशंकराचार्यांप्रमाणें त्यांनीं प्रत्येक वाक्य श्रुति आणि उपनिषदें यांच्या आधारानेंच उच्चारलें आहे. सनातनधर्म नव्या परिस्थितीस अनुकूल अशा स्वरूपानें सांगावयाचा इतकीच कामगिरी त्यांनीं केली. स्वामीमहाराज जन्मास आले नसते तरी त्या प्रमेयांस कांहीं उणीव आली असती असें नाहीं. फरक इतकाच कीं, नव्या परिस्थितीमुळें त्यांचें स्पष्ट स्वरूप आह्मांस समजलें नसतें. त्यांतील विरोधाभासानें आमचा गोंधळ झाला असता. आह्मासारख्या आर्तांस मोक्षमार्ग आज पूर्ण उघडला गेला आहे, तो स्वामीजींच्या अभावीं बंद राहिला असता. सनातनधर्मांचें प्रवचन स्वामींनीं पूर्ण अधिकारयुक्त वाणीनें केलें आहे; पण तें केवळ वाक्पटु पंडिताप्रमाणें नसून अनुभवी ब्रह्मनिष्ठाप्रमाणें केलें आहे. स्वामी श्रोत्रीय असून ब्रह्मनिष्ठहि होते. चैतन्यरत्नाकराच्या तळापर्यंत बुडी मारून तेथील संपूर्ण कोश त्यांनीं प्रथम हस्तगत केला आणि नंतर आह्मां पामरांच्या करुणेस्तव तो मार्ग त्यांनीं प्रकट केला. हा आप्त, हा परका, हा ब्राह्मण आणि हा चांडाळ असा भेद मनांतहि न आणतां त्यांनीं हें गुह्य सर्वांस सारखेंच प्रकट केलें.

त्यांनीं नवें असें कांहींच सांगितलें नाहीं असें ह्मटलें, तथापि तसें ह्मणणेंहि थोडेंसें अयुक्त आहे. अद्वैतसिद्धांत हा यच्चयावत् धर्ममार्गांचा मुकुटमणि आहे, असें सांगतांना त्यांनीं द्वैत आणि विशिष्टाद्वैत या अद्वैतसिद्धांताच्या पायऱ्या आहेत असेंही सांगितलें, हें विसरतां कामा नये. परमेश्वर साकार आहे आणि निराकारहि आहे, असें भगवान् श्रीरामकृष्ण ह्मणत असत. एकाच ब्रह्माचीं व्यक्त आणि अव्यक्त अशीं दोन स्वरूपें असून निरनिराळ्या दर्जाच्या भावनेनुरूप त्यांचा अनुभव होतो, आणि सर्वत्र एकरूपच पाहणें ‘ एकमेवाद्वितीयम् ’ असा अनुभव होणें ही अत्युच्च अनुभवाची भावना आहे, असें श्रीरामकृष्ण यांचें मत

होतें. त्याचाच अनुवाद सशास्त्र पद्धतीनें करून स्वामींनीं या परस्परविरोधी दिसणाऱ्या मतांची एकवाक्यता केली हें विसरतां कामा नये. स्वामींच्या प्रवचनांत जो नवीनपणा आहे, तो हाच.

अशा रीतीनें पौर्वात्य व पाश्चात्य आणि जुनें व नवें यांचा पूर्ण संधि करून भांडणाचें बीजच ज्यांनीं दग्ध करून टाकलें ते माझे सद्गुरु धन्य होत! धर्ममंदिरावर हा कळसच त्यांनीं उभारला असें कोण ह्मणणार नाहीं? जर 'एकमेवा द्वितीयम्' हें खरें आहे तर पूजनाचे सर्व मार्ग खरे आहेत, एवढेंच नव्हे तर सर्व प्रकारचीं कर्में आणि एकंदर जीवनक्रम हे सर्व पूजाविधिच आहेत असें ह्मणावयास काय हरकत आहे? याकरितां अमुक कृत्य ऐहिक आणि अमुक पारलौकिक हा भेदसुद्धां खोटाच ह्मटला पाहिजे. कर्म करणें हा सुद्धां पूजाविधीच आहे. मनोजय हाच त्याग. सर्व मानवी जीवनक्रमच धर्मरूप आहे. सदैव कार्यमग्न राहणें हें जितकें कठीण आहे, तितकेंच संन्यस्त होणें हेंहि आहे. दोहोंचेंहि अंतिम पर्यवसान एकच.

ज्ञान आणि भक्ति यांपासून कर्म वेगळें नाहीं असें विवेकानंदांनीं सांगितलें त्याचें रहस्य हेंच होय. परमेश्वराची भेट मठांत अथवा देवळांतच होते असें नाहीं; तर ती एखाद्या कारखान्यांत अथवा शेतांतील झोंपडींतहि होऊं शकते. परमेश्वराच्या सेवेंत राहून जसा परमेश्वर भेटतो, तसाच तो मनुष्याच्या सेवेनेंहि भेटतो. जनतेची सेवा तीच परमात्म्याचीहि सेवा होय. जनतेच्या सेवेकरितां लढणारा वीर आणि कोणाच्या स्तुतीचीहि अपेक्षा न करितां आपल्या उद्दिष्ट सिद्धीकरितां खटपट करणारा सामान्य मनुष्य यांची योग्यता स्वामींच्या दृष्टीनें सारखीच आहे. आपणांस धार्मिक न ह्मणवितां खऱ्या सन्मार्गानें चालणारा मनुष्य आणि अत्यंत धार्मिक मनुष्य यांत योग्यतेच्या दृष्टीनें फरक नाहीं, असें ते ह्मणत. 'सर्व भौतिकशास्त्रें, विद्या व धर्मशास्त्रें एकाच सत्याचा शोध करीत आहेत; पण हें बरोबर समजण्यास आपणांस अद्वैतसिद्धांत प्रथम नीट कळला पाहिजे,' असें स्वामींनीं एके ठिकाणीं ह्मटलें आहे. त्यांच्या एकंदर लेखांत व व्याख्यानांत याच तत्वाचा त्यांनीं सर्वत्र अनुवाद केला आहे; किंबहुना त्यांचे सर्व लेख व व्याख्यानें या एकाच तत्वाच्या प्रतिपादनार्थ केलेल्या टीकाच आहेत असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं.

स्वामी विवेकानंद यांनीं संस्कृत आणि इंग्रजी या दोन्ही भाषांचें चांगलें अध्ययन केलें होतें. या दोन्ही संस्कृतींचा परिणाम स्वामीजींच्या मनावर एकदम झाल्या-

मुळें त्यांच्या परस्परविरोधी स्वरूपाकडे त्यांचें चित्त वेधलें. परस्परविरुद्ध अशा या संस्कृतींत सत्य कोणती याचा विचार मनांत आल्यावर त्यांची बुद्धि आपोआप जागृत होऊन विचारमालिकेस सुरवात झाली. विवेचकबुद्धीचें पूर्ण समाधान होईपर्यंत मध्यंतरीं कोठेंहि विसावा न घेतां सशास्त्र पद्धतीनें या दोन्ही संस्कृतींचा त्यांनीं अभ्यास केला. या मार्गाचें अंतिम पर्यवसान अद्वैतमतांत झालें. पूर्वकालीन ऋषींना तरी अद्वैतसिद्धांत कांहीं अगम्य रीतीनें अथवा केवळ दैववशात् प्राप्त झाला होता असें नाहीं. त्याकरितां त्यांनाहि आपल्या बुद्धीस आटोकाट ताण द्यावा लागला होता.

ज्या अद्वैताची सिद्धि बुद्धीनें केली होती, त्याचेंच प्रत्यक्ष स्वरूप नरेंद्रास (विवेकानंदाचें पूर्वाश्रमींचें नांव) दक्षिणेश्वराच्या देवालयांतील उद्यानांत दिसलें. पूर्वकालीन ऋषींनीं सांगितलेलें व बुद्धीनें कबूल केलेलें रूप भगवान् श्रीरामकृष्ण या विभूतींत अवतरलें आहे, अशी नरेंद्राची खात्री झाली. ज्याचें परोक्ष वर्णन ग्रंथांनीं केलें तें रूप त्यांस प्रत्यक्षच दिसलें. समाधि हाच ज्यांचा ज्ञानार्जनाचा मार्ग व ज्यांचें भाषण ह्मणजे प्रत्यक्ष ज्ञानाचें व्यक्तरूप अशा श्रीरामकृष्णांचें त्यांस दर्शन झालें. त्यांच्या दर्शनाबरोबर परमात्मदर्शनाची उत्कंठा उद्भवली. क्षणक्षणा वाढणाऱ्या तापाप्रमाणें ती इच्छा बळावत गेली. ग्रंथांनांहि ज्याचें पूर्ण वर्णन करतां आलें नाहीं त्या स्वरूपांत निमग्न असणाऱ्या श्रीरामकृष्णांस ग्रंथांत काय सांगितलें आहे याची खबरहि नव्हती ! श्रीरामकृष्णांच्या प्रसादानें मानवी जीविताचें रहस्य विवेकानंदांनीं हस्तगत केलें.

पण इतक्यानेंच त्यांच्या कार्याची पूर्वतयारी संपली नाहीं. यानंतर त्यांनीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत प्रवास करून अनेक संतमहंत आणि श्रोत्रीय यांच्या भेटी घेतल्या. सामान्य मनुष्यांशींहि स्वामीजी अगदीं बरोबरीच्या नात्यानें वागत. सामान्य मनुष्यापासूनहि जें घेण्यासारखें दिसलें, त्याचा त्यांनीं संग्रह केला. परमहंस श्रीरामकृष्ण आणि इतर संत यांच्यापासून ज्याप्रमाणें भरतभूमीच्या प्राचीन स्वरूपाची माहिती त्यांस मिळाली त्याप्रमाणें सध्याच्या भरतभूमीची माहिती त्यांनीं सामान्य जनांपासून मिळविली.

अशा रीतीनें जें ज्ञान त्यांनीं, शास्त्रें, सद्गुरु आणि प्रवास यांच्यायोगें प्राप्त करून घेतलें, तेंच त्यांनीं जगास परत दिलें. ज्ञानाच्या या त्रिविधरूपाची छाया त्यांच्या सर्व भाषणांत स्पष्ट उमटलेली आहे. या त्रिविधज्ञानापासून सर्व जगाचा ताप हरण करणारी दिव्य औषधि त्यांनीं निर्माण केली. या तीन वातींनीं जो

ज्ञानदीप भरतभूमीनें त्यांच्या हस्तें लाविला आहे, त्याच्या योगानें तिच्या मुलांचाच नव्हे तर सर्व सृष्टीचा मोक्षमार्ग प्रकाशित झाला आहे. ता. १९ सप्टेंबर १८९३ पासून ता. ४ जुलै १९०२ पर्यंतच्या कालांत हें सर्व काम त्यांनीं केलें. ज्या भूमीनें हें नररत्न आह्मांस दिलें तिचा सदा विजय असो! ज्यांच्या प्रेरणेनें तें प्रकट झालें ते विजयी असोत ! त्यांनीं केलेल्या कार्याचा अंतिम हेतु जाणण्याची बुद्धि आह्मांस नाहीं.

रामकृष्ण–विवेकानंदशिष्या,


निवेदिता.

अनुक्रमणिका.



भगवान् श्रीरामकृष्ण परमहंस.

स्वामी विवेकानंद.



ब्रह्मस्वरूप ब्रह्मज्ञ ब्रह्मभावे च तत्पर ।
ब्रह्मबीजस्वरूपेण ब्रह्मबीज नमोस्तुते ॥

स्वामी विवेकानंद यांचे समग्र ग्रंथ.

प्रथम खंड.

सर्व धर्मांच्या परिषदेपुढें दिलेलीं व्याख्यानें.

१. अमेरिकेंतील स्वागतास उत्तर.

ता. ११ सप्टेंबर १८९३.

माझ्या अमेरिकन भगिनिबंधूंनो,

आह्मां सर्व धर्मांच्या प्रतिनिधींचें जें तुह्मीं अंतःकरणपूर्वक स्वागत केलें त्याजबद्दल तुह्मां सर्वांचे आभार मानण्यास मला अत्यानंद होत आहे. खरी संन्यस्तवृत्ति ह्मणजे काय हें आपल्या उदाहरणानें ज्यांनीं जगाच्या प्रथम निदर्शनास आणिलें त्यांच्या वतीनें, तसेंच जगांतील सर्व धर्मांची जननी असा जो हिंदुधर्म, त्या धर्मांच्या वतीनें आणि निरनिराळ्या वर्णांच्या व धर्ममार्गांच्या कोट्यवधि हिंदूलोकांच्या वतीनें मी सर्वांचे आभार मानितों.

तसेंच जगाच्या लांबलांबच्या भागांतून येथें आलेल्या प्रतिनिधींपैकीं ज्यांनीं आह्मां पौर्वात्यांच्या परमतसहिष्णुतेचा प्रसार, आपापल्या देशांत करण्याचें वचन दिलें, त्या सर्व प्रतिनिधींचेहि मी आभार मानितों. परधर्मसहिष्णुता आणि विश्वबंधुत्व यांची ओळख साऱ्या जगास ज्या धर्मानें प्रथम करून दिली त्या धर्मांत माझा जन्म झाला याचा मला मोठा अभिमान वाटतो. सर्व धर्मांबद्दल सहिष्णुता बाळगावी इतकेंच नव्हे तर सर्व धर्म सत्य आहेत, असा आमचा समज आहे. स्वतःच्या राष्ट्रांत मतभेदामुळें ज्यांचा छळ झाला व वित्त आणि जीवित यांसहि सुरक्षितपणा राहिला नाहीं, अशा सर्व धर्मांच्या व सर्व जातींच्या लोकांस ज्या भूमीनें आपल्या पोटांत घेतलें, तीच माझी जन्मभूमी आहे, याचा मला अभिमान वाटतो. रोमनराष्ट्राच्या जुलमानें ज्यांचा धर्म नामशेष होण्याच्या मार्गास लागला त्या यहुदी लोकांस माझ्या जन्मभूमीनें आपल्या

ओटींत घेतलें. पूर्वकाळीं सुप्रसिद्ध असलेल्या जरदुष्ट्रानुयायांसहि, आमच्याच देशांत आश्रय मिळाला. प्रिय बंधूंनो, माझ्या लहानपणापासून माझ्या नित्य पाठांत असलेलें एक सूक्त मला आठवलें तें मी तुह्मांस ह्मणून दाखवितों. लक्षावधि हिंदुलोकांच्या नित्यपाठांत तें सूक्त आहे.

आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ॥
सर्वदेवनमस्कारं केशवंप्रति गच्छति ॥

'येऽप्यन्यदेवताभक्ता यजंते श्रद्धयान्विताः ॥ तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम् ॥' असें जें श्रीकृष्णांनीं गीतेंत ह्मटलें आहे त्याची सत्यता जगास पटविण्याकरितांच जणू काय तुमची ही सर्वधर्मपरिषदेची कल्पना उदयास आली. परमतासहिष्णुता, बुद्धीचा आकुंचितपणा आणि त्यामुळें उद्भवणारें धर्मवेड यांचें पृथ्वीतलावर आज दीर्घ कालपर्यंत साम्राज्य सुरू आहे. या धर्मवेडामुळें किती भयंकर जुलूम झाले, केवढाले रक्तपात झाले, संस्कृतीस कैक जबर धक्के बसले आणि कैक मोठमोठीं राष्ट्रें निराशापंकांत रुतून गेलीं. जर धर्मवेड पृथ्वीवर जन्मास आलें नसतें तर मानवजातीची आजला जी स्थिति आपण अनुभवित आहों तीहून खास अधिक चांगली प्रगति आपणांस पाहावयास सांपडली असती; परंतु आतां या धर्मवेडाचें आयुष्य भरत आल्याचीं शुभचिन्हें दृग्गोचर होऊं लागलीं आहेत. आपल्या आजच्या सभेचें काम सुरू झाल्याचा सूचक ह्मणून जो मोठा घंटानाद झाला, त्यानें जणू काय ह्या धर्मवेडाचा मृत्यु झाल्याचेंच जगास जाहीर केलें. सर्व जग निरनिराळ्या मार्गांनीं परंतु एकाच केंद्राकडे धांव घेत आहे; त्याजमधील द्वेषबुद्धि लयास गेली आहे व आतां तरवारीच्या धारेनें अथवा इतर कोणत्याहि मार्गानें परस्परांचा छळ करण्याचे दिवस उरले नाहींत, असेंच त्या घंटानादानें जगास सूचित केलें आहे.

---

२. मतभेद कां होतो ?

ता. १५ सप्टेंबर १८९३.

माझ्या पूर्वीच्या एका वक्त्यानें जगांत सर्वत्र मतभेद दिसतो याबद्दल दुःख प्रदर्शित करून ' आपण हीं भांडणें बंद करूं या ' अशी विनंति केली. माझ्या लहानपणीं ऐकिलेली एक गोष्ट मी तुम्हांस सांगणार आहें. जगांत सर्वत्र मतभेद कां दिसतो याचें विवेचन या लहानशा गोष्टीवरून बरेंच होण्याजोगें आहे.

एका विहिरींत एक बेडूक राहत होता. तो बराच काळपर्यंत त्या विहिरीचा रहिवासी होता. त्याला डोळ्यांनीं दिसत होतें कीं नाहीं हें सांगण्यास आपले सध्याचे उत्क्रांतिवादी तेथें हजर नव्हते. परंतु त्या बेडकाला दृष्टि होती असें धरून चालण्यास नड नाहीं. विहिरींतील सर्व विषारी कीटक नाहींसे करून तिचें पाणी शुद्ध करण्याचा उद्योग तो बेडूक सदोदित करित असे. सध्याच्या जंतुशास्त्रज्ञांसहि हेवा वाटण्याइतकें त्या बेडकानें विहिरीचें पाणी शुद्ध ठेविलें होतें. कालेंकरून तो बेडूक चांगलाच पुष्ट दिसूं लागला होता. असो. एके दिवशीं कर्मवशात् समुद्रांतला एक बेडूक त्या विहिरींत आला. तेव्हां त्यांजमध्यें एक गमतीचा संवाद झाला.

" दादा, तूं कोठून आलास ? "

" मी समुद्रांतून आलों. "

" तुझा तो समुद्र केवढासा आहे बरें ? माझ्या या विहिरीएवढा मोठा आहे काय ? " असें म्हणून विहिरींतल्या बेडकानें या कांठावरून त्या कांठावर उडी मारिली.

" वेड्या, तुझ्या या विहिरीची आणि माझ्या समुद्राची तुलना तरी होणें शक्य आहे काय ? "

आणखी एक उडी मारून विहिरींतला बेडूक म्हणाला, " खचित, तुझा समुद्र एवढा मोठा नसेल. " दुसरा उत्तर करितो, " अहो अकलेचे खंदक, माझा समुद्र आणि तुमची विहिर यांच्या तुलनेचा नुसता विचारहि हास्यास्पद आहे, हें मीं पूर्वीं सांगितलें तें विसरलां वाटतें ? "

विहिरींतला बेडूक मोठ्यानें ओरडून म्हणाला, " जा, जा. माझ्या विहिरीपेक्षां मोठें असें कांहीं असणें शक्यच नाहीं. तूं अगदीं खोटें बोलतोस. चल, येथून चालता हो. "

आपलीं मनुष्यांतलीं भांडणेंहि बहुधा याच प्रकारचीं असतात. एक हिंदु आपल्या लहानशा खबदाडांत बसून सारें जग म्हणजे तें खबदाड असें म्हणतो. अशाच रीतीनें ख्रिस्ती, मुसलमान वगैरे लोक आपआपल्या खबदाडांत सर्व विश्व सांठविलें असल्याचें कंठरवानें सांगूं लागतात.

माझ्या अमेरिकन बंधूंनो, या सर्व निरनिराळ्या खबदाडांच्या भिंती जमीनदोस्त करून सर्वांस अफाट मैदानावर आणण्याचा जो स्तुत्य उद्योग तुम्हीं

आरंभिला आहे, त्याजबद्दल तुमचे किती आभार मानावे! या तुमच्या उद्योगांत परमेश्वर खचित तुह्मांस साहाय्य करील.

६. हिंदुधर्माचें स्वरूप.

ता. १९ सप्टेंबर १८९३.

इतिहासकालाच्या पूर्वीपासून आजपर्यंत चालत आलेले असे तीन धर्म आपणास सांप्रत उपलब्ध आहेत. हिंदुधर्म, जरदुष्ट्राचा धर्म आणि यहुदीधर्म. यहुदी धर्माची स्थिति पाहिली तर त्याच्याच पोटांतून निघालेल्या ख्रिस्तीधर्मानें त्याची अगदीं धुळधाण करून त्यास जन्मभूमींतूनसुद्धां हद्दपार केलें. जरदुष्ट्राच्या धर्मांचीहि जवळजवळ तीच अवस्था आहे. पूर्वी जरदुष्ट्राचा धर्म होता इतकें दर्शविण्यापुरती मूठभर पारशी लोकांची संख्या सध्या अवशिष्ट राहिली आहे. हिंदुधर्मावरहि अनेक हल्ले आजपर्यंत झाले. खुद्द त्याच धर्मांत अनेक पोटपंथ उपस्थित होऊन कांहीं वेळ त्यांचें एवढें प्राबल्य माजलें कीं वृद्ध वैदिकधर्म आतां नामशेष होतो कीं काय अशी भीति वाटूं लागली. परंतु त्यावेळीं दिसणारी पिछेहाट केवळ थोड्या वेळेपुरतीच होती. वैदिकधर्माचें आणि त्याच्यांच पोटांतून निघालेल्या या अनेक पंथांचें युद्ध संपून जरा स्थिरता आल्या-बरोबर वैदिकधर्म जीवंत राहिला एवढेंच नव्हे, तर पूर्वीपेक्षां दुप्पट जोरानें फोंफावूं लागल्याचें नजरेस आलें. वैदिकधर्मानें या सर्व पंथांतील आणि मतांतील तात्विक विचार खाऊन पचवून टाकिले.

ज्यांचा केवळ लहानसा प्रतिध्वनि आधुनिक भौतिक शास्त्रें काढित आहेत अशा विश्वव्यापी वेदांततत्वांपासून तों पौराणिक कालच्या मूर्तिपूजेपर्यंत व बौद्धांचा शून्यवाद आणि जैनांचा निरीश्वरवाद यांतील सर्व तत्वविचार ज्यांत ग्रथित झाले आहेत असा सांप्रतचा हिंदुधर्म आहे. तर मग या अगदीं परस्पर विरुद्ध दिसत असलेल्या तत्वांचें कोठें तरी केंद्रीकरण होणें शक्य आहे काय? अगदीं निरनिराळ्या दिसणाऱ्या या इमारतींचा एक सर्वसामान्य पाया असणें शक्य आहे काय? इत्यादि प्रश्नांची परंपरा आपोआप उद्भवते. याच प्रश्नांचीं समर्पक उत्तरें देण्याचा आज मी यत्न करून पाहणार आहें.

हिंदुधर्माची मूळ उत्पत्ति वेदांपासून झाली आहे. वेद अपौरुषेय आहेत व आदिअंतरहित आहेत असें हिंदूंचें मत आहे. एखाद्या पुस्तकाला आरंभ नाहीं व शेवटहि नाहीं ही गोष्ट तुह्मास खचित हास्यास्पद वाटेल; परंतु

वेद या शब्दानें एखाद्या विशिष्ट पुस्तकाचा उल्लेख केला जात नाहीं हें आपण ध्यानांत धरा. निरनिराळ्या महात्म्यांनीं निरनिराळ्या वेळीं जे विश्वव्यापी सिद्धांत शोधून काढिले, त्या सिद्धांतांच्या समुच्चयास वेद अशी संज्ञा आहे. न्यूटननें शोधून काढीपर्यंतहि गुरुत्वाकर्षणाचा नियम गतिनियमन करित होता आणि सर्व मानवजाति तो नियम विसरून गेली तरीहि तो आपलें काम सोडणार नाहीं. जड जगाचें नियमन करणारे सिद्धांत जसे कालस्थलातीत आहेत, तसेच चैतन्ययुक्त विश्वाचें नियमन करणारे सिद्धांतहि कालस्थलातीत आहेत.

निरनिराळ्या व्यक्तींचा परस्पर आत्मिक संबंध आणि सर्व व्यक्तींचा अथवा व्यष्टीचा समष्टीशीं अथवा विश्वात्म्याशीं संबंध ज्या सिद्धांतांनीं नियत झाला आहे ते सिद्धांत त्रिकालाबाधित आहेत. या सिद्धांतांचा शोध लागण्यापूर्वींहि ते अस्तित्वांत होतेच आणि उद्यां आपण ते सर्व विसरून गेलों तरीहि ते राहतीलच, यांत यत्किंचितहि संदेह नाहीं.

हे सिद्धांत ज्यांनीं शोधून काढिले त्यांस ऋषि असें ह्मणतात, आणि ते पूर्णरूप–परमेश्वरस्वरूप–आहेत असें समजून आह्मी त्यांस मान देतों. यांत कित्येक स्त्रियाहि आहेत हें मी मोठ्या आनंदानें आपणांस सांगतों.

हे सिद्धांत प्रत्यक्ष रूपानें अंतरहित असतील असें मानिलें तरी ते तशा रूपानें अनादि नसावेत असें वाटतें. एखादा समाज अस्तित्वांत आला ह्मणजे त्याच्या नियमनाकरितां कांहीं कायदे तयार होतात. आणि समाज नष्ट झाला तर त्या कायद्यांचें अस्तित्वहि संपतें. आतां त्या कायद्यांतील मूलतत्वें जरी सर्वकाल खरीं ठरणारीं असलीं तरी त्यांचें समाजाच्या अस्तित्वानंतरचें अस्तित्व केवळ भावरूप होतें. त्या मूलतत्वांचें विधिरूप ह्मणजे कायदे यांचें अस्तित्व समाजाच्या अस्तित्वाबरोबरच संपतें. तसेंच वरील सिद्धांतांचें विधिरूप प्रत्यक्ष दृग्गोचर झालें असा काल केव्हांतरी असला पाहिजे अशी कल्पना मनांत येते. ह्मणजे सृष्टि अंतरहित असली तरी अनादि नसावी अशी कल्पना मनांत येते. सृष्टि अनाद्यनंत आहे असें वेदांनीं आह्मांस सांगितलें आहे. जडविश्वांत कितीहि फेरबदल झाले तरी विश्वाच्या चैतन्योत्पादक शक्तींत कमीअधिकपणा येत नाहीं, असा सिद्धांत भौतिक शास्त्रांनींहि ठरविल्याचें माझ्या ऐकिवांत आहे. तर मग या विश्वास ज्या वेळीं सांप्रतचें मूर्तरूप नव्हतें त्यावेळीं आज दृग्गोचर होणारी ही चैतन्यशक्ति कोठें होती? ती अमूर्तरूपानें परमेश्वराच्या ठिकाणीं लीन होती असें या प्रश्नाचें उत्तर कित्येक देतात. ही कल्पना खरी मानिली तर,

कांहीं वेळ जड आणि कांहीं वेळ चैतन्यात्मक अशा द्विधा स्वरूपाचा ईश्वर आहे असें मानणें भाग पडतें. याचा अर्थ जड आणि चैतन्ययुक्त अशा भिन्न धर्मांचें मिश्रण परमेश्वर आहे असा होतो. मिश्र पदार्थांत कालेंकरून फेरबदल होत होत त्याचें दृश्य स्वरूप नष्ट होतें असा शास्त्रांचा सिद्धांत आहे. हाच नियम वरील प्रकारच्या परमेश्वरस्वरूपास लागू केला तर परमेश्वर मर्त्य आहे असा सिद्धांत निघतो आणि हें ह्मणणें तर धडधडीत खोटें आहे. याकरितां सृष्टीचा अमुक आरंभकाल आणि अमुक अंतकाल असें बोटानें दाखविणें शक्य नाहीं. ह्मणून सृष्टि ही अनाद्यनंत आहे हाच सिद्धांत निघतो. दोन वर्तुळें शेजारीं शेंजारीं ठेविलीं तर त्यांच्या रेषांचा आदि अंत ठरविणें जसें अशक्य आहे, तसेंच परमेश्वर आणि सृष्टि यांचा आदिअंत ठरविणें अशक्य आहे. परमेश्वर सदोदित चैतन्ययुक्त असून त्याच्या शक्तीनें अनंत सृष्टिमालिकांच्या घडामोडी विश्वांत नेहमीं चालू आहेत. अव्यक्तांतून व्यक्तांत येऊन कांहीं वेळ अस्तित्वांत राहून पुन्हां अव्यक्तांत लीन होणें हा सृष्टिव्यापार नेहमींचाच चालू आहे. त्यांत नवीन असें कांहींच उत्पन्न होत नाहीं. हीच गोष्ट

‘ ऋतं च सत्यं चाभीद्धात्तपसोऽध्यजायत ॥
ततोरात्र्यजायत ततः समुद्रो अर्णवः ॥
समुद्रादर्णवादधि संवत्सरो अजायत ॥
अहोरात्राणि विदधद्विश्वस्यमिषतोवशी ॥
सूर्याचंद्रमसौ धाता यथा पूर्वमकल्पयत् ॥
दिवं च पृथिवीं चांतरिक्षमथोस्वः ॥’

या श्रुतीनें दर्शित केली आहे. प्रत्येक ब्राह्मणाचा मुलगा हें सूक्त रोज ह्मणत असतो.

आपण असें समजूं कीं, तुमच्यापुढें उभा असलेला जो ‘ मी ’ त्यानें स्वतः आपण कोण याच्या विचारास सुरवात केली. मी डोळे मिटून प्रथम इतर बाह्य जग विसरतों. नंतर विचारास सुरवात होते. ‘ मी ’ ‘ मी ’ ‘ मी ’ ह्मणजे कोण? या प्रश्नाचें उत्तर ह्मणून प्रथम माझें शरीर माझ्या कल्पनाचक्षूंपुढें उभें राहतें. तर मग ‘मी’ ह्मणजे केवळ जड वस्तूंचें मिश्रण आहें काय? यावर आमचे वेद उत्तर देतात, “बाबारे, तूं जड शरीर नव्हस. तूं या जड शरीरांत राहणारें चैतन्य आहेस.” तर मग ‘मी’ ह्मणजे जड शरीर नव्हे. शरीर कालेंकरून मृत होईल. ‘मी’ मात्र मरणार नाहीं. हें शरीर मृतपिंड झालें तरीहि ‘मी’ सदोदित जिवंत राहणारच.

जसा 'मी' भविष्यकाळीं सदोदित राहणार तसाच गतकालींहि 'मी' होतोंच. आत्मा हा कोणीं निर्माण केलेला नव्हे. कारण, उत्पन्न करणें या शब्दांतच मिश्रण करणें या कल्पनेचा अंतर्भाव होतो. आणि आज जो पदार्थ मिश्रस्थितींत आहे, त्यांतील घटक कालांतरानें भिन्न होणार हा नियम आहे. ह्मणजे आत्मा जर कोणी नवा उत्पन्न केलेला असता, तर तोहि केव्हां तरी खचित मेला असता. कित्येक जन्मतःच सुखी असतात. कित्येकांची शरीरसंपत्ति जन्मतःच चांगली असते. त्यांस कशाची कधींहि वाण पडत नाहीं. कित्येक जन्मतःच दुःखी-कष्टी असतात. कित्येक जन्मतःच लंगडेलुले असतात. कित्येक जन्मतःच वेडे असतात आणि देहपातापर्यंत कसेंबसें आयुष्य कंठित असतात. जर या सर्वांचा उत्पन्नकर्ता कोणी एकच असेल तर असा भेद कां हा प्रश्न साहजिक उद्भवतो. परमेश्वर जर न्यायी आणि दयाशील ह्मणवितो तर त्यानें उत्पन्न केलेल्या पदार्थांत इतकें जमीनअस्मानाचें अंतर कां दिसावें ? बरें, आज जे दुःखी आहेत ते पुढें केव्हां तरी सुखी होतील अशी कल्पना करावी तर त्याची खातरजमा कोणी केली आहे काय ? ह्मणजे न्यायी आणि दयाशील परमेश्वरानें निर्माण केलेल्या सृष्टींत इतका भेद कां हा प्रश्न शेवटीं कायमच राहतो.

'हें सर्व ईश्वरनिर्मित आहे' या कल्पनेनें वरील अनेक प्रश्नांचा समाधानकारक निकाल लागण्याचें बाजूस राहून उलट सर्वांवर ताबा चालविणारा असा एक नवाच प्राणी ह्मणजे परमेश्वर आणखी निराळा कल्पावा लागतो. यावरून प्रत्येक प्राण्याला सुखांत अथवा दुःखांत जन्म येण्यास जन्मापूर्वीच कांहीं तरी कारणें घडलीं असलीं पाहिजेत हें उघड होतें. आणि हीं कारणें ह्मणजे त्याच प्राण्यांचीं पूर्वजन्माचीं कर्में होत.

प्रत्येक प्राण्यास पूर्वसंस्कार आहेत हें कबूल केलें ह्मणजे प्रत्येकाची निरनिराळी मनःप्रवृत्ति कां, या प्रश्नाचा समाधानकारक उलगडा होतो. प्रत्येक प्राण्यांत आपणास दोन भिन्नधर्मी पदार्थांचें मिश्रण आढळून येतें. या पदार्थांपैकीं एक पदार्थ जडशरीर आणि दुसरा चैतन्यात्मक मन हा होय. आपणापुढें जी प्रश्नपरंपरा उभी राहते तिचा समाधानकारक निकाल जडपदार्थांच्या शास्त्रसिद्धांतांनीं लागण्यासारखा असेल तर आत्म्याचें निराळें अस्तित्व मानण्याचें कारण उरत नाहीं. परंतु जड पदार्थांत विचारशक्ति उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे ही गोष्ट सिद्ध करतां येत नाहीं.

प्रत्येक प्राण्याच्या शरीरावर आनुवंशिक संस्कारांचीं उघड चिन्हें दिसतात ही गोष्ट आपणांस नाकबूल करतां येणार नाहीं; तथापि हीं चिन्हें केवळ बाह्य-स्वरूपाच्या विशिष्टतेचीं दर्शक असतात. याशिवाय अंतःस्वरूपाचीं निदर्शक अशीं निराळीं चिन्हें प्रत्येक जीवात्म्यास असतात. हीं चिन्हें त्याच्या पूर्वकर्मानुसार उत्पन्न झालेलीं असतात. आणि पूर्वी जी इच्छा केली ती फलद्रूप करण्यास योग्य अशा शरीराचा आत्मा स्वीकार करितो.

अनंत कालाच्या संवयीनें प्राण्याच्या शरीररचनेंत बदल होतो, ही गोष्ट अर्वाचीन शास्त्रांसहि संमत आहे. आणि अनेकवेळां एक गोष्ट पुनःपुनः करण्यामुळें संवय लागते. यामुळें जन्मतःच कित्येक प्राण्यांस असलेल्या ज्या संवयी आढळून येतात त्या, त्यानें पूर्वी अनेक जन्मीं पुनःपुनः केलेल्या कर्मांमुळें उत्पन्न झालेल्या असतात. या जन्मीं त्यानें त्या संवयी आपणांस नवीन लावून घेतल्याचा दाखला नसतो. ह्मणून त्या पूर्वजन्मांतरींच्या असल्या पाहिजेत असें मानणें भाग पडतें.

‘ आपण म्हणतां त्या सर्व गोष्टी गृहित धरल्या तर माझ्या अनेक जन्मांपैकीं एकाचेंहि मला स्मरण नाहीं हें कसें ’ अशी कोणीं शंका काढिली तर तिचें समाधान करणें फारसें कठिण नाहीं. मी यावेळीं इंग्रजी भाषा बोलत आहें. ही माझी जन्मभाषा नव्हे. तरी माझ्या मनांत यावेळीं माझ्या जन्मभाषेचा एकहि शब्द येत नाहीं. ह्मणजे चालूक्षणीं माझी जन्मभाषा मी विसरलों असें झालें आहे. परंतु माझी जन्मभाषा मला आठवावी इतकी नुसती इच्छा मीं केली कीं, शब्दामागें शब्द येऊन माझ्या चित्तांत एकच गर्दी करून सोडतात. यावरून आठवण अथवा स्मृति, ही माझ्या चैतन्यसमुद्राच्या पृष्ठभागावरील एक तरंग आहे. त्या समुद्राच्या पोटांत अनेक वस्तू सांठविलेल्या आहेत. तुह्मीं भगिरथ प्रयत्नांनीं आपली इच्छा तितकी शक्तिमती केली तर या समुद्राच्या पोटांत तळापर्यंत शिरून पूर्वीचे अनेक जन्म पाहणें ही मोठीशी अवघड गोष्ट नाहीं.

कोणत्याहि गोष्टीचा अनुभव होणें हा तिच्या सिद्धीचा प्रत्यक्ष आणि सरळ मार्ग आहे. अमुक तत्वविचार खरा आहे हें प्रत्यक्ष अनुभवानेंच निःसंशय पटतें. आह्मीं काय ह्मणतों त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन पहा असें आमच्या ऋषिवर्गांनें साऱ्या जगास मुक्तकंठानें आव्हान केलें आहे. आपल्या चैतन्यसमुद्रांत बुडी कशी मारावी आणि दम न कोंडतां तळापर्यंत प्रवेश करून तेथील कोश कसा हस्तगत करावा ही गुरुकिल्ली आह्मांपाशीं आहे.

आत्मा अच्छेद्य, अदाह्य, अक्लेद्य आणि अशोष्य आहे अशी आह्मां हिंदूंची कल्पना आहे. ह्मणजे तो तरवारीनें तुटत नाहीं, विस्तवानें जळत नाहीं, पाण्यानें भिजत नाहीं आणि वाऱ्यानें कोरडा होत नाहीं. असें आह्मीं समजतों. प्रत्येक जीवात्मा ह्मणजे एक वर्तुळ. त्या वर्तुळाचा परिघ निश्चित नाहीं, परंतु त्या त्या वेळेपुरता त्याचा मध्यबिंदु मात्र शरीरांत असतो, व मृत्यु ह्मणजे हा बिंदु एका शरीरांतून दुसऱ्या शरीरांत जातो असें प्रत्येक हिंदुमनुष्य समजतो. तसेंच तो जडपदार्थांच्या संगानें बांधला जात नाहीं. तो अत्यंत शुद्ध, बुद्ध, मुक्त आणि पूर्ण असा आहे; परंतु कांहीं कारणानें तो जडपदार्थांशीं संयोग पावतो व भ्रमानें ‘ मी जडपदार्थ आहें ’ अशी भावना करितो.

जर आत्मा नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त आणि पूर्ण असा आहे तर तो जडपदार्थांनीं पक्का बांधला गेल्यासारखा कां दिसतो असा प्रश्न येथें ओघानेंच उद्भवतो. पूर्ण ज्ञानरूप आत्म्यास ‘ मी अपूर्ण आहें ’ असा भ्रम तरी कां होतो ? या प्रश्नाचें उत्तर देण्यास हिंदु तत्त्ववेत्ता कचरतो असें कोणी ह्मणतात. कित्येकांनीं हिंदु अद्वैत सिद्धांताच्या जागीं द्वैतादि अनेक प्रकारच्या कल्पनांनीं हे प्रश्न सोडविण्याची खटपट केली आहे; परंतु वरील प्रश्नाचें समर्पक उत्तर कोणीहि दिलें नाहीं. या प्रश्नासंबंधानें हिंदुतत्त्ववेत्ता सरळ उत्तर देतो कीं अत्यंत पूर्णावस्थेंतला आत्मा स्वतःस अपूर्ण व जड कां कल्पितो, याचें कारण मला सांगतां येत नाहीं. त्याला उत्तर देतां आलें अथवा न आलें तरी त्याच्याशीं आपणास प्रस्तुत कांहीं करावयाचें नाहीं. आपण कोण या प्रश्नाचें उत्तर आपण ह्मणजे देह असें प्रत्येकजण प्रत्येक क्षणीं देत असतो. हा आपला नेहमींचा अनुभवच आहे. ‘ परमेश्वराची तशी मर्जी ’ असेंहि उत्तर कोणी कोणी देतात. परंतु वस्तुतः ‘ मला ठाऊक नाहीं.’ या उत्तरांत आणि ‘ ईश्वराची मर्जी ’ या उत्तरांत फारसा भेद नाहीं. असो.

जीवात्मा नित्य आणि पूर्ण आहे व मृत्यु ह्मणजे त्याच्या निवासस्थानाचा बदल होण्याशिवाय अधिक कांहीं नाहीं, असा हिंदुशास्त्राचा सिद्धांत आहे. पूर्वजन्मीं केलेल्या कर्मांचा परिपाक फलरूपानें आपण या जन्मीं भोगित असतों; आणि वर्तमान अथवा चालू कर्मानें पुढील जन्माची तयारी आपण करित असतों, असाहि आमचा सिद्धांत आहे. या रीतीनें जीवात्मा स्वतःच्या कर्मानुरोधानें पूर्वीपेक्षां अधिक चांगल्या अथवा अधिक वाईट अवस्थेंत जात असतो. आतां येथें आणखीहि

एक प्रश्न उद्भवतो. प्रचंड वादळांत ज्याप्रमाणें एखादी नौका सांपडावी व एका क्षणीं पर्वताइतक्या उंच लाटेच्या शिखरावर तर दुसऱ्या क्षणीं अत्यंत खोल अशा डोहाच्या तळाशीं लोटली जावी अशाच प्रकारच्या स्थितींत मनुष्याचा जीवात्मा सांपडला आहे काय? त्या नौकेला ज्याप्रमाणें जवळपास कोठेंहि आधार म्हणून दिसत नाहीं, त्याचप्रमाणें या प्रचंड संसारचक्रांतून सुटण्यास कांहींच उपाय नाहीं काय? कारण आणि कार्य या द्वयींचा तडाखा असा प्रचंड आहे कीं, त्यांतून कोणीहि सुरक्षितपणें बाहेर पडतोसें दिसत नाहीं. कालचक्र इतक्या जोरानें आणि निर्दयतेनें फिरतांना दिसतें कीं, त्यांत निराश्रित विधवा, पोरकीं पोरें आणि उन्मत्त सत्ताधीश एकसारख्या प्रमाणानेंच चिरडले जातात. या प्रचंड संसार-चक्राची नुसती कल्पनाहि भयजनक आहे. अशा वेळीं सृष्टींतून अत्यंत करुणाजनक आवाज निघाला कीं यांतून सुटण्यास मार्ग नाहीं काय? या प्रश्नास वेदरूपी उत्तर आलें कीं "बाळांनो, भिऊं नका. तुम्हीं सच्चिदानंदरूपच आहां. ज्या मूळ सनातन –प्राचीन–रूपांतून तुमचा उद्भव झाला आहे त्याचें ज्ञान तुम्हांस झालें म्हणजे या जन्ममरणाच्या फेऱ्यांतून तुम्हीं मुक्त व्हाल. माझ्या अमेरिकन भगिनिबंधूंनो, 'सच्चिदानंदाचीं अपत्यें' हें नांवच किती मनोहर आहे! अहाहा! आपण पापी असें तुम्ही आजवर ऐकत होतां परंतु तुमचे हिंदुबांधव आज तुम्हास पुण्यात्मे म्हणून हांका मारित आहेत. तुम्हीं पापी असें तुमचे हिंदु बांधव तुम्हास कधीं स्वप्नांतहि म्हणणार नाहींत. तुम्हीं पूर्ण आहां, अत्यंत पवित्र आणि पूर्णानंद-रूप आहां असें ते तुम्हांस सांगत आहेत. तुम्हांला पापी कोण म्हणेल? तुम्ही पापी असे शब्द उच्चारणें हेंच महापाप आहे. सिंहाच्या बच्चांनो, उठा, जागे व्हा. आपण मेंढ्या आहोंत असें तुम्हीं स्वप्नांत बरळत आहां. तुम्हीं जड शरीर नव्हत. शरीर हें तुमच्या नोकरासारखें आहे. तुम्हीं नित्य, शुद्ध, बुद्ध आणि मुक्त आहां.

सृष्टीच्या कायद्याच्या तडाक्यांतून सुटण्यास मार्ग नाहीं असें वेद सांगत नाहींत. हे सर्व कायदे ज्याच्या अनुरोधानें चालतात आणि जें सर्व जड आणि चैतन्ययुक्त पदार्थांस व्यापून उरलें आहे, ज्याच्या हुकमानें वारा वाहतो, अग्नि दहन करितो, मेघ वर्षाव करितात आणि मृत्यु हरण करितो असें सर्वव्यापी आणि सर्वांहून निराळें असें एक महत्तत्व आहे. "तूंच आमचा पिता, तूंच आमची माता, तूंच आमचा सखा, तूंच सर्व शक्तीचें अधिष्ठान म्हणून शक्तीसाठीं तुझी आम्ही याचना करितों. या विश्वाचें ओझें तूं वाहतोस. आम्हांस जीविताचें ओझें वाहण्यास सामर्थ्य दे" असें ऋषींनीं या तत्वाचें वर्णन केलें आहे. या स्वरूपावर

सदैव इतकें प्रेम करणें, कीं त्याहून या जन्मीं अथवा जन्मांतरीं अन्य कांहींच प्रिय नाहीं अशी उत्कट भावना ठेवणें हाच या स्वरूपाच्या पूजनाचा मार्ग आहे. हा मार्ग भगवान् श्रीकृष्णांनीं पूर्णत्वानें व्यक्त करून दाखविला आहे. श्रीकृष्ण हे प्रत्यक्ष परमेश्वरच मानवस्वरूपानें पृथ्वीवर आले, असा आमचा समज आहे. ज्याप्रमाणें कमळाचें पान पाण्यांत असतें त्याप्रमाणें मनुष्यानें जगांत राहावें असें भगवानांनीं सांगितलें आहे. कमळाचें पान पाण्यांत असतांहि जसें ओलें होत नाहीं तसें जगांत सर्व कर्में करित असतांहि त्यांपासून उद्भवणाऱ्या सुखदुःखांतून निराळें राहावें. हातानें कर्म घडत असतां मनानें परमेशचिंतन करावें असा भगवान् श्रीकृष्णांचा उपदेश आहे.

या जगांत आपलें बरें व्हावें अशा इच्छेनें परमेश्वराचें भजन पूजन करणें वावगें नाहीं; परंतु अत्यंत निरिच्छ मनानें केवळ त्याच्याच प्राप्तीसाठीं त्याच्यावर निर्व्याज प्रेम करावें हें अधिक चांगलें नाहीं काय?

“ न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ॥
हेंचि माझी वाणी मज उपदेशी । आणिकां लोकांसी हेंचि सांगे ॥
विटंबो शरीर होत कां विपत्ति । परि राहो चित्तीं पांडुरंग ॥ ”

हीच प्रार्थना आपण सदोदित करित असलें पाहिजे.

भगवान् श्रीकृष्णाचा युधिष्ठिर नांवाचा भक्त होता. तो समस्त आर्यावर्ताचा राजा होता. त्याच्या भाऊबंदांनीं त्याचें सर्वस्व हरण करून त्यास वनवासास धाडिलें. तो हिमालयाच्या आसमंतात् असलेल्या एका वनप्रदेशांत राहिला असतां एकदां त्याच्या राणीनें त्यास विचारलें, “ महाराज, आपण परमेश्वराचे अनन्य भक्त असतां आपणावर मोठमोठीं संकटें कोसळतात हें कसें?” युधिष्ठिरानें उत्तर दिलें, “ देवि, मी या हिमालयाचीं उतुंग आणि रमणीय शिखरें पाहून त्यांवर प्रेम करितों. असें करण्यांत त्या पर्वतराजापासून कांहीं प्राप्त करून घेण्याची माझी अपेक्षा आहे काय? सुंदर आणि उदात्त स्वरूपाची वस्तू नजरेस पडल्यावर तिजवर प्रेम करावें असा माझा स्वभावच आहे. तसेंच जो सर्व सौंदर्याचा निधि आणि उदात्ततेचा परमावधि त्यावर प्रेम केल्याशिवाय माझ्यानें कसें राहवेल बरें! जगांत प्रेमास योग्य असें तें एकच स्थान आहे. या माझ्या प्रेमाच्या मोबदल्यांत मी कशाचीहि अपेक्षा करित नाहीं. त्याची मर्जी असेल तसें त्यानें मला ठेवावें. माझें त्याजवरील प्रेम अगदीं निर्व्याज आहे. प्रेम ही गूळखोबऱ्यासारखी क्रयविक्रयाची वस्तु आहे काय? ”

आत्मा हा पूर्ण ईश्वररूप असून जड शरीरानें बद्ध असल्यासारखा दिसतो. हा पाश तुटला म्हणजे आत्मा मुक्त होतो. मुक्त होतो याचा अर्थ जन्ममरण, दुःखपरंपरा आणि अपूर्णता यांतून तो सुटतो, असें वेदांचें सांगणें आहे. परमेश्वराच्या कृपेवांचून मुक्तीचीं साधनें उपलब्ध होणें शक्य नाहीं. आणि आपण अत्यंत पवित्र झाल्यावांचून परमेश्वराची कृपा होणें शक्य नाहीं. त्याच्या या कृपेचें स्वरूप म्हणजे शुद्ध अंतःकरणांत परमेश्वर स्वतः उदय पावतो. जें शरीर पूर्वी आपणास केवळ जड, त्याज्य—मृत्पिंड—वाटत होतें त्याच शरीरांत परमेश्वराचा उदय होतो. अंतःकरणांतील सर्व बरे वाईट विकार लय पावतात. कसल्याहि प्रकारच्या शंका उदय पावत नाहींत. ज्याच्या हृदयांत परमेश्वर उदय पावतो तो जन्ममरणाच्या कारणपरंपरेंतून कायमचा बाहेर पडतो. हिंदुधर्माचें सार या एका कल्पनेंत सांठविलें आहे असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाहीं. केवळ कल्पनेचीं चित्रें पाहून आणि शब्द ऐकून हिंदूंचें कधींहि समाधान होणार नाहीं. आमच्या दशविध इंद्रियांच्या आटोक्या बाहेर असाणारा कोणी प्राणि असला तर तो प्रत्यक्ष नजरेस पडला पाहिजे असा हिंदूंचा हट्ट आहे. जर जड सृष्टीच्या बाहेर असणारा केवळ चैतन्यात्मक असा कोणी असेल तर कोणाच्याहि मध्यस्थीवांचून त्याची भेट घेण्यासाठीं हिंदु धडपड करितील. जर एखादा खरा हिंदु साधू आपणास भेटला आणि आपण त्यास विचारिलें कीं "बावाजी, परमेश्वर आहे हें खरें कशावरून ?" तर त्यावर तो उत्तर देईल कीं " माझ्या मुला, मीं त्याला प्रत्यक्ष पाहिलें आहे. त्याची आणि माझी भेट झाली आहे." असें स्पष्टपणें सांगणारा मनुष्यच पूर्णत्वास पोहोंचला असें समजावयाचें. अमुक एक मत खरें मानावें, अथवा अमूक एक सिद्धांत खरा समजावा असें हिंदुधर्म कधींहि सांगत नाहीं. 'आम्ही जें कांहीं म्हणतों, त्याचा तूं स्वतः अनुभव घे, किंबहुना तेंच तूं स्वतः हो' असें आमच्या ऋषींचें सांगणें आहे. याप्रमाणें धर्ममार्गांत जे जे प्रयत्न ऋषींनीं केले त्यांचा अंतिम हेतु मनुष्यानें स्वतः-च्या एकांतिक परिश्रमानें पूर्णत्व पावावें, अत्यंत पवित्र व्हावें—परमेश्वर व्हावें—असा आहे. ख्रिस्तीधर्मांतील आकाशस्थ पित्याची जी कल्पना आहे ती कल्पना स्वतःचे ठिकाणींच खरी करणें हें हिंदुधर्माचें अंतिम साध्य आहे. पूर्णत्व पावलेल्या योग्याची स्थिति कशी असते म्हणाल तर तो पूर्णानंदाच्या स्थितींत सर्वकाल असतो. सर्व सुखाचें माहेरघर जो परमेश्वर त्याच्या सान्निध्यांत दुःखाचा स्पर्शहि होणें शक्य नाहीं. येथपर्यंत हिंदुतत्वज्ञानांतील निरनिराळ्या पंथांच्या आचार्यांची एकवाक्यता

आहे. निरनिराळ्या पंथांस सामान्यत्वेंकरून संमत झालेलीं अशीं तत्वें येथवर सांगितलीं; परंतु ' पूर्णत्व ' हें भिन्न भिन्न रूपाचें असणें शक्य नाहीं. तें दोन अथवा तीन रूपांनीं अस्तित्वांत येणें शक्य नाहीं. पूर्णत्व हें नेहमीं एकच असूं शकेल. तसेंच त्याला कांहीं विशिष्ट गुणधर्म असणेंहि संभवत नाहीं. याकरितां जीवात्मा पूर्णत्व पावला ह्मणजे पूर्णरूप जें ब्रह्म त्या ब्रह्माशीं त्याचें ऐक्य होतें. येथें आपण स्वतः पूर्णरूप आहों—सच्चिदानंदरूप आहों—असा जीवात्म्यास अनुभव येतो. आपलें व्यक्तित्व नाहींसें होणें ह्मणजे काष्ठलोष्टवत् होण्यासारखें आहे असें कित्येकांस वाटतें. परंतु तरवारीचा घाव सोसला नाहीं अशा क्लीबानें धारातीर्थी स्नान करणाऱ्या वीरपुरुषाच्या अंगावरील जखमांची थट्टा करावी यांत नवल नाहीं. आपणास मी त्रिवार बजावून सांगतों कीं, ब्रह्मरूप होणें ह्मणजे काष्ठलोष्टवत् होणें नव्हे. आपल्या या एकाच देहांत अनुभवास येण्याऱ्या चैतन्याचा सुखास्वाद किती आहे हें आपण प्रत्यहीं अनुभवितों. जर दोनतीन देहांतील चैतन्यरस एकाच देहांत आपणास अनुभवितां येईल तर नेहमींपेक्षां दुप्पट तिप्पट आनंदाचा अनुभव आपणांस होईल. मग या साऱ्या दृश्य विश्वांतील चैतन्यरसांत बुडून जाणें किंबहुना तो चैतन्यरसच आपण होऊन जाणें ह्मणजे कशी स्थिति असेल याची कल्पना करणें आपणावरच सोंपवितों.

जर आपण स्वतः विश्वरूप व्हावें असें वाटत असेल तर आपल्या या क्षुद्र देहांतील 'स्वत्व' आपणांस विसरण्यावांचून गत्यंतर नाहीं हें उघड आहे. मला मृत्यूच्या जडत्वापलीकडे जावयाचें असेल तर स्वतः केवळ चैतन्यरूप झालें पाहिजे. दुःखाचें वारें लागूं नये अशी माझी इच्छा असेल तर मला स्वतःच सुखरूप झालें पाहिजे. कोणतेंहि अज्ञान माझ्या ठिकाणीं संभवूं नये अशी माझी इच्छा असेल तर मला स्वतःला ज्ञानरूप झालें पाहिजे. ही जी विचारपरंपरा मीं सांगितली ती तर्कशास्त्रासही पूर्णपणें संमत अशीच आहे. सांप्रत जें शरीर मी धारण करितों तें कायम स्वरूपाचें नसून प्रत्येक क्षणीं बदलत आहे—नवें होत आहे—असें आज भौतिक शास्त्रें मला सांगतात. हें शरीरहि कायमचें माझें एकटयाचें नसून त्यांत होणाऱ्या फेरबदलावर माझी सत्ता नाहीं; त्याला स्वतंत्र असें अस्तित्व नसून विश्वांतील अनंत दृश्य आकारांतील तो एक घटक आहे आणि ह्मणून त्याचें कांहीं काल अनुभवास येणारें स्वतंत्र अस्तित्व स्वप्नरूप आहे असें अर्वाचीन शास्त्रें मला मोकळ्या मनानें सांगत आहेत. माझें शरीर जर स्वतंत्रपणें माझें नव्हे हें सिद्ध झालें आहे तर माझें चैतन्य—माझा

आत्मा—स्वतंत्र आहे, विश्वचैतन्याहून निराळा आहे असें मी कसें ह्मणावें ? आणि हाच अद्वैत सिद्धांत वेदांतमतानें प्रतिपादिला आहे.

प्रत्येक शास्त्राचें अंतिम साध्य पाहिलें तर एक मूलतत्व शोधून काढण्याचें आहे. हें मूळचें तत्व सांपडलें कीं त्या शास्त्राची पुढली गति बंद झालीच पाहिजे; कारण मग तें शास्त्र पूर्णत्वास पोंहोंचलें. पृथ्वीवर अनेकविध दिसणारे पदार्थ एकाच पदार्थापासून निर्माण करतां येऊं लागले तर रसायनशास्त्राची प्रगति खुंटणार नाहीं काय ? तसेंच विश्वांत अनेकविध रीतींनीं प्रत्ययास येणाऱ्या शक्ती एका मूलशक्तीचींच अनंत रूपें आहेत असें सिद्ध झालें तर पदार्थविज्ञानशास्त्राची (Physics) प्रगति बंद झालीच पाहिजे. तसेंच मृत्यूचें साम्राज्य सर्वत्र अनुभवास येत असतां सदोदित राहणारें चैतन्य सांपडलें कीं धर्माची वाढहि संपलीच पाहिजे. प्रत्येक क्षणीं बदलत जाणाऱ्या विश्वाचें मूळ स्वरूप शोधून काढणें, अनंत रूपांनीं दिसणारे जीवात्मे एकाच विश्वात्म्याचीं भ्रामक अशीं अनंत रूपें आहेत हें सिद्ध करणें, सृष्टीच्या अनंत दृश्य रूपांत वास्तविक एकरूप पाहणें हें धर्माचें अंतिम साध्य आहे. हें साधलें ह्मणजे धर्मशास्त्राचा शेवटच झाला. त्यापुढें धर्मशास्त्र जाऊंच शकणार नाहीं. केव्हांना केव्हां तरी सर्व शास्त्रांस हा सिद्धांत मान्य करावाच लागेल.

कशाचाहि नाश होत नाहीं आणि अगदीं नवें असें कांहीं निर्माणहि होत नाहीं, असा अलीकडील शास्त्रांचा शोध आहे. हीच गोष्ट आर्यांच्या भाषेंत सांगावयाची ह्मणजे 'धाता यथा पूर्वमकल्पयत्' या शब्दांनीं सांगतां येईल. आपण कित्येक शतकें—सहस्रकें—जी गोष्ट आपली ह्मणून उराशीं बाळगिली तिची सत्यता अधिक स्पष्टपणानें आणि दृश्य अनुभवाच्या शास्त्रांनीं सिद्ध होत आहे, हें पाहून आह्मां हिंदूंस आनंदाचें आणि अभिमानाचें भरतें आलें तर त्यांत नवल नाहीं.

येथवर तुह्मांस हिंदूधर्माच्या अत्यंत उज्वल अशा स्वरूपाची माहिती दिली. आतां हिंदूंतील अज्ञजनसमूहाच्या धर्मकल्पनांकडे वळूं. हिंदुस्थानांत अनेक देवांची कल्पना अस्तित्वांत नाहीं हें आरंभींच आपणांस सांगणें इष्ट आहे. जर आपण थोडा वेळ एखाद्या देवळांत उभे राहिलों आणि तेथील पूजेचा विधि लक्ष्यपूर्वक पाहिला तर तेथील इष्टदेवतेची स्तुति करतांना सर्वसाक्षित्वादि जे गुण परमात्म्यास लाविले आहेत त्याच गुणांची योजना तेथील भक्त आपल्या इष्ट देवतेवर करित असल्याचें आपणास आढळून येईल. जर अशी स्थिति आहे तर हिंदुस्थानांत अनेक देव मानण्यांत येतात, या ह्मणण्यांत काय तात्पर्य आहे ?

गुलाबाला निरनिराळीं अनेक नांवें दिल्यानें त्याच्या सुवासांत कांहीं उणीव येते काय? नुसतीं निराळीं नांवें देणें याचा अर्थ निराळें मत प्रतिपादन करणें असा होत नाहीं.

माझ्या लहानपणीं एक ख्रिस्ति उपदेशक एका लहानशा जमावापुढें व्याख्यान देत असतां तेथील मंडळीस उद्देशून ह्मणाला, " अहो, जर मीं तुमच्या मूर्तीवर माझी काठी मारून ती मूर्ती फोडून टाकिली तर ती माझें काय वांकडें करणार आहे? " यावर मंडळींतील एकानें त्या पाद्र्यास उलट प्रश्न विचारिला, " पाद्री-बुवा, तुमच्या आकाशांतील बापाला जर मीं शिव्या दिल्या तर तो तरी माझें काय करील? " पाद्री ह्मणाला, " तूं मेल्यावर तो तुला शासन करील. " हिंदूनें यावर ह्मटलें " तूं मेलास ह्मणजे माझी मूर्ति तुला शासन करील."

ज्यांना तुह्मी ख्रिस्तिलोक मूर्तिपूजक असें ह्मणतां आणि मूर्तिपूजा ह्मणजे पापाचा मार्ग समजतां त्याच मूर्तिपूजकांत अत्यंत पवित्र असे महात्मे मीं पाहिले आहेत. इतकी पवित्रता माझ्या अवलोकनांत दुसऱ्या कोठेंहि आली नाहीं. असें असतां मूर्तिपूजा ह्मणजे पापाचा मार्ग हे शब्द उच्चारतांना बराच विचार करावा लागेल. पापांतून अत्यंत पावित्र्याची उत्पत्ति शक्य आहे काय, याचा तुह्मींच विचार करा.

धर्मभोळेपणा हा मनुष्याच्या उन्नतीच्या आड येणारा शत्रु आहे, ही गोष्ट मी कबूल करितों; परंतु धर्मवेड हा त्याहूनहि भयंकर शत्रु नाहीं काय? ख्रिस्ती मनुष्याला प्रार्थनेसाठीं देऊळच कशास पाहिजे? क्रुसाच्या खुणेंत पवित्रता कशी आली? प्रार्थना करितांना आकाशाकडे डोळे लावण्याची काय गरज आहे? जुन्या क्याथोलिकपंथाच्या ख्रिस्त्यांस अनेक मूर्तींची आवश्यकता कां वाटली? परमेश्वराचें गुणवर्णन करितांना प्रॉटेस्टंट ख्रिस्ति अनेक मूर्तींची कल्पना मनांत आणितात ती कां? माझ्या प्रिय बंधूंनो, श्वासोच्छ्वास केल्यावांचून जगणें जसें अशक्य तसें कोणत्याना कोणत्या तरी रूपानें गुणांची मानसिक मूर्ति उत्पन्न केल्याशिवाय त्या गुणांचें चिंतन करणें अशक्य आहे. आपलें चित्त केवळ निराकारांत लीन होत असल्याचा आपणास केव्हांहि अनुभव येत नाहीं. आपणास चोहोंकडे जडविषय आणि गुण यांची संलग्न अवस्था पाहण्याची संवय लागलेली आहे. यामुळें जडविषय मनांत आणल्यावांचून गुण अथवा गुणावांचून जडविषय यांचें चिंतन करणें आपणांस शक्य नाहीं. याच तत्वावर हिंदूंनीं मूर्तिरूपानें गुणांना दृश्यस्वरूप दिलें आहे. मूर्ति या गुणांचें स्मरण करून देणाऱ्या खुणा आहेत. सद्गुणैकमूर्ती—परमेश्वरा—कडे चित्त लागावें आणि तें इकडे तिकडे

भटकूं नये ह्मणून मूर्तीची योजना आहे. केवळ मूर्ति ह्मणजे परमेश्वर नव्हे, ही गोष्ट आपल्या इतकीच प्रत्येक हिंदूस पक्की ठाऊक आहे. आपण प्रार्थना करितांना 'परमेश्वरा, तूं सर्वव्यापी आहेस' असें म्हणतां याचा वास्तविक अर्थ काय? आपण अनुभवानें हें म्हणत असतां काय? आकाशाचा अनंत विस्तार अथवा समुद्राचा प्रचंड विस्तार आपल्या मनांत त्या वेळीं येत नाहीं काय? ह्मणजे सर्वव्यापी या शब्दाचें हें मूर्तरूपच झालें नाहीं काय?

वास्तविक विचार केला तर यांत मनुष्यस्वभावास विसदृश असें कांहीं नाहीं, हें आपल्या ध्यानांत येईल. आमच्या मनोभूमिकेची रचनाच अशी आहे कीं कोणत्या तरी दृश्य पदार्थांशीं जोडल्याशिवाय केवळ गुणांचें चिंतन आम्हास करितांच येत नाहीं. मग तो दृश्य पदार्थ समुद्र असो, आकाश असो, अग्नि असो, ख्रिस्ति देउळ असो, क्रूसचिन्ह असो, अगर मशीद असो. ईश्वरविषयक सर्व उच्च कल्पना हिंदूंनीं आपल्या विशेष प्रकारच्या मूर्तींशीं जोडल्या आहेत इतकेंच. आपण निराकाराची स्तुति करतों ह्मणून मोठ्या आढ्यतेनें इतरांस तुच्छ समजणारे लोक अद्यापि देवळाच्या चारी भिंतींच्या आंतच कोंडले असल्यासारखे दिसतात. त्यांची अत्यंत मोठी कल्पना ह्मटली तर आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांस मदत करावी इतकीच दिसते. मनुष्याला प्रत्यक्ष परमेश्वर होणें शक्य आहे या कल्पनेचा नुसता स्पर्शहि त्यांस झाल्याचें दिसत नाहीं. मूर्तिपूजकांची मुख्य कल्पना ह्मटली तर स्वयमेव परमेश्वर होण्याची आहे. एखादें देऊळ, एखादी मूर्ति अथवा एखादें पुस्तक हीं केवळ साधनरूप आहेत. यांच्या सहाय्यानें एकेका कल्पनेचा ग्रास करून शेवटीं परमात्म्याची भेट घ्यावयाची आहे ही गोष्ट हिंदुमात्रास ठाऊक आहे. अमुक मतें संमत आहेत असें ह्मटलें ह्मणजे धार्मिक जीवनाचा परमावधि झाला असें कोणाहि हिंदूस वाटत नाहीं. परमेश्वराची भेट होईपर्यंत मध्यें कोठें थांबण्यास जागाच नाहीं असें त्यास वाटतें. बाह्योपचारांनीं मूर्तिपूजा करणें ही अगदीं शेवटची पायरी आहे. प्रार्थना ही दुसरी पायरी आहे, आणि स्वतः परमेश्वर होणें हें मुक्कामास पोहोंचणें आहे असें श्रुतींनींहि सांगितलें आहे. एखादा मूर्तिपूजक आपल्या मूर्तीपुढें बसला असतां ह्मणतो "सूर्याचा प्रकाश, चंद्राचा प्रकाश, ताऱ्यांचा प्रकाश अथवा अग्नीचा प्रकाश यांपैकीं एकहि तुला दाखवूं शकत नाहीं. हे सर्व तुझ्या प्रकाशानें प्रकाशतात." ते स्वतः मूर्तिपूजक असले तरी दुसऱ्या कोणी दुसऱ्या पद्धतीनें पूजा केली असतां त्यांस पापी समजत नाहींत, अगर त्यांचा पूजनमार्ग खोटा

असेंहि ह्मणत नाहींत. मूर्तिपूजा ही खालची पायरी झाली ह्मणून ती करणारास अधिक श्रेष्ठ असलेल्यांनीं हंसावें हें योग्य आहे काय? एखाद्या तरुणानें लहान मुलास तें लहान ह्मणून हंसावें अथवा वृद्धानें तरुणास तरुण ह्मणून हंसावें अशाच बालिशतेचा हा प्रकार आहे. मूर्तिदर्शनाबरोबर जर सात्विकभाव कोणाच्या अंतःकरणांत उत्पन्न होत असतील तर मूर्तिदर्शन करणें पाप आहे कीं काय, याचा आपणच विचार करा. अशा मनुष्याला पुढें मूर्तिपूजेची जरूर वाटेनाशी झाली तरी तो मूर्तिपूजकास खचित नांवें ठेवणार नाहीं. आपण पूर्वी कांहीं चूक करित होतों—कांहीं वाईट गोष्ट करित होतों—ती सुधारावयाची आहे अशी हिंदूंची कल्पनाच नाहीं. धर्ममार्ग ह्मणजे सत्याच्या अंधुक कल्पनेंतून निघून अत्यंत उज्वल —प्रकाशमय—अशा सत्यांत प्रवेश करावयाचा अशी हिंदूंची कल्पना आहे. आपण मूळचे पापी आहों असें हिंदुलोक समजत नाहींत; तर आपण अत्यंत पुण्यमय व पूर्णस्वरूपाचीं अनंतरूपें आहोंत असें ते समजतात. यामुळें अगदीं रानटी मनुष्याच्या धर्ममार्गापासून तों थेट वेदांताच्या अद्वैत सिद्धांतापर्यंत सर्व मार्ग निरनिराळे दिसणारे परंतु एकाच केंद्राकडे पोहोंचणारे रस्ते आहेत असें हिंदु मनुष्य समजतो. भिन्न परिस्थिति आणि भिन्न देशकालवर्तमान यांस अनुसरून हे निरनिराळ्या प्रकारचे मानवी प्रयत्न एकाच सत्याच्या शोधांत गुंतले आहेत. हे निरनिराळे लहानमोठे गरूडपक्षी एकाच सूर्यबिंबाकडे धांव घेत आहेत. त्यांतील लहान पक्षी विश्रांतीसाठीं एखाद्या मुक्कामावर क्षणभर थांबतात व कांहीं कालानें पुन्हा उडूं लागतात; व शेवटीं बिंबावर सर्व एकत्र जमतात असा हिंदूंचा सिद्धांत आहे.

दृश्यविश्व अनेकतेनें भासलें तरी शेवटीं त्यांत एकतानता आहे असें हिंदूंनीं जाणलें आहे. आपलीं विशिष्ट मतें ह्मणून तीं साऱ्या समाजास एकसहा स्वीकारावयास लावावयाचीं असा इतर धर्मांचा कटाक्ष आहे; जणूं काय एकाच आकाराचा अंगरखा सर्वांनीं घातला पाहिजे असा त्यांचा हट्ट आहे. मग तो अंगास बरोबर बसो अगर न बसो. ज्याच्या अंगास बरोबर बसत नसेल, त्यानें उघडें भटकावें. प्रतिमा अथवा पुस्तकें हीं केवळ मूलरूप व्यक्त करण्याचीं साधनें आहेत एवढेंच हिंदूंचें ह्मणणें आहे. या साधनांचा प्रत्येकानें अवश्य उपयोग केलाच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष नाहीं. याचा उपयोग न करणारा मूर्ख असेंहि त्यांचें ह्मणणें नाहीं. तसेंच या साधनांचा उपयोग केला ह्मणजे पाप घडतें असेंहि त्यांस वाटत नाहीं.

आणखीहि एका गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य आहे. मूर्तिपूजेंत कांहीं भयंकर विधि आहे असा कोणी आपला समज करून दिला असल्यास तो सर्वथैव

चुकीचा आहे. हिंदूंतहि इतर लोकांप्रमाणेंच अनेक दोष आहेत. परंतु आपण एवढें पक्कें लक्ष्यांत ठेवा कीं, त्यांच्या सदोष कल्पनांचें पर्यवसान इतरांस त्रास देण्यांत झालें नाहीं. सती जाणें पुण्यकारक ह्मणून एखादी स्त्री पतीच्या शवाबरोबर आपणा स्वतःस जिवंत जाळून घेईल; परंतु कांहीं शतकांपूर्वी धर्माच्या नांवाखालीं मनुष्यांस जिवंत जाळण्याचे जे अत्त्याचार यूरोपांत घडले, तसली गोष्ट हिंदुस्थानांत स्वप्नांतहि घडून येणें शक्य नाहीं. कित्येक ख्रिस्ती लोकांनीं पूर्वकालीं डांकिणी डांकिणी ह्मणून कित्येक स्त्रियांस जिवंत भस्मसात् केलें हें आपणास इतिहासावरून कळून येतें. हें पातक ख्रिस्तीधर्माच्या माथीं मारणें जसें बरोबर नाहीं तसेंच कांहीं हिंदूंनीं धर्माच्या खोटया कल्पनांनीं अत्त्याचार केले तर त्यांचा दोष हिंदुधर्मावर लादणें बरोबर होणार नाहीं.

जगांतील यच्चावत् धर्मपंथ परमेश्वराकडे जाण्याचे निरनिराळे रस्ते आहेत असें हिंदूंचें मत आहे. त्यांत अनेक प्रकारचे मतभेद दिसले तर परिस्थितीप्रमाणें एकच सत्य अनेक रूपें धारण करितें असें हिंदु ह्मणतात. एकाच सूर्याचे किरण निरनिराळ्या रंगांच्या कांचेंतून आल्यामुळें जसे भिन्नवर्णी आहेत असें वाटतें तसेंच धर्मपंथांचेंहि आहे. इतके भिन्न आणि परस्परांस विसदृश असे पंथ असणें अनिष्ट नसून उलट इष्टच आहे. त्यामुळें आपणास काय पाहिजे याची बरोबर निवड करण्यास प्रत्येकास अवसर सांपडतो. बाह्यरूपें निराळीं दिसलीं तरी अंतःस्वरूप व अंतिम हेतु हीं एकच आहेत. “ **मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय । मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥** ” तसेंच “ **यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसंभवम् ॥** ” असें जें भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे याचाहि अर्थ हाच आहे. अनेक युगांच्या परंपरेनें निर्माण झालेल्या या हिंदुधर्माचा मानवजातीवर केवढा उपकार झाला आहे ! परमतासहिष्णुता हिंदूंस आजपर्यंत केव्हांहि शिवली नाहीं. ‘फक्त हिंदूंसच मुक्ति मिळेल ’ अशा आशयाचें एक तरी वाक्य साऱ्या हिंदू ग्रंथांतून काढून दाखवा असें साऱ्या जगास मी आव्हान करतों. उलट महर्षि व्यास ह्मणत आहेत कीं ‘आमच्या जातीच्या आणि धर्माच्या बाहेरचे असे अनेक पूर्णत्वास पावलेले लोक मीं पाहिले आहेत.’

प्रिय भगिनिबंधूंनो, याप्रमाणें हिंदुधर्माचें सामान्यस्वरूप काय आहे याची माहिती मीं आपणांस दिली आहे. हिंदूंनीं आजपर्यंत केलेले बेत फलद्रूप झाले नसतील. त्यांच्या हातून अनेक चुकाहि झाल्या असतील. परंतु सर्व जगाचा कधीं-

काळीं जर एकधर्म होणें शक्य असेल तर तो कालस्थलाबाधित अशा रूपाचाच असला पाहिजे. त्यांतील तत्वें विशिष्ट स्थलीं अथवा विशिष्ट कालींच खरीं ठरतील अशीं नसावीं. जाति अथवा वर्ण यांचा यत्किंचितहि भेद मनांत न आणितां सर्वांस सारखाच ज्ञानमार्ग दाखविणारा असा तो धर्म असला पाहिजे. तसेंच अत्यंत पुण्यवान् अथवा अत्यंत पापी यांस सारखीच दया दाखविणारा तो धर्म असला पाहिजे. ब्राह्मणांचा धर्म, बुद्धाचा धर्म, येशुख्रिस्ताचा धर्म आणि महंमदाचा धर्म या सर्वांचें स्वरूप जेथें आत्यंतिक ऐक्यानें नजरेस येईल असा तो धर्म असला पाहिजे. पशूंपेक्षां फारसे अधिक श्रेष्ठ नाहींत अशा रानटी लोकांपासून तों परमेश्वरस्वरूपाच्या जवळ जवळ पोहोंचलेल्या मनुष्यापर्यंत सर्वांस सारख्याच ममतेनें त्यानें पोटाशीं धरिलें पाहिजे. प्रत्येक मनुष्यांत गुप्तपणें ईश्वरत्व वास करित आहे, हें त्याचें खरें स्वरूप त्याच्या अनुभवास आणणें हेंच त्या धर्मांचें काम असलें पाहिजे. आपण असा धर्म जगास दिलात तर सारें जग आपलें अनुयायी होईल. अशोकानें अशा एकीकरणाचा प्रयत्न केला. परंतु तो एकटया बौद्ध धर्मासच चिकटून राहिला. बादशहा अकबर यानें या गोष्टीचा उपक्रम केला होता; परंतु त्याचें प्रमाण अगदींच अल्प होतें. हें काम अमेरिकेनेंच शेवटास न्यावें असा संकेत दिसतो.

हिंदूचें ब्रह्म, जरदुष्ट्राचा अहुर-मझ्द, बौद्धांचा बुद्ध, यहुद्यांचा यशाया आणि ख्रिस्ती लोकांचा आकाशस्थ पिता आपल्या या प्रयत्नास आशीर्वाद देवोत. धर्मकल्पनेचा तारा पूर्वेस उदय पावला व पश्चिमदिशेकडे संक्रमण करूं लागला. केव्हां त्याचा प्रकाश अंधुक तर केव्हां दैदीप्यमान दिसत होता. अशा रीतीनें आपला प्रवास संपवून तो पुन्हां पूर्वदिशेकडे येत येत सँपो नदीच्या कांठीं आला आहे. येथें त्याच्या तेजाची परमावधि झाल्याचें दिसत आहे.

स्वतंत्रतेची जन्मभूमि जी कोलंबिया तिचा जयजयकार असो! ज्या कोलंबियानें आपले हात आपल्या शेजाऱ्याच्या रक्तांत कधींहि माखले नाहींत, ज्या कोलंबियानें शेजाऱ्यांना लुटून आपले खिसे कधींहि भरले नाहींत त्या कोलंबियाला मानवी कुलाच्या अत्युच्च संस्कृतींत साहेब नौबतीचा मान मिळावा हें योग्यच आहे. शांतताचिन्हांकित जरिपटका घेऊन कोलंबिया आज सर्व राष्ट्रांच्या आघाडीस चालत आहे! कोलंबिया, तुझा त्रिवार जयजयकार असो!

---

४. हिंदुलोकांस धर्मज्ञानाची उणीव नाहीं.

२० सप्टेंबर १८९३.

आपल्या वर्तनावर कांहीं टीका झाली तर ती सहन करण्यास प्रत्येक खऱ्या ख्रिस्तानुयायानें नेहमीं तयार असलें पाहिजे. मी आज अशा प्रकारची टीका करणार आहें आणि तीबद्दल आपणास कांहीं विषाद वाटणार नाहीं असें मला वाटतें. ख्रिस्ती धर्माचे जे अनुयायी नव्हत अशा लोकांच्या आत्मोद्धारासाठीं आपण जगभर उपदेशक पाठवितां त्याऐवजीं आपण प्रथम त्यांचें मृत्यूपासून रक्षण करण्याची तजवीज केली तर अधिक बरें होणार नाहीं काय? हिंदुस्थानांत लहानसा दुष्काळ पडल्याबरोबर हजारों लोक मृत्युमुखीं जातात; आपण ख्रिस्ती ह्मणविणारांनीं त्यांस वांचविण्याचा कांहीं प्रयत्न केला आहे काय? साऱ्या हिंदुस्थानभर ख्रिस्ती देवळें उभारण्याबद्दल आपण फार दक्ष आहां; परंतु हिंदुस्थानाला आज धर्मज्ञानाची गरज आहे असें नाहीं. क्षुधेनें त्यांचें पोट आणि त्यांची पाठ यांची एकी झाल्यामुळें भाकरीचा एखादा तुकडा मिळेल या आशेनें ते टाहो फोडित आहेत. ते भाकरी मागत असतां त्यांच्या पदरांत धोंडा बांधण्यासारखें आपण करित आहां. भुकेनें प्राण व्याकूळ होत असतां कोरड्या धर्मज्ञानानें त्यांची भूक भागवूं पाहणें ह्मणजे खरोखर त्यांचा अपमान करण्यासारखें आहे. हिंदुस्थानांत केवळ पैशासाठीं धर्मज्ञानदानाचा जर कोणी उद्योग केला तर लोक खरोखर त्यांस शेणमार करतील. माझ्या बुभुक्षित बांधवांकरितां मीं येथें याचना केली, परंतु ख्रिस्ती देशांत ख्रिस्ती लोकांकडून इतर जातीच्या लोकांकरितां मदत मिळविणें किती कठीण आहे याचा मला चांगलाच अनुभव आला.

---

५. बौद्धधर्म हा हिंदुधर्माची पुरवणी आहे.

२६ सप्टेंबर १८९३.

मी बौद्धधर्मी नाहीं हें आपणास विदितच आहे. तथापि मी बुद्धाचा खरा अनुयायी आहें हें मात्र खरें आहे. चिनी, जपानी अथवा सिलोनी लोक बुद्धानुयायी ह्मणवितात, परंतु हिंदु लोक त्याला प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार मानून त्याची पूजा करितात. बौद्धधर्मासंबंधीं कांहीं टीकात्मक भाषण मी आज करणार आहें, परंतु त्यांत बुद्धावर टीका करण्याचा माझा उद्देश नाहीं. ज्याला परमेश्वरस्वरूप समजून मी भजतों त्याजवर टीका करण्यास मी धजेन तरी

कसा ? त्यावेळीं जे बुद्धानुयायी झाले त्यांस बुद्धाचें खरें ज्ञान लाभलें नाहीं, इतकेंच आमचें ह्मणणें आहे. यहुदी धर्म आणि ख्रिस्ती धर्म यांत जें परस्पर नातें आहे तशाच प्रकारचें नातें वैदिक हिंदुधर्म आणि बौद्धधर्म यांमध्यें आहे. येशु ख्रिस्त यहुदी होता. तसाच शाक्यमुनी हिंदु होता. यहुदी लोकांनीं येशु ख्रिस्ताचा अत्यंत छळ केला इतकेंच नव्हे तर त्यांनीं त्यास क्रुसावर खिळून ठार मारिलें; परंतु हिंदूंनीं शाक्यमुनी हा अवतार आहे असें मानून त्याचें पूजन केलें. शाक्यमुनीनें अगदीं नवें असें कांहीं सांगितलें नाहीं; तर वैदिकधर्मतत्वेंच त्यानें अधिक स्पष्ट रीतीनें प्रगट केलीं इतकेंच आम्हा हिंदु लोकांचें ह्मणणें आहे. यहुदी धर्म नष्ट करण्याकरितां नव्हे तर तो प्रत्यक्ष आचरून दाखवून त्यांत दिसणाऱ्या उणिवा भरून काढण्याकरितां ज्याप्रमाणें येशू ख्रिस्ताचा अवतार झाला, त्याच प्रकारच्या कार्यासाठीं शाक्यमुनी अवतरला. येशू ख्रिस्ताची खरी ओळख तत्कालीन इतर लोकांस जशी पटली नाहीं, तशीच बुद्धाची खरी ओळख खुद्द त्याच्या अनुयायांस बरोबर पटली नाहीं. पूर्वीचा धर्म मोडून टाकून अगदीं नव्या धर्माची स्थापना करावी हा बुद्धाच्या अवताराचा हेतु नसून वैदिकधर्माचा प्रत्यक्ष आचार कसा असतो आणि त्याच्या तत्वांना दृश्यस्वरूप कसें द्यावें हें दाखविण्याकरितां बुद्ध अवतरला.

हिंदुधर्माचे प्रमुख असे दोन भाग आहेत–कर्मकांड आणि ज्ञानकांड. होमहवनादि क्रियांचा विचार कर्मकांडांत प्रधान असून ज्ञानकांडांत तत्वविचार सांगितला आहे. संन्यस्तवृत्तीनें राहणारे लोक केवळ ज्ञानकांडाचा विचार करितात.

या धर्मविचारांत जातिभेदास फांटा दिलेला आहे. अत्यंत उच्च जातीचा अथवा अगदीं नीच जातीचा असा कोणीहि मनुष्य असला तरी त्यागी होण्यास त्यास हिंदुस्थानांत आडकाठी नाहीं. दोघेहि खरे त्यागी झाले तर त्यांच्यांत कांहींच भेद मानण्यांत येत नाहीं. धर्ममार्गांत जातीचा अथवा वर्णाचा भेद नाहीं. जात ही केवळ व्यावहारिक आचाराची बाब आहे. शाक्यमुनी स्वतः त्यागी होता. कालांतरानें वेदांतील धर्मज्ञान गुप्त झालें होतें तें त्यानें पुन्हां उज्वल स्वरूपानें लोकांस दाखविलें. अत्यंत कनिष्ठ दर्जाच्या मनुष्यापर्यंत हें ज्ञान पसरावें अशा उदार बुद्धीचा तो होता. धर्मप्रचारक तयार करून त्यांच्याकडून धर्मज्ञानाचा लोकांस उपदेश करण्याचा मार्ग बुद्धानेंच प्रथम प्रचारांत आणिला.

प्रत्येक मनुष्याबद्दल, आणि विशेषेंकरून प्रत्येक गरीब आणि अज्ञान मनुष्याबद्दल त्याच्या मनांत अनुपमेय प्रेम वसत होतें. हाच त्याच्या एकंदर

चरित्रांतील अत्यंत उज्वल आणि रमणीय असा विशेष होय. कित्येक ब्राह्मण त्याचे शिष्य झाले होते. बुद्धाचा जन्म झाला त्यावेळीं संस्कृत भाषा प्रचारांतून गेली होती. ती फक्त पुस्तकरूपानें जिवंत राहिली होती. त्यानें सांगितलेलें धर्मज्ञान संस्कृतांत ग्रथित करावें अशी त्याच्या ब्राह्मण शिष्यांस इच्छा होऊन तसें करण्यास त्यांनीं आपल्या गुरूची परवानगी मागितली. त्यावर बुद्ध ह्मणाला, " माझा जन्म माझ्या गरीब आणि अज्ञान बांधवांसाठीं झाला आहे. याकरितां त्यांच्याच भाषेनें त्यांस धर्मज्ञान सांगणें मला इष्ट वाटतें." यामुळें बौद्धधर्माचीं बहुतेक पुस्तकें त्या वेळच्या प्रचलित भाषेंत लिहिलेलीं आढळतात.

तत्ववेत्त्यांनीं कोणत्याहि मताचें प्रतिपादन केलें अथवा मानसशास्त्रवेत्त्यांनीं कोणतेहि सिद्धांत सिद्ध केले, तरी जोंपर्यंत मृत्यूचें साम्राज्य या भूतलावर कायम आहे, जोंपर्यंत मानवी अंतःकरणांतून भीतीचें समूळ उच्चाटन झालें नाहीं, आणि जोंपर्यंत दुर्बलतेमुळें आपणांस कोणाची तरी मदत असावी ही इच्छा मानवी हृदयांत शिल्लक आहे, तोंपर्यंत परमेश्वरावरील भरंवसा जगांतून नष्ट होणारच नाहीं.

बुद्धानुयायांनीं आपल्या धर्मप्रचाराच्या कार्यांत दोन मोठ्या चुका केल्या. वेदांवर हल्ले करून जुन्या इमारतीचा पाया ढांसळविण्याचा त्यांनीं यत्न केला. परंतु वेदांवर हल्ला करून यश मिळवूं पाहणें आणि खडक डोक्यानें फोडण्याचा प्रयत्न करणें हीं सारख्याच शहाणपणाचीं कामें आहेत. हीच त्यांची पहिली मोठी चूक झाली. तसेंच सामान्य कर्मसंगी जनतेचा परमेश्वरावरील भरंवस नाहींसा करण्याचा त्यांनीं यत्न केला, ही दुसरी मोठी चूक त्यांजकडून घडली. याचा साहजिक परिणाम बौद्धधर्माचा हिंदुस्थानांतून नायनाट झाला हा होय. ज्या देशांत बौद्धधर्माचा जन्म झाला त्याच आर्यावर्तांत आपणास बौद्ध ह्मणवून घेणारा एकहि इसम आज सांपडणार नाहीं !

परंतु यामुळें ब्राह्मणी धर्माचें मात्र थोडेंसें नुकसान झालें ही गोष्ट खरी. बौद्धधर्मामुळें खालच्या वर्गांत झपाट्यानें सुधारणा झाली. लोकांत परस्पर साहानुभूति आणि औदार्य यांची वाढ झाली. त्या वेळच्या एका ग्रीक प्रवाशानें हिंदूंत खोटें बोलणारा कोणी आढळत नाहीं व परद्वार करणारी अशी एकहि हिंदु स्त्री आढळत नाहीं, असें वर्णन लिहून ठेविलें आहे. यावरून त्यावेळचा हिंदुसमाज बुद्धाच्या अवतारामुळें किती उच्च पदवीस पोहोंचला होता, याची कल्पना येते. हेंच कार्य पूर्वी ब्राह्मणधर्म करित होता; परंतु त्याचें कार्य बुद्धावतारानें उचलल्यामुळें तो धर्म कांहीं काल मागें पडला ही गोष्ट खरी.

तात्विकदृष्ट्या हिंदुधर्म आणि बौद्धधर्म यांचा इतका एकजीव झाला आहे कीं एकावांचून दुसऱ्यास जिवंत राहणें शक्य नाहीं. ब्राह्मणांनीं पूर्णतेस आणिलेल्या तत्वविचारांचें साहाय्य असल्याशिवाय बौद्धधर्म मृतप्राय होणारच. तसेंच प्राणिमात्रावर दया करणें हा जो बौद्धधर्माचा विशेष त्याचें ब्राह्मणांनीं ग्रहण केल्याशिवाय त्यांच्या कोरड्या ब्रह्मज्ञानाचें तेज कसें पडणार ? या दोन धर्मांनीं निर्माण करून दिलेल्या दोन तत्वांचें एकीकरण कायम होतें, तोंवर हिंदुसमाज संस्कृतीच्या अत्युच्च शिखरावर आरूढ झालेला दिसत होता; परंतु दुर्दैवानें हीं दोन तत्वें भिन्न झालीं आणि हिंदुसमाजाची भव्य इमारत कडाडून पडली. तीस कोटी भिकाऱ्यांनीं आज हिंदुस्थान व्यापला आहे याचें कारण ही विभक्तताच. आज हजारों वर्षें वाटेल त्या जेत्याची आर्यभूमि दासी बनून राहिली आहे याचेंहि कारण हेंच. प्रिय बंधूंनो, इतका वेळ मीं सांगितलेली गोष्ट ध्यानांत धरून आपण ब्राह्मणांची तेजस्वी बुद्धिमत्ता आणि बुद्धाचें दयार्द्र आणि उदार अंतःकरण यांचें पुन्हां मिश्रण करूं या.

---

६. धर्मपरिषदेंतील शेवटचें व्याख्यान.

कल्पनासृष्टीच्या उदरांतून सुरक्षितपणें बाहेर पडून सर्व-धर्मपरिषद् प्रत्यक्ष सृष्टींत अवतरली. ही परिषद् यशस्वी व्हावी ह्मणून ज्यांनीं ज्यांनीं अहेतुक चित्तानें अत्यंत परिश्रम केले त्यांच्या श्रमांचें दयाळु परमेश्वरानें चीज केलें. ज्यांच्या उदार अंतःकरणांत या परिषदेची प्रथम कल्पना उद्भवली व ज्यांनीं तिला प्रत्यक्ष रूप दिलें त्यांचे आभार मानणें उचित आहे. ज्यांनीं भाषणें करून आपलें मनौदार्य व्यक्त केलें त्यांचेहि आभार मानिले पाहिजेत. माझ्या भाषणाचें कौतुक करून ज्यांनीं मला प्रोत्साहन दिलें त्या माझ्या प्रिय श्रोतृगणाचेहि मी आभार मानितों. त्याच प्रमाणें प्रसंगास अनुचित अशीं भाषणें कोणी केलीं असलींच तर त्यांचेहि आभार मानणें अवश्य आहे; कारण त्यामुळें तुलनात्मक दृष्टीनें उचित भाषणांचें तेज अधिक उज्वलतेनें पडण्यास मदतच झाली असें ह्मटलें पाहिजे.

सर्व धर्मांचें एकीकरण कोणत्या तत्वांवर करतां येईल याचा बराच ऊहापोह झाला. मी सध्यां कांहीं नवीन उपाय सुचविणार आहें असें नाहीं; परंतु एकाच धर्माचा पूर्ण विजय होऊन बाकीचे धर्म नष्ट व्हावे अशी जर कोणाची इच्छा असेल तर त्यास मला एवढेंच सांगावयाचें आहे " बाबारे, तुझी इच्छा तृप्त

होणें अशक्य आहे. ख्रिस्त्यांनीं हिंदुधर्म स्वीकारावा अशी इच्छा मी कां करावी, तसेंच हिंदूनें अथवा बौद्धानें ख्रिस्ती व्हावें असें तरी मला कां वाटावें ? ईश्वर करो आणि तसें न होवो !"

जमिनींत बीजारोपण केलें ह्मणजे त्या बीजाभोंवतीं पृथ्वी, पाणी आणि हवा यांचा पक्का गराडा असतो; ह्मणून पृथ्वी, पाणी आणि हवा यांपैकीं कोणत्याहि एका पदार्थाचें रूप त्या बीजास प्राप्त होतें काय ? नाहीं. त्या बीजाचा वृक्षच निर्माण होतो. याचा अर्थ हाच कीं पूर्वसंकेतानें ठरविलेल्या दिशेनेंच त्याची वाढ होते. पृथ्वी, पाणी आणि हवा यांतील पोषक द्रव्यें घेऊन त्यांचें रूपांतर करून, पानें आणि फुलें, तें त्रीज निर्माण करितें. तसेंच धर्माचेंहि आहे. हिंदूंचे ख्रिस्ती झाले अथवा ख्रिस्त्यांचे हिंदू झाले तर त्यांत कांहीं फायदा होण्याचा संभव नाहीं; परंतु एकमेकांच्या सहानुभूतीनें परस्परांत जें चांगलें ह्मणून आढळेल तें परस्परांनीं घेऊन आपल्या मूळ संस्कारांशीं त्याचा एकजीव करून टाकिला पाहिजे. कोणीहि आपलें स्वत्व विसरणें फायद्याचें नाहीं. अंतःकरणाचें पावित्र्य आणि मनौदार्य हीं निर्माण करण्याचें सामर्थ्य कोणत्याहि एकाच विशिष्ट धर्मास आंदण दिलेलें नाहीं, ही गोष्ट विशेषेंकरून या परिषदेंत निःसंशय सिद्ध होऊन जगाच्या प्रत्ययास आली. अत्युच्च दर्जाचीं स्त्रीपुरुषें सर्व धर्मांत निर्माण झालेलीं आहेत, असा प्रत्यक्ष पुरावा दिसत असूनहि जर आपलाच धर्म तेवढा खरा व जगण्यास योग्य आणि बाकीचे धर्म नष्ट होण्यास योग्य असें कोणास वाटत असेल तर असल्या व्यक्ति केवळ अनुकंपनीय मात्र होत. त्यांस माझें एवढेंच सांगणें आहे कीं "मित्रांनो, इतर धर्म बुडविण्यासाठीं तुह्मीं भगिरथ प्रयत्न केला तरी इतःपर 'शांतता, परस्पर मदत, आणि मित्रभाववृद्धि' या त्रिपुटीनें अंकित केलेलीं निशाणें घेऊन सर्व धर्म सारख्याच जोमानें पुढें सरसावणार आहेत."

आत्मा, परमेश्वर आणि धर्म.

कित्येक शतकांपूर्वी विश्वांत उमटलेला ध्वनि काळाच्या पोटांतून प्रवास करित करित आपणापर्यंत येऊन पोहोंचला आहे. निर्जन अरण्यांत आणि हिमाचलाच्या गुहांत वास करणाऱ्या ऋषिवर्यांनीं पाठविलेला निरोप आपणापर्यंत येऊन पोहोंचला आहे. जो ध्वनि भगवान् बुद्धाच्या मुखांतून बाहेर पडला, जो ध्वनि अनेक वेळां अनेक रूपांनीं अनेकांच्या मुखांतून प्रगट झाला, जगा-

च्या आरंभापासून जो ध्वनि मनुष्याबरोबर सहचर आहे, तोच ध्वनि चालू क्षणीं आमच्याजवळ उमटत आहे. उच्च पर्वतांत उगम पावणाऱ्या झऱ्यासारखा तो ध्वनि आहे. ज्याप्रमाणें तो झरा कित्येक ठिकाणीं गुप्त होऊन पुन्हां प्रगट होतो, व मध्यंतरीं त्याचें पाणी कोठें कमी झालेलें तर कोठें इतर प्रवाह मिळून अधिक झालेलें असतें, त्याचप्रमाणें हा ध्वनि केव्हां सूक्ष्म तर केव्हां प्रचंड, कधीं अगदीं गुप्त तर केव्हां पूर्णपणें प्रगट झाला. पर्वताच्या शिखरावर जन्म पावलेला लहानसा झरा ज्याप्रमाणें दुसऱ्या लहान लहान ओढ्यांस आपल्याशीं संयुक्त करून घेत घेत शेवटीं प्रचंड नदाचें स्वरूप पावतो, त्याचप्रमाणें काळाच्या अनंतत्वांत प्रगट झालेला हा सूक्ष्म ध्वनि सर्व राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांच्या मुखांतून निघणाऱ्या लहान लहान ध्वनींस आपल्याशीं मिळवून घेऊन आतां पूर्णत्वानें प्रगट होऊं पहात आहे. या ध्वनीनें जो प्रथम निरोप आणिला तो असाः—' सर्वत्र मित्रभाव, सर्व धर्मांचा विजय.' सर्व धर्मांतील शत्रुभाव नष्ट होऊन सर्वांचें शेवटीं एकीकरण होणार असें या ध्वनीनें सूचित केलें आहे. या निरोपाचा अर्थ काय हें समजण्याचा आपण प्रयत्न करूं.

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं भौतिकशास्त्रांची जी प्रचंड लाट उसळली तिच्या सपाट्यांत सांपडून सर्व धर्म रसातळास जातात कीं काय अशी भीति वाटूं लागली होती. नव्या शास्त्रांनीं सुरू केलेल्या घणाच्या तडाक्याखालीं जुन्या धर्मकल्पना कांचेच्या भांड्याप्रमाणें कडाकड फुटूं लागल्या. धर्म ह्मणजे अर्थशून्य बडबडीचें पोतडें आहे कीं काय असें ज्यांस वाटूं लागलें त्यांची स्थिति अत्यंत अंधकारमय आणि निराशाजनक दिसूं लागली. एखाद्या बुळबुळीत पदार्थास अधिक दाबून धरूं लागलें असतां तो जसा अधिक सपाट्यानें लांब निसटून जातो त्याप्रमाणें एक एक धर्मकल्पना सपाट्यानें लांब लांब जाऊं लागली. अज्ञेयवाद आणि चार्वाकमत यांचें प्राबल्य होऊन त्यांच्या हल्ल्यानें जुन्या धर्मांची इमारत इतकी खिळखिळीत झाली कीं, ती लवकर जमिनदोस्त होणार अशीं चिन्हें उघड दिसूं लागलीं. जे कोणी जुन्या मताचे होते त्यांस आपलीं मतें बोलून दाखविण्याचेंहि धैर्य होईनासें झालें. आतां जुना धर्म जगणें शक्य नाहीं अशी बहुतेकांची खात्री झाली होती. परंतु ही स्थिति बदलत जाणार, असें वाटूं लागलें आहे. हा फरक होण्यास काय कारणें झालीं याचा आपण विचार करूं. निरनिराळ्या प्रचलित धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करण्याची प्रवृत्ति वाढूं लागली हें पहिलें मोठें कारण आहे. मी लहान वयाचा

असतां या निराशामय स्थितीनें मलाहि पछाडलें होतें. धर्मांत कांहीं तात्पर्य नाहीं असें मलाहि वाटूं लागलें होतें; परंतु माझें सुदैव म्हणून बायबल, कुराण आणि बौद्धधर्मांचीं पुस्तकें यांचा मीं अभ्यास केला. त्या वेळीं माझ्या हिंदु-धर्मांत सांगितलेलीं प्रमुख मूलतत्वेंच इतर धर्मांतहि आहेत असें मला आढळून आलें. त्या वेळीं अनेक प्रकारची विचारपरंपरा माझ्या चित्तांत उभी राहिली. मी विचार करूं लागलों कीं, जगांत 'सत्य' तरी काय आहे ? प्रथम हें दृश्य जग सत्य आहे काय ? होय. हें सत्य असलेंच पाहिजे. कारण, याचा मला प्रत्येक क्षणीं ज्याअर्थीं अनुभव येत आहे त्याअर्थीं तें खोटें कसें म्हणावें ? आतांच आपण जें संगीत ऐकिलें तें खरें काय ? होय. तें अगदीं खरें. कारण तें आपण आपल्या कानांनीं स्वतः ऐकलें. प्रत्येक मनुष्याला शरीर, डोळे आणि कान इत्यादि बाह्येंद्रियें आहेत. या बाह्येंद्रियांनीं त्यास बाह्य जगाचा अनुभव घेऊन खऱ्याखोटयाची निवड करतां येते. ज्याप्रमाणें मनुष्यमात्रास बाह्येंद्रियें आहेत त्याचप्रमाणें त्यास अतींद्रियत्वहि आहे. त्याच्या चैतन्याचें स्वरूप काय आहे हें आपणांस आपल्या चर्मचक्षूंनीं दिसत नाहीं. या आपल्या चैतन्यास चालन देऊन मनुष्य विचार करूं लागला असतां त्यास एक गोष्ट निःसंशय आढळून येईल. कोणताहि धर्म, मग तो अरण्यांत ऋषींनीं सांगितलेला असो, अथवा ख्रिस्ती देशांत सर्व मनुष्यांपुढें सांगितलेला असो, एकाच प्रकारच्या मूल-भूत तत्वांवर रचिला आहे अशी त्याची निःसंशय खात्री होईल. यावरून असें सिद्ध होतें कीं धर्मविचार हा कोणत्याहि कालीं व कोणत्याहि स्थलीं असलेल्या मनुष्यमात्राच्या मनाचा नेहमीं आढळणारा एक घटक आहे. एका धर्माच्या सत्यतेकरितां अनेक धर्मांची सत्यता सिद्ध व्हावी लागते. अनेक ठिकाणीं एकच गोष्ट एकाच प्रकारची आहे असें आढळून आलें म्हणजे आपण त्या गोष्टीचें निश्चित स्वरूप अमूक असें ठरवितों. समजा, कीं मला सहा बोटें असलीं आणि आपण निरीक्षणार्थ हातीं घेतलेल्या माझ्या जातीच्या पंचवीस प्राण्यांस पांचच बोटें आढळलीं तर मी तेवढ्यापुरता सृष्टिबाह्य प्राणी आहें असें म्हणणें चुकीचें होणार नाहीं. तसेंच एकच धर्म खरा आणि बाकीचे खोटे हें म्हणणेंहि खोटेंच आहे. एकच धर्म असणें हें सहा बोटांच्या प्राण्यासारखेंच सृष्टिबाह्य आहे– असामान्य आहे. याच न्यायानें जगांतील कोणताहि एक धर्म खरा म्हटला तर बाकीचे खरे असलेच पाहिजेत. कांहीं किरकोळ बाबतींत त्यांत फरक आढळेल परंतु प्रमुख तत्वें सर्वांत सारखींच सांगितलीं आहेत. जर मला पांच बोटें असणें

हें सृष्टीस अनुरूप असेल तर आपणा सर्वांस पांच बोटें असणें हेंहि अनुरूपच म्हटलें पाहिजे.

मनुष्यप्राणी कोणत्याहि कालीं आणि कोणत्याहि स्थलीं असो, त्याची आस्तिक्य-बुद्धि जागृत झालीच पाहिजे. त्याचें चैतन्य जागृत झालेंच पाहिजे. एका व्यक्तीच्या देहांत गडबड करतांना आढळतो तो कोण आणि साऱ्या विश्वांत प्रत्यक्ष दृश्यमान होणाऱ्या चैतन्याचें स्वरूप काय अशा प्रकारच्या प्रश्नांनीं त्याच्या चित्तांत केव्हांना केव्हां तरी गोंधळ उडवून दिलाच पाहिजे. अशा प्रश्नपरं-परेस तो उत्तरें शोधूं लागला म्हणजे निरनिराळ्या तीन पायऱ्यांवरून त्यास या उत्तराकरितां चढावें लागतें. नेहमीं बदलत जाऊन शेवटीं नष्ट होणाऱ्या या शरीराशिवाय न बदलणारा असा आणखी एक निराळाच अंश प्रत्येक प्राण्यांत आहे ही गोष्ट सर्व धर्मांनीं कबूल केली आहे. हा अंश अविभाज्य, नित्य आणि केव्हांहि न बदलणारा असा आहे. ही एक पायरी झाली. हा अंश केव्हांहि मरत नाहीं ही गोष्ट खरी, परंतु तो पूर्वी केव्हां तरी एके काळीं जन्मास आला असला पाहिजे असा सिद्धांत कित्येक धर्मांनीं प्रतिपादिला आहे. ही दुसरी पायरी झाली. परंतु जें जन्मास आलें–नवीन उत्पन्न झालें–त्याचा शेवट केव्हां ना केव्हां तरी होणारच हें उघड आहे. जन्म म्हटला कीं मृत्यु आणि आरंभ म्हटला कीं शेवट, या कल्पना आपोआपच मनांत उभ्या राहतात. हें कल्पनायुग्म अविभाज्य आहे. याकरितां आपणांतील जो चैतन्यांश आहे त्याला आरंभ असा कधीं झालाच नाहीं, आणि म्हणूनच तो कधीं मरणार नाहीं ही गोष्ट खरी. तसेंच दृश्यतेस आलेल्या या चैतन्याशिवाय आणखी एक न मरणारें असें महत् चैतन्य आहे, त्यास परमेश्वर अथवा परमात्मा अशी संज्ञा आहे. ही तिसरी पायरी झाली. मनुष्ययोनीचा आरंभ–सृष्टीचा आरंभ–असे शब्द जेव्हां आपण ऐकतों, तेव्हां 'आरंभ' या शब्दानें एका युगकालाच्या आरंभाचा बोध होतो असें समजावें. सृष्टीची व्यक्तदशा संपून कांहीं काल ती अव्यक्त स्थितींत राहते व नंतर पुन्हा ती व्यक्त होते. या दुसऱ्या व्यक्त होण्याच्या कालीं नव्या युगाला आरंभ होतो. 'आरंभ' या शब्दानें सर्व विश्वरचनेचा आरंभ असा अर्थ ध्वनित होतो असें समजूं नये. 'ज्याला आरंभ आहे त्याला शेवट निश्चित आहे.' हा सिद्धांत आपण नीट ध्यानांत धरा. "न त्वेवाहं जातुनासं न त्वं नेमे जनाधिपाः । न चैव न भविष्यामः सर्वे वयमतःपरम् ॥" या शब्दांनीं भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत हाच सिद्धांत सांगितला आहे. तुमच्या देहाचा अंत केव्हांना केव्हां तरी होणारच; परंतु आत्म्याचा अंत मात्र कधींहि होणार नाहीं.

जीवात्म्यासंबंधीं जशा या कल्पना प्रचलित झाल्या तशाच दुसऱ्या प्रकारच्या कांहीं कल्पना त्याच्या पूर्णत्वासंबंधीं प्रचलित झाल्या. आत्मा हा स्वतः पूर्ण आहे. हें त्याचें पूर्णत्व नव्या करारासही मान्य आहे. मनुष्य हा आरंभीं पूर्ण होता, आणि आपल्या वाईट कृत्यांनीं पापी झाला; परंतु पुण्यकृत्यांनीं, पुन्हां त्याची मूळची पदवी त्यास प्राप्त होईल असें नवा करार सांगतो. इतर कित्येक धर्मांतून हीच गोष्ट, केव्हां गोष्टींच्या, केव्हां रूपकांच्या आणि केव्हां विशिष्ट खुणांच्या रूपानें सूचित केली आहे. या सर्व गोष्टींचें आणि रूपकांचें आपण पृथक्करण केलें तर आपणास असें आढळून येईल कीं, जीवात्मा हा स्वभावतः पूर्ण असून त्यास त्याचें पूर्वीचें पावित्र्य पुन्हां मिळवितां येईल, ही गोष्ट सर्वांस संमत आहे. ही गेलेली पूर्णता पुन्हां कशी मिळवितां येईल अशा प्रश्नास "परमेश्वरास जाणल्यानें." हें उत्तर सर्व धर्मांनीं दिलें आहे. पुत्राची (येशूची) भेट घेतल्याशिवाय परमेश्वराची भेट होणार नाहीं, असें बायबलांत ह्मटलें आहे. यावरून परमेश्वराची भेट करून देणें हेंच प्रत्येक धर्माचें साध्य-ध्येय-आहे असें ह्मणतां येईल. परमेश्वराच्या भेटीचे मार्ग त्यांनीं निरनिराळे सांगितले असतील ही गोष्ट स्वतंत्र आहे. वर बायबलांतील वचन दिलें त्याचा वास्तविक अर्थ असा आहे कीं पुत्रास शोभण्यासारखी कृति करावी तेव्हां पित्याची भेट होते. आपल्याच कृतीनें मनुष्य अवनत झाला आहे हें ह्मणणें विशेषतः प्रत्येकानें ध्यानांत ठेविलें पाहिजे. ज्या ज्या वेळीं आपणावर दुःखदायक प्रसंग येतात, त्या त्या वेळीं आपल्याच कर्मांचा हा परिपाक आहे ही गोष्ट ध्यानांत आणून परमेश्वरास दोष देऊं नये. याच कल्पनांशीं अत्यंत संयुक्त अशी पुनर्जन्माची कल्पना प्रसार पावली होती. परंतु युरोपियन लोकांनीं तिची पुढें मोडतोड केली.

तुमच्यांपैकीं कित्येकांच्या कर्णपथावरून ही कल्पना गेली असेल आणि कित्येक वेळां तुह्मी तिची उपेक्षा केली असेल. आत्म्याच्या अमरत्वाच्या कल्पनेच्या अत्यंत साहचर्यानें असणारी अशी ही पुनर्जन्माची कल्पना आहे. जिचा एके वेळीं पूर्ण नाश होतो, अशा वस्तूला केव्हांना केव्हां तरी आरंभ झाला असलाच पाहिजे; तसेंच एखाद्या वस्तूचा आरंभकाल निश्चित करतां येत असला तर केव्हांना केव्हां तरी तिचा अंत झालाच पाहिजे. जर जीवात्मा कधीं मरत नाहीं हें खरें मानलें, तर तो केव्हां तरी जन्म पावतो—त्याला आरंभ होतो—हें मानणें अत्यंत धाष्ट्याचें आहे. जीवात्मा हा पूर्ण स्वतंत्र आहे ही गोष्ट पुनर्जन्माच्या कल्पनेनेंच सिद्ध होते. कोणत्या तरी एका कालीं जीवात्मा नवीन उत्पन्न

झाला–त्याला आरंभ झाला–असें मानिलें तर मनुष्यांत दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या पापवृत्तींचा सर्व बोजा परमात्म्याच्या–ईश्वराच्या–डोक्यावर बसतो! अत्यंत पवित्र परमेश्वरानें पापी मनुष्यांस जन्म दिला असें ह्मणणें भाग पडतें! जर जगांत दिसणाऱ्या पापाचा मूळ कर्ता परमेश्वर असता तर जगांतील सर्व व्यक्ति एकसारख्या दुःखी असावयास पाहिजे होत्या. अत्यंत न्यायी अशा परमेश्वराच्या राज्यांत त्यानेंच उत्पन्न केलेल्या जीवांस कमी अधिक शिक्षा व्हावी हें योग्य आहे काय? लक्षावधि लोक प्रत्यहीं पायाखालीं केरासारखे तुडविले जावे, हजारों निरपराधी लोक क्षुधेला बळी पडावे, या गोष्टी किती चमत्कारिक आहेत! मनुष्यप्राणी आपल्या कर्मानुरूप दुःख भोगित नाहीं, असें ह्मटलें तर या सर्व दुःखाचें जनकत्व परमेश्वराकडे येतें! तर, जगांतील दिसणाऱ्या दुःखास ज्याचा तो कारण आहे हेंच ह्मणणें युक्तीस धरून आहे. कर्म करणारा जर मी तर त्यापासून उत्पन्न होणाऱ्या फलाची जबाबदारी माझ्याच माथीं मारावयास नको काय? दुःखोत्पत्ति होणारीं कर्मे जशीं मला करतां येतात तशींच सुखोत्पादक कर्में करण्याचीहि मला पूर्ण मुभा आहे. कोणतेंहि कर्म करण्यास अथवा न करण्यास मी पूर्ण स्वतंत्र आहें. मला कर्म करण्यास लावणारा असा कोणीहि नाहीं ही गोष्ट आपण नित्य लक्षांत बाळगिली पाहिजे. या करितांच नशीब अथवा दैव असे जे शब्द वारंवार आपण ऐकतों ते अगदीं अर्थशून्य आहेत हें आपल्या लक्षांत आलेंच असेल. कोणतेंहि बरें अथवा वाईट फळ मिळत असलें तर तें आपल्याच कृतींतून आपल्याच इच्छेनें निर्माण झालें आहे, हा निश्चित सिद्धांत समजावा. याकरितां दुःख भोगणें अथवा त्यांतून मुक्त होणें हें सर्वथा माझ्याच इच्छेवर अवलंबून आहे. "सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता। परो ददातीति कुबुद्धिरेषा॥" हा सिद्धांत मनुष्यमात्रानें सदैव ध्यानांत बाळगिला पाहिजे.

पुनर्जन्माच्या मताविषयीं जें कांहीं मी आतां सांगणार आहें त्याकडे विशेष लक्ष्य पुरविण्याची मी आपणास विनंति करितों. आपणास कोणत्याहि पदार्थाचें जें ज्ञान होतें तें अनुभवजन्य असतें; आणि ज्याला आपण अनुभव ह्मणतों त्या स्थितीचें वास्तविक स्वरूप ह्मणजे स्मरण होणें हें होय. अनुभव आणि स्मरण हे वस्तुतः समानार्थक शब्द आहेत. उदाहरणार्थ, एखादा मनुष्य सतार वाजवित असतो त्यावेळीं कोणत्या पडद्यावर बोट ठेविलें ह्मणजे कोणत्या स्वराची उत्पत्ति होते याचें स्मरण त्यास असतें. त्यासच आपण ज्ञान ह्मणतों. हें ज्ञान पूर्वी

कानांनीं जे स्वर ऐकिले त्यांच्या अनुभवाची पुनरावृत्ति होय. कोणीहि मनुष्य नवीनच सतार वाजविण्यास शिकत असतो तेव्हां प्रत्येक पडदा दृष्टीनें पाहून आणि पूर्वींच्या अनुभवाचें स्मरण करून त्यास त्या अनुभवाप्रमाणें बोटें ठेवावीं लागतात. बऱ्याच कालाच्या प्रयत्नानें शेवटीं त्याच्या बोटांस इतकी संवय लागते कीं, तीं योग्य पडद्यांवरून आपोआप फिरूं लागतात. ही क्रिया इतक्या साहजिक रीतीनें आणि झपाट्यानें होते कीं, आपण पूर्वीच्या अनुभवाच्या–ज्ञानाच्या–स्मरणानें वाजवित आहों ही गोष्ट खुद्द वाजविणाराच्याहि लक्ष्यांत येईनाशी होते. त्याचप्रमाणें आपणा मनुष्यांमध्यें जे कित्येक संस्कार अथवा मनोवृत्ति जन्मतःच आढळतात, त्या पूर्वींच्या संवयींमुळें उत्पन्न झालेल्या असतात. एखाद्या तान्ह्या मुलांतहि विशिष्ट मनोवृत्ति असल्याचें आपल्या नेहमीं अनुभवास येतें; या मनोवृत्ति कोठून उत्पन्न होतात ? या जन्मींचा अनुभव ह्मणावा तर तें बिचारें आपल्या खोलींतूनहि पुरतें बाहेर गेलेलें नसतें. यावरून मूल जन्मास येतें तेव्हां अगदीं कोऱ्या मनानें येतें असें वाटत नाहीं. पूर्वानुभवजन्य अशा विशिष्ट मनोवृत्ति तें बरोबर घेऊन येतें असें ह्मणावें लागतें.

प्रत्येक मुलास विशेष मनोवृत्ती जन्मतःच असतात, ही गोष्ट जुन्या ग्रीक आणि इजिप्शियन तत्त्ववेत्त्यांनां मान्य होती. पूर्वजन्मीं त्यानें जीं कृत्यें केलीं त्यांचाच परिपाक मनोवृत्तींत होऊन नव्या जन्माबरोबर त्या पुन्हां व्यक्त होऊं लागतात. पुनर्जन्म आहे असें मानिल्यावांचून या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागणें शक्य दिसत नाहीं. अत्यंत हट्टी अशा चार्वाकमतवाद्यालाहि पुनर्जन्म कबूल करणें भाग पडेल. पूर्वकालीं होऊन गेलेल्या अनेक महात्म्यांस आणि तत्त्ववेत्त्यांस पुनर्जन्माची कल्पना मान्य होती. खुद्द येशु ख्रिस्ताला ही कल्पना मान्य होती. ख्रिस्त ह्मणतो "पूर्वींचा जो आब्राहाम तोच मी." (Before Abraham was, I am.)

हल्लीं निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या स्वरूपानें ज्या अनेक धर्मांची वाढ झाली आहे त्यांचें जन्मस्थान आशियाखंड आहे आणि त्या धर्मांतील भावार्थ आशियांतील लोकांस जितका चांगला समजतो तितका तो इतरांस कळत नाहीं. हे धर्म आशियांतून बाहेर इतरत्र संचार करूं लागल्यानंतर त्यांत चुकीच्या मतांची भेसळ झाली. ख्रिस्ती धर्मांतील अत्यंत उदार आणि उच्च तत्त्वें युरोपियन लोकांस कधींच नीटशीं समजलीं नाहींत. बायबल प्रथम ज्यांनीं लिहिलें त्यांनीं ज्या कल्पना प्रचलित करण्याचा यत्न केला व कित्येक वेळां त्यांकरितां

ज्या चिन्हांची योजना केली, त्या कल्पना आणि तीं चिन्हें युरोपियन लोकांस अगदीं अपरिचित होतीं. ख्रिस्ताची आई मेरी हिचीं युरोपियन लोकांनीं काढिलेलीं चित्रेंच आपण उदाहरणार्थ घेऊं. प्रत्येक चितार्‍यानें स्वतःच्या कल्पनेस अनुसरून हें चित्र तयार केल्यामुळें निरनिराळ्या चित्रांवर अनेकविध मनोवृत्तींची छाया दिसून येते. येशू ख्रिस्ताच्या शेवटच्या भोजनप्रसंगाचें चित्र पुष्कळांनीं काढिलेलें मीं पाहिलें आहे. या चित्रांत ख्रिस्त टेबलाशीं बसल्याचें दाखविलें आहे. वास्तविक ख्रिस्तानें टेबलाचा उपयोग जेवण्याकरितां केव्हांहि केला नव्हता. कोणत्याहि राष्ट्रांतील लोकांना परकीयांच्या चालीरीतींचें यथार्थ ज्ञान होणें बहुधा अशक्य आहे. ग्रीक, रोमन आणि इतर राष्ट्रांच्या अनुषंगानें ज्यांत अनेक प्रकारची भेसळ झाली आहे अशा जुन्या यहुदी लोकांच्या चाली युरोपियनांस नीटशा समजल्या नाहींत ही आश्चर्याची गोष्ट नाहीं. अनेक दंतकथा आणि काल्पनिक गोष्टी यांनीं वेष्टून गेलेल्या येशूच्या तत्त्वज्ञानाची नीटशी ओळख युरोपियन लोकांस न झाल्यामुळें त्यांनीं सध्यांचा आपल्या वणिग्वृत्तीस साजेसा ख्रिस्तिधर्म निर्माण केला यांत आश्चर्य नाहीं. असो. आतां हें विषयांतर बाजूस ठेवून आपण आपल्या पहिल्या मुद्द्याकडे वळूं.

आत्मा अमर आहे व आपल्याच कृतीनें तो मलिन झाल्यासारखा दिसतो ही गोष्ट सर्व धर्मांस कबूल असल्याचें प्रथम सांगितलेंच आहे. आतां ईश्वर अथवा परमात्मा ह्मणजे काय, याबद्दल निरनिराळ्या धर्मांच्या काय कल्पना आहेत, त्या पाहूं. अगदीं जुन्या काळची परमेश्वराबद्दलची कल्पना अत्यंत अस्पष्ट अशी आहे. जुन्या काळच्या राष्ट्रांत सूर्य, पृथ्वी, अग्नि इत्यादि अनेक प्रकारच्या देवता मानिल्या जात असत. अशाच प्रकारच्या अनेक देवता आपआपसांत मोठमोठीं युद्धेंहि करित असत, असें जुन्या यहुदी दंतकथांवरून दिसून येतें. यानंतर बाबिलोनियन आणि यहुदी लोकांचा इलोहिम देव आढळतो. यानंतर अनेक देवतांची कल्पना कमी होत जाऊन त्या जागीं एखाद्या देवास अग्रपूजेचा मान मिळूं लागला. परंतु हा मुख्य देव प्रत्येक जातीचा निराळा असे. आपलाच देव सर्वांत मोठा असें प्रत्येक जातीनें ह्मणावें आणि हा मोठेपणा सिद्ध करण्याकरितां कित्येक वेळां या निरनिराळ्या जातींत लढायाहि होत असत. लढाईत ज्या जातीचा जय होई तिचा देव मोठा असें समजण्यांत येई. या सर्व जाती बहुधा रानटी होत्या. परंतु या निरनिराळ्या कल्पनांचा क्षय होत होत त्यांऐवजीं अधिक उदार आणि अधिक उच्च अशा कल्पनांचा प्रादुर्भाव होऊं

लागला आहे. या जुन्या कल्पना नष्ट होत होत आतां पूर्णपणें नाहींशा होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. पृथ्वीवर सध्या जे मुख्य धर्म दिसत आहेत ते शेंकडों वर्षें वाढत असलेल्या वृक्षाचीं फळें आहेत. त्यांतला एकहि धर्म आकाशांतून पडून पृथ्वीवर सांवरला असें नाहीं. त्यांपैकीं प्रत्येकाची अनेक पुण्यपुरुषांनीं थोडी थोडी जोपासना करून त्यास सांप्रतच्या दर्शनीय स्वरूपास आणिलें आहे.

यानंतर सर्वशक्तिमान् व सर्वज्ञ अशा परमेश्वराची कल्पना उदयास आली. या सर्व विश्वाचा चालक एकच परमेश्वर आहे. या कल्पनेचा उदय झाला. हा परमेश्वर विश्वाच्या बाहेर कोठें तरी अंतराळांत राहतो अशी समजूत झाली. ही कल्पना ज्यांनीं प्रथम प्रचारांत आणिली, त्यांनीं स्वतःच्या लहरीप्रमाणें त्या परमेश्वराचें स्वरूप अनेक प्रकारचें कल्पिलें आहे. त्याला उजवें आणि डावें अंग आहे असें कोणी सांगतात, इतकेंच नव्हे तर त्याच्या हातांत एक पक्षी आहे अशीहि कोणाची कल्पना धांवते; तथापि एवढी गोष्ट खरी कीं, निरनिराळ्या जातींचे निराळे देव नाहींसे होऊन त्यांऐवजीं एका विश्वबाह्य देवाची योजना केली गेली तरी येथपर्यंत देवाचें अस्तित्व विश्वबाह्य होतें. पुढें ही कल्पनाहि बदलत जाऊन अंतर्यामी आणि सर्वव्यापी परमेश्वराची कल्पना तिच्या जागीं आली.

'आमचा पिता, जो आकाशांत राहतो' असें एक वाक्य नव्या करारांत आहे, याचा अर्थ, परमेश्वर मनुष्यांहून निराळा असून अंतराळांत कोठें तरी राहतो, असा होतो; परंतु यापुढें ही कल्पना थोडी बदलून तिच्याऐवजीं परमेश्वर अंतराळांत आणि पृथ्वीवर राहतो अशी कल्पना आढळते. हिंदुतत्वज्ञानांत परमेश्वराचें अस्तित्व मनुष्यांत असल्याचें सांगितलें आहे; इतकेंच नव्हे तर हिंदूंचा अद्वैतवाद याच्याहि पुढें जाऊन पूजक मनुष्य आणि पूजनीय परमेश्वर हे एकच आहेत असें सांगतो. पूजक मनुष्य ह्मणजे परमेश्वरानेंच घेतलेलें एक सोंग आहे. जें जें सत्य ह्मणून माझ्या ठिकाणीं आहे तें तें परमेश्वराचें स्वरूप आहे, आणि परमेश्वर स्वरूपांत जें सत्य तेंच माझ्या ठिकाणीं व्यक्त झालें आहे असें पूजक शेवटीं ह्मणूं लागतो. परमेश्वर आणि मनुष्य यांतील जमीन अस्मानाचें अंतर याप्रमाणें कमी होत जाऊन शेवटीं मनुष्य आणि परमेश्वर एक झाल्याचें आढळून येतें. परमेश्वरास जाणलें असतां आकाशांतील परमेश्वर आपल्याच अंतर्यामीं आहे असा अनुभव येतो.

मी निराळा आणि परमेश्वर निराळा असें द्वैत जेव्हां आरंभीं मानवी हृदयांत असतें तेव्हां मी ह्मणजे अमुक एक गोमाजी आहे व अनंतकालपर्यंत मी गोमाजीच राहणार असें त्यास वाटत असतें. देहावरील त्याची ममता इतकी पक्की असते कीं, आंतील आत्म्याच्या स्वरूपाकडे त्याचें लक्ष्यच जात नाहीं व यामुळें 'मी' ह्मणणाराचें खरें स्वरूप देहाहून कांहीं निराळेंच असेल कीं काय, अशी नुसती शंकाहि त्यास येत नाहीं. यामुळें देहाध्यासानें एखाद्या खुनी मनुष्याचीहि अनंतकालपर्यंत खुनीच राहीन असें ह्मणण्यापर्यंत मजल जाण्याचा संभव आहे. परंतु या देहाध्यासाचे परिणाम दुःखप्रद आहेत असें हळू हळू त्याच्या लक्ष्यांत येऊन त्यापासून पराङ्मुख होऊन तो कालेंकरून आपल्या आरंभींच्या ॲडमच्या पवित्र स्थितीस परत जातो.

'ज्यांचें अंतःकरण शुद्ध आहे ते परमेश्वरास पाहतील.' परमेश्वरास आपण पाहूं ही गोष्ट शक्य आहे काय ? नाहीं. खास नाहीं. तसेंच परमेश्वरास आपणास जाणतां येईल ह्मणावें तर तेंहि शक्य दिसत नाहीं. जर अमुक हा परमेश्वर असें दाखवितां आलें तर त्याच क्षणीं त्याचें परमेश्वरत्व ह्मणजे सर्वव्यापित्व नष्ट होतें याची वाट काय ? परंतु 'मी आणि माझा पिता एकच आहों' असें जें बायबलांत ह्मटलें आहे तें मात्र खरें; कारण परमेश्वरस्वरूप पाहतां आलें नाहीं अथवा जाणतां आलें नाहीं तरी त्याचा अनुभव अंतर्यामीं होणें हें युक्तीस सोडून नाहीं. पाहणें अथवा जाणणें असें ह्मटलें ह्मणजे तें दृश्य अथवा ज्ञेय विशिष्ट मर्यादेनें व्याप्त आहे असें होतें; आणि परमेश्वरस्वरूप मर्यादित असणें शक्य नाहीं. कित्येक धर्मांत ही कल्पना स्पष्ट शब्दांनीं सांगितली आहे व दुसऱ्या कित्येकांत केवळ प्रसंगानें सूचित केली आहे; व आणखी कित्येकांत तर तिचा मागमूसहि लागत नाहीं. आपल्या या देशांत (अमेरिकेंत) ख्रिस्तानें सांगितलेला संदेश क्वचितच कोणा एखाद्यास समजला असेल. आपणास राग येऊं देऊं नका; परंतु आजपर्यंत ख्रिस्ताचा संदेश ख्रिस्ती ह्मणविणाऱ्यांपैकीं कोणास केव्हांच नीटसा समजला नाहीं.

आतां या शेवटच्या पायरीपर्यंत पोहोंचण्यापूर्वीं तळापासून आरंभ करून क्रमाक्रमानें एक एक पायरी आक्रमिली पाहिजे, हें खरें. धर्मपुस्तकांनीं जे निरनिराळे अनेक मार्ग दाखविले आहेत त्या सर्वांचा आदिपाया हेंच तत्व आहे. निरनिराळ्या अधिकाराच्या मनुष्यांस निरनिराळे मार्ग सांगणें इष्ट आहे. इतकेंच नव्हे तर तें अत्यंत जरुरीचेंहि आहे. यामुळें पुष्कळ वेळां बाह्यतः वि-

रोधी अशीं वचनें एकाच ग्रंथांत आढळतात. 'स्वर्ग तुमच्या हृदयांतच आहे' असें ख्रिस्तानें एके ठिकाणीं सांगितलें आहे, तर दुसरे ठिकाणीं 'आपला पिता जो अकाशांत आहे,' असें तो ह्मणतो! हीं वचनें परस्पर अगदीं विरोधी दिसतात. यांची एकवाक्यता होणें शक्य आहे काय? हीं वाक्यें तो कोणत्या निरनिराळ्या प्रसंगीं बोलला याचा विचार केला पाहिजे. ज्यांना धर्मज्ञान मुळींच नाहीं, धर्मांचीं सामान्य मूलभूत तत्वें ज्यांच्या कधीं कानांवरूनहि गेलीं नाहींत, अशा मनुष्यांस 'परमेश्वर अंतराळांत आहे' असेंच सांगणें इष्ट आहे. आपणापुढें असलेल्या श्रोत्यांचा अधिकार बरोबर ओळखून त्यांस समजेल अशा भाषेनें उपदेश करणें हें सद्गुरूचें कामच आहे. सामान्य मनुष्याला प्रत्यक्ष पदार्थांच्या साहाय्यानेंच उपदेश केला पाहिजे. अतींद्रिय ज्ञान त्याच्या डोक्यांत शिरणेंच शक्य नाहीं. एखादा मनुष्य लौकिकदृष्टीनें मोठा पंडित असेल, पण त्याचें धर्मज्ञान पाहिलें तर एखाद्या लहान मुलास शोभण्यासारखें असण्याचा संभव आहे. इंद्रियजन्य सुखाचा अभिलाष सुटतां सुटतां जो मनुष्य इंद्रियांच्या पलीकडे पोहोंचला आहे, त्याला 'आकाशाचें राज्य स्वतःच्या अंतःकरणांतच आहे' ही गोष्ट बरोबर पटेल. स्वतःचें अत्यंत पवित्र अंतःकरण ह्मणजे 'आकाशाचें राज्य' ही गोष्ट तो अनुभवानें समजण्याच्या स्थितींत असतो. याकरितां एकाच धर्मपुस्तकांत परस्परविरोधि वचनें आढळलीं तर तीं निरनिराळ्या अधिकाराच्या व्यक्तीकरतां असतात, असें समजावें. तसेंच प्रत्येक मनुष्य आपापल्या धर्मांप्रमाणें वागतो ह्मणून त्यास दोष देणेंहि वाजवी नाहीं. अधिकारपरत्वें कित्येकांस मूर्ति अथवा दुसरीं कांहीं चिन्हें यांचा उपयोग करावा लागेल. मनुष्याच्या अंतरंगाशीं बोलण्याची ती एकप्रकारची भाषाच आहे.

आतां दुसरी एक गोष्ट विशेषेंकरून तुमच्या चित्तावर ठसली पाहिजे ती ही कीं, अमुक मतें आपण स्वीकारलीं किंवा एखाद्या धर्मपुस्तकांत सांगितलेल्या कवाइती आपण बरोबर केल्या तर तेवढ्यानेंच आपण धार्मिक झालों असें होत नाहीं. तुह्मीं कोणतीं धर्मपुस्तकें वाचितां अथवा कोणत्या मतांवर विश्वास ठेवतां ही बाब यत्किंचित्‌हि महत्वाची नसून तुह्मीं वाचतां त्यांतलें स्वतःच्या ठिकाणीं तुम्हीं काय अनुभविलें आहे, हें पाहणें महत्वाचें आहे. 'ज्यांचें अंतःकरण पवित्र आहे ते धन्य होत; कारण ते परमेश्वरास पाहतील.' असें जें बायबलांत ह्मटलें तें सर्वथैव खरें आहे. होय, याच जन्मांत त्यांस परमेश्वर खचित भेटेल. यालाच मुक्तस्थिति असें ह्मणतात. कांहीं विशिष्ट मंत्र ह्मटले अथवा

तोंडानें नुसती कांहीं विशेष प्रकारची बडबड केली ह्मणजे मुक्ति मिळेल असें कोणी ह्मणतात; परंतु नुसत्या बाह्य कृतीनें परमश्वेर मिळेल असें कोणत्याहि महात्म्यानें आजपर्यंत केव्हांहि सांगितलें नाहीं. मुक्ति मिळण्यासाठीं बाहेरून कोणतींहि साधनें आणावीं लागत नाहींत. तीं आपल्याच अंतरंगांत आपणास शोधिलीं पाहिजेत. अंतर्बाह्य परमेश्वरच भरून राहिला आहे, ही गोष्ट आपणास अनुभवानें पटावी लागते. बाह्य आचार अगदींच निरुपयोगी आहेत असें माझें ह्मणणें नाहीं; परंतु त्यांचा उपयोग केवळ आरंभीं असून पुढें लवकरच ते निरुपयोगी होतात. धर्म हे पुस्तकांमुळें अस्तित्वांत आलेले नसून धर्मानंतर पुस्तकें झालीं आहेत, हें आपण विसरतां कामा नये. कोणत्याहि पुस्तकानें परमेश्वरास उत्पन्न केलें नसून सर्व मोठे ग्रंथ परमेश्वराच्या प्रेरणेनें झाले आहेत. तसेंच आमच्या जीवात्म्याचें अस्तित्वहि पुस्तकांवर अवलंबून नाहीं, ही गोष्ट प्रत्येक मुमुक्षूनें नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे. जीवात्मा आणि परमात्मा यांचें ऐक्य स्वतः अनुभविणें हें सर्व धर्मांचें ध्येय आहे. हाच विश्वधर्म होय. कल्पना आणि मार्ग निरनिराळे झाले तरी शेवटीं त्या सर्वांची भेट होण्याचें ठिकाण एकच आहे. सर्व धर्मांचा एकच पाया कोणता ह्मणून कोणीं विचारिलें तर 'परमेश्वराशीं ऐक्य' या शब्दांनीं त्या प्रश्नाचें मी उत्तर देईन. एखाद्या वर्तुळाच्या परिघापासून मध्यबिंदूपर्यंत काढिलेल्या रेषा जशा मध्यबिंदूंत एकत्र व एकजीव होतात तसेंच सर्व धर्मांनीं सांगितलेले निरनिराळे मार्ग परमेश्वरस्वरूपांत एकत्र व एकरूप होतात. इंद्रियांनीं अनुभवास येणाऱ्या व खऱ्या दृष्टीनें केवळ छायेसारख्या असणाऱ्या या जगापलीकडे असलेल्या परमात्म्याचा अनुभव आला ह्मणजे आपण कोणत्या उपायांनीं हें साध्य केलें हा प्रश्न महत्वाचा नाहीं. तुम्हीं कोणतींहि विशिष्ट मतें मान्य करा अथवा करूं नका; एखाद्या पुस्तकानें आंखून दिलेल्या मर्यादेंत राहा, अथवा राहूं नका; एखाद्या विशिष्टपंथाचे ह्मणवा अथवा ह्मणवूं नका, परंतु कोणत्याहि मार्गानें परमेश्वराचें अस्तित्व स्वतःच्या ठिकाणीं तुह्मी अनुभविलें ह्मणजे तुमचें काम झालें. एखादा मनुष्य, जगांत अस्तित्वांत असणाऱ्या सर्व धर्मांवर मी विश्वास ठेवितों असें ह्मणेल, जगांतील सर्व धर्मग्रंथ त्यास मुखोद्गत असतील, जगांतील सर्व तीर्थांत त्यानें स्नान केलें असेल, आणि इतकें करून परमेश्वराबद्दल अगदीं पुसट कल्पनाहि त्यास न होणें संभवनीय आहे. तसेंच साऱ्या जन्मांत एखादें देऊळ नजरेनेंहि न पाहतां किंवा धर्मपुस्तकांत सांगितलेला एखादाहि विधि न करतां परमेश्वराचा अंतरंगांत अनुभव होणें

छाती पिटण्यांत कांहीं फायदा नाहीं. मुकाट्यानें एक काडी ओढली म्हणजे अंधार कोठें शोधूनहि सांपडत नाहीं. आपल्या चैतन्यास चालन द्या, अंतःकरण पवित्र करा म्हणजे पाप कोठेंच नव्हतें असें तुम्ही म्हणूं लागाल. पापी, पापी, म्हणून कंठशोष न करतां आपण ज्या मूळस्वरूपाचे आहों त्या स्वरूपाचें चिंतन करा.

* * * * * * * *

[व्याख्यान संपल्यानंतर पुढील प्रश्नोत्तरें झालीं.]

एक श्रोताः—स्वामी, नरकयातनांचें वर्णन करून मनुष्याच्या चित्तांत भय उत्पन्न झाल्याशिवाय तो सन्मार्गवर्ति राहणार नाहीं. उपदेशकाचा आपल्या श्रोत्यांवर दाब राहिला पाहिजे.

स्वामीः—अशा रीतीनें खोटी भीति दाखवून धर्मप्रेम उत्पन्न करण्यापेक्षां परमेश्वरस्वरूपाची ओळख श्रोत्यास करून देणें अधिक चांगलें. कारण, केवळ भीतीमुळें जो मनुष्य सदाचरणी बनलेला असतो तो केवळ ढोंगी असतो. भीतीचें कारण संपल्याबरोबर तो अधिक उच्छृंखल होण्याचा संभव असतो.

श्रोताः—'आकाशाचें राज्य या लोकीं नाहीं' असें भगवान् ख्रिस्त ह्मणाला त्याचा अर्थ काय ?

स्वामीः—स्वर्गाचें राज्य आपल्याच अंतरंगांत आहे असें भगवानानें सांगितलें. या पृथ्वीवर आपणांस स्वर्गांतले भोग प्राप्त होतील अशी यहुदी लोकांची कल्पना होती ती खोटी असें भगवानानें सुचविलें आहे.

श्रोताः—उत्क्रांतीनें आपण चतुष्पादांचे मनुष्यप्राणी झालों असें ह्मणतात. आपला या मतावर विश्वास आहे काय ?

स्वामीः—उत्क्रांतीनें चतुष्पादांतून मनुष्यस्थितीपर्यंत येतां येईल, असें माझें मत आहे.

श्रोताः—ज्याला स्वतःचे पूर्वजन्म समजतात असा कोणी सत्पुरुष आपण पाहिला आहे काय ?

स्वामीः—होय. इतक्या प्रतीची इच्छाशक्तीची वाढ झालेले लोक माझ्यां अवलोकनांत आले आहेत.

श्रोताः—क्रुसावर खिळून यहुद्यांनीं ख्रिस्ताचा जीव घेतला, यावर आपला विश्वास आहे काय ?

स्वामी:—भगवान् येशुख्रिस्त परमेश्वराचा प्रत्यक्ष अवतारच होता. त्यास मारणें शक्य नव्हतें. आपण ख्रिस्ताला क्रुसावर खिळून मारलें असा यहुदी-लोकांस दृष्टिभ्रम झाला.

श्रोता:—असे दोन तीन येशुख्रिस्त प्रभूनें निर्माण करून दाखविले असते तर तो मोठाच चमत्कार झाला असता. नाहीं ?

स्वामी:—सत्याच्या मार्गांत चमत्कार मोठाच अडथळा आणितात. भगवान् बुद्धाला त्याच्या शिष्यांनीं एकदां एक मनुष्य चमत्कार करतो ह्मणून सांगितलें. शिष्य ह्मणाले, 'लोट्याला हात लावल्याशिवाय अमक्या मनुष्यानें तो बराच उंच उचलिला.' त्यावर भगवानांनीं सांगितलें कीं चमत्कारांच्या मागें न लागतां सत्यशोधनाच्या मागें लागा. आपली बुद्धि तीव्र करून तिच्या प्रकाशानें चालण्याची संवय करा. चमत्कारांच्या मागें गेल्यास केव्हां खड्ड्यांत पडाल याचा भरंवसा नाहीं.

श्रोता:—येशुख्रिस्तानें पर्वतावर आपल्या शिष्यांस उपदेश केला यावर आपला विश्वास आहे काय ?

स्वामी:—होय. पुस्तकांत असें लिहिलें आहे त्या अर्थीं इतरांप्रमाणेंच मलाहि त्यावर विश्वास ठेवणें भाग आहे. परंतु खऱ्याखोट्याचा हा प्रश्न बाजूस ठेविला तरी त्यांतील विचार आपणा सर्वांस सारखेच ग्राह्य होण्याजोगे आहेत. भगवान् बुद्धानें ख्रिस्तापूर्वीं पांचशें वर्षें धर्मज्ञान सांगितलें. त्यांतील सारांश आपण पाहावा. खऱ्याखोट्याचा निवाडा करण्यांत फायदा नाहीं. ख्रिस्त काय, जरदुष्ट्र काय अथवा कन्फ्यूशस काय ? या सर्वांचीं वचनें नेहमीं कल्याणप्रदच असतात.

हिंदु धर्म.

[ब्रुक्लिन स्टँडर्ड पत्रावरून.]

ता. ३० डिसेंबर १८९४ रोजीं परमहंस स्वामी विवेकानंद यांनीं ब्रुक्लिन एथिकल सोसायटीच्या विनंतीस मान देऊन वरील विषयावर एक व्याख्यान दिलें. व्याख्यानास हजारों स्त्रीपुरुषांची गर्दी झाली होती. स्वामीजींचें व्याख्यान चालू असतां सर्व श्रोतृगण चित्राप्रमाणें तटस्थ झाला होता. हिंदुस्थानांतील पुरातन ऋषिमंडळ जणूं काय स्वामीजींच्या मुखानें बोलत होतें असें वाटलें.

अत्यंत पुरातन धर्मतत्वांचे प्रतिनिधि या नात्यानें स्वामींची कीर्ति अगोदरच सर्वतोमुखीं झाली असल्यामुळें व्याख्यानश्रवणास सर्व प्रकारच्या धंद्यांच्या

हजारों स्त्रीपुरुषांची गर्दी उडून राहिली होती. हिंदुस्थानांतील कृष्ण व बुद्ध यांची पूजा करणाऱ्या स्वामींचें शिकागो येथें भरलेल्या सर्व–धर्मांच्या परिषदेंत वेदांतावर व्याख्यान झालें होतें व त्यावेळीं एकंदर व्याख्यानांमध्यें यांचें व्याख्यान सर्वांस फार आवडलें होतें. केवळ धर्मासाठीं यांनीं आपल्या सर्व उच्चतम आशा बाजूस ठेविल्या आणि कित्येक वर्षें निरलसपणें त्यांनीं पुरातन तत्वज्ञानाचा अभ्यास केला. पाश्चात्य शास्त्रांचाहि त्यांनीं चांगला अभ्यास केला आहे. पाश्चात्य शास्त्रें आणि जुनीं वेदांततत्वें यांचें अपूर्वसंमेलन त्यांच्या ठिकाणीं झालें आहे. त्यांची संस्कृति, विद्वत्ता, वक्तृत्व, शुद्धाचरण आणि पावित्र्य यांची कीर्ति अगोदरच पसरली असल्यामुळें आपणास आज कांहीं तरी अलभ्य लाभ होणार आहे असें वाटून सर्व श्रोते भाषणश्रवणासाठीं अगदीं उत्कंठित होऊन राहिले होते. त्यांची उत्कंठा विफल झाली नाहीं.

स्वामींची कीर्ति आपण ऐकिली ती प्रत्यक्षापुढें कांहींच नाहीं असेंच सर्वांचें मत झालें. काषायवस्त्र परिधान केलेले हे स्वामी श्रोत्यांपुढें उभे राहिले तेव्हां त्यांच्या अंतर्गत तत्वविचारांचें अपूर्व तेज त्यांच्या मुखमंडळावर झळकत होतें. प्रेम, सहानुभूति आणि सहिष्णुता हीं मूर्तिमंत त्यांच्या मुखावर व्यक्त होत होतीं. इंग्रजी भाषेवरील त्यांचें प्रभुत्वहि वाखाणण्यासारखें आहे. बुद्धाचें तत्वज्ञान आणि ख्रिस्ताचीं नीतितत्वें यांचा अपूर्व संयोग ज्यांत झाला आहे असा नवा धर्म शिकविण्याकरितां स्वामी महाराज येथें आले आहेत. हिमालयांतील साधु कसे असतात याची कल्पना स्वामींच्या दर्शनानें आम्हांस झाली.

स्वामींच्या व्याख्यानासंबंधीं कोणीं कांहीं ह्मटलें तरी एकंदरीनें त्यांचें व्याख्यान अत्यंत चित्ताकर्षक होतें यांत तिलमात्र संशय नाहीं. डाक्टर लुई जेम्स यांनीं स्वामींची श्रोत्यांस ओळख करून दिल्यानंतर स्वामी श्रोत्यांचे मनःपूर्वक आभार मानून ह्मणाले :—

"जगांत उपलब्ध असलेल्या सर्व धर्मांचा अभ्यास करणें हाच माझा धर्म होय. ख्रिस्ती धर्मपुस्तकांचा मीं चांगला अभ्यास केला तेव्हां मला माझ्या मातृधर्माचें चांगलें ज्ञान झालें. मला जीं कांहीं तत्वें पूर्वीं गूढ वाटत होतीं त्यांची नीट संगति लागली. सत्य हें सर्वत्र एकच आहे. ज्याप्रमाणें एखादा सहा बोटांचा मनुष्य हा सामान्य मानवी देहाचा नमुना नसून त्यास सृष्टिबाह्य असें आपण ह्मणतों तशीच धर्माचीहि गोष्ट आहे. कोणताहि एक धर्म खरा ह्मटला कीं, बाकीचे सर्व खरे असलेच पाहिजेत. जगांतील सर्वच धर्म खरे असल्यामुळें

माझा धर्म अमुक आणि तुमचा धर्म अमुक असा भेद करणेंहि योग्य नाहीं. हिंदुधर्मावर जितका माझा तितकाच तुमचाहि हक्क आहे. हिंदुस्थानच्या वस्तींत वीस लक्ष ख्रिस्ती, सहा कोटी मुसलमान आणि बाकी सर्व हिंदु आहेत.

हिंदूंचा धर्म वेदप्रणित आहे. जगांतील सर्व धर्मांचें सार, आमच्या मतांप्रमाणें वेदांतर्गत आहे. तथापि सर्व सत्य केवळ वेदांतच आहे असें आमचें ह्मणणें नाहीं. 'आत्मा अमर आहे' असें वेदांनीं आह्मांस सांगितलें आहे. कोणत्याही कालीं आणि कोणत्याही स्थलीं मनुष्यमात्राची सर्व खटपट कोठें तरी स्थिर जागा शोधण्यासाठींच चाललेली असते. केव्हांहि नष्ट न होणारी अशी सुखभूमि सांपडावी हाच त्याच्या धडपडीचा हेतु असतो. एकंदर सृष्टीचें अवलोकन केलें तर दृश्य सृष्टींत अशी जागा सांपडेल असा भरंवसा आपणांस वाटत नाहीं. प्रत्येक क्षणीं बदलत असणाऱ्या या दृश्य जगांत स्थिर जागा सांपडणार कशी ?

परंतु यावरून अशी जागा कोठेंच नाहीं असें कोणी ह्मणेल तर तो मात्र त्याचा भ्रम आहे. अशा भ्रमाचें पर्यवसान नेहमीं चार्वाकवादांत होतें. '**भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः**' असें ह्मणून '**ऋणं कृत्वा घृतं पिबेत्**' असा चार्वाकानें आपल्या अनुयायांस उपदेश केला आहे. त्याच्या मताप्रमाणें आत्मा, धर्म, मन इत्यादिकांचें अस्तित्व वंध्यापुत्राच्या कथेसारखें आहे. पंचज्ञानेंद्रियांनीं आत्मा वस्तुतः बद्ध नाहीं असें वेदांताचें मत आहे. या इंद्रियांच्या द्वारें वर्तमान अथवा चालू कालाचें ज्ञान होतें, ही गोष्ट आपल्या नित्य अनुभवाची आहे. तसेंच त्यांच्या द्वारें भूत व भविष्यकालाचें ज्ञान होत नाहीं, ही गोष्टहि अनुभवसिद्ध आहे. कालाच्या एकतानतेंत हा भेद वास्तविक नसून तो केवळ इंद्रियजन्य आहे. जर भूत, वर्तमान आणि भविष्य हे काल वास्तविक अलग असते—यांतील भेद खरा असता—आणि भूतकालाचें ज्ञान वर्तमानांत आणण्याचें कोणतेंच साधन उपलब्ध नसतें तर आपणास वर्तमानाचें ज्ञानहि झालें नसतें. यावरून या त्रिकालास जोडणारें इंद्रियातीत असें कांहीं तरी स्वतंत्र साधन असलें पाहिजे, हें उघड होतें.

परंतु स्वतंत्र साधन ह्मणजे काय याचा विचार येथें करणें अवश्य आहे. आपलें शरीर पाहिलें तर भोंवतालच्या परिस्थितीची गुलामगिरी त्यानें पूर्णपणें पत्करलेली दिसते. मन स्वतंत्र ह्मणावें तर तें विचारांचें बांधलेलें आणि विचारांची उत्पत्ति बाह्यसृष्टीवर अवलंबून असणार ! तेव्हां असें स्वतंत्र साधन

शरीर आणि मन यांहूनहि निराळें असलें पाहिजे असें उघड दिसतें. तें साधन आत्मा हें होय. स्वातंत्र्य आणि अत्यंत पारतंत्र्य यांच्या मिश्रणानें हें जग बनलें असून अत्यंत स्वतंत्र, पूर्ण आणि पवित्र असा परमात्मा सर्व विश्वाच्या द्वारें व्यक्त झाला आहे असें वेदांनीं सांगितलें आहे. त्याला मृत्यु नाहीं, कारण मृत्यु ह्मणजे नष्ट होणें नसून एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जाणें होय. तो अत्यंत पूर्ण असल्यामुळें स्वतंत्र आहे. अपूर्णता असणें ही एक विशिष्ट परिस्थिति आहे; आणि आत्मा परिस्थितीनें मर्यादित नसतो. हाच पूर्ण आणि स्वतंत्र परमात्मा थेट ईश्वरापासून तों अगदीं हलक्या भिकाऱ्यापर्यंत सर्वांत एकसारखाच आहे. यांत जो फरक दिसतो त्याचें कारण तो परमात्मा व्यक्त होण्याच्या साधनांत असणारा फरक हें होय.

परंतु आत्म्यानें शरीर कां धारण करावें, असा प्रश्न निघतो. त्याचें कारण असें, कीं माझें मुख पाहावयास जसा मी आरसा घेतों, तद्वत् स्वतःचें प्रतिबिंब परमात्म्यास शरीरधारी जीवात्म्यांत दिसतें. जीवात्मा हा परमात्म्याचें प्रतिबिंब आहे आणि केव्हांना केव्हां तरी जीवात्मा आपल्या मूळच्या स्वरूपास प्राप्त होईलच होईल. मी एखाद्या अंधाऱ्या जागेंत जाऊन कितीहि कोरडी ओरडाओरड केली तरी प्रकाशाची प्राप्ति मला होणार नाहीं. त्यासाठीं एक काडी पेटविली कीं अंधार आपोआप नाहींसा होतो. तसेंच 'मी पापी, मी पापी' ह्मणून आपण कितीहि रडलों तरी त्याचा उपयोग काय? त्यामुळें आपण आपल्या अपूर्णस्थितींतून निघून पूर्णत्वास जाऊं असा यत्किंचितहि संभव नाहीं. याकरितां आपलें मूळस्वरूप काय हें ओळखून त्याचें तेज फांकेल असा यत्न करा असें वेद अनादिकालापासून सांगत आहेत. आतां यापुढें 'मी पापी' अशी प्रार्थना करण्यास मुलांस शिकवूं नका. धर्म ही कांहीं तरी मूर्खपणाची कवाईत नाहीं. परमेश्वरप्राप्तीचा तो निश्चित मार्ग आहे, ही गोष्ट त्यांच्या मनावर ठसवा. एखादें दुःख प्राप्त झालें ह्मणजे 'अरे परमेश्वरा' ह्मणणें, हा धर्म नव्हे. आपलें संपूर्ण तेज फांकेल अशा रीतीनें प्रत्येक कार्यांत आपली वर्तणूक ठेवणें, हा धर्म आहे.

प्रत्येक मनुष्याचा वर्तमान आणि भविष्य आयुःक्रम पूर्वक्रियेवर अवलंबून असून चालू जीवित हें पूर्वक्रियेचें फळ आहे; याबद्दल सर्व धर्मांचें एकमत आहे. एक मूल चांगल्या आईबापांच्या पोटीं जन्मास येऊन चांगलें शिक्षण मिळवितें आणि श्रीमान् होतें. दुसरें मूल भिकाऱ्याच्या पोटीं येऊन जन्मभर भिकारी राहतें. न्यायी परमेश्वरावर या विसदृशतेचें खापर फोडणें अनुचित

आहे. तर मग हे भेद आले कोठून ? तसेंच सध्याचा माझा जन्म पहिलाच आहे, असें मानिलें तर माझें मूळचें स्वातंत्र्य नष्ट होऊन मी परिस्थितीनें बांधला जातों; असें कां व्हावें ? माझें स्वातंत्र्य कां हरण झालें ? जर माझ्या चालू आयुःक्रमांत पूर्वक्रियेचे अनुभव उपयोगीं पडत नाहींत असें मानिलें तर सर्व आयुष्य मला लोकांच्या तोंडाकडे पाहून कंठावें लागेल याची वाट काय ? पूर्वानुभवशून्य असा मी स्वतंत्रपणें कांहीं करूं शकेन असा संभव तरी आहे काय ? आणि मला स्वतःच्या स्वतंत्र क्रियेनें वागतां आलें नाहीं तर मी अत्यंत परतंत्र असा प्राणी झालों नाहीं काय ? या सर्व प्रश्नांचें उत्तर वेद असें देतात, "तूं पूर्वकर्मानुरूप चालू कालांत जन्मास आला आहेस. पूर्वकर्मानुभवाचा फायदा घेऊन युक्त कर्मे करून दुःखमुक्त होण्याची तुला पूर्ण मुभा आहे." हीच आमची पुनर्जन्ममीमांसा आहे. प्रत्येक जन्मीं सत्कर्मानुरत राहून अधिक चांगलें होत होत आपणास शेवटीं मुक्त होतां येतें.

परमात्मा विश्वव्यापी, अमर्याद, आणि सर्वशक्तिमान् असून जीवात्माहि शेवटीं त्याच पदास पोहोंचतो असें आमचें हिंदुमत आहे. परमेश्वर हा विश्वबाह्य आणि आह्मी त्याच्या कृपेंत राहणारे जीव अशी कल्पना उत्पन्न होणें, ही प्रथम पायरी; नंतर आमच्या अंतर्यामीं त्याचा वास आहे असा अनुभव येणें, ही दुसरी, आणि आह्मी आणि तो एकच हीं तिसरी व शेवटची पायरी आहे. सर्व धर्म ईश्वरस्वरूपाकडेच जाण्याचे निरनिराळे मार्ग असल्यामुळें खरे आहेत. या करितां क्रुसापुढें गुडघे टेंकणारा ख्रिस्ती, मशिदींत प्रार्थना करणारा मुसलमान आणि अग्निपूजक पारशी हे सर्व सारखेच धार्मिक आहेत असें आह्मां हिंदूंस वाटतें. हे सर्व प्रयत्न एकाच्याच प्राप्तीकरितां असून निरनिराळ्या परिस्थित्यनुरूप एकाच धर्माचीं अनेक रूपें आहेत. ही कल्पना पूर्णपणे पटली ह्मणजे धर्मद्वेषास जागाच उरत नाहीं. तरी सर्व धर्मांनीं दिलेल्या या सुंदर फुलांस एकत्र करून प्रेमसूत्रानें बांधून तो झेला आपण परमेश्वरास अर्पण करूं या.

जर मी खरोखर परमेश्वरस्वरूप आहें तर माझा जीवात्मा हा परमात्म्याचें देऊळ आहे हें मी निरंतर लक्ष्यांत ठेवून परमात्म्याच्या ठिकाणीं निर्व्याज प्रेम करणें—कर्तव्यदृष्टीनें सर्व कर्मे करणें—हें माझें कर्तव्य आहे. यांत बक्षिसाची आशा अथवा शिक्षेची भीति बाळगून वागणें हें अयुक्त आहे. धर्म ह्मणजे केवळ निरर्थक बडबड आणि कवाईत नसून स्वतः परमात्मरूप होण्याचा तो मार्ग आहे असें माझा धर्म मला सांगतो."

भाषण सुरू असतां टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटानें श्रोतृगण आपली पसंती मधून मधून व्यक्त करित होता. भाषणसमाप्तीनंतर सुमारें पंधरा मिनिटें कांहीं प्रश्नोत्तरें होऊन सभेचें काम संपलें.

कर्मयोग.

कर्मयोग.

प्रकरण १ लें.

कर्माचा दानतीवर परिणाम.

कर्म हा शब्द मूळ संस्कृत धातु कृ ह्मणजे करणें यापासून उत्पन्न झाला आहे. आपण जें जें कांहीं करतों तें सर्व कर्म होय. आपल्या हातून घडणाऱ्या कृतीचा परिपाक, असाहि कर्म या शब्दाचा दुसरा अर्थ आहे. पूर्वजन्मार्जित क्रियांचें वर्तमान फल अशा अर्थानेंहि कर्म या शब्दाचा उपयोग करितात; परंतु पुढील विवेचनांत कर्म हा शब्द चालू क्रिया या अर्थाचाच दर्शक आहे असें समजावें. पूर्णज्ञानी होणें हा मानवी संस्कृतीचा अंतिम हेतु आहे. यावांचून दुसरें साध्य कांहीं नाहीं असें प्राचीन पौर्वात्य तत्ववेत्त्यांचें मत आहे. इंद्रियजन्य सुखासाठीं अनेक साधनें निर्माण करणें हें मनुष्याचें साध्य नसून, पूर्णज्ञानी होऊन स्वतः सुखरूप होणें हें साध्य आहे. जगांत दुःख आढळून येतें त्याचें कारण, मनुष्य भ्रमानें सुखसाधनें मिळविण्याच्या मागें लागतो हें होय. सुख हें साधनांतर्गत आहे असें वाटणें हा भ्रम होय. सुखाचीं साधनें हस्तगत करण्याचा उद्योग करित असतां मनुष्य सुख आणि दुःख यांच्या द्वंद्वांत सांपडतो व केव्हां सुखांतून दुःखांत तर केव्हां दुःखांतून सुखांत हेलकावे खात असतांच त्याची चूक त्याच्या लक्ष्यांत येते. साधनांतर्गत सुखदुःखांचा आस्वाद घेतल्यानंतर सुख हें वस्तुतः साधनांत नाहीं हें त्याच्या लक्ष्यांत येऊं लागतें. हें ज्ञान होण्याकरितां सुख आणि दुःख या दोहींचीहि सारखीच अपेक्षा आहे. सुख आणि दुःख हीं दोन्ही साधनांतर्गत असल्यामुळें चिरस्थायी नसून कांहीं कालानें तीं नष्ट होतात असा त्यास अनुभव येतो. तथापि सुख अथवा दुःख नष्ट झालें तरी त्यांचा कांहीं परिणाम जीवात्म्यावर कायमचा राहतो. सुख अथवा दुःख आलें कसें आणि नष्ट झालें कसें याचें ज्ञान कायम स्वरूपाचें असून तें ज्ञानरूपानें जीवात्म्याच्या ठिकाणीं कायम राहून त्याच्या वागणुकींत दिसूं लागतें. मनुष्याच्या सामान्य व्यवहारांत प्रतिबिंबित झालेल्या या ज्ञानास दानत असें ह्मणतात. सुखदुःखांचा अनुभव घेत असतां मनुष्याच्या मनोवृत्ती निरनिराळें वळण घेत असतात व या निरनिराळ्या मनोवृत्ती एकत्र मिळून त्यांची दानत बनत असते. ही दानत बनविण्यांत सुखाचा व दुःखाचा सारखाच उपयोग आहे; किंबहुना कित्येक वेळां तर सुखापेक्षां दुःखामुळें होणारी ज्ञानप्राप्तीच अधिक दर्जाची असते. जगांत विशिष्ट

दानतीमुळें प्रसिद्धीस आलेल्या अशा व्यक्तींचा इतिहास पाहिला तर त्यांत सुखापेक्षां दुःखप्रसंगच त्यांस अधिक भोगावे लागल्याचें दिसून येतें. लक्ष्मी-पेक्षां तिच्या वडील बहिणीच्या राज्यांत ज्ञानी लोक अधिक आढळतात. स्तुती-पेक्षां निंदेच्या तडाक्यानेंच लोक अधिक ज्ञानी निर्माण झाल्याचा दाखला आहे. याचसाठीं ' **निंदकाचें घर असावें शेजारीं** ' अशी मागणी सत्पुरुष परमेश्वरा-जवळ मागतात.

ज्ञान प्रत्येक मनुष्यांत जन्मतःच वास करित असतें. ज्ञान ही कोठून बाहेरून येणारी चीज नव्हे. तिचा वास प्रत्येकाच्या अंतर्यामीं सदोदित असतो. ' अमुक मनुष्यानें अमुक जाणलें ' असें आपण सामान्य भाषेंत ह्मणतों. हेंच वाक्य तात्विक भाषेंत बोलावयाचें झालें तर ' अमुक मनुष्यानें अमुक व्यक्त केलें, गूढांतून निदर्शनास आणिलें, ' असें ह्मणावयास पाहिजे. जीवात्मा हा स्वभावतः ज्ञानपूर्ण व अज्ञानानें केवळ आच्छादिलेला असा आहे. हा अज्ञानाचा पडदा ज्या मानानें दूर होतो, त्या मानानें ज्ञान दृग्गोचर होऊं लागतें. ' **अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः** ' ज्ञान हें अज्ञानानें आवृत्त झाल्यामुळें मनुष्यप्राणी मूर्ख असल्यासारिखा दिसतो. हा सिद्धांत नित्य लक्ष्यांत बाळगिला पाहिजे. न्यूटननें गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढिला असें आपण ह्मणतों. हा नियम जगाच्या कोणत्या तरी कोपऱ्यांत लपून बसला होता काय ? तो न्यूटनच्या अंतर्गत ज्ञानभांडारांतच होता. त्याची बाहेर येण्याची वेळ झाल्या-बरोबर एका क्षुल्लक कारणानें त्या भांडाराचें दार उघडून तो नियम बाहेर पडला. जगांत आज दृश्यमान होणारें सर्व ज्ञान मानवी हृदयांतच एके काळीं वास करित होतें व आतां तें व्यक्त झालें आहे. या सर्व विश्वांत मावणार नाहीं एवढा मोठा ग्रंथसंग्रह तुमच्या एवढ्याशा हृदयांत सांठविलेला आहे. दृश्य जग हें केवळ मनुष्याच्या अंतरंगाला जागृत करण्याचें एक साधन मात्र आहे. त्यांतून ज्ञानाची निष्पत्ति होत नसून त्यामुळें चैतन्य जागृत होऊन अज्ञानाचा पडदा फाटण्यास सुरवात होते व ज्ञान अव्यक्तांतून व्यक्तांत येतें. ह्मणून ज्ञानार्जनासाठीं जगाचा अभ्यास करावयाचा नसून जगरूप साधनानें मनाचा अभ्यास करणें हा ज्ञाना-र्जनाचा मार्ग आहे. झाडावरून एक फळ पडलेलें न्यूटननें पाहिलें आणि डोळे मिटून विचार करतां करतां अनेक विचारपरंपरा त्याच्या चित्तांत त्याला दिसून आल्या. या विचारपरंपरेच्या सांखळींतील एका दुव्यास आपण गुरुत्वा-कर्षणाचा नियम या नांवानें सांप्रत ओळखितों. या नियमाचें ज्ञान त्या फळांत

नव्हतें आणि पृथ्वीच्या पोटांतील मध्यबिंदूंतहि नव्हतें. सर्व ज्ञानाचें भांडार मनुष्याचें मन हेंच आहे; मग तें अध्यात्मज्ञान असो अथवा लौकिकज्ञान असो. आपणांत हें ज्ञान गुप्त असतें व त्यावरील पडदा हळूहळू दूर करण्याच्या उद्योगास लागलों ह्मणजे आपण शिकूं लागलों असें ह्मणतों; आणि जसजसा हा पडदा अधिक दूर होऊं लागतो तसतसे आपण अधिक ज्ञानी होऊं लागतों. ज्या मनुष्याच्या ज्ञानावरील हा पडदा अधिक दूर झाला आहे तो अधिक ज्ञानी ह्मणवितो; ज्यावर तो पडदा अगदीं घट्ट बसला आहे तो मनुष्य अज्ञानी आणि ज्याच्या हृदयावरील हा पडदा निखालस गळून पडला तो परमज्ञानी ह्मणजे सर्वज्ञ ह्मणवितो. आजपर्यंत असे सर्वज्ञ अनेक वेळां येऊन गेले आहेत आणि पुढेंहि येतील. पुढेंहि युगानुयुगीं त्यांचे अवतार होणार आहेत. गारगोटीच्या पोटीं अग्नि जसा गुप्तरूपानें राहत असतो तसेंच सर्व ज्ञान मानवी हृदयांत वसत असतें. घर्षणानें गारेंतून जशी ठिणगी व्यक्त होते तसेंच साधनांच्या घर्षणानें ज्ञान दृश्यस्वरूपास येतें. हें दृश्य स्वरूप अनेकप्रकारच्या रूपांनीं व्यक्त होतें. आपल्या चित्तांत उद्भूत होणाऱ्या सर्व भावना, आपलीं सर्व कर्में–रडणें, हंसणें इत्यादि क्रिया, आनंददुःखादि मनोव्यापार, आपला क्रोध, आपलें प्रेम, स्तुति आणि निंदा इत्यादि प्रत्यहीं घडणाऱ्या गोष्टींचें सूक्ष्म अवलोकन केलें तर कोणत्याना कोणत्या तरी साधनाच्या घर्षणानें हे नानारूप स्फुलिंग आपल्याच चित्तांत जन्म पावल्याचें आपणास आढळून येईल. या सर्वांचा समवायी परिणाम ह्मणजे आमची दानत. या सर्वप्रकारच्या घर्षणास कर्म अथवा क्रिया असें नांव आहे. ज्या क्रियासाधनानें जीवात्म्यास घर्षण मिळून त्याचें सामर्थ्य आणि ज्ञान दृक्प्रत्ययास येतें तें सर्व क्रियासाधन कर्म या एका शब्दानें ओळखिलें जातें. या दृष्टीनें विचार केला, ह्मणजे कर्म केल्यावांचून आपल्या आयुष्यांतील एक क्षणहि जात नाहीं असें दिसून येईल. ' **नहि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्। कार्यतेह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥**' असा सिद्धांत भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत सांगितला आहे. मी बोलतों तें कर्म, आपण ऐकतां तें कर्म, आपण श्वासोच्छ्वास करितों तें कर्म; सारांश आपण मनानें अथवा शरीरानें ज्या ज्या क्रिया करितों तें सर्व कर्म असून त्यांतील प्रत्येक क्रियेचा परिणाम–संस्कार–जीवात्म्यावर घडल्यावांचून रहात नाहीं.

अत्यंत सूक्ष्म अशा अनेक कर्मपरंपरा एकजीव होऊन एका मोठया रूपानें ज्यांत दृश्यमान होतात अशा प्रकारचीं कांहीं कर्में असतात. आपण समुद्र-

कांठीं एखाद्या धक्क्या जवळ उभे असतां एखादी मोठी लाट येऊन त्या धक्क्यावर आदळते. त्या वेळीं त्या लाटेनें केवढा मोठा आवाज उत्पन्न केलासें आपणास वाटतें. परंतु कोट्यवधि सूक्ष्म तरंगांच्या एकीकरणानें ती लाट उत्पन्न झालेली असते; आणि आपण जो मोठा आवाज ऐकला तो त्या सूक्ष्म तरंगांच्या लहान लहान आवाजांच्या एकीकरणाचेंच फल असतो. ते सूक्ष्म आवाज स्वतंत्रपणें आपल्या प्रत्ययास येत नाहींत. अशाच रीतीनें आपलें हृदय उडणें वगैरे सर्व क्रिया कर्मेंच होत. कित्येक कर्में स्वतंत्रपणें आपल्या प्रत्ययास येतात; परंतु तीं सर्व सूक्ष्म कर्मांच्यां समुच्चयाचा परिणाम असतात. कोणत्याहि मनुष्याची खरी दानत तुह्मांस समजून घ्यावयाची असली तर त्यानें केलेल्या एखाद्या मोठ्या कृत्यावरून तिची बरोबर पारख होणार नाहीं. प्रसंगीं एखादा अत्यंत कृपण मनुष्य कर्णालाहि लाजवील. परंतु अशा एखाद्या प्रसंगावरून आपण कोणाच्या दानतीचें अनुमान केलें तर तें पुष्कळ वेळां चुकीचें ठरण्याचा संभव आहे. मनुष्य रोजच्या व्यवहारांत कसा वागतो, आणि बारीकसारीक गोष्टी कशा करतो याचें सूक्ष्म अवलोकन करूनच त्याच्या दानतीचें यथार्थ ज्ञान होईल. प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत कांहीं प्रसंग असे येतात कीं त्या वेळीं आपलें लघुत्व विसरून तो कांहीं महत्कार्य करून जातो. परंतु सर्वदा आणि सर्वकालीं ज्याची वागणूक एकसारखीच मोठी असते तोच खरा मोठा मनुष्य होय.

कर्मांचा मनुष्याच्या दानतीवर होणारा परिणाम पाहिला ह्मणजे कर्म ही एक अचाट शक्तीच आहे असें वाटतें. प्रत्येक मानवी प्राणी हा ईश्वरांश असल्यामुळें जगांतील सर्व शक्ती जणूं काय त्याच्या ठिकाणीं एकवटलेल्या असतात. व तो या शक्तींस कर्मांच्या रूपानें पुन्हां जगांत फिरावयास लावतो. जेथें या सर्व शक्ती एकवटतात आणि जेथून पुन्हां कर्मरूपानें बाहेर पडून जगभर वावरतात तीच मनुष्यांतील जीवनकला होय. या चालककलेंत सर्व सामर्थ्य एकवटलेलें आहे. ही कला सर्वशक्तिमति अशा स्वरूपाची असल्यामुळें गुरुत्वाकर्षणाच्या नियमानें विश्वांतील अनेक शक्ती तिच्याकडे ओढल्या जातात, आणि तिच्याभोंवतीं फिरत राहतात. त्यांचा उपयोग करून आपल्या दानतीच्या द्वारें मनुष्य या शक्तींस बरें अथवा वाईट रूप देऊन त्यांस जगांत परत पाठवीत असतो. इतर शक्तींस आकर्षण करण्याचें जसें त्यास सामर्थ्य आहे तसेंच त्यांचें रूपांतर करून त्यांस जगभर फिरावयास पाठविण्याचेंहि त्यास सामर्थ्य आहे.

जगांत जें जें कार्य आपण पाहतों तें तें सर्व मानवी विचारांचें दृश्यरूप आहे. मनुष्याची इच्छाशक्ति चित्तांत गुप्तरूपानें असते व तीच कार्यरूपानें दृश्य होते.

कार्य हें अव्यक्त इच्छाशक्तीचें व्यक्त रूप होय. या रीतीनें आपणांस दिसणारीं सर्व यंत्रें, कारखाने, शहरें, आगबोटी वगैरे जिनसा मनुष्याच्या इच्छाशक्तीचीं दृश्यफलें आहेत. मनुष्याच्या दानतीस अनुरूप अशी इच्छा उद्भवते. आणि दानत कर्मांनुरूप बनलेली असते. यामुळें जसें कर्म तद्वतच इच्छा हें उघड झालें. आपल्या अचाट इच्छाशक्तीनें जगाचें स्वरूप ज्यांनीं बदलून टाकिलें असे सामर्थ्यवान् पुरुष जबर व्यासंगी होते. सर्व जग सुलट्याचें उलटें व उलट्याचें सुलटें करावें असें सामर्थ्य युगानुयुगें कर्मे करून त्यांनीं आपल्या ठिकाणीं आणून ठेविलें होतें. भगवान् बुद्ध अथवा भगवान् येशुख्रिस्त यांची अलोट इच्छाशक्ति ही एकाच जन्मांतील कर्मांचें फल नसून जन्मजन्मांतरींचीं कर्मफलें जीं त्यांनीं सांठविलीं होतीं त्यांचें एक दृश्यफळ आहे. आपणांतील विशिष्ट मनोवृत्ति आनुवंशिक संस्कारांनीं आपणांस प्राप्त झाल्या आहेत असें ह्मणणारांनीं बुद्ध अथवा ख्रिस्तचरिताचा विचार करावा. ख्रिस्ताचा बाप जोसेफ हा एक साधारण दर्जाचा सुतार होता. तत्त्वज्ञानाचा एक शब्दहि त्यानें उच्चारिला असल्याचें कोणाच्या ऐकिवांत नाहीं. त्याच्यासारखे रंधापटाशी बहाद्दर आजपर्यंत अनेक होऊन गेले व आजहि अनेक आहेत. अशा साधारण दर्जाच्या सुताराच्या पोटीं अर्धें जग प्रकाशमय करून सोडणारा ज्ञानदीप पेटविण्यासारखा पुत्र निर्माण व्हावा हें आनुवंशिक संस्कारांचें फल आहे काय ? बुद्धाचा बाप एक सामान्य राजा होता. स्वतःच्या नोकरांवर तरी त्यास ताबा चालवितां येत होता कीं नाहीं कोणास ठाऊक ! परंतु त्याच्या पोटीं उत्पन्न झालेल्या पुत्रास ईश्वरावतार मानून अर्धें जग प्रत्यहीं त्याची पूजा करीत आहे. जोसेफ सुतार आणि त्याचा पुत्र या दोघांत दिसून येणारें जमीनअस्मानाचें अंतर आनुवंशिक संस्कारांच्या उपपत्तीनें भरून येईल काय ? बुद्ध आणि ख्रिस्त यांनीं ज्या आपल्या इच्छाशक्तीनें जगांत क्रांति घडवून आणली ती शक्ति कोठून आली ? अनेक लहान लहान शक्ती युगानुयुगें एकवटत होत्या व शेवटीं त्या बुद्ध व ख्रिस्त या रूपानें प्रगट झाल्या असेंच ह्मटलें पाहिजे.

आपली जी कांहीं दानत आजमितीस आहे, ती आपल्या सर्व पूर्वकर्मांचा परिपाक आहे. स्वतः श्रम करून मिळविल्याशिवाय कोणासहि आयतें असें कांहींच प्राप्त व्हावयाचें नाहीं, असा अनादिसिद्ध नियम आहे. कित्येक वेळां अशा प्रकारचा नियम कांहींच नसावा असें वाटण्यासारख्या गोष्टी घडतात; परंतु आपली दृष्टि जसजशी शुद्ध होत जाते तसतशी या नियमाच्या अस्तित्वाबद्दल आपली

खात्री होत जाते. एखादा मनुष्य पैसा मिळविण्यासाठीं एकसारखी धडपड करित असतो. प्रसंगीं कोणाची मान मुरगळण्यासहि मागेंपुढें पाहत नाहीं; परंतु इतकें करूनहि त्यास कांहीं प्राप्ति होत नाहीं. आणि आयुष्य त्याला कंटाळवाणें वाटूं लागतें. पैसा मिळावा अशी त्या मनुष्याची योग्यताच नसते. स्वतःच्या सुखासाठीं हजारों वस्तु आपण जमवून ठेवितों; परंतु त्यांतील जितक्यांचा उपभोग घडण्याची आपली पात्रता असते तितक्याच आपल्या उपयोगीं पडतात. एखाद्या मूर्खानें जगांतील सर्व पुस्तकांचा संग्रह केला तरी त्यांतील जितकीं वाचण्याची त्याची योग्यता असते तितक्यांचाच त्यास उपयोग होतो. ही योग्यता त्याला स्वतःच्या कर्मानुसार प्राप्त झालेली असते. आपली योग्यता काय आहे व आपणास कोणत्या गोष्टी आपल्याशा करतां येतील याचा आपल्या कर्मानुरोधानें निश्चय होतो. आपली जी कांहीं आज स्थितिं आहे ती आपण स्वतःच प्राप्त करून घेतली असून आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल ती स्थिति प्राप्त करून घेण्यास आपणांस मोकळीक आहे. आज आपणांस जी कांहीं स्थिति प्राप्त झाली आहे ती पूर्वकर्माचें फल असल्यामुळें पुढें प्राप्त होणारी स्थिति वर्तमान अथवा चालू कर्मानुरूप होणार हें उघड आहे. असें आहे तर कर्म कसें करावें हें समजून घेणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. ‘कर्म कसें करावें यांत समजून घेण्यासारखें काय आहे ? आम्ही रोज कसें तरी कर्म करीत असतोंच’ असें कोणी म्हणेल. परंतु कर्म करावें कसें; तसेंच कर्म कोणतें आणि अकर्म कोणतें याचा बोध झाला नसल्यामुळें आपल्या कर्तव्यशक्तीचा दुरुपयोग होतो, व प्रसंगीं तर तिचा फुकट व्यय होतो, ही गोष्ट त्याच्या लक्ष्यांत आलेली नसते. ‘**योगः कर्मसुकौशलम्**’ व ‘**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि**’ असें भगवंतांनीं गीतेंत सांगितलें आहे. कर्म कसें करावें हें जाणून सशास्त्र मार्गानें कर्म केलें तर अत्यंत फलदायी होतें. मानसिकशक्ति अव्यक्तपणांतून व्यक्तपणांत आणणें व निद्रित आत्म्यास चेतना देणें हें कर्माचें साध्य आहे, हें आपण नित्य लक्ष्यांत धरिलें पाहिजे. प्रत्येक मनुष्यांत एकसारखी चिच्छक्ति निद्रित असून ती कर्मरूप आघातांनीं जागृत होते.

प्रत्येक मनुष्य कर्म करूं लागला म्हणजे तें करण्यांत त्याचा कांहीं तरी हेतु असतो. हेतूवांचून कर्मप्रवृत्ति होत नाहीं. कित्येकांना कीर्तिमान् होण्याची इच्छा असते, म्हणून कीर्तीसाठीं ते कर्म करितात. दुसऱ्या कित्येकांना द्रव्य हवें असतें; ते द्रव्यप्राप्तीच्या हेतूस्तव कर्म करीत असतात. कित्येकांना स्वर्गसुखाच्या प्राप्तीचा हव्यास असतो; व ते तशा दृष्टीनें कर्में करितात. कित्येक

आपलें नांव मागें रहावें ह्मणून कर्मे करितात. चिनी लोकांत मनुष्य मेल्यानंतर त्यास त्याच्या योग्यतेप्रमाणें पदवी मिळते. विचारांतीं चिनांतली ही चाल आपल्या चालीपेक्षां बरी आहे असें मला वाटतें. कोणी एखादें मोठें कृत्य केलें तर त्याच्या बापाला अथवा आजाला सरदाराची पदवी देण्याची चाल चीन देशांत आहे. तेव्हां तिकडे कित्येक लोक आपल्या बापाचें नांव मोठें व्हावें ह्मणून कर्म करितात. आपण मेल्यानंतर आपलें खूप मोठें थडगें बांधलें जावें अशा हेतूनें मुसलमानांतील कांहीं विशिष्ट पंथाचे लोक कर्मे करीत असतात. मूल जन्माला आल्याबरोबर त्याचें थडगें बांधणारे कांहीं पंथ मला ठाऊक आहेत. हें थडगें जितकें मोठें आणि सुंदर असेल त्या मानानें आईबापांची पदवी अधिक समजली जाते. सुंदर आणि मोठें थडगें बांधणें हाच हेतु बाळगणारे लोक अशा पंथांत पुष्कळ असतात. दुसरे कित्येक शरीराला खूप त्रास देण्यांतच आनंद मानितात. आणखी कित्येक लोकांचीं घरें बुडवून देवळें बांधतात व भिक्षुकादिकांस खूप धर्म करितात. जणूं काय स्वर्गद्वारावर दाखविण्यासाठीं भटांपासून ते पासच घेत असतात ! इत्यादि अनेक प्रकारच्या हेतूंनीं प्रेरित होऊन मनुष्य कर्मे करीत असतो.

केवळ कर्तव्य ह्मणून कर्म करणारे थोडे. असे लोक कीर्ति अथवा वित्त अथवा दुसरा कांहीं स्वार्थ मनांत न आणितां केवळ कोणाचें तरी बरें व्हावें याचसाठीं कर्मे करितात. कोणाचें तरी बरें झालेलें पाहिलें ह्मणजे त्यांस आनंद होतो. कीर्तीच्या हेतूनें केलेल्या कर्मांचा परिपाक नेहमीं बहुधा सावकाश होत असतो. कीर्तीसाठीं साऱ्या जन्मभर खटपट केली आणि ती अगदीं वृद्धापकाळीं—मरावयाच्या वेळीं—मिळाली असें पुष्कळ वेळां घडतें. जर मनुष्य कोणताहि हेतु मनांत न धरितां कर्मे करील तर त्या कर्मांचा त्यास कांहींच फायदा मिळणार नाहीं काय ? मिळेल, खचित मिळेल. सर्वांत अत्युच्च दर्जाचा असा फायदा त्यास मिळेल. निर्हेतुक कर्माइतकें फायदेशीर दुसरें कोणतेंहि कर्म नाहीं; परंतु तें फलद्रूप होईपर्यंत वाट पहात बसण्या इतका धीर सामान्य मनुष्याच्या ठिकाणीं असत नाहीं. अशा कर्मांचा शरीरप्रकृतीवरहि फारच उत्तम परिणाम होत असतो. प्रेम, सत्य, आणि निःस्वार्थबुद्धि हे शब्द केवळ अलंकारिक भाषेनें मीं योजिले नसून आपणांपैकीं प्रत्येकानें तेंच आपलें साध्य आहे असें जाणावें. आपल्या चैतन्यशक्तीस पूर्णपणें जागृत करण्याची शक्ति या तीन गुणांतच आहे. कोणताहि हेतु–मग तो कीर्तीचा, पैशाचा, स्वर्गसुखाचा

अथवा दुसरा कसलाहि असो—मनांत न धरितां जर कोणीं पांच दिवस किंबहुना पांच मिनिटें कर्म केलें तर अशा मनुष्यांत उत्तम मानसिक धैर्याचें बीज आहे असें समजावें. अशा प्रकारचें कर्म करणें अत्यंत बिकट आहे, ही गोष्ट खरी; परंतु अशा कर्मांत वसत असणाऱ्या सामर्थ्यांचा प्रत्यय आपणास कधींच आलेला नसतो, असें नाहीं. असें कर्म करण्यासाठीं जी आकलनशक्ति लागते तिची किंमत वास्तविक कर्म करण्यांत दिसून येणाऱ्या शक्तीपेक्षां अधिक आहे. कोणतेंहि कर्म करित असतां स्वार्थाचा यत्किंचितहि उदय न होऊं देण्यासाठीं मनावर केवढा मोठा ताबा असावा लागतो याची कल्पना नुसत्या वर्णनानें कधींच करितां येणार नाहीं. स्वार्थी कर्म करण्यांत केवढेंहि सामर्थ्य दिसून आलें तरी त्या सामर्थ्याचें महत्व वरील प्रकारच्या आकलनांत लागणाऱ्या सामर्थ्यापेक्षां निःसंशय कमी दर्जाचें आहे. चार घोडे जोडलेली एखादी गाडी उतरणीवरून भरधांव जात असतां ती तशीच जाऊं देण्यास जें बळ लागतें त्याहून ती एकदम थांबविण्यास अधिक बळ निःसंशय लागतें. एखादा गोळा तोफेंतून मोठ्या वेगानें निघाला आणि त्याच्या वाटेंत कोणताच पदार्थ आड आला नाहीं तर बऱ्याच अंतरावर तो जाऊन पडतो व तेथें त्यांतील विनाशक शक्तीचा फारसा प्रत्यय येत नाहीं. परंतु तो मध्येंच एखाद्या कठीण पदार्थावर आपटला तर अत्यंत परिमाणाची उष्णता तो उत्पन्न करितो. स्वार्थबुद्धीनें प्रेरित होऊन आपण कोणतेंहि कर्म करूं लागलों ह्मणजे आपलें जें सामर्थ्य खर्च होतें तें कोणत्याहि उपायानें आपणास परत मिळत नाहीं. परंतु स्वार्थबुद्धि टाकून देण्यास—मनावर ताबा ठेवण्यास—जें सामर्थ्य खर्च होतें तें मात्र किती तरी अधिक वाढून आपणांस परत मिळतें. अशा रीतीनें ज्याचें मन ताब्यांत आलें आहे, त्याची इच्छाशक्ति अत्यंत बळावत जातजात तोच पुढें ख्रिस्ताची अथवा बुद्धाची पदवी पावतो. मनुष्यमात्रानें आपणापुढें नमावें अशी पुष्कळांची इच्छा असते; परंतु शक्तीच्या वृद्धीचें हें रहस्य त्यांस ठाऊक नसतें. आज अत्यंत मूर्ख असा दिसणारा मनुष्यहि हें रहस्य जाणून व त्याप्रमाणें वागून जगाचा शास्ता होऊं शकेल. आपणापुढें मनुष्यांनीं नमून राहावें अशी इच्छा मात्र त्यानें प्रथम समूळ टाकिली पाहिजे. ज्या दिवशीं अशा इच्छेची त्यास आठवणहि नाहींशी होईल त्याच दिवशीं मनुष्यें त्याजपुढें नमत आहेत असें त्यास दिसेल. ज्याप्रमाणें कित्येक प्राण्यांस कांहीं थोड्याशा पावलांपलीकडील जमीन दिसत नाहीं, त्याच प्रमाणें आह्मां मनुष्यांची नजर कांहीं थोड्या वर्षांपली-

कडे जात नाहीं. आमच्या सभोंवतीं दिसणाऱ्या परिघापलीकडे आणखी जग आहे ही गोष्टच आमच्या ध्यानांत येत नाहीं. दृष्टीच्या या आकुंचितपणामुळेंच आह्मी दुष्ट आणि अनीतिमान् बनलों आहों. हाच आमचा मोठा दुर्बळपणा आहे.

कर्म कितीहि हलक्या दर्जाचें असलें तरी त्याचा विषाद मानूं नये. हलकें कर्म झालें तरी तें शक्य तितक्या उत्तम रीतीनें करण्यास शिकलें पाहिजे. केवळ कीर्तीसाठीं कोणी कांहीं कर्म करित असतील तर असोत. परंतु आपलें कर्तव्य करतांनां कीर्तीची दृष्टि ठेऊं नये. आपल्या स्वतःचें मानसिक सामर्थ्य वाढावें ही दृष्टि नेहमीं जागृत असली पाहिजे. '**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन**' ही भगवंताची उक्ति सतत ध्यानांत वागविली पाहिजे. एखाद्याला मदत करण्याची तुम्हांस इच्छा झाली तर तो पुढें आपल्याशीं कसा वागेल असल्या प्रकारचे विचार चित्तास शिवूंहि देऊं नयेत. कोणत्याहि चांगल्या कार्यास आरंभ करावा असें वाटलें तर तें शेवटास जाईल कीं नाहीं याची चिंता करित न बसतां कार्यास आरंभ करावा.

अशा प्रकारचें कर्म करण्याचा निश्चय केला तर एक नवीच अडचण दिसूं लागते. सदोदित कार्यरत राहावयाचा आम्ही निश्चय करूं; वस्तुतः कर्माशिवाय आमचा एक क्षणहि जात नाहीं. हें तुमचें ह्मणणें आह्मीं कबूल केलें, तर सदोदित कार्यरत राहिल्यावर आह्मांस विश्रांति केव्हां मिळणार? जगांत राहून कर्म करावयाचें ह्मटलें तर निवळ चरितार्थासाठीं सुद्धां इतका उद्योग करावा लागतो कीं त्याखालींच आमचा चुराडा होऊन जातो. संसार सोडून अरण्यवास पत्करावा ह्मटलें तर तेथील शांतताहि सहन करण्याची आम्हांस मानसिक शक्ति नाहीं. पशुपक्ष्यांवांचून इतरांचा शब्दहि ऐकूं येण्याची मारामार,' अशा स्थितींत या दोन्ही स्थिति अर्धवट वाटतात. एखाद्या अरण्यवासी मनुष्याला संसारांत आणिलें तर भोंवतालच्या गडबडीनें तो बिचारा भांबावून वेडा व्हावयाचा. उलटपक्षीं एखाद्या संसाऱ्याला अरण्यांत पाठविलें तर तेथल्या निःसीम शांततेनें तो वेड्यासारखा होतो. समुद्राच्या खोल पाण्यांत राहणाऱ्या माशाला पृष्ठभागावर आणिलें तर त्याच्या शरीराचे तुकडे होतात. कारण त्याच्या शरीरावर जें पाण्याचें प्रचंड वजन असतें तें नाहींसें झाल्यामुळें त्याचें शरीर विस्कळित होतें. अशी स्थिति दिसत असतां या दोहींचा योग्य संयोग करावयाचा कसा? जगांतील एकसारख्या चालू राहणाऱ्या गडबडींत ज्याला अत्यंत स्थिर राहतां येतें आणि अरण्याच्या निःसीम शांततेंत ज्याला अत्यंत कार्यरत राहतां येतें

अशी मानसिक स्थिति आम्हांस प्राप्त करून घ्यावयाची आहे. माणसांनीं गजबजून गेलेल्या रस्त्यांत अरण्यांतील गुहेची शांतता मिळविणें आणि अरण्यांतील गुहेंत अत्यंत कार्यरत राहतां येणें अशी संयुक्त स्थिति आपणास प्राप्त करून घ्यावयाची आहे. कर्मयोगाचें हेंच ध्येय आहे. ही स्थिति तुह्मास प्राप्त करून घेतां आली तरच कर्मयोगाचें रहस्य तुह्मीं जाणलें असें होईल.

ही स्थिति प्राप्त करून घेण्याकरितां आपल्या चालू परिस्थितींत राहूनच आपणास आरंभ करावयास पाहिजे. कोणताहि उद्योग निःस्वार्थी मनानें करावयाला शिकणें हा या शाळेंतील पहिला धडा आहे. आपल्याला कोणतेंहि काम करण्याची इच्छा उद्भवली कीं तिच्यापलीकडे असणारा हेतु शोधावा. हेतूवांचून इच्छा उद्भवत नाहीं. इच्छा उद्भवली कीं तिचें स्वरूप अधिक व्यक्त असल्यामुळें हेतूपुढें पडदा आल्यासारखा होऊन तो अदृश्य होतो. तो हेतु शोधून काढून त्याचें वास्तविक स्वरूप अवलोकन करावें. पहिल्या पहिल्यानें आपली प्रत्येक इच्छा स्वार्थी हेतूनें प्रेरित असते असें आपणास आढळून येईल. परंतु आपल्या इच्छाशक्तीनें या स्वार्थाच्या निःपाताचा उद्योग निश्चयानें आरंभिला तर केव्हांना केव्हां तरी यश खचित येईल. या दुस्तर संसृतींतून आपला रस्ता काढित असतां हळू हळू प्रयत्न करून शेवटीं सर्वथा निःस्वार्थी बनणें हें प्रत्येकाला शक्य आहे. ज्या दिवशीं आपण पूर्ण निःस्वार्थी बनूं त्या दिवशीं आमचें सर्व सामर्थ्य एकवटलें आहे असा प्रत्यय येऊन आपली मूळची केवळ ज्ञानमय स्थिति आपणास प्राप्त होईल.

प्रकरण २ रें.

स्वकर्तव्यदक्ष प्रत्येक मनुष्य सारखाच मोठा आहे.

सांख्यमताप्रमाणें विश्व हें त्रिगुणात्मक आहे. या तीन गुणांस सत्व, रज आणि तम अशीं नांवें आहेत. या तीन गुणांचें सृष्टींतील प्रत्यक्ष अथवा दृश्य स्वरूप अनुक्रमें स्थैर्य, चापल्य आणि जाड्य अशा तीन अवस्थांत दिसून येतें. दगडासारखी जडावस्था हें तमोगुणाचें दृश्यस्वरूप आहे. रागलोभादि विकारांस वश होऊन कार्यास प्रवृत्त होणें हें रजोगुणाचें दृश्यस्वरूप आहे. या दोहोंस ताब्यांत ठेऊन त्यांच्यांत समतोलपणा उत्पन्न करणारा तो सत्वगुण.

प्रत्येक मनुष्यांत हे तीन गुण असतात. त्यांपैकीं जो गुण ज्या वेळीं प्रबल असेल त्यास अनुसरून प्रत्येक मनुष्य त्यावेळीं कर्म करित असतो. जेव्हां तमोगुण प्रबल असतो तेव्हां आपणास आळस येतो—आपण अगदीं स्तब्ध आणि

क्रियाशून्य होतों. अशा वेळीं आळसामुळें कोणताच विचार उत्पन्न होत नाहीं. कित्येक वेळां विलक्षण चपलतेचा आपल्या अंगीं संचार होऊन एखादें अवघड कामहि त्रास वाटल्याशिवाय आपण पार पाडतों; अशावेळीं रजोगुणाचें प्राबल्य असतें; आणि कित्येक वेळीं आळस बिलकुल नसतां आपली वृत्ति अगदीं शांत असते; अशा वेळीं सत्वगुण अधिक प्रबल असतो. याहून अधिक स्थिर असेंहि ह्या गुणांचें दुसरें एक स्वरूप आढळून येतें. कित्येक मनुष्यांत या तिहींपैकीं कोणत्या तरी एका गुणाचें प्राबल्य नेहमींच विशेष असतें. कित्येक स्वभावतःच आळशी असतात. कित्येक स्वभावतः अत्यंत उद्योगप्रिय आणि चळवळे असतात; आणि कित्येक शांत स्वभावाचे आणि मित व मधुरभाषी असतात. हे तीन स्वभावविशेष अनुक्रमें तम, रज आणि सत्व या गुणांचे द्योतक आहेत. या त्रिगुणांवांचून असणारा एकहि पदार्थ या सृष्टींत नाहीं. झाडेंझुडपें, पशुपक्षी आणि मनुष्यें यांत कमीअधिक प्रमाणानें या गुणत्रयाचें मूर्तस्वरूप दृग्गोचर झालें आहे.

कर्मयोगांत मुख्यत्वेंकरून या त्रिगुणांचाच विचार केला आहे. यांच्या गुणांचें स्वरूप काय आहे, आणि त्यांचा यथायोग्य उपयोग कसा करतां येईल याचें ज्ञान आपणास झालें ह्मणजे आपलें कर्तव्य अधिक सशास्त्र मार्गानें कसें करावें हें आपणास समजतें. मानव समाजांची रचना देशकालानुरूप निरनिराळ्या प्रकारची झालेली आहे. नीति ह्मणजे काय याचें सामन्य ज्ञान आम्हांस सारखेंच असतें. तसेंच कर्तव्य ह्मणजे काय हेंहि आह्मांस सामान्यपणें समजतें. तथापि निरनिराळ्या देशांच्या निरनिराळ्या चालीरीतींस अनुसरून या शब्दांच्या व्याख्यांत बदल होत असतो. जी गोष्ट एका देशांत नीतीची अशी समजली जाते तीच दुसऱ्या देशांत नीतीस अगदीं विघातक समजली जाते. कांहीं देशांत चुलत बहिणीशीं लग्न करणें ही सामान्य व्यवहारांतील गोष्ट आहे. परंतु दुसऱ्या देशांत तीच चाल नीतीस अगदीं विरुद्ध अशी मानली जाते. कित्येक देशांत मेहुणीशीं लग्न करणें हें पाप आहे असें समजतात. तर दुसऱ्या कित्येकांत तसें समजत नाहींत. कित्येक देशांत एका पुरुषास एका वेळीं एकच पत्नी असणें हें नीतीचें दर्शक मानलें जातें, तर दुसऱ्या कित्येकांत एकाच वेळीं चारपांच अथवा शेंपन्नास बायका असणें ही सामान्य चाल आहे. अशाच रीतीनें नीतीच्या इतर तत्वांचेंहि व्यवहार्य रूप प्रत्येक देशांत निरनिराळें आढळतें.

याचप्रमाणें कर्तव्याचीही गोष्ट आहे. मनुष्यानें कांहीं एखादी गोष्ट केली नाहीं तर तो कर्तव्यच्युत झाला असें कांहीं ठिकाणीं समजलें जातें. परंतु

दुसऱ्या कित्येक देशांत तीच गोष्ट करणारा मनुष्य मूर्ख समजला जातो. अशी वस्तुस्थिति आहे तरी नीतीच्या व कर्तव्याच्या सामान्य कल्पना आपणा सर्व मानव जातीच्या एकच आहेत अशी जाणीव आपल्या अंतर्यामीं नेहमीं जागरूक आहे. अंतर्यामीं असणाऱ्या जागरूकतेचा अनुभव आणि त्याच गोष्टींचा व्यवहार्य स्वरूपांतील भिन्नपणाचा अनुभव यांचा मेळ कसा घालावयाचा हा प्रश्न आपणापुढें उभा राहतो. या परस्परविरोधी अनुभवांची एकवाक्यता करण्यास दोन मार्ग मोकळे आहेत. 'मी ह्मणतों अथवा करतों तेंच बरोबर, तसें न करणारे इतर लोक मूर्ख आणि अनीतिमान्' अशा रीतीनें एकवाक्यता करणें हा एक मार्ग आहे; परंतु हा मूर्खांचा मार्ग झाला. शाहण्यांचा मार्ग याहून भिन्न आहे. भिन्न देशकालवर्तमान आणि भिन्न परिस्थिति यांमुळें एकाच सिद्धांताच्या व्यवहार्य स्वरूपांत भेद दिसतो. हा बाह्यतः दिसणारा भेद खरा नसून तो त्या सिद्धांताचें वैय्यर्थ्य न दाखवितां केवळ भिन्न परिस्थिति मात्र दाखवितो. एकवाक्यतेचा हा शहाण्या पुरुषांचा दुसरा मार्ग आहे. सिद्धांत एकच असला तरी त्याचें व्यवहार्य स्वरूप परिस्थित्यनुरूप बदलणें शक्य आहे येवढेंच नव्हे तर तसें होणें इष्टहि आहे असें पंडितांचें मत आहे.

उदाहरणार्थ, 'दुष्टाचा प्रतिकार करूं नये' असा उपदेश येशुख्रिस्ताप्रमाणें इतर धर्मप्रवर्तकांनींहि केला आहे. स्वसंरक्षणार्थसुद्धां कोणालाहि दुखवावयाचें नाहीं हें ध्येय निःसंशय उच्च दर्जाचें आहे, ही गोष्ट आपणांस अंतर्यामीं पटते. आतां आपण हें ध्येय नित्याच्या व्यवहारांत आणूं लागलों तर केवढे अनर्थ ओढवतील याची कल्पना करा. आमचें वित्त आणि जीवितहि सुरक्षित राहणार नाहीं. सर्व समाजसंघटना विस्कळित होऊन कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहीं, अशी स्थिति होऊन जाईल. फार काय सांगावें, आपण एकच दिवस वरील तत्वास अनुसरून वागावयाचें ठरविलें तरी सर्वत्र झोटिंगशाही माजेल. यासाठीं या तत्त्वाचा उच्चपणा आपणांस अंतर्यामीं पटला असला तरी त्याला व्यवहार्यरूप देणें आजच्या समाजाच्या स्थितींत अनिष्ट आहे. हें तत्त्व चांगलें आहे त्या अर्थी याप्रमाणें न वागणारा तो पापी असें आपण ह्मणूं लागलों तर या पापांतून मुक्त असे मनुष्य फारसे आढळणार नाहींत. ह्मणजे या दृष्टीनें बहुतेक सर्व मानवजाती पापी असें ह्मणावयाची पाळी येईल. आपण पापी अशी कल्पना जर एकवेळ खरोखर रूढ झाली तर ती केवढे अनर्थ करील व आपणा मनुष्यांस कोणत्या खाड्यांत नेऊन टाकील याचा नेम सांगवत नाहीं.

'मी पापी आहें' असें मनापासून कोणास वाटूं लागलें कीं त्याचा पहिला घातक परिणाम मनोदौर्बल्य हा होय. अशा दुर्बळ मनुष्याच्या हातून निश्चयानें कोणतीहि गोष्ट पार पडणें सर्वथा अशक्य आहे; आणि मनुष्य एक वेळ असा घसरणीस लागला कीं प्रतिक्षणीं त्याचा वेग वाढत जाऊन तो अगदीं तळाशीं जाईपर्यंत मध्यें कोठें थांबण्यास त्यास अवसरच सांपडत नाहीं. मनोदौर्बल्या-इतकें मोठें पाप जगांत दुसरें कोणतेंहि नाहीं. मनुष्यजातीचा याच्याएवढा दुसरा मोठा शत्रु नाहीं. ज्याप्रमाणें मनोदौर्बल्य हें एका व्यक्तीच्या घातास कारण होतें, त्याचप्रमाणें तें सबंध राष्ट्राच्या नाशासहि कारण होतें. 'आह्मी मूर्ख, आह्मी पापी,' असें पठण करित बसणारे लोक दुर्गतिपंकांत असावयाचेच यांत कांहीं शंका नाहीं.

आपल्या स्वत:बद्दल आपलें कधींहि अनिष्ट मत होऊं देऊं नये. मला असाध्य असें या जगांत कांहीं नाहीं असा अत्यंत दृढ विश्वास चित्तांत प्रथम उत्पन्न झाला पाहिजे; आणि नंतर परमेश्वरावर विश्वास पाहिजे. परमेश्वर जें जें कांहीं करतो तें तें सर्व आपल्या बऱ्यासाठींच आहे, असा भरंवसा परमेश्वरावर पाहिजे. ज्याच्या ठिकाणीं आत्मविश्वास नाहीं, त्याचा विश्वास परमेश्वरावरहि नाहींच, असें तुह्मी पक्कें समजा. सारांश, नीति आणि कर्तव्य यांचें स्वरूप देशकालानुरूप बदलतें ही गोष्ट नित्य ध्यानांत बाळगून कोणासहि त्यांच्या चालीरीतीबद्दल दूषण देऊं नये. 'दुष्टाचा प्रतिकार करूं नये' हें जसें कर्तव्य आहे तसेंच, परिस्थिति बदलली तर 'दुष्टाचा प्रतिकार करावा' हेंहि आपलें कर्तव्यच होईल.

भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत भगवान् श्रीकृष्णांनीं अर्जुनाला दांभिक व भित्रा ह्मणून दूषण दिलें आहे, याबद्दल कित्येकांना मोठें नवल वाटत असेल. आपले आप्त, स्नेही यांजबरोबर युद्ध करणें हें अर्जुनाला मोठें पाप वाटलें. सर्व विश्वावर प्रेम करणें हें आपलें कर्तव्य असतां स्वजनांचा वध करावयाचा ह्मणजे प्रेमाला उघड्या डोळ्यांनीं तिलांजुलि द्यावयाची असें होतें. अशा कल्पनेनें अर्जुन युद्धास प्रवृत्त होईना. या प्रसंगापासून आपणा सर्वांस बोध घेतां येण्यासारखा आहे.

उजेड अत्यंत मंद असला तर तो आपणांस दिसत नाहीं. तसेंच तो अत्यंत तीव्र असला तरीहि आपणांस दिसत नाहीं. त्याचप्रमाणें आवाजाचें आहे. आवाज अगदीं लहान असला तर जसा आपणांस ऐकूं येत नाहीं, त्याच प्रमाणें अत्यंत मोठा आवाजहि आपणांस ऐकूं येत नाहीं. गतीची गोष्टहि अशीच आहे.

घड्याळांतील अवर कांट्याची गति आपणांस दिसत नाहीं. तसेंच एखाद्या अत्यंत झपाट्यानें फिरणाऱ्या भोंवऱ्याची गतीहि आपणांस दिसत नाहीं. तो भोंवरा निश्चळ उभा आहे असेंच आपणास वाटतें. यावरून कोणत्याहि स्थितीचीं आत्यंतिक रूपें बाह्यतः अगदीं एकसारखींच असतात, असें सिद्ध होतें. अत्यंत हळु आणि अत्यंत झपाट्याची गति, हीं गतीचीं वस्तुतः परस्पर अगदीं विरुद्ध अशीं स्वरूपें असतां आत्यंतिकपणामुळें अगदीं एकसारखीं दिसतात. हा बोध आपणांपैकीं कित्येकांनीं मनन करण्यासारखा आहे. जड पदार्थांसंबंधीं जसा हा नियम खरा आहे, तसाच तो चैतन्ययुक्त पदार्थांसहि लागू पडतो. आपणास रस्त्यानें जाणारा कोणी मनुष्य अपशब्द बोलत आहे हें पाहून एखादा स्तब्ध राहिला तर त्या कृतींत परस्परविरुद्ध असे दोन हेतु संभवतात. आपला शत्रु धष्टपुष्ट आहे हें पाहून भीतीनें गप राहणें निराळें; आणि त्याचें तोंड एका तडाक्यानें बंद करतां येण्याची शक्ति आपल्या मनगटांत आहे अशी पूर्ण जाणीव असतांहि त्याला केवळ क्षमा करून गप राहणें हें निराळें. बाह्यतः कृतीचें स्वरूप एकच आहे. परंतु हेतूंत मात्र जमीनअस्मानाचें अंतर आहे. यामुळें वरील कृति एकच असतां तिजपासून उद्भवणाऱ्या पापपुण्याचें स्वरूप मात्र अगदीं भिन्न होतें. भीतीनें गप राहणें ही कृति पापपरिणामी असून दुसरी कृति पुण्यकारक आहे. बुद्ध जन्मतः राजपुत्र असून सुखविलासांत वाढलेला असतांहि त्यानें त्या सर्वांवर लाथ मारिली. याचें नांव खरा त्याग. परंतु खायाला मिळत नाहीं ह्मणून एकादशी करणारा भिकारी पुण्यवान् ह्मणतां येईल काय? वास्तव ज्यावेळीं आपण प्रतिकार करणें हें पाप आहे असें ह्मणतों तें कोणत्या हेतूनें ह्मणतों याचा विचार केला पाहिजे. येथें हेतु प्रधान असून कृति गौण आहे, ही गोष्ट नित्य लक्ष्यांत बाळगिली पाहिजे. प्रतिकार करण्याची ताकद आपल्यांत आहे कीं नाहीं याचा विचार प्रथम केला पाहिजे. आपणांत सामर्थ्य आहे अशी पक्की जाणीव असतांहि आपण दुष्टाचा प्रतिकार केला नाहीं तर आपण खरोखर मोठें पुण्य केल्यासारखें होईल. परंतु अप्रतिकाराच्या तत्वामागें आपला भेकडपणा लपवूं पाहणें यासारखें दुसरें कोणतेंहि मोठें पाप नाहीं. आपणासमोरील प्रचंड सेना पाहून अर्जुनाचें चित्त क्षणभर कंपित झालें, आणि असें कंपित चित्त असतां त्यास अप्रतिकाराच्या तत्वाचें स्मरण झालें. परंतु या तत्वाच्या स्मरणाबरोबर तो स्वतःचें कर्तव्य विसरला; अथवा ही विस्मृति तरी कसली? अप्रतिकाराच्या तत्वामागें तो आपली भीति लपवूं पाहत होता. परंतु भगवान् श्रीकृष्णांनीं ती

स्थिति ओळखूनच त्यास 'अशोच्यानन्व शोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे' असें ह्मटलें, व 'क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप' असा उपदेश केला.

याप्रमाणें कर्मयोगाची प्रमुख कल्पना आहे. अप्रतिकाराचें तत्व अतिशय उच्च आहे ही गोष्ट प्रत्येक कर्मयोगी जाणत असतो. प्रतिकाराचें पूर्ण सामर्थ्य अंगीं असतांहि मनावर ताबा ठेवून प्रतिकार न करण्यांत उत्पन्न होणाऱ्या शक्तीची जाणीवहि त्याला पूर्ण असते. परंतु इतकी अत्युच्च दशा प्राप्त होईपर्यंत प्रतिकार करूनच आपलें सामर्थ्य वाढविलें पाहिजे हें ओळखून तो तदनुरूप वागत असतो. अत्युच्च ध्येय साध्य होईपर्यंत मधील मुक्कामावर थांबून आपल्या सामर्थ्याचा आढावा काढणें हाच मार्ग प्रत्येकास श्रेयस्कर आहे. जोंपर्यंत भेकडपणाची यत्किंचित्हि छाया शिल्लक आहे तोंपर्यंत अप्रतिकाराची कांस धरणें ह्मणजे बुडत्या गलबतावर नांगराला मिठी मारण्यासारखें आहे.

माझ्या देशांत एक अत्यंत आळशी आणि मूर्ख मनुष्य मला भेटला. तो दोन पायांवर चालणारा प्राणी असल्यामुळेंच केवळ त्यास मनुष्य अशी संज्ञा प्राप्त झाली होती. तो मला ह्मणाला "अहो, परमेश्वरप्राप्तीचा कांहीं मार्ग मला दाखवाल काय? मी मुक्त कसा होईन तें मला सांगाल काय?" मीं त्याला विचारिलें "तुला खोटें बोलतां येतें काय?" तो ह्मणाला "नाहीं." यावर मीं त्याला ह्मटलें "तर मग अगोदर खोटें बोलायाला शीक. लांकडाच्या ठोकळ्यासारखा होऊन बसण्यापेक्षां खोटें बोलणेंहि कांहीं वाईट नाहीं. बाह्यतः अत्यंत निश्चल दिसणारी तुझी स्थिति स्थितप्रज्ञाची नसून दगडाची आहे. त्यामुळें कांहीं वाईट कृत्यहि तुझ्या हातून घडत नाहीं. तर प्रथम कांहीं वाईट कृत्य तरी करायाला शीक." मित्रांनों, यांतील थट्टेचा भाग सोडून दिला तर केवळ दगडाच्या स्थैर्यांतून स्थितप्रज्ञाच्या स्थैर्याला पोहोंचण्याकरितां कर्मयोगाच्या अगदीं तळच्या पायरीपासून आरंभ करणें जरूर आहे हें माझ्या सांगण्याचें तात्पर्य तुमच्या लक्ष्यांत आलेंच असेल.

दगडासारखी निश्चल स्थिति कधींहि स्पृहणीय नाहीं; एवढेंच नव्हे, तर सर्वथैव त्याज्य आहे. स्थितप्रज्ञाची शांतता प्राप्त होईपर्यंत प्रत्येकानें उद्योग हा केलाच पाहिजे; आणि उद्योग ह्मटला कीं त्यांत प्रतिकार उत्पन्न होणारच. यास्तव उद्योगरत राहून वाईटाचा प्रतिकार करतां करतां स्थितप्रज्ञता तुह्मांस प्राप्त करून घेतली पाहिजे. 'कोणाचाहि द्वेष करूं नका, आणि वाईटाचा प्रतिकार करूं नका' हें ह्मणणें फार सोपें आहे; परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणें

किती धोक्याचें आहे याचें विवरण अगोदर केलेंच आहे. आपल्या स्वतःवरहि या तत्वाच्या अंमलबजावणीचा परिणाम अत्यंत अहितकरच होतो. आपल्या कृतीकडे सर्व जग पाहत आहे ही जाणीव असेपर्यंत प्रतिकार न करण्याचें सोंग आपण आणूं. परंतु या सोंगाची बतावणी करित असतां आपणांस किती त्रास होतो व तोंड बांधून बुक्यांचा मार कसा सोसावा लागतो याचा अनुभव ज्याचा त्यालाच विचारला पाहिजे. स्थितप्रज्ञाचा निरिच्छपणा, समता व शांतता यांचें कवच नसतां जगाचे तीक्ष्ण बाण सोसावयाचे ही गोष्ट अशक्य आहे, असा आपणांस त्यावेळीं अनुभव येतो व आपलें ढोंग सोडून देऊन जोराचा प्रतिकार करून पुढें सरावें असें मनांत आल्यावांचून राहत नाहीं. आपण श्रीमंत व्हावें अशी इच्छा तुम्हांस झाली आणि पैशाच्या मागें लागणें हें जगाच्या दृष्टीनें पाप आहे असें समजून तुम्हीं पैशाकरितां उद्योग केला नाहीं तरी तुमचें मन सदोदित ' कवडी कवडी ' असा जप केल्यावांचून कधींहि राहणार नाहीं. असा जप अहोरात्र चालू असतां त्यागी म्हणून स्वस्थ बसण्यांत काय शहाणपण आहे बरें ! अशावेळीं स्वस्थ न बसतां व जगाच्या बरें अथवा वाईट ह्मणण्याकडे लक्ष्य न देतां सपाटून उद्योग करा. म्हणजे संपत्तीच्या प्राप्तीकरितां भोगावीं लागणारीं सुखदुःखें कशीं असतात यांचा प्रत्यक्ष अनुभव येऊन तुमचें मन आपोआप शांत होऊं लागेल, व त्यागाचा सरळ रस्ता तुम्हांस दिसूं लागेल. कोणतीहि इच्छा अतिप्रबळ झाली तर तिची तृप्ति करून घेणें हें ढोंगीपणापेक्षां परिणामीं अधिक हितकर असतें. इच्छातृप्तीनंतर जो थोडा शांततेचा काल सांपडतो, त्यावेळीं विचार जागृत झाला तर आपण एवढी खटपट करून मिळविलेलें सुख तुच्छ आहे असें तुमचें तुह्मांसच वाटूं लागतें. आणि ही जाणीव एक वेळ पक्की उत्पन्न झाली ह्मणजे त्यागापासून मिळणाऱ्या अननुभूत सुखाची खरी गोडी तुह्मांस कळेल. प्रखर उन्हाचा ताप अनुभवल्यावांचून सावलीच्या सुखाची खरी किंमत कळत नाहीं. त्यागापासून शांति मिळते असा उपदेश आज हजारों वर्षें साधुसंत करित आले आहेत. आपल्या जन्मापासून हे शब्द आपल्या कानांवर नेहमीं आदळत आहेत. असें असतांहि खरे त्यागी आपणांस कितीसे दिसतात? मीं अर्ध्या जगावर फिरून अनुभव घेतला, परंतु असे वीस इसम सुद्धां आजपर्यंत माझ्या पाहण्यांत आले नाहींत.

आपल्या नजरेपुढें कांहीं तरी साध्य ठेवून त्याच्या प्राप्तीकरितां यत्न करण्यास प्रत्येकानें प्रथम सुरवात करावी. हाच मार्ग नेहमीं हितपरिणामी असतो. कोणी

एखाद्यानें अमुक साध्य इष्ट आहे असें सांगितलें ह्मणून त्या साध्याच्या मागें लागणें हें निःसंशय अनिष्ट आहे. उदाहरणार्थ, आपण एखाद्या लहान मुलाला त्याच्या शक्तीचा विचार न करितां आठदहा कोसांची मजल मारावयास सांगितलें तर मुक्कामास पोहोंचण्यापूर्वीच त्या बिचाऱ्याचा अंत होईल. जगांत वागतांना आपण पुष्कळ वेळां अशाच प्रकारचें वर्तन करीत असतों. कोणत्याहि एका समाजांतील सर्व स्त्रीपुरुषें मनाच्या एकाच अवस्थेचीं अशीं कधींहि असावयाचीं नाहींत. त्या सर्वांकडून एकच गोष्ट एकाच मार्गानें होणें शक्य नाहीं. त्यांपैकीं प्रत्येकाचें ध्येय निराळें असणार व त्याच्या सिद्धतेचे मार्गहि निराळे होणार हें उघड आहे. ह्मणून कोणाच्याहि साध्यसाधनासंबंधानें त्यास नांवें ठेवण्यास अथवा त्याचा तिरस्कार करण्यास आपणांस अधिकार नाहीं. प्रत्येकानें आपल्या मार्गानें चालून इतरांसहि बिनहरकत त्यांच्या मार्गानें जाऊं देणें हें योग्य आहे. आंब्याचें लांकूड सागवानाइतकें चांगलें नाहीं ह्मणून अथवा सागवानाला आंब्यासारखीं मधुर फळें येत नाहींत ह्मणून त्या दोहोंसहि वाईट ठरविणारा मनुष्य स्वतः शहाणा ठरेल काय?

जगांत कितीहि भिन्नता दिसली तरी तिच्या मुळाशीं एकात्मकता आहे. सृष्टि आकाराला आली ह्मणजे तींत भिन्नता आणि वैचित्र्य यावयाचेंच असा नियम आहे. किंबहुना भिन्नतेवांचून सृष्टि आकाराला येणेंच अशक्य आहे. तेव्हां या भिन्नतेस अनुसरून प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र ध्येय आणि स्वतंत्र मार्ग असावे हें सृष्टिनियमास अनुसरूनच आहे. सर्वांपुढें एकच ध्येय आणि एकच मार्ग ठेवला तर त्यांत कांहीं मागें पडणारच. तसें झालें ह्मणजे समाजांत निष्कारण द्वेष आणि दुही यांचें पीक येणार. आपण या मार्गांत मागें पडतों असें दिसलें ह्मणजे अशा मनुष्यांच्या ठिकाणचा आत्मविश्वास नाहींसा होतो, आणि आत्मविश्वास नाहींसा झाला ह्मणजे असा मनुष्य प्रायः स्थितप्रज्ञाची स्थिरता सोडून दगडाची स्थिरता पावण्याच्या मार्गास लागतो. ज्याचें जें साध्य असेल त्याला तदनुरूप मार्ग दाखविणें आणि त्याच्या उन्नतींत त्यास शक्य ती मदत करणें इतकेंच आपलें कर्तव्य आहे. त्याचें ध्येय चुकीचें असेल तर हळुहळु ती चूक त्याच्या लक्ष्यांत आणून दिली पाहिजे.

हिंदु महात्म्यांनीं हें तत्व जाणल्यास आज फार काळ लोटून गेला आहे. या तत्वाची अंमलबजावणी करण्याकरितां त्यांनीं निरनिराळे आश्रम कल्पून तदनुरूप आश्रमधर्मांची योजना केली आहे. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम असे हे चार आश्रम आहेत.

सर्वसामान्य मनुष्यजातीला उक्त असें जें आचरण असेल त्याशिवाय या प्रत्येक आश्रमास उचित असे निराळे धर्म हिंदुतत्वग्रंथांत सांगितलेले आहेत. यांतील पहिला ब्रह्मचर्याश्रम हा आहे. यानंतर लग्न होऊन मनुष्य संसार करूं लागला ह्मणजे पहिल्या आश्रमांतून निघून तो गृहस्थाश्रमांत प्रवेश करतो. यानंतर वृद्धापकाळीं संसारांतून विरक्त झाल्यावर तो वानप्रस्थाश्रमी होतो व शेवटीं सर्वसंगपरित्याग करून संन्यासाश्रमाचा तो स्वीकार करतो. या सर्व आश्रमांस निरनिराळे धर्म ह्मणजे कर्तव्यें सांगितलेलीं आहेत. यांपैकीं अमुक आश्रम अमक्यापेक्षां मोठा असा मात्र भाव नाहीं. ब्रह्मचर्याश्रम आजन्म स्वीकार करून धर्मज्ञानदानाचें काम करणारा मनुष्य आणि लग्न करून गृहस्थाश्रमांत पडून त्या आश्रमास अनुरूप अशा धर्मानें वागणारा मनुष्य हे आध्यात्मिक दृष्ट्या सारख्याच योग्यतेचे आहेत. फार काय सांगावें, पण स्वधर्मरत असणारा रस्त्यांतील झाडूवाला आणि स्वधर्मपरायण तक्ताधिपति यांचीहि योग्यता आध्यात्मिकदृष्टीनें अगदीं एकसारखीच आहे. क्षणभर झाडूवाल्याला राजा केलें आणि राजाला झाडूवाल्याचें काम सांगितलें तर काय मौज होईल याची तुह्मीच कल्पना करा. कोणी त्यागी होऊन अरण्यांत जाऊन राहिला ह्मणून तो संसारी मनुष्यापेक्षां मोठा होतो असें नाहीं. वास्तविक विचार केला तर संसारांत स्वधर्मरत राहून परमेश्वराची उपासना करणें हें अरण्यवासाहून अधिक कठिण आहे. पूर्वीचे चार आश्रम सांप्रत नष्ट होऊन त्यांच्या जागीं सध्या दोनच आश्रम मुख्यत्वें करून आढळतात. एक गृहस्थाश्रम आणि दुसरा संन्यासाश्रम. गृहस्थाश्रमी मनुष्यानें संसारी होऊन लौकिक आचार पाळावे व ईशचिंतन करावें. संन्याशानें केवळ धर्मपरायण राहून परमेशचिंतन करावें, आणि लोकांस धर्ममार्ग दाखवावा. महानिर्वाणतंत्रांतील कांहीं वचनें मी तुह्मांस सांगतों ह्मणजे गृहस्थाश्रमाचे धर्म तंतोतंत पाळणें हें किती दुष्कर आहे याची तुह्मांस कल्पना येईल.

प्रत्येक गृहस्थानें परमेशचिंतन करित असावें. परमेश्वरप्राप्ति हेंच साध्य त्याच्या नजरेसमोर सदोदित असावें; असें आहे तरी त्यानें नित्यकर्मांत कधीं अंतर पडूं देऊं नये. कर्म करणें तें फलाशेसाठीं न करतां केवळ कर्तव्य ह्मणून करावें.

या जगांत कर्म करीत असतां फलाची यत्किंचित्‌हि अपेक्षा न बाळगणें हें किती दुष्कर आहे याचा अनुभवच घेतला पाहिजे. एखाद्याला मदत करून नुसत्या कृतज्ञतादर्शक शब्दांचीहि अपेक्षा न करणें, तसेंच एखादें कृत्य करून कीर्ति आपल्या पाठीमागून येत आहे कीं काय, हें कळण्यासाठीं नुसतें मागें

वळूनहि न पाहणें हें खरोखर असिधाराव्रतच आहे यांत संदेह नाहीं. जगाचा स्तुतिपाठ ऐकून एखाद्या क्लीबाचे बंदहि तटातट तुटतील. जगांत आपलें नांव राहील अशी आशा दिसली तर एखादा यःकश्चित मनुष्यहि प्रसंगीं मोठी कृति करील ! कीर्तीची प्रचंड लालसा मानवी हृदयांत आहे. ती लालसा निखालस नष्ट करून जगाच्या स्तुतीची यत्किंचितहि पर्वा न करतां लोकांचें बरें करण्यासाठीं सदोदित झटावयाचें हें कर्म सोपें ह्मणतां येईल काय ? वास्तविक विचार केला तर हा यज्ञ सर्व यज्ञांत मोठा आहे. आपला व आपल्या कुटुंबियांचा चरितार्थ चालविण्याकरितां धनसंपादन करावयाचें हें गृहस्थाश्रमधर्माचें एक कर्तव्यच आहे; परंतु खोटें बोलून, कोणास फसवून अथवा चोरून धनसंपादन करतां कामा नये. परमेश्वर आणि गरीब मनुष्यें यांच्या सेवेकरितांच आपलें जीवित आहे ही गोष्ट गृहस्थानें नित्य लक्ष्यांत बाळगिली पाहिजे.

आपलीं मातापितरें हीं प्रत्यक्ष परमेश्वराचीं स्वरूपें आहेत असें समजून गृहस्थानें त्यांना सदोदित संतोष होईल असें वागलें पाहिजे. मातापितरांचा संतोष तोच परमेश्वराचा संतोष होय. आपल्या मातापितरांस एकहि कटु शब्द जो चुकूनसुद्धां बोलत नाहीं तोच खरा सुपुत्र होय.

थट्टेचा अगर फाजील शब्द मातापितरांदेखत उच्चारूं नये, अधीरपणा दाखवूं नये अथवा क्रोध येऊं देऊं नये. मातापितरांस नमन करून त्यांच्या समोर उभें राहावें व बसण्याबद्दल त्यांची आज्ञा झाल्यावांचून बसूं नये.

आपलीं मातापितरें, आपलीं मुलेंलेंकरें व आपली धर्मपत्नी यांच्या अन्नवस्त्राची प्रथम तरतूद केल्याशिवाय त्या पदार्थांचा जो गृहस्थ उपभोग घेतो तो पातकी समजावा. मातापितरें या देहाच्या उत्पत्तीचें कारण असल्यामुळें कितीहि कष्ट पडले तरी ते सोसून त्यांस संतोष देणें हा पुत्रधर्म आहे.

आपल्या धर्मपत्नीस कठोर शब्दांनीं गृहस्थानें ताडन करूं नये, व आपल्या मातेप्रमाणेंच तिची चांगली तरतूद ठेवावी. आपणास कितीहि त्रास पडत असला अथवा कष्ट सोसावे लागत असले तरी तिच्या देखत त्रासिक मुद्रा धारण करूं नये अथवा क्रोधाचा शब्द उच्चारूं नये.

आपल्या पत्नीवांचून इतर स्त्रीबद्दल मनानें देखील व्यभिचार घडला तर असा गृहस्थ दारुण नरकवासाचा धनी होतो.

कोणत्याहि स्त्रीसमक्ष अनुचित शब्द गृहस्थानें उच्चारूं नये; आणि आत्मश्लाघा करूं नये.

द्रव्य, कपडे, प्रेम आणि अमृतोपम भाषण यांनीं आपल्या पत्नीस सदोदित तुष्ट करित असावें. तिच्या शांततेचा भंग होईल असें कोणतेंहि कृत्य करूं नये. ज्याला सुशील धर्मपत्नीचें प्रेम संपादितां आलें त्यानें धर्मार्थकाममोक्षादि चारी पुरुषार्थ संपादिले असें समजावें. आपल्या मुलांबाळांसंबंधी वर्तणुकीचे नियम सांगितले आहेत ते असे:—

पुत्र चार वर्षांचा होईपर्यंत त्याचें प्रेमानें लालनपालन करावें. सोळावर्षांचा होईपर्यंत त्याला शिक्षण द्यावें. तो वीस वर्षांचा झाल्यानंतर त्यास उद्योगधंद्यास लावावें. नंतर त्याशीं मित्राप्रमाणें प्रेमानें वागावें. याचप्रमाणें कन्येलाहि काळजीपूर्वक शिक्षण द्यावें, व तिच्या विवाहप्रसंगीं तिला वस्त्रें भूषणें द्यावीं.

आपले बंधु, आपल्या भगिनी आणि त्यांचीं मुलें, तसेंच इतर बांधव व चाकरनोकर यांसंबंधीहि विशिष्ट कर्तव्यांचा निर्देश केलेला आहे. त्याचप्रमाणें आपल्या मदतीची अपेक्षा करणारांस गृहस्थानें योग्य मदत करावी. जवळ पैसा असतां जो गृहस्थ गरीबगुरिबांस मदत करित नाहीं तो पशुवृत्तीचा समजावा. खरोखर तो मनुष्यच नव्हे.

स्वतःच्या शरीरावरील वस्त्रप्रावरण व स्वतःचें शरीर यांवर गृहस्थानें अतिप्रेम ठेवूं नये. केंस तुळतुळीत राखण्याचा हव्यास गृहस्थास नसावा. अंतःकरणानें पवित्र व देहानें स्वच्छ राहावें; तसेंच त्यानें उद्योगप्रिय आणि उद्योगरत असावें.

आपल्या शत्रूंशीं निकरानें सामना करावा. शत्रूंचा प्रतिकार करणें हें गृहस्थाचें कर्तव्यच आहे. त्यानें कोंपऱ्यांत बसून अप्रतिकाराचें रडगाणें गाऊं नये. शत्रूला पाठ दाखविणारा गृहस्थ स्वकर्तव्यभ्रष्ट होतो. आपले मित्र आणि आप्त यांशीं अत्यंत लीनतेनें राहावें.

दुष्टांपुढें न वांकणें हें गृहस्थाचें कर्तव्य आहे. दुष्टांपुढें मान वांकविणारा गृहस्थ जगांतील दुष्टपणा वाढविण्यास पर्यायानें कारण होतो. तसेंच जे मानार्ह असतील त्यांस मान द्यावा. मित्रांशीं उच्छृंखल वर्तन करूं नये. मित्र करण्यासाठीं जिकडेतिकडे फिरूं नये. आपल्या परिचितांपैकीं आपल्या कसाला कोणी उतरला असेल तेवढ्यासच मित्र ह्मणावें.

स्वतःच्या सत्कृत्याचा स्वतः उच्चार करूं नये. आपल्या सामर्थ्याची स्वतः टिमकी वाजवूं नये. स्वतःच्या संपत्तीबद्दल बोलूं नये. तसेंच कोणाचा रहस्यस्फोट करूं नये.

'मी गरीब आहें, अनाथ आहें,' असें गृहस्थानें कधींहि ह्मणूं नये. तसेंच 'मी संपत्तिमान् आहें' असाहि उच्चार करूं नये. विहिताविहिताचा स्वतःशीं विचार करून जें करणें तें करावें; दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिऊं नये. याप्रमाणें न वागणारा गृहस्थाश्रमी अनीतिमान् ह्मणविला जातो.

प्रत्येक गृहस्थाश्रमी मनुष्य समाजाच्या आधारस्तंभांपैकीं एक मानला जातो. गरीब आणि अशक्त माणसें, मुलें व स्त्रिया इत्यादिकांचा तो पोषणकर्ता आहे. इतक्यांच्या पोषणाचा भार उचलण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं पाहिजे. आणि हें सामर्थ्य सदोदित वाढतें राहिलें पाहिजे. याकरितां प्रसंगीं त्याच्या हातून चूक झाली तरी तिजबद्दल सर्वांसमक्ष त्यानें कांहीं बोलूं नये. अशा रीतीनें त्यानें स्वतःस उणेपणा आणला तर त्यामुळें त्याच्या ठिकाणीं हृदयदौर्बल्य उत्पन्न होण्याचा संभव असतो. दुर्बळ मनुष्याकडून आश्रमधर्म पाळण्याचें काम बरोबर होणार नाहीं. तसेंच वित्त आणि ज्ञान यांच्या प्राप्तीसाठीं त्यानें खटपट केली पाहिजे. हीं मिळविणें हें त्याचें कर्तव्यच आहे. तें तो न करील तर तो गृहस्थाश्रमास नालायक ठरेल. पैशाकरितां मेहनत न करणारा गृहस्थ अनीतिमान् आहे. जो आळशी आहे आणि आळसांत आयुष्य घालविणें ज्याला आवडतें तो गृहस्थाश्रमी मनुष्य अनीतिमान् समजावा. तो श्रीमान् झाला तर शेंकडों लोकांच्या उपयोगीं पडतो. तुमच्या या शहरांत शेंकडों लोकांनीं श्रीमंत होण्याचा जर प्रयत्न केला नसता, तर येथें दिसणारीं हीं सदावर्तें आणि इतर लोकोपयोगी कृत्यें कधीं तरी नजरेस पडतीं काय ? परोपकारीं लागणारा पैसा मिळविण्यासाठीं श्रम करणें हा गृहस्थाचा धर्मच आहे. कारण जेथून सर्व लोकोपयोगी कार्यांस मदत होते असें मध्यवर्ति ठिकाण ह्मणजे गृहस्थाचें घरच होय. नीतीनें पैसा मिळवून तो परोपकारार्थ खर्च करणाऱ्या मनुष्याची योग्यता सर्वसंगपरित्याग करून परमेश्वरप्राप्तीसाठीं तप करणाऱ्या योग्याहून तिळभरहि कमी नाहीं. योग्यांत आढळून येणारा आत्मत्याग आणि परोपकारार्थ पैसा खर्च करणाऱ्या गृहस्थाचा आत्मत्याग यांत काय फरक आहे ?

आपली कीर्ति वाढविण्याची खटपट योग्य मार्गानें करणें हा गृहस्थाचा धर्म आहे. गृहस्थानें जुगार खेळूं नये, दुष्टांच्या संगतींत राहूं नये, मिथ्या भाषण करूं नये, आणि दुसऱ्यास त्रास होईल असें कोणतेंहि काम करूं नये.

एखादी गोष्ट आपल्या हातून होण्यासारखी नसली तरी ती करावयाची हांव पुष्कळांस असते. अशा प्रकारची एखादी गोष्ट करावयास ते आरंभ करितात;

व तिच्या पूर्ततेसाठीं दुसऱ्या कोणास तरी फसवून आपला कार्यभाग साधतात. त्याचप्रमाणें कोणतीहि गोष्ट करतांना युक्तायुक्ततेचा विचार अवश्य केला पाहिजे. एखादेवेळीं जी एक गोष्ट करणें युक्त असेल तीच गोष्ट दुसऱ्या प्रसंगीं अयुक्त ठरण्याजोगी असेल.

परक्याशीं भाषण करतांना तें अनुद्वेगकर, सत्य, प्रिय आणि हितकर असें असावें. परक्याच्या कामाविषयीं गृहस्थानें चर्चा करीत बसूं नये.

तळीं व विहरी खणणारा, रस्त्याच्या बाजूस वृक्ष लावणारा, धर्मशाळा बांधणारा, आणि रस्ते व पूल बांधणारा गृहस्थ, योगमार्गानें प्राप्त होणाऱ्या लोकीं जातो.

याप्रमाणें गृहस्थाश्रमधर्मापैकीं एका बाजूचें निरूपण केलें आहे. तसेंच आपल्या देशासाठीं व धर्मासाठीं धारातीर्थी देह ठेवणारा गृहस्थ ध्यानी योग्याच्या गतीस जातो, असेंहि ह्मटलें आहे.

या एकंदर निरूपणाचा मथितार्थ असा आहे, कीं, प्रत्येकानें आपापल्या आश्रमधर्माप्रमाणें वागावें. तसेंच योग्य आश्रमधर्म आस्थेनें आचरणाऱ्या सर्व मनुष्यांची योग्यता सारखीच आहे. आपापल्या परिस्थितीप्रमाणें प्राप्त होणारीं कर्तव्यें आचरणें हेंच धर्माचें रहस्य आहे.

याप्रमाणें सर्व आश्रमधर्मांचें निरूपण पाहिलें तर सर्वांत प्रमुखत्वानें आढळणारें असें एकच तत्व आहे. मनोदौर्बल्य नाहींसें करणें हेंच मुख्यतः धर्माचें कार्य आहे असें विचारा अंतीं दिसून येईल. आश्रमधर्म ह्मटला कीं, मग तो गृहस्थाचा असो अथवा संन्याशाचा असो, पहिली बाब मनोदौर्बल्य नाहींसें करणें हीच आहे. आपण सर्व वेद पाहिले तर ही हृदयदौर्बल्यत्यागाची कल्पना चोहोंकडे व्यापून राहिली आहे, असें आपणांस आढळून येईल. भीति ही दौर्बल्याची सूचक अशी वृत्ति आहे. जग काय ह्मणतें, मला कोणी हंसतें कीं काय, असल्या क्षुद्र विचारांस थारा न देतां स्वतःला योग्य वाटेल तें कर्म नित्य आचरणें हें सर्व जीविताचें रहस्य आहे.

कोणी एखादा वनवासी होऊन राहिला तर जगांतील संसारी लोक पापी आणि अभक्त असें त्यानें स्वतःस वाटूं देऊं नये. तसेंच संसारी लोकांनीं त्यागी मनुष्य ह्मणजे निरुद्योगी व परान्नपुष्ट आहे असें ह्मणूं नये. जो कोणी स्वीकृत तत्वाचा कोणासही न भितां आचार करित असेल तो मोठाच आहे. याबद्दल एक गोष्ट सांगतों; ह्मणजे तिजवरून या तत्वाचें मर्म आपल्या ध्यानीं येईल.

एका शहरीं एक राजा होता. तेथें कोणी संन्यासी आला कीं राजानें त्याला बोलावून आणून प्रश्न करावा कीं " यति महाराज, संसारी मोठा कीं संन्यासी मोठा ? " यावर अनेकांकडून अनेक प्रकारचीं उत्तरें येत असत. कोणी ह्मणत कीं संन्यासी मोठा; परंतु त्यांचें ह्मणणें त्यांना सप्रमाण सिद्ध करतां न आलें ह्मणजे राजानें त्यांस लग्न करून संसारी होण्याचा हुकुम करावा.

असें होतां होतां एके दिवशीं एक संन्यासी त्या शहरीं आला असतां राजानें त्यास बोलावून आणून हाच प्रश्न विचारला. तेव्हां संन्यासी ह्मणाला, " राजा, असुक एक आश्रम मोठा असें नाहीं. जो कोणी स्वीकृत आश्रमधर्म पाळतो तो मोठा." राजा ह्मणाला, " आपण ह्मणतां या गोष्टीची सत्यता प्रत्यक्ष प्रमाणानें आपण मला पटवून दिली पाहिजे." राजाचें हें बोलणें यतीनें कबूल करून राजासह तो त्या नगरांतून बाहेर पडला.

याप्रमाणें फिरतांफिरतां ते दुसऱ्या एका मोठ्या राजाच्या नगरांत गेले. तेथें जिकडेतिकडे गर्दी उडून गेली होती. तासे, तर्फे आणि ढोल मोठमोठ्यानें वाजत होते. त्या दिवशीं तेथील राजकन्येचा स्वयंवरसमारंभ होता. मंडपांत उंची पोषाक करून हजारों प्रजाजन जमले होते. हें कौतुक पाहण्यासाठीं आपला राजा व यति हेहि तेथेंच उभे राहिले. याप्रमाणें स्वयंवर करण्याची चाल पुरातनकाळीं आर्यावर्तांत होती. प्रत्येक राजकन्या आपल्या पसंतीप्रमाणें वराची निवड करीत असे. कोणी राजकन्या उत्तम रूपावर लुब्ध होत असे, तर दुसरी एखादी अप्रतिम शौर्याची चहाती असे. आसपासचे सर्व राजपुत्र अशा समारंभास यावयाचे व त्यांतून एकाला कन्येनें आपल्या पसंतीनें वरावयाचें, अशी पद्धत होती. राजकन्येला तिची सखी प्रत्येक राजपुत्राचे गुण सांगत तिच्याबरोबर फिरत असे. असें होतां होतां जो राजपुत्र कन्येच्या पसंतीस उतरे त्याला ती माळ घालीत असे.

आपला राजा व यति ज्या नगरांत आले होते तेथील राजकन्या अप्रतिम लावण्यवती होती. तसेंच त्या राजास पुत्रसंतान नसल्यामुळें राजाच्या पाठीमागें सर्व राज्यहि त्याच्या जांवयासच मिळावयाचें होतें. ही राजकन्या अप्रतिम रूपाची चहाती असल्यामुळें आपला पति अतुल सौंदर्यवान् असावा अशी तिची इच्छा होती. हजारों लोक व देशोदेशचे राजपुत्र त्या ठिकाणीं जमले होते. राजकन्या त्या सभामंडळींत सखीसह फिरूं लागली. कित्येक राजपुत्रांस व इतरांस तिनें पाहिलें परंतु कोणीच तिच्या पसंतीस उतरेना. मोठ्या आशेनें जम-

लेल्या त्या राजपुत्रांचा आशाभंग झाला. शेवटीं स्वयंवर न होतांच सभा विसर्जन होते कीं काय अशी सर्वांस भीति वाटूं लागली. अशा समयीं एक संन्यासी तेथें आला. सूर्यालाहि लाजविणारी कांति त्याच्या मुखावर झळकत होती. त्याला पाहतांच राजकन्येनें त्याच्या गळ्यांत माळ घातली. परंतु संन्याशानें तत्क्षणींच ती माळ गळ्यांतून काढून दूर फेंकून दिली व ह्मटलें "राजकन्ये, मी संन्याशी आहें हें तुला दिसत आहेना ? मला लग्न करून काय करावयाचें आहे ?" त्याचें भाषण ऐकून तिच्या बापाला असें वाटलें कीं संन्यासी भिकारी असल्यामुळें राजकन्येशीं लग्न करण्यास भीत असेल. तो त्या संन्याशाला ह्मणाला, "माझ्या मुलीबरोबरच आपण अर्ध्या राज्याचेहि मालक आतांच होणार आहां व माझ्या पश्चात् सर्व राज्य आपणासच मिळणार आहे." राजानें असें ह्मणतांच राजकन्येनें ती माळ पुनः यतीच्या गळ्यांत घातली. परंतु संन्याशानें ती पुनः काढून फेंकून दिली व ह्मटलें "राजा, लग्न करणें हा माझा धर्म नव्हे." असें ह्मणून तो यति झपाट्यानें तेथून निघून गेला. परंतु त्याच्या दर्शनानें राजकन्या अत्यंत मोहित झाली होती, ती ह्मणाली "लग्न करावयाचें तर याच्याशींच करीन अथवा तशीच मरून जाईन." असें ह्मणून ती त्याच्या मागोमाग जाऊं लागली.

ह्या सर्व प्रकार आपला राजा व संन्यासी पाहत होते. संन्यासी राजास ह्मणतो, "राजा, आपणहि या दोघांच्या मागें जाऊन काय चमत्कार होतो तो पाहूं." संन्याशानें असें ह्मणतांच आपला राजा व संन्यासी त्या दोघांच्या मागें थोड्या अंतरावर चालूं लागले. चालतां चालतां तो संन्यासी बऱ्याच अंतरावर गेल्यानंतर त्यास एक घोर अरण्य लागलें. त्या संन्याशानें त्या अरण्यांत प्रवेश केला. त्याच्या मागोमाग आलेली राजकन्याहि त्या अरण्यांत शिरली. हें पाहून आपला राजा व संन्याशी हे दोघे त्यांच्या मागोमाग त्या अरण्यांत शिरले. हें अरण्य त्या पहिल्या संन्याशाच्या चांगल्या माहितीचें असल्यामुळें त्यांतील सर्व आडवाटा त्यास अवगत होत्या. त्यांपैकीं एका आडवाटेनें जाऊन तो संन्यासी दिसेनासा झाला. त्या बिचाऱ्या राजकन्येस त्याचा कोठें मागमूसहि लागेना; तेव्हां ती भयभीत होऊन एका वृक्षाखालीं बसली. तिला तिच्या पित्याचें स्मरण होऊन ती अश्रु ढाळूं लागली. इतक्यांत आपला राजा व संन्यासी हे त्या ठिकाणीं आले व तिला ह्मणाले, "राजकन्ये, भिऊं नको. या अरण्यांतून आह्मी तुला सुरक्षित बाहेर नेऊन तुझ्या पित्याच्या स्वाधीन करूं. परंतु आतां

काळोख होऊं लागल्यामुळें मागें फिरणेंहि सुरक्षित नाहीं. या शेजारच्या मोठ्या वृक्षाखालीं एक रात्र काढून सकाळींच आपण मागें फिरूं." राजकन्येला त्या दोघांचें हें ह्मणणें बरोबर वाटलें व तीं तिघें त्या वृक्षाच्या आश्रयास येऊन बसलीं.

त्या वृक्षावरील एका कोटरांत एका लहान पक्ष्यांचें घरटें होतें. त्यांत तो पक्षी, त्याची मादी व तीन लहान पिलें असें कुटुंब होतें. नरानें घरट्यांतून सहज बाहेर डोकावून पाहिलें तों त्यास हे तीन अतिथी आढळले. तेव्हां तो गृहस्थाश्रमी पक्षी आपल्या पत्नीस ह्मणाला, "प्रिये, आपल्याकडे तीन अतिथी आल्याचें दिसतें. थंडी तर मी ह्मणते! आणि आपल्या घरांत विस्तव नाहीं!" असें ह्मणून तो पक्षी बाहेर उडून गेला व एक जळत्या लांकडाचा तुकडा चोंचींतून आणून त्यानें त्या तिघांपुढें टाकला. तो घेऊन व जवळ पडलेला पाचोरा त्यावर घालून त्यांनीं शेकोटी तयार केली. परंतु त्या पक्ष्याचें येवढ्यानें समाधान झालें नाहीं. तो पुन्हां ह्मणाला, "हे तर बिचारे उपवासी दिसतात! यांस खावयास देण्यासारखें आपल्या घरांत कांहीं नाहीं. प्रिये, आपण गृहस्थाश्रमी आहों आणि क्षुधार्त अतिथि आला असतां त्याला विमुख परत लावणें आपला धर्म नव्हे. आपणाजवळ जें कांहीं असेल तें त्यास द्यावें. माझ्याजवळ माझा देह मात्र आहे. तोच मी त्यांस अर्पण करतों." असें ह्मणून त्यानें त्या पेटलेल्या आगींत उडी घेतली. हें पाहून त्याची ती स्त्री विचार करूं लागली कीं, "एवढासा लहान पक्षी खाऊन त्या तिघांची तृप्ति कशी होईल? माझ्या पतीच्या मार्गानें जाऊन त्यांची तृप्ति करणें माझें कर्तव्य आहे." असें ह्मणून तिनेंहि त्या आगींत उडी टाकिली. हें सर्व कृत्य तीं पक्ष्याचीं तीन पिलें पाहत होतीं. तींही आपल्या मनाशीं विचार करूं लागलीं कीं, "अजूनहि या आपल्या पाहुण्यांची तृप्ति होईलसें वाटत नाहीं. आईबापांच्या मागें त्यांची तरतूद ठेवण्याचें काम आमच्याकडे आलें आहे." असें ह्मणून त्या तीघांनींही आगींत उडी घेतली.

हें सर्व कृत्य पाहून तीं तिघेंहि थक्क होऊन गेलीं. दिवस उगवल्यानंतर तीं सर्व अरण्याच्या बाहेर आलीं. राजा व संन्यासी यांनीं राजकन्येला तिच्या बापाकडे पोहोंचविलें. नंतर संन्यासी राजाला ह्मणाला, "राजा आपलें कर्तव्य करणारा कोणत्याहि परिस्थितींत असला तरी तो मोठाच समजावा. जर गृहस्थाश्रमधर्म स्वीकारण्याची तुझी इच्छा असेल तर त्या पक्ष्याप्रमाणें परहितासाठीं आपल्या देहावरहि पाणी सोडण्यास तुला तयार असलें पाहिजे. तसेंच संन्यस्त व्हावें असें तुला वाटत असेल तर त्या संन्याशाप्रमाणें राज्यलक्ष्मी आणि रती-

लाहि लाजविणारी स्त्री हीं उपेक्ष्य मानण्याची तुझी तयारी असली पाहिजे. परहितासाठीं देहाचीहि आहुती देण्याची गृहस्थाची तयारी असली पाहिजे. ज्याला संन्यासी व्हावयाचें असेल त्यानें रूपवती स्त्री, पैसा आणि सत्ता यांकडे ढुंकूनहि पाहूं नये. जो तो आपपल्यापरी मोठाच आहे. ज्याचें जें कर्तव्य तें त्यानें करावें. "**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।**" हेंच खरें धर्मरहस्य.

प्रकरण ३ रें.

कर्मरहस्य.

दुसऱ्याच्या अडचणी दूर करण्यासाठीं आपण अंगमेहनत करणें हें खरोखर थोरवीचें लक्षण आहे; परंतु परक्याची अडचण ज्या मानानें अधिक महत्वाची असेल, व ज्या मानानें मदतीचे परिणाम अधिक काल टिकणारे असतील त्या मानानें मदत करणाराची थोरवीहि अधिक होईल हें उघड आहे. आपण एखाद्याची एखाद्या घटकेपुरती अडचण निवारण केली तर आपण त्यास मदत केली हें कृत्य चांगलें तर खरेंच; परंतु जर आपण एक वर्षापुरती त्याला मदत केली तर त्या मानानें आपल्या मदतीचें श्रेयहि अधिक झालें हें उघडच आहे. त्याचप्रमाणें जर आपण त्याची एखादी चिरकालिक अडचण दूर केली, तर खरोखर त्या मदतीचें मापहि करतां येणार नाहीं ! आपलें अनंत कालाचें दुःख सर्वथैव नष्ट करण्याचें सामर्थ्य एकट्या अध्यात्मविद्येंतच आहे. याचसाठीं '**अध्यात्मविद्या विद्यानाम्**' असें ह्मणून भगवान् श्रीकृष्णांनीं त्या विद्येला प्रत्यक्ष परमेश्वराच्या पायरीस पोहोंचविलें आहे. दुसऱ्या कोणत्याहि विद्येचें सामर्थ्य कांहीं थोड्याशा कालापलीकडे जात नाहीं. मनुष्यदेहांत सदैव वास करणाऱ्या इच्छा व आशा व त्यांमुळें उद्भवणारी अतृप्ति यांचा समूळ नाश करून त्याला स्वानंदसाम्राज्यपदीं आरूढ करणें हें सामर्थ्य एकट्या अध्यात्मविद्येचेंच आहे. असें आहे तर अध्यात्मज्ञानदाना इतकें मोठें पुण्यकृत्य दुसरें कोणतें असणार आहे? '**य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति। भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः॥**'

अशी अध्यात्मज्ञानदानाची थोरवी भगवंतांनीं स्वतः वर्णिली आहे ! परमार्थमार्ग दाखविणारे महात्मे हेच मानवजातीचे खरे हितचिंतक होत. अशा महात्म्यांच्या ठिकाणीं अनुपमेय सामर्थ्य वास करित असल्याचें आपणास आढळून येतें.

या जगांत आपण जें जें कांहीं करतों तें आपल्या चिच्छक्तीच्या बळावर करतों. या शक्तीवांचून नुसता देह ह्मणजे केवळ मातीचा गोळा आहे. याकरितां स्वतःच्या या शक्तीचें काय सामर्थ्य आहे याची पूर्ण जाणीव ज्याला उत्पन्न झाली आहे, असा मनुष्य कोणतेंहि कार्य नेटानें पार पाडण्यास लायक असतो. मग तें कार्य लौकिक असो अथवा वैयक्तिक असो, अगर दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचें असो. ज्या मनुष्याला आपणांत सदैव वास करणाऱ्या या शक्तीची जाणीव झाली नाहीं तो संसार आणि परमार्थ या दोहोंतहि निरुपयोगी ठरतो. अध्यात्मज्ञानाच्या खालोखाल उपयोगी असें बौद्धिक ज्ञान होय. वस्त्रदान अथवा अन्नदान याहून बौद्धिकज्ञानदान फार श्रेष्ठ आहे. फार काय सांगावें, पण जीवदानापेक्षांहि ज्ञानदानाचें पुण्य अधिक आहे. कारण पुरुषार्थसंपादन ही जी मानवी-जीविताची इतिकर्तव्यता तिची पूर्ति ज्ञानावांचून होणें नाहीं. ज्यानें कोणताहि पुरुषार्थ संपादिला नाहीं तो जगला आणि मेला सारखाच. अज्ञान आणि त्यापासून उद्भवणारी दुःखपरंपरा यांच्या संगतीनें कसेंबसें आयुष्य ढकलणाऱ्या मनुष्याचें जीवित वस्तुतः कितीशा महत्वाचें आहे बरें ? या दोहोंच्या खालच्या पायरीची मदत ह्मणजे शारीरिक मदत होय. आपल्या अंगबळानें दुसऱ्यास मदत करावयाची व त्याच्या उपयोगी पडावयाचें हेंहि एक प्रकारचें दानच आहे. परक्यांचें दुःख निवारण करण्याकरितां केवळ शारीरिक मदत करणें ह्मणजेच त्याला खरी महत्वाची मदत केल्यासारखें होतें असें समजूं नये. वास्तविक शारीरिक मदत ही अगदीं खालच्या पायरीची आहे; कारण तीपासून होणारा उपयोग केवळ तात्कालिक असतो. त्याला कोणतेंहि चिरकालिक स्वरूप नसतें. भुकेच्या वेळीं कोणाला अन्न दिलें तर त्यावेळेपुरता त्याला आनंद होईल हें खरें, पण पुन्हां लवकरच भूक आणि दुःख हीं परत येणार. हीच गोष्ट आपल्या इतर गरजांसहि लागू पडते. जेथें कसली तरी गरज उत्पन्न झाली तेथें तिच्या पाठोपाठ तिचें लेंकरूं दुःख हें ठेवलेलेंच असतें. जर मला खरोखर सुखी व्हावयाचें असेल तर गरजेच्या पलीकडे मला गेलें पाहिजे. ज्या दिवशीं मला कशाचीहि गरज लागणें नाहींसें होईल त्या दिवशीं मी खरा सुखी होईन. अशा स्थितींत मला भुकेची बाधा होणार नाहीं व जगांतील कोणतीहि स्थिति मला माझ्या पदापासून ढळवूं शकणार नाहीं. अशा प्रकारची स्थिति प्राप्त होण्याजोगी मदत मला मिळाली तर ती अत्यंत श्रेष्ठ प्रकारची मदत होय. तिच्या खालोखाल बौद्धिक आणि अगदीं शेवटच्या पायरीची ह्मणजे शारीरिक मदत होय.

जगांत जें दुःख आढळतें तें नुसत्या शारीरिक मदतीनें कधींहि नष्ट होणार नाहीं. सध्या जो मनुष्यस्वभाव आपण पाहतों तो सर्व बदलून जाईपर्यंत अनेक प्रकारच्या गरजा उद्भवणार आणि त्या न भागल्या ह्मणजे दुःखप्राप्ति ही होणारच; आणि नुसत्या शारीरिक मदतीनें असल्या दुःखाची निवृत्ति कायमची होणार नाहीं. खऱ्या ज्ञानदानानें चित्तशुद्धि करणें हेंच या रोगावर रामबाण औषध आहे. '**चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रहि न खाती सर्प तया ॥**' अशी चित्तशुद्धीची महती संतांनीं वर्णिली आहे. जगांतील सर्व पाप आणि दुःख यांची उत्पत्ति अज्ञानापासून झाली आहे. खऱ्या ज्ञानप्राप्तीनें ज्या दिवशीं मनुष्यमात्रास आपल्या चैतन्यशक्तीची ओळख पटेल, आणि त्याच्यांत पूर्ण आत्मविश्वास निपजेल, त्या दिवशीं मानवजाति पूर्ण सुखी होईल. त्याच्या अगोदर अशा स्थितीची आशाहि करूं नये. राष्ट्रांतील प्रत्येक घर सदावर्त झालें आणि प्रत्येक घराआड एक एक फुकट दवाखाना झाला तरी मानवजातीची आज आढळणारी दुःस्थिति नाहींशी होणार नाहीं. मनुष्यजातीचा आज दिसून येणारा स्वभाव अगदीं बदलून जाईपर्यंत हीच स्थिति नित्य कायम राहणार.

कर्म हें नित्य केलेंच पाहिजे असें श्रीकृष्णांनीं गीतेंत जागोजाग सांगितलें आहे. '**कर्मणैवहि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।**' असें भगवान् श्रीकृष्णाचें निश्चित मत आहे. आपल्या प्रत्येक कर्मापासून सुख आणि दुःख यांची मिश्र उत्पत्ति होत असते. तुह्मीं कोणतेंहि काम करा, त्यापासून कोणाला सुख आणि कोणाला दुःख हीं होणारच. ज्यापासून कोणाला सुख नाहीं आणि कोणाला दुःख नाहीं असें एकहि काम करणें शक्य नाहीं. प्रत्येक कर्माच्या पोटीं सुख आणि दुःख यांची मिश्र संतति निपजत असते; आणि असें आहे तरी आह्मांस कर्म हें केलेंच पाहिजे. जर कर्मापासून सुखदुःखाची उत्पत्ति होते तर आपण कर्मच करूं नये ह्मणजे सुखदुःखांच्या द्वंद्वांतून आपण मुक्त होऊं असें कोणास वाटेल तर तो मात्र त्याचा निवळ भ्रम होय. प्रत्येक कर्म ज्या मानानें सुष्ट अथवा दुष्ट असेल त्या मानानें त्यांतून सुखाची अथवा दुःखाची प्राप्ति होते. सत्कर्मापासून सुख आणि दुष्कर्मापासून दुःख निपजतें. तथापि दुःख हें जसें आत्म्याला बद्धक आहे तसेंच सुखहि बद्धकच आहे. सत्कर्मानें सुख होतें ही गोष्ट जरी अनुभवाची आहे तरी तें सुख कर्मापासून नवीन उत्पन्न झालेलें नसतें. तर आपल्याच ठिकाणीं असलेलें सुख सत्कर्मामुळें आपल्या अनुभवास येतें, अशी वस्तुस्थिति आहे. सत्कर्मापासून सुख उत्पन्न होतें हा भ्रम आहे, आणि

हा भ्रम अंशत:हि जोंपर्यंत शिल्लक आहे तोंपर्यंत सुखदु:खाच्या द्वंद्वांतून आत्म्याची मुक्ति होणार नाहीं. यासाठीं ‘ मी अमुक कर्म करतों आणि त्यापासून मला अमुक प्रकारची सुखप्राप्ति होईल ’ ही भावनाच टाकून द्यावी, असें भगवान् श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे. प्राप्तकर्म केलेंच पाहिजे असें आहे तर तें अवश्य करावें; परंतु त्यापासून सुखप्राप्ति होईल ही भावना सोडावी. ‘कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाच न ।’ ‘कर्म करावें परंतु त्यापासून अमुक फळ मिळेल अशी आसक्ति ठेवूं नये ’ असा याचा अर्थ आहे. आतां अनासक्ति ह्मणजे काय याचा आपण विचार करूं.

अनासक्तीनें प्रत्येक कर्म केलें पाहिजे, हें भगवद्गीतेंतील एक मुख्य प्रतिपादन आहे. प्रत्येकानें कर्म हें केलेंच पाहिजे, परंतु फलाची इच्छा न धरितां तें केलें पाहिजे. प्रत्येक प्राण्याला कोणत्या तरी प्रकारचे जन्मजात संस्कार असतात. मनाची तळ्याशीं तुलना केली तर त्यांतील पाण्यावर जसे बारीक बारीक तरंग उठतात तसेच तरंग मनावर एकसारखे उठत असतात. मनाचे तरंग भासेनासे झाले तरी ते कधींहि समूळ नष्ट न होतां गुप्तरूपानें मनांत राहतात व कांहीं कारण घडल्याबरोबर पुन्हा त्यांचा उदय होतो; याच गुप्तरूपास संस्कार अशी संज्ञा आहे. आपण जी जी क्रिया करतों, अथवा जो जो विचार मनांत आणितों, त्या त्या प्रत्येकाचा ठसा मनावर उमटून, तो त्याच्या तळाशीं बुडी मारून बसलेला असतो; व अशा गुप्त स्थितींतहि मनाला चलन देण्याची त्याची क्रिया चालू असते. आपण चालू व्यवहार करीत असतां आपलें जें कांहीं स्वरूप प्रत्ययास येतें, तें या अनेक प्रकारच्या संस्कारांच्या संघटनेनें उत्पन्न झालेलें असतें. या स्वरूपाला नित्यव्यवहारांत आपण स्वभाव असें ह्मणतों.

आतां मी स्वत: ज्या कांहीं स्वरूपानें आपणांस दिसत असेन तें माझें स्वरूप पूर्वसंस्कारांच्या संघटनेपासूनच उत्पन्न झालें आहे. प्रत्येक मनुष्याच्या या स्वभावविशेषास दानत असें नांव आहे. पूर्वसंस्कार चांगले असले तर मनुष्य चांगल्या दानतीचा व वाईट संस्कारांनीं वाईट दानतीचा होतो. एखादा मनुष्य नित्य वाईट शब्द ऐकत असला, मनांत नित्य वाईट विचार घोळवित असला, व नित्य वाईट कृति करित असला तर त्यापासून निघणारे संस्कारहि वाईटच असणार हें उघड आहे; व अशा संस्कारांनीं तयार झालेली दानतहि वाईटच असली पाहिजे. एकाच प्रकारच्या संस्कारांची संवय एकवार मनास जडली ह्मणजे वाईटाचा वाईटपणाहि त्यास दिसेनासा होतो, व अशा मनुष्याच्या हातून

वाईट कामें अगदीं सहजासहजीं घडून येतात. पुढें पुढें तर या संस्कारांचें प्राबल्य इतकें होतें कीं एखादी गोष्ट वाईट आहे असें समजूनउमजूनहि तो मनुष्य ती गोष्ट करण्यास प्रवृत्त होतो. वाईट संस्कारांच्या प्राबल्यापुढें चांगल्या वृत्तीचा जोरच चालेनासा होतो. याचप्रमाणें मनानें चांगलें चिंतणाऱ्या आणि चांगलीं कामें करणाऱ्या मनुष्याचे चांगले संस्कार उत्तरोत्तर अधिक चांगलीं कामें त्याजकडून करवितात. चांगल्या संस्कारांनीं त्याच्या दानतीचें स्वरूप इतकें पक्कें बनून गेलें असतें कीं एखादें वाईट कर्म करण्याचें त्याच्या क्षणभर मनांत आलें तरी त्याचें शरीर तें कर्म करण्यास पुढें सरसावतच नाहीं. इतकी स्थिति झाली ह्मणजे मनुष्याची दानत पक्की झाली असें समजावें.

आपले अवयव आपल्या पाठीखालीं मिटून घेण्याची शक्ति कांसवाला असते. पाठीवर केवढेहि तडाके बसले तरी जसें तें कांसव निग्रहानें आपल्या अवयवांस बाहेर येऊं देत नाहीं, तसें ज्या मनुष्याचें आपल्या इंद्रियांवर स्वामित्व असतें तो मनुष्यहि कांसवासारख्या निग्रहानें आपल्या हातून कोणतेंहि वाईट कर्म घडूं देत नाहीं. 'तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः। इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता॥' असें भगवान् श्रीकृष्णाचें वचन आहे. सदोदित सद्विचार ठेवून सत्क्रिया आचरल्यानें उत्पन्न होणारे संस्कार बळावत जाऊन जी दानत बनते, तिच्या साहाय्यानें इंद्रियनिग्रह करणें फार जड जात नाहीं. या ठिकाणीं इंद्रिय शब्दानें केवळ दृश्य आणि जड इंद्रियांचा निर्देश केला आहे, असें समजूं नये. कारण केवळ जड शरीर जाग्यावरून न हालवितांहि नित्य वाईट गोष्टींचें चिंतन केलें तरी दानत बिघडावयास उशीर लागत नाहीं. यासाठीं कर्मेंद्रियांबरोबरच ज्ञानेंद्रियांचाहि निरोध आवश्यक आहे. हा निरोध पक्का झाला ह्मणजे मनुष्य स्थितप्रज्ञ झाला असें ह्मणतां येईल; आणि स्थितप्रज्ञासच सत्याची भेट होते व तो द्वंद्वातीत होऊन अगदीं सुरक्षित अशा जागीं जाऊन बसतो. त्याच्या हातून कोणतेंहि वाईट कृत्य घडणेंच अशक्य होतें. जगांतील अत्यंत दुष्ट अशा नरपशूंचा गराडा त्याच्या भोंवतीं असला तरी त्याच्या दानतींत यत्किंचित्‌हि बदल होण्याची भीति नको. अशा प्रकारच्या स्थितीला ब्राह्मी स्थिति असें ह्मणतात. ही स्थिति एकदां प्राप्त झाली ह्मणजे पुन्हा कसल्याहि मोहांत न पडतां तो मनुष्य मुक्ताच्या स्थितींत प्रवेश करतो. सर्व योगांचें ध्येय ही मुक्तस्थिति प्राप्त करून घेण्याचें आहे. व प्रत्येकानें दाखविलेले मार्ग जरी निरनिराळे दिसले तरी त्यांचें पर्यवसान एकाच ठिकाणीं होतें. ज्ञानयोगानें बुद्धाला अथवा

भक्तियोगानें येशुख्रिस्ताला जी स्थिति प्राप्त झाली, तीच निवळ कर्मयोगानेंहि एखाद्याला प्राप्त करून घेतां येईल. बुद्ध ज्ञानी असून कर्मयोगी होता व येशुख्रिस्त शुद्ध भक्त होता; परंतु दोघांनाहि एकाच स्थितीची प्राप्ति झाली. ही स्थिति म्हणजे पूर्ण मुक्ताची स्थिति होय. मुक्तावस्था म्हणजे काय, याचा येथें थोडासा खुलासा करणें अवश्य आहे. सुखदुःख, पापपुण्य, सत्कर्मदुष्कर्म, इत्यादि जीं द्वंद्वें आपण नित्य पाहतों त्या द्वंद्वांतून पलीकडे गेलेला तो मुक्त. ज्याप्रमाणें दुःख, पाप आणि दुष्कर्म हीं मुक्तीला विघातक आहेत त्याचप्रमाणें सुख, पुण्य आणि सत्कर्म हीं सुद्धां खऱ्या मुक्तीच्या आड येणारीं आहेत. एकाला लोखंडाच्या सांखळीनें बांधिलें आणि दुसऱ्याला बांधावयास सुवर्णशृंखलेचा उपयोग केला तरी ज्याप्रमाणें त्यांच्या बंधनाचें स्वरूप वस्तुतः सारखेंच आहे, त्याप्रमाणेंच पुण्यकृत्यें करून सुख भोगणारा मनुष्य आणि दुष्कृत्यें करून दुःख भोगणारा मनुष्य हे दोघेही मुक्ताच्या दृष्टीनें सारख्याच योग्यतेचे आहेत. आपल्या पायांत शिरलेला कांटा काढावयास जसा आपण दुसऱ्या कांट्याचा उपयोग करतों व काम झाल्यावर जसे ते दोन्ही कांटे टाकून देतों, तसेंच दुष्कर्मांकडे वळलेलें आपलें मन त्यापासून परत फिरविण्याकरितांच सत्कर्मांचा उपयोग आपणास करावयाचा आहे; तें एकवेळ पक्कें परत फिरलें म्हणजे सत्कर्मांचाहि आपणास कांहीं उपयोग नाहीं; सत्कर्मांपासूनहि आपलें मन आपणास पुढें आंवरावयाचें आहे. कोणतेंहि कर्म करण्याची आवश्यकता न वाटणें हीच अनासक्ति होय. कर्म करा; परंतु त्याचा विशेष असा कोणताच परिणाम मनावर होऊं देऊं नका. ज्याप्रमाणें एखाद्या तळ्याच्या पृष्ठभागावर तरंग येतात व जातात, परंतु त्यामुळें जसा त्या तळ्याच्या शांतीचा भंग होत नाहीं, त्याचप्रमाणें तुम्हीं कर्मे करूनहि आपल्या मनाचा क्षोभ होऊं देऊं नका असें भगवान् श्रीकृष्णांचें सांगणें आहे. हें शक्य तरी आहे काय ? आम्ही कांहीं कर्म केलें तर त्याचें कांहीं सुखदुःख आमच्या चित्तावर राहणारच, हा आमचा नित्याचा अनुभव आहे. असा अनुभव असतांहि आजच्या स्थितींत अशक्य वाटणारी गोष्ट शक्यकोटींत कशी आणतां येईल याचा आतां विचार करूं.

माझ्या नित्यक्रमांत मला शेंकडों मनुष्यें रोज भेटतात आणि त्यांतच एखाद्यावर माझें प्रेम असतें. रात्रीं मी बिछान्यावर पडलों आहें अशा वेळीं दिवसा पाहिलेले सर्व चेहरे मी आठवूं लागलों तर ज्यावर माझें प्रेम आहे त्या मनुष्या-

खेरीज इतरांपैकीं एकहि चेहरा माझ्या ध्यानांत येत नाहीं. याचें कारण असें कीं माझें प्रेम ज्यावर जडलें त्या मनुष्याचा चेहरा माझ्या मनःपटावर पक्का कोरला गेला. ती प्रतिमा माझ्या चित्तांतून सहसा निघून जाऊं नये अशा रीतीनें तेथें ती चित्रित झाली. बाकीचे शेंकडों चेहरे मीं पाहिले, परंतु माझें मन त्यां-विषयीं आसक्त नसल्यामुळें त्या प्रतिमा माझ्या मनावर उमटल्या नाहींत; व त्या न उमटल्यामुळें त्यांचें स्मरण करणें मला अशक्य झालें. केवळ बाह्यदृष्टीनें पाहिलें तर माझ्या नेत्रांतील कनीनिकेवर सर्व चेहरे सारखेच चित्रित झाले होते. असें असतां त्यांपैकीं एकच मला आठवतो आणि बाकीच्यांचें यत्किंचितहि स्मरण कां राहिलें नाहीं ? याचें कारण असें कीं एकाशिवाय बाकीचे चेहरे मी कदाचित् पूर्वी कधींहि पाहिले नसल्यामुळें त्यांच्यासंबंधीं माझ्या मनांत पूर्वग्रह असा कांहींच नव्हता. परंतु प्रेमाच्या मनुष्याची गोष्ट निराळी आहे. त्याला मीं पूर्वीं अनेक वेळां पाहिलें असल्यामुळें त्याच्यासंबंधीं कांहीं पूर्वग्रह माझ्या मनांत अगोदरच होते. त्यामुळें त्या विशिष्ट दिवशीं त्याची प्रतिमा माझ्या चित्तांत शिरतांच तिचे जुने स्नेही तेथें आढळल्यामुळें ती तेथेंच त्यांच्या सहवासास राहिल्यासारखी झाली. त्या मनुष्याबद्दल शेंकडों प्रकारच्या गोष्टी अनेक प्रसंगीं माझ्या कानावरून गेल्या होत्या व शेंकडों मीं माझ्या मनांत स्वतः तयार केल्या होत्या. हा सर्व कल्पनासमूह माझ्या चित्तांत निद्रित होता; व त्या दिवशीं त्या मनुष्याच्या चेहऱ्याच्या प्रतिमेचा आघात माझ्या चित्तावर होतांच तो निद्रित कल्पनासमूह खडबडून जागा झाला, व त्यानें या नव्या पाहुण्याचें प्रेमानें स्वागत केलें. यावरून असें सिद्ध होतें कीं, जी गोष्ट कोणत्या तरी कारणानें माझ्या मनांत घोळत राहते तिचा ठसा तेथें खोल उमटून राहतो व यत्किंचित् आघा-तानें जागृत होतो.

यासाठीं प्रत्येक गोष्ट करतांना तूं ती अलिप्त चित्तानें कर. ती तुझ्या मनांत घोळित बसूं नको असा भगवान् श्रीकृष्णाचा उपदेश आहे. तुझीं कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें एकसारखीं उद्योगरत असतां त्या उद्योगाचा ठसा आपल्या मनावर उमटूं देऊं नको. आपण कोणाच्या घरीं पाहुणे म्हणून गेलों तर तेथील वस्तूं-कडे ज्या बुद्धीनें आपण पाहतों त्याच बुद्धीनें या सृष्टींतील यच्चयावत् पदार्थांचें अवलोकन करावें. तूं एकसारखा उद्योग अवश्य कर; परंतु त्यांत लिप्त होऊं नको. नुसता उद्योग करणें हें बाधक नसून लिप्तपणा हा बाधक आहे. हें दृश्य जग आपल्या नित्य वास्तव्याचें ठिकाण नसून आपल्या प्रवासांतील मधल्या

मुक्कामाची एक जागा आहे. यापूर्वी आपण अनेक ठिकाणीं मुक्काम केला होता; व पुढेंहि अनेक ठिकाणीं मुक्काम करावयाचा आहे. 'ही सर्व सृष्टि आत्म्यामुळें उत्पन्न झाली आहे. सृष्टीपासून आत्मा उत्पन्न झाला नाहीं,' हें सांख्यवचन नित्य लक्ष्यांत बाळगिलें पाहिजे. जीवात्म्याच्या शिक्षणासाठीं ही सारी सृष्टि दृश्य स्वरूपास आली आहे. त्याशिवाय तिचा दुसरा कोणताहि हेतु नाहीं. जीवात्म्याला ज्ञान होऊन त्या ज्ञानाच्यायोगें तो मुक्त व्हावा हाच सृष्टीचा उद्देश आहे. हा सृष्टिरूप ग्रंथ वाचून जीवात्म्यानें ज्ञानी व्हावें व नंतर ग्रंथ टाकून द्यावा; परंतु तसें न करतां आह्मीं आपली स्थिति अगदीं उलटी करून घेतली आहे. आह्मीं स्वतःला स्वतंत्र न समजतां सृष्ट पदार्थांपैकींच एक घटक आहों असें समजतों. जणूं काय देहाकरितां आत्म्याची योजना असून देहाचें संरक्षण करणें आणि त्याला सुखी ठेवणें हेंच आत्म्याचें काम आहे ! एखाद्या खादाड मनुष्याची थट्टा करावयाची असली तर तो जगण्यासाठीं खात नसून खाण्यासाठीं जगतो अशा अर्थाच्या एका इंग्रजी ह्मणीचा उपयोग करतात; परंतु आपली सर्वांची नेहमींची वागणूक पाहिली तर ती वस्तुतः या खादाड मनुष्याच्या वागणुकीहून फारशी उच्च दर्जाची नसते. यामुळें आपल्या साऱ्या आयुष्याची आपण प्रत्यहीं थट्टा करून घेत आहों, हें आपल्या लक्षांत येत नाहीं. आपण सृष्ट पदार्थांपैकींच एक ही भावना पक्की करून घेतल्यामुळें सहोदरत्वाच्या नात्यानें आह्मांस सृष्ट पदार्थांबद्दल लिप्तपणा वाटूं लागतो व या लिप्तत्वाची मिठी एकवार आपणाभोंवतीं पडली कीं ती जीवात्म्यास पक्का बांधून गुलामाप्रमाणें राबविते. 'सदैव कर्म कर' या गीतेच्या अनुज्ञेप्रमाणें आह्मीं सदैव कर्म करीत असतों खरे, परंतु तें मालकासारखें कर्म नसून गुलामाचें कर्म आह्मी करीत असतों. यामुळें कर्मयोगाचें साध्य ह्मणजे मोक्ष यापासून आह्मी दिवसेंदिवस अधिकच लांब जातों.

तुम्हीं स्वतंत्र होऊन कर्म करा हा कर्मयोगाचा मुख्य उपदेश आहे. एकसारखें कर्म करा परंतु त्या कर्माचें पर्यवसान मुक्तींत झालें पाहिजे, हें लक्ष्यांतून जाऊं देऊं नका. आपल्या भोंवतीं शेंकडा नव्याण्णव लोक कार्यरत असल्याचें आपण पाहतों; परंतु ते कोणत्या प्रकारचें कर्म करितात याचा विचार केला तर स्वदेहसुखाच्या अभिलाषाचे बंदे गुलाम होऊन तो सांगेल तें काम हे लोक करीत असतात, असें आपणांस आढळून येईल. अशा प्रकारच्या गुलामगिरीमुळें जगांत जिकडे तिकडे रुदनस्वर ऐकूं येतात. स्वदेह विसरून, त्याच्या सुखाभिलाषाची बुद्धि

बाजूस ठेवून केवळ प्रेमानें प्रेरित होऊन कार्य करा. येथें प्रेम हा शब्द न कळण्याजोगा आहे. पूर्ण स्वतंत्रतेशिवाय खरें प्रेम उत्पन्न होणें अशक्य आहे. तुम्हीं एखाद्याला गुलाम ह्मणून विकत घेतलें आणि हातापायांत बिड्या ठोकून त्यास कामास लाविलें तर, काम केलें पाहिजे ह्मणून तो काम करील; परंतु तुमच्याबद्दल त्याच्या मनांत प्रेम उत्पन्न होणें कधीं तरी शक्य आहे काय ? तसेंच स्वतःच्या इंद्रियांचा जो दासानुदास बनून गेला आहे त्याच्या चित्तांत प्रेमाचा उद्भव होणें शक्य नाहीं. इंद्रियसुखार्थ कोणाचाहि बळी द्यावयास तो मागेंपुढें पाहणार नाहीं. अशा मनुष्यानें केवढालेहि उद्योग केले तरी तात्विकदृष्ट्या खऱ्या कर्मांची योग्यता त्याच्या उद्योगास येऊं शकतच नाहीं. त्यानें स्वतःकरितां केलेले उद्योग असोत अथवा आपल्या आप्तेष्टांकरितां ह्मणून केलेलीं कामें असोत, त्यांची किंमत खऱ्या कर्मांच्या योग्यतेच्या मानानें पाहिली तर जवळजवळ शून्य इतकीच असते. यासाठीं प्रत्यक्ष अथवा परंपरेनें जोंपर्यंत आमचीं कर्में स्वसुखाभिलाषानें प्रेरित होऊन केलीं जात आहेत, तोंपर्यंत तीं कर्में त्या गुलामाच्या कर्मांसारखींच आहेत. खऱ्या प्रेमानें प्रेरित होऊन केलेल्या कर्मांचा मोबदला आपणांस सुखसंवेदनांच्या रूपानें मिळत असतो. ज्यापासून आपल्या चित्तास शांतीचा आणि तज्जन्य सुखाचा लाभ होत नाहीं असें एकहि प्रेमप्रेरित कार्य नाहीं. चिरकालिक चैतन्य, चिरकालिक ज्ञान आणि चिरलिक प्रेम यांचा सदैव एकत्र वास असतो; जणूं काय हीं तिन्ही एकजीवच होऊन गेलीं आहेत. या तिहींपैकीं कोणतेंहि एक तुह्मांस कोठें आढळलें तर बाकीचीं दोन तेथें अवश्य सांपडलींच पाहिजेत. वस्तुतः एकाच मूलरूपाचीं तीं तीन अंगें आहेत. त्या मूलरूपास सच्चिदानंद असें नांव आहे या मूलरूपापैकीं सत् हें आपणांस प्रत्यक्ष सृष्टीच्या रूपानें नटलेलें आढळतें; चित् हें सृष्टपदार्थांच्या ज्ञानाच्या रूपानें दिसतें आणि प्रत्येक सजीव हृदयांत जें प्रेम अंशतः दिसतें त्याची उत्पत्ति आनंदापासून झाली आहे. यासाठीं खऱ्या प्रेमापासून दुःखाची उत्पत्ति संभवतच नाहीं. खरें प्रेम करणाऱ्याला अथवा ज्या वस्तूवर त्याचें प्रेम जडलें आहे त्या वस्तूला त्या प्रेमापासून दुःख होईल ही गोष्ट सर्वथैव अशक्य आहे. हें जर खरें तर प्रेम करणारा आणि त्याचा प्रेमविषय हीं दोघेंहि दुःखांत चूर झाल्याचें आपणांस हरघडी दिसतें, हें कसें असा प्रश्न येथें उद्भवतो. याच्या उत्तरासाठीं जगांत सर्वत्र आढळणारें असें एखादें उदाहरण आपण घेऊं. एका पुरुषाचें एका स्त्रीवर अत्यंत प्रेम असतें; इतकें कीं ध्यानीं, मनीं, स्वप्नीं तिच्या

शिवाय दुसरें त्याला कांहींच दिसत नाहीं. अहाहा! स्वर्गीय प्रेम ! स्वर्गीय प्रेम!! परंतु जरा थांबा. या प्रेमाचें आपण सशास्त्र पृथक्करण करूं ह्मणजे त्याचें खरें स्वरूप आपणांस समजून येईल. तिनें सदोदित जवळ असावें, जवळच उभें राहावें, जवळच खावें आणि प्यावें असें त्यास वाटतें; ह्मणजे तिनें जवळ जवळ या स्वारीचा गुलामच बनून राहिलें पाहिजे. तिला जणूं काय स्वतंत्र अशी कांहीं हालचालच नाहीं. तिच्या तोंडांतून पडणारा प्रत्येक शब्द झेलण्यास हा तयार असतो. या कृतीचा खरा अर्थ ह्मणजे तिला स्वतःचा गुलाम करून हा स्वतः तिचा गुलाम बनतो. आतां या दोन गुलामांच्या प्रेमाचें खरें स्वरूप कितपतसें चिरस्थायी असणार बरें ! ती कोठें क्षणभर बाहेर गेली तर यानें वेड्यावांकड्या कल्पना करून स्वतःस दुःखी करून घ्यावें. मित्र हो, हें खऱ्या प्रेमाचें स्वरूपच नव्हे. इंद्रियजन्यसुखाच्या अभिलाषानें वेडावलेल्या मनुष्याची ती एक लहर आहे. आणि तो बोलून चालून वेडा झालेला असल्यामुळें भ्रमानें तें प्रेम आहे असा त्यास भास होतो आणि त्या लहरीच्या भरांत स्वर्गीय प्रेम ह्मणून तो नाचूं लागून दुसऱ्यासहि आपणासारखाच क्षणभर वेडा करतो. जर याच्या ह्मणण्याप्रमाणें एखादी गोष्ट करण्याचें तिनें नाकारलें तर याची तबियत बिघडली ! खऱ्या प्रेमापासून उद्भवणाऱ्या चैतन्यतरंगांतून दुःख कधींहि आपली वाट काढूं शकणार नाहीं. ज्या ठिकाणीं दुःखाची उत्पत्ति होतांना आढळते तें खरें प्रेमच नव्हे. ती वास्तविक भलतीच कांहीं वस्तु असून भ्रमानें प्रेम ह्मणून तिला आपण कवटाळित असतों. ज्या दिवशीं कोणत्याहि वस्तूवर अथवा प्राण्यावर तुमचें खरें प्रेम जडेल–मग तें स्त्रीवर असो, पुत्रावर असो अगर दुसऱ्या कोणावर असो–त्या दिवशीं तुह्मांस विश्वव्यापी प्रेमाची गुरुकिल्ली सांपडेल व त्याच दिवशीं अलिप्तपणा ह्मणजे काय याचाहि बरोबर उलगडा होईल.

भगवान् श्रीकृष्ण अर्जुनाला ह्मणतात, ‘ न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन । नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥ यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः । मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् । संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥’ याचा भावार्थ असा आहे कीं ‘ मला या जगापासून कांहीं प्राप्त करून घ्यावयाचें आहे ह्मणून मी कर्म करित नाहीं; परंतु या जगावर माझें प्रेम असल्यामुळें त्याच्या बऱ्यासाठीं मी कर्म करतों. मी कर्म न केलें तर हे लोकहि कर्म न केल्यामुळें अनेक प्रकारें नाश पावतील.’ यावरून प्रेम आणि अलिप्तपणा यांची

बरीच कल्पना आपणांस होते. स्वतःला कसलीच इच्छा नसतां केवळ प्रेमानें वश होऊन भगवान् कर्म करतो ह्मणूनच तें कर्म अलिप्तपणानें होतें. त्यांत इंद्रियजन्यसुखाच्या अभिलाषाची यत्किंचित् छटा उत्पन्न झाली कीं अलिप्तता आणि प्रेम या दोहोंचाहि बरोबरच नाश होतो. इंद्रियसुखार्थ प्रेम करणाऱ्या मनुष्याचें लक्ष्य बहुधा जडविषयापलीकडे जात नाहीं. एखाद्या पुरुषाचें अमूक स्त्रीवर प्रेम जडलें असें आपण ह्मणतों; परंतु वस्तुस्थिति पाहिली तर तें प्रेम त्या स्त्रीच्या शरीरावर जडलेलें असतें. तो तिच्या निरनिराळ्या अवयवांचें चिंतन करतो. ह्मणजे प्रेम या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या विकाराचें स्वरूप, जड विषयांत जें आकर्षण नित्य असतें त्या आकर्षणाच्याच स्वरूपाचें आहे. लोखंडाचें जसें लोहचुंबकावर प्रेम असतें, तसेंच मनुष्यांतील प्रेमाचेंहि वास्तविक स्वरूप असतें. यामुळें एखाद्या यःकश्चित् कारणानेंहि अशा प्रेमाचा विपर्यास होऊन त्यांतून दुःखाची उत्पत्ति होते. खऱ्या प्रेमाचें स्वरूप याहून फार निराळें आहे. तें जडविषयाशीं कधींहि संलग्न होऊन राहत नाहीं; तर जडविषयांपलीकडे असलेल्या चैतन्यरूपांत तें एकजीव होऊन राहतें. खरें प्रेम करणारीं अशा प्रकारचीं दोन मनुष्यें हजारों मैलांवर एकामेकांपासून निराळीं असलीं तरी त्यांच्या प्रेमांत अंतर पडत नाहीं; तें कधीं नष्ट होत नाहीं, अथवा त्यांतून दुःखाचीहि उत्पत्ति होत नाहीं.

अशा प्रकारची अलिप्तता स्वतःच्या ठिकाणीं आणणें ही गोष्ट सोपी नाहीं. याचा क्षणोक्षणीं अभ्यास केला तर एक आयुष्य पुरें होईपर्यंत याची प्राप्ति झाली तर होईल; परंतु याची प्राप्ति झाल्याबरोबर खरें प्रेम आणि मुक्ति हीं प्राप्त होतात. सध्या आपणाभोंवतीं पक्केसे दिसत असलेले जगाचे पाश खटाखट तुटून पडतात आणि सृष्टीचें खरें स्वरूप काय आहे याचा आपणांस बोध होतो. आपणांसाठीं शृंखला बनविण्याचें काम सृष्टि सोडून देते यानंतर जें कांहीं आपण करतों त्यांचीं भलींबुरीं फळें आपणांस सेवन करावीं लागत नाहींत. आपल्या कृतीचें फळ गोड आहे कीं कडू आहे, हें पाहण्याची आपणांस जरूरच राहिलेली नसते.

वास्तविक विचार केला तर आपण ज्यांना 'आपले' असें ह्मणत असतों त्यांवर तरी आपलें खरें प्रेम असतें काय? खुद्द आपलें आपल्या मुलांवरील प्रेमहि खरोखर प्रेम या नांवास पात्र नसतें. त्यांत कोठेंना कोठें स्वार्थाचा अंश असतोच. सूक्ष्म विचार करून पाहिलें तर आपली दृष्टि स्वार्थापलीकडे

फारशी कधीं गेलेलीच नसते. 'केवळ लोकांसाठीं, केवळ देशासाठीं' अशी भाषा आपण तोंडानें वापरीत असतां अंतःकरणाच्या अगदीं खोल भागांत कीर्तीची अपेक्षा दडून बसलेली असते. ज्या ठिकाणीं कसल्या तरी प्रकारची फलाशा असते तेथें खऱ्या प्रेमाचा प्रवेशच होऊं शकत नाहीं; आणि जेथें खरें प्रेम नाहीं तेथें अलिप्तता तरी कशी येणार? तसेंच जेथें अलिप्तता नाहीं तेथें मुक्तीहि नाहीं; अशी ही परंपरा आहे. यासाठीं आपण जेव्हां कोणतेंहि कर्म करतों तेव्हां तें केवळ कर्तव्य या दृष्टीनें केलें पाहिजे. त्यांत प्रतिफलाची कोणतीच आशा असतां उपयोगी नाहीं. असें कर्म करण्याची संवय जसजशी पक्की होत जाईल तसतशी आपल्या अंगीं खरी अलिप्तता येईल.

आपल्या इंद्रियसुखाभिलाषाचे आपण नित्य गुलाम असतों असें पूर्वी सांगितलेंच आहे. ज्याप्रमाणें गुलाम होऊन काम केल्यामुळें तें काम फलरूपानें आपणास बाधक होतें, तसेंच आपल्या इंद्रियांवर ताबा चालवून–त्यांचा धनी होऊन–निरपेक्षपणानें केलेलें कर्म, मोक्षदायक होतें. '**वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता।**' असें भगवान् श्रीकृष्णाचें वचन आहे. हक्क आणि न्याय हे शब्द व्यवहारांत आपल्या कानांवरून अनेक वेळां जात असतात; परंतु खऱ्या दृष्टीनें पाहतां या शब्दांना लहान पोरांच्या बडबडीपेक्षां अधिक महत्व कोणी देतोसें दिसत नाहीं. मानवी जातीचा नित्य व्यवहार अवलोकन केला तर तींत मुख्य असे दोन मनोधर्म आढळतात. एक सामर्थ्य आणि दुसरी दया. मनुष्याच्या सामान्य वर्तणुकींत यांपैकीं कोणत्या तरी एका मनोधर्माचें प्राबल्य आढळतें. दया विसरून जेव्हां आपलें सामर्थ्य मनुष्य प्रगट करूं लागतो तेव्हां त्याची स्वार्थबुद्धि अत्यंत बळावलेली असते. अगदीं सामान्य प्रतीच्या मनुष्याचा व्यवहार पाहिला असतां तो आपल्या ठिकाणीं असलेल्या सामर्थ्याचा उपयोग एकसारखा करीत असतो असें आढळून येईल. दया ही क्वचित् आढळणारी चीज आहे. दयाशील अंतःकरण ह्मणजे प्रत्यक्ष स्वर्गच आहे. ज्याच्या अंतःकरणांत दयेचा विपुल सांठा आहे असा मनुष्य खरोखर परम भाग्यवान् आहे. खरी न्यायबुद्धि जगांत फार थोडी आढळते; यासाठीं हक्क आणि न्यायपद्धति यांची रचना दयेच्या पायावर केलेली असावी. आपल्या धर्मबुद्धीच्या वाढीला आड येणारा फार मोठा अडथळा ह्मटला ह्मणजे आपल्या कर्मापासून प्रतिफलाची अपेक्षा करणें हा होय. अशा अपेक्षेमुळें केवळ धर्मबुद्धीची वाढ खुंटते इतकेंच नाहीं, तर तीमुळें आपणांवर अनंत दुःखपरंपराहि

कोसळतात. कोणत्याहि प्रकारच्या फलाची अपेक्षा न करतां कर्म करून तें ईश्वरास अर्पण करणें हा साकार परमेश्वराच्या पूजनाचा अत्यंत श्रेष्ठ असा विधि आहे. आपण देवाला वाहिलेले जिन्नस जसे परत घेत नाहीं तसेंच कर्म करीत असतां तीं सर्व–वरीं अथवा वाईट–परमेश्वरास अर्पण करावीं. कर्म करीत असतां ही गोष्ट नित्य लक्षांत बाळगली तर आपल्या चित्तास हळू हळू तशी संवय लावतां येईल. प्रत्येक कर्म ' कृष्णार्पण ' झटलें ह्मणजे कोणत्याहि मनुष्याकडून प्रतिफळ मिळावें ही इच्छाच आपणांस करतां येत नाहीं. श्रीकृष्ण ह्मणतात **' यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् । यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥'** स्वतः परमेश्वरहि अशाच प्रकारें नित्य कर्म करूनहि फलाची अपेक्षा न केल्यामुळें नित्यमुक्त असतो. अशा रीतीनें कर्म करणारा मनुष्य एखाद्या मोठ्या शहरांतील अत्यंत पापी लोकांच्या वस्तींत राहिला तरी पाप त्याला स्पर्शहि करूं शकणार नाहीं. कमळाचें पान जसें पाण्यांत राहूनहि ओलें होत नाहीं, तसेंच असा मनुष्य प्रत्यक्ष पापकूपांत राहिला तरी त्याला पापाचा स्पर्श होऊं शकत नाहीं. **' ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः । लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥'** असें गीतेंत सांगितलें आहे.

यासंबंधीं महाभारतांतील एक कथानक तुम्हांस सांगतों. कौरव व पांडव यांजमधील युद्ध संपून कौरवांचा निःपात झाल्यावर राज्यपद प्राप्त झालेल्या पांडवांनीं एक मोठा यज्ञ केला. त्या यज्ञांत गोरगरिबांस मोठमोठीं दानें करण्यांत त्यांनीं पाण्यासारखा पैसा खर्च केला. तें दानशौर्य पाहून लोकांनीं तर तोंडांत बोटच घातलें. असा यज्ञ आमच्या ऐकण्यांतहि झाला नाहीं असें जो तो ह्मणूं लागला. तो यज्ञ समाप्त होण्याचे वेळीं एक मुंगुस तेथें आला. त्याचें अर्धें शरीर सुवर्णाचें होतें; व बाकीचें अर्धें नेहमींप्रमाणें साधें होतें. तेथें आल्याबरोबर यज्ञाच्या जागीं जाऊन तो मुंगुस गडबडां लोळूं लागला; व लोळतां लोळतां ह्मणूं लागला, "काय हो, हे लोक किती खोडसाळ आहेत तरी ! मला सांगतात कीं येथें मोठा यज्ञ झाला ! परंतु येथें यज्ञ झाल्याचें कांहींच चिन्ह नाहीं !" लोक ह्मणाले "मूर्खा, येथें यज्ञच झाला नाहीं असें कसें ह्मणतोस ? आज या हस्तिनापुरांत गरीब असा कोणीच राहिला नाहीं. कारण यज्ञांतील दान घेऊन प्रत्येकजण गबर होऊन बसला आहे. असें असतां तूं यज्ञ न झाल्याचें सांगतोस त्या अर्थीं तूं पक्का वेडाच असला पाहिजेस." यावर मुंगुस ह्मणाला, "मी सांगतों ती गोष्ट ऐका. एका लहानशा खेड्यांत एक गरीब ब्राह्मणाचें कुटुंब होतें.

ब्राह्मण, त्याची पत्नी आणि मुलगा व सून अशीं त्या कुटुंबांत चार माणसें होतीं. त्या गरीब ब्राह्मणास जी कांहीं थोडी प्राप्ति अध्यापनामुळें होत असे तींत त्या कुटुंबाचा कसाबसा निर्वाह चाले. अशा स्थितींत एकेवेळीं तीन वर्षें अवर्षण पडल्यामुळें मोठा दुष्काळ पडून त्या बिचाऱ्या ब्राह्मणाच्या यातनांस पारावार नाहींसा झाला. अशा स्थितींत कित्येक दिवस उपवास पडला असतां एके दिवशीं थोडें सातूचें पीठ त्या ब्राह्मणास मिळालें. त्या पिठाचे त्यानें चार भाग केले. त्याच्या भाकरी तयार करून त्या आतां खाणार इतक्यांत दारांत एक अतिथि येऊन उभा राहिला. '**अतिथि देवो भव**' अशी धर्माज्ञा असल्यामुळें तो ब्राह्मण अतिथीस ह्मणाला, 'यावें महाराज, भोजनाची तयारी आहे.' असें ह्मणून त्यानें आपलें ताट त्या अतिथीपुढें ठेविलें. अतिथीनें त्या अन्नाचा एकच घांस करून ह्मटलें, 'भल्या गृहस्था, मी दहा दिवसांचा उपवासी आहें. तुमच्या या थोड्याशा अन्नानें माझी क्षुधा अधिक प्रदीप्त मात्र झाली.' त्या अतिथीचें हें भाषण ऐकून ब्राह्मणपत्नी पुढें येऊन ह्मणाली, 'महाराज, हा माझा भागहि आपण भक्षण करावा.' ब्राह्मणानें तिला तसें न करण्याविषयीं सांगितलें. पण ती धर्मनिष्ठ स्त्री ह्मणाली, 'आपण गृहस्थाश्रमी आहों, त्या अर्थी क्षुधिताला अन्न देणें हा आपला धर्म आहे.' अतिथीनें तेंहि अन्न भक्षण केलें; तरी त्याची क्षुधा शांत होईना. तेव्हां ब्राह्मणपुत्र ह्मणाला, 'महाराज हा माझा भाग घेऊन मजवर अनुग्रह करावा; पित्याच्या धर्माचरणांत सहाय होणें हा पुत्रधर्म आहे.' अतिथीनें तोहि भाग भक्षण केला तरी त्याचें समाधान झालें नाहीं. तेव्हां ब्राह्मणस्नुषेनें आपलाहि भाग त्याला दिला. तो भाग खाऊन अतिथि तृप्त झाला व त्या कुटुंबास आशीर्वाद देऊन चालता झाला. त्याच रात्रीं क्षुधेनें तें सर्व कुटुंब मरण पावलें. तो अतिथि जेवला त्या ठिकाणीं, भाकरीचे कांहीं कण पडले होते त्यांत लोळल्यामुळें माझें अर्धें शरीर सुवर्णाचें झालें हें तुह्मी पाहतच आहां. असाच यज्ञ आणखी कोठें होत असेल तर पाहावा ह्मणून सर्व जगभर मी फिरलों, परंतु असा यज्ञ कोठेंच न झाल्यामुळें माझें अर्धें शरीर अद्यापि सुवर्णाचें झालें नाहीं. येथें मोठा यज्ञ झाला असें ऐकल्यामुळें मी येथें आलों, तरी माझें शरीर अद्यापि सुवर्णाचें झालें नाहीं. यावरून मी ह्मटलें कीं येथें यज्ञ झालाच नाहीं."

मित्रहो, हिंदुस्थानांतील हें सुवर्णयुग आतां काळाच्या पोटांत गडप झालें आहे. आर्यभूच्या पोटीं खरीं पुत्ररत्नें आतां कमीच निपजतात. मी नवीनच इंग्रजी

शिकूं लागलों होतों त्या वेळीं एक इंग्रजी गोष्टींचें पुस्तक माझ्या वाचनांत आलें होतें. त्यांतील एक गोष्ट मला आठवते ती अशीः—एका गांवीं एक मुलगा राहत होता. तो कोठें कामावर लागलेला होता. त्याला मिळणाऱ्या वेतनांतला कांहीं भाग तो आपल्या आईला देत असे; आणि या त्याच्या कृतीचें वर्णन लेखकानें मोठ्या कौतुकानें तीन चार पानें केलें होतें. तुह्मांस खरेंच सांगतों कीं आमच्या हिंदु मुलांस या गोष्टीचें तात्पर्य समजणें फार जड जाईल. 'जो तो आपापल्या पुरता' ही तुमची ह्मण त्यावेळीं मला ठाऊक नव्हती, ह्मणून त्यावेळीं त्या गोष्टीचें महत्व माझ्या ध्यानांत नीटसें आलें नव्हतें; परंतु तें आतां मला समजलें. आईबाप उपाशीं मेले आणि बायकापोरांनीं भीक मागितली तरी स्वतः अजीर्ण होईपर्यंत जेवणारे लोक मला तुमच्या या देशांत प्रथमच आढळले! छे! छे! कोणत्याहि गृहस्थाश्रमी मनुष्यानें असलें राक्षसी ध्येय आपल्या पुढें ठेवूं नये.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून कर्मयोगाचें रहस्य तुमच्या ध्यानांत बरेंच आलें असेल. देहपात होण्याची वेळ आली तरी आश्रमधर्मापासून पराङ्मुख न होतां आणि कसलीहि बडबड न करतां कोणाच्याहि मदतीस पुढें होणें हा कर्मयोगानें सुचविलेला एक महत्वाचा मुद्दा आहे. हजारों लोकांनीं तुह्मांला फसविलें तरी मागणारा कोणी भेटला कीं जवळ असेल तर तें त्यास द्यावयाचें हा तुमचा धर्म आहे. आपल्या दानाचा आपल्या तोंडानें कधींच उच्चार करूं नये, आणि दान घेणाराकडून नुसत्या कृतज्ञतेचीहि अपेक्षा करूं नये. संन्याशापेक्षांहि गृहस्थाश्रम किती कठीण आहे याची तुह्मांस आतां चांगलीच कल्पना झाली असेल. खरा त्यागी होऊन कांहींच न करतां राहणें हें जितकें कठीण आहे, तितकेंच–किंबहुना त्याहून अधिक असें गृहस्थाश्रमधर्मानें राहणें हें आहे.

प्रकरण ४ थें.

कर्तव्य.

कर्तव्य ह्मणजे काय याचा विचार कर्मयोगाच्या विवेचनांत करणें अवश्य आहे. मला कोणतीहि गोष्ट करावीशी वाटली तर तें माझें कर्तव्य आहे कीं नाहीं याचा प्रथम विचार करून नंतर तें कर्म मी करीत असतों. नीतिविषयक कल्पना निरनि-

राळ्या देशांत निरनिराळ्या प्रकारच्या असतात हें मीं पूर्वी सांगितलेंच आहे. त्याच प्रमाणें निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या कर्तव्यविषयक कल्पना प्रचलित असतात. कुराणांत ज्या गोष्टी कराव्या ह्मणून सांगितलें आहे त्या करणें हें माझें कर्तव्य असें मुसलमान ह्मणेल. हिंदु ह्मणेल कीं वेदाची जी अनुज्ञा तें माझें कर्तव्य. तसेंच बायबलांत सांगितल्याप्रमाणें वागणें हें माझें कर्तव्य असें एखादा ख्रिश्चन मनुष्य ह्मणेल. निरनिराळ्या काळीं, निरनिराळ्या देशांत आणि निरनिराळ्या परिस्थितीस अनुरूप अशा कर्तव्याच्या कल्पना प्रचलित असल्याचें इतिहासादि ग्रंथांवरून दिसून येतें. जिचें प्रत्यक्ष स्वरूप अमुक ह्मणून दाखवितां येत नाहीं अशा कोणत्याहि भावरूप कल्पनेची निश्चित व्याख्या सांगणें कठीण आहे. कर्तव्य ही कल्पनाहि अशाच विषयांपैकीं आहे. रोजच्या सामान्यव्यवहारांत घडून येणाऱ्या कारणकार्यांवरून आपल्या कर्तव्याची फक्त कल्पना मात्र आपणांस करतां येते. आपल्या डोळ्यांसमोर ज्या ज्या गोष्टी घडत असतात त्या अवलोकन केल्याबरोबर त्या त्या प्रसंगीं आपलें कर्तव्य काय आहे, याची जाणीव आपोआपच आपल्या ठिकाणीं उत्पन्न होते. हें कदाचित् आपल्या उपजत बुद्धीनें होत असेल अथवा पूर्वानुभवहि कदाचित् याचें कारण असेल. तें कसेंहि असलें तरी ही जाणीव जागृत झाल्याबरोबर मन त्या गोष्टीचा आपोआप विचार करूं लागतें. एखाद्या विशिष्ट प्रसंगीं ज्या प्रकारें वागणें आपलें कर्तव्य आहे असें आज आपल्या मनांत येतें तसाच प्रसंग उद्यां आला तर कदाचित् आजच्या अगदीं उलट वागणें हेंच कर्तव्य आहे असें आपल्या मनांत येण्याचा संभव आहे. कर्तव्य ह्मणजे काय असा प्रश्न केला तर 'आपल्या सदसद्विवेकबुद्धीस अनुसरून वागणें' असें उत्तर सामान्यतः बहुतेकांकडून आपणांस मिळेल. परंतु या उत्तरानें सर्व प्रसंगीं निर्वाह होतो असें नाहीं. उदाहरणार्थः एखाद्या ख्रिस्ती मनुष्याजवळ गोमांसाचा कांहीं पदार्थ असला आणि तो त्यानें कोणा क्षुधार्तास दिला नाहीं अथवा स्वतःहि क्षुधार्त असतां भक्षण केला नाहीं, तर तो ख्रिस्ती मनुष्य स्वतःच्या दृष्टीनें कर्तव्यभ्रष्ट ठरेल. उलटपक्षीं एखाद्या हिंदूजवळ तें गोमांस असलें आणि केवळ भुकेनें जीव गमावण्याची वेळ आली ह्मणूनच त्यानें तें भक्षण केलें अथवा अशा वेळीं दुसऱ्यास दिलें तर आपण कर्तव्यभ्रष्ट झालों असें त्या हिंदूस खचित वाटेल. गाईच्या पूज्यतेसंबंधीं ज्या गोष्टी लहानपणापासून त्यानें ऐकिलेल्या असतात, त्यांचा परिणाम चित्तावर होऊन गोमांस भक्षण करणें ह्मणजे घोर पातक असें त्यास वाटलें तर त्यांत

नवल नाहीं. अठराव्या शतकांत हिंदुस्थानांत ठग या नांवाचे लोक राहत असत. मनुष्यें मारणें हाच त्यांचा जन्मजात व्यवसाय होता. यामुळें खून करणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें प्रत्येक ठगास वाटे. जो सर्वांत अधिक खून करील तो सर्वांत अधिक पुण्यवान् असें ते समजत. एखादा मनुष्य रस्त्यानें जात असतां त्यानें आपली बंदुक रोंखून दुसऱ्या एखाद्या मनुष्याचा प्राण घेतला तर त्याला साहजिकपणें आपल्या कृत्याबद्दल वाईट वाटेल–निदान तसें वाटण्याचा बराच संभव आहे; परंतु तोच एखाद्या पलटणींत शिपाई असला आणि लढाईंत त्यानें वीस मनुष्यें मारलीं तर अशा वेळीं आपण आपल्या जन्मभूमीची मोठीच कामगिरी बजाविली असें वाटून त्यास मोठा आनंद होईल. यावरून केवळ कृत्यावरूनच कर्तव्याचें क्षेत्र निश्चित होत नाहीं. यामुळें अमुक एक कृत्य कर्तव्य आणि अमुक एक अकर्तव्य असें निश्चितपणें सांगतां येणें शक्य नाहीं; तथापि कर्तव्य कशास ह्मणतां येईल याचें विवेचन भावरूपानें करतां येण्याजोगें आहे. ज्या कृत्यानें आपलें हृदय शुद्ध होऊन त्यांत परमेश्वराचा उदय होण्यास अवसर सांपडतो तें पुण्यकर्म असून आपलें कर्तव्य आहे. तसेंच ज्या कृत्याच्या योगानें अंतःकरण मलीन व दुष्ट होण्याचा संभव असतो तें दुष्कृत्य असून त्याज्य आहे असें समजावें. ही पापपुण्याची अथवा कर्माकर्माची भावरूप व्याख्या झाली; तरी हिजवरून अमुक कृत्य करावें अथवा अमुक कृत्य करूं नये असें विधिनिषेधात्मक वचन सांगणें शक्य नाहीं. असें आहे तरी सर्व काळीं, सर्व स्थळीं आणि सर्व धर्मांचें जीबद्दल एकमत झालेलें दिसतें अशी पापपुण्याची एकच व्याख्या आहे. ती '**परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ।**' या संस्कृत उक्तींत उत्तमप्रकारें व्यक्त झाली आहे.

धर्म कोणता आणि अधर्म कोणता याविषयींचें विवेचन भगवद्गीतेंत वर्णधर्मानुसारें केलें आहे. वर्णानुरोधानें प्रत्येकाचे गुणकर्म व मनोधर्म कोणत्या प्रकारचे असण्याचा संभव आहे याचा साधारण निर्णय होतो. यामुळें ज्या परिस्थितींत आणि वर्णांत आपला जन्म झाला असेल त्या वर्णाला त्या परिस्थितींत कोणतीं कर्में अभिमत होतात याचा विचार करून त्यांतून स्वतःला कल्याणप्रद आणि मनःशुद्धिकर अशीं कर्में निवडून काढतां येतात; तथापि सर्व देशांत आणि सर्व काळीं एकाच प्रकारच्या स्थितींतील निरनिराळ्या समाजांत पापपुण्याच्या कल्पना एकसारख्याच असत नाहींत. ही वस्तुस्थिति लक्ष्यांत न आल्यामुळें एक राष्ट्र दुसऱ्याचा द्वेष करतें. अमेरिकन चालीरीतींप्रमाणें

वागणें आपलें कर्तव्य आहे असें एखादा अमेरिकन ह्मणतो. तसेंच एखादा हिंदु आपल्या चालीरीती सर्वोत्कृष्ट असतात, आणि त्या चालींप्रमाणें न वागणारा तो पापी होय असें ह्मणत असतो. अशा प्रकारची चूक तुमच्या आमच्या सारख्या सामान्य मनुष्याच्या हातून होणें साहजिक आहे; तथापि असल्या क्षुल्लक वाटणाऱ्या चुकीचे फार वाईट परिणाम होतात. शिकागो प्रदर्शनांत मी प्रथमच गेलों असतां पाठीमागून एका अमेरिकन गृहस्थानें माझ्या पटक्याचें टोंक धरून ओढलें. मीं मागें वळून पाहिलें तेव्हां त्याच्या पोषाखावरून तो सभ्य गृहस्थ असावा असें मला वाटलें. मीं त्याच्याशीं भाषणास सुरवात केल्याबरोबर मला इंग्रजी भाषा येते असें पाहून तो गृहस्थ फार ओशाळला. त्याच प्रदर्शनांत दुसऱ्या वेळीं एका गृहस्थानें मला धक्का दिला. मीं त्याला तसें करण्याचें कारण इंग्रजींत विचारलें तेव्हां तोहि फार खजील झाला, आणि 'असा पोषाख कां करतां' असें कांहीं पुटपुटत स्वारीनें तेथून पाय काढला. सामान्यतः कोणत्याहि मनुष्याला दुसऱ्या मनुष्याबद्दल वाटणारा आत्मभाव, या गृहस्थांच्या मतें जणूं काय भाषेंत किंवा पोषाखांतच असतो. आरंभीं असल्या गोष्टी अगदीं क्षुल्लक वाटल्या तरी त्यांचे परिणाम कित्येक वेळां फारच वाईट होत असतात. बलिष्ठ राष्ट्रें एखाद्या दुर्बल राष्ट्राचा छळ, कित्येक वेळां याच प्रकारच्या क्षुल्लक कारणासाठीं करीत असतात. केवळ भिन्न चालीरीती पाहून त्यांच्या मनांतील सहानुभूतीचा झरा जणूं काय आटूनच जातो. फार कशाला, माझा पोषाख पाहून बुजलेला गृहस्थ कदाचित् खरोखरच चांगल्या स्वभावाचा असेल; आपल्या आप्तेष्टांशीं व मुलाबाळांशीं तो फार चांगल्या प्रकारें वागत असेल; तसेंच आपलीं इतर लौकिक कर्तव्येंहि तो चांगल्या रीतीनें पार पाडीत असेल; परंतु आपल्या चालीपेक्षां निराळ्या चालीचा पोषाख दृष्टीस पडतांच त्याचा चांगुलपणा एकदम कोठें नाहींसा झाला! मनुष्य परठिकाणीं गेला ह्मणजे तेथील लोकांकडून त्याला अनेक प्रकारचा उपसर्ग पोहोंचतो असें सर्वत्र आढळतें आणि असें होण्याचें कारण पाहिलें तर, त्या त्या देशांतील चालीरीती त्याला माहित नसल्यामुळें, त्याला स्वतःचें संरक्षण करणें दुरापास्त होतें, इतकेंच. पण यामुळें आपल्या देशास परत जातांना परकीयांबद्दल अत्यंत अनिष्ट ग्रह आणि द्वेष तो बरोबर घेऊन जातो. जहाजांवरील खलाशी, सैन्यांतील शिपाई आणि बारीकसारीक व्यापारी परक्या देशांत गेले ह्मणजे किती विक्षिप्तपणें वागतात हें तुह्मांस ठाऊकच असेल. ज्या गोष्टी

स्वतःच्या देशांत करण्याचें त्यांच्या स्वप्नांतहि येणार नाहीं अशा गोष्टी परक्या देशांत ते बिनदिक्कत करतात. युरोपियन आणि अमेरिकन लोकांस चिनी लोक 'परकीय पिशाच्चें' ह्मणतात, तें बहुधा अशा कारणामुळेंच असावें. अमेरिकन अथवा युरोपियन लोकांत असणारे चांगले गुण त्या विचाऱ्यांच्या प्रत्ययासच आले नसावे.

यासाठीं आपली अंतर्दृष्टि जागृत करून परकीयांचें वर्तन त्यांच्या स्वतःच्या चालीरीतीशीं सुसंगत आहे कीं नाहीं हें पाहण्यास शिकलें पाहिजे. आपल्या चालीरीतींवरून परक्यांच्या वागणुकीवर टीका करणें कधींहि इष्ट होणार नाहीं. सर्व सृष्टीनें माझ्या वर्तणुकीप्रमाणें चालावें असा एखादा ताम्रपट मीं मिळविला आहे काय? सारें जग कांहीं माझ्या सुखासाठीं निर्माण झालें नाहीं ही गोष्ट प्रत्येक मनुष्यानें नित्य लक्ष्यांत बाळगून सर्वत्र सहानुभूति ठेविली पाहिजे. भोंवतालच्या परिस्थित्यनुरूप आपल्या कर्तव्याची दिशा बदलते हें ध्यानांत ठेवून विशिष्ट प्रसंगीं स्वतःच्या मनास पवित्र व युक्त वाटेल असें वर्तन ठेवणें हेंच आपलें कर्तव्य आहे. आपला जन्म ज्या परिस्थितींत झाला तिला अनुरूप अशीं कांहीं सामान्य कर्तव्यें लावून दिलेलीं असतात, तीं प्रथम नीट करणें हें आपलें कर्तव्य आहे. तसेंच ज्या समाजांत आपण लहानाचे मोठे झालों त्या समाजाच्या स्थितीस आणि स्वतःच्या दर्जास अनुरूप अशीं कांहीं सामाजिक कर्तव्यें असतात तीं नीटपणें पार पाडणें हें आपलें दुसरें कर्तव्य आहे. असें करीत असतां जो एक मोठा अडथळा आपल्या वाटेंत नेहमीं येत असतो त्याचा आतां विचार केला पाहिजे. हा मोठा अडथळा ह्मटला ह्मणजे आत्मप्रौढी हा होय. आपल्या हातून कधीं कांहीं चूक होत असेल असें आपणांस वाटत नाहीं. आपल्याला याच क्षणीं राज्यावर बसविलें तरी तितकी आपली योग्यता आहेच असें आपणांस नित्य वाटतें. ही भावना नित्य जागृत राहिल्यामुळें आपला आत्मपरीक्षणाचा मार्ग बंद झालेला असतो. एखादें राज्य चालविण्याची पात्रता खरोखरच आपल्या अंगीं असली तरी चालू परिस्थितींत प्राप्त होणारीं कर्तव्यें उत्कृष्ट रीतीनें बजावून आपली पात्रता आपण प्रथम सिद्ध केली पाहिजे. आपण हलक्या दर्जाचे असलों तरी त्या दर्जाचीं कर्तव्यें उत्तम प्रकारें केलीं ह्मणजे वरचा दर्जा आपणांस आपोआप प्राप्त होतो. लौकिक व्यवहाराच्या भोंवऱ्यांत शिरून आपलीं कर्तव्यें आपण करूं लागलों ह्मणजे चोहोंकडून जे धक्केचपेटे आपणांस सोसावे लागतात त्यांमुळें आपली स्वतःची खरी योग्यता काय आहे हें

आपणांस समजतें. आपल्या डोळ्यांवर आत्मप्रौढीची जी धुंदी असते ती अशा धक्क्यांनीं खाड्कन् उतरते. यदृच्छेनें प्राप्त झालेल्या उच्च दर्जाचीं कर्तव्यें उत्तम प्रकारें चालविण्याची एखाद्याला पात्रता नसली तर त्याचा तो उच्च दर्जा फार दिवस टिकून राहणें शक्य नाहीं. ज्याला त्याला त्याच्या योग्यतेनुरूप त्याच्या जागीं बसविणें हें सृष्टीचें कामच आहे. तेव्हां त्याबद्दल रिकामी कुरकुर करून फायदा नाहीं. याकरितां कोणाचीहि खरी योग्यता केवळ त्याच्या दर्जावरून पारखतां येत नाहीं. एखादा मनुष्य हलकें काम करीत असला तर केवळ तेवढ्यावरूनच त्याची योग्यता कमी लेखणें अनुचित आहे. कार्य कसलेंहि असो, तो मनुष्य तें कोणत्या प्रकारें आणि किती उत्साहानें पार पाडतो याचा विचार करणें अवश्य आहे.

या नंतर कर्तव्याविषयींच्या आपल्या कल्पनेंत आणखीहि थोडा बदल केला पाहिजे, असें आपणांस आढळून येईल. अत्यंत निरपेक्षबुद्धीनें प्रेरित असल्याशिवाय कोणतेंहि महत्वाचें काम आपल्या हातून नीटपणें पार पडत नाहीं. असें आहे तरी अमुक एक काम कर्तव्य ह्मणून मला केलें पाहिजे अशी भावना नसेल तर एखाद्या कार्याचा आरंभहि आपणाकडून व्हावयाचा नाहीं; यासाठीं प्रथम कर्तव्य ह्मणूनच एखाद्या कार्यास आरंभ करावयास पाहिजे. व शेवटीं स्वार्थबुद्धीचा पूर्ण नाश होऊन जगांतील हरएक कर्म ह्मणजे परमेश्वराचें प्रत्यक्ष पूजनच आहे असें वाटूं लागलें ह्मणजे खरें निष्काम कर्म आपल्या हातून होऊं लागतें व आपणांस अलिप्तता ह्मणजे काय याचा खरा अर्थ कळतो. अनेक प्रकारचीं स्वार्थी कर्में अनंतकालापासून आपण करीत असल्यानें आपल्या ज्ञानमय मूलरूपावर अज्ञानाचा जो दाट पडदा पडला आहे तो नाहींसा करून आपल्या ज्ञानस्वरूपास पूर्णपणें व्यक्त होण्यास अवसर करून देणें हेंच सर्व योगमार्गांचें ध्येय आहे; व कर्मयोगाचें तरी वास्तविक रहस्य हेंच आहे. ज्ञानदृष्ट्या आपण आपल्या चालू स्थितींत अगदीं खालच्या दर्जाचे लोक आहों, व जीं कर्में स्वसुखासाठीं ह्मणून आपण करितों त्यांत आपल्या शक्तीचा व्यर्थ व्यय फार होऊन आपल्याभोंवतीं असलेल्या जाळ्यांत अधिकच गुंतागुंत होत जाते. अशी गुंतागुंत न होतां पहिल्या जाळ्याचीं बंधनें हळूहळू ढिलीं कशीं करावयाचीं व शेवटीं अज्ञानरूपी जाळ्यांतून आपणांस कसें मुक्त करून घ्यावयाचें हें रहस्य कर्मयोगानें आपणांस प्राप्त करून घ्यावयाचें आहे. कर्तव्य ह्मणून कोणतेंहि कार्य आरंभिलें ह्मणजे त्याच्या पूर्ततेकरितां हलक्या प्रतीच्या सुखकल्पनांवर आपणांस पाणी सोडावें

लागतें. प्रथम लहानसान सुखें सोडावयास आपण तयार झालों ह्मणजे संवयीनें आपली कर्तव्याची कल्पना अधिक विस्तृत होऊन मोठ्या सुखाच्या कल्पनाहि हळुहळू विराम पावूं लागतात. ज्या मूळतत्वांवर सांप्रतची समाजाची रचना झाली आहे तीं तत्वेंहि याच स्वरूपाचीं आहेत. मनुष्यप्राणी संघ अथवा समाज करून राहूं लागला ह्मणजे त्याच्याभोंवतीं कांहीं सामाजिक बंधनें आपोआपच उद्भवतात. त्यामुळें त्याचा उच्छृंखळपणा आपोआप नाहींसा होतो. तसेंच केवळ स्वतःच्या सुखापुरताच उद्योग करावयाचा ही त्याची पशुबुद्धि हळुहळू कमी होत जाते. इतरांसाठींहि कांहीं तरी कर्तव्य ह्मणून मला करावयाचें आहे ही जाणीव त्याच्या ठिकाणीं उद्भवते; व शेवटीं स्वतःच्या एकाच देहाशीं संलग्न असणारा आकुंचितपणा टाकून देऊन विश्वव्यापक व्हावयाची संधीहि सध्यांच्या समाजरचनेंत त्यास प्राप्त होते. अशी ही समाजरचना कोणीं जाणूनबुजून निर्माण केली असेल अथवा अनंतकालाच्या अनुभवानें तीस हें स्वरूप प्राप्त झालें असेल. तें कसेंहि असलें तरी सांप्रतच्या समाजरचनेचें स्वरूप वर दाखविल्याप्रमाणें झालें आहे ही गोष्ट खरी.

केवळ कर्तव्य ह्मणून कोणतेंहि काम करावयाचें ह्मटलें ह्मणजे तो मार्ग अगदीं अकंटक नाहीं असा आपणांस अनुभव येऊं लागतो. ज्या मनुष्याबद्दल आपल्या मनांत यत्किंचित्हि प्रेमबुद्धि नाहीं अशा मनुष्यासाठीं एखादें काम कर्तव्य ह्मणून करण्याची वेळ आली ह्मणजे आपल्या मनाची स्थिति कशी होते ती अनुभवानेंच जाणिली पाहिजे. गाडीच्या चाकाला वंगण नसलें ह्मणजे प्रत्येक फेरीला जसें तें कर्णकटु आवाज काढितें तसेंच आपलें मनहि अशा प्रसंगीं हरघडी आपणाशीं भांडूं लागतें. केवळ प्रेमाच्या वंगणानें हें कर्मचक्र सुरळीत चालतें. हें वंगण मनुष्याजवळ नसतें तर आईबाप मुलांसाठीं ज्या खस्ता खातात, पुरुष पत्नीसाठीं जो स्वतःला प्रसंगीं विकूनहि घेतो तें त्यानें केलें असतें काय ? जेथें प्रेमाचा अभाव असतो, अशा एखाद्या कुटुंबांत होणारे तमाशे आपण नेहमीं पहातोंच. केवळ प्रेमामुळेंच आपला कर्तव्यमार्ग सुखकर होतो; आणि प्रेमाचा प्रवाह ज्या मानानें अनिरुद्ध व स्वतंत्रपणें चालेल त्या मानानें तो अधिक अधिक विस्तृत व खोल होत जातो. येथें अनिरुद्धता–स्वतंत्रता–ह्मणजे काय याचा विचार केला पाहिजे. इंद्रियजन्य सुखासाठीं त्यांचा गुलाम होऊन राहणें, क्रोधास वश होणें व व्यवहारांत नित्य उद्भवणाऱ्या हजारों विकारांस बळी पडणें हें स्वातंत्र्य आहे काय ? अगदीं

खालच्या पायरीच्या मनुष्याच्या दृष्टीनें स्वातंत्र्याचा असाच अर्थ असतो असें वाटतें. त्याच्या इंद्रियजन्यसुखतृप्तीच्या आड कांहीं आलें तर तो आपलें स्वातंत्र्य गमावलें ह्मणून शेंडी उपटण्याच्या बेतास येतो; पण वास्तविक विचार केला तर हें स्वातंत्र्यहि नव्हे आणि ही अनिरुद्धताहि नव्हे. अशा प्रसंगीं सहनशीलता दाखविणें हें खरें स्वातंत्र्य प्रगट करणें होय. परक्यासाठीं स्वतःच्या क्रोधादि भावनांवर ज्याचा पूर्ण ताबा चालतो तो परतंत्र नसून स्वतंत्र आहे–गुलाम नसून धनी आहे–असें समजावें. पतीनें एखादी गोष्ट अपल्या मनासारखी केली नाहीं असें वाटतां क्षणींच स्वातंत्र्य गेलें ह्मणून ओरड करणारी स्त्री स्वतःच्या क्षुद्र मनोविकारांची पक्की दासी बनलेली असते. तिला खऱ्या स्वातंत्र्याची प्राप्ति स्वप्नांतहि शक्य नाहीं. आपल्या स्त्रीस सदोदित नांवें ठेवीत असलेल्या पुरुषाचीहि स्थिति वास्तविक अशीच आहे. केव्हांहि परद्वार न करणें हें स्त्रीपुरुषाचें पहिलें कर्तव्य आहे. खऱ्या पतिव्रतेच्या प्रेमाचा प्रभावच असा आहे कीं पुरुष कितीहि बिघडला असला तरी तिच्या अमृततुल्य मधुर वाणीनें तो सन्मार्गवर्ती झाल्यावांचून राहणार नाहीं. स्त्रीच्या शुद्ध आणि क्षमाशील वर्तनानें ज्याचें हृदय यत्किंचितहि द्रवणार नाहीं, इतका पशुतुल्य मनुष्य क्वचितच असेल. खरोखर, जग अद्यापि इतकें बिघडलेलें नाहीं. पुरुष जात भ्रष्ट व पशुतुल्य झाली आहे अशी ओरड आपण सर्वत्र ऐकतों, परंतु स्त्रियांच्या संबंधानें विचार केला तर बऱ्याच स्त्रियांवरहि हा आक्षेप लागू होणार नाहीं काय? स्त्रिया तोंडानें बोलून दाखवितात तितक्या जर त्या खरोखर पवित्र असत्या तर सर्व जगांत एकहि वाईट पुरुष सांपडताना; याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. पावित्र्याला अजिंक्य असा एकहि दुर्गुण जगांत नाहीं. स्वतःच्या पतीशिवाय इतर सर्व पुरुषांकडे केवळ पुत्रदृष्टीनें अवलोकन करावयाचें इतकी जिची दृष्टि पवित्र झाली आहे तिला भ्रष्ट करण्याला चंग बांधून कोणी आला तरी तिच्या समोर आल्याबरोबर त्याचे अपवित्र विचार मावळून तो तिजकडे केवळ मातृभावानेंच अवलोकन करील. पतिव्रता अनसूयेच्या गोष्टीचें तात्पर्य हेंच आहे. त्याचप्रमाणें स्वतःच्या पत्नीशिवाय इतर सर्व स्त्रीजातीकडे केवळ मातृभावानें अगर भगिनीभावानें अवलोकन करावयाचें असें पुरुषानें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. तसेंच धर्मज्ञान देण्याचें ज्यानें पत्करिलें असेल त्यानें सर्व स्त्रियांस मातेसमान पूज्य मानून तदनुरूप प्रत्येक स्त्रीशीं आपलें वर्तन ठेविलें पाहिजे.

—

मातृत्व हें सर्व जगांत अत्यंत श्रेष्ठ असें मानिलें आहे. स्वार्थ अथवा आपलपोटेपणा विसरावयास शिकावयाचें असेल तर तें मातेपाशीं शिकावें. ईश्वरीप्रेमावांचून दुसरें कोणतेंहि जगांतील प्रेम मातृप्रेमापेक्षां श्रेष्ठ नाहीं. मातृप्रेमाहून प्रेमाचे इतर सर्व प्रकार निःसंशय हलक्या प्रतीचे आहेत. स्वतःच्या सुखाकडे न पाहतां आपल्या मुलांच्या सुखाकडे प्रथम लक्ष्य पुरविणें हें मातेचें आद्यकर्तव्य आहे. मुलांच्या सुखाकडे प्रथम लक्ष्य न पुरवितां जीं आईबापें स्वसुखार्थ अत्यंत दक्ष असतात तीं जवळ जवळ पशुपक्ष्यांच्या कोटींत बसविण्यास योग्य आहेत असें समजावें. पिलांना पंख फुटून तीं स्वरक्षणास योग्य झालीं ह्मणजे ज्याप्रमाणें आईबाप व पिलें हीं परस्परांची ओळख विसरतात त्याचप्रमाणें मुलें मोठीं व मिळवितीं झालीं ह्मणजे आईबापांनीं घालून दिलेला धडा गिरवून वृद्ध मातापित्यांकडे तीं दुर्लक्ष्य करितात. परमेश्वराचें सृष्टीवरील प्रेमच स्त्रीरूपानें उद्भवलें आहे असें ज्या पुरुषास वाटतें तो पुरुष धन्य होय ! परमेश्वराचें पितृत्व पुरुषरूपानें व्यक्त झालें आहे असें ज्या स्त्रीस वाटतें ती स्त्री धन्य होय ! आणि मातापितरें हीं खचित परमेश्वररूपेंच आहेत असा ज्या मुलांचा निश्चय आहे तीं मुलेंहि धन्य होत !

आत्मविकासाचा निश्चित मार्ग ह्मटला ह्मणजे प्राप्तकर्तव्यें निश्चयानें पार पाडण्यास प्रथम शिकलें पाहिजे. अशीं कर्तव्यें करीत असतां निश्चय पक्का होत गेला ह्मणजे आत्मश्रद्धा व निश्चयाचें बळ हीं वाढत जातात व त्यांमुळें स्थितप्रज्ञाची स्थिति प्राप्त होते. याविषयीं महाभारतांत एक कथा आहे ती मी आपणांस सांगतों. एकेवेळीं एक तरुण संन्यासी अरण्यांत तप आचरीत होता. बरींच वर्षे योगसाधन केल्यानंतर एके दिवशीं तो एका वृक्षाखालीं बसला असतां वरून कांहीं वाळलेलीं पानें व काटक्या त्याच्या अंगावर पडल्या. तेव्हां त्यानें वर पाहिलें तों दोन पक्षी भांडत असलेले त्याच्या दृष्टीस पडले. त्यांजकडे पाहून संन्याशास क्रोध येऊन तो ह्मणाला, ‘अरे, मी खालीं बसलों असतां मला त्रास देण्यास तुमची छाती तरी कशी झाली ?’ असें ह्मणून मोठ्या क्रोधानें त्या पक्ष्यांकडे त्यानें अवलोकन केलें. त्यावेळीं त्याच्या ठिकाणीं असलेलें योगसामर्थ्य अग्निज्वालेच्या रूपानें प्रगट होऊन क्षणार्धांत ते बिचारे पक्षी जळून भस्म झाले ! स्वतःच्या तपःसामर्थ्याची ही प्रतीति पाहून त्या योग्यास मोठा हर्ष झाला. कांहीं वेळानें तो नेहमींप्रमाणें भिक्षा मागण्यास गांवांत गेला. गांवांतील एका घरीं जाऊन ‘माई, भिक्षा लाव’ असा त्यानें पुकारा केला. ‘बावाजी,

जरा धीर धरा.' असा आंतून आवाज आला. संन्यासी मनांतल्या मनांत फार संतप्त होऊन ह्मणाला 'अग भिकारडे, मला वाट पहायला लावतेस काय? तुला अद्यापि माझ्या सामर्थ्याचा प्रभाव कळला नाहीं ह्मणून तूं इतकी उद्दाम झालीस अं!' अशा प्रकारें तो मनांत विचार करीत आहे इतक्यांत आंतून पुन्हां आवाज निघाला. 'यतिराज, इतका अहंकार असणें अनुचित आहे. मी रानांतील पक्षी नव्हें." हे शब्द ऐकून संन्यासी अगदीं चकित झाला. परंतु तेथून निघून न जातां तो तसाच वाट पाहत उभा राहिला. आणखी कांहीं वेळ गेल्यानंतर आंतून बोलणारी स्त्री भिक्षान्न घेऊन आली. तिजकडे पाहून मनांत ओशाळलेला तो संन्यासी तिला वंदन करून ह्मणाला 'माते, रानांतील हकीगत तुला कशी समजली?' ती स्त्री ह्मणाली, 'माझ्या मुला, तुझा योगबीग मला कांहीं समजत नाहीं. अगदीं सामान्यप्रतीची अशी मी एक स्त्री आहें. माझे पति थोडेसे आजारी असल्यामुळें त्यांची शुश्रूषा मी करीत होतें, इतक्यांत तूं आलास. त्यामुळें त्यांचें पथ्यपाणी होईपर्यंत तुला थांबावयास सांगणें मला भाग पडलें. माझ्या पत्नित्वाचीं कर्तव्यें उत्तम तऱ्हेनें पार पाडावीं इतकेंच मला समजतें. आणि आजपर्यंत सर्वजन्म मी तेवढेंच करीत आहें. माझें लग्न झालें नव्हतें तेव्हां कन्या या नात्यानें माझ्या मातापितरांची मीं सेवा केली. लग्न झाल्यापासून माझ्या प्रिय पतीची सेवा मी करीत आहें. माझें योगसाधन ह्मणशील तर इतकेंच. मला सध्या जें कांहीं थोडेंबहुत ज्ञान प्राप्त झालें आहे तें या सेवेमुळेंच होय. त्या ज्ञानानेंच रानांतील सर्व इतिवृत्त मला कळलें. तुला याहून कांहीं अधिक जाणण्याची इच्छा असली तर...गांवीं एक व्याध असतो त्याची भेट घे ह्मणजे तुझी इच्छा तृप्त होईल. बाजारांत चवाठ्यावर त्याचें दुकान आहे.' व्याधाचें नांव ऐकून तो तरुण संन्यासी मनांत प्रथम थोडा खजील झाला; परंतु त्यावेळेपर्यंत जें कांहीं त्याच्या अवलोकनांत आलें होतें, त्यामुळें उत्पन्न झालेली त्याची जिज्ञासा त्याला स्वस्थ बसूं देईना. तो तेथून निघून त्या स्त्रीनें सांगितलेल्या गांवीं गेला व बाजारांत जाऊन त्या व्याधाचें दुकान त्यानें शोधून काढलें. दुकानांत एक भला लठ्ठ व्याध हातीं मोठा सुरा घेऊन बसला आहे व मांसाचा विक्रय करीत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्याला पाहून संन्यासी मनांत ह्मणाला, 'देवा! आतां या खाटकापासून ज्ञानप्राप्ति होणार! हा तर निव्वळ यमदूत दिसतो.' तो असा विचार करीत आहे, इतक्यांत त्या व्याधाचीहि नजर संन्याशाकडे जाऊन त्यानें ह्मटलें, "स्वामी महाराज, आपणास...गांवच्या एका

स्त्रीनें मजकडे पाठविलें आहे, नाहीं बरें ? आपण कृपा करून जरा थांबा. थोड्या वेळानें दुकान बंद करून आपण घरीं जाऊं.' आतां येथें कोणता चमत्कार नजरेस पडणार याचा आपल्या मनाशीं विचार करीत तो संन्यासी तेथें उभा राहिला. थोड्या वेळानें गिऱ्हाइक येण्याचें बंद झालें तेव्हां दुकान बंद करून व्याध त्या संन्याशाला बरोबर घेऊन आपल्या घरीं गेला. ओसरीवर कांहीं बसावयास घालून व त्या संन्याशाला त्यावर बसवून व्याध आंत गेला. आंत जाऊन आपल्या वृद्ध मातापितरांस त्यानें स्नान घातलें व नंतर जेवूं घालून तीं तृप्त झाल्यानंतर तो बाहेर संन्याशाजवळ येऊन ह्मणाला, 'स्वामीमहाराज, आपण येथपर्यंत येण्याची तसदी घेतली, हा मजवर मोठा अनुग्रह आहे. आतां आपली कोणत्या प्रकारची सेवा करूं याबद्दल आज्ञा व्हावी.' यानंतर संन्याशानें अध्यात्मविद्येंतील अनेक कूट प्रश्न त्यास केले व व्याधानें त्या सर्वांचीं समर्पक उत्तरें दिलीं. तो कथाभाग वेदांतरसानें ओथंबलेला असून त्यालाच महाभारतांत व्याधगीता असें नांव आहे. त्या व्याधाचें तें ज्ञान पाहून संन्यासी अगदीं थक्क होऊन त्याला ह्मणाला, 'तुह्मांस एवढ्या विमल ज्ञानाची प्राप्ति झाली असतां व्याधजातींत तुमचा जन्म कां झाला ? आणि तसा जन्म झाला असला तरी मांस विकण्याचें ओंगळ कर्म तुह्मीं कां करतां ?' व्याध ह्मणाला, 'माझ्या बेटा, अमुक कर्म चांगलें, आणि अमुक कर्म वाईट ह्मणणें ही दृष्टीच खोटी आहे. जगांतील कोणतेंहि कर्तव्य वाईट अथवा असंगल नाहीं. पूर्वकर्मानुसार मला ज्या परिस्थितींत जन्म आला, त्या परिस्थितीचीं कर्तव्येंहि मला जन्मादारभ्यच प्राप्त झालीं आहेत. लहानपणीं मी हाच धंदा शिकलों. या धंद्यांत होणाऱ्या नफ्यानें जसा मला आनंद होत नाहीं तसाच प्रसंगीं होणाऱ्या तोट्यानें मला शोकहि होत नाहीं. या दोहोंपासूनही अलिप्त राहून मी माझें कर्तव्य उत्तम प्रकारें बजावितों. गृहस्थाश्रमाला अनुरूप अशीं माझीं कर्तव्यें नीट संभाळून माझ्या मातापितरांची मी सेवा करतों. मी कसल्याहि प्रकारचें योगसाधन करीत नाहीं अथवा मी संन्यासीहि झालों नाहीं हें तुला दिसतच आहे. मला जें कांहीं थोडें फार ज्ञान प्राप्त झालें आहे तें मीं आपलीं कर्तव्यकर्मे अलिप्तपणें परंतु उत्तम रीतीनें पार पाडल्यामुळेंच प्राप्त झालें आहे.

हिंदुस्थानांत सध्या एक महायोगी राहत आहेत. माझ्या साऱ्या आयुष्यांत त्यांच्या तोडीची विभूति माझ्या पहाण्यांत आली नाहीं. त्यांची वृत्ति थोडी विलक्षण आहे. कोणी कांहीं प्रश्न विचारला तर ते त्याचें सरळ उत्तर ताबडतोब कधींच देणार नाहींत. कोणाचा गुरु होण्याची आपली योग्यताच नाहीं असें

त्यांस वाटतें. परंतु एखादा प्रश्न विचारून कांहीं दिवस तुह्मीं वाट पाहात बसलां तर एखादे दिवशीं बोलण्याच्या ओघांत तुमच्या प्रश्नाचें उत्तर ते अशा प्रकारें देतील कीं अननुभूत अशी ज्ञानप्राप्ति आपणांस झाली असें तुह्मांला वाटेल. कर्माचें मुख्य रहस्य काय असा प्रश्न त्यांना मीं एक वेळ केला. कांहीं दिवसांनीं ते सहज एकदां ह्मणाले, "साध्य आणि साधनें हीं चित्तांत एकरूप झालेलीं असावीं." याचा अर्थ असा आहे कीं ज्यावेळीं तुह्मीं कांहीं कार्य करीत असाल त्या वेळीं साध्य आणिं साधनें यांशिवाय इतर कोणत्याहि गोष्टीचा विचार करूं नका. साधनांनीं साध्य सिद्ध होईपर्यंत मध्यंतरीं जो वेळ जातो त्या वेळांत इतर भलत्याच गोष्टीचा विचार करूं नका. व्याधाच्या गोष्टींतील तात्पर्य हेंच आहे. प्राप्तकर्तव्य उत्तम रीतीनें पार पाडणें हीच परमेश्वराची पूजा करण्याचा उच्च मार्ग आहे. अशा रीतीनें प्रत्येक कर्म ह्मणजे त्याचें पूजन, आणि त्याचें आज्ञा-पालन आहे अशी भावना पक्की झाली ह्मणजे ज्ञान आपोआप प्राप्त होऊं लागतें. आपली परिस्थिति आणि आपला दर्जा यांस अनुरूप अशीं जीं प्राप्तकर्तव्यें असतील तीं निष्काम मनानें—अलिप्तपणानें—पार पाडलीं ह्मणजे अशा कर्मांतून ज्ञान उदय पावूं लागतें, व ज्ञानानें आत्म्यास मोक्ष मिळतो.

ज्याच्या हृदयांत फलापेक्षा आहे, अशा मनुष्याच्या हातून आनंदी वृत्तीनें कोणतेंहि काम होणें शक्यच नाहीं. जरा कोठें कांहीं अडचण आल्याचा भास झाला, कीं अशा मनुष्याचें डोकें ठिकाणावर राहत नाहीं. यामुळें ज्ञानप्राप्तीचा प्रसंग आला तरी तो वांया जातो. ज्याला फलापेक्षा नाहीं त्याला सर्व कर्तव्यें सारख्याच योग्यतेचीं वाटतात. यामुळें प्रचंड उद्योग करीत असतांहि एखाद्या गुहेंत राहिल्याप्रमाणें निःसीम शांतता त्याच्या हृदयांत वास करिते. यामुळेंच त्याचें प्रत्येक कर्म ह्मणजे तीक्ष्ण हत्यारच होऊन बसतें; व या हत्यारानें स्वार्थ आणि इंद्रियसुखलोलुपता यांचा समूळ उच्छेद करून तो ज्ञानवान् होतो. '**यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्प वर्जिताः। ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः॥**' अशी पंडिताची व्याख्या भगवान् श्रीकृष्णांनीं केली आहे. स्वतःच्या ज्ञानाबद्दल घमेंड वाटणें हा मनुष्यजातीचा सामान्य स्वभाव आहे. यामुळें कोणतेंहि कर्तव्य प्राप्त झालें ह्मणजे तें कमी दर्जाचें असें आपणांस वाटतें. परंतु कर्माची वांटणी योग्यतेनुरूपच झालेली असते, हा त्रिकालाबाधित सिद्धांत आपणांस ठाऊक नसतो. अथवा ठाऊक असला तरी 'मी मोठा' या भावनेनें अंध झालेल्या मनुष्यास तो दिसत नाहीं. मोठेपणाच्या भावनेनें मोह पावलेल्या बुद्धीला या

सिद्धांताचा उमजच पडत नाहीं. यामुळेंच नित्य व्यवहारांत चढाओढ सुरू होते. अगोदरच मोहानें व्यापलेली बुद्धि चढाओढीनें अधिक भ्रष्ट होते व राग, द्वेष, असूया इत्यादिकांचा प्रवेश होण्याजोगें महाद्वार तेथें उघडतें. रागद्वेषांचा प्रवेश बुद्धींत झाल्याबरोबर दयाक्षमादि दैवी गुणांचा झरा कोरडा होतो. कुरकुऱ्या स्वभावाच्या मनुष्याला जगांतील प्रत्येक कर्म नावडतेंच असतें. त्याला कोणीं राजा केलें तरी तो रडणार ! आणि रंकाच्या अवस्थेचाहि त्याला हेवा वाटणार! अशा मनुष्याच्या हातून कर्तबगारी ती कशाची होणार ! यासाठीं प्राप्तकर्तव्यें आनंदानें आणि नेटानें पार पाडून आपण ज्ञानवान् होऊं या. आपण ज्ञानवान् झालों ह्मणजे मोक्ष आपल्या मागच्या दारींच आहे.

प्रकरण ९ वें.

परोपकार स्वतःसच कल्याणप्रद आहे.

आपल्या आध्यात्मिक उन्नतीस कर्मयोग किती पोषक आहे याचा विचार पुढें चालू करण्यापूर्वी ‘ कर्म ’ या एका शब्दांत ज्या अनेक कल्पनांचा अंतर्भाव आह्मीं हिंदुलोक करितों, त्यांपैकीं आणखी एक कल्पना तुह्मांस प्रथम सांगणें इष्ट आहे. प्रत्येक धर्माचीं प्रमुख अशीं तीन अंगें असतात. तत्वविचार, पुराणें अथवा दंतकथा आणि आचार. यांपैकीं तत्वविचार हा भाग सर्वांत अत्यंत महत्वाचा असतो हें उघड आहे. तत्वविचारांत ज्या तत्वांचें उद्घाटन असतें त्यांचें प्रत्यक्ष आचरण कसें करावें याचा बोध दंतकथा व काल्पनिक गोष्टी यांवरून होतो. ठराविक आचारांमुळें तत्वविचारांस प्रत्यक्ष दृश्य स्वरूप येतें. किंबहुना, आचार हें अमूर्त तत्वविचारांचें मूर्त रूपच होय. अगदीं सामान्य बुद्धीच्या मनुष्यास आचारामुळें तत्वविचारांचें आकलन करणें सोपें जातें. कर्म या शब्दांत अशा प्रकारच्या आचारांचा अंतर्भाव होतो. प्रत्येक धर्ममार्गांत अशा प्रकारच्या आचारांची जरूर असते. आमची बुद्धि विचारानें तीव्र होईपर्यंत केवळ भावरूप सिद्धांताचें पूर्ण आकलन करण्याची तिला शक्ति नसते. कोणताहि विषय लवकर कळतो असें आपल्या अहंकारामुळें आपणास वाटत असतें; परंतु प्रत्यक्ष प्रसंग आला ह्मणजे निव्वळ भावरूप सिद्धांतापुढें आपल्या बुद्धीची कशी त्रेधा उडते हें अनुभवानेंच कळण्याजोगें आहे. या कारणामुळें प्रत्येक धर्मांत कांहीं विशिष्ट खुणा अथवा चिन्हें यांचा उपयोग केलेला असतो. या चिन्हांच्या

साहाय्यानें आपला मार्ग बराच सोपा होतो. सर्व धर्मांत आणि सर्वकाळीं अशा प्रकारच्या कांहीं विशिष्ट चिन्हांची योजना केलेली आहे. फार काय पण विशिष्ट चिन्हांवांचून तत्वविचार मनांत आणणेंहि अशक्य आहे. शब्दसृष्टि ही विचारांचीं चिन्हेंच आहेत असें ह्मणावयास हरकत नाहीं. किंबहुना, सर्व दृश्य विश्वांतील प्रत्येक पदार्थ हें एक चिन्हच आहे. अदृश्य चैतन्यात्मक अधिष्ठानावर ही सर्व दृश्य सृष्टि उत्पन्न झाली आहे. ह्मणजे अदृश्य परमेश्वराचें सृष्टि हें दृश्य चिन्ह आहे. अशा रीतीनें अस्तित्वांत आलेली चिन्हसृष्टि ही केवळ मनुष्यकृतच आहे असें नाहीं. एखाद्या धर्माचे कांहीं विद्वान एकत्र जमले आणि त्यांनीं हीं चिन्हें एकत्र विचार करून तयार केलीं असें नाहीं. अनेक सृष्ट पदार्थांप्रमाणेंच या चिन्हांचीहि आपोआप वाढ झालेली आहे. असें नसतें तर कांहीं विशिष्ट चिन्हें पाहून अनेक व्यक्तींच्या चित्तांत एकाच प्रकारच्या कल्पना उद्भवल्या नसत्या. कित्येक चिन्हांचा तर सर्वत्र आणि सर्वकालीं सारखाच उपयोग होत असल्याचें आढळून येतें. ख्रिस्तीधर्माच्या उदयाबरोबर क्रुसाचें चिन्ह प्रचारांत आलें असावें असा तुह्मांपैकीं बऱ्याचजणांचा समज असेल; पण वस्तुस्थिति तशी नाहीं. ख्रिस्तीधर्म जन्मास येण्यापूर्वी व मोझेसच्याहि जन्माच्या पूर्वी, वेदप्रचारांत आले नव्हते तेव्हांहि हें चिन्ह अस्तित्वांत होतें; इतकेंच नव्हे पण मनुष्यकृतीची कोणतीहि नोंद नव्हती तेव्हांहि हें चिन्ह अस्तित्वांत होतें. फिनीशियन आणि ॲझटेक्स लोकांतहि या चिन्हाचा उपयोग होत असल्याचें आढळतें. जगांतील सर्व जातीच्या लोकांस थोड्याशा फरकानें हें क्रुसाचें चिन्ह ठाऊक होतें. त्याचप्रमाणें वर्तुळाचें चिन्हहि फार प्राचीनकाळापासून सर्वत्र प्रचारांत असल्याचें आढळतें. त्याचप्रमाणें स्वस्तिकाची आकृतीहि बहुधा सर्व देशांत आणि सर्वकाळीं आढळते. बौद्धधर्माच्या प्रसाराबरोबर स्वस्तिकाच्या चिन्हाचा प्रसार झाला असावा असा समज होता; परंतु बुद्धाच्या जन्माच्याहि अगोदर या चिन्हाचा सर्वत्र उपयोग होत होता, असें आढळून आलें आहे. जुन्या बाबिलोन आणि मिसर देशांत हें चिन्ह अस्तित्वांत होतें. हीं चिन्हें कोणीं विशिष्ट व्यक्तींनीं विशिष्ट कारणापुरतींच प्रचारांत आणलीं नसावीं एवढी गोष्ट या हकीगतीवरून सिद्ध होते; एवढें नव्हे, तर मानवी मन आणि चिन्हें यांमध्यें कांहीं तरी अदृश्य संकेत असावा असें वाटतें. अशीच गोष्ट भाषेचीहि आहे. चार पुढाऱ्यांनीं जमून अमक्या पदार्थास अमुक ह्मणावें असें ठरविल्याचें कोणास माहीत नाहीं. भाषेची रचना अशाप्रकारें झालीच नाहीं. तिची उत्पत्ति

आणि वाढ हीं मनुष्यजातीबरोबर आपोआपच झालीं आहेत. ज्या कल्पनेला शब्द नाहीं अशी कल्पना अस्तित्वांतच आली नाहीं; तसेंच जे शब्द प्रचारांत आले ते कल्पनेवांचून आलेले नाहींत. कल्पना आणि शब्द यांचें अविभाज्य संमेलन झालेलें आहे. यांस केव्हांहि विभक्त करतां येणार नाहीं. कल्पना व्यक्त करण्याकरितां दोन प्रकारच्या चिन्हांचा उपयोग होतो. एक प्रकार ध्वनिचिन्हांचा, आणि दुसरा वर्णचिन्हांचा. जन्मापासून बहिरे आणि मुके अशा लोकांस ध्वनिचिन्हांचा कांहीं उपयोग नाहीं. त्यांना ध्वनिचिन्हांहून निराळ्या चिन्हांचा उपयोग करावा लागतो. जो जो विचार मनांत येतो त्याचें दृश्यचित्र मनःपटावर तावडतोब उमटतें. पर्वताचें, नदीचें अथवा दुसरें कसलें तरी चित्र काढावयाचें एखाद्या चितार्‍याच्या मनांत आलें तर कागदाला त्याची कुंचली लागण्यापूर्वी तें सर्व चित्र पूर्णपणें त्याच्या चित्तपटावर प्रथम रंगविलें जातें व नंतर त्याची नक्कल तो कागदावर काढितो. अशाप्रकारें मनःपटावर प्रत्येक विचाराचें दृश्य स्वरूप प्रथम चित्रित होतें. या चित्राला आर्यतत्वज्ञांनीं नाम-रूप अशी संज्ञा दिली आहे. ज्याप्रमाणें कांहीं विशिष्ट मनुष्यांनीं भाषा निर्माण केलेली नाहीं, त्याचप्रमाणें चिन्हेंहि कोणीं निर्माण केलेलीं नाहींत. धर्मतत्वांचा प्रत्यक्ष आचार सुरू होतांच त्याबरोबर विशिष्ट चिन्हेंहि आपोआप प्रचारांत येत गेलीं. धर्मांचे विशिष्ट आचार आणि देवळें, मशिदी वगैरे विशिष्ट जागा असण्याचें काय कारण आहे, असा प्रश्न अलीकडे अनेक लोक करितात. धर्मविचारांत तान्ह्या मुलांपेक्षा ज्यांची योग्यता अधिक नाहीं, अशा लोकांनाहि धर्मविषयक हवे ते प्रश्न विचारण्याची जणूं काय पूर्ण मुभा मिळाली आहे! तथापि देवळांत जाऊन मूर्तीस नमस्कार करणार्‍या अथवा प्रार्थना करणार्‍या लोकांच्या वर्तणुकीची, तसें न करण्यांत अभिमान बाळगणार्‍या लोकांच्या वर्तणुकीशीं सूक्ष्म तुलना केली तर त्यांजमधील फरक कळतो. देवळें व पूर्वी सांगितलेलीं चिन्हें यांच्या संबंधीं ज्या विशिष्ट भावना मानवी मनोवृत्तींत अत्यंत संलग्न आहेत, त्या देवळांत जाण्याबरोबर अथवा चिन्हदर्शनाबरोबर जागृत होऊन त्यांचा परिणाम चित्तावर होतो. याकरितां अशाप्रकारच्या विशिष्ट चिन्हांचा त्याग करणें युक्त नाहीं. चिन्हांचा वास्तविक अर्थ समजून त्यांचा उपयोग करणें हाहि कर्मयोगाचाच एक भाग आहे.

कर्मयोगशास्त्रांत महत्वाचीं अशीं दुसरीं अनेक अंगें अंतर्भूत होतात. विचार आणि उच्चार यांजमधील परस्पर संबंध काय आहेत व उच्चारांत ह्मणजे विचा-

राच्या शब्दस्वरूपांत काय सामर्थ्य आहे यांचा निश्चय करणें हें कर्मयोगाचेंच एक अंग आहे. प्रत्येक धर्मांत शब्दाचें अतिशय महत्व मानण्यांत आलें आहे; इतकें कीं 'आरंभीं शब्द होता, आणि शब्दांतून सृष्टि निर्माण झाली' असें कित्येक तत्त्ववेत्त्यांनीं अनुमान केलें आहे. परमेश्वराच्या चित्तांत उद्भूत झालेला विचार शब्दरूपानें बाहेर पडतांक्षणींच त्यानें सृष्टीचें रूप धारण केलें. परमेश्वराच्या मनांत प्रथम विचार उद्भवला. विचाराचें इच्छेंत रूपांतर झालें. इच्छेनें शब्द उत्पन्न झाला आणि त्यानें सृष्टीचें रूप धारण केलें अशी सृष्टीची उपपत्ति कांहीं तत्वज्ञ सांगतात. वारंवार जूं घांसल्यामुळें बैलाच्या मानेस घट्टा पडून जसे तेथील ज्ञानतंतू मरून गेलेले असतात, तसेच आपले ज्ञानतंतूहि चालू व्यवहाराच्या रोजच्या घर्षणानें मठ्ठ बनतात. जों जों वृद्धापकाल अधिक होतो तों तों हा मठ्ठपणा वाढतच जातो. तशांतून सांप्रतच्या काळीं जडवाद अधिक मोहकरूपानें नटलेला असल्यामुळें आपल्या ज्ञानदृष्टीवर एक आवरण अधिकच पडल्यासारखें झालें आहे. यामुळें आपल्या सभोंवतीं प्रत्यहीं घडणाऱ्या गोष्टींचें नुसतें महत्वहि आपणांस समजत नाहींसें होतें. तथापि मनुष्य कितीहि मठ्ठ असला तरी कित्येकवेळां असे कांहीं चमत्कारिक प्रकार घडून येतात कीं त्याची जिज्ञासा जागृत झाल्यावांचून राहत नाहीं. अमुक गोष्ट अशी कां घडली हा विचार मनावर वारंवार आघात करून निद्रित जिज्ञासेस जागृत करितो. जिज्ञासा जागृत होणें ही ज्ञानार्जनाच्या मार्गांतील पहिली पायरी आहे. शब्द आणि सृष्टीची उत्पत्ति यांविषयीं जें नुकतेंच विवेचन केलें त्यांतील तात्विक विचार क्षणभर बाजूस ठेविले तरी ध्वनिचिन्हांकडून रोजच्या व्यवहारांत बजाविली जाणारी कामगिरी कमी महत्त्वाची आहे असें नाहीं. याक्षणीं मी तुह्मांशीं बोलत आहें. तुह्मांपासून मी बऱ्याच अंतरावर आहें. माझा स्पर्श तुह्मांस होत नाहीं; तथापि माझ्या भाषणानें हवेवर उत्पन्न होणारे तरंग तुमच्या कानांत शिरून मनावर कांहीं परिणाम उत्पन्न करितात. हा परिणाम होण्याचें बंद करणें तुमच्या हातांत नाहीं. तुह्मांस यत्किंचित् स्पर्शहि न करितां तुमच्या मनांत मी इतक्या अंतरावरून खळबळ उत्पन्न करूं शकतों ही गोष्ट चमत्कारिक नाहीं काय ? एक मनुष्य दुसऱ्यास मूर्ख ह्मणतो. इतक्यांत तो दुसरा मनुष्य उभा राहून संतापानें दुसऱ्याच्या तोंडावर गुद्दा मारतो ! हें शब्दाचें–ध्वनिचिन्हाचें—प्रत्यक्ष सामर्थ्य पहा ! एखादी स्त्री दुःखव्याप्त होऊन रडत असली आणि इतक्यांत दुसरी स्त्री येऊन तिनें तिच्याशीं थोडेंसें

गोड भाषण केलें तर दुःखी स्त्रीचें अवनत मुख एकदम वर होतें. तिजकडे पाहावें तों क्षणापूर्वींचा तो म्लान चेहरा जाऊन मंदहास्य त्या जागीं विलसूं लागल्याचें आढळून येतें. शब्दांत काय सामर्थ्य आहे याचा प्रत्यय याप्रमाणें क्षणोक्षणीं आपणांस येतो. तत्वविचारांत काय अथवा सामान्य व्यवहारांत काय शब्दांचें–ध्वनिचिन्हांचें–सामर्थ्य सारखेंच प्रकट होतें. आपल्या जाग्रदवस्थेंत या आपल्या सामर्थ्याचा मन मानेल तसा उपयोग आपण करीत असतों. या शक्तिसंबंधीं कसल्याच प्रकारचा विचार आपल्या मनांत येत नाहीं, किंवा तिचें कांहीं कौतुकहि आपणांस वाटत नाहीं. आपल्या या सामर्थ्याची उपपत्ति समजून घेऊन तदनुरूप त्याचा योग्य उपयोग करणें हेंहि कर्मयोगाचेंच एक अंग आहे.

रोजचा व्यवहार सुरळीत चालण्याकरितां आपणांस जीं कांहीं कर्तव्यें करावीं लागतात त्यांचे प्रायः दोन प्रकार आपण कल्पितों. एक स्वतःसाठीं करावयाचीं कर्में आणि दुसरा प्रकार ह्मणजे लोकांसाठीं करावयाचीं कर्में. या दुसऱ्या प्रकारच्या कर्तव्यांस परोपकाराचीं कामें असें आपण नांव देतों. हीं परोपकाराचीं कामें करीत असतां आपण केवळ लोकांच्याच उपयोगीं पडतों असें बाह्यतः दिसतें; तरी वस्तुतः आपण आपल्या स्वतःच्या कल्याणासाठींच तीं कामें करीत असतों. केवळ परोपकारासाठीं कांहीं उद्योग करणें हें चांगलें आहे, व प्रत्येकानें ही इच्छा सदोदित करावी हें इष्ट आहे; परंतु परोपकारी कृत्यांचा तत्वदृष्ट्या विचार केला तर आपल्यावांचून जगाचें यत्किंचित्‌हि अडत नाहीं असें आपणांस दिसून येईल. आपण जन्मास येण्यापूर्वी जग सुरळित चाललें होतें व आपल्या पाठीमागेंहि तें सुरळीत चालणारच. त्यानें आपल्या मदतीची केव्हांहि अपेक्षा केलेली नव्हती व सध्यांहि तें करीत नाहीं. एका ख्रिस्ती उपदेशकाचें एक धार्मिक प्रवचन माझ्या वाचनांत आलें. त्यांत तो ह्मणाला, "ही सर्व सुंदर सृष्टि फार चांगली आहे. कारण तिजमुळें परोपकाराचीं कृत्यें करावयास आपणास संधी मिळते." केवळ वरवर पाहिलें तर या विचारांत नांवें ठेवण्यासारखें कांहीं नाहीं. पण आमच्या मदतीसाठीं जग जणूं काय वाटच पाहत आहे असा जो ध्वनि या भाषणांत निघतो तो जगाला आणि परंपरेनें परमेश्वराला उपमर्दकारक नाहीं काय? जग इतकें लंगडें लुलें आहे काय कीं, तुमच्या मदतीवांचून त्याचें त्याला कांहीं करतां येऊं नये? जग अनंत प्रकारच्या दुःखांनीं व्यापिलें आहे ही गोष्ट खरी; व दुःखितांचें संकट नाहींसें करण्यास आपण त्यांस मदत करावी हेंहि युक्त आहे. पण त्या आपल्या मदतीचा शेवटीं

आपणांसच उपयोग होत असतो ही गोष्ट विसरतां येत नाहीं. मी लहानपणीं कांहीं पांढरे उंदीर बाळगिले होते. त्यांच्या पिंजऱ्यांत एक पितळेचा रहाट बसविला होता. ते उंदीर त्यावर चढूं लागले ह्मणजे तो रहाट गरगर फिरूं लागे. उंदीर जों जों जलदीनें पाय उचलीत तों तों रहाट अधिक झपाट्यानें फिरूं लागे; परंतु या सर्व गतीचा शेवट पाहिला तर उंदीर आणि रहाट जागच्या जागींच असलेले आढळावयाचे. रहाटावरून पलीकडे जाण्यासाठीं निघालेला उंदीर चालून चालून थकला तरी शेवटीं जागच्या जागींच रहावयाचा. जगाच्या कल्याणासाठीं हातीं वीरकंकण बांधून निघालेल्याची गोष्टहि अशीच आहे. अशा कृत्यांचा वास्तविक उपयोग ह्मटला तर तीं करणाराची नीतिमत्ता सुधारते व दृढ होते, हा होय. तत्वदृष्ट्या जगाला चांगलें अथवा वाईट असें कांहीं निश्चित स्वरूपच नाहीं. जो ज्या दृष्टीनें त्याजकडे अवलोकन करितो त्याप्रमाणें तें त्यास दिसतें. '**ना जानुं तेरा राम कैसा है**' असें कोणीं कबीरास ह्मटलें तेव्हां त्यावर त्यानें उत्तर दिलें '**राम जैसेकू वैसाहै.**' हीच गोष्ट जगासहि पूर्णपणें लागू पडते. या दृष्टीनें पाहतां प्रत्येक मनुष्य आपल्या स्वतःचें निराळेंच जग निर्माण करीत असतो असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. जन्मांधाला दृक्प्रत्यय नसल्यामुळें जग थंड आहे, उष्ण आहे, कठीण आहे अथवा मृदु आहे, अशा प्रकारचा स्पर्शानुभव तो जगाविषयीं सांगेल. एकाच मनुष्याविषयीं विचार केला तरी त्याचें निश्चित स्वरूप अमुक असें ठरवितां येणार नाहीं. एक ह्मणेल, 'हा लुच्चा आहे.' दुसरा ह्मणेल, 'हा चांगला मनुष्य आहे.' तिसरा ह्मणेल, 'हा फार प्रेमळ आहे.' चवथा ह्मणेल, 'हा दुष्ट आहे.' याचा अर्थ इतकाच कीं, त्या विशिष्ट मनुष्याविषयीं ज्याला जसा अनुभव असेल तसें तो त्याचें स्वरूप समजेल. वस्तुतः आपण मनुष्यें ह्मणजे सुखदुःखाचे डोल्हारे आहों; आपण ह्मणजे सुखाचीं आणि दुःखाचीं रहावयाचीं घरें. या माझ्या ह्मणण्याचा अनुभव आपल्या आयुष्यांत आपणांस हजारों वेळ आला असेल. तरुण पुरुष आशावादी आणि ह्मातारीं माणसें निराशावादी असावयाचीं असा सामान्य नियम आहे. तरुणांपुढें आयुष्याचा बराच काळ शिल्लक असतो; आपलें आयुष्य निघून गेलें ही जाणीव वृद्धांत असते. आपल्या पुढील काळांत आपल्या इच्छा तृप्त होतील असा भरंवसा तरुणाच्या हृदयांत असतो, आणि अतृप्त राहिलेल्या आशा वृद्धाच्या हृदयास आंच लावीत असतात. वास्तविक विचार केला तर अशा निरनिराळ्या अवस्थांतले तरुण काय अथवा वृद्ध काय, सारखेच मूर्ख असतात.

आपण ज्या दृष्टीनें विचार करितों तीप्रमाणें आपलें चरित्र सुखाचें अथवा दुःखाचें असें आपणांस वाटतें. सुख अथवा दुःख वस्तुगत नसून आत्मगत आहे. ही जाणीव नसल्यामुळें अमुक जीवित सुखाचें आणि अमुक दुःखाचें अशी भावना करून कोणी हंसत असतो आणि कोणी रडत असतो ! उदाहरणार्थ, अग्नि हा स्वतः सुखमय नाहीं व दुःखमयहि नाहीं. परंतु कडाक्याची थंडी पडली असतां शेकोटीजवळ बसून आपण ह्मणतों, " अहाहा ! अग्नि किती सुखदायक आहे !" पण इतक्यांत एखाद्या निखाऱ्याला हात लागून बोटें भाजलीं ह्मणजे त्याच अग्नीला दोष देण्यासहि आह्मी तयार होतों. परंतु वास्तविक पाहिलें तर अग्नीनें आह्मांस सुख अथवा दुःख या दोहोंपैकीं स्वतः कांहींच दिलें नसून दोन्ही भावना आमच्याच ठिकाणीं होत्या, त्या प्रसंगानुरोधानें जागृत मात्र झाल्या. आपण ज्याप्रमाणें अग्नीचा उपयोग केला त्याप्रमाणें तो आपणांस सुखदायक अथवा दुःखदायक झाला. हीच गोष्ट जगासंबंधींहि खरी आहे. जग हें स्वतः अत्यंत पूर्णावस्थेंत आहे. पूर्णावस्था ह्मणजे ज्या कार्याकरितां जगाची उत्पत्ति झाली, त्या कार्याच्या पूर्तीकरितां लागणाऱ्या साधनांनीं तें पूर्ण आहे असा अर्थ समजावा. आह्मीं जगलों अथवा मेलों तरी त्यामुळें त्या साधनांत कांहीं भर पडत नाहीं अथवा त्यांत कांहीं उणीवहि येत नाहीं. जगाच्या बऱ्याचा विचार करून मेंदूला शीण देण्याचें आह्मांस कांहीं कारण नाहीं.

हें जरी खरें आहे तरी आपण सदोदित परोपकार करीत असलें पाहिजे हेंहि खरें आहे. परोपकाररत राहणें हें स्वतःच्याच फायद्याचें आहे व हा एक मोठा हक्कच आपणांस प्राप्त झाला आहे अशी जाणीव आपल्या अंतःकरणांत सदोदित असली तर त्या परोपकारबुद्धीचा एखाद्या प्रचंड चालक शक्तीसारखा आपणांस उपयोग होतो. एखाद्या भिकाऱ्याला कांहीं द्यावयाचें तुमच्या मनांत आलें तर छाती काढून डौलानें एखादें नाणें त्याजकडे भिरकावूं नका. तुमची उपकारबुद्धि त्याच्यामुळें जागृत झाली ही गोष्ट लक्ष्यांत ठेवून त्याला जें देणें असेल तें द्यावें. अशा कृत्यापासून जी कांहीं मानसिक उन्नति होते व मनाला शक्ति प्राप्त होते ती दान घेणाऱ्यास होत नसून दान देणाऱ्याला होत असते. परोपकाराच्या कृत्यांनीं अहंकार मावळूं लागतो, व अहंकार मावळूं लागला ह्मणजे मनुष्य आपल्या पूर्णरूपाकडे जाऊं लागतो. कोणी तरी उपकार घेण्याच्या स्थितींत आहेत ह्मणून पूर्णरूप पावण्याच्या साधनांतील एकाचा आपणांस उपयोग करून घेतां येतो याजबद्दल उपकार घेणाऱ्याचे आपण आभार मानिले

पाहिजेत. प्रत्येक परोपकाराच्या कृत्यानें आपल्या क्षुद्रवृत्ति नाश पावण्यास मदत होत असते. त्यामुळें आपण पवित्र होऊन पूर्णावस्थेस जातों. यासाठीं आपल्या दातृत्वाचा गर्व वाहण्यासारखी त्यांत कांहींच थोरवी नाहीं. तुमच्या जवळ पांच चार लाख रुपये असले तर मोठा परोपकार तो तुह्मी काय कराल! एखादें इस्पितळ बांधाल, एखादा टाऊनहॉल बांधाल, एखाद्या अधिकाऱ्याचा पुतळा उभाराल, अथवा कोणाला मोठी मेजवानी द्याल; पण विश्वशक्तीच्या दृष्टीनें या लांबलचक यादीची खरी किंमत काय आहे? ' बाडीबीचमें बंगला बनाया, रचा कमलका फूल।' ही गोष्ट खरी. पण जर पांचच मिनिटें प्रचंड झंझावात सुटला–विश्वांतील अनेक शक्तींपैकीं एकच जागृत झाली–तर ' दो घडीसे देखना, तो आखर धूलकी धूल।' असेंच ह्मणण्याची पाळी यावयाची! एखादा ज्वालामुखी पर्वत लीलेनें फूत्कार करूं लागला तर तुमचीं प्रचंड शहरें, लांबचलांब रस्ते आणि हजारों इमारती जागच्या जागींच भस्मसात् होतील. यासाठीं जगाचे उपकारक ह्मणून गर्व वाहणें यासारखें दुसरें मूर्खत्व कोणतेंच नाहीं. तुमच्या अथवा माझ्या मदतीवांचून जगाचें अडलें आहे असें नाहीं. तर परोपकारामुळें आपल्या स्वतःच्या उन्नतीस मदत होते ही गोष्ट नित्य लक्षांत बाळगून आपण नेहमीं परोपकाररत राहिलें पाहिजे. स्वत्व विसरून पूर्णत्व पावण्याचा हाच मार्ग आहे. एखादा भिकारी आमचें कांहीं देणें लागत नसतो. पण आमची उपकारबुद्धि जागृत करून तो मात्र आह्मांस ऋणी करून ठेवितो. माझ्यामुळें जगाचें अमुक बरें झालें अथवा अमक्या तमक्याला माझ्यामुळें मदत झाली हा विचारच मूर्खपणाचा आहे. ज्यामुळें अहंकार वाढतो असा प्रत्येक विचार मूर्खपणाचाच असतो व दुःखप्राप्ति होणें हें मूर्खत्वाचें निश्चित पर्यवसान आहे. एखाद्याला आपण कांहीं दिलें आणि त्याच्याकडून कृतज्ञतादर्शक शब्दांची अपेक्षा केली असतां तो कांहींच बोलला नाहीं ह्मणजे आपल्या अहंकारास तावडतोब एक धक्का बसतो व आपणांस क्षणभर तरी दुःख होतें. आपण जें कांहीं करतों त्याचें कांहीं तरी प्रतिफल आपणांस मिळावें अशी इच्छा करणेंच चुकीचें आहे. ज्यानें उपकार करावयास संधी दिली त्याचे आभार मानणें रास्त आहे. परमेश्वराच्या पूजनाचा हा एक अत्युत्कृष्ट मार्ग आहे. दातृत्वबुद्धि असणें हें भाग्य सर्वांच्याच वांट्यास येत नाहीं. अशी बुद्धि हा एक मोठा हक्क आहे. हा हक्क आपणांस प्राप्त झाला आणि तो अमलांतहि आला याबद्दल आपणच कृतज्ञ असलें पाहिजे. कोणत्याहि प्रतिफलाची अपेक्षा न करण्या-

इतकी आपली अलिप्तता जागृत असली म्हणजे निराशेचें दुःख प्राप्त होण्याची भीति नको. अलिप्त राहून केलेल्या कर्मांपासून दुःखाची प्राप्ति होणें ही गोष्ट सर्वथैव अशक्य आहे. आपण कांहीं केलें अथवा न केलें तरी सुखदुःखांचे अनुभव घेत घेत हें जग असेंच अनंत कालपर्यंत चालावयाचें आहे.

एके गांवीं एक मनुष्य राहत होता. तो फार गरीब असल्यामुळें त्याला पैसा मिळण्याची इच्छा होती. त्याला कोणीं असें सांगितलें कीं, जर एखादें भूत तुला वश होईल तर तें तूं मागशील तें तुला आणून देईल. त्यालाहि हें सांगणें बरें वाटून तो भूत वश करून देणाऱ्या मांत्रिकाचा शोध करूं लागला. शोध करतां करतां त्याला शेवटीं एक सत्पुरुष भेटला. त्या सत्पुरुषाला सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. तेव्हां त्याजजवळ जाऊन तो ह्मणाला, " महाराज, मला एखादें भूत वश करून द्याल काय ?" सत्पुरुषानें विचारिलें, "बावा, तुला भुताशीं काय करावयाचें आहे ?" त्यानें उत्तर दिलें " वाटेल तें काम पार पाडण्याची शक्ति भुताला असते असें मीं ऐकिलें आहे. तर कृपा करून मला माझ्या कामासाठीं एखादें भूत मिळवून द्या." त्यावर सत्पुरुष ह्मणाला, " वेड्या, असल्या भलत्याच नादाला लागूं नको. आपल्या घरीं जाऊन स्वस्थ बैस." दुसऱ्या दिवशीं तो मनुष्य पुन्हां त्या सत्पुरुषाकडे जाऊन रडून आणि त्याची करुणा भाकून ह्मणाला, " महाराज, कसेंहि करून एखादें भूत मला मिळवून द्याच." तेव्हां त्याच्या रडण्याला कंटाळून सत्पुरुष ह्मणाला, " हा ताईत घेऊन जा आणि मी सांगतों तो मंत्र ह्मण, ह्मणजे एक भूत ताबडतोब तुजपाशीं येईल. तें तूं सांगशील तें काम करील. पण संभाळ हो, भुतें मोठीं भयंकर असतात. त्यांस एकसारखें कामास लाविलें पाहिजे. जर एक क्षणभर तूं त्यास रिकामें ठेविलेंस तर तें ताबडतोब तुला खाऊन टाकील." तो मनुष्य ह्मणाला, "अंः, त्यांत काय मोठें कठीण आहे ? त्याच्या जन्माला पुरून उरेल इतकें काम मीं त्याला देईन." असें ह्मणून व सत्पुरुषानें दिलेला ताईत घेऊन तो एका अरण्यांत गेला, आणि मंत्र ह्मणूं लागला. बराच वेळ मंत्राचा जप झाल्यानंतर एक मोठें धिप्पाड भूत त्याजजवळ येऊन ह्मणालें, " अरे, मी तुझा सेवक झालों आहें. तूं सांगशील तें काम मी करीन; पण जर क्षणभर मी रिकामा राहिलों तर ताबडतोब तुला खाऊन टाकीन." मनुष्य ह्मणाला, "बरें तर, माझ्यासाठीं एक प्रचंड राजवाडा बांध." इतकें तो ह्मणत आहे तोंच भुतानें उत्तर दिलें, " राजवाडा बांधून तयार झाला. आतां आणखी काम सांग." मनुष्य ह्मणाला, " पुष्कळसें द्रव्य

घेऊन ये." भुतानें उत्तर दिलें, " राजवाड्यांत द्रव्यकोश आणून ठेविला. आतां आणखी काम सांग." त्या बिचाऱ्या गरीब मनुष्याची छाती धडधडूं लागली. जें सांगावें तें काम झालेंच आहे, असें हें भूत ह्मणतें तर आतां त्यास काय काम सांगावें ? असा विचार करतां करतां तो मनुष्य एकदम पळत सुटला व सत्पुरुषाजवळ येऊन त्याला त्यानें सर्व हकीगत सांगितली. त्याची हकीगत संपते न संपते तोंच पाठोपाठ तें भूतहि येऊन हजर झालें आणि त्या मनुष्याला ह्मणालें, " आतां काम सांग, नाहीं तर तुला खाऊन टाकितों." त्यानें त्या मनुष्यास खाऊन टाकिलें असतें; परंतु सत्पुरुष इतक्यांत ह्मणाला, " अरे मनुष्या, त्या कुत्र्याचें शेंपूट कापून आण, आणि या भुताला तें सरळ करावयास सांग." सत्पुरुषाच्या सांगण्याप्रमाणें त्या मनुष्यानें कुत्र्याचें शेंपूट कापून आणिलें आणि तें भुताजवळ देऊन ह्मटलें. " हें मला सरळ करून दे." भुतानें मोठ्या कुशलतेनें तें जमिनीवर ठेवून सरळ केलें. परंतु त्याजवरील बोटें काढतांच तें पुन्हां वांकडें झालें. भुतानें याप्रमाणें बराच वेळ खटपट करून पाहिली, परंतु तें शेंपूट सरळ होईना. तेव्हां त्रासून तें ह्मणालें, " खरोखर, साऱ्या जन्मांत मला कोणतेंहि काम इतकें अवघड वाटलें नाहीं. अरे मनुष्या, जर तूं आतां या कामांतून मला मुक्त करशील तर तुला दिलेली दौलत बक्षीस देईन आणि पुन्हां कधींहि तुला त्रास देणार नाहीं." तो मनुष्य आनंदानें ह्मणाला, " बरें, तुझी अट मला मान्य आहे."

हें जग कुत्र्याच्या शेंपटासारखें सदोदित वांकडें आहे आणि हजारों वर्षें त्यास सरळ करण्याचा उद्योग अनेकजण करित आले आहेत. पण त्याच्यावरचा दाब ढिला पडल्याबरोबर तें पुन्हां लगेच वांकडें होतें. हें असेंच चालावयाचें आहे. यासाठीं जग सरळ करण्याच्या खटपटीस लागूं नका. या इच्छेनें प्रेरित होऊन तुह्मीं कोणतेंहि काम करूं लागलां तर जग सरळ होत नाहींच पण तुह्मीं मात्र वेडे होतां—आततायी होतां. जर हें आततायित्व जगांत उत्पन्न झालें नसतें तर जगाची प्रगति सध्याहून अधिक झपाट्यानें झाली असती. हट्टानें आणि आततायीपणानें कोणतीहि सुधारणा जगावर लादण्याचा प्रयत्न करणें मूर्खपणाचें आहे. यामुळें क्रोधादि शत्रूंची वाढ मात्र झपाट्यानें होऊन मारामाऱ्या आणि रक्तपात होतात. तुमच्या हट्टामुळें तुह्मांबद्दल असलेली सहानुभूति मात्र लोकांच्या मनांतून नाहींशी होते. आपण जें कांहीं करतों तें उत्तम; आपणाजवळ जें कांहीं आहे त्याला जगांत कोठें तोड नाहीं; तसेंच इतरांचें जें

कांहीं ह्मणणें असेल तें सर्व चुकीचें असें वाटणें हा मानवी स्वभावच आहे. यासाठीं जगावर सुधारणा लादण्याची इच्छा तुह्मांस होईल तेव्हां कुत्र्याच्या शेंपटाच्या गोष्टीचें स्मरण करा. जगाच्या नादीं लागून आपलें डोकें फिरवून घेऊन आपल्या विश्रांतीचा भंग करावा यांत काय शहाणपण आहे बरें ! तुह्मीं जन्मभर निजून राहिलांत, व जगाकडे ढुंकूनहि पाहिलें नाहीं, तरी जग जसें चालावयाचें तसें चालणारच. यासाठीं आपलें सुखदुःख जगाच्या बऱ्यावाईटावर न ठेवितां व आततायीपणा न करितां अलिप्त मनानें कर्म करीत राहणें इतकेंच आपलें कर्तव्य आहे. यत्किंचितहि हटवादीपणा अंगीं आहे तोंपर्यंत खरें चांगलें कार्य आपल्या हातून कधींहि होणें नाहीं. ज्याच्या चित्तांतून अहंकार नष्ट झाला आहे, निस्सीम शांतता ज्याच्या हृदयांत वास करीत आहे, खरें प्रेम आणि सहानुभूति ज्याच्या हृदयांत उत्पन्न झाली आहे, तोच पुरुष सत्कर्म करून इतरांच्या उपयोगीं पडतो आणि स्वतःचेंहि कल्याण करून घेतो. आततायी मनुष्याला सहानुभूति ह्मणजे काय याची ओळखहि नसते. जगाचीं दुःखें हलकीं करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं कधींहि येत नाहीं, अथवा तो स्वतःचेंहि कल्याण करून घेत नाहीं.

यासाठीं थोडक्यांत तुह्मांस इतकेंच सांगावयाचें कीं, जग आपलें ऋणी नसून आपण जगाचे ऋणी आहों ही गोष्ट प्रथम लक्ष्यांत बाळगिली पाहिजे. परोपकार करणें ह्मणजे पर्यायानें स्वतःच्या कल्याणाचाच प्रयत्न करणें होय, हा दुसरा मुद्दा ध्यानांत धरण्यासारखा आहे. तसेंच जग तुमच्या आमच्या मदतीसाठीं अडून राहिलें नसून त्याचा नेता व शास्ता परमेश्वर आहे, याचा विसर पडूं देऊं नये. त्याची तेथें नित्य वस्ती असून त्याच्या उद्योगास कधींहि खळ पडत नाहीं. तो यच्चयावत् प्राणिमात्राची काळजी वाहून त्याच्या बऱ्याचा मार्ग त्याला दाखवितो. सर्व विश्व झोंपीं गेलें तरी तो जागृत असतो. जगांत जें जें कांहीं दृष्टीस पडतें तें त्याच्यामुळेंच होय. या गोष्टी नित्य लक्ष्यांत बाळगिल्या पाहिजेत. आणखी असें कीं, जग जसें आजवर चालत आलें आहे तसेंच अनंत काळपर्यंत राहणार. यासाठीं कोणावर रागावण्यांत अथवा कोणाचा द्वेष करण्यांत फायदा नाहीं. गरीबदुबळ्यांस शक्य ती मदत करणें आणि दुष्टावरहि प्रेम करणें इतकेंच आपलें कर्तव्य आहे. जग हें मोठ्या तालीमखान्यासारखें आहे. कसरतीनें जसें शरीर धष्टपुष्ट होतें तसें या तालीमखान्यांत कसरत करून मन धष्टपुष्ट होतें. तसेंच कोणत्याहि कार्यांत हट्ट आणि माथेफिरूपणा

करूं नये. कारण त्यामुळें नफा कांहींच न होतां नुकसान मात्र हटकून होतें. धर्माभिमानाचा आव घालणारे कांहींजण असें ह्मणतात कीं "आह्मीं पाप्यांचे द्वेष्टे नसून पापाचे द्वेष्टे आहों." असे धर्माभिमानी अथवा धर्मवेडे तुमच्याहि पाहण्यांत आले असतील. पापी मनुष्य आणि त्यानें केलेलें पाप हीं स्वतंत्रपणें पाहण्याइतकी ज्याची दृष्टि दिव्य झाली आहे, त्याच्या दर्शनासाठीं जगाच्या दुसऱ्या टोंकापर्यंत मी पायानें चालत जाईन. पाप आणि पापी मनुष्य हीं भिन्न आहेत असें तोंडानें बडबडणें फार सोपें आहे; परंतु अंतःकरणांत तसा अनुभव येऊन त्याप्रमाणें कृति घडणें दुष्कर आहे. तसेंच आपलें चित्त सदोदित शांत ठेविलें तर प्रेमाचा उदय आपल्या हृदयांत लवकर होऊन निष्काम कर्म आपल्या हातून होऊं लागेल.

प्रकरण ६ वें.

अनासक्ति हाच अहंकारनाश.

ज्याप्रमाणें आपल्या कृतीचे परिणाम फळरूपानें आपणांकडे येतात त्याच प्रमाणें आपल्या कृतीचे परिणाम परक्यावर व परक्याच्या कृतीचे परिणाम आपणांवर घडत असतात. कोणत्याहि मनुष्यानें कांहीं वाईट कर्म केलें तर त्याच्या प्रतिफलानें त्याची बुद्धि भ्रष्ट होऊन दिवसेंदिवस तो अधिकच वाईट होत जातो; तसेंच शुभकर्मानें बुद्धि शुद्ध झालेल्या मनुष्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस अधिक चांगल्या कर्मांकडे आपोआप वळते. हा अनुभव आपल्यांपैकीं बहुतेकांस आलाच असेल. आपण जीं कर्में करितों त्यांचे परिणाम परस्परांवर घडत नसते तर वर दाखविलेली बुद्धीची वाढ अधिक चांगल्या अगर अधिक वाईट दिशेनें झाली नसती. जड पदार्थांसंबंधीं केलेल्या अवलोकनावरूनहि वरील प्रमेयाची सिद्धि होते. एखाद्या खोलींत एका जातीचीं दोन तीन तंतुवाद्यें असलीं आणि आपण त्यांपैकीं एखादें वाद्य वाजवून कांहीं विशिष्ट स्वर उत्पन्न केला तर त्या स्वरानें हवेवर जे तरंग उत्पन्न होतात ते बाकीच्या वाद्यांवर आदळून त्यांतून सजातीय स्वराची उत्पत्ति करितात. ही गोष्ट पदार्थविज्ञानशास्त्रानें सिद्ध केली आहे. तसेंच माझ्या मनांत कांहीं विचारतरंग उठले तर त्यांचा परिणाम सजातीय मनांवर होऊन तेथेंही तत्सदृश विचारांची उत्पत्ति होते. प्रत्यक्ष आघातानें वाद्यांतून निघणारा स्वर जितका स्पष्ट असतो तितका तरंगांच्या

आघातानें स्पष्ट न निघतां सूक्ष्म निघतो. पहिल्या वाद्यापासून दुसरें वाद्य बऱ्याच अंतरावर असेल तर हा ध्वनि अत्यंत सूक्ष्म होईल हें उघड आहे; तसेंच माझ्या विचारतरंगांनीं दुसऱ्यांच्या मनावर उमटणारे तरंग कमी अथवा अधिक स्पष्ट उमटणें हें, अंतरावर व इतर परिस्थितीवर अवलंबून राहील, हेंहि उघड आहे. यावरून आपल्या मनावर बाह्य तरंगांचा परिणाम कधीं सूक्ष्म, तर कधीं व्यक्त, परंतु निश्चितपणें होत असतो एवढी गोष्ट सिद्ध होते. माझ्या मनांत एखादें वाईट कर्म करण्याचा विचार उद्भवला तर या विश्वांत जीं मनें माझ्याशीं सदृश अशा स्थितींत असतील त्यांजवर त्या विचारतरंगांचा परिणाम घडणें शक्य आहे. त्याचप्रमाणें कांहीं शुभ कर्म आचरावें अशी इच्छा माझ्या मनांत उद्भवली तर तीमुळें दुसऱ्या प्रकाराचे तरंग उद्भवतात व सदृश स्थितींतील मनांवर आघात करितात. हा तरंगाघात किती सूक्ष्म अथवा किती जोराचा होईल हें पहिल्या मनाच्या शक्तीवर अवलंबून आहे. दुर्बळ मनापासून निघणारे तरंग दुर्बळच असणार व त्यांच्या आघातानें होणारा परिणामही अत्यंत सूक्ष्म होईल हें उघड आहे. तसेंच स्वतःच्या चैतन्यशक्तीची पूर्ण ओळख होऊन जें मन अत्यंत शक्तिमान् झालें असेल त्यांतून उद्भूत होणारे तरंग अति सामर्थ्यवान् असलेच पाहिजेत.

ज्याप्रमाणें ध्वनीचे तरंग एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जातात, त्याचप्रमाणें प्रकाशकिरणहि एकापासून दुसऱ्या स्थलीं जातात. कमी अधिक अंतराच्या मानानें प्रकाशकिरण पोहोंचावयास कमी अथवा अधिक वेळ लागतो. कित्येक ताऱ्यांचा प्रकाश पृथ्वीवर पोहोंचण्यास कित्येक लक्ष वर्षें लागतात. ज्यांचा प्रकाश आपल्या पृथ्वीवर अद्यापि पोहोंचला नाहीं, व त्यामुळें जे अद्यापि आपल्या दृष्टिपथांत आले नाहींत असे तारे विश्वांत आहेत असें ज्योतिषशास्त्राचें मत आहे. त्याचप्रमाणें एका मनावर उठणारे विचारतरंग सदृश स्थितींतील मन सांपडून त्यावर प्रतितरंग उमटवीपर्यंत कदाचित् कित्येक लक्ष वर्षेंहि उलटून जाण्याचा संभव आहे. यावरून आपल्या भोंवतीं असलेलें वातावरण चांगल्या व वाईट अशा दोन्ही प्रकारच्या विचारतरंगांनीं भरून गेलेलें असण्याचा संभव आहे. प्रत्येक मेंदूतून निघणारा तरंग याप्रमाणें हिंडत असतो आणि योग्य ठिकाण सांपडतांच तेथें शिरून बसतो. जें मन स्वतःच्या विचारतरंगांनीं विशिष्ट स्थितीस प्राप्त झालेलें असतें तें आपल्याशीं सदृश असणारे बाहेरील विचारतरंग ताबडतोब ग्रहण करितें. याकरितां कोणतीहि वाईट गोष्ट

करावी असें एखाद्याच्या मनांत आलें ह्मणजे त्याचें मन कांहीं विशिष्ट प्रकारच्या स्थितीला प्राप्त झालेलें असतें व त्या स्थितींत त्यावेळीं स्वतःशीं सदृश अशा वातावरणांतील दुष्ट विचारतरंगांचें तें ग्रहण करितें. यामुळें दुष्ट मनुष्य नेहमींच दुष्कत्यें करतांनां आपणांस आढळतो. दुष्कृत्यें करण्याची त्याची मनःप्रवृत्ति दिवसेंदिवस वाढतच जाते. यासाठीं दुष्कृत्यें करण्याचा विचार आपल्या मनांत येतो त्या वेळीं एक दोनधारी शस्त्रच आपण तयार करीत असल्यासारखें होतें. एक तर, अशा वेळीं बाहेरील दुष्ट तरंगांस आपल्या मनांत घुसावयास दरवाजा उघडून दिल्यासारखें होतें; आणि दुसरें असें कीं आपल्या मनांतून बाहेर पडणारे दुष्ट तरंग दुसऱ्या कोणास तरी अधिक दुष्ट करण्यास कारणीभूत होण्याचा संभव असतो. हा दुसरा परिणाम होण्यास कदाचित् कित्येक वर्षांचा काळ लोटावा लागेल. पण तसा परिणाम केव्हां ना केव्हां तरी होईल हें निश्चित आहे. याकरितां आपण जेव्हां एखादें दुष्कृत्य करितों, त्यावेळीं आपलें नाक कापून दुसऱ्यास अपशकून केल्यासारखें होतें. तसेंच आपण शुभ कर्म केलें तर तें आपणांस जसें कल्याणप्रद होतें तसेंच त्याचा इतरांवरहि इष्ट परिणाम घडतो. मनुष्यांत ज्या कांहीं शक्ती गुप्तपणें वास करीत आहेत. त्या स्वतःशीं सदृश असे तरंग बाहेरून गोळा करितात आणि स्वतः अधिक सामर्थ्यवान् होऊन प्रगट होतात. ‘दैवीसंपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता’ हा भगवद्गीतेचा सिद्धांत प्रत्येकानें नीट लक्षांत बाळगावा.

कोणतेंहि कर्म एक वेळ कर्त्याच्या हातून घडलें ह्मणजे तें फळाला पोहोंचेपर्यंत मध्यंतरीं त्याचा नाश होऊं शकतच नाहीं; असा कर्मयोगाचा सिद्धांत आहे. तें फलद्रूप होण्याच्या आधीं त्याचा नाश करण्यास समर्थ अशी एकहि शक्ति विश्वांत जन्मास आली नाहीं. जर मीं कांहीं दुष्कृत्य केलें तर त्यापासून उत्पन्न होणारें दुष्ट फळ मलाच भक्षण केलें पाहिजे. माझें दुष्कृत्य फलद्रूप होऊं न देणें हें जसें अशक्य आहे तसेंच तें कडु फळ माझ्या तोंडीं न पडेसें करणें हेंहि अशक्यच आहे. तसेंच मीं कांहीं चांगलें कर्म केलें तर त्याचें शुभ फळ प्राप्त न होणें हेंहि अशक्य आहे. कारण उत्पन्न झालें कीं त्याचें कार्य हें घडलेंच पाहिजे. यांत कमीअधिक करण्याचें कोणास सामर्थ्य नाहीं. आतां येथें एक अत्यंत सूक्ष्म विचाराचा प्रश्न उद्भवतो. आपण कोणतेंहि कर्म केलें तरी त्यांत चांगला व वाईट अशा दोन्ही परिणामांची अत्यंत संलग्न अशी स्थिति आढळते. कोणत्याही एका कर्माचे चांगलेच परिणाम होतात व वाईट कांहींच होत नाहींत

असें सांगतां येणें आपणांस अशक्य आहे. ज्याचे चांगले आणि वाईट परिणाम एकाच वेळीं होत नाहींत असें कोणतेंहि कर्म करतां येणें शक्य नाहीं. याचें प्रत्यंतर पहावयास फार लांब जावयास नको. मी या क्षणीं आपणाशीं बोलत आहें. माझें हें कृत्य चांगलें आहे असें तुह्मांपैकीं कांहींस वाटत असेल, पण याच वेळीं माझ्या भाषणाच्या आघातानें हवेंतील हजारों सूक्ष्म जंतु मृत्यु पावत असतील. ह्मणजे माझ्या एकाच कर्मापासून चांगला आणि वाईट असे परस्पर विरुद्ध परिणाम एकाच वेळीं घडत आहेत. एखाद्या कृत्याचे परिणाम प्रत्यक्ष आपल्या नजरेसमोर होत असले आणि त्यामुळें आपल्या ओळखीच्यांपैकीं कोणाचें बरें होत असलें तर तें कर्म सत्कर्म आहे असें आपण ह्मणतों. माझें भाषण हें सत्कर्म आहे असें तुह्मी ह्मणाल पण माझ्या आवाजानें मृत्युमुखीं जाणारे हजारों कीटक काय ह्मणत असतील बरें! तुह्मी आपणा स्वतःस पाहत आहां आणि माझ्या भाषणानें तुमच्या चित्तावर काय परिणाम होतो याचा स्वतः अनुभव घेत आहां. परंतु सूक्ष्म कीटक तुह्मांस दिसत नाहींत आणि त्यांजवर होणारा परिणामहि तुमच्या दृष्टिपथाबाहेरचा आहे; यामुळें माझ्या कृतीचा एकच परिणाम पाहून तुह्मी त्याला सत्कर्म असें नांव देतां. अशाच रीतीनें एखाद्या दुष्कृत्याचें सूक्ष्म अवलोकन केलें तर त्यांतूनहि कदाचित् एखादा चांगला परिणाम कोठें तरी घडत असल्याचें आढळून येईल. स्थूल दृष्टीनें चांगल्या दिसणाऱ्या कर्मांचे वाईट परिणाम पाहण्याइतकी सूक्ष्म दृष्टि ज्याला आहे आणि वाईट कर्मांतूनहि उद्भवणारे चांगले परिणाम जो पाहूं शकतो त्यानेंच कर्मयोगाचें रहस्य खरोखर जाणलें असें समजावें. '**कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः। स बुद्धिमान् मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत्॥**' अशी बुद्धिमानाची व्याख्या गीतेंत सांगितली आहे. असो.

यावरून एवढेंच लक्ष्यांत ठेवावयाचें कीं परक्याच्या सुखदुःखानुरोधें आपल्या कर्मांचा विचार केला तर केवळ सुखोत्पादक अथवा केवळ दुःखोत्पादक असें कोणतेंहि कर्म आपणांस करतां येणें शक्य नाहीं. दुसऱ्या कोणा तरी जीवास दुःख दिल्याशिवाय आपणांस जगणें अथवा श्वासोच्छ्वास करणेंहि शक्य नाहीं. अन्नाचा एक घांस आपण भक्षण करणें ह्मणजे तेवढें अन्न दुसऱ्या कोणाच्या तरी तोंडून बाहेर काढण्यासारखेंच आहे. आह्मीं स्वतः जगणें ह्मणजे पृथ्वीची जागा अडवून दुसऱ्या कोणास तरी जगण्याचा अवसर न देणें असेंच होतें. आपल्यामुळें ज्यांस दुःख होतें ते मनुष्य असोत, पशुपक्षी असोत, अथवा अत्यंत सूक्ष्म जंतु

असोत; पण आपल्या जगण्यामुळें त्यांस उपसर्ग पोहोंचतो व प्रसंगीं त्यांचा प्राणनाशहि होतो ही गोष्ट खरी. यावरून सिद्धांत असा निघतो कीं केवळ कर्म करून पूर्णत्वास पोहोंचणें आपणांस शक्य नाहीं. विश्वाच्या अंतापर्यंत आपण कर्मच करीत राहिलों तर या चक्रव्यूहांतून सुटण्यास आपणांस मार्ग नाहीं. कोणतेंहि आणि कितीहि कर्म केलें तरी त्यांतून सुख आणि दुःख ह्मणजे अनुक्रमें पुण्य आणि पाप यांची उत्पत्ति टाळतां येण्यास मार्ग नाहीं.

आतां या पुढें दुसरा प्रश्न असा उद्भवतो कीं आपल्या ह्या साऱ्या कर्मांचें पर्यवसान तरी कोठें होणार? युगानुयुगें एकसारखें कर्म करून आह्मीं साधणार तरी काय? कित्येक असें ह्मणतात कीं, पुढें केव्हां तरी हें जग पूर्णत्वास पोहोंचणार आहे. ह्मणजे या जगांत दुःख, दुष्टपणा, रोग, मृत्यु इत्यादिकांचें जें पूर्ण साम्राज्य आपणांस दिसत आहे तें नाहींसें होऊन सर्व सृष्टि सुखानें नांदत असण्याचा काळ पुढें येईल. असें उत्तर देणारे शेंकडों लोक तुह्मांस प्रत्येक देशांत आढळतील. ही कल्पना मोठी सुखकर आहे खरी; अज्ञजनांस चांगल्या कर्मांस उत्तेजित करण्यास आणि दुःखप्रसंगीं आधार ह्मणून या कल्पनेचा उपयोग करितां येईल हेंहि खरें; परंतु ती केव्हां तरी सत्यत्वास येणें शक्य आहे काय, एवढाच काय तो विचाराचा प्रश्न आहे. क्षणभर विचार केला तर जग अशा स्थितीस येईल ही कल्पना निव्वळ अशक्य कोटीपैकीं आहे, असें आपणांस आढळून येईल. अगदीं वरवर विचार करणारासहि या कल्पनेची अशक्यता दिसून येण्याजोगी आहे. एका धातूच्या तुकड्यावर दोन बाजूस दोन शिक्के मारिले ह्मणजे त्यास नाणें अशी संज्ञा प्राप्त होते. हे शिक्के निघून गेले ह्मणजे त्याबरोबर त्या तुकड्याचें नाणेपणहि नष्ट झालें नाहीं काय? तसेंच जगाची उत्पत्ति आणि स्थिति हीं जर सुख आणि दुःख या द्वंद्वाच्या अस्तित्वावरच अवलंबून आहेत तर यांपैकीं कोणतेंहि एक नष्ट झालें कीं जगाचेंहि अस्तित्व संपलेंच. सुख आणि दुःख या दोन्ही कल्पना सापेक्ष आहेत. यांपैकीं कोणत्याहि एकीमुळेंच दुसरीचा अनुभव होतो. यांतील कोणतीहि एक नष्ट झाली तर दुसरीचें अस्तित्व संपुष्टांत आलेंच ह्मणून समजावें. केवळ सुखोत्पादक असें एकहि कर्म करतां येणें शक्यच नाहीं, हें नुक्तेंच आपण पाहिलें. तर मग पूर्णत्व या शब्दाचा अर्थ काय? पूर्ण जीविताची कल्पना ह्मणजे वंध्यासुताची काहाणी आहे. आपलें सर्व जीवित केवळ चढाओढीवर अवलंबून आहे. सुखाची इच्छा उद्भवली कीं, तदनुरूप आपण कर्म करूं लागतों. आपण कर्म करूं लागलों ह्मणजे

कोणाना कोणास तरी तें दुःखप्रद होणारच. मग सर्व जग सुखी होईल ही कल्पना ह्मणजे वंध्यासुताची काहाणी नव्हे तर काय ? प्रत्येक क्षणीं आपल्या सुखासाठीं आपण कोणाना कोणाबरोबर तरी लढत असतोंच. आपला जय झाला तर आपल्या कल्पनेप्रमाणें कांहीं सुखप्राप्ति झाल्यासारखें होतें. पराभव झाला तर, एक तर जीवित नष्ट होणार अथवा पुन्हां दुसऱ्या लढाईस सुरवात होणार! आपल्या जीवितास अत्यंत आवश्यक असें अन्न आणि हवा हीं सुद्धां लढाई केल्यावांचून आपणांस प्राप्त होत नाहींत. यांपैकीं कोणतेंहि एक आपणास प्राप्त झालें नाहीं तर आपलें जीवित संपलेंच. जीवित हें कोणत्याहि एकाच वस्तूमुळें झालेलें नसून अनेक वस्तूंच्या समीकरणाचा तो परिणाम आहे. हा देहांतर्गत वस्तुसमुच्चय एकीकडे आणि बाह्य जग दुसरीकडे असून यांजमधील युद्धास जीवित अशी संज्ञा आहे. या युद्धाचा शेवट आणि जीविताचा शेवट हीं दोन्ही बरोबरच घडतात. यावरून सुखमय अथवा पूर्ण जगाची कल्पना ह्मणजे केवळ मृगजलाभास आहे.

तर मग चिरंतन सुखमय स्थिति शक्यच नाहीं असें तुमचें ह्मणणें आहे काय? नाहीं. असें आमचें ह्मणणें नाहीं. ज्या वेळीं सुख आणि दुःख, पाप आणि पुण्य इत्यादि द्वंद्वें पूर्णपणें नाहींशीं होतील त्यावेळीं सुखमय स्थिति तुह्मांस प्राप्त होईल. पण अशी स्थिति प्राप्त होण्याबरोबर चालू जीवनक्रमाचा मात्र अंत होईल. चालू जीवनक्रमाचा अंत झाल्याशिवाय–द्वंद्वें बंद झाल्याशिवाय–सुखमय स्थितीची प्राप्ति नाहीं; अशी ही परंपरा आहे. आपण परोपकारार्थ ह्मणून जीं कर्में करितों तीं वस्तुतः स्वतःसच उपकारक होतात, हें आपण पूर्वी सिद्ध केलेंच आहे. जीं जीं कर्में आपण परोपकारार्थ ह्मणून करितों त्या सर्वांचा संकलित परिणाम ह्मटला तर आत्मशुद्धि हा होय. परोपकाराची इच्छा जों जों बळावत जाते तों तों आपला अहंकार मावळत जातो. परहिताचें चिंतन आपण करूं लागलों ह्मणजे स्वसुखलालसा आपोआपच कमी होऊं लागते. स्वसुखलालसा कमी होऊं लागली, ह्मणजे आपणांस अत्यंत चिकटून राहिलेल्या देहाध्यासाची मिठी सुटूं लागते. जी आपणांस आपल्या जीवनक्रमांत अत्यंत महत्वाची अशी जी कांहीं गोष्ट शिकावयाची आहे ती अहंकारविस्मृति ही होय. जगाबरोबर एकसारखें युद्ध करून मी स्वतःस सुखी करीन, असा जो आपला समज आरंभीं असतो तो मूर्खपणाचा आहे असा प्रत्यक्ष अनुभव आपणांस येऊं लागतो. सुख हें बाहेरून कोठून मिळविण्याजोगी चीज नसून ती आपल्यापाशींच आहे

व आपलपोटेपणा–अहंकार–विसरल्यावांचून तिची प्राप्ति होत नाहीं, असें ज्ञान आपणांस होतें. परोपकारार्थ केलेलें प्रत्येक कर्म, सहानुभूतीचा प्रत्येक विचार आणि प्रत्येक सत्कर्म आपणांतील अहंकार कमी करण्यास कारणीभूत होतें. आपणांतील अहंकार जसजसा कमी होत जाईल, तसेंतसें आपलें स्वतःचें क्षुद्रत्व अधिक ढळढळीतपणें आपणांस दिसूं लागतें. परोपकाराचा हा खरा उपयोग आहे. ज्ञान, भक्ति, आणि कर्म यांनीं दाखविलेले निरनिराळे मार्ग एकत्र होण्याचा हाच मध्यबिंदु आहे. अहंकार संपूर्णपणें विसरून गेला ह्मणजे 'मी'-पण नष्ट होतें व त्याजागीं 'तूं'पण येतें. सर्व प्रकारचीं द्वंद्वें नष्ट झालीं, दृश्य जग नाहींसें झालें आणि शेवटीं जें कांहीं उरलें तें 'मी' नसून 'तूं' उरलें आहे. जिकडे पाहावें तिकडे 'मी' नसून 'तूं' दिसतें आणि अंतर्यामींहि 'मी' नसून 'तूं' उरतें. कर्मयोगाच्या आचाराचें शेवटीं हेंच पर्यवसान व्हावयाचें. कर्मयोगाचा आचार तुह्मीं समजून करा अथवा न समजतां करा पण तुमचें आचरण जर कर्मयोगाच्या तत्वांस अनुसरून होत असेल तर त्याचा निश्चित परिणाम हाच व्हावयाचा. अशा रीतीनें निराकार परमरूपाशीं ऐक्य होणें हेंच सर्व योगांचें साध्य आहे. धर्मोपदेश हा ज्यानें पोटाचा धंदा केला आहे, अशा उपदेशकाला निराकार परमेश्वर आणि त्याशीं ऐक्य ही कल्पनाच भयंकर वाटेल. परमेश्वर साकार असून भक्त हा त्यापासून नेहमीं निराळाच राहणार असें तो ह्मणेल. आपण बोलतों त्याचा वास्तविक अर्थहि त्याला कळणार नाहीं; पण असें ह्मणणें हेंच त्याच्या फायद्याचें आहे. त्याच्या नीतिविषयक कल्पना कितीहि उच्च दर्जाच्या असल्या तरी 'मी'पण विसरण्याइतकी त्याची मजल कधींहि जाणार नाहीं. वास्तविक विचार केला तर 'मी'पण विसरणें हाच सर्व नीतिसिद्धांतांचा पाया आहे. 'मी'पण संपूर्ण विसरल्याशिवाय खरी भक्ति करणें–खरें प्रेम करणें–हेंहि शक्य नाहीं. मग हें प्रेम मनुष्यांविषयीं असो, पशुपक्ष्यांविषयीं असो, देवदूतांविषयीं असो, अथवा आत्म्याविषयीं असो. सर्व नीतिसिद्धांतांच्या पोटीं हेंच तत्व ग्रथित असल्याचें आपणांस आढळेल.

या जगांत आपणांस अनेक प्रकारचे लोक आढळून येतात. कित्येक पूर्ण संन्यासी असतात. आयुष्य संपेपर्यंत केवळ लोकांच्या बऱ्याकरितां हे कर्मे करितात. कोणाचें कल्याण यांच्या प्राणनाशानें होत असलें तर तोहि करावयास ते मागें पुढें पाहणार नाहींत. यांना स्वतःच्या देहाविषयीं ममता यत्किंचितहि आढळणार नाहीं. सर्वांत हीं अत्युच्च कोटीचीं मनुष्यें होत. एखाद्या राष्ट्रांत जर

अशीं शंभर मनुष्यें निर्माण झालीं तर अशा राष्ट्रास अवनतीची भीति नको. परंतु मनुष्यजातीचें बलवत्तर दुर्दैव ह्मणून अशीं मनुष्यें फारच क्वचित् आढळतात. यानंतर दुसऱ्या प्रतीचे लोक ह्मटले ह्मणजे स्वतःला उपाधि न होतां, पडवेल तितकें लोकांच्या उपयोगीं पडावयाचें अशी इच्छा बाळगणारे हे होत. आणि तिसऱ्या प्रतीचे ह्मटले तर केवळ आपल्याच सुखाकरितां जगणारे लोक होत. प्रसंगीं परक्याचा जीव गेला तरी हरकत नाहीं, पण हे आपल्या सुखांत कमी पडूं देणार नाहींत. यानंतर आणखी चवथा प्रकार एका संस्कृत कवीनें सांगितला आहे; व त्यांस त्यानें निनांवी कोटींत ढकललें आहे. ह्मणजे त्यांस नांव काय द्यावें याची कल्पना कवीस झाली नाहीं. हे लोक केवळ मौजेखातर इतरांस पीडा करितील. लोकांना त्रास दिला ह्मणजे यांच्या आयुष्याची इतिकर्तव्यता झाली ! पृथ्वीस जसे परस्परविरुद्ध असे दोन ध्रुव आहेत तसेच मानवसमाजालाहि दोन ध्रुव आहेत. स्वतः जिवाची पर्वा न करितां परक्याचें बरें करावयाचें हा एक ध्रुव, आणि स्वतःच्या जिवाची पर्वा न करितां परक्याचें अनिष्ट करावयाचें हा दुसरा ध्रुव. परक्याचें इष्ट करावयाचें हा जसा पहिल्याचा स्वभाव, तसाच परक्याचें अनिष्ट करावयाचें हा दुसऱ्याचा स्वभाव.

प्रवृत्ति आणि निवृत्ति असे दोन शब्द संस्कृत भाषेंत नेहमीं आढळतात. प्रवृत्ति ह्मणजे आंत घेणें आणि निवृत्ति ह्मणजे बाहेर टाकणें. आंत घेणें ह्मणजे सदोदित 'मी' आणि 'माझें' हाच विचार करणें. ज्या ज्या कारणांनीं 'मी' आणि 'माझें' या विचारास पुष्टि मिळते तीं सर्व कारणें प्रवृत्तिपर होत. यांत द्रव्य, सामर्थ्य आणि कीर्ति इत्यादिकांचा अंतर्भाव होतो. यांचा पगडा चित्तावर बसला ह्मणजे जगांतील सर्व संपत्ति, सर्व सत्ता आणि सर्व कीर्ति हीं या एका 'मीं'त सांठून राहावीं अशी इच्छा उद्भवते. जगांतील सर्व संपत्ति इत्यादिकांचें केंद्रस्थान या 'मीं'त येऊन राहतें. यालाच प्रवृत्ति असें ह्मणतात. जगांतील सर्व सामान्य मनुष्यांची बुद्धि प्रवृत्तीकडे वळलेली असते; ही बुद्धि मावळूं लागली ह्मणजे निवृत्तीचा उदय होऊं लागतो. व तिच्या उदयाबरोबर नीति आणि धर्म यांच्या कल्पनांचा उदय होऊं लागतो. प्रवृत्ति आणि निवृत्ति हे दोन्ही कर्मांचे परिणाम आहेत. सहेतुक कर्मांचा परिणाम प्रवृत्ति आणि अहेतुक कर्मांचा परिणाम निवृत्ति. जगांतील सर्व धर्मांचा आणि नीतिशास्त्रांचा पाया ह्मटला ह्मणजे निवृत्ति हाच होय. 'माझें' आणि 'मी' हे शब्दहि विसरून जाणें, आणि परक्याकरितां प्रसंगीं जीव देण्यासहि न कचरणें ही निवृत्तीची परि-

चक्र दशा होय. आपल्या मनाची इतकी तयारी झाली ह्मणजे कर्मयोगाच्या शेवटच्या पायरीस आपण पोहोंचलों असें होतें. सर्व चांगल्या कर्मांचें हेंच अत्युच्च फळ आहे. एखाद्यानें कोणत्याहि तत्वग्रंथाचा अभ्यास केला नसला, परमेश्वरावर त्याचा मुळींच विश्वास नसला, साऱ्या जन्मांत त्यानें प्रार्थनापर असा एकहि शब्द उच्चारला नसला तथापि सत्कर्मांनें त्याची बुद्धि पूर्ण निवृत्तिपर झाली असली तर अत्यंत धार्मिक असा मनुष्य भक्तीनें ज्या ठिकाणीं जाईल अथवा मोठा तत्ववेत्ता ज्ञानानें जें ठिकाण हस्तगत करील तें ठिकाण या कर्मयोग्यासहि प्राप्त होईल. यावरून ज्ञानी, कर्मयोगी आणि भक्त हे सर्व शेवटीं एकाच ठिकाणीं मिळतात, असें तुमच्या लक्ष्यांत येईल. जेथें 'मी' आणि 'माझें' या शब्दांचीहि विस्मृति होते तेंच तें ठिकाण. यालाच संन्यस्तवृत्ति असेंहि ह्मणतात. कोणत्याहि धर्माचा, पंथाचा अथवा तत्वविचाराचा कोणी मनुष्य असला तरी खऱ्या संन्यस्तवृत्तीच्या मनुष्याबद्दल त्याच्या मनांत अत्यंत आदरबुद्धि उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहीं. परक्याकरतां आपलें सर्वस्व व प्रसंगीं जीवहि दान करण्याची ज्याची खरी तयारी आहे अशा मनुष्याबद्दल कोणाच्याहि मनांत अत्यंत पूज्यबुद्धि उत्पन्न झालीच पाहिजे. या ठिकाणीं पंथाचा, मताचा अथवा धर्माचा प्रश्नच उद्भवत नाहीं. अगदीं विरुद्ध मतांच्या धर्माचा अथवा पंथाचा कोणी असला तरी अशा मनुष्याबद्दल त्याला नकळतहि त्याच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होते. एडविन् आर्नोल्ड यांनीं 'आशियाखंडाचा दीप' (Light of Asia) या नांवानें एक बुद्धाचें चरित्र लिहिलें आहे; तें वाचून एखाद्या आग्रही ख्रिस्त्याच्या मनांतहि बुद्धाबद्दल पूज्यभाव उत्पन्न झाल्याचें तुह्मीं पुष्कळवेळां पाहिलें असेल. बुद्ध निरीश्वरवादी होता. त्यानें भक्तिमार्गाचा कधींहि उपदेश केला नाहीं. त्यानें विशिष्ट असा तत्वमार्गहि शोधून काढिला नाहीं. त्यानें केवळ संन्यस्तवृत्तीचा उपदेश केला. परक्यासाठीं आपलें सर्वस्व व प्रसंगीं आपला जीवहि अर्पण करा, एवढाच त्याचा उपदेश आहे. सर्व धर्मांचें, सर्व पंथांचें, सर्व मतांचें आणि सर्व तत्वदर्शनांचें अंतिम साध्य एकच आहे, ही गोष्ट आग्रही मनुष्याच्या लक्ष्यांत आलेली नसते ह्मणूनच तो एका विशिष्ट मताचा अथवा धर्माचा आग्रह धरून बसतो. भक्तिमार्गाची अगदीं शेवटली पायरी ह्मटली ह्मणजे सर्वत्र परमेश्वराचेंच अधिष्ठान पाहणें ही होय. खऱ्या भक्ताच्या मनांत 'मी' आणि 'माझें' या शब्दांची आठवणहि शिल्लक उरत नाहीं. कसल्याहि स्थितींत 'परमेश्वरा, तुझी मर्जी' असेंच तो ह्मणतो. जगांत 'माझें' कांहीं नाहीं. जें कांहीं आहे तें

'तुझें' आहे, हा निश्चय त्याच्या अंतःकरणांत पूर्ण बाणून गेलेला असतो. ही पूर्ण संन्यस्तवृत्ति नव्हे तर काय? ज्ञानाची शेवटची पायरीसुद्धां ही संन्यस्तवृत्तीच होय. जग हें काय आहे, मी कोण आणि विश्वचैतन्याचें स्वरूप काय आहे इत्यादिकांचा शोध करतां करतां सर्व जग केवळ मृगजलाभास आहे; दिसतें तसें तें नाहीं; तें प्रत्येक क्षणीं बदलत आहे यामुळें तें अनिश्चित स्वरूपाचें आहे–मायानिर्मित आहे–असा त्याचा पक्का निश्चय होतो. जग अनित्य स्वरूपाचें आहे असा निश्चय एकवेळ बाणून गेल्यावर त्यांतील कोणत्या पदार्थांची त्यानें इच्छा करावी? अशा रीतीनेंच तो पूर्णत्यागी–पूर्ण संन्यस्तवृत्तीचा–बनतो. यावरून कर्म, भक्ति आणि ज्ञान यांचें अंतिमसाध्य–अंतिम पर्यवसान–एकच आहे असें सिद्ध होतें. जगांत जे मोठे धर्मप्रवर्तक होऊन गेले, त्यांनीं निरनिराळ्या मार्गांनें या एकाच तत्वाचा उपदेश केला आहे. 'परमेश्वर जगांत नाहीं' असें जें त्यांनीं सांगितलें त्याचा वास्तविक अर्थ, जगांतील वस्तूंच्या मागें लागून परमेश्वराची प्राप्ति होणार नाहीं, हाच आहे. जगाचें जें स्वरूप आहे त्याहून परमेश्वराचें स्वरूप अगदीं भिन्न आहे असें त्यांनीं सांगितलें. 'मी' आणि 'माझें' ही बहुधा सर्वत्र आढळून येणारी प्रवृत्ति हें जगाचें स्वरूप आहे, आणि या स्वरूपापासून निवृत्त होणें ह्मणजे परमेश्वररूप होण्यासारखें आहे. प्रवृत्ति हें जगाचें स्वरूप आणि निवृत्ति हें परमेश्वराचें स्वरूप आहे. एखादा मनुष्य रत्नजडित सुवर्णाच्या राजवाड्यांत राहत असून आणि सर्व प्रकारचे भोग भोगीत असूनहि जर त्याच्या मनांतून 'मी' आणि 'माझें' यांची आठवण गेली तर त्यालाहि पूर्ण संन्यासी ह्मणतां येईल. तसेंच पर्णकुटींत राहणारा आणि अंगावर फाटक्या लंगोटीवांचून दुसरें वस्त्र नसणारा असा कोणी असून जर जगांतील वस्तूंचा हव्यास त्याच्या मनांतून गेला नसेल तर तो संन्यासी नसून पूर्ण संसारीच ह्मटला पाहिजे.

आपण कोणतेंहि कर्म केलें तरी त्यांतून चांगला आणि वाईट असे दोन्ही परिणाम घडून येतात. केवळ चांगलें अथवा केवळ वाईट असें एकहि कर्म आपणास करतां येत नाहीं, याचा विचार आपण पूर्वीं केलाच आहे. तर मग आह्मीं कर्म तरी कसें करावें हा प्रश्न साहजिक उद्भवतो. या प्रश्नाचें उत्तर देण्याच्या भानगडींत पडून जगांतील कित्येक पंथाचे प्रवर्तक बेसुमार वाहावले आहेत. कोणाला तरी दुःख दिल्यावांचून स्वतःस सुखाची प्राप्ति करून घेतां येत नाहीं, असें पाहून स्वतःच्या गरजा कमी करतां करतां शेवटीं मरून जावयाचें

अशी तोड त्यांनीं काढिली. जणूं काय आपण मरून जाणें हीच जन्माची इतिकर्तव्यता आहे ! आपण जगावयाचें ह्मटलें तर प्रत्यक्ष अथवा परंपरेनें कोणा तरी प्राण्याची हत्या आपणांस करावी लागणारच. त्या अर्थी आपला देह नाहींसा करावा ह्मणजे सर्व पापांचें मूळच नाहींसें होईल असा त्यांचा समज असावा, असें वाटतें. जैनधर्माचें हेंच साध्य ह्मणून सांगितलें आहे. वरवर विचार करणारास ही विचारपद्धति सुसंगतशी दिसते; परंतु कर्म ह्मणजे काय, कोणत्या कर्माचे काय परिणाम होतात आणि ते कोणावर होतात, याचा विचार केला ह्मणजे वरील विचारपद्धतीचा पोरकटपणा तेव्हांच उघड दिसून येतो. याचा उलगडा भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत केला आहे, तो असाः—जें जें कर्म तुह्मीं स्वतःच्या इंद्रियसुखलालसेनें कराल तें तें तुह्मांस बद्धक होईल. 'मी-' पणा टाकून व कर्ताकरविता निराळाच आहे असें पक्केपणीं समजून जें कर्म तुह्मीं कराल त्याचें बरें अथवा वाईट फळ तुह्मांस भोगावें लागणार नाहीं. कोणतेंहि कर्म करतांना हेतु प्रथम शोधावा. स्वतःच्या सुखेच्छेच्या प्रेरणेनें आपण कर्मास प्रवृत्त होत असलों तर त्याचे परिणाम आपणांस भोगलेच पाहिजेत. आणि तसें नसेल तर ते आपणांस भोगण्याचें कारण नाहीं. कर्मयोगदृष्ट्या नुसती कृति गौण असून हेतु प्रधान आहे. स्वसुखेच्छेची प्रेरणा नसतां जर तुह्मीं सर्व विश्वाचा वध केलात अथवा स्वतः मारले गेलांत तरी त्या कृत्याचें कोणतेंच बरें अथवा वाईट फळ तुह्मांस भोगण्याचें कारण नाहीं. अशावेळीं त्या बऱ्यावाईट कर्माचें कर्तृत्वच तुमच्याकडे नसतें, असा भगवान् श्रीकृष्णांच्या सांगण्याचा सारांश आहे. यासाठीं कर्मयोगाचें सांगणें असें आहे कीं "बाबांनो, संसार सोडून उगीच रानांत जाऊन राहूं नका. जगांत राहून संसार करतां करतां जगाचे जे जे अनुभव येतील ते ते सर्व घ्या. कर्म करणें तें त्यापासून सुख होईल या आशेनें करूं नका. त्यापेक्षां कर्म न केलेलें बरें. इंद्रियांची तृप्ति ही जीविताची इतिकर्तव्यता नव्हे. ह्मणून प्रथम 'मी'पण विसरा, ह्मणजे 'मी' आणि जग एकच असा अनुभव तुह्मांस येईल. आपल्या इंद्रियांची तृप्ति करण्याकरितां 'जग' निर्माण झालें आहे ही कल्पना जाळून टाका." कांहीं कांहीं लोक आपल्या मुलांबाळांस असें शिकवित असतात कीं, हें सारें विश्व सूर्य, चंद्र वगैरे—परमेश्वरानें मनुष्यांच्या सुखासाठीं रचलें आहे. जणूं काय परमेश्वराला दुसरा चांगला उद्योगच नव्हता ! मित्रांनो, आतां यापुढें मुलांबाळांना असल्या मूर्खपणाच्या गोष्टी शिकवूं नका. दुसरे कांहीं लोक असें ह्मणणारे आहेत कीं

बकरीं वगैरे जनावरें आमच्या खाण्याच्या उपयोगी पडावीं ह्मणूनच परमेश्वरानें निर्मिलीं आहेत! हा सर्व मूर्खपणाचा बाजार आहे. उद्यां एखादा वाघहि असेंच ह्मणूं लागेल कीं परमेश्वरानें सर्व मनुष्यें माझ्या पोटासाठीं निर्माण केलीं आहेत. तोहि उद्यां प्रार्थना करूं लागेल कीं 'परमेश्वरा, हीं मनुष्यें मजपुढें येऊन उभीं राहत नाहींत तर तीं केवढीं पापी आहेत! तीं तुझा कायदा मोडीत आहेत!' जर जग आमच्यासाठीं निर्माण झालें असेल तर आह्मींहि जगासाठीं निर्माण झालों नाहीं काय? सर्व जग माझ्यासाठीं निर्माण झालें आहे, ही घातुक कल्पनाच आमच्या साऱ्या अवनतीच्या मुळाशीं आहे. कोटयवधि मनुष्यें या जगांतून दरवर्षी नाहींशीं होतात आणि कोटयवधि जन्मास येतात. जगाचें हें रहाटगाडगें अनंतकाल चालू आहे आणि अनंतकाल चालू राहणार.

यासाठीं सशास्त्र कर्म करावयाचें ह्मटलें तर अगोदर आशेचा त्याग केला पाहिजे. त्यानंतर मी करतों, मी भोगतों, असल्या भावनांचा त्याग केला पाहिजे. या भावनांमुळेंच तुह्मीं आणि कर्म हीं इतकीं एकजीव होऊन बसतां कीं युगानुयुगें तुह्मीं कर्म करीत राहिलां तरी ही जोडी फुटणें अशक्य होतें. यासाठीं कर्म करीत असतां तुह्मीं केवळ साक्षित्व स्वीकारिलें पाहिजे. अलिप्तपणें प्रत्येक कर्म करावयाचें, ह्मणजे त्यांतील यशानें हुरळावयाचें नाहीं अथवा अपयशानें म्लान व्हावयाचें नाहीं. अशा बुद्धीनें तुह्मीं कर्म करूं लागलां ह्मणजे साक्षित्व याचा बरोबर अर्थ तुह्मांस कळूं लागेल. माझे सद्गुरु ह्मणत असत कीं, 'आपल्या मुलांबाळांकडे तुह्मीं दाईच्या दृष्टीनें पहा.' दाईजवळ दुसऱ्या कोणाचें मूल असलें तरी ती त्याच्याशीं इतक्या लडिवाळपणें बोलेल, खेळेल आणि त्याचे लाड करील कीं जणूं काय तें तिचेंच मूल आहे! परंतु घरधन्यानें तिला नोकरींतून कमी केलें कीं त्याचक्षणीं आपलें लुगडें चोळी कांखोटीस मारून ती तडक घराबाहेर चालती होईल. घराकडे ती परतून बघणारहि नाहीं. मुलावरचें तिचें प्रेम एका क्षणांत लयास जातें. तुमच्या मुलांस सोडून दुसऱ्याच्या मुलांस घेण्यासाठीं तिचे हात त्याचक्षणीं तयार असतात! अशाच रीतीनें तुह्मी या जगांत सदोदित राहिलें पाहिजे. जी कांहीं चीजवस्त तुमच्यापाशीं आहे ती वास्तविक परमेश्वराची. त्यानें ती कांहीं वेळ संरक्षणार्थ तुमच्या स्वाधीन केली आहे, असेंच तुह्मीं सदोदित समजलें पाहिजे. अमुक चीजवस्त 'माझी' असें तुह्मीं ह्मणूं लागलां कीं त्याचक्षणीं मोह तुह्मांस पछाडतो व दुर्बळ करितो. तुमचें सुखदुःख त्या वस्तूच्या असण्यानसण्यावर

अवलंबून राहूं लागतें, आणि मी 'स्वतंत्र' आहें, 'परमेश्वरूप' आहें, ही भावना नाहींशी होऊन तुह्मीं आपल्या परमेश्वरस्वरूपापासून लांब जातां.

आतां याहूनहि परतंत्रतेचें एक अधिक भयंकर स्वरूप आहे. अमुक मनुष्य आपला शत्रु आहे असें निश्चित समजलें ह्मणजे त्याबद्दल सावधगिरी बाळगणें थोडें सोपें होतें; पण तोच जर प्रच्छन्न शत्रु असला—मित्रत्वाचें पक्कें सोंग घेऊन आला असला, तर त्याचा कावा आपणांस केव्हां गळफांस लावील याचा नेम नाहीं. तसेंच जे दुर्गुण ह्मणून उघडपणें दिसतात त्यांचा संपर्क आपणांस होऊं नये अशी खबरदारी घेणें सोपें आहे; परंतु दुर्गुणांनीं सद्गुणांचें रूप घेतलें ह्मणजे त्यांचा मोह अनिवार असतो. असें समजा, कीं, आपण श्रीमंत आहों आणि परोपकार करण्याची बुद्धि आपणांस आहे. अशा वेळीं अनेक गरीब दुबळे आपला आश्रय करितात. गरीब दुबळ्यांस आश्रय देणें ही गोष्ट वस्तुतः पुण्यकारक आहे. पण तीमुळेंच अभिमानाचें वारें हळूहळू आपल्या मनांत शिरूं लागतें. 'मी इतक्यांचा पोषक आहें,' 'इतक्या मनुष्यांचें सुखदुःख मजवर अवलंबून आहे' असले क्षुद्र विचार हळूच आपल्या मनांत शिरून बसतात. सामान्य जनतेकडूनहि असल्या विचारांस प्रोत्साहनच मिळतें. 'अमुक मनुष्य मोठा उदार, दिलदार आणि परोपकारी आहे' असा प्रवाद आपल्या कानीं येऊं लागला कीं आपला अहंकार–अभिमान–बळावूं लागतो, आणि सद्गुणाचें स्वरूप हळू हळू पालटाव-यास लागून शेवटीं त्याचें दुर्गुणांत पूर्ण रूपांतर होतें. वास्तविक विचार केला तर सर्व मनुष्यें परमेश्वरस्वरूप असल्यामुळें त्यांना स्वतःच्या सुखासाठीं दुसऱ्या कोणाच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग यावा ही आनंदाची गोष्ट आहे काय? आप-णांवर अवलंबून राहणारांची ही स्थिति खचित आनंददायक नाहीं. असें अस-तां त्यांच्या दुःखांत आपण आनंद मानणें हें खचित पाप होय. त्यांच्या स्थिती-बद्दल आपणांस वास्तविक वाईट वाटलें पाहिजे. दुसरा विचार असा कीं आपण जन्मासहि आलों नसतों तर त्यांचें कांहीं अडून राहिलें असतें काय? आपणा-वर कोणाचेंहि सुखदुःख अवलंबून नाहीं. जो तो आपापल्या कर्मानुसार सुख-दुःख भोगीत असतो, हें तत्व आपल्या हृदयांत पूर्णपणें बाणवून ठेवलें पाहिजे. सर्वांचा पोषक, सर्वांचा साहाय्यकर्ता निराळाच आहे. त्याच्याच योजनेप्रमाणें कांहीं मनुष्यांस तो आपणाकडे पाठवितो. त्यांस आपण आपल्या पदरची एक काडीहि देत नसून त्यांचेंच त्यांस आपण परत देत असतों. आह्मांसारखे कोटय-वधि कर्ण जन्मासहि आले नाहींत तरी जगांतील दुःखांत रतिभरहि भर पडा-

वयाची नाहीं. यासाठीं नित्य लक्ष्यांत बाळगण्यासारखी गोष्ट ही कीं, परोपकाराचा हा हक्क परमेश्वराकडून तुम्हांस कांहीं काल प्राप्त झाला आहे. याचा सदुपयोग तुह्मीं केलात तर दुसरे हक्कहि तुह्मांस प्राप्त होणार आहेत; पण दुरुपयोग केलात तर हा हक्क जाऊन दुसरे मिळावयाचे तेहि मिळणार नाहींत. यासाठीं या हक्काचा सदुपयोग करून त्यापासून जें कांहीं शिकावयाचें असेल तें शिकून घेऊन आपल्या ईश्वरत्वाकडे एक पायरी अधिक चढणें हें आपलें कर्तव्य आहे. आपणांस ही अनुपम संधि प्राप्त झाली आहे, तिचा आपण योग्य फायदा करून घेतला तर जगांत आपणांस दुःख प्राप्त होण्यास फारसें कारण उरणार नाहीं. तुम्ही अगदीं राज्यावर बसलां असलां आणि शेंकडों नोकरांचे धनी असलां, तरी जोंपर्यंत वरील तत्व तुम्हीं पक्कें लक्ष्यांत बाळगून वागत असाल तोंपर्यंत तुम्हांस दुःख होईल असें कांहीं करण्याची कोणासहि इच्छा व्हावयाची नाहीं. तुमचे कांहीं मित्र या वर्षी कालवश झाले असतील, त्यांच्यासाठीं जग वाट पाहत बसलें आहे काय ? त्याच्या सतत चालू असणाऱ्या प्रवाहांत कोठें लहानसा तरी बांध पडला आहे काय ? नाहीं. तो अगदीं पूर्वींप्रमाणेंच चालू आहे. यासाठीं जगाकरितां ह्मणून आपणांस कांहीं करावयाचें आहे ही भावना टाकून द्या. जगाला मदत करण्यासाठीं आपला जन्म झाला असें वाटणें हा निर्भेळ मूर्खपणा आहे. हा दुरभिमान सद्गुणाचें सोंग घेऊन आलेला आहे हें पुष्कळ वेळां आपल्या लक्ष्यांत येत नाहीं. कर्मांपासून जी दुःखप्राप्ति होते तिचें कारण दुरभिमान हेंच आहे. कोणाचेंहि कोणावांचून अडत नाहीं, हा सिद्धांत आपण एक वेळ पक्का हृदयांत बाळगिला ह्मणजे अभिमानयुक्त कर्मांचें फल जें दुःख तें आपणास मिळण्याचें कारण उरत नाहीं. आपण कोणास कांहीं दिलें व त्याजबद्दल कृतज्ञतेच्या एखाद्या शब्दाचीहि अपेक्षा केली नाहीं तर अशा मनुष्याच्या कृतघ्नपणानें आपणांस वाईट वाटण्याचें कारणच उरत नाहीं. जिची आपणास अपेक्षाच नव्हती अशी वस्तु मिळाली नाहीं तर त्याचें दुःख काय आहे ? यासाठीं कोणास कसल्याही प्रकारची मदत करतांनां केवळ कर्तव्यबुद्धि जागृत ठेवावी. त्याला साहाय्य करण्याचें काम परमेश्वरानें आपणाकडे सोंपविलें आहे, आणि परमेश्वर दाता असून आपण केवळ साधन आहों असा आपल्या बुद्धीचा निश्चय झाला पाहिजे. आपणाकडून दुसऱ्यास जें कांहीं प्राप्त होतें तें वास्तविक त्याच्या कर्मांचें फल असतें. आपल्या कर्मांमुळें साधनीभूत होणें, हें आपल्याकडे येतें. अशी वस्तुस्थिति असतां मी देणारा

आणि तो घेणारा असें म्हणून गर्व वाहण्याचें तुम्हांस यत्किंचित् तरी कारण आहे काय ? आपण परोपकाराची कांहीं गोष्ट केली म्हणजे जगाचें आपण बरें केलें असें आपल्यास वाटतें; पण बरें म्हणजे काय आणि वाईट म्हणजे तरी काय ? परिस्थितीच्या दोन विशिष्ट स्वरूपांस हीं नांवें आपणच दिलीं आहेत. आपल्या मनांत एखादी लालसा उत्पन्न झाली असतां ती ज्यायोगें तृप्त होईल तें बरें आणि याच्या उलट स्थिति असणें म्हणजे तें वाईट, अशा आपल्या व्याख्या आहेत. परंतु कसल्याच प्रकारच्या लालसा ज्याला उरल्या नाहींत त्याला कांहीं बरें नाहीं आणि कांहीं वाईटही नाहीं. यासाठीं 'मी' आणि 'माझें' या कल्पनाद्वयापासून उद्भवणाऱ्या इच्छेचा त्याग केला, तर बरें आणि वाईट, सुख आणि दुःख या द्वंद्वाचा नाश आपोआपच होईल. इच्छेचा त्याग करावा हें म्हणणें जितकें सोपें आहे त्याहून तसें करणें शतपट अधिक कठीण आहे, ही गोष्ट मलाहि कबूल आहे. परंतु हें असिधाराव्रत तडीस गेलें तर कोणत्या पदाची प्राप्ति होणार आहे, याची थोडी तरी कल्पना ज्याला होईल तो हें व्रत आनंदानें स्वीकारील. हें व्रत जसजसें सिद्ध होऊं लागतें तसतसे आपण अधिक स्वतंत्र होऊं लागतों. वास्तविक आम्हांवर सत्ता चालवून आम्हांस कर्म करण्यास भाग पाडणारी अशी एकहि शक्ति या विश्वांत जन्मास आली नाहीं. आमच्या इच्छेविरुद्ध आम्हांवर सत्ता चालविण्यास कोणीहि समर्थ नाहीं; परंतु आम्ही पदभ्रष्ट होतों, अहंकार आम्हांस पछाडतो, आणि मी कर्ता, मी भोक्ता असें आम्ही म्हणूं लागतों. कर्म आणि आम्ही यांचा अशा रीतीनें एकजीव झाल्यावर कर्मांपासून उद्भवणारीं दुःखें भोगल्यावांचून सुटका आहे काय ? आपल्याच मूर्खपणानें आपण आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला तर त्याबद्दलचें दुःख आपणांस भोगल्यावांचून गत्यंतर नाहीं. यासाठीं ' मी ' आणि ' माझें ' ही भावना टाकून केवळ साक्षित्वानें तुम्ही कर्में करूं लागलां म्हणजे सध्या जी शक्ति अनिवार्यपणें तुम्हांस कर्में करावयास लावीत आहे, तिचा एक एक अवयव तुटून शेवटीं ती गतप्राण होईल. अशा खऱ्या स्वतंत्र मनुष्याचें लक्षण हेंच आहे कीं जगांत घडून येणाऱ्या गोष्टींपासून त्याला हर्ष अथवा विषाद होत नाहीं. कांहीं प्राप्त झाल्याचा जसा त्याला आनंद होत नाहीं तसेंच सर्वस्व गेल्यास त्याला दुःखहि होत नाहीं. सारें जग इकडचें तिकडे झालें तरी त्याच्या स्थितींत अणुमात्र फरक पडत नाहीं. ' दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः । वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥' असें त्याचें लक्षण गीतेंत सांगितलें आहे.

हिंदुस्थानांत पूर्वी व्यास या नांवाचे एक महर्षि होऊन गेले. वेदांतसूत्रांचे कर्ते अशी यांची प्रसिद्धि आहे. हे मोठे साधुवृत्तीचे होते. यांच्या पित्यानें पूर्णत्व मिळविण्यासाठीं फार प्रयत्न केले, पण त्यास यश आलें नाहीं. त्याचप्रमाणें व्यासांच्या आजानें व पणजानेंहि प्रयत्न केले, पण त्यांसहि सिद्धि प्राप्त झाली नाहीं. खुद्द व्यास महर्षींसहि चिरंतन सुखाची प्राप्ति झाली नव्हती; परंतु व्यासांचा पुत्र शुक हा मात्र जन्मतःच सिद्ध होता. व्यासांनीं त्याला सर्व अध्यात्म विद्या सांगितली आणि नंतर पूर्णत्वाकरितां त्यांनीं त्याला जनकराजाकडे पाठविलें. जनक हा एका मोठ्या देशाचा अधिपति होता. याला विदेह जनक असें ह्मणत असत. विदेह ह्मणजे ज्याचा देहाध्यास संपूर्ण नष्ट झाला आहे असा. जनक हा जरी जन्मतः राजा होता आणि जन्मापासून ऐषआरामांत वाढला होता तरी त्याची देहावरील आसक्ति पूर्ण नाहींशी झाली होती. 'अहं ब्रह्मास्मि' अशी जनकाची सर्वकाल भावना असे. अशा प्रकारच्या त्या राजाकडे शुकाची रवानगी व्यासांनीं करून दिली. राजा जनक अंतर्ज्ञानी होता. महिर्षींचा पुत्र आपणाकडे येत आहे, ही गोष्ट त्याला अगोदरच समजली व त्याची परीक्षा पाहण्यासाठीं जनकानें कांहीं अगाऊ योजना करून ठेविली. शुक राजद्वारीं आला आणि आपणास राजास भेटावयाचें आहे असें सांगूं लागला; परंतु देवडीवरील लोकांनीं त्याच्या ह्मणण्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. तेथेंच एक आसन देऊन त्यावर त्यांनीं त्याला बसविलें. याहून त्यांनीं त्याची अधिक कांहीं वास्तपुस्त केली नाहीं. वास्तविक ह्मटलें तर तो महर्षींचा पुत्र होता. महर्षींची कीर्ति सर्व देशांत पसरली होती व त्यांस सर्व लोक पूज्य मानीत होते. खुद्द शुकहि मानार्ह समजला जात होता. असें असतांहि त्या देवडीवाल्यांनीं त्याच्याशीं आडदांडपणाचें वर्तन केलें. शुकमुनी बिचारा तीन दिवस देवडीवरच बसला होता. नंतर त्याच्या आगमनाची वार्ता राजास देवडीवाल्यांनीं कळविली. तेव्हां राजा जनक आपल्या मंत्र्यांसह तेथें आला, व महर्षिपुत्राचें त्यानें मोठ्या सन्मानानें स्वागत करून त्यास राजवाड्यांत नेलें. नंतर अंगास सुवासिक उटणीं लावून त्यानें त्यास मंगलस्नान घातलें व त्याची पूजा केली. इतकें सर्व होत असतां राजा त्याच्याकडे बारीक लक्ष्य लावून पाहत होता; परंतु शुकाच्या मुखावर सुखाची अथवा दुःखाची यत्किंचित् छायाहि त्याला दिसून आली नाहीं. दरवाजावर तीन दिवस बसला असतां जी त्याची वृत्ति तीच आतांहि कायम होती. त्याचें पूजन झाल्यावर राजानें त्यास दरबा-

रांत नेलें. तेथें मोठा समारंभ करून करमणुकीचे अनेक प्रकार चालू केले होते. त्यांत कित्येक सुंदर रमणी नाचत होत्या; व कित्येक गात होत्या. दुधानें कांठोकांठ भरलेला एक पेला राजानें शुकाच्या हातीं देऊन, त्यास समारंभाच्या जागेंत सात फेऱ्या करावयास सांगितलें. त्याप्रमाणें शुकानें सात फेऱ्या केल्या; परंतु पेल्यांतील दुधाचा एक थेंबहि जमिनीवर पडला नाहीं. रतीला लाजविणाऱ्या त्या चारुगात्रींच्या दर्शनानें शुकाची वृत्ति यत्किंचित्‌हि चळली नाहीं. शुक राजापाशीं आला तेव्हां राजा त्याला ह्मणाला, "शुकमुने, तुझ्या वडिलांनीं जें तुला सांगितलें आहे तेंच पुन्हां बोलून दाखविण्यापलीकडे मला कांहीं सांगावयाचें राहिलें नाहीं. तूं पूर्णच आहेस. तूं सत्यरूप आहेस. तर आतां आपल्या पित्याकडे परत जा."

अशा रीतीनें ज्यानें अहंकार समूळ नष्ट केला असेल, आणि ज्याची देहबुद्धि नाश पावली असेल त्याजवर जगांतील कोणतीहि वस्तु सत्ता चालवूं शकत नाहीं. स्वतःच्या इंद्रियांचा जो धनी झाला त्याला गुलाम करावयास या विश्वांत कोण समर्थ आहे ? असा मनुष्य जगांतील अत्यंत पापमय अशा जागेंत राहिला तरी तो पुण्यवानच राहणार.

जगाबद्दल आपणांस सामान्यतः दोन प्रकारचीं मतें ऐकूं येतात. निराशावादी लोक ह्मणतात कीं, 'जग अत्यंत दुष्ट आहे, पापानें भरलें आहे, आणि तें कधींहि सुधारावयाचें नाहीं.' दुसरे कित्येक आशावादी असतात, ते ह्मणतात, 'अहाहा ! हें जग किती सुंदर वस्तूंनीं भरलें आहे ! याची भव्यता आणि सौंदर्य पाहून मन आनंदांत गर्क होतें !' ज्यांना स्वतःच्या वृत्तींवर तावा चालवितां येत नाहीं, त्यांना हें जग असेंच दुःखमय भासणार; अथवा फार झालें तर, कांहीं थोडें सुखमय आणि बाकी बरेंच दुःखमय असें भासणार. आपण आपल्या वृत्तींचे धनी झालों ह्मणजे जगाचें हें एकेरी स्वरूप नष्ट होऊन जग आहे तसेंच उत्तम आहे असें आपणांस दिसूं लागेल. वरवर दिसणाऱ्या सुखाच्या अथवा दुःखाच्या तरंगांनीं त्याची एकतानता भंग पावत नाहीं, अगर त्याच्या शांतीस बाध येत नाहीं, असा आपणांस प्रत्यय येईल. असा प्रत्यय आला ह्मणजे त्यांतील घडणाऱ्या गोष्टींचें आपणांस सुख अथवा दुःखहि वाटणार नाहीं. हें जग ह्मणजे प्रत्यक्ष नरकवासच आहे असें ह्मणणारा मनुष्य इंद्रियांचा धनी झाला तर तो सुद्धां हें जग ह्मणजे प्रत्यक्ष स्वर्गभूमि आहे असें ह्मणूं लागेल. कर्मयोगाचा मनःपूर्वक अभ्यास करून प्रथम

सांगितलेली स्थिति प्राप्त करून घेण्याची आपली इच्छा असली तर तसें करण्यास आपण तावडतोब आरंभ केला पाहिजे. आरंभ करण्यास कांहीं विशिष्ट परिस्थितीची अपेक्षा नाहीं. कोणत्याहि स्थितींत तुह्मीं आरंभ केला आणि निश्चयानें चाललां तर तुह्मांस अलिप्ततेची स्थिति प्राप्त होईलच होईल; आणि पूर्ण अलिप्तता प्राप्त होऊन तुमचा अहंकार निखालस मावळला ह्मणजे जें जग आज तुह्मांस पापमय दिसत आहे तेंच जग केवळ स्वर्ग आहे, आणि त्यांत पापाचा अंशहि नाहीं असें तुह्मी ह्मणाल. तेथें वाहणारा वायूहि शीतळ आणि पुण्यकारक आहे असें तुह्मांस वाटूं लागेल. कर्मयोगाचें हेंच ध्येय—हेंच साध्य—आहे आणि चालू जीविताची हीच पूर्णावस्था आहे.

प्राचीन आर्यतत्वज्ञांनीं अनेक प्रकारचे योग सांगितले आहेत; तथापि प्रकार भिन्न असले तरी सर्वांचें साध्य एकच आहे. मनुष्यमात्रास पूर्णत्वास नेणें हें सर्व योगांचें ध्येय आहे. आपणांस या मार्गांपैकीं कोणता पसंत असेल त्या मार्गानें निश्चयानें आणि अट्टाहासानें आपण गेलें पाहिजे. कोणत्याहि योगाचें रहस्य ज्ञालें तरी तें नुसतें समजण्यांत तात्पर्य नाहीं. ' हें मला समजलें ' असें नुसतें तोंडानें ह्मणून तुह्मांस कांहीं खरी प्राप्ति व्हावयाची नाहीं. तुह्मांस उच्चतम स्थिति प्राप्त करून घेणें असेल तर तुह्मीं समजून उमजलें पाहिजे. उमजून त्याचा अभ्यास दृढ निश्चयानें आणि अट्टाहासानें केला पाहिजे. श्रवण, मनन आणि अभ्यास या तीन पायऱ्यांचा आश्रय करून तुह्मीं कोणताहि मार्ग निश्चयानें आक्रमिला पाहिजे. कोणताहि योग ज्ञाला तरी त्याच्या सिद्धीकरितां निश्चय आणि अभ्यास हीं सतत पाहिजेत. तत्वांचें प्रथम श्रवण करून नंतर त्यांचें सदैव चिंतन केलें पाहिजे. प्रथम प्रथम कांहीं प्रमेयें फार अवघडशीं वाटलीं तरी सतत श्रवण, मनन आणि निदिध्यास या त्रयीच्या साहाय्यानें तीं आपोआप समजूं लागतील. एकाच वेळीं सर्व प्रमेयें आपणांस समजतील असें नाहीं. वस्तुतः तुह्मीच सर्वज्ञ आहां, यामुळें कोणीहि कोणास कांहीं नवें शिकवूं शकत नाहीं. या गोष्टी ज्याच्या त्यानेंच शिकावयाच्या आहेत. फार ज्ञालें तर बाह्य जगाकडून कांहीं सूचना तुह्मांस मिळतील. त्यामुळें तुमच्या अंतरात्म्यास जागृति येऊन तो अज्ञानाचा पडदा टाकून देण्याचा प्रयत्न करितो. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें बुद्धि सदैव जागृत ठेवून बाह्येंद्रियद्वारा येणाऱ्या सर्व सूचनांचा योग्य उपयोग करणें हें आपलें कर्तव्य आपणच केलें पाहिजे. ज्ञान ही बाहेरून येणारी वस्तु नसून अनुभवानें ती आपल्याच ठिकाणीं पहावयाची

आहे. हा अनुभव वाढत गेला ह्मणजे आपल्यांतील इच्छाशक्ति जागृत होऊं लागते. प्रथम ज्ञानाची इच्छा उद्भवते. इच्छा पक्की बळावली ह्मणजे तोच ध्यास लागून तीच इच्छा अधिक बलवत्तर होते. तिला संपूर्ण बळ प्राप्त झाल्यावर ती तुमच्या रोमरोमांतून खेळूं लागते व शेवटीं 'मी' आणि 'माझें' हें भान संपूर्ण नाहींसें होतें. अहंकाराचा यत्किंचित् अंशहि उरत नाहीं, व अशा रीतीनें तुह्मी पूर्णत्व पावतां. पूर्णत्व पावणें हें कोणत्याहि विशिष्ट मतावर अवलंबून नाहीं; अथवा विशिष्ट धर्मावर अगर पंथावरहि अवलंबून नाहीं. कोणी आपणास यहुदी ह्मणवो, ख्रिस्ती ह्मणवो अथवा आणखी कांहीं ह्मणवो. पूर्णत्वाचा त्याशीं कांहीं संबंध नाहीं. तुह्मीं अहंकाराचा त्याग केला आहे कीं नाहीं, हा काय तो महत्वाचा प्रश्न आहे. जर तुमचा अहंकार गेला असेल तर कोणत्याहि धर्मपुस्तकाची एखादी ओळहि न वाचतां अथवा एखाद्या देवळांत पाऊलहि न ठेवतां बसल्या जागींच मुक्ति तुह्मांस माळ घालील. प्रत्येक योगानें मार्ग जरी निरनिराळे सांगितले असले तरी एका योगाच्या अभ्यासांत दुसऱ्या एखाद्या मार्गाची मदत घ्यावी लागतेच असें नाहीं. कारण, प्रत्येक योग मनुष्याला पूर्णत्वाचा मार्ग दाखविण्यासाठींच निर्माण झाला आहे. कर्मयोग, ज्ञानयोग अगर भक्तियोग यांपैकीं कोणत्याहि एका मार्गानें मोक्ष निश्चित मिळेल. अमक्या एका विशिष्ट मार्गानेंच मोक्ष मिळेल असें ह्मणणारे मूर्ख होत. '**सांख्य योगौ पृथग्बालाः प्रवदंति न पंडिताः।**' ह्मणजे ज्ञानमार्ग व कर्ममार्ग हे भिन्न आहेत असें मूर्ख ह्मणतात; पंडित तसें ह्मणत नाहींत, असा भगवान् श्रीकृष्णांचा अभिप्राय आहे. जरी हे मार्ग बाह्यतः भिन्न दिसले तरी त्यांचें अंतिम पर्यवसान एकच आहे ही गोष्ट पंडितांस ठाऊक असते.

प्रकरण ७ वें.

मुक्ति.

आपलें सांप्रतचें जीवित ज्याचें कार्य आहे त्यापूर्वकर्मांसहि आध्यात्मिक भाषेंत कर्म असें ह्मणतात हें पूर्वीं सांगितलेंच आहे. ज्याचा सांप्रतच्या जीवितावर कांहीं परिणाम झाला आहे, अशा प्रत्येक कृत्यास व विचारास कर्म असें नांव दिलें आहे. ज्याप्रमाणें कारण आणि त्याचें कार्य हीं अनादिसिद्ध नियमांनीं बांधिलेलीं आहेत त्याचप्रमाणें कर्म आणि फल हींसुद्धां त्याच नियमांनीं

बद्ध आहेत. ज्याप्रमाणें कारण उत्पन्न झालें कीं त्याचें कार्य घडलेंच पाहिजे, तें टाळणें जसें सर्वथा अशक्यच आहे, त्याचप्रमाणें कर्म झालें कीं त्याचें फल येणारच; तें टाळणें अशक्य आहे. हा नियम साऱ्या विश्वरचनेच्या मुळाशीं आहे असें आमच्या तत्ववेत्त्यांचें ह्मणणें आहे. या सिद्धांताप्रमाणें चालू कर्माचें स्वरूप दोन प्रकारचें आहे असें सिद्ध होतें. चालू जीवनक्रमांत पाहणें, विचार करणें आणि कर्म करणें इत्यादि ज्या ज्या क्रिया आपण करतों त्या सर्व पूर्व-कर्मानुरूप घडत असतात हें एक स्वरूप. चालू जीवनक्रमाचें दुसरें स्वरूप असें आहे, कीं त्यांत ज्या ज्या क्रिया आपण करतों त्या सर्व कारणरूप होऊन पुढील जन्मींच्या कार्यांची ह्मणजे जीवनक्रमाची तयारी करीत असतात. आतां येथें नियम या शब्दाचा अर्थ काय, याचा विचार केला पाहिजे. कोणतीहि गोष्ट पुन्हां पुन्हां घडून येणें हें ज्या प्रवृत्तीमुळें होतें त्या प्रवृत्तीस नियम असें ह्मणतात. आपण प्रथम कांहीं कार्य घडलेलें पाहतों आणि नंतर त्याचे पाठोपाठ दुसरें कार्य घडतें हेंहि आपण पाहतों. त्यावेळीं तशाच प्रकारची कार्यपरंपरा पुन्हां पुन्हां घडत राहील असें आपल्या मनांत साहजिक येतें. हिंदुतत्वज्ञांपैकीं ज्यांना नैय्यायिक असें ह्मणतात त्यांनीं या नियमास व्याप्ति असें नांव दिलें आहे. अमुक एक गोष्ट घडली ह्मणजे त्या कारणापासून दुसरी अमुक एक कार्य-रूप गोष्ट घडणारच, असें जें आपल्या मनांत येतें त्याचें कारण पूर्वींचा अनुभव आहे असें नैय्यायिकांचें मत आहे. कांहीं कार्यपरंपरा पूर्वी आपण पाहिलेली असते, व ती जशीच्या तशीच आपल्या मनांत बीजरूपानें ग्रथित झालेली असते; आणि पुन्हां जेव्हां आपण कांहीं कार्य घडलेलें पाहतों त्यावेळीं त्या कार्यांशीं सदृश अशा पूर्वानुभवाशीं तें कार्य आपण तत्क्षणींच मनांत ताडून पाहतों. अशा वेळीं जो विचार अथवा शास्त्रीय भाषेंत बोलावयाचें ह्मटलें तर जो तरंग आपल्या चित्तांत उद्भूत होतो तो आपल्या इतर मित्रांसहि जागे करितो व अशा रीतीनें ती पूर्वींची सर्व कार्यपरंपरा पुनः जशीच्या तशीच आपल्या चित्तांत जागृत होते, आणि त्या कार्यपरंपरेशीं सांप्रतचें कार्य ताडून पाहून त्यावरून आतां या कार्यापुढें दुसरें अमुक कार्य घडणार असें आपल्या मनांत येतें. याच पूर्वानुभवास आपण नियम ह्मणतों, असें नैय्यायिकांचें मत आहे. ही जी कार्यपरंपरा आपल्या चित्तास व्यापून राहिलेली असते, ति-च्याच एका विशिष्ट स्वरूपास आपण कारण असें ह्मणतों. याच व्यापून राह-ण्याच्या स्थितीस संस्कृत भाषेंत व्याप्ति असें नांव आहे. पूर्वी अमुक प्रकारें

कांहीं कार्यपरंपरा घडून आली होती आणि आतांहि त्या परंपरेपैकीं एक कार्य घडून आलेलें पाहतांच बाकीचीं कार्येंहि पूर्वींप्रमाणेंच घडून येतील अशी जी अपेक्षा आपल्या चित्तांत उद्भूत होते, त्या अपेक्षेलाच आपण नियम अथवा कायदा असें नांव देतों. यावरून असें सिद्ध होतें कीं, सृष्टींत अमुक एक नियम अगर कायदा असा कांहीं अस्तित्वांत नाहीं. यासाठीं पृथ्वीच्या मध्यबिंदूंत गुरुत्वाकर्षणाचें सामर्थ्य असणें हा कायदा आहे–नियम आहे–असें ह्मणणें चुकीचें आहे. किंबहुना सृष्टींतील अमुक एक वस्तु अमुक एका नियमानें बद्ध आहे, असें नाहीं; तर एका विशिष्ट रीतीनें–पद्धतीनें–कांहीं वस्तुसंघात पाहण्याची आपणांस संवय लागली आहे, असें समजावें. अमुक एक कार्यपरंपरा एकाच विशिष्ट रीतीनें घडते असा अनुभव आपणांस आला ह्मणजे आपण त्या रीतीस अथवा पद्धतीस नियम–कायदा–असें ह्मणतों. यावरून त्या कायद्यानें अथवा नियमानें वस्तु बद्ध नसून त्या कायद्याची व्याप्ति आपल्या चित्तांतच असते असें सिद्ध होतें.

आतां यापुढें आपण जे कांहीं नियम अगर कायदे विश्वव्यापी आहेत असें समजतों, त्याचा अर्थ काय हें पाहावयाचें आहे. यासाठीं विश्व ह्मणजे काय, याचा अर्थ प्रथम निश्चित केला पाहिजे. देश-काल-निमित्त या रेषात्रयीनें एकंदर अस्तित्वाचा जेवढा भाग अंकित केला जातो, त्याला आपण विश्व असें नांव देतों. एकंदर अस्तित्व अनंत आहे. त्यापैकीं कांहीं भाग देश-काल-निमित्त या उपाधीनें बद्ध झाल्यासारखा दिसतो आणि त्यास आपण विश्व अशा संज्ञेनें ओळखतों. या उपाधिविरहित असें अनंत अस्तित्व त्यापलीकडे आहे. ज्यांना आपण नियम अथवा कायदे ह्मणतों, त्यांचें अस्तित्व वस्तूंत नसून आपल्या मनांतच असतें, हें आपण नुकतेंच सिद्ध केलें आहे. तेव्हां विश्वव्यापी कायदे असें आपण ज्यांस ह्मणतों त्यांचेंहि अस्तित्व देश-काल-निमित्त या उपाधीनें निगडित असलेल्या विश्वांतच असणें शक्य आहे. या उपाधीबाहेर असलेल्या अस्तित्वांत हे कायदे असणें शक्य नाहीं. विश्व असें ज्याला आपण ह्मणतों तें व्यष्टिरूप आहे. व्यष्टि ह्मणजे अनेकांपैकीं एक. जसें गांव ही समष्टि आणि घर ही व्यष्टि. अरण्य ही समष्टि आणि झाड ही व्यष्टि. याचप्रकारें अनंत अस्तित्वापैकीं जितका भाग कोणत्या तरी रीतीनें आपल्या मनाच्या हद्दींत येतो, त्याला आपण विश्व असें ह्मणतों. ह्मणजे अनंत अस्तित्व समष्टिरूप असून विश्व हें व्यष्टिरूप आहे. आपल्याला जें जें दिसतें, जें जें स्पर्शितां येतें, जें जें ऐकूं येतें, जें जें

विचारांत आणतां येतें आणि ज्याची ज्याची आपण नुसती कल्पना करूं शकतों, त्या सर्व अस्तित्वाला आपण विश्व अशी संकलित संज्ञा देतों. आपण ज्यांना कायदे असें ह्मणतों, त्यांची व्याप्ति अशा विश्वापुरतीच असणार हें उघड आहे. याबाहेरील अस्तित्वांत नुसत्या कल्पनेनेंहि जर आपल्या मनाचा प्रवेश होत नाहीं, तर तेथें हे आपले कायदे आपण लागू कसे करणार? त्यांत घडून येणाऱ्या कार्यपरंपरेची तुलना करण्यास तिच्याशीं सदृश अशी परंपरा आपल्या मनांतच तयार नाहीं. यामुळें अमुक कारण आणि अमुक त्याचें कार्य असें ठरविण्यास आपणांस कोणतेंहि साधन उपलब्ध नाहीं. यावरून जेव्हां कोणतीहि वस्तु नाम-रूप धारण करिते, तेव्हांच ती कायद्याच्या हद्दींत येते असें उघड झालें. जेथें आपलें मन पोहोंचूं शकत नाहीं, तेथें देश-काल-निमित्त या रेषात्रयीला अस्तित्व नाहीं; आणि जेथें या दोहोंचें अस्तित्व नाहीं, तेथें नाम-रूपहि नाहीं. यांतच आणखी एक गोष्ट आपोआप सिद्ध झाली; ती ही कीं, स्वतंत्र इच्छा असें मनाच्या कांहीं विशिष्ट स्थितीस जें आपण नांव देतों, त्याला अस्तित्वच नाहीं. 'स्वतंत्र' आणि 'इच्छा' या दोन शब्दांचा संधि होणें, हे दोन शब्द एकत्र उच्चारणें ह्मणजे अर्थशून्य शब्द उच्चारण्यासारखेंच आहे. 'स्वतंत्र' आणि 'इच्छा' हे दोन शब्द परस्परविरुद्ध अशा अर्थांचे द्योतक आहेत. इच्छेचें अस्तित्व कल्पनेवर अवलंबून आहे. कल्पना विश्वानें बद्ध आहे आणि विश्व देश-काल-निमित्तानें बद्ध आहे. अशा बद्ध वस्तुसंघांतून मुक्त–स्वतंत्र–इच्छा कशी निर्माण होणार? ज्या कोणत्याहि वस्तूबद्दल आपणांस ज्ञान झालेलें असतें अथवा होण्याचा संभव असतो, ती प्रत्येक वस्तु आणि तें ज्ञान हीं पूर्वीच्या निमित्तानेंच उद्भवलेलीं असतात. तीं निमित्तबाह्य ह्मणजे स्वतंत्र नसतात. जी वस्तु आज कार्यरूप आहे असें आपणांस वाटत असतें, तिजवर दुसऱ्या कांहीं वस्तूंचा आघात होऊन ती स्वतः कारणरूप होण्याचा संभव आहे. यावरून वस्तुनिर्मित ज्ञान स्वतंत्र नाहीं असें सिद्ध झालें. परंतु वस्तूच्या आघातामुळें ज्या मूलरूपानें हें ज्ञानाचें रूप धारण केलें, तें मूलरूप स्वतंत्र आहे. जेव्हां हें ज्ञान देश-काल-निमित्ताच्या हद्दींतून बाहेर जातें, तेव्हां तें स्वतंत्र होतें; ह्मणजे आपल्या मूलरूपांत एकजीव होतें. तें मूळचें स्वतंत्र आहे, पण देश-काल-निमित्तानें बद्ध होऊन वस्तु आणि ज्ञान या स्वरूपास येतें व या देश-काल-निमित्ताचें अस्तित्व संपलें, कीं त्याबरोबर त्याचें पारतंत्र्य नष्ट होऊन तें आपल्या स्वतंत्र मूलरूपास जातें.

या विश्वाची उत्पत्ति कोठून झाली, याचें अस्तित्व कशावर अवलंबून आहे आणि याचें पर्यवसान कोठें होणार, अशा प्रकारची प्रश्नपरंपरा नेहमीं विचारण्यांत येत असते. तिचें उत्तर असें कीं विश्वाची उत्पत्ति पूर्णांपासून झाली असून, बद्धता ही त्याची स्थिति–अस्तित्व–आहे, आणि पूर्वींच्या पूर्णावस्थेंतच त्याचा लय होणार. यासाठीं मनुष्यप्राणी पूर्ण आहे असें जेव्हां आपण ह्मणतों, तेव्हां आपल्या मनांत या अनंत अस्तित्वाच्या एका अत्यंत सूक्ष्म अशा भागाविषयींच बोलावयाचें असतें, हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. आपल्या दृष्टीस पडणारें हें शरीर आणि हें मन, हीं अनंत अस्तित्वांतील एका सूक्ष्म बिंदूइतकीं आहेत. खुद्द हें सर्व विश्व, अनंत अस्तित्वाचा एक सूक्ष्म अंश आहे. आमचे सर्व कायदे, सर्व बंधनें, सर्व सुखें, सर्व दुःखें आणि सर्व आशा अतिशय विशाल झाल्या, तरी या बिंदुरूप विश्वाबाहेर जाऊं शकत नाहींत. आमच्या सर्व संस्कृती आणि विकृती या सूक्ष्म बिंदूंत सांठविल्या आहेत. तर मग यावरून हें सर्व विश्व, कीं ज्याला आपल्या चित्ताबाहेर अस्तित्व नाहीं–तें असेंच चालावें अशी अपेक्षा करणें, आणि स्वर्गसुख भोगण्याची इच्छा करणें हें किती पोरकटपणाचें आहे, याची तुह्मीच कल्पना करा. स्वर्गसुख ह्मणजे काय, तर याच जगाची सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति. ज्यांना आपण कायदे–नियम–असें भपकेबाज नांव देतों आणि ज्यांवर या बिंदुरूप विश्वाचें अस्तित्व अवलंबून आहे असें आपण समजतों, त्यांवरून अनंत अस्तित्वाचे नियम ठरवूं पाहणें, हें किती अशक्य आणि बालिशबुद्धीचें लक्षण आहे, याची तुह्मांस निःसंशय खात्री पटली असेल. या बिंदुरूप विश्वांतच अनंत काल कोंडलेले राहून यांतील पंकाचें पुनःपुनः चर्वण करण्याची ज्यांना इच्छा असेल, आणि ही इच्छा तृप्त करण्याजोगा सवलतीचा धर्ममार्ग ज्यांना हवा असेल त्यांची बुद्धि वठून गेलेल्या झाडासारखी आहे, असें तुह्मी निश्चित समजा. आपल्या चालू स्थितीहून उच्चतर स्थिति असणें शक्य आहे, ही कल्पनासुद्धां त्यांस शिवत नाहीं. चालू स्थिति हीच त्यांच्या दृष्टीनें मानवी जीविताची इतिकर्तव्यता असते. स्वतःच्या अनंत रूपाचा त्यांस पूर्ण विसर पडलेला असतो. चालू क्षणीं जीं सुखदुःखें अनुभवास येतात त्यांहून कांहीं निराळी स्थिति असेल असें त्यांस स्वप्नांतहि वाटत नाहीं. रोज अनेक वस्तूंचा नाश होत आहे हें पाहूनहि त्याच वस्तु निरंतरच्या आहेत या कल्पनेची मिठी ते सोडीत नाहींत. तृष्णा, तृष्णा ह्मणून एकसारखे ते मृगजल पीत सुटतात. आपल्या बिंदुमात्र विश्वाच्या बाहेर अनंत अस्तित्व आहे, त्यांत

अनंत सुखकर वस्तु भरल्या आहेत, तेथें अनंत जीवांची वस्ती आहे, तेथें अनंत प्रकारचे कायदे, अनंत राष्ट्रें आणि अनंत संस्कृती आहेत; आणि हें अनंत अस्तित्व सगळें आपल्या विश्वाच्या बाहेर आहे. यावरून आपल्या विश्वाच्या बाहेर आणखी किती विस्तार आहे याची कांहीं अंशीं तरी तुह्मांस कल्पना होईल; आणि येवढा मोठा विस्तार आपल्या स्वतःच्या अनंतत्वाचा एक लहानसा भाग आहे.

जर आपणांस खरें स्वातंत्र्य–मुक्ति–मिळवावयाची असेल तर या विश्वांत कोंठून घेऊन ती मिळणें नाहीं. ती मुक्ति या दृश्य विश्वांत नाहीं; अगर ती अदृश्य स्वर्गांतही नाहीं. तसेंच ज्या ज्या ठिकाणीं आपल्या कल्पनेची धांव पोहोंचूं शकते, अशा कोणत्याहि ठिकाणीं जाऊन मुक्ति मिळणार नाहीं. तुह्मीं कसल्याहि प्रकारच्या स्वर्गाची अथवा दुसऱ्या एखाद्या लोकाची कल्पना केली तरी जेथें आपल्या कल्पनेस अवसर आहे, ती जागा आपल्या विश्वांतच अंतर्भूत होणार; आणि विश्व तर देश-काल-निमित्त या रेषात्रयीनें बद्ध आहे. आमच्या या जगाहून आणखी कांहीं निराळ्याच प्रकारचीं जगें असूं शकतील; तेथें येथल्याहून कांहीं अधिक सुखकर वस्तु असतील; परंतु जोंपर्यंत त्यांचें अस्तित्व विश्वाबाहेर नाहीं, जोंपर्यंत त्यांनीं देश-काल-निमित्त ही त्रयी ओलांडली नाहीं, तोंपर्यंत तीं विश्वाच्या कायद्यांनीं बांधलेलीं राहणारच. यासाठीं मुक्तीची वाट या विश्वाबाहेर जाऊन शोधिली पाहिजे. ह्मणून विश्व जेथें संपतें तेथेंच खऱ्या धर्ममार्गास आरंभ होतो. जोंपर्यंत जीविततृष्णा आह्मांस सोडून गेली नाहीं, आणि जोंपर्यंत या क्षुद्र सुखांच्या कल्पनेनें आपण लाळ घोटित आहों, तोंपर्यंत मुक्तीचा मार्ग स्वप्नांतहि दिसण्याची आशा नको. यावरून हें निःसंशय सिद्ध होतें कीं मानवी जीविताचा खरा हेतु जी मुक्ति ती मिळण्याकरितां आपणांस, या विश्वाचा, या जगाचा, या स्वर्गकल्पनेचा, या देहाचा, या मनाचा, या चित्ताचा आणि जें जें ह्मणून मर्यादित असेल त्याचा सर्वथा त्याग केला पाहिजे. ज्या क्षणीं इंद्रियजन्यसुखाची ही आसक्ति नाहींशी होईल, त्याच क्षणीं मुक्ति आपणांस माळ घालील. ज्या शृंखलांनीं सध्या आपण बद्ध झालों आहों त्या तोडण्याचा मार्ग एकच. कल्पनेनें जेथें प्रवेश करतां येतो त्याचा त्याग करा, कल्पनातीत व्हा, ह्मणजे तुह्मी मुक्तच आहां.

'कल्पनातीत व्हा' हें ह्मणणें सोपें आहे; पण करणें अत्यंत कठीण आहे. हजारों मनुष्यांपैकीं एखादा त्या मार्गास लागतो, आणि अशा हजारों मार्गस्थां-

यैकीं एखादाच त्यांत यश मिळवितो. 'मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये। यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः॥' अशी वस्तुस्थिति आहे. कल्पनातीत होण्यास आमच्या तत्ववेत्त्यांनीं दोन मार्ग सांगितले आहेत. एक 'नेति' आणि एक 'इति.' पहिला मार्ग निषेधरूप असून दुसरा विधिरूप आहे. यांपैकीं पहिला निषेधरूप मार्ग अत्यंत दुर्गम आहे. अद्वितीय मनःस्थिति आणि प्रचंड इच्छाशक्ति हीं ज्यांस प्राप्त झालीं असतील, त्यांनाच त्या मार्गांत पाऊल टाकणें शक्य आहे. कोणतीहि सुखेच्छा नुसती उत्पन्न झाल्याबरोबर हे ह्मणतात, 'जा, तुझी मला जरूर नाहीं;' आणि त्यांचें मन व शरीर त्यांची आज्ञा अक्षरशः पाळितात. पण इतक्या प्रचंड शक्तीचे लोक कितीसे असणार ? असे लोक क्वचितच असतील. यासाठीं प्रायः सर्व मनुष्यें दुसऱ्या मार्गाचाच स्वीकार करितात. जगांतील सर्व बंधनें पाहून त्यांजबद्दल विचार करून आणि त्याच बंधनांचा उपयोग स्वतःस करून घेऊन ते बंधनमुक्त होतात. कांटयानें कांटा काढून शेवटीं जसे दोन्ही कांटे फेंकून द्यावयाचे, त्याप्रमाणें एक प्रकारच्या बंधनांनीं दुसऱ्या प्रकारचीं बंधनें तोडून शेवटीं दोहोंतूनहि सुटावयाचें. हा मार्गहि वस्तुतः त्यागाचाच आहे. त्याचेंहि पर्यवसान शेवटीं 'नेति' या मार्गांतच होतें; पण तें फार हळू हळू होत असल्यामुळें फारसें कष्टप्रद होत नाहीं. जगांतील वस्तूंकडे पाहून, त्यांजबद्दल विचार करून, त्यांचा उपभोग घेऊन आणि त्यांजपासून प्राप्त होणाऱ्या सुखाची खरी योग्यता काय आहे, याचा अनुभव घेत घेत त्यांजपासून हळू हळू मनास परावृत्त करावयाचें असा हा 'इती'चा मार्ग आहे. पहिला मार्ग विवेकप्रधान असून दुसरा कर्मयोगाचा आणि अनुभवप्रधान आहे. पहिल्या मार्गाला ज्ञानयोग असेंहि नांव आहे. यांत पूर्ण विवेकानें कर्मसंन्यास करावयाचा असतो. ह्मणजे कोणतेंहि कर्म करावयाचें नाहीं असा बुद्धीचा निश्चय विवेकानें करावयाचा. दुसऱ्या मार्गांत कोणतेंहि कर्म करणें सोडावयाचें नसतें. विश्वांतील प्रत्येक प्राण्याला कोणत्याना कोणत्या प्रकारचें तरी कर्म करावेंच लागतें. ज्यांचें मन स्वतःच्या ठिकाणींच पूर्ण संतुष्ट असतें त्यांची मात्र गोष्ट निराळी आहे. आत्मज्ञानाशिवाय त्यांना दुऱसया कशाचीहि वासना नसते. यामुळें स्वस्वरूप सोडून त्यांचें मन बाह्य जगांत कधींहि भटकत नाहीं. बाह्य वस्तूंपैकीं कशाचीहि अपेक्षा उरली नसल्यामुळें ज्यांची बुद्धि अंतर्मुखता कधींहि सोडीत नाहीं अशा पुरुषांस मात्र कोणत्याहि कर्माचा अवलंब करण्याचें कारण नाहीं.

याहून अन्यप्रतीच्या सर्व लोकांस कर्म करणें भागच आहे. ज्याप्रमाणें उंचावरून खोल दरींत पडणारा पाण्याचा झोत खालीं पडल्याबरोबर प्रथम भोंवरा उत्पन्न करतो, आणि त्या भोंवऱ्यांत चक्राकार फिरून नंतर पुढें जातो, तद्वतच मनुष्यप्राण्याचीहि गति आहे. मनुष्यप्राणी जन्मास आल्यापासून या संसाररूपी भोंवऱ्यांत सांपडतो. त्यांत चक्राकार परिभ्रमण करीत असतां तो कोणाला बाप ह्मणतो, कोणाला भाऊ ह्मणतो, 'माझी कीर्ति, माझें नांव' असें ओरडतो आणि अनुभवानें शहाणा होऊन शेवटीं आपल्या मुक्तस्थितीस परत जातो. सर्व विश्व नेहमीं याच स्थितींत असतें. समजून अथवा न समजतांहि आपण सर्व जगद्रूपी स्वप्नांतून जागे होण्याचाच प्रयत्न करीत आहों. या संसाररूपी भोंवऱ्यांत जे जे अनुभव आपणांस प्राप्त होतात त्यांचा उद्देश हाच कीं त्यांच्या योगानें आपणांस त्या भोंवऱ्यांतून सुटण्यास मदत व्हावी.

आपणांपैकीं बहुतेकांस कर्मसंन्यास करतां येणें शक्य नाहीं. आपणांस कर्मांचा अवलंब केलाच पाहिजे. असें आहे, तर कर्म करतां करतांच मुक्ति मिळविण्याचें साधन असेल तर तें आपणांस हवें आहे. कर्मयोगानें असें साधन आपणांस दिलें आहे. कर्मयोगानें आपणांस कर्मसंन्यासाचें रहस्य प्राप्त होतें. आपणासभोंवतालचें सर्व विश्व कार्यरत आहे हें आपण नित्य पाहतों. या सर्व कार्यांचा उद्देश काय? मुक्ति—स्वातंत्र्य हाच या सर्व कार्यांचा अंतिम हेतु आहे. जगांतील अणुरेणूपासून तों हत्तीपर्यंत एकंदर सर्व प्राणी केवळ मुक्तीसाठींच धडपडत आहेत. या शरीरबंधांतून सुटावें, मनोबंधाचा त्याग करावा आणि आत्म्याला मोकळें करावें यासाठींच ही सारी गडबड आणि धडपड सुरू आहे. प्रत्येक वस्तूची गति पाहिली तरी तिचा हेतु हाच आहे. मुक्ति—स्वातंत्र्य—यावांचून दुसरा कोणताहि हेतु या गतीच्या मुळाशीं नाहीं. सूर्य, चंद्र, पृथ्वी आणि इतर सर्व गोलसुद्धां बंधनांतून मुक्त होण्याकरितांच भ्रमण करित आहेत. सशास्त्र ज्ञानाच्या अभावीं आपणांस अनंतकाल प्रवास करावा लागेल आणि अनेकवेळां ठोकरा खाण्याचा प्रसंग आपणांवर येईल. परंतु कर्मयोगाचें रहस्य आपणांस बरोबर समजलें, तर हा सर्व त्रास आपणांस चुकवितां येतो. कर्मयोग, हें कर्मरहस्य सांगणारें शास्त्र आहे. कर्म करीत असतां त्याचवेळीं त्या कर्मांपासून आपली शक्ति कशी वाढवावी आणि तिचा उपयोग मुक्तीकडे कसा करावा, याचें ज्ञान आपणांस कर्मयोगापासूनच प्राप्त होतें. अनंत काल आपण कर्म करीत राहिलों तरी आपलें कर्म अशास्त्र असेल तर आपली सर्व शक्ति अनाठायीं खर्च होऊन मुक्तिपथाची एक

पायरीहि आपण चढलों नाहीं असें होतें. रसायनशास्त्रामुळें जसें पदार्थांचा बरोबर उपयोग आपणांस समजून क्षुद्र पदार्थांपासून मोठीं कार्यें आपण निर्माण करितों, अथवा पदार्थविज्ञानशास्त्रामुळें अल्पशक्तीनें जशीं प्रचंड कार्यें आपण लीलेनें पार पाडितों, तसेंच कर्मयोगाच्या सशास्त्र ज्ञानानें इच्छाशक्तीची योग्य संघटना करून आपण मुक्ति मिळवूं शकतों. कर्मत्याग जर आह्मांस अशक्य आहे, तर मग कर्म करून कर्मत्यागाचें पूर्ण फल मिळेल, अशी कांहीं युक्ति सांपडेल तर आह्मांस हवी आहे. हें जग ह्मणजे कांहीं थोडासा वेळ विश्रांतीची जागा आहे, ही गोष्ट कबूल करणें भाग आहे. ही आपली निरंतर वस्तीची जागा नसून केवळ मधल्या मुक्कामाची जागा आहे हें प्रतिक्षणीं आपल्या प्रत्ययास येतें. येथून कोठें तरी दुसरीकडे जाणें आह्मांस भाग पडतें. येथें राहून स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं, ही गोष्टहि दरक्षणीं आमच्या अनुभवास येते. जर आह्मांस स्वातंत्र्य–मुक्ति पाहिजे असेल तर ती जगाच्या पलीकडे कोठें तरी शोधिली पाहिजे, हें उघड आहे. या जगाच्या बंधनांतून बाहेर पडण्याचा मार्ग हळुहळु पण निश्चयानें आक्रमिला पाहिजे. एकदम 'नेति' ह्मणून जगाचे सर्व पाश एकदम तोडणारे कांहीं पुरुष असतील. ज्याप्रमाणें सर्प आपली कात टाकून मोकळा होतो, त्याप्रमाणें केवळ इच्छामात्रेंकरून जगाचीं बंधनें टाकून मोकळे होणारे धीर पुरुष कांहीं थोडेसे असतील यांत संशय नाहीं. पण त्यांचा मार्ग बाकीच्या गरीब दुबळ्यांस कितपतसा उपयोगी पडणार ? कर्म करतां करतां मुक्ति मिळविण्याचा मार्ग त्यांस हवा आहे. हा मार्ग–हें कर्मरहस्य-कर्मयोगानेंच आपणांस मिळवितां येतें. आपल्या प्रत्येक कर्मानें मुक्तिमंदिराची पायरी कशी बांधावी, हें रहस्य कर्मयोग आपणांस शिकवितो.

'सदोदित कर्म करा, पण तें अलिप्तपणें करा,' हें कर्मयोगाचें मुख्य सांगणें आहे. आपण आपली बुद्धि थोडी सूक्ष्म केली तर आपणांस असें आढळून येईल कीं, कर्म करतां करतां आपण स्वतःस विसरून कर्माशींच एकजीव होऊन राहतों. हीच आपली पहिली मोठी चूक आहे. कर्म आणि आपण निरनिराळे आहों, ही भावना प्रथम दृढ केली पाहिजे. याच भावनेनें आपण आपलें मन स्वतंत्र ठेविलें पाहिजे. आपणाभोंवतीं अनेक प्रकारचीं दुःखें आणि संकटें आपण हरघडी पाहतों; परंतु जगाचें अस्तित्वच जर त्यांच्यावर अवलंबून आहे, तर त्यांजबद्दल अधिक विचार करून आपलें डोकें फिरविण्यांत काय फायदा आहे ? तीं अनंत काल अशींच राहणार आहेत. त्याचप्रमाणें

गरिबी अगर श्रीमंती हींसुद्धां थोडा वेळ टिकणारीं आहेत. आमचें जें खरें अनंत अस्तित्व आहे, त्याशीं या गरिबीचा, अगर श्रीमंतीचा, अगर लौकिक सुखाचा यत्किंचित्हि संबंध नाहीं. आमचें नित्य स्वरूप त्याच्या फार पलीकडचें आहे. येवढेंच नव्हे, तर तें प्रत्येक दृश्यपदार्थांपलीकडे आणि कल्पनेच्याहि पलीकडे आहे. '**यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसासह**' असें तें आपलें नित्यरूप आहे. त्या आपल्या मूळरूपास परत जाण्याचा मार्ग नित्य कर्म करीत असतांच आपणांस आक्रमावयाचा आहे. यासाठीं आपण एक सिद्धांत नित्य लक्ष्यांत बाळगिला पाहिजे; तो हा कीं, '**दुःखाची प्राप्ति कर्मांमुळें होत नसून फलासक्तीमुळें होते.**' कर्म आणि त्याचा कर्ता हे एकजीव होऊन राहिले ह्मणजे त्यापासून उद्भवणारीं दुःखें भोगणें कर्त्यांच्या नशीबीं येतेंच येतें. परंतु कर्म आणि कर्ता हे वेगळे झाले, तर कर्मांपासून उद्भवणाऱ्या सुखदुःखाशीं कर्त्यांचा कांहीं संबंध उरत नाहीं. दुसऱ्याच्या एखाद्या सुंदर वस्तूचा नाश झालेला पाहून तिऱ्हाइतास कांहीं दुःख वाटत नाहीं. पण त्या तिऱ्हाइताची स्वतःची तसलीच वस्तु नाश पावली तर? तर तो ऊर बडवून घेऊं लागतो. वास्तविक त्या दोन्ही वस्तु सुंदर होत्या. अगदीं एकसारख्याच सुंदर होत्या. परंतु एकीच्या नाशानें दुःख झालें नाहीं आणि दुसरीच्या नाशानें तें झालें. असें कां? याचें कारण पहिल्या वस्तूशीं त्याचें मन संलग्न नव्हतें; तें मोकळें होतें; पण दुसऱ्या वस्तूशीं त्याचें चित्त एकजीव होऊन गेलें होतें. यामुळें तिच्या नाशानें त्याच्या चित्तास धक्का बसून तेथें दुःखाची उत्पत्ति झाली. 'मी' आणि 'माझें' या दोन शब्दांत साऱ्या जगांतलें दुःख सांठविलें आहे. ही वस्तु 'माझी' अशी भावना झाल्याबरोबर तेथें आसक्ति उत्पन्न झाली व तिजबरोबर तिचेंच अपत्य जें दुःख तेंहि येणारच. 'मी' आणि 'माझें' ही भावना धरून कोणतेंहि कर्म केलें अथवा या भावनेनें प्रेरित असा एखादा विचार आपल्या चित्तांत उद्भवला कीं तत्क्षणींच आपण त्या कर्मांचे अगर त्या विचाराचे गुलाम बनतों. तत्क्षणींच धन्याचें गुलामांत रूपांतर होतें. 'मी' आणि 'माझें' या विचारानें आपलें चित्त तत्क्षणींच आपल्या भोंवतीं पडणाऱ्या शृंखलेचा एक एक दुवा घडवूं लागतें. 'मी' आणि 'माझें' हा विचार जसजसा वाढत जातो, तसतशी आपली शृंखला अधिक जड आणि कष्टप्रद होऊं लागते. यासाठीं जगाच्या स्वरूपाकडे पाहून आनंद करा, आणि त्यांतून शिकण्यासारखें कांहीं असेल तें शिका; पण त्याच्या तडाक्यांत सांपडूं नका, असें कर्मयोगाचें

आम्हांस सांगणें आहे. 'माझें' असें कांहींच म्हणूं नका. 'माझें' या शब्दाबरोबर दुःखाचें बीज पेरलें जातें. मुलाच्या लीला पाहून आनंद करा, पण 'माझें' मूल म्हणूं नका. 'माझें' घर, 'माझें' शरीर हेंहि म्हणूं नका. 'माझें' हेंच सर्व दुःखांचें आणि संकटांचें मूळ आहे. वास्तविक शरीर तुमचें नव्हे, माझें नव्हे आणि कोणाचेंच नव्हे. सृष्टीच्या कायद्यास अनुसरून हजारों देह येतात आणि जातात. त्यांचें जाणें आणि येणें यांचे आपण नुसते साक्षी आहों. नुसत्या शरीराची खरी योग्यता ही भिंत अथवा हिजवरील तें चित्र याहून अधिक नाहीं. तर मग या मातीच्या गोळ्यास आपण इतकें काय म्हणून चिकटावें? एखाद्या चितार्‍यानें चित्र रंगविलें आणि तो पुढें चालता झाला, तर त्या चित्राचें त्यास स्मरणहि उरत नाहीं; पण तेंच जर त्यानें 'माझें' चित्र असें म्हटलें तर तत्क्षणींच त्याच्या भोंवतीं एक नवा बंध उपस्थित होतो. बंधाबरोबर त्याचें सहचारी जें दुःख तें येणारच.

यासाठीं कर्मयोग आपणांस कंठरवानें सांगतो कीं, 'मी' आणि 'माझें' या भावनेचा प्रथम त्याग करा. या भावनेवर थोडासा ताबा चालवितां येऊं लागला, कीं तेथें तसेच हट्टानें चिकटून राहून मनास या लाटेच्या तडाक्यांत जाऊं देऊं नका. असा ताबा ठेवून मग खुशाल जगांत जा आणि वाटतील तितकीं कर्में करा. वाटेल तेथें जा, आणि वाटेल त्या मंडळींत मिसळा. पाप तुह्मांस स्पर्शहि करूं शकणार नाहीं. कमळाचें पान पाण्यांत जन्मास येतें आणि पाण्यांतच राहतें; पण पाणी जसें त्यास चिकटून राहूं शकत नाहीं, तसेंच तुमचा ताबा तुमच्या मनावर आहे, तुह्मी त्याचे धनी आहांत, तोंपर्यंत पाप आणि दुःख तुह्मांस स्पर्शहि करूं शकणार नाहींत. यालाच वैराग्य असें ह्मणतात. 'साधकाची वृत्ति असावी उदास।' ह्मणून संतांनीं जो उपदेश केला आहे, ती उदासवृत्ति हीच. उदासवृत्ति पूर्ण बाणल्यावांचून कर्मयोगच काय, पण कोणताहि योग साध्य होणें शक्य नाहीं. अनासक्ति ही सर्व योगांचा मूळ पाया आहे. पण उदासवृत्ति ह्मणजे काय, याची कल्पना प्रथम बरोबर असली पाहिजे. कोणी घरदार सोडून अरण्यांत जाऊन आणि नुसती लंगोटी लावून कंदमुळें भक्षून राहिला, ह्मणून तो खरा उदासी असेलच असें नाहीं. त्याची हांव फक्त त्याच्या शरीरापुरतीच असूं शकेल; आणि त्यामुळें त्याच्या धडपडीचें क्षेत्र आकुंचित झालें इतकेंच. उदासीनता या शब्दानें शारीरिक सुखदुःखाचा बोध होत नसून ती केवळ मानसिक स्थिति आहे. 'मी' आणि 'माझें' या बंध-

नाचा वास बाह्य देहावर नसून त्याच्या आंत आहे. बाह्य वस्तु आपल्या मनाशीं जोडून देण्याचें काम इंद्रियद्वारा देह करितो इतकेंच. पण त्यापासून जें बंधन प्राप्त होतें ती सांखळी आंतच तयार होते. यासाठीं ' मी ' आणि 'माझें' ही भावना जाऊन बाह्य पदार्थांचा व आपला संबंध तुटला, तर आपण उदासीन होऊं. एखादा मनुष्य राजा असून आणि सर्व भोग भोगूनहि उदासीन असूं शकेल; आणि दुसरा एखादा लंगोटी लावूनहि अत्यंत आसक्त असूं शकेल. यासाठीं प्रथम उदासवृत्ति बाणली पाहिजे; आणि नंतर सदैव कार्यरत असलें पाहिजे. ही उदासीनवृत्ति आपल्या अंगीं कशी आणावी याचा कर्मयोगानें बराच खुलासा होतो; तथापि ही स्थिति साध्य करणें मोठें बिकट काम आहे.

कर्मयोगानें मुख्यतः दोन मार्ग सांगितले आहेत. एक मार्ग निरीश्वरवादी लोकांकरितां आहे. ज्यांना परमेश्वराचें अस्तित्व मान्य नाहीं अथवा त्याबद्दल ज्यांच्या वृत्ती साशंक आहेत आणि परमेश्वराचें आपल्या कार्यांत आपणांस साहाय्य मिळतें अशी भावना ज्यांच्या चित्तांत उत्पन्न होत नाहीं, अशा लोकांकरितां एक मार्ग कर्मयोगानें आंखून दिला आहे. त्यांनीं स्वबुद्धीनेंच सदैव कार्यमग्न असावें. स्वतःस सुचेल अथवा बरा वाटेल असा मार्ग त्यांनीं स्वीकारून कार्यरत रहावें. त्यांची स्वतःची सदसद्विवेकबुद्धि हाच त्यांचा मोठा आधार. अशा रीतीनें कार्यमग्न असतां मनानें मात्र त्या कार्यांत चिकटूं नये. मन अगदीं मोकळें ठेवावें. ' मला यांतून सुखदुःखाची अपेक्षा करावयाची नाहीं ' असें त्यांनीं सदोदित चिंतन ठेवावें. कार्य करीत असतां फल काय येईल याची चिंता न करितां बऱ्याचें सुख अथवा वाईटाचें दुःख मानूं नये. ज्यांचा परमेश्वराच्या अस्तित्वावर पक्का भरंवसा आहे, त्यांच्याकरितां कर्मयोगानें दुसरा मार्ग सांगितला आहे. हा मार्ग पुष्कळ सोपा आहे. अशा मनुष्यांनीं सदैव उद्योगरत राहून सर्व कार्य ' कृष्णार्पण ' ह्मणावें. कार्याचें जें कांहीं फळ येईल तें ' माझें ' नव्हे, तर ' परमेश्वराचें ' आहे, असें त्यांनीं सदोदित चिंतन करावें. जें कांहीं करावयाचें तें सारें परमेश्वराप्रीत्यर्थच करावयाचें. स्वतःच्या सुखासाठीं ह्मणून कांहीं करावयाचेंच नाहीं असा पक्का निर्धार असावा. जें कांहीं पहावयाचें, ऐकावयाचें अथवा दशविध इंद्रियांनीं जें कांहीं करावयाचें तें सर्व परमेश्वरासाठीं. कांहीं चांगलें काम त्यांच्या हातून घडलें तर त्याबद्दल स्वतःच्या स्तुतीचा शब्दहि ऐकावयाचा नाहीं. कारण तें कार्य परमेश्वराचें ह्मणून स्तुतीसहि तोच पात्र आहे. आपण ह्मणजे निवळ परमेश्वराचे नोकर अथवा हस्तक असून तो

आपल्याकडून स्वतःचीं कर्में करवितो आणि अमुक करावें असें आपल्या मनांत येतें, तो त्याचाच हुकूम अशी दृढभावना त्यांनीं धरिली पाहिजे. ' यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् । यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणं ॥' असा हा कर्म योगाचा दुसरा मार्ग भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत सांगितला आहे. कर्ता करविता सर्व परमेश्वर आहे, मग आपण सुखदुःखांनीं स्वतःस व्यर्थ शीण कां करून घ्यावा? अशा विचारानें भक्तांनीं सदोदित संतुष्टवृत्तीनें राहिलें पाहिजे. त्यांनीं आपलें शरीर आणि आपलें मन भगवंतास अर्पण केलें पाहिजे. मोठमोठे अग्नि प्रदीप्त करून त्यांत आहुती देण्यापेक्षां हा महायज्ञ करा. हा शेवटास गेला कीं, ज्ञानजलाच्या अवभृथस्नानानें तुह्मी मुक्त व्हाल. ' या जगांत आढळणाऱ्या वस्तु, बऱ्या, वाईट अगर उपेक्ष्य असोत, त्या सर्व त्याच्या आहेत. मला त्यांपैकीं कांहींच नको ' असें आपण सदोदित आपल्या चित्तांत वागवूं या. ही संवय सदोदित राहिली ह्मणजे ती हळु हळु स्वभावरूप होऊन तिचा प्रवेश आनखशिखाग्र आपल्या देहांत होईल; आपल्या रोमरोमांत ती पक्की भिनून जाईल. इतकी स्थिति झाल्यावर मग हातघाईच्या लढाईंत प्रवेश करून, आपल्या प्रचंड कडकडाटानें मेघराजाला लाजवूं पाहणाऱ्या तोफांच्या तोंडावर आपण चाल करून गेलों, तरीहि आपली मनःशांति आपणांस सोडून जाणार नाहीं.

सामान्य व्यवहारांत ज्याला आपण कर्तव्यकर्म असें म्हणतों ती कर्मयोगाच्या दृष्टीनें अगदीं खालची पायरी आहे. अशीं कर्तव्यें आपणा सर्वांच्या मागें रोजचीं लागलेलीं आहेत. कर्तव्य कर्तव्य म्हणून रोजचीं कामें करीत असतां, त्यांतच दुःखाची उत्पत्ति होते, असा आपणांस नेहमीं अनुभव येतो. अशावेळीं त्या कर्माचें कर्तव्य हें रूप जाऊन तो एक रोगच आपणांस जडल्यासारखा होतो. आणि मग या कर्तव्यरोगाचें पाऊल एकसारखें पुढें पुढेंच पडत जातें. जें जें कांहीं करावेंसें चित्तांत येतें तें तें सारें कर्तव्यच वाटूं लागतें. आणि या कर्तव्यभ्रमाच्या चरकांत आपण एकदां सांपडलों म्हणजे सर्व आयुष्य संपेपर्यंत त्यांतून सुटका होत नाहीं. कर्तव्यभ्रम हा आपल्या साऱ्या आयुष्याचें मातेरें करितो. भर उन्हाळ्यांतला माध्यान्हींचा सूर्य जसा वस्तु करपवून टाकतो तसा हा कर्तव्यभ्रम आपल्या साऱ्या आयुष्याची होळी करतो. संसारचक्रांत पूर्ण सांपडलेल्या आणि कर्तव्यभ्रमानें गुलामाच्या स्थितीस पोहोंचलेल्या या पामरांकडे पहा! सकाळीं उठल्यापासून त्यांचीं 'कर्तव्यें' त्यांच्या

पाठीस लागतात. त्यांना स्नान करावयास अथवा परमेश्वराचें नांव घ्यावयासहि वेळ मिळत नाहीं. सारीं 'कर्तव्यें' करून मट्ट्यास आलेलें शरीर जमिनीवर आडवें होईपर्यंत एकसारखें 'कर्तव्यास' जुंपलेलें असावयाचें. कामावरून हे लोक घरीं आले तरी कामाचे विचारच त्यांच्या डोक्यांत घोळावयाचे. स्वप्नांतहि त्यांस तें पिशाचरूपी 'कर्तव्य' सोडीत नाहीं. त्या बिचाऱ्यांस झोंपहि चांगलीशी लागत नाहीं. अरेरे, 'कर्तव्य' 'कर्तव्य' ह्मणून भ्रमांत पडलेला हा प्राणी याच भ्रमांत एखादे दिवशीं मरण पावतो. सामान्यव्यवहारांत ज्याला कर्तव्य असें आपण समजत असतों, त्याचा हाच प्रकार चोहोंकडे आपणांस आढळून येतो. परंतु हें आपलें कर्तव्य नव्हे. बायकापोरांच्या, आप्तेष्टांच्या अथवा स्वतःच्या सुखकल्पनांस बळी पडून कर्में करणें, हें कर्तव्य नव्हे. आनासक्त चित्तानें आणि स्वतःच्या सुखकल्पनांस बळी न पडतां प्राप्त झालेलीं कामें केवळ ईश्वराची आज्ञा ह्मणून पार पाडून फल त्यास अर्पण करावयाचें हें आपलें खरें कर्तव्य आहे. सर्व कर्में हीं त्याचीच आज्ञा ह्मणून करावयाचीं. आपणांस त्याच्या हुकमानें या जगांत मनुष्यदेह मिळाला हा त्याचा उपकार. त्याच्या हुकमानें प्राप्त झालेलीं कर्तव्यें सुचतील तशीं करावयाचीं. तीं बरीं अगर वाईट झालीं तर त्याचा तो पाहून घेईल. त्याचा विचारच आह्मांस नको. तीं चांगलीं झालीं तर त्यांचीं चांगलीं फळें आह्मांस नकोत, तसेंच तीं वाईट झालीं तर त्यांचीं वाईट फळेंहि ज्याचीं तोच घेणार. चित्त सदोदित शांत ठेवा; सुखकल्पनांचे बंदे गुलाम होऊन दिवसभर राबूं नका; आणि मग प्राप्तकर्तव्य खुशाल करा. हा धनीपणा—हें स्वातंत्र्य—मिळविणें फार कठीण काम आहे. भिकार-देहाच्या तुच्छ वासना तृप्त करण्याकरितां नीच कर्में करून त्यांस 'कर्तव्यें' असें सोज्वल नांव द्यावयाचें हें मात्र सध्या फार सोपें झालें आहे. वाटेल त्याच्या माना कापाव्या, वाटेल तसे घातपात करावे आणि वाटतील तीं कर्में करावीं. 'अमुक असें तूं कां केलेंस' ह्मणून विचारणारा कोणी भेटलाच तर 'काय करावें, हें माझें कर्तव्य ह्मणून मीं केलें,' असा जबाब द्यावा. याहूनहि अधिक मखलाशी करावयाची असली तर आपल्या या धनतृष्णाकूपावर आणखी कांहीं फुलें पसरावीं ह्मणजे झालें. आपल्या कृतीला कांहीं देशहितार्चें, मित्रहिताचें अथवा कुटुंबहिताचें रूप द्यावें, ह्मणजे त्याखालीं हवीं तीं कृष्णकृत्यें लपलीं जातात. कर्तव्य या शब्दाचा हाच अर्थ सध्या पुष्कळांस पटल्यासारखें दिसतें !

कर्तव्य या शब्दाचा खरा अर्थच आपणांस समजत नाहीं. अमुक कर्म करावें असें आपल्या मनांत येतें त्यावेळीं कांहीं तरी शारीरिक सुखाच्या कल्पनेनें हा विचार आपल्या चित्तांत उद्भवलेला असतो. हा विचार बहुधा नेहमीं तृष्णाजन्य असतो. अनंत कालाच्या संवयीनें इंद्रियजन्य सुख हेंच आपलें सर्वस्व होऊन बसतें आणि त्याच्या प्राप्त्यर्थ करावीं लागणारीं कर्में हीं सर्व कर्तव्येंच आहेत, असें आपणांस वाटूं लागतें. उदाहरणार्थ, आपण कांहीं सांसारिक कर्मांस पतिपत्नीमधील कर्तव्यें असें ह्मणतों. पण ज्या देशांत लग्नविधीच नाहीं, तेथें पति आणि पत्नी हें नातेंच नाहीं. त्यामुळें तेथें पतिपत्नीचीं कर्तव्यें हा शब्दहि ठाऊक नाहीं. स्त्रीपुरुषें लग्न करितात तीं एकमेकांच्या सुखाकरितां करितात. अशी चाल बरीच काल चालू राहिली ह्मणजे त्याच चालीनें कर्तव्यें निर्माण होऊं लागतात. एखादा मंदरोग जडला ह्मणजे फारसा त्रास न देतां तो मनुष्याचें शरीर हळुहळु भक्षण करतो! मनुष्याच्या शरीरावर एखाद्या विकाराचा जाज्वल्य परिणाम झाला तर त्याला आपण रोग असें नांव देतों; पण तोच परिणाम अत्यंत मंद–दृष्टोत्पत्तीस न येण्या इतका मंद–असला ह्मणजे प्रकृतीच तशी असें वाटूं लागतें. मंदगतीमुळें त्याचें रोग हें वाईट स्वरूप आपल्या नजरेस येईनासें होतें; तथापि सशास्त्र दृष्टीनें तो रोगच. तसेंच पत्नीबद्दल फाजील आसक्ति असणें हाहि वास्तविक रोगच आहे; पण त्याचें सान्निध्य कित्येक शतकें–सहस्रकें–असल्यामुळें आपण त्याला कर्तव्य हें गोंडस आणि भपकेबाज नांव दिलें आहे. लग्न झालें ह्मणजे तासेमर्फे वाजवावे, ब्राह्मणांनीं मंत्र ह्मणावे, देव आणि अग्नि साक्षीस आणावे, आणि लोकांनीं फुलें अक्षता उधळाव्या; आणि लग्न झाल्यावर त्याच बायकोच्या नादीं लागून नवऱ्यानें वाटतील तीं अमानुष कृत्यें करावीं आणि त्याला कुटुंबाचें कर्तव्य असें नांव द्यावें, हा प्रकार जगांत जिकडे तिकडे चालू आहे. सामान्य व्यवहारांत ज्याला आपण कर्तव्य असें ह्मणतों, त्याचा थोडासा उपयोग इतकाच आहे कीं तेवढी तरी जाणीव असल्यानें मनुष्य अगदींच पशूच्या कोटीस न जातां थोडा तरी शुद्धीवर असतो. ज्या पामरांना यांहून उच्च दर्जाचा विचारच मनांत येणें शक्य नाहीं, त्यांस अधिक खालीं जाऊं न देण्याकरितां या बागुलबोवाचा उपयोग होतो. पण ज्यांना कर्मयोगी व्हावयाचें असेल त्यांनीं कर्तव्याच्या या सामान्य कल्पनेस आपल्या डोक्यांतून प्रथम हद्दपार केलें पाहिजे. असलें कर्तव्य तुमच्या आमच्यासारख्यांच्या उपयोगीं नाहीं. जगाकरितां कांहीं करावयाचें आमच्या मनांत असेल तर तें आम्ही खास

करूं; पण कर्तव्याच्या या बागुलबोवास भिऊन मात्र नाहीं. कर्तव्याचें भूत आमच्या पुढें उभें करून आह्मांस कोणी कांहीं करावयास भाग पाडील ही गोष्ट कोणीं स्वप्नांतहि आणूं नये. आम्हांस कोणतेंहि कर्म करावयास भाग पाडणारा कोणी मायेचा पूत जन्मास आला आहे काय? नाहीं, खास नाहीं. आपण नित्य लक्ष्यांत बाळगिलें पाहिजे तें हें कीं, कोणासहि भिऊन अथवा कोणीं भाग पाडलें ह्मणून आपण कांहीं कर्म केलें तर त्याचें पर्यवसान शेवटीं आसक्तींत व्हावयाचेंच. अमक्यासाठीं कर्तव्य आणि तमक्यासाठीं कर्तव्य असला नेभळटपणाचा विचारच मनांत आणूं नका. आपला देह, आपलें मन आणि आपलें सर्वस्व परमेश्वराच्या चरणीं अर्पण करा. धडाडून पेटलेला हा संसाराग्नि आपणा सर्वांची पूर्णाहुती घेण्याची इच्छा करीत आहे. त्याच्या ज्वाळा प्रत्येक क्षणीं जवळ जवळ येत आहेत. त्यांचा दुःसह ताप आपणांस भाजून काढीत आहे. मित्रांनो, हा अमृताचा पेला घ्या ह्मणजे हाच अग्नि चंद्रासारखा शीतळ होईल, आणि तुह्मांस अनुपमेय सुखाची प्राप्ति होईल. वास्तविक कर्ता करविता निराळा असून आपण सर्व त्याचे नुसते हस्तक आहों. असें असतां तुह्मांला एखाद्या कर्माबद्दल बक्षिस हवेंसें वाटलें तर दुसऱ्या एखाद्या कर्माबद्दल चाबूक खाण्याचीहि तुमची तयारी असली पाहिजे. चाबूक नको असें वाटत असेल तर बक्षिसाची आशा सोडली पाहिजे. चाबूक आणि बक्षिस हे सहोदर आणि संलग्न असल्यामुळें जेथें एक जातो तेथें दुसरा येणारच. त्यांची जोडी फुटणें नाहीं. तुमच्या एका बाजूस सुख आणि दुसऱ्या बाजूला दुःख अशीं जोडीनें चाललीं आहेत. एका बाजूला जीवित आहे तर दुसऱ्या बाजूस मृत्यु आहे. जर तुम्हांस मृत्यूच्या पलीकडे जावयाचें असेल तर जीविताची आशा सोडली पाहिजे. तशा स्थितींत तुम्हीं प्रवेश केला तर चालू जीवित आणि मृत्यु यांची किंमत तुम्हांस सारखीच वाटूं लागेल. असो. यावरून दुःखावांचून निर्भेळ सुखाचें जीवित आणि मृत्युवांचून जीवित ह्या कल्पना शाळेंत जाणाऱ्या पोरांसच शोभणाऱ्या आहेत, अशी तुमची खात्री होईल. ज्याची दृष्टि ज्ञानमय झाली आहे, त्याला या स्थितीची अशक्यता तेव्हांच पटते आणि तो या कल्पनेचा तत्क्षणींच त्याग करून सुखी होतो. जें कांहीं तुम्ही करीत असाल त्यापासून स्तुतीचा एखादा शब्द अथवा कांहीं बक्षिस मिळण्याची आशा करूं नका. आपण एखादें चांगलें कृत्य करण्याचीच खोटी, कीं त्याजबद्दल आपला गौरव व्हावा असें आपणांस वाटूं लागतें. एखाद्या निराश्रितांच्या फंडाला थोडेसे पैसे दिले कीं आपलें नांव कोणकोणत्या पत्रांत आलें आहे

याचा आपण प्रथम शोध करूं लागतों. आपल्या मनांत तृष्णा इतकी रसरसत असतां तिच्यापासून दुःखाची प्राप्ति होऊं नये हें शक्य तरी आहे काय? ज्यांनीं जगावर महदुपकार करून ठेविले आहेत अशा महात्म्यांचीं नांवेंहि कोणास ऐकूं न येतां ते जग सोडून गेले. बुद्ध आणि ख्रिस्त हे ज्यांच्या तुलनेनें फिक्के पडतील अशा मनुष्यांनीं आपलीं नुसतीं नांवेंहि कोणाच्या कानीं जाऊं दिलीं नाहींत. आजपर्यंत प्रत्येक देशांत असे शेंकडों महात्मे जन्मास आले आणि आपलें कार्य करून गेले. देहधारी असतां त्यांनीं जगावर अनंत उपकार केले आणि ते गेले. त्यांचेच विचार बुद्ध आणि ख्रिस्त या रूपानें आपणांस प्रत्यक्ष दिसले; पण खुद्द त्यांचें दर्शन आपणांस झालें नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यांचीं नांवेंहि आपणास ऐकूं आलीं नाहींत. स्वतःच्या ज्ञानाचें पर्यवसान मोठ्या नांवांत—कीर्तींत—व्हावें अशी इच्छाहि त्यांस कधीं शिवली नाहीं. आपला विचार जगावर सोडून ते मोकळे होतात. त्याजबद्दल स्तुतीचा एखादा शब्द ऐकावा अथवा एखादा नवा धर्म अगर पंथ काढावा असेंहि त्यांस वाटत नाहीं. ‘ कीं बृहस्पतीचेनि पाडें । सर्वज्ञता तरी अंगीं जोडे । परी वेडिवे माजी दडे । महिमे भेणें ।’ अशी त्यांची स्थिति असते. त्यांची वृत्ति ह्मणजे शुद्ध सात्विकतेची मूर्तीच असते. प्रेमरसानें ते ओथंबलेले असतात. गडबड आणि धडपड हीं त्यांच्या स्वभावास खपतच नाहींत. हिमालयांतील एका गुहेंत अशा एका योग्याचें दर्शन मला झालें. त्याचा अहंकार अगदीं समूळ नष्ट झाला होता. सर्वतोपरी बद्ध असें जें मानवरूप तें पूर्ण नष्ट होऊन शुद्ध परमेश्वरस्वरूप तो झाला होता. त्याच्या एका हातास एखाद्या प्राण्यानें दंश केला तर तो आपला दुसरा हात ताबडतोब पुढें करी. ‘ परमेश्वराची मर्जीच तशी’ असें तो ह्मणत असे. जें जें कांहीं घडतें तें तें परमेश्वराच्या मर्जीनेंच घडतें, असा त्याच्या बुद्धीचा निश्चय झाला होता. त्याचें दर्शन फार करून कोणास होत नसे; तथापि प्रेम आणि ज्ञान यांची केवळ चिन्मूर्तीच तो होता.

या सात्विक पुरुषांच्या खालोखाल ज्ञानी पण रजोगुणी अशा पुरुषांची पायरी असते. सात्विक पुरुषांपासून मिळालेलें ज्ञान सर्व जगाला सांगण्याचें काम हे पुरुष करितात. अत्युच्च दर्जाच्या सात्विक पुरुषांनीं जें शुद्ध ज्ञान सांठविलेलें असतें तें जगांत पसरविण्याचें काम बुद्ध आणि ख्रिस्त करीत असतात. ‘मी पंचविसावा बुद्ध आहें’ असें गौतमबुद्धानें जागोजाग सांगितलें आहे. पहिले चोवीस बुद्ध कोण होते, त्यांनीं काय सांगितलें वगैरे हकीकत आपणा मानवजातीस उपलब्ध नाहीं. तथापि त्यांच्याच ज्ञानाच्या बळावर ज्यानें आपल्या ज्ञानरूपी

इमारतीचा पाया रचला, तो पंचविसावा बुद्ध मात्र आपणांस माहित आहे. केवळ विचारांत केवढें सामर्थ्य वास करीत असतें, याची जाणीव त्या पूर्वीच्या बुद्धांस पूर्णपणें होती. मनुष्यजातीस अज्ञात अशा एखाद्या गुहेंत आपण जाऊन राहिलों व केवळ पांचच विचारतरंग आपल्या चित्तांत उद्भवले तरी ते अनंतकाल जगांत राहतील अशी त्यांची पक्की खात्री होती. असे पांच विचारतरंग पर्वतांच्या कित्येक गुहा फोडून व अनेक समुद्र ओलांडून सर्व जग-भर प्रवास करून त्यांत भरून राहतील असें सामर्थ्य त्यांत असतें. त्यांचें ग्रहण करण्यास योग्य अशीं मानवी अंतःकरणें सांपडतांच ते त्यांत शिरून त्यांस जागे करितात. ज्यांना या विचारांनीं जागृति आली आहे, अशीं स्त्रीपुरुषें त्या विचारांचें व्यवहार्यरूप आचरणांत व्यक्त करितात. जगाच्या कल्याणाकरितां झालें तरी त्यांत फिरून ज्ञान सांगावयाचें ह्मणजे वादविवाद होणार, आणि अनेक प्रकारच्या अडचणींशीं तोंड देण्याचे नित्य प्रसंग येणार हें उघड आहे. हें करावयास बऱ्याच रजोगुणाची अपेक्षा असते. यामुळें सत्वगुणैकमूर्ति महात्मे जगांत येऊन आपलें ज्ञान व्यक्त करण्याच्या भानगडींत पडत नाहींत. केवळ ब्रह्मरूप होऊन बसल्यानंतर जगाच्या अस्तित्वाची जाणीव उत्पन्न होण्याइतकाहि रजोगुण त्यांच्या ठिकाणीं नसतो. प्रत्यक्ष कार्यकारी जे बुद्ध आणि ख्रिस्त हे कितीहि उत्तम पुरुष असले तरी अज्ञानाची शेवटची छटा त्यांच्या ठिकाणीं राहिलेली असते. आपल्या हृदयांत अशुद्धत्व थोडें तरी शिल्लक असल्या-शिवाय जगांत येऊन काम करणें आपणांस शक्य नाहीं. कोणतेंहि कर्म झालें, तरी कर्म ह्मटलें कीं त्यांत हेतु आणि आसक्ति यांची अगदीं थोड्या अंशानें तरी उत्पत्ति असावयाचीच. कर्माचा हा स्वभावच आहे. परंतु एखादें क्षुद्र कार्य करून त्याबद्दल महत्कीर्तीची अपेक्षा करणें हें मूर्खपणाचें आहे. ज्याच्या इच्छेवांचून गवताची एक काडीहि इकडची तिकडे होऊं शकत नाहीं व जो अगदीं अणुवत् कीटकाचीहि पूर्ण काळजी वाहतो त्या परमात्म्यासमोर उभें राहून आपण आपल्या क्षुद्र कृत्यांचा डांगोरा पिटावा हें आपणास शोभतें काय? वास्तविक विचार केला तर असें करणें हें, परमेश्वराचा अत्यंत उपमर्द करण्यासारखें आहे. त्याच्या समोर उभें राहून 'परमेश्वरा तुझी मर्जी' इतकेंच ह्मणण्याची आपली योग्यता आहे.

सत्वगुणैकमुर्ति पुरुष प्रत्यक्ष जगांत कांहींच कार्य करीत नाहींत; कारण त्यांच्या ठिकाणीं आसक्तीचा यत्किंचित् अंशहि उरलेला नसतो. ज्यांच्या वृत्ति ब्रह्माच्या

ठिकाणीं अत्यंत लीन झाल्या आहेत, ज्यांच्या सर्व वासना ब्रह्मरूप पावल्या आहेत, सदैव ब्रह्मचिंतन करणें हाच ज्यांचा उद्योग, त्यांस करावयाचें असें कांहींच उरलेलें नसतें. ही अगदीं शेवटची पायरी झाली. पण त्यांशिवाय बाकीच्या सर्वांस कर्म करणें भागच आहे. परंतु कर्म करीत असतां त्यामुळें विश्वांतील एखाद्या अणूसहि आपल्याकडून मदत होत आहे, असा विचार आपल्या चित्तास शिवूं नये. कारण त्यास स्वतंत्रपणें मदत करणें हें आपणांस शक्यच नाहीं. या जगद्रूपी तालमींत आपण आपलेंच शरीर कमावीत असतों. कर्म करीत असतां सदैव ध्यानांत बाळगावयाचें तें हेंच. आपण या गोष्टीचा केव्हांहि विसर पडूं दिला नाहीं व कर्म करणें हा एक विशिष्ट हक्कच परमेशाच्या कृपेनें आपणांस प्राप्त झाला आहे, अशी भावना बाळगली म्हणजे आसक्ति आपल्या चित्तांत बिऱ्हाड करणार नाहीं. तुमच्या आमच्यासारखे लक्षावधि लोक स्वतःस मोठे समजून त्यांत गर्क असतात; पण तुह्मी आम्ही मरण पावलों तर पांच मिनिटांच्या आंतच तुमचें आमचें विस्मरण जगास होईल. परमेश्वराची मर्जी नसेल तर एक क्षण तरी जीवंत राहणें तुह्मां आह्मांस शक्य आहे काय ? सर्व कर्ता करविता तोच आहे. सर्व सामर्थ्य त्याचेंच. विश्वांतील यच्चयावत् वस्तूंत आढळणारें सामर्थ्य त्याच्या इच्छेवरच अवलंबून आहे. त्याच्याच आज्ञेनें वारा वाहतो, सूर्य प्रकाशतो, माणसें जगतात आणि मृत्यु हरण करतो. सर्व तोच आणि सर्वांतर्यामीं तोच. त्याची पूजा करावी इतकीच आपली योग्यता. सर्व कर्मांचें फल त्यास अर्पण करा. चांगलें कर्महि केवळ त्याच्याचसाठीं त्याच्याच हुकमानें करावयाचें अशी दृढ भावना धरा; ह्मणजे अनासक्ति तुमच्या ठिकाणीं उत्पन्न होईल. आपणांस जखडणारे पाश खटाखट तुटून आपण मुक्त होऊं. मुक्ति मिळविणें हेंच कर्मयोगाचें साध्य आहे.

प्रकरण ८ वें.

कर्मयोगाचा आदर्श.

अनेक प्रकारच्या निरनिराळ्या मार्गांनीं गेलें तरी सर्वांचें पोहोंचण्याचें ठिकाण एकच आहे. ही वेदांताची कल्पना अत्युच्च दर्जाची आहे. हे मार्ग सामान्यतः चार प्रकारचे आहेत. कर्मयोग, भक्तियोग, राजयोग आणि ज्ञानयोग. हे चार मार्ग भिन्न असले, तरी त्यांचा परस्परांशीं कांहींच संबंध नाहीं असें मात्र नव्हे. केवळ नांवांवरून भिन्नता दिसते तितकी ती प्रत्यक्ष आचारांत नसते, ही गोष्ट

आपण लक्ष्यांत ठेवली पाहिजे. बाह्यतः जरी ते माग वेगळे दिसले तरी तत्वतः त्यांचा एकमेकांशीं अत्यंत निकट संबंध आहे. त्यांच्यापैकीं व्यवहारांत ज्याचें स्वरूप अधिक उघड दिसतें त्यावरून एखादें विशिष्ट नांव त्या मार्गास आपण देतों; पण त्यामुळें इतर मार्गांतलें कोणतेंहि तत्व त्यांत अंतर्भूत होणार नाहीं असें नाहीं. एखादा मनुष्य कर्मयोगी असला तरी तो ज्ञानी असणार नाहीं असें नाहीं. एखादा भक्त असूनहि राजयोगी असूं शकेल. अथवा तिसरा एखादा ज्ञानी असून भक्तहि असेल. एखाद्या मनुष्यांत एखाद्या मार्गाचें स्वरूप उघड दिसतें व त्यावरून तो अमुक मार्गाचा असें आपण ह्मणतों इतकेंच. हे चार मार्ग आरंभीं भिन्न दिसले तरी त्यांचें लक्ष्य एकच असल्यामुळें पुढें पुढें ते ऐकमेकां-जवळ येतात, व शेवटीं त्या लक्ष्यांत एकरूप व एकजीव होतात. त्याचप्रमाणें जगांतील सर्व धर्म आणि पंथ यांचें पर्यवसानहि शेवटीं त्याच लक्ष्यांत होतें.

हें लक्ष्य–साध्य–कोणतें याचा उलगडा मीं पूर्वी केलाच आहे. मुक्ति मिळविणें हेंच सर्वांचें साध्य आहे. आपणाभोंवतीं दिसणारा प्रत्येक अणुरेणु मुक्ती-साठींच धडपड करीत आहे. नुसत्या डोळ्यांनीं न दिसण्याइतक्या सूक्ष्म पदार्थां-पासून तों मनुष्यापर्यंत आणि अगदीं निर्जीव जड पदार्थापासून तों जगां-तील अत्युच्च दर्जाच्या जीवात्म्यापर्यंत सर्वांची धडपड केवळ मुक्तीकरतां आहे. किंबहुना ही धडपड आहे ह्मणूनच हें विश्व आकाराला आलें आहे. प्रत्येक अणूच्या गतीचें सूक्ष्म अवलोकन केलें, तर तो इतरांपासून दूर दूर जाण्याचा प्रयत्न करीत असून, इतर अणू त्याला आपल्याजवळ ओढीत असतात असें आढळून येईल. आपली ही पृथ्वि सूर्यापासून लांब जाण्याचा प्रयत्न प्रत्येक क्षणीं करीत आहे; तसेंच चंद्रहि पृथ्वीपासून दूर जाण्यासाठीं प्रत्येक क्षणीं धडपड करीत आहे. भोंवतालचीं बंधनें तोडून अनंतांत जाऊन मिळावें हाच हेतु या साऱ्या धडपडीच्या मुळाशीं आहे. केवळ याच हेतूनें प्रेरित होऊन सत्पुरुष परमेश्वराची भक्ति करतात आणि याच हेतूनें चोरहि चोऱ्या करतात. सर्व कर्मांच्या मुळाशीं हेतु एकच आहे. हा हेतु सिद्ध करण्याचा मार्ग अयोग्य असला ह्मणजे त्याला आपण पातक असें नांव देतों व योग्य मार्गानें हेतु सिद्ध करूं पाहणारास आपण सज्जन ह्मणतों. मार्गांच्या इष्टानिष्टतेप्रमाणें नांवें भिन्न झालीं तरी मुळांत हेतु तोच आहे. मुक्ति मिळवून अनंताशीं एकरूप–एकजीव–होणें हाच हेतु सर्व विश्वांतील पदार्थांचा आहे. आपणाभोंवतीं असणारे पाश कोणत्या प्रकारचे आहेत याचें ज्ञान होऊन त्यांच्या जाचामुळें श्रमी झालेला

पुरुष परमेश्वराची प्रार्थना करतो, आणि आपणापाशीं अमुक वस्तु नाहीं या विचारानें श्रमी झालेला पुरुष ती वस्तु मिळविण्याकरितां चोरी करतो. 'माझ्याजवळ अमुक वस्तु नाहीं,' हा विचारच येथें पाशरूप झालेला असतो. ती वस्तु मिळाली ह्मणजे या पाशाचें अस्तित्व नाहींसें होईल, या भावनेनें चोर चोरी करितो. विश्वांतील यच्चयावत् पदार्थ–जड अथवा सचेतन–मुक्तीसाठींच धडपडत आहेत. आपण मुक्तीसाठीं धडपडत आहों याचें ज्ञान कित्येकांस असतें आणि कित्येकांस नसतें. पण एवढ्या फरकामुळें मार्ग भिन्न होऊन अंतिम परिणामहि विपरीत होतात. आपली गरज काय आहे व ती पुरविण्याचा मार्ग कोणता याचें ज्ञान ज्यास बरोबर झालें आहे, असा मनुष्य योग्य मार्गावर आरूढ होऊन शेवटीं अनिर्वाच्य सुखाच्या स्थितीस पोहोंचतो. परंतु आपली वास्तविक गरज काय आहे याचेंच ज्ञान चोरास नसतें; यामुळें विपरीत मार्गानें जाऊन शेवटीं त्याची फसगत होते. जीवात्मा मोकळा व्हावयाचा तें बाजूस राहून उलट आणखी नवे पाश त्याच्या गळ्यांत पडतात. याकरितां आपणास पाहिजे काय व तें मिळविण्याचा मार्ग कोणता याचें बरोबर ज्ञान असणें प्रत्येकास आवश्यक आहे.

जगांतील सर्व धडपड मुक्तीकरतां सुरू आहे, ही गोष्ट सर्व धर्मांनीं सूचित केली आहे. सर्व धर्मांनीं प्रतिपादिलेलीं नीतितत्वें व सांगितलेला स्वार्थत्याग यांच्या मुळाशीं हेंच तत्व आहे. मी ह्मणजे देह हा जो जन्मापासून लागलेला अध्यास तो सुटून जीवात्मा मुक्त व्हावा याच करितां सर्व धर्मांचा अवतार आहे. ज्यावेळीं एखादा मनुष्य परोपकारासाठीं झटतो असें आपण पाहतों त्यावेळीं त्याची बुद्धि केवळ 'मी' आणि 'माझें' एवढ्यांतच गुंतली नसून ही हद्द त्यानें ओलांडिली आहे असें सहज आपल्या लक्ष्यांत येतें; तथापि परोपकार करीत असतां दिसून येणारा स्वार्थत्याग कितीहि मोठा असला तरी ती शेवटची पायरी नव्हे, हें आपण लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. परोपकाराकरितां जीव दान दिला तरी त्याच्या मुळाशीं कीर्तिसंपादनाचा स्वार्थ असण्याचा संभव आहे. यासाठीं 'मी' आणि 'माझें' यांची पूर्ण विस्मृति होणें हेंच साध्य आहे असें सांगण्याचा सर्व धर्मांचा, पंथांचा, अथवा नीतिशास्त्रांचा रोंख आहे. मनुष्याला अशा प्रकारचा पूर्ण त्याग करितां आला, तर त्याची स्थिति तरी कोणत्या प्रकारची होईल अशा प्रकारचा प्रश्न उद्भवेल. त्यावर उत्तर असें कीं, अशी स्थिति प्राप्त झाल्यानंतर असा मनुष्य अमुक एक गोमाजी

(देहधारी) अशा स्वरूपाचा राहिला नसून तो विश्वव्यापी झाला, असें समजावें. विश्वांत जें जें म्हणून दृश्यास आलेलें आहे, तें तें सर्व तोच, इतका त्याचा मोठा विस्तार होतो. ' हें विश्वचि माझें घर । ऐसी मति जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपण झाला ॥' हेंच त्याच्या स्थितीचें योग्य वर्णन होय. 'मी' आणि 'माझें' म्हणणारी त्याची क्षुद्रवृत्ति अनंतत्वांत एकवार हरवली म्हणजे तिचा पुनः पत्ता लागत नाहीं. सर्व धर्म, सर्व नीतिशास्त्रें आणि सर्व तत्वज्ञान हेंच साध्य साधा, म्हणून उपदेश करीत आहेत. हें स्थितिवर्णन ऐकून देहाध्यासपिशाचानें पूर्ण पछाडलेल्या मनुष्याची भीतीनें गाळण उडते. परंतु अशीं मनुष्येंहि नीतितत्वांचा उपदेश करीत असतात, असें पुष्कळ वेळां आढळून येतें. अशावेळीं स्वतःस न समजतां तीं त्याच साध्याचा उपदेश करीत असतात. मनुष्य कितीहि देहाध्यासी असला तरी अमुक एक प्रतीचा स्वार्थत्याग केला म्हणजे नीतीची परम सीमा झाली, असें म्हणत नाहीं. किंबहुना अशा प्रकारची परम सीमा निश्चित करतां येणेंच त्यास शक्य नाहीं. अशा रीतीनें केवळ नीतिशास्त्राचा पूर्ण अवलंब करावयाचा म्हटलें तरी विश्वरूप होईपर्यंत मध्यें कोठें थांबतां येणेंच शक्य नाहीं. आमचें तरी म्हणणें हेंच आहे कीं विश्वरूप होणें हीच शेवटची पायरी आहे. मग ती तुह्मीं कोणत्या मार्गानें सिद्ध केली हा प्रश्न यत्किंचित्‌हि महत्वाचा नाहीं. आमच्या विचारांत व देहाध्यासी मनुष्याच्या नीतिमार्गांत फरक इतकाच कीं त्याला स्वतःच्याच सदसद्विवेकबुद्धीस शेवटपर्यंत चिकटून राहण्याची छाती होत नाहीं. त्याच्याच बुद्धीनें दाखविलेलें अंतिम साध्य पाहून त्याला भीति वाटते. जिच्यासाठीं सर्व सृष्टि धडपड करीत आहे त्या मुक्तीचा मार्ग दाखविणें हेंच कर्मयोगाचेंहि साध्य आहे. स्वार्थ विसरून अनासक्त विचारानें कर्म केलें म्हणजे मुक्ति मिळते, असें कर्मयोगाचें सांगणें आहे. या एकंदर विवेचनाचा मथितार्थ हा आहे कीं, स्वार्थप्रेरित प्रत्येक कर्म आपणांस आपल्या साध्यापासून दूर नेतें, आणि अनासक्त चित्तानें केलेलें प्रत्येक कर्म आपणांस आपल्या साध्याच्या जवळ नेतें. यावरून नीति आणि अनीति यांची व्याख्या अशी आहे कीं प्रत्येक स्वार्थप्रेरित कर्म अनीतिवर्धक, आणि निःस्वार्थी असें प्रत्येक कर्म नीतिवर्धक.

अनीतिवर्धक कर्में आणि नीतिवर्धक कर्में यांची व्याख्या परमार्थतः इतकी सोपी असली तरी त्या कर्मांचें प्रत्यक्ष–व्यवहार्य–स्वरूप ठरविणें सोपें नाहीं. परिस्थिति बदलली म्हणजे पूर्वीचीं विहित कर्में अविहित कशीं होतात व पूर्वीं अविहित म्हणून समजलेलीं कर्में विहित होण्याचा संभव कसा उत्पन्न होतो, याचें

विवेचन पूर्वी एकवार केलेंच आहे. एक कर्म एखाद्या परिस्थितीस अनुरूप व विहित असलें, तरी तेंच कर्म परिस्थिति बदलल्याबरोबर अननुरूप व अविहित होतें. तसेंच विशिष्ट परिस्थितींत एखादें कर्म निःस्वार्थी असलें तरी परिस्थिति बदलली तर तेंच कर्म स्वार्थी होण्याचा संभव असतो.

अमुक एक कर्म स्वार्थी व अमुक दुसरें निःस्वार्थी असें निश्चयानें ठरवितां येणें शक्य नाहीं; त्या अर्थी अशा कर्मांची सर्वसामान्य व्याख्या सांगितली आहे. देश, काल आणि परिस्थिति यांस अनुसरून विहित कर्म कोणतें आणि अविहित कोणतें, हें ज्याचें त्यानेंच ठरविलें पाहिजे. एखाद्या देशांत अमुक एक प्रकारची वागणूक नीतिसंमत समजली जाते परंतु दुसऱ्या देशांत निराळ्या परिस्थितीमुळें तीच वर्तणूक नीतिबाह्य ठरण्याचा संभव आहे. सर्व धडपडीचा–सर्व कर्मांचा–अंतिम हेतु मुक्ति हा असून अत्यंत निःस्वार्थी कर्में करणें हाच मोक्षाचा मार्ग होय, इतकेंच तात्विकदृष्ट्या सांगणें शक्य आहे. अत्यंत निःस्वार्थी असें प्रत्येक कर्म, असा प्रत्येक विचार आणि शब्द आपणांस मोक्षाकडे नेतो आणि ह्मणूनच तो नीतिवर्धक. प्रत्येक धर्मांत आणि प्रत्येक नीतिग्रंथांतील विवेचनांत नीतीची हीच व्याख्या लागू पडते असें आपणांस आढळून येईल. कित्येक ग्रंथांत नीति ही परमेश्वराची आज्ञा आहे, असें प्रतिपादन केलें आहे. मनुष्यानें अमुक एक कर्म कां करावें अथवा अमुक एक कर्म कां करूं नये अशा प्रश्नांस ‘ परमेश्वराची आज्ञा ह्मणून ’ इतकेंच उत्तर आपणांस मिळेल. नीतिविषयक कल्पनांच्या उत्पत्तीचें मूलस्थान कोणतेंहि असलें तरी त्यांच्या पोटीं निःस्वार्थ हेंच तत्व गोवलें असल्याचें आपणांस आढळून येईल. नीतिदृष्ट्या अथवा धर्मदृष्ट्या या सिद्धांताचा उच्चपणा इतका उघड असतां ‘ तूं स्वतःला विसर ’ असें ह्मटल्याबरोबर कित्येक लोक गर्भगळित होतात, हें आश्चर्य नव्हे काय? एखाद्यानें केवळ स्वतः-साठीं असें कोणतेंहि कर्म करावयाचें सोडून दिलें, स्वतःबद्दल तो अक्षरहि उच्चारीनासा झाला अथवा स्वतःबद्दल कांहीं विचारहि त्याच्या मनांत येईनासा झाला तर अशा मनुष्यांत 'मी' आणि 'माझें' यांचें वास्तव्य कोठें आढळेल? किंबहुना, 'तूं कोण?' असा प्रश्न आपण त्या मनुष्यास केला तर तो स्वतः तरी या प्रश्नाचें काय उत्तर देईल? स्वतःबद्दल यत्किंचित् तरी विचार शिल्लक असल्याशिवाय 'मी' आणि 'माझें' या भावनेची उत्पत्ति होणेंच शक्य नाहीं. मग स्वतःबद्दलचा विचारहि ज्याच्या चित्तांतून लुप्त झाला आहे, स्वतःबद्दलची ज्याची भावना विश्वभावाशीं एकरूप झाली आहे, अशा मनुष्याच्या चित्तांतून

हरवलेलें 'मी' आणि 'माझें' पुन्हां परत मिळण्याची आशा आहे काय ? त्यानें उत्तर दिलेंच तर '**मनोबुद्ध्यहंकारचित्तानि नाहं। न च श्रोत्रजिव्हे न च घ्राणनेत्रे।**' अशाच प्रकारचें कांहीं उत्तर तो देईल. 'मी' आणि 'माझें' हें एकवार अनंतत्वांत हरवलें ह्मणजे तें कायमचेंच हरवलें.

अशा रीतीनें नीतितत्वें आणि धर्मतत्वें यांचा सुखकर मिलाफ कर्मयोगांत झाला असून 'निःस्वार्थी होऊन आणि युक्तकर्मे करून मुक्त हो,' असा त्याचा उपदेश आहे. अमुक एका मतावर विश्वास ठेवला पाहिजे अथवा अमुक एक धर्म खरा मानिला पाहिजे असें बंधन कर्मयोग्यास नाहीं. फार काय, पण परमेश्वराचें अस्तित्वहि त्यास मान्य नसलें तरी चालेल. आत्मा काय आहे आणि परमात्मा कोण इत्यादि प्रमेयांचें उद्घाटन करीत बसण्याचेंहि त्यास प्रयोजन नाहीं. या देहांत प्रत्ययास येणारा इतकाच 'मी' नसून त्याचें खरें स्वरूप जाणण्याचा कर्मयोग्याचा मार्गच निराळा आहे. हा मार्ग कर्मयोग्यानें स्वतःच आक्रमिला पाहिजे. आयुष्याच्या प्रत्येक क्षणीं त्यानें स्वार्थ विसरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जीं प्रमेयें बुद्धीला आटोकाट ताण देऊन समजावयाचीं तींच प्रमेयें कर्मयोग्याला कर्मे करून प्रत्यक्ष प्रमाणानें अनुभवावयाचीं असतात. त्याला कोणत्याहि मताची अथवा कोणत्याहि उपपत्तीची मदत होण्याचा संभव नसतो. अव्यभिचारी भक्तीनें भक्ताला अथवा अत्युच्च ज्ञानानें ज्ञात्याला जो अनुभव होतो, तोच कर्मयोग्याला कर्मांनीं मिळवावयाचा असतो. निःस्वार्थी कर्मे हाच कर्मयोगांतील पहिला धडा आहे.

आतां यापुढें आणखी एका प्रश्नाचा विचार कर्तव्य आहे. 'कर्म ह्मणजे काय ? निःस्वार्थी कर्म करा, जगाच्या बऱ्यासाठीं कर्म करा, असें तुह्मीं ह्मणतां; पण आमच्या हातून जगाचें बरें काय होणार ?' अशा प्रकारच्या प्रश्नपरंपरेस काय उत्तर देतां येईल याचा आतां विचार करूं. आपणास जगाचें बरें करतां येईल कीं नाहीं, या प्रश्नास केवळ निरपेक्षदृष्टीनें—केवळ परमार्थदृष्ट्या—उत्तर द्यावयाचें ह्मटलें तर तें नकारार्थीच दिलें पाहिजे. केवळ तात्विकदृष्ट्या बोलावयाचें ह्मटलें तर जगाचेंच काय पण एखाद्या अत्यंत क्षुद्र व्यक्तीचेंहि आपण बरें करूं शकत नाहीं. पण या विचारांत दुसरीहि एक दृष्टि आहे, ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं. सापेक्षदृष्टीनें पाहतां आपणांस बऱ्याच गोष्टी जगाच्या बऱ्याकरितां करतां येणें शक्य आहे. जगाचें चिरकालिक कल्याण होईल अशी एकहि गोष्ट आपणांस करतां येणें शक्य नाहीं. कारण तसें असतें तर आजला

जगाची जी स्थिति आहे तशी ती आपणांस आढळली नसती. क्षुधिताला अन्नदान करून त्याची भूक चालू वेळापुरती भागविली तरी थोड्या वेळानें ती पुनः उद्भवणारच. अशाच रीतीनें मनुष्याच्या सुखासाठीं आपण केलेला प्रत्येक प्रयत्न खरोखर क्षणभंगुर आहे, असें आपल्या प्रत्ययास येतें. सुखदुःखांचा जो ताप साऱ्या जगाच्या अंगांत भिनून गेला आहे, त्यावर रामबाण उपाय अजून कोणींहि योजिला नाहीं. चिरस्थायी सुखाचें जीवित जगास देणें शक्य तरी आहे काय ? समुद्रांत एका ठिकाणीं लाट उठवावयाचा आपण उद्योग केला, तर तितक्याच प्रमाणानें दुसरीकडे खाडा पडतो. सुखसाधनांची कितीहि समृद्धि केली, तरी मनुष्यांची हांव आणि ती पुरी करण्याचीं साधनें यांचा मेळ अनादि-कालापासून आजपर्यंत पडला नाहीं. जी स्थिति तेव्हां होती तीच आज आहे. त्या स्थितींत वृद्धि अथवा क्षय यांपैकीं कांहींच झालेलें नाहीं. जगांतील आनंद आणि दुःख आणि उचनीच भाव पूर्वींप्रमाणेंच आतांहि आहेत. गरीब आणि श्रीमंत, रोगी आणि निरोगी, आनंदी आणि दुःखी अशा अत्यंत विरुद्ध दशेंतील लोक पूर्वींप्रमाणेंच आतांहि नाहींत काय ? इजिप्शियन लोकांच्या वेळीं, ग्रीक लोकांच्या अमदानींत, रोमन रियासतींत अथवा सध्याच्या अमेरिकन लोकसत्ताक अमलांत लोकस्थितींत यत्किंचितहि फरक नाहीं. इतिहासकालापासून चालू क्षणा-पर्यंत जगाची स्थिति अगदीं एकसारखी आहे. असें असलें तरी मानवी दुःख हलकें करण्याचे प्रयत्नहि इतिहासकालापासून चालू आहेतच. इतिहासकालापासून प्रत्येक शतकांत इतरांच्या बऱ्याकरितां झटणारीं हजारों स्त्रीपुरुषें जन्मास आलीं, आणि त्यांच्या प्रयत्नांस कितपत यश आलें याचा आढावा काढला तर ? पण या प्रश्नाचें उत्तर देण्याची जरूरच नाहीं. फूटबॉलच्या खेळांत ज्याप्रमाणें चेंडू इकडून तिकडे आणि तिकडून इकडे जातो, त्याचप्रमाणें जगांतील सुखदुःखांची गति आहे असें आपणांस आढळून येतें. शारीरिक यातना हलक्या करण्यासाठीं यत्न करावे तों त्या यत्नांनींच मानसिक यातनांची वृद्धि होते, असा अनुभव येतो. सर्व जग सुखमय करून सोडावयाचें ही आपली कल्पना आरबी भाषेंतील गोष्टींत शोभण्यासारखी आहे आणि तिची वास्तविक योग्यताहि तितकीच आहे. सर्व जग सुखी करण्यासाठीं ह्मणून जें जें राष्ट्र पुढें सरतें, त्याची इच्छा पाहिली तर हीच कीं त्यांतल्या त्यांत त्या सुखांत स्वतःला मोठा वांटा मिळावा. अहाहा! यापेक्षां अधिक निःस्वार्थी उद्योग कोणता आहे बरें ? आणि असल्या निःस्वार्थी उद्योगानें जगाचें कोटकल्याण होणार !

जगांत सुखाची वृद्धि करणें जसें अशक्य आहे, त्याचप्रमाणें त्याच्या दुःखांतहि थोडीसुद्धां भर टाकणें आपणांस अशक्य आहे. सुखदुःखाचें व्यक्त स्वरूप कोठें अधिक अथवा उणें दिसलें तरी त्यामुळें ज्या शक्तीच्या योगानें या संवेदना भासतात त्या शक्तींत कांहीं अधिक उणेपणा येत नाहीं. सुखदुःखें इकडून तिकडे गेलीं अथवा तिकडून इकडे आलीं तरी एकंदर समवायी परिणामांत त्यामुळें वैगुण्य येत नाहीं. निरंतर एकरूप राहणें हा त्या शक्तीचा स्वभावच आहे. त्याचप्रमाणें जीवित आणि मरण व सुख आणि दुःख हीं द्वंद्वें असणें, हा जगाचा स्वभाव आहे. या द्वंद्वावांचून जगाची उत्पत्ति आणि स्थिति शक्यच नाहीं. तसें नसतें तर अनंतकालपर्यंत. आपण देह धारण करूं अशी इच्छा करणें वावगें झालें नसतें. परंतु जीविताची कल्पना आली कीं तिजबरोबर मृत्यूचीहि कल्पना अवश्य येणारच. सुखाच्या कल्पनेबरोबर दुःखाच्याहि कल्पनेचा जन्म होणारच. हीं द्वंद्वें आहेत ह्मणून जग आहे. हीं द्वंद्वें नाहींशीं झालीं, तर त्याच क्षणीं जगहि अदृश्य होईल. खरें चिरकाल जीवित तुह्मांस हवें असेल तर तें मिळविण्यासाठीं तुह्मांस क्षणोक्षणीं मेलें पाहिजे. ज्यांना आपण जीवित आणि मृत्यु या नांवांनीं ओळखतों, तीं तात्विकदृष्ट्या एकाच स्थितीचीं दोन अंगें आहेत. परंतु दृष्टिभेदामुळें त्यांची एकतानता आपल्या लक्ष्यांत येत नाहीं. समुद्रांत एका ठिकाणीं लाट उठली ह्मणजे उंचवटा झाल्यासारखा दिसतो व दुसऱ्या ठिकाणीं खाडा दिसतो तरी त्यामुळें ज्याप्रमाणें त्याच्या पृष्ठभागांत वास्तविक वैगुण्य येत नाहीं, त्याचप्रमाणें जीवित आणि मृत्यु हीं एकाच स्थितींत उत्पन्न होणाऱ्या लाटेप्रमाणें आणि खाड्याप्रमाणें आहेत; अशा रीतीनें दोन अंगें मिळून एक स्थिति आहे. केवळ मृत्यूच्या ह्मणजे खाड्याच्या अंगाकडे पाहणारे ते निराशावादी बनतात व जीविताच्या ह्मणजे लाटेच्या बाजूकडे पाहणारे असतात ते आशावादी बनतात. शाळेंत जाणारीं मुलें पाहावीं तेव्हां आनंदी दिसतात; त्यांच्या गरजा भागविण्यास त्यांचे आईबाप हजर असतात; त्यांना या जगांत कांहीं उणीव आहे, याचें भानच नसतें; यामुळें नैराश्याचे प्रसंगहि त्यांस ठाऊक नसतात. तीच वृद्धाची स्थिति पहा. ती मुलाच्या स्थितीच्या अगदीं उलट असते. जगांत अनेक प्रकारच्या कष्टांचा त्यास अनुभव येऊन त्याच्या वृत्ती शांत झालेल्या असतात. यामुळें कसल्याहि स्थितीनें तो हुरळून जात नाहीं. जी गोष्ट व्यक्तीला तीच राष्ट्रालाहि लागू आहे. तारुण्यांत नुक्तेंच प्रवेश करूं लागलेलें राष्ट्र आशावादी असलें—आपण ह्मणूं तें करूं अशी धमक त्यास वाटत असली—तर त्यांत

नवल नाहीं. परंतु वृद्ध राष्ट्राची स्थिति याहून निराळी आहे. अनेक शतकें निरनिराळ्या परिस्थितींचा अनुभव येऊन त्याच्या वृत्तींत नैराश्यवादाचा प्रवेश झालेला असतो. ‘ हजार वर्षें शहर आणि हजार वर्षें रान ’ अशा अर्थाची एक ह्मण आहे. ही ह्मण साऱ्या जगाच्या स्थितीस लागू आहे. आज वैभवाच्या शिखरावर असलेलीं राष्ट्रें उद्यां धुळीस मिळतात! आणि आज अत्यंत अवनतावस्थेंतला समाज उद्यां प्रगतीच्या उच्च शिखरावर आरूढ झालेला दिसतो. अशा रीतीनें परिस्थितींत बदल होत असतां ज्याच्या नजरेस जी परिस्थिति येते तिच्याकडे पाहून तो आशावादी अथवा निराशावादी बनतो. पण अशा अदलाबदलीमुळें जगाच्या सामान्यरूपांत कांहीं बदल होत नाहीं. जगांतील दुःखें नाहींशीं करूं पाहणारांच्या मतांपैकीं एकाचा विचार येथवर केला.

अशा लोकांचें दुसरें एक तत्व समता हें आहे. जगांतील विषमावस्था हें त्याच्या दुःखाचें एक मोठें कारण असून ती नाहींशी होऊन सर्वत्र समता नांदूं लागली तर जग सुखी होईल, असें या लोकांचें दुसरें तत्व आहे. सर्व जगाला सुखी करण्याची इच्छा करणें ही कल्पना एका दृष्टीनें प्रशंसनीय आहे. केवळ याच कल्पनेनें प्रेरित असे अनेक उद्योग चालू असल्याचें आपल्या पाहण्यांत येतें. हिच्या अभावीं हीं कार्यें सुरू झालीं नसतीं. सर्व मानवजातींत समता उत्पन्न करणें हें आपल्या धर्माचें एक ब्रीदच आहे असें कित्येक धर्मांचे उपदेशक सांगत असतात. खुद्द परमेश्वर या पृथ्वीवर राज्य करण्यास येणार असून त्याच्या अंमलांत विषमावस्था कोठें औषधासहि मिळणार नाहीं असें प्रतिपादन हे लोक मोठ्या जोरानें करीत असतात. असें प्रतिपादन करणारे लोक हे वस्तुतः धर्मवेडे असतात. धर्मवेड्यांइतके खरे भाविक कोणी नाहींत. ग्रीक आणि रोमन रियासतींतील गुलामांस ख्रिस्ती धर्म इतका मानवला याचें कारण हेंच कीं, या धर्माच्या उपदेशांत समतेच्या तत्वाचा प्रमुखपणें उल्लेख होत असे. त्यामुळें त्या बिचाऱ्यांची साहजिकच अशी कल्पना झाली कीं सर्व जग ख्रिस्ती झालें, तर त्यामुळें सर्वत्र समता उत्पन्न होऊन गुलामगिरीचें समूळ उच्चाटन होईल. आपण एकदां गुलामगिरींतून सुटलों ह्मणजे यथेच्छ खाऊन पिऊन आनंद करूं, अशी त्या बिचाऱ्यांस आशा उत्पन्न होऊन ख्रिस्ताच्या निशाणाभोंवतीं ते जमा झाले. ज्यांनीं या तत्वाचा उपदेश केला ते उपदेशक धर्मवेडे असले, तरी खरोखर फार भाविक होते. परमेश्वर या जगावर राज्य करण्यास येईल, ही कल्पना खरी मानण्याइतका भोळा आणि भाविक

माणूस सध्याच्या काळीं फारसा आढळावयाचा नाहीं. यामुळें पूर्व कालींच्या या समतेच्या तत्वाचें थोडेंसें रूपांतर झालें आहे. या रूपांतराचे समानार्थक असे स्वातंत्र्य आणि बंधुभाव हे शब्द आतां जिकडे तिकडे ऐकूं येतात. व्यक्ति-स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य इत्यादि प्रकारचीं अनेक स्वातंत्र्यें मिळालीं व परमेश्वर सर्व मनुष्यांचा पिता ही कल्पना एकसमयावच्छेदेंकरून सर्वांस पटली ह्मणजे सर्वत्र समता उत्पन्न होऊन जग सुखी होईल, असा घोष सध्या ऐकूं येतो. परंतु हाहि दुसऱ्या प्रकारचा वेडेपणाच आहे. पूर्वीचें धर्मवेड जाऊन त्या जागीं हें नवें वेड आलें, इतकेंच. खरी समता या पृथ्वीवर पूर्वी केव्हांहि नव्हती, सध्या नाहीं, आणि पुढेंहि कधीं होणार नाहीं. सर्वांची स्थिति एकसारखी असणें ही गोष्ट शक्य कोटींतील तरी आहे काय? राजा आणि रंक यांस जेथें एक-सारखाच मान मिळतो असें ठिकाण या पृथ्वीवर एकच आहे. तें ठिकाण कोणतें ह्मणाल तर स्मशान! सर्वत्र समता उत्पन्न करण्याकरितां सर्व जगाचें स्मशानभूमींत रूपांतर करावें लागेल! जग ज्या स्वरूपानें आपणांस भासत आहे तें रूप त्यास कां प्राप्त झालें, याचा प्रथम विचार केला पाहिजे. सृष्टि-मालिकांपैकीं आपल्या या एका सृष्टीचा आपण विचार केला, तर अगदीं आरंभीं ह्मणजे प्रलयकालीं जगाचें रूप सध्या आहे तसें नव्हतें असें आपणांस दिसून येईल. त्यावेळीं सर्व तत्वें एका महत्तत्वांत लीन होतीं व जगाला दृश्य स्वरूप नव्हतें. अग्नि जसा गारगोटीच्या पोटीं लीनावस्थेंत असतां अदृश्य असतो त्याचप्रमाणें जगाची अवस्था होती. ज्या त्रिगुणांच्या साहाय्यानें हें जग दृश्य स्थितीस आलें आहे, ते तीन गुण ह्मणजे सत्व, रज आणि तम, हे समसमान स्थितींत होते. त्यांची जी समावस्था ती जगाची लीन अथवा अदृश्य स्थिति होय. जेव्हां या समावस्थेचा भंग होतो, जेव्हां या त्रिगुणांत असमान स्थिति उत्पन्न होते, तेव्हां जग दृश्य होतें. ह्मणजे जग दृश्य होण्याकरितां या गुणांत असमानावस्था उत्पन्न व्हावी लागते असें सिद्ध होतें. या गुणत्रयांत चढाओढ आणि अहमह-मिका सुरू झाली ह्मणजेच जग दृश्य होतें. चढाओढीबरोबर कमी अधिकपणा अवश्य येणारच. ज्या अणुरेणूंचें हें जग बनलें आहे त्या अणुरेणूंतील चळवळ बंद होऊन त्याची समावस्था झाली तर काय होईल? अशावेळीं त्यांतून कशाचीहि उत्पत्ति होणें शक्य नाहीं. आपल्या भौतिक शास्त्रांनीं ही गोष्ट प्रत्यक्ष सिद्ध केली आहे. एखाद्या भांड्यांत शांत असलेलें पाणी आपण हातानें ढवळलें तर त्या पाण्यांतील प्रत्येक बिंदु आपली पूर्वीची समता प्राप्त करून घेण्यासाठीं धडपड

करतो. सर्व बिंदु एकमेकांच्या आश्रयानें पूर्वस्थिति प्राप्त करून घेण्यासाठीं धडपड करीत असतात. त्याच प्रमाणें या विश्वांतील यच्चयावत् पदार्थ आपल्या पूर्वीच्या समानावस्थेस जाण्याकरितां धडपडत आहेत. अशी समानावस्था प्राप्त होते न होते तोंच पुन्हां एखादा आघात होऊन तो समानावस्थेचा बिघाड करतो व जग पुन्हां दृश्यावस्थेस येतें. यावरून असमानावस्था हेंच जगाच्या दृश्यस्वरूपाचें आदिकारण आहे असें सिद्ध होतें. तसेंच जग दृश्यस्वरूपास येण्याकरितां आघाताची जशी जरूर आहे, त्याचप्रमाणें त्याकरितां समावस्थेस जाऊं पाहणाऱ्या गुणांचीहि आवश्यकता आहे.

यावरून गुणत्रयाची सर्वत्र समता उत्पन्न झाल्याशिवाय जगांत समानता उत्पन्न होणें ही गोष्ट अगदीं अशक्य कोटींतली आहे, हें सिद्ध झालें. गुणत्रयाची समावस्था सर्वत्र आणि एकाच कालीं उत्पन्न होईल ही गोष्ट शक्य नाहीं. गुणत्रयाची समावस्था उत्पन्न होऊं लागली तर त्यावेळीं जगांत सध्या असलेले सर्व पदार्थ निराळ्या स्थितींत जाऊं लागतील. ज्या दोन वायूंचें पाणी बनलें आहे, त्यांतील गडबड बंद झाली ह्मणजे पाण्याचें अस्तित्व नाहींसें होईल. अशा रीतीनें पदार्थमात्राचें रूपांतर होऊं लागलें ह्मणजे आपणा मनुष्यांस जीव धारण करणें शक्य आहे काय ? ह्मणजे ज्या कालीं पदार्थमात्रांत समता उत्पन्न होईल, त्याच क्षणीं हें जग आपणांस राहावयास अयोग्य होऊन जग ह्मणजे एक मोठी स्मशानभूमि होऊन राहील ! स्मशानांत मात्र खरी समता असते, हें आपण नित्य पाहत आहोंच ! या एकंदर विवेचनावरून सर्वत्र समता आणि बंधुभाव उत्पन्न करण्याचे आपले प्रयत्न किती बालिशतेचे आहेत, हें आपल्या लक्ष्यांत आलेंच असेल. हे प्रयत्न केवळ बालिशतेचे आहेत येवढेंच नव्हे, तर ते फलद्रूप करण्याच्या प्रयत्नांत आपणांस यश आलेंच तर त्याच दिवशीं प्रलयकाल सुरू होईल ! मनुष्यांमनुष्यांत जो फरक आढळतो त्याचें कारण काय ? दोन मनुष्यांच्या मेंदूंत जो फरक असतो तोच पुढील अवस्थेंत असमता उत्पन्न करतो, असें ह्मणणें वावगें होणार नाहीं. एकाच दिवशीं जन्मलेलीं चार मुलें आपण पाहिलीं तरी त्यांच्या मेंदूंत फरक असतोच, असें शास्त्रज्ञ आपणांस सांगतात. सर्व मनुष्यांचे मेंदु सारख्याच शक्तीचे असतात, असें निवळ वेड्यावांचून सध्याच्या कालीं तरी कोणी ह्मणणार नाहीं. आपण ज्या शस्त्रास्त्रांनीं सिद्ध होऊन या जगांत अवतरतों त्या शस्त्रास्त्रांत आरंभींच फरक असतो. हा फरक गर्भावस्थेंतच उत्पन्न झालेला असतो.

गर्भावस्थेंतून बाहेर येऊन आपण जगांत वावरूं लागलों ह्मणजे बुद्धीच्या कमी अधिकपणास दृश्य स्वरूप येऊं लागतें. बुद्धीचा कमी अधिकपणा नाहींसा करणें शक्य आहे काय ? तुमच्या या देशांत (अमेरिकेंत) मूळचे लोक-ज्यांना तुह्मी इंडियन लोक ह्मणतां-हजारों वर्षें राहत होते. त्यानंतर तुमचे मूठभर पूर्वज येथें आले. त्यावेळची स्थिति पाहिलेला एखादा मनुष्य सध्या येथें आला, तर त्यावेळच्या आणि सध्यांच्या स्थितींत त्यास जमीनअस्मानाचें अंतर दिसून येईल. पूर्वींचा देश तो हाच, ही गोष्ट त्यास खरीहि वाटणार नाहीं. अमेरिकन इंडियन लोकांनीं हजारों वर्षें या देशांत राहून एखादें तरी शहर वसविलें होतें काय ? एखादा कारखाना तरी त्यांनीं उभारला काय ? त्यांनीं असें कां केलें नाहीं ? जन्मतः सर्वांच्या बुद्धीचें प्रमाण जर एकसारखें आहे, तर तुमच्या मूठभर पूर्वजांनीं जी गोष्ट थोड्याशा अवधींत करून दाखविली तीच हजारों वर्षें वस्ती करून राहिलेल्या हजारों इंडियनांस कां करितां आली नाहीं बरें ? तुमच्या पूर्वजांबरोबर या भूमींत आलेली बुद्धिमत्ता निराळ्या प्रकारची होती. त्यांचे निराळे पूर्वसंस्कार त्यांजबरोबर आले होते; व येथें अनुकूल भूमि सांपडतांच त्या संस्कारांस दृश्यस्वरूप येऊन झोंपड्यांचीं इंद्रभुवनें आणि वनांचीं उपवनें बनलीं. सर्वत्र समावस्था ह्मणजे मृत्यूचें साम्राज्यच होय ! जोंपर्यंत जग आहे तसेंच चालेल, तोंपर्यंत त्यांतील विषमावस्था कधींहि नाहींशी होणार नाहीं, आणि सर्वत्र समता उत्पन्न करून जगाला सुखी करण्याचा आपला प्रयत्न प्रलय-कालीं मात्र सिद्ध होईल ! प्रलयकालावांचून इतर कोणत्याहि कालीं समावस्था शक्य नाहीं. असें आहे तरी सुद्धां या कल्पनेनें प्रेरित असे महत्वाचे अनेक उद्योग सुरू आहेत, ही गोष्ट विसरतां कामा नये. जग दृश्यस्वरूपास येण्यास ज्याप्रमाणें असमतेची जरूर आहे, त्याचप्रमाणें ती असमता अधिक होऊं नये अशा प्रयत्नांचीहि जगाच्या स्थितीस जरूर आहे. अशा मार्गांनीं प्रयत्न करून मनुष्य आपल्या मूळच्या सच्चिदानंदस्वरूपास परत जातो. आपल्या मूळच्या स्वरूपास परत जाण्याची इच्छा न उद्भवती तरीसुद्धां जगाला दृश्यस्वरूप प्राप्त झालें नसतें. ह्मणजे जग दृश्यस्वरूपास येण्यास व त्याची स्थिति कायम राहण्यास, पूर्वस्वरूपास परत जाण्याची इच्छा आणि असमता या दोहोंचीहि सारखीच आवश्यकता आहे. याकरितां जगाची स्थिति बदलण्याचा यत्न करणारे आणि ती स्थिति कायम ठेवूं पाहणारे अशा दोन्ही प्रकारच्या मनुष्यांची जगास जरूर आहे. या दोहोंपैकीं जी एक इच्छा अंतःकरणांत प्रबळ असते तिला

अनुरूप असा हेतु उत्पन्न होतो व त्या हेतूस अनुसरून मनुष्य कर्मास प्रवृत्त होतो. जगाला जोंपर्यंत अस्तित्व आहे, तोंपर्यंत हे दोन्ही प्रकार कायम राहणारच व हे दोन्ही प्रकार कायम आहेत तोंपर्यंतच जगाला अस्तित्व असणार; असा हा परस्परावलंबी संबंध आहे.

या प्रचंड संसारचक्राच्या पोटांत इतर अनेक चक्रांची इतकी भयंकर गुंतागुंत आहे कीं, आपला हात त्यांत कोठेंहि एकवेळ गुंतला, कीं हीं चक्रें आपणांस आंत ओढून शुष्क करून टाकण्यास चुकत नाहींत. आपण एखाद्या कर्मास प्रवृत्त झालों, ह्मणजे तें कर्म संपल्याबरोबर आपणांस विश्रांति मिळेल अशी आपली अपेक्षा असते. परंतु आपल्या हातचें कर्म अर्धवट झालें न झालें तोंच आपल्या पाठीशीं दुसरें कर्म दत्त ह्मणून उभें राहतें. आज आपण सर्वजण या प्रचंड चक्राच्या सपाट्यांत सांपडलों आहों. यांतून सुटण्यास आपणास दोनच मार्ग आहेत. पहिला मार्ग असा आहे कीं या चक्राशीं आपला कांहीं संबंधच येऊं द्यावयाचा नाहीं. ह्मणजे सर्व वासनांचा त्याग एका क्षणींच करावयाचा. सांगतांना हें फार सोपें वाटतें, पण करणें मात्र जवळ जवळ अशक्य आहे. ‘ बोल बोलतां वाटे सोपें । करणी करतां टीर कांपे । ’ हा अनुभव कोणास नाहीं ? कोट्यवधि मनुष्यांत असा एखादा असला तर असेल. दुसरा मार्ग हा कीं, या चक्रांच्या भेसूर स्वरूपाला न भितां एकदम त्यांत उडी घालावयाची व तीं कशीं फिरतात, कशाच्या जोरावर फिरतात आणि मधूनच त्यांतून निसटण्यास कोठें रस्ते आहेत कीं काय, इत्यादि रहस्याचा शोध करावयाचा. हें रहस्य सांपडलें कीं, चक्रांचें धनीपण आपणांस प्राप्त होतें. हेंच रहस्य आपल्या स्वाधीन करणें, हा कर्मयोगाचा उद्देश आहे. या चक्रव्यूहाला भिऊन पळून जाऊं नका. पळून जाऊन रक्षण होणें शक्य नाहीं. तर मग निधड्या छातीनें एकदम आंत शिरून बाले किल्ला हस्तगत करा, ह्मणजे तुमचें काम झालें. या कामास फार चातुर्यानें हात घातला पाहिजे. आंत शिरून योग्य मार्गानें तुह्मीं गेलां, तर सुरक्षितपणें बाहेर पडण्याचा मार्गहि तुह्मांस आपोआप दिसेल.

कर्म ह्मणजे काय याचा विचार आपण पूर्वीं एक वेळ केलाच आहे. जगाचें अस्तित्वच कर्मावर अवलंबून आहे हेंहि आपणांस समजून आलें आहे. तसेंच जगाला सुखी करूं पाहणें हें मूर्खपणाचें व सर्वथैव अशक्य आहे, हेंहि आपणांस कळून आलें आहे. अंतःकरणापासून ईश्वराच्या अस्तित्वावर ज्यांचा खरा विश्वास असतो त्यांस हें लवकर पटतें. आपल्या मदतीची अपेक्षा करण्याइतका परमेश्वर लंगडा-

ळला नाहीं, ही गोष्ट ते केव्हांहि विसरत नाहींत. जग जसें चाललें आहे तसें चालणारच. आपलें काम मुक्ति मिळविण्याचें आहे, आणि अत्यंत निःस्वार्थी होणें हा मुक्तीचा मार्ग आहे. कर्म करीत असतांच निःस्वार्थी होणें आणि निःस्वार्थी होऊन मुक्ति मिळविणें यालाच कर्मयोग ह्मणतात. जगाला सुखी करण्याची ही कल्पना धर्मवेड्या लोकांना कार्यरत ठेवण्यास उपयोगी पडते ही गोष्ट खरी, पण धर्मवेडापासून जसें कांहीं चांगलें कार्य होतें, तसेंच अनेक अहितकर भावना त्यापासून निर्माण होतात, ही गोष्टहि खरी आहे. आपण मुक्त व्हावें अशी जी लालसा प्रत्येक वस्तूंत आढळते, तिला अनुसरून वस्तुमात्र प्रयत्न करीतच असते. ही इच्छा इतकी बलवती आहे कीं, ती तुह्मांस स्वस्थ बसूं देणारच नाहीं. मग कर्मास प्रवृत्त करण्यास बाहेरील एखाद्या शक्तीची अपेक्षा कां असावी, असा आपणांस कर्मयोगाचा प्रश्न आहे. 'मी अमुक करीन आणि त्याचें तमुक फल भोगीन' इत्यादि लौकिक विचार झुगारून देऊन फलासक्ति न ठेवतां कर्म करा. सतत अभ्यासानें हें सर्व साध्य होण्याजोगें आहे असें कर्मयोगाचें सांगणें आहे. स्वतःच्या इंद्रियजन्य सुखार्थ कर्म करावयाचें नाहीं, अशा भावनेनेंच कर्म करण्याचा अभ्यास सुरु केला, ह्मणजे स्वार्थाचा समूळ लोप होऊन, परार्थ हाच कर्त्याच्या जीविताचा एक घटक होऊन बसतो. आपल्या हातून परार्थ न घडेल तर जगणेंहि योग्य नाहीं, इतकी उत्कट भावना त्याच्या ठिकाणीं उत्पन्न होऊं लागते. असें आहे तर कार्यरत राहण्यास चालकशक्ति बाहेरून येण्याची अपेक्षा कां करावी ? अमुक कार्य चांगलें आहे असें आपणांस वाटलें, तर तें करण्यास आपली सदोदित तयारी असली पाहिजे. त्यांत स्वतःच्या सुखाची अपेक्षा मुळींच असतां कामा नये. इहलौकिक सुखाची अपेक्षा तर राहोच, परंतु स्वर्गसुखाच्या अपेक्षेनें केलेलें सत्कर्मसुद्धां आत्म्यास बद्धक होतें. स्वार्थाची यत्किंचित्‌हि छटा शिल्लक असेपर्यंत केलेलें प्रत्येक कर्म मुक्तिपथापासून आपणांस दूर ठेवतें; येवढेंच नव्हे, तर आपणाभोंवतीं अगोदरच असलेल्या शृंखलेंत त्या कर्मांच्या योगानें आणखी एका दुव्याची भर पडते.

यासाठीं कर्मयोगाचें त्रिवार सांगणें हेंच आहे कीं, प्रत्येकानें कर्म करीत असतां फलाची आसक्ति ठेवूं नये. जग हें आमच्यासाठीं उत्पन्न झालें नाहीं; अथवा आह्मींहि जगासाठीं उत्पन्न झालों नाहीं. कोणी कोणाचें बरें अगर वाईट करूं शकत नाहीं. तसेंच बाह्यशरीरावरून दिसून येतें तें आमचें स्वरूप नव्हे. अनेक कर्में करून फळें भोगतांना जरी आह्मी दिसलों, तरी

तें आमचें खरें स्वरूप—मूळरूप—नाहीं. आमचें खरें रूप ह्मणजे सच्चिदानंदरूप हेंच आहे. आह्मी कर्म करतांना आढळलों, तरी वस्तुतः आह्मी कांहींच करीत नाहीं. असें आहे तर, आह्मी सध्याचा बंदिवास कां भोगावा? या बंदिवासांतून मुक्त होण्याचा राजमार्ग एकच आहे. अत्यंत अनासक्त चित्तानें केलेलें प्रत्येक कर्म आमच्या पायांतील शृंखलेचा एक एक दुवा तोडीत असतें. चित्त अनासक्त असतां त्यांतून एखादाहि शुभ विचार निघून जगांत संचार करूं लागला तर त्या विचारालाहि असला एखादा दुवा तोडण्याचें सामर्थ्य येतें; व अशा रीतीनें शुद्धीकरणाची क्रिया पूर्ण होऊन आह्मी अत्यंत पवित्र बनतों. आतांपर्यंत केलेलें सर्व विवेचन इतकें उघड असतांहि निव्वळ वेड्याची बडबड आहे, असें समजणारे वेडेपीर अस्तित्वांत आहेत. कर्मयोग हा निवळ बोलण्याचा विषय असून तो कृतींत येणें अशक्य आहे, असें ह्मणणारे अनेक लोक माझ्या पाहण्यांत आले आहेत. कांहीं तरी हेतु असल्याशिवाय मनुष्याच्या हातून कोणतेंहि कर्म घडणें शक्य नाहीं व यासाठीं गीताप्रतिपादित मार्ग दिसण्यास चांगला दिसला, तरी तो सर्वथा अव्यवहार्य आहे, असें ह्मणणारे अनेक लोक मला भेटले. परंतु यांतील तात्पर्य इतकेंच कीं, अनासक्तचित्तानें कर्में करणारे कर्मयोगी त्यांच्या पाहण्यांत आले नसल्यानें ते असें बोलतात. केवळ परोपकारार्थ कर्म करणें ही गोष्ट धर्मवेड्यासच शक्य आहे, असें त्यांस वाटतें.

कर्मयोगानें दाखविलेला मार्ग पूर्ण व्यवहार्य आहे, ही गोष्ट भगवान् बुद्धानें तो मार्ग स्वतः पूर्णपणें आचरून प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविली आहे. कर्मयोगाचा आचार प्रत्यक्ष करून दाखविणारा असा हा एकच महात्मा या भूतलावर झाला. जगांत आजपर्यंत जितके धर्मप्रवर्तक झाले, त्यांच्या चरितांत कोणताना कोणता तरी हेतु प्रधान होता. अगदीं अहेतुक असें चरित एकट्या बुद्धाचेंच आहे. बुद्धाखेरीज जितके धर्मप्रवर्तक होऊन गेले, त्यांत मुख्यतः दोन प्रकार आढळतात. आपण प्रत्यक्ष परमेश्वराचे अवतार आहों असें कांहीं प्रवर्तक ह्मणत, हा एक प्रकार; आणि आपण परमेश्वराचे केवळ दूत असून त्याचा संदेश मनुष्यजातीस पोहोंचवावयाचा हें आपलें काम आहे, असें ह्मणणारे प्रवर्तक हे दुसऱ्या प्रकारचे होत. या प्रकारचे प्रवर्तक कितीहि उच्च दर्जाचे असले व त्यांची धर्मबुद्धि कितीहि श्रेष्ठ असली, तरी त्यांचीं कर्में अगदीं अनासक्त चित्तानें केलेलीं होतीं असें ह्मणवत नाहीं. कसल्या तरी प्रतिफलाची अपेक्षा त्यांस होतीच. एका वादविवादाचे प्रसंगीं भगवान् बुद्ध ह्मणाला, "ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल

अथवा आत्म्याच्या स्वरूपाविषयीं तुमच्या अनेक प्रकारच्या उपपत्ति ऐकण्याची माझी इच्छा नाहीं. परमेश्वर असला अथवा नसला तरी त्यामुळें माझ्या दानतीवर बरावाईट परिणाम काय होणार आहे? असलें तुषकंडन करून कालक्षेप करण्यापेक्षां सन्मार्गवर्ति होण्यांत गेलेला वेळ सत्कार्यी तरी लागेल. स्वतःच्या सुखाची यत्किंचित्हि पर्वा न करतां परोपकारार्थ कर्म करा, ह्मणजे सत्य ह्मणून जें काय असेल, त्याची तुह्मांस प्रत्यक्ष भेट होऊन तुह्मी मुक्त व्हाल." त्याच्या एकंदर जीवितयात्रेंत स्वतःच्या सुखाबद्दलचा विचार त्यास शिवलासुद्धां नाहीं. त्याचें चित्त इतकें अहेतुक असतांहि त्यानें केलेल्या कार्याचा शतांशहि इतर कोणीं करून दाखविल्याचें आढळत नाहीं. जगाच्या इतिहासांत इतक्या अनासक्त चित्तानें एवढा मोठा कार्यभाग केल्याचें दुसरें एकहि उदाहरण आपणांस सांपडणार नाहीं. पृथ्वीवर मनुष्यजात अस्तित्वांत आल्यापासून 'अनामिका सार्थवती' करणारें असें हें एकच नररत्न आजपर्यंत उदयास आलें. केवळ परार्थचिंतन, निःसीम त्याग आणि अत्यंत निरपेक्षबुद्धि यांचा मनोहर संयोग इतर कोठेंहि तुह्मांस आढळणार नाहीं. अत्यंत उच्चप्रतीचें तत्वज्ञान सांगत असतां नीचतम प्राण्याबद्दलहि अत्यंत कळकळ त्याच्या अंतःकरणांत वास करीत होती. 'मी' आणि 'माझें' या शब्दांचे अर्थहि तो विसरला होता. कर्मयोगाचा शुद्ध आदर्श पहावयाचा असेल तर तुह्मी बुद्धाकडे पहा. अहंकाराची छटासुद्धां त्याच्या हृदयांत नव्हती. बुद्धि आणि अंतःकरण या दोहोंचीहि परिपक्व दशा एकत्र कोठें पाहणें असेल तर बुद्धावांचून ती दुसऱ्या कोठेंहि आढळणार नाहीं. जीवात्म्याचें याहून अधिक उज्वल असें रूप दुसऱ्या कोठेंहि सांपडणार नाहीं. मनुष्यजात सन्मार्गवर्ति व्हावी एवढ्याचसाठीं खटपट करणारा असा हा पहिला महात्मा होय. एके वेळीं तो आपल्या शिष्यांस ह्मणाला, "अमुक गोष्ट अमक्या जुन्या ग्रंथांत सांगितली आहे, एवढ्यावरूनच ती सत्य ह्मणून गृहीत धरूं नका. तुमचे आप्तइष्ट अमुक गोष्ट खरी मानतात, एवढ्यावरूनच ती तुह्मी खरी मानूं नका. लहानपणापासून वडिलांनीं अमुक गोष्ट सांगितली, एवढ्यावरूनच तुह्मी ती खरी मानूं नका. जें जें तुह्मी ऐकाल तें तें सर्व आपल्या बुद्धीच्या कसोटीवर घांसून पहा. जर तें उत्तम ठरलें तर तें खरें माना, त्याचा प्रत्यक्ष आचार करा; इतरांस तें सांगा आणि तसें करण्यास इतरांस मदत करा." 'जुनें तें सोनें' असें ह्मणण्याची साऱ्या जगाची प्रवृत्ति असतां त्या प्रवृत्तीविरुद्ध उघडपणें उपदेश करणारा वीर किती निधड्या छातीचा असला पाहिजे, याचा तुह्मीच विचार करा.

'केवळ मोठ्या नांवावर भुलूं नका' असा उपदेश उघडपणें करणारा महात्मा आजपर्यंत दुसरा कोणीहि झाला नाहीं. अत्यंत अनासक्त चित्तानें कर्म करून बुद्धाची पदवी मिळविणें तुह्मांसहि अशक्य नाहीं. साऱ्या जगाला नवें वळण लावण्याचें सामर्थ्य तुह्मांसहि प्राप्त करून घेतां येण्याजोगें आहे. हें तुह्मांस साधलें तर कर्मयोगाचे आदर्श असे तुह्मी व्हाल. 'नर करणी करे तो नरका नारायण होत.' असें सत्पुरुषांनीं आश्वासन दिलें आहे.

ॐ शांतिः शांतिः शांतिः।

धर्म ह्मणजे काय ?

आगगाडीच्या रुळांवरून एक प्रचंड एंजिन झपाट्यानें धांवून येत आहे. त्यांपैकीं एका रुळावर एक अगदीं लहानसा किडा बसला आहे. एंजिन जवळ येऊं लागल्याबरोबर त्याची जाणीव त्या किड्याला होते आणि रुळावरून बाजूला सरपटून तो आपला प्राण वांचवितो. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी आपल्या नेहमीं पाहण्यांत येतात. तो किडा पाहिला तर किती लहानसा प्राणी ! एखाद्या लहानशा आघातानेंहि बिचारा मरून जावयाचा. तें एंजिन पाहिलें तर केवढें अजस्र. त्याचें शरीर आणि शक्ति एखाद्या राक्षसासारखी विशाल ! परंतु एंजिन कितीहि मोठें आणि शक्तिमान् असलें तरी तें जड इंजिन; आणि किडा कितीहि सूक्ष्म असला तरी तो जिवंत प्राणी. त्या एंजिनाचा लहानसा धक्का त्या किड्याला लागता, तर त्या किड्याचा मागमूसहि या सृष्टींत राहिला नसता ! असें आहे तरी आपल्या दृष्टीनें त्या किड्याची योग्यता त्या राक्षसी एंजिनापेक्षां अधिक आहे. कारण किडा कितीहि सूक्ष्म असला तरी अनंत चैतन्याचा तो एक स्फुलिंग आहे. अनंत चैतन्य त्या सूक्ष्म देहांत अंशतः प्रकट झालें आहे. एका दृष्टीनें पाहिलें तर एंजिनहि जिवंत प्राण्याप्रमाणें हालचाल करितें. मग त्याच्या हालचालींत आणि त्या किड्याच्या हालचालींत फरक आहे, ही भावना आपल्या ठिकाणीं कोठून येते ? हालचाल करणारा एवढासा किडा, तशीच हालचाल करणाऱ्या प्रचंड एंजिनाहून आपणांस मोठा वाटतो तें कां ? एंजिनानें कितीहि हालचाल केली तरी तें मृत आहे—जड आहे—असें आपण ह्मणतों. किडा कितीहि लहान असला तरी तो जिवंत प्राणी आहे असें आपल्या मनांत येतें. दोहोंच्या हालचाली पाहून आपल्या मनांत अगदीं विरुद्ध भावना उत्पन्न होतात त्या कां, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. त्याचें कारण असें आहे कीं एंजिनानें कितीहि हालचाल केली, तरी ती हालचाल मर्यादित आहे. एंजिन बनविणारानें जें कांहीं सामर्थ्य त्या एंजिनाच्या अंगीं ठेविलें असेल, त्या मर्यादेचें उल्लंघन तें कधींहि करूं शकणार नाहीं. परंतु जिवंत प्राण्याची गोष्ट याहून वेगळी आहे. हालचाल कोणत्या प्रकारची व किती करावी हें ठरविण्याची त्याला पूर्ण स्वतंत्रता आहे. त्यानें अमुक मर्यादेंतच राहिलें पाहिजे अशी जबरी त्यावर कोणी करूं शकत नाहीं. त्याच्या ठिकाणीं उदित झालेल्या बुद्धीचा उपयोग करण्याची त्याला

पूर्ण मुभा आहे. एंजिन कितीहि मोठें असलें तरी त्याच्या ठिकाणीं बुद्धि नसल्यामुळें तें केवळ परतंत्र आहे. सजीव प्राण्याच्या ठिकाणीं स्वतंत्र होण्याची जी इच्छा दिसून येते, त्या स्वातंत्र्यासाठीं–मुक्तीसाठीं–आमची सारी धडपड चाललेली आहे. हल्लींच्या स्थितीहून अधिक स्वातंत्र्याची स्थिति कशी प्राप्त होईल या विचारांत आपण सर्व गढलों असून बुद्धिदर्शित मार्गानें चालू असलेले आपले सर्व प्रयत्नहि याच साध्याच्या प्राप्तीकरितां आहेत. पूर्णपणें स्वतंत्र होणें–मुक्त होणें ह्मणजेच पूर्णत्व पावणें होय. पूजनाचे जे जे विधि व आचार आज जगांत दिसून येतात, त्यांच्या मुळाशीं हीच इच्छा ग्रथित झालेली आहे. आपलें साध्य मुक्ति हें आहे, ही गोष्ट कोणास समजत असेल अथवा कोणास समजत नसेल, पण प्रत्येकाचे प्रयत्न मात्र त्याच दिशेनें चालू आहेत, ही गोष्ट निश्चित आहे.

जगावर चालू असलेले पूजाविधि पाहिले तर रानटी स्थितींतील लोक, भुतेंखेतें, राक्षस अथवा स्वतःच्या पूर्वजांचे आत्मे यांचें पूजन करीत असल्याचें आढळून येतें. सर्पपूजा, आपल्या टोळीच्या मुख्य देवाची पूजा अथवा पूर्वजांच्या आत्म्याची पूजा ते कां करितात ? कांहीं गुप्त कारणांनीं भूतपिशाचांना आपणापेक्षां अधिक सामर्थ्य असतें आणि आपलें सध्याचें स्वातंत्र्यहि हिरावून घेण्याची शक्ति त्यांस आहे, अशी त्यांची भावना असते. यासाठीं त्यांना खुष ठेवलें ह्मणजे त्यांजपासून आपणांस कांहीं अडथळा होणार नाहीं, असा त्यांचा साहजिक समज असतो. तसेंच त्यांची मदत मिळाली तर स्वतः फारसे श्रम न करितां आपणांस जरूर असलेल्या वस्तु मिळतात, असाहि त्यांचा समज असतो. या भावनांचें पृथक्करण केलें तर त्यांच्या मुळाशीं प्रथम सांगितलेली स्वातंत्र्याची लालसा हीच आढळून येते. स्वतःस फारसे श्रम करावे न लागतां आपणांस जरूर असलेल्या वस्तु मिळाल्या ह्मणजे गरजा भागून आपण अधिक स्वतंत्र होऊं असा या भावनांचा तात्विक अर्थ आहे.

कोणाची तरी स्तुति केली अथवा पूजा केली तर तो आपणास अनपेक्षित अशी मदत करील–एखादा चमत्कार करील अशी भावना मानवहृदयांत सर्वत्र आढळून येते. कोठून तरी बाहेरून मदत मिळण्याची आशा आपल्या हृदयांतून सर्वथैव नष्ट अशी कधींच होत नाहीं. आपण केवढाहि अट्टहास केला, तरी ही भावना कोणत्याना कोणत्या रूपानें आपल्या हृदयांत घर करून राहतेच; इतकी तिची चिकाटी विलक्षण आहे. फार लांब कशाला, आपण आपल्या मनावर उठणाऱ्या नानाविध तरंगांचें पृथक्करण केलें तर जगाचें अंतःस्वरूप–गुप्तरूप–काय आहे याचा विचार

करण्यांत तें गुंतलेलें असतें असें आढळून येईल. आपल्यापासून गुप्त असें जगांत कांहीं असूंच नये कशी आपल्या मनाची इच्छा असते. अशी भावना केवळ रानटी लोकांतच अधिक आढळून येते असें कोणी ह्मणेल; पण त्यावर आमचा उलट प्रश्न असा आहे कीं, त्यांच्या हृदयांत तरी ही भावना आली कोठून? परमेश्वरानें एखादा मोठा चमत्कार घडवून स्वर्गलोकींचें सुख आह्मांस याच लोकीं द्यावें अशी यहुदी लोकांची इच्छा होती. या गोष्टीस कित्येक शतकें लोटून गेलीं, तरी तेव्हांपासून सर्व जगहि वस्तुतः हीच इच्छा करीत आहे. हीच गोष्ट अतृप्ततेसहि लागू पडते. जगाच्या आरंभापासून आजतागाईत सर्व अतृप्त असल्याचा प्रत्यय येतो. अमुक एक गोष्ट सिद्ध झाली कीं आपली तृप्ति होईल, अशा कल्पनेनें आपण एखाद्या उद्योगास सुरवात करितों; परंतु आपलें काम अर्धेमुर्धें झालें न झालें तों तिसरीच एखादी इच्छा उत्पन्न होऊन अतृप्ति पुनः पहिल्या इतकीच ताजीतवानी असल्याचें आढळून येते, आणि आपले पहिले सारे बेत ढांसळून पुन्हां नव्या उद्योगास आरंभ करावासें वाटूं लागतें. अमुक एक गोष्ट हवीशी वाटली कीं तिच्या प्राप्तीकरितां आपण निकराचे प्रयत्न करितों; परंतु ती गोष्ट अंशतः साध्य झाल्याबरोबर तिचा नाद सुटून ती नकोशी वाटूं लागते व आपलें मन आणखी एखाद्या निराळ्याच गोष्टीकडे वेधलें जातें. आपल्या साऱ्या जन्माचा अनुभव आपण चाळून पाहिला तर त्यांत अतृप्तीशिवाय दुसरें कांहींसुद्धां आपणांस आढळून यावयाचें नाहीं. कशाचीहि आपणांस गरज नाहीं, असा क्षण आपल्या साऱ्या आयुष्यांत आढळून येणार नाहीं. या भावनेचें स्वरूप कधीं कमी उघड तर कधीं अधिक उघड असतें. साऱ्या जगभर जी ही स्थिति आढळून येते ती कां? सर्व मानवजाति मुक्त होण्याकरितां–गरजेच्या पलीकडे जाण्याकरितां–एकसारखी धडपड करीत आहे, हेंच या स्थितीचें कारण आहे. मानवी जीविताचा हाच प्रधान हेतु आहे. मूल जन्मास आल्याबरोबर 'कोऽहं' असा टाहो फोडितें. देहबंधनांत सांपडल्याचें त्यास झालेलें दुःख तें रडून व्यक्त करतें. आपण स्वतंत्र व्हावें–मुक्त व्हावें--या भावनेपासून सर्वथैव मुक्त असा कोणी प्राणी असावा ही कल्पना ओघानेंच उदयास आली. आपण मुक्त व्हावें, स्वतंत्र व्हावें, गरजेच्या पलीकडे जावें या भावनेच्या अत्यंत साहचर्यानें असणारी दुसरी भावना ह्मणजे असा मुक्त प्राणी कोणी तरी असावा हीच आहे. या दोन भावना अत्यंत निकटवर्ती आहेत. यामुळें ईश्वराच्या अस्तित्वाची कल्पना मानवी हृदयांत निरंतरची वास करून राहिली आहे. मनुष्याचें अंतःकरण हें

ज्या भावनांचें समवायीरूप आहे, त्यांपैकींच ईश्वराच्या अस्तित्वाची भावना हा एक घटक आहे. वेदांतमताप्रमाणें सच्चिदानंदरूपाची भावना ही परमेश्वराच्या अस्तित्वाच्या भावनेची अत्युच्च दशा आहे. परमेश्वराबद्दल जो कांहीं कल्पनासमूह आपल्या मनांत वास करीत असेल तो सर्व समूह सच्चिदानंद या एकाच पदानें व्यक्त होतो. आपली ईश्वरविषयक कल्पना कितीहि विस्तार पावली, तरी ती 'सच्चिदानंद' या स्वरूपापलीकडे जाऊं शकतच नाहीं, असें वेदांताचें मत आहे. सर्व ज्ञानाचा शेवट जेथें होतो व त्यामुळें निरामय आनंदाची प्राप्ति जेथें होते, असें तें सच्चिदानंदरूप आहे. आपण अनंतकालापासून आपल्या या मुक्त होण्याच्या इच्छेस दाबून धरीत आहों. सृष्टींत भासमान होणाऱ्या कार्यकारणभावाच्या नियमांस अनुसरण्यांत अधिक सुरक्षितपणा आहे, अशा भ्रमानें आपल्या अंतःकरणांत उत्पन्न होणाऱ्या भावनांचा कोंडमारा आपण आज अनंतकालापासून करीत आहों; तथापि आपल्या या कोंडमाऱ्यास न जुमानतां आपण मुक्त व्हावें ही भावना पुनःपुनः जोरानें आपल्या मनांत उद्भवतेच. कार्यकारणांचा आणि सृष्टीच्या कायद्यांचा बंध उल्लंघून पलीकडे असलेल्या सच्चिदानंदपदास जावें अशी भावना पुनःपुनः आपल्याच चित्तांत येते. आपण कितीहि प्रयत्न केला तरी ही भावना उत्पन्न होण्याचें थांबत नाहीं. या भावनेचा वास्तविक अर्थ आपल्या ध्यानांत येत नाहीं, तरी मानवी बुद्धीची व दैवी बुद्धीची अहमहमिका आपल्या हृदयांत आपणांस नकळतहि सुरू असतेच; व ही अहमहमिका—हें भांडण—सुरू असेपर्यंत, प्रत्येक मनुष्याचें निराळें अस्तित्व—व्यक्तित्व—शिल्लक असतें. किंबहुना व्यक्तिविशिष्टत्व असणें हेंच या भांडणाचें कार्य आहे. मानवीबुद्धि आपणांस दृश्य जगाबाहेर जाऊं न देण्याचा यत्न करीत असते व दैवीबुद्धीचा यत्न दृश्य जगाबाहेर नेण्याचा असतो. या दोहोंच्या तंट्याचें जें व्यक्तरूप तेंच आपलें विशिष्ट वैय्यक्तिक रूप होय.

या जगांत आपण जन्मास आल्याबरोबर जो पहिलाच शब्द व्यक्त करतों त्याचाहि अर्थ हाच. ' मी कायद्यानें बांधला जाणार नाहीं; मी कायद्याच्या पलीकडचा आहें ' हाच आपल्या पहिल्या ध्वनीचा वास्तविक अर्थ आहे. जोंपर्यंत आपण हीं सृष्टीचीं बंधनें पाळीत असतों, तोंपर्यंत एखाद्या यंत्रापेक्षां आपली वास्तविक अधिक किंमत नसते. निर्जीव यंत्रांची सर्व हालचाल जशी त्याच्या कर्त्यांच्या आधीन असते, तशीच आपली सर्व हालचाल सृष्टीच्या आधीन असते; व अनंतकालाच्या संवयीनें आपणांस हीं बंधनें फारशीं जाचक वाटत नाहींत;

एवढेंच नव्हे तर उलट त्या बंधनांत राहणें हेंच इष्ट आहे असेंहि वाटूं लागतें. परंतु आपण आपली दृष्टि थोडीशी अंतर्मुख केली तर आपल्या ठिकाणीं या मानवीबुद्धीहून निराळ्या स्वरूपाच्या बुद्धीचाहि वास आहे, ही गोष्ट आपल्या लक्ष्यांत येते. या दुसऱ्या बुद्धीला आपण थोडें चालन दिल्याबरोबर तिचा मानवी बुद्धीशीं तंटा सुरू होतो. सृष्टिनिर्मित बंधनें तोडून पलीकडे जाण्याची त्या बुद्धीची आकांक्षा व्यक्त होऊं लागते. 'मुक्ति' 'मुक्ति' या एकाच शब्दाचा ती बुद्धि जप करीत आहे. या बुद्धीनें प्रेरित झालेला जीवात्मा मुक्तीसाठीं अट्टहास करीत आहे, आणि मानवीबुद्धि पुनःपुनः त्याला सृष्टिनियमांच्या पाशांनीं बांधण्याचा यत्न करीत आहे. या सृष्टिनियमांच्या पाशांतच त्यानें सर्वदा गुरफटलेलें राहावें असें त्याच्या नशीबीं लिहिलें आहे काय?

सर्पपूजा, पिशाचपूजा आणि पूर्वजपूजा इत्यादि प्रकारचे अनेक पूजनांचे मार्ग अस्तित्वांत कां आले? आपण बाहेरून कोणाच्या तरी मदतीची अपेक्षा करतों, ती कशाकरितां? आपलें जीवित, आपलें अस्तित्व इत्यादि जे शब्द आपण उच्चारितों त्यांचा अर्थ काय? आपल्या या साऱ्या प्रयत्नांचें पर्यवसान कोठें होणार, हा खरोखर विचार करण्यासारखा प्रश्न आहे. ही सारी धडपड खचित अर्थशून्य नाहीं. या साऱ्या धडपडीचा आणि अनंत प्रश्नमालिकेचा अर्थ हाच कीं, प्रत्येक जीवात्मा मुक्तीसाठीं प्रत्येक क्षणीं यत्न करीत आहे. अनेक भौतिक शास्त्रें आज ज्या स्थितीस पोहोंचलीं आहेत, तीं या जीवात्म्याच्या हजारों वर्षांच्या खटपटीचें दृश्य फल आहे. पूर्णत्व पावावें हें या सर्व शास्त्रांचें साध्य आहे; आणि जीवात्म्याची सारी धडपडहि याच पूर्ण स्थितीच्या प्राप्तीकरितां—मुक्तीकरितां—आहे. केवळ सृष्टीकडे पाहिलें तर तींतून मुक्तीचा मार्ग कोठेंच आढळत नाहीं. सृष्टि चोहोंकडून नियमांनीं जखडलेली. या नियमबद्ध रचनेंत गुरफटल्यावर मुक्तीचा मार्ग कसा दिसणार? पाहावें तिकडे नियम आणि कायदा यांचें साम्राज्य. पण नियम आणि कायदा यांचें साम्राज्य चोहोंकडे इतकें उघड रीतीनें प्रत्ययास येत असतांहि हा कायदा उल्लंघन करण्याची जीवात्म्याची खटपट एकसारखी सुरू आहेच. चंद्र, सूर्य आणि ताऱ्यांपासून तों गवताच्या पातीपर्यंत यच्चयावत् सृष्ट पदार्थ नियमांनीं जखडलेले आहेत. मनुष्यप्राणीहि या सृष्टींतलाच असल्यामुळें सृष्टीच्या कायद्यांचा खोडा त्याच्याहि पायांत असला तर त्यांत नवल कसलें? पण छे, मनुष्यप्राण्याला ही गोष्ट अद्यापिहि पटत नाहीं. आज हजारों वर्षें मनुष्यप्राणी या कायद्यांचा मनःपूर्वक अभ्यास करीत असूनहि

आपण त्याच कायद्यानें बांधले आहों, ही गोष्ट त्यास अद्यापिहि पटत नाहीं; आणि पुढेंहि पटणार नाहीं. अनंतकालापासून तो 'मुक्ति' हें एकच पालोपद गात बसला आहे. हें पद गात असतां त्याला साहजिकच असें वाटलें कीं, या नियमांच्या बाहेरचा असा एखादा प्राणी असावा. हाच ईश्वरविषयक कल्पनेचा प्रारंभ आहे. आपण मुक्त व्हावें—गरजेच्या पलीकडे जावें—अशी प्रवृत्ति एकवार उद्भवली कीं ती कायमची राहणार. ही कल्पना प्रत्यक्ष सिद्ध करण्याकरितां ह्मणजे मुक्त होण्याकरितां मनुष्य जे श्रम करतो व जे कष्ट सहन करतो त्यांवरून त्याच्या अंतःकरणांत मुक्तीची लालसा किती जाज्वल्य आहे, याचा अजमास होतो. दुसऱ्या एखाद्या कार्यासाठीं त्यानें इतके कष्ट कधींहि सोसले नसते. आपण परिस्थितीचे पक्के गुलाम आहों, व सृष्टिनियमांच्या शृंखला आपल्या पायांत खळखळत आहेत, ही जाणीव अंतःकरणास वारंवार टोंचीत असतांहि त्याला असें वाटतें, कीं या सृष्टीच्या कायद्याबाहेरचा असा कोणी तरी प्राणी असला पाहिजे. सृष्टिबंधनांचें दुःख अनुभवास येत असतांहि ईश्वरविषयक कल्पना त्याच्या चित्तास मोठा आधार देते. यावरून ज्याप्रमाणें सृष्टिनियमांची जाणीव ही एक अंतःकरणाचा घटक आहे, त्याचप्रमाणें त्या बंधनापलीकडे असणाऱ्या ईश्वराविषयींची कल्पना हा दुसरा घटक आहे. जेथें पहिल्या कल्पनेचें वास्तव्य असेल तेथें दुसरीहि तिच्या सोबतीनें येणारच. मुक्तीसाठीं सुरू असणाऱ्या धडपडीमुळेंच वरील दोन्ही कल्पनांचा उदय झाला आहे. सर्व सजीव सृष्टींत मुक्तीच्या कल्पनेचा उदय कमीअधिक प्रमाणानें झालेला आहे. ही कल्पना उदित न झालेली अशी एखादी वनस्पतीहि सांपडणार नाहीं. झाडेंझुडपें आणि लहानसहान कीटक यांमध्येंहि या कल्पनेचा उदय स्पष्ट दिसतो. मनुष्यांमध्यें मानवीबुद्धि आणि दैवीबुद्धि अशीं बुद्धीचीं दोन स्वरूपें असतात व या दोन बुद्धींच्या द्वैतामुळें—भांडणामुळें—मनुष्यांतला विशिष्टपणा कायम असतो असें नुक्तेंच सांगितलें. त्याचप्रमाणें बुद्धीची ही द्विविध दशा अल्प प्रमाणानें, झाडेंझुडपें आणि क्षुद्र कीटक यांमध्यें असते; आणि त्यामुळेंच मुक्तीच्या खटपटीबरोबर व्यक्तिविशिष्टत्व कायम ठेवण्याचीहि प्रवृत्ति प्राणिमात्रांत दिसून येते. गरजेच्या पलीकडे जाण्यासाठीं क्षुद्र कीटकहि प्रयत्न करीत असतात, हें आपल्या अनुभवांतलें आहे. त्याचप्रमाणें आपल्या दृष्टीनें त्यांची स्थिति फारशी स्पृहणीय नसतांहि त्या क्षुद्र देहास ते किती चिकटून असतात, हेंहि प्रत्यहीं आपल्या अनुभवास येतें. गरजेच्या पलीकडे जाण्याची खटपट ही दैवीबुद्धीच्या अल्प उदयाचें द्योतक असून

शरीररक्षणाची इच्छा असणें हें देहबुद्धीचें द्योतक आहे. या दोन बुद्धींच्या तंट्यामुळेंच प्राण्यांमध्यें व्यक्तिविशेष आढळून येतो. या दोन बुद्धीच्या भांडणांत जिचें प्राबल्य अधिक असेल, त्या मानानें उत्क्रांतीचें प्रमाण कमी अधिक होईल. भोंवतालचें जड विश्व त्याच्या देहबुद्धीस एकसारखें प्रोत्साहन देत असतें व मुक्तीची कल्पना त्याला दुसऱ्या बाजूस ओढीत असते. अशा रीतीनें हें भांडण अनंतकाल सुरू आहे. या भांडणास केव्हांहि खळ ह्मणून पडत नाहीं. मानवी जातींत नाना धर्म आणि नाना पंथ उपस्थित झाले आहेत व त्यांत पुन: पोटधर्म व पोटपंथ उपस्थित होत आहेत व लढाया करीत आहेत. या स्थितिबद्दल आपणांस केव्हां केव्हां विषाद वाटतो; परंतु वस्तुतः यांत विषाद मानण्यासारखें कांहीं नाहीं. हीं भांडणें मनुष्याच्या उत्क्रांतीस अत्यावश्यक अशींच आहेत. अनेक पंथ उपस्थित व्हावे हें अगदीं न्याय्य आहे. आणखीहि शेंकडों धर्म आणि पंथ अस्तित्वांत आले, तरी त्या सर्वांचें साध्य एकच आहे, ही खूण एकवार आपणांस पटली ह्मणजे तंट्याचें कारणच उरणार नाहीं.

ज्यावर हें सर्व विश्व भासमान झालें आहे व जो सर्वदा मुक्त स्थितींत असतो, त्याला आपण परमेश्वर या नांवानें ओळखितों. परमेश्वराचें अस्तित्व कबूल करणें भागच आहे. मुक्तीची कल्पना वजा केली, तर तुह्मांस जिवंत राहणेंहि अशक्यच आहे. कारण ही कल्पना सत्य करण्याकरितांच ही सारी धडपड आहे. ही कल्पना नाहींशी झाली, तर धडपड बंद होणार आणि धडपड बंद झाली तर देहबंध तरी कसा टिकणार ? जीवित हें या धडपडीचेंच व्यक्त रूप आहे. धडपडीची इच्छा गेली, कीं जीवितहि संपलेंच. याकरितां मुक्तीच्या कल्पनेस फांटा देणें तुह्मांस शक्यच नाहीं. मुक्तीची कल्पना कबूल केली, कीं तिची सहचारी कल्पना तिजबरोबर अवश्य येणारच. स्वतंत्रतेची यत्किंचित्‌हि कल्पना तुमच्या ठिकाणीं उदय पावली नसेल, तर तुह्मांस थोडीदेखील हालचाल करणें शक्य नाहीं. आपण अमुक ठिकाणीं जाऊं आणि अमुक करूं असा विचार जेव्हां तुमच्या मनांत येतो, तेव्हां तसें करण्यास आपण मुखत्यार आहों—स्वतंत्र आहों—या कल्पनेचाहि तुमच्या विचारांत अंतर्भाव होत नाहीं काय ? यावरून स्वतंत्रतेच्या—मुक्तीच्या—कल्पनेवांचून जगणेंहि कसें अशक्य आहे, ही गोष्ट बरोबर तुमच्या ध्यानीं येईल. प्राणिमात्रांत दिसून येणाऱ्या धडपडीची शास्त्रीय मीमांसा एखादा प्राणिशास्त्रवेत्ता तुह्मांस सांगेल. त्याचें सर्व ह्मणणें कबूल केलें, तरी स्वातंत्र्याची बुद्धि हीच या धडपडीच्या मुळाशीं आहे हें आमचें ह्मणणें त्यास खोडून काढतां येणार नाहीं.

विश्वनियमांनीं आपण बांधले गेलों आहों, ही कल्पना जितक्या अंशानें खरी आहे, तितक्याच अंशानें मुक्तीची इच्छा आपल्या अंतःकरणांत वास करीत आहे, ही कल्पनाहि खरी आहे.

बद्धता आणि मुक्ति, ज्ञान आणि अज्ञान व पुण्य आणि पाप या नित्य सहचारी वस्तु आहेत. यांपैकीं एका स्थितीची कल्पना चित्तांत उद्भवली, कीं तिच्या पोटीं तिच्या दुसऱ्या सहचारी कल्पनेचा अंतर्भाव आपोआपच होतो. ज्या ज्या सृष्टिनियमांनीं आपण बांधले गेल्यासारखे दिसतों, त्या प्रत्येक नियमाच्या पोटीं स्वतंत्रतेचा–मुक्तीचा–गुप्तवास आहे. या कल्पनाद्वयापैकीं कोणतीहि एक जितकी खरी आहे तितकीच दुसरीहि खरी आहे. अगदीं रानटी स्थितीच्या मनुष्याकडे पाहिलें, तर मुक्तीच्या कल्पनेचा उद्भव त्याच्या ठिकाणीं विशेष उघडपणें प्रत्यास येत नाहीं; याचें कारण विश्वनियमांनीं आपण चोहोंकडून जखडले गेलों आहों, ही जाणीवहि त्याच्या ठिकाणीं विशेषत्वानें उत्पन्न झालेली नसते. मुक्तीकरितां ज्या मानानें आपले प्रयत्न कमी अधिक दर्जाचे असतील, त्या मानानें सृष्टिनियमशृंखलेचा प्रत्यय आपणांस कमी अधिक प्रमाणानें येतो. 'आपण पापी आहों, अपवित्र आहों,' ही कल्पना सुधारलेल्या मानवसमाजांत ज्या प्रमाणानें आपल्या प्रत्ययास येते त्याप्रमाणें रानटी समाजांत आढळत नाहीं. 'आपण पापी आहों' ही कल्पना अगदीं रानटी अवस्थेंतल्या मनुष्याच्या मनांत सहसा उद्भवतच नाहीं. कारण त्यांची स्थिति पशूच्या स्थितीपलीकडे फारशी गेलेली नसते. 'आपण पापी आहों' ही कल्पना पशूच्या चित्तांत कधींहि येत नाहीं. कारण बुद्धि ह्मणून जें तत्व मानवी हृदयांत उदय पावतें, त्याचा पशूच्या ठिकाणीं अत्यंत अल्प प्रमाणानें उगम झालेला असतो. पशूच्या सर्व इच्छा पाहिल्या, तर त्याच्या गरजा जड देहापलीकडे गेलेल्या नसतात. जड देह सुखांत राहिला, ह्मणजे त्याच्या सर्व गरजा भागल्या. त्याचप्रमाणें रानटी अवस्थेंतील मनुष्यांच्या इच्छाही जडदेहाच्या सुखसाधनापलीकडे नसतात. यानंतर मानसिक व बौद्धिक गरजा उत्पन्न होऊं लागतात. देह अत्यंत सुखांत राहण्याजोगी अवस्था प्राप्त झाली, तरी आपण पूर्ण सुखी आहों असें मनुष्यास कधींहि वाटण्याचा संभव नाहीं. त्याचें स्वास्थ्य भंग पावेल अशा गोष्टी घडून येतात व त्या पुष्कळ वेळां त्याच्या आटोक्याबाहेर असतात. आपणास दुःखद अशी गोष्ट घडत आहे असें दिसून येत असूनहि त्याच्या प्रतिकाराचा कोणताच उपाय आपणांस दिसेनासा झाला ह्मणजे आपण परतंत्र आहों, पंगु आहों व शारीरिक

सुख ही सुखाची परमावस्था नव्हे, असें त्याच्या मनांत येतें. येथें शारीरिक सुखाची कल्पना संपुष्टांत येऊन मानसिक सुखाची कल्पना जन्म पावते. मानसिक सुखाची कल्पना उद्भवली कीं तिच्या मागोमाग पापपुण्य, बरें वाईट इत्यादि कल्पना उदय पावतात; व शेवटीं हे सर्व बंध तोडून टाकून सर्वथैव स्वतंत्र होण्यास–मुक्त होण्यास–कांहीं उपाय नाहीं काय असा प्रश्न चित्तांत आपोआपच उद्भवतो. असा प्रश्न उत्पन्न होण्याजोगी अवस्था प्राप्त झाली, ह्मणजे अज्ञानाचें जें अत्यंत घन पटल असतें तें फाटावयास लगून ज्ञानरवीचे बालकिरण उदय पावूं लागतात. यावेळीं अज्ञानाचें अभ्रपटल इतकें घन असतें कीं ज्ञानाच्या अरुणोदयास आपली दिव्यप्रभा त्यांतून व्यक्त करावयास अवसर मिळत नाहीं. यामुळें त्याच्या उदयाचा प्रत्यय येत नाहीं; तथापि त्याचा उदय झालेला असतो, हें मात्र निश्चित आहे. याच संपूर्ण ज्ञानरूपास एक, अद्वितीय, परमात्मा इत्यादि नांवें आपण देतों. यावेळीं परमात्मा निराळा आणि विश्व निराळें अशी त्याची दृष्टि असते. विश्व त्याच्या दृष्टीस प्रत्यक्ष दिसत असतें ह्मणून तें खरें; आणि संपूर्ण ज्ञानरूपाचा, कल्पनेनें तरी त्यास प्रत्यय आलेला असतो ह्मणून तेंहि खरें. अशा रीतीनें त्याच्या अंतःकरणांत दोन सत्यवस्तूंचा वास असतो. सत्य ह्मणून दिसणाऱ्या दोन्ही वस्तु वास्तविक एकरूपच आहेत, याचा त्यास प्रत्यय नसतो. एकच वस्तु द्विधा भासणें हा स्वतःच्या दृष्टीचा दोष आहे, ही गोष्ट त्याच्या लक्ष्यांत आलेली नसते. शेवटीं हाहि दृष्टिदोष नाहींसा झाला ह्मणजे सर्व विश्व एकरूपच असून निरनिराळ्या उपाधिभेदांमुळें तें अनेकधा भासतें, अशी त्याची खात्री होते. मनुष्यांतील आणि पशूंतील अंतर्ज्ञान एकरूपच असतां शरीरोपाधीनें तें कमीअधिक प्रमाणानें व्यक्त होतें; इतकाच मनुष्यांत आणि पशूंत फरक आहे, ही गोष्ट त्याला पक्केपणीं कळते.

अनंतरूपांनीं नटलेल्या या सृष्टीकडे अवलोकन केलें तर यच्चयावत् वस्तुमात्र परमेश्वराच्या पूजनांत गुंतलें आहे व त्याजकडेच धांव घेत आहे असें आपणांस आढळून येईल. ज्या ज्या ठिकाणीं सजीवपणा आढळतो तेथें तेथें पूर्णरूपाकडे –मुक्तीकडे–धांव घेण्याची प्रवृत्ति आढळते. आपण स्वतंत्र झालों–मुक्त झालों–तर या अनंत विश्वाचें स्वामित्वहि आपणांस मिळेल, हें उघडच आहे; परंतु ही मुक्ति ज्ञानावांचून मात्र मिळणार नाहीं. आपणांतील अज्ञानाचा पडदा जसजसा अधिक फाटत जातो, तसतसें ज्ञान अधिक व्यक्त दशेस येऊन त्याप्रमाणानें विश्वावरील स्वामित्व आपणांस प्राप्त होऊं लागतें. या स्वामित्वाचा प्रत्यय जस-

जसा आपल्या ठिकाणीं दिसूं लागतो, तसतसें आपलें बळ वाढत आहे असें आपणांस दिसून येतें. केवळ मुक्त अशा स्थितींतला जर कोणी प्राणी असेल, तर तो सर्वशक्तिमान्, सर्वज्ञ आणि सर्वांतर्यामी असा असला पाहिजे हें उघड आहे. मुक्तस्थिति ही या सर्वशक्तींच्या अत्यंत साहचर्यानें राहणारी असल्यामुळें मुक्तावस्थेपर्यंत गेलेला प्राणी सृष्टिबंधनापलीकडे जाणारच हेंहि उघड आहे.

केवळ मुक्ततेची स्थिति व तिजमुळें उद्भवणारी चिरशांति प्राप्त करून देणें, हेंच प्रत्येक धर्माचें ध्येय आहे. कोणत्याहि अवस्थेनें अथवा कोणत्याहि कालीं निगडित नाहीं असें स्वातंत्र्य व ज्या अवस्थेंत कोणत्याहि वस्तूच्या आघातानें यत्किंचित्‌हि फेरबदल होणार नाहीं, अशी पूर्णावस्था हीं प्राप्त करून देणें हेंच धर्माचें साध्य आहे. ही पूर्णावस्था वस्तुतः आपणा सर्वांच्या ठिकाणीं असून हीच खरी मुक्ति–स्वातंत्र्य–होय.

परमेश्वर सदोदित या मुक्तावस्थेंत असून आपण त्याच्याशीं एकरूप होण्यासाठीं खटपट करीत आहों. परंतु मध्यंतरीं आपल्या ध्येयाचा आपणांस विसर पडून आपल्या रस्त्यांत आपण अनेक आडवाटा उपस्थित करून त्यांतून धांवूं लागतों व यामुळें आपला पहिला राजमार्ग बाजूस राहतो. कीर्ति, पैसा, स्त्री इत्यादि अनेक आडवाटा फुटून आपला गोंधळ उडतो व राजरस्त्याचें भान नाहींसें होतें. या सर्व आडवाटा मिळून एक भला मोठा चक्रव्यूह झाला आहे. त्यांतून सुटून पुन्हा राजमार्गास लागावें, हीच आपली सर्वांची इच्छा आहे. परंतु या आडवाटांत आणखी आडवाटा फुटून आपणांस अधिकाधिक भ्रमांत मात्र पाडतात. असो. जगांत वस्तुमात्राच्या ठिकाणीं जें तेज प्रत्ययास येतें तें तेजहि त्यांस परमात्म्यापासूनच प्राप्त झालें. तें त्यांस सूर्यापासून, चंद्रापासून अथवा तारकांपासून प्राप्त झालेलें नाहीं. कारण सूर्याला तरी स्वतःचें तेज कोठून प्राप्त झालें? '**यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् !**' असें भगवान् श्रीकृष्णाचें वचन आहे. सूर्यांत आढळून येणारा प्रकाश असो अथवा आमच्या अंतर्यामीं प्रत्ययास येणारा ज्ञानरूप प्रकाश असो, त्याची उत्पत्ति त्या महत्तेजापासून–परमेश्वरापासून–झाली. '**सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो । मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च**' असें परमेश्वराचें वचन आहे. त्याच्याच प्रकाशानें हें सर्व विश्व प्रकाशत आहे.

या एकंदर विवेचनावरून परमेश्वरस्वरूपाची बरीच कल्पना आपणांस आली असेल. तो स्वयंव्यक्त, निराकार, सर्वांतर्यामी, सर्वज्ञ आणि सर्व विश्वाचें अधिष्ठान असा आहे, ही गोष्ट आतां आपल्या लक्ष्यांत पूर्णपणें आली असेल. सर्व विश्व

त्याच्याच पूजनांत गुंतलें असून आपला सर्वांचा मार्गदर्शकहि तोच आहे. जगांत जितकें चांगलें आहे तितकें सर्व त्याचेंच स्वरूप आहे आणि त्याचप्रमाणें ज्याला वाईट ह्मणून आपण ह्मणतों, तेंहि त्याचेंच स्वरूप आहे. कोणी मनुष्य कांहीं वाईट गोष्ट करितो, पाप आचरितो, ह्मणून आपण त्याचा तिरस्कार करितों; परंतु त्याचा तसें करण्यांत उद्देश काय, याचा आपण विचार केला पाहिजे. पापाचरण हाहि परमेशपूजनाचा एक मार्ग आहे, हें ह्मणणें तुह्मांस खचित विलक्षण वाटेल; पण वस्तुस्थिति तशीच आहे. अत्यंत पापी मनुष्याच्या हृदयांतसुद्धां मुक्तीची इच्छा आहे. ज्याला तुह्मी पापाचरण ह्मणतां तें कृत्यहि तो या इच्छेनें प्रेरित होऊनच करीत असतो. त्याचा मार्ग चुकीचा असेल ही गोष्ट वेगळी. पण त्याची इच्छा मुक्त होण्याची–गरजेच्या पलीकडे जाण्याची–आहे ही गोष्ट तुह्मांस केंव्हांहि नाकबूल करतां येणार नाहीं. मग त्याचें कृत्य ह्मणजे वस्तुतः परमेश्वराचें पूजनच नव्हे काय? गरजेच्या पलीकडे जाण्याची–मुक्त होण्याची–इच्छा त्याच्या हृद-यांतून मावळली तर जगणेंहि त्याला शक्य नाहीं, हें आपण नुकतेंच सिद्ध केलें आहे. विश्वांत जेथें जेथें यत्किंचित् तरी हालचाल दिसते, तेथें तेथें मुक्तीची इच्छा उद्भवली आहे, हें आपण पक्कें लक्ष्यांत ठेवा. अशी प्रत्येक वस्तु परमे-श्वराच्या पूजनास लागली आहे. विश्वांतील यच्चयावत् वस्तूंच्या पोटीं याच कल्प-नेचा वास आहे. मुक्तीकरितां सर्वांची खटपट सुरू आहे. त्यांत फरक आढळून येतो, त्याचें कारण बाह्योपाधिभेद हें आहे. ही इच्छा व्यक्त करण्यासाठीं उप-योगांत येणाऱ्या शरीरादि बाह्य साधनांत जो भेद आहे तोच वस्तुवस्तूंतील दृश्य भेदास कारण आहे. यामुळें बाह्यतः अनेकतेनें भासणारें विश्व मूलतः एकच कसें आहे हें आपल्या लक्ष्यांत येईल. हीच कल्पना उपनिषद्‌ग्रंथांत चोहोंकडे व्यापून राहिली आहे. ईश्वर आणि आह्मी वस्तुतः एकाच मूलरूपाचे आहोंत असें ह्मटल्याबरोबर कित्येकांच्या अंगांवर शहारे येतात. 'आह्मी किती पापी आणि परमेश्वर किती पवित्र, तो आणि आह्मी एकाच स्वरूपाचे आहों हें ह्मणणें पापा-त्मक आहे' असें ह्मणणारे लोक पुष्कळ आहेत. परंतु सशास्त्र विचारांतीं या ह्मणण्यांत कांहींच तथ्य नाहीं, असें आढळून येईल. गुलाबाच्या फुलाचा मनोहर वास आणि फुलपांखरांच्या अंगावरील चित्रविचित्र रंग हीं त्याचींच स्वरूपें आहेत. आमच्यांत व्यक्त होणारें चैतन्य हेंहि त्याच परमेश्वराचें रूप आहे. या सर्व जगाचें अस्तित्व त्याजवरच अवलंबून आहे आणि 'कालोऽस्मि लोकक्षय-कृत् प्रवृद्धः' असें ह्मणणारा या जगाचा संहारकर्ताहि तोच आहे. तो जसा

संहारकर्ता काल आहे तसेंच चिरंतन वास करणारें चैतन्यहि तोच आहे. पारध्याला भिऊन ससे जसे रानोमाळ पळतात, तसे आपण त्याच्या उग्ररूपास भिऊन इतस्ततः पळूं लागतों व एखाद्या झाडाच्या ढोलीचा क्षणभर आश्रय मिळाला तर आपला जीव वांचला ह्मणून स्वतःस धन्य मानून घेतों. त्याचें उग्ररूप कोठेंहि थोडें प्रकट झाल्याबरोबर सारें जग पळत सुटतें. परंतु जगाच्या अंतापर्यंतहि आपण पळालों तरी जाणार कोठें ? मी काशीला गेलों असतां एक वेळ एका बाजूस तलाव आणि दुसऱ्या बाजूस उंच भिंत अशा रस्त्यानें जाण्याचा मला प्रसंग आला. त्याठिकाणीं कित्येक माकडें बसलीं होतीं. काशींतलीं माकडें चांगलीं गलेलठ्ठ आणि खोडकर असून मनुष्याचा रस्ता अडविण्याचें कधीं कधीं त्यांच्या मनांत येतें. मी या रस्त्यानें चाललों असतां कित्येक माकडें माझ्या भोंवतीं जमलीं. कित्येकांनीं माझ्या पायांस विळखा घातला व कित्येक तर चावूंहि लागलीं. त्यांना कसेंबसें दूर करून मी झपाट्यानें पळत सुटलों; परंतु त्यांचें चापल्य माझ्याहून अधिक असल्यामुळें त्यांनीं मला पुन्हां गांठलें. मी पुन्हां पळत सुटणार, इतक्यांत समोरून येणारा एक गृहस्थ ओरडून ह्मणाला 'त्यांना तोंड द्या. पळूं नका.' मीहि ताबडतोब मागें वळून धिटाईनें त्यांजकडे पाहिलें तेव्हां मागें पाय घेत घेत तीं पळून गेलीं. आपल्या आयुष्यांत अडचणीचे असे अनेक प्रसंग आपणांवर येतात. व त्यावेळीं आपण पळूं लागतों. परंतु पळून त्यांतून आपली सुटका होणें शक्य नाहीं. त्या प्रसंगांना तोंड देणें हेंच इष्ट आहे. अनेक आपत्तींवर जय मिळविल्यावांचून मुक्तीचा मार्ग खुला होणार नाहीं. आपण पळं लागलों तर अधिकाधिक बंधनांत मात्र पडूं. आपल्या भेकडपणामुळें विपत्तींस अधिक अवसान मात्र चढतें. भित्र्याला जगांत कोठेंहि यशप्राप्ति होणार नाहीं. '**नहीं जो खारसे (कांटा) डरते वोहि उस गुल (फूल) को पाते हैं**' असें एका हिंदी साधूचें ह्मणणें अत्यंत अर्थपूर्ण आहे. भय, दुःख आणि अज्ञान यांशीं चार हात करण्याची तयारी असल्यावांचून तीं आपणांपासून दूर होणार नाहींत.

ज्या मृत्यूचें नुसतें नांव घेतल्याबरोबर आपण चळचळां कांपूं लागतों त्याचें स्वरूप तरी काय आहे ? ही भीति कोठून उत्पन्न झाली ? परमात्म्यानेंच हें बागुलबोवाचें सोंग घेतलें आहे. या बाहेरील सोंगडीच्या आंत आपण आपली दृष्टि घातली पाहिजे. जगांतील भयांपासून आपण पळून जाऊं लागलों ह्मणजे तींहि आपला एकसारखा पाठलाग करीत सुटतात; आणि आपण त्यामुळें परमात्म्याच्या दर्शनसुखास मात्र अंतरतों. जगांत सुखाची आणि समृद्धीची आराधना करणारे

अनेक–बहुतेक–सर्व आहेत; परंतु दुःखालाहि प्रेमानें मिठी मारणारे कितीसे आढळतील? या दोहोंतहि एकच रूप पाहणें व या दोहोंचीहि आराधना न करणें–हाच मुक्तीचा मार्ग. '**दुःखेष्वनुद्विग्न मनः सुखेषु विगतस्पृहः**' असे आपण झाल्यावांचून मोक्षश्री आपणांस माळ घालणार नाहीं. ती शूराची चहाती आहे. सुखदुःखें, भय, चिंता इत्यादि अनेक दरवाजे मोक्षमार्गांत आपणांस अडथळा करण्यासाठीं बंद होऊन बसले आहेत. हे फोडल्यावांचून आपणांस पलीकडे कसें जातां येईल? परमात्म्याच्या दर्शनाची इच्छा होऊन आपण त्या मार्गानें जाऊं लागल्याबरोबर प्रथम आपलेंच शरीर आपल्या आड येतें. सृष्टीचे कायदेहि आपला मार्ग निरोधूं लागतात. आपली दृष्टि अंधुक होते आणि आपणांस परमात्म्याचें दर्शन घडत नाहीं. जगांतील भीतिस्थानें, संकटें आणि दुःखें यांतहि त्याचेंच वास्तव्य आहे, ही गोष्ट पटल्याखेरीज त्याचें दर्शन आपणांस होणें शक्य नाहीं. दोरीला सर्प समजून आपण भीत आहों. एकवार भीतीनें आपलें ठाणें अंतःकरणांत दिल्यावर जिकडे पाहावें तिकडे अंधार दिसतो. '**दोरीच्या सापा भिऊनि भवा। भेट नाहीं जिवा शिवा। अंतरिंचा ज्ञानदिवा। मालवूं नकोरे॥**' हा उपदेश किती योग्य आहे बरें! सद्गुणांत परमेश्वराचा वास आहे असें सांगणारे पुष्कळ आहेत. परंतु मी तुह्मांस सांगतों कीं सद्गुणांत ज्या परमेश्वराचा वास आहे त्याच परमेश्वराचा वास पापांतहि आहे. पापालाहि मिठी मारण्याइतकें अलोट धैर्य तुह्मांपाशीं नसेल तर तुमच्यासारख्या क्लीबास मुक्ति वरील काय? असें प्रचंड धैर्य ज्यावेळीं आपल्या ठिकाणीं येईल, आनंददायक वस्तु आणि दुःखप्रद वस्तु, नयनमनोहर रूपें आणि भयप्रद रूपें यांच्या ठिकाणीं एकाच परमात्म्याचा वास जेव्हां आपणांस दिसूं लागेल, तेव्हां मोक्षमार्गांतले सर्व बंद असलेले दरवाजे खडाखड उघडतील. अशा स्थितीनंतरच सर्वत्र समभाव आपणांस दिसूं लागेल. मोक्षपथ जितक्या झपाट्यानें आपण आक्रमण करूं तितक्या झपाट्यानें दुःखें आपणापासून पळूं लागतील. स्वर्ग आणि नरक हे दोन्ही एकसारखेच सुखदायक आहेत, असा आपणांस अनुभव येईल. भेददृष्टि नाहींशी होऊन हा लहान आणि तो मोठा अशीं खोटीं रूपें आपणांस दिसणार नाहींत. सर्वांच्या अंतर्यामीं एकाच परमेश्वराचा वास असतां लहान कोण आणि मोठा कोण? '**रामसभामें हरिजन बैठे। को बडा को छोटा है!**' इतकी समता आपल्या दृष्टींत आल्यानंतर विश्वांत सत्य ह्मणून जें कांहीं असेल त्याची व आपली भेट होईल. आपल्या दृष्टींत समता नसल्यामुळें बरें आणि वाईट असे प्रकार या

दुनियेंत आपण पाहतों. समता नसल्यामुळें आपल्या अंध झालेल्या नजरेस परमेश्वर दिसत नाहीं.

एकाच वृक्षाच्या दोन निरनिराळ्या शाखांवर सुंदर पिसाऱ्याचे दोन पक्षी बसले होते. एक अगदीं टोंकाजवळच्या शाखेवर होता आणि दुसरा बुंधाजवळील शाखेवर बसला होता. बुंधाजवळील शाखेवर बसलेला पक्षी त्या झाडाचीं फळें खात होता. त्यांत कित्येक फळें गोड व कित्येक कडू होतीं. तो दोहोंचीहि चव घेत होता. एखाद्या फळाला चोंच मारून तें कडू लागलें ह्मणजे तो आपलें तोंड वेडेंवांकडें करी आणि दुःखी होई. पुन्हां त्यानें आणखी एकदां दुसऱ्या फळाला चोंच मारिली, तों तें पहिल्यापेक्षांहि अधिक वाईट असल्याचें त्यास आढळून आलें. तो शोक करीत असतां त्याची नजर सहजगत्या वर गेली, तों वर दुसरा एक पक्षी बसला असल्याचें दिसून आलें. तो दुसरा पक्षी अगदीं शांत होऊन बसला असून कांहींहि खात नव्हता. पहिल्या पक्ष्यानें त्याजकडे पाहून पुन्हां आपली नजर फळांकडे वळविली व फळें खाण्याचा आपला उद्योग त्यानें पुन्हां सुरू केला. इतक्यांत एक अत्यंत कडू फळावर त्यानें चोंच मारिली. त्या फळाची थोडी चव घेतांच त्याला अत्यंत दुःख झालें व त्यानें पुन्हां एकवार आपली नजर वरील पक्ष्याकडे वळविली. वरचा पक्षी पहिल्यासारखाच निःसीम शांततेचा उपभोग घेत होता. खालच्या पक्ष्याला त्याच्या त्या स्थितीचें मोठें कौतुक वाटून तो हळूहळू त्याजकडे जावयास निघाला. तो त्या पक्ष्याच्या अगदीं जवळ आला. इतक्यांत प्रकाशाचे शुभ्र किरण त्याच्या अंगावर पडले. त्याच्या आजुबाजूस जिकडे तिकडे तेच किरण पसरले होते. त्या प्रकाशानें दिपलेले आपले डोळे त्या पक्ष्यानें उघडून पाहिले तों वर बसलेला पक्षी दुसरा कोणी नसून आपलेंच तें मूलबिंब होतें असें त्यास आढळून आलें. आपणच आपल्या बिंबास निराळा पक्षी समजत होतों, असें त्याच्या प्रत्ययास आलें. खालील पक्षी हा वरच्या पक्ष्याचें प्रतिबिंबच होता. ही गोष्ट त्याला कळल्यानंतर त्याचा भ्रमनिरास होऊन तो शांत व संपूर्ण वैभवयुक्त असा झाला. त्या पक्ष्याप्रमाणें आह्मीहि स्वतः परमेश्वररूप असून प्रतिबिंबामुळें आपलीं हजारों रूपें दिसतात. एकच सूर्य दंवाच्या हजार बिंदूंत प्रतिबिंबित झाला तर ज्याप्रमाणें हजार लहान लहान सूर्य दिसूं लागतात, त्याचप्रमाणें एकच परमात्मा हजारों ठिकाणीं व्यक्त झाल्यामुळें हजारों रूपांनीं दिसूं लागतो. आमच्या मूळच्या स्वरूपास आपणांस जाणें असेल तर हें प्रतिबिंब आपण सोडून दिलें पाहिजे. आपल्या गरजा भागवून आपण

गरजेच्या पलीकडे जाऊं ह्मटलें, तर ती गोष्ट शक्य दिसत नाहीं. आपणांस सर्व विश्वाचें आधिपत्य मिळालें तरी आपल्या गरजा संपणार नाहींत. गरजेच्या पलीकडे जावें याच हेतूनें प्रेरित झालेला मारवाडी कवडी कवडी करतो, चोर चोऱ्या करितो, पापी पापें करितात आणि आपण तत्वज्ञानाचा विचार करितां. सर्वांचें ध्येय एकच; गरजेच्या पलीकडे जाण्याच्या इच्छेव्यतिरिक्त दुसरी कोणतीहि इच्छा साऱ्या आयुष्यांत कोणास उत्पन्न होत नाहीं. कोणास समजो अगर न समजो पण आपले सर्वांचे प्रयत्न या एकाच दिशेनें चालले आहेत. पूर्णत्व पावण्यासाठीं ही सारी धडपड आहे आणि केव्हांना केव्हां हे पूर्णत्व पावतीलच.

अत्यंत पातकी आणि पातकें करण्यांत सदोदित दंग असलेला माणूसहि शेवटीं गरजेच्या पलीकडे जाईल. मात्र, तसें व्हावयास काळहि पुष्कळ पाहिजे, हें उघड आहे. अशा ठिकाणीं आपल्या खटपटीपासून त्यास कांहींच उपयोग होणार नाहीं. धक्के चपेटे खाऊनच तो परमेश्वराकडे वळेल. सद्गुण, पावित्र्य, परोपकाररतता इत्यादि दैवी संपत्ति सर्वांसच प्राप्त होणार आहे. आपली सर्व खटपट कशाकरितां आहे, हें कित्येकांच्या लक्ष्यांत आलेलें नाहीं; परंतु तुमच्या लक्ष्यांत तें आतां आलें आहे. पॉल प्रेषित एकदां ह्मणाला, "ज्या देवाची तुह्मी अज्ञानानें पूजा करीत आहां, तो देव तुमच्या ठिकाणीं आहे असें मी तुह्मांस सांगतों." पॉलचें हें वाक्य सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. आपल्या आयुष्यांतील ज्या एका लक्ष्याकडे आपण सर्व धांव घेत आहों, त्या लक्ष्याला लवकर पोहोंचण्यास आमचीं सर्व शास्त्रें आणि सर्व तत्वज्ञान यांचा उपयोग न झाला, तर तीं निर्माण तरी झालीं कशाला? सर्व चराचरास व्यापून राहिलेलें मूलतत्व आपणच आहों, ही गोष्ट अनुभवानें पाहणें हेंच आपलें साध्य आहे. परमेश्वराला आकुंचित स्वरूपांत पाहणारे पंथ आणि धर्म सोडून सर्व विश्वांत तोच भरून उरला आहे असा अनुभव पटविणाऱ्या धर्मांची कांस आपण धरूं या. परमेश्वराचें अस्तित्व तुह्मांस खरोखर अंतःकरणापासून मान्य असेल तर तुह्मांप्रमाणेंच विश्वांतील सर्व पदार्थ त्याचीच आराधना करीत आहेत, ही गोष्ट तुह्मांस निःसंशय पटेल.

आपण आपला आकुंचितपणा टाकून प्रत्येक मनुष्यांत एकाच परमात्म्याचें रूप प्रकट झालें आहे, हें जाणण्यास शिकलें पाहिजे. प्रत्येकाच्या अंतर्यामांत त्याचाच वास असून या निरनिराळ्या दिसणाऱ्या सर्व मनांत विचाराची प्रेरणा तोच करितो. त्याची सिद्धि बाह्य साधनांवर अवलंबून नसून तो स्वतःसिद्ध आहे. अशा प्रकारचा प्रत्यय येणें हाच धर्म. हाच खरा विश्वास. असा विश्वास आपणा

सर्वांच्या अंतःकरणांत उदय पावावा, अशी आपण त्या सर्वेश्वराची प्रार्थना करूं या. त्याच्या सर्वव्यापी अस्तित्वाचा प्रत्यय जेव्हां आपणांस येईल, तेव्हांच आपण अमर आहों, हें आपणांस निःसंशय पटेल. आपण वस्तुतः शरीरानेंहि अमर असून या विश्वाशीं एकरूप आहों. या सर्व विश्वाचें अधिष्ठान एकच आहे आणि त्याच एकांत माझेंहि वास्तव्य आहे. मी या शरीरांत दिसतों तितका लहान प्राणी नसून विश्वव्यापी आहें. पूर्वी होऊन गेलेली सृष्टिहि मीच. बुद्ध तो मीच, येशू मीच आणि महंमदहि पण मीच. जितके धर्मप्रवर्तक आजपर्यंत होऊन गेले ते सर्व मीच. जगांतील चोऱ्या करणारे मीच आणि फांसावर चढलेले खुनी लोकहि मीच. मी जेथें नाहीं असें ठिकाण अनंत विश्वांत एकहि नाहीं. प्रिय बंधूंनो, जागे व्हा. आपल्या लहान लहान खबदाडांतून बाहेर पडून अफाट मैदानावर या आणि या खऱ्या आराधनेच्या मार्गास लागा. तुह्मी अनंत असतां आपल्याच इच्छेनें क्षुद्र देहांत स्वतःस कोंडून बसलां आहांत. सर्व विश्वांत त्याचेंच रूप पाहणें, ब्रह्मापासून क्षुद्र तृणापर्यंत त्याचाच वास आहे हें जाणणें, हीच खरी लीनता. नुसते डोळे मिटून 'अरे परमेश्वरा, आह्मी पापी, आह्मी दीन' असें ओरडणें ही लीनता नसून लीनतेची थट्टा आहे. आपल्या डोळ्यांवर असलेला पडदा दूर होऊन सर्वत्र परमेश्वराचें स्वरूप दिसूं लागणें हीच आपली अत्युच्च संस्कृति आणि हीच मानवकुलाच्या उत्क्रांतीची शेवटची पायरी. सर्वत्र एकरूप दिसणें हाच खरा धर्म. 'मी' अमुक (देहधारी) असें वाटणें हें 'मी'चें खरें स्वरूप नव्हे. 'मी' सर्वव्यापी, सर्व भूतांतरात्मा आहें, अशा भावनेनें सर्वत्र स्वतःस पाहणें हेंच खरें पूजन. बाह्योपचारयुक्त पूजाविधि हे खालच्या पायरीचे दर्शक आहेत. या जड विधींस फांटा देऊन सर्वत्र एकच चैतन्य पाहणें, हा अत्युच्च पूजाविधि आहे. अंतःकरण जसजसें शुद्ध होऊं लागतें, तसतसा बाह्य पूजाविधि कमी होऊन मनुष्य मानसपूजा करूं लागतो; व युक्त मानसपूजेच्या योगानें परमेश्वराचें सर्वव्यापी रूप त्यास दृग्गोचर होऊं लागून एकच चैतन्य सर्वत्र पाहणें हीच खरी पूजा असा त्यास प्रत्यय येतो. विश्वांतील साऱ्या जड पदार्थांस मर्यादा असून त्या मर्यादेंत ते नियमानें जखडले आहेत. चैतन्य मात्र अमर्याद–निःसीम–असें आहे. परमात्मा ह्मणजे केवळ चैतन्यरूप आहे आणि ह्मणूनच तो अमर्याद आहे. त्याच प्रमाणें मनुष्यांत दिसणारी जीवनकलाहि चैतन्यरूप आणि ह्मणून अमर्याद आहे. मर्यादित वस्तु अमर्याद वस्तूला जाणूं शकत नाहीं, व तिचें पूजनहि करूं शकत नाहीं. अमर्याद वस्तूच अमर्याद वस्तूला जाणून तिचें पूजन

करूं शकते. आपण अमर्याद असल्यामुळें अमर्याद होऊन अमर्यादाला ओळखावें हेंच आपणांस योग्य आहे. परमेश्वराच्या पूजनाचा खरा मार्ग हाच आहे. या पूजनाचा स्वतःच्या ठिकाणीं प्रत्यय घेणाराची स्थिति वर्णनातीत आहे. ती व्यक्त करण्याचें सामर्थ्य भाषेंत नाहीं. 'यतो वाचो निवर्तंते अप्राप्य मनसासह' अशी ही स्थिति आहे; परंतु ही प्राप्त करून घेणेंहि तितकेंच कठीण आहे. 'वाचा वदे परी करणें कठीण। इंद्रियां आधीन झालों देवा ॥' असें ह्मणून अश्रुपात करण्याची पाळी येते. तोंडानें मोठाल्या गोष्टी मी सांगत असतों, तत्वज्ञानाचा झरा माझ्या मुखानें वाहत असतो आणि इतक्यांत कांहीं तरी क्षुल्लक कारणावरून माझा क्रोध अनावर होतो, अहंकार उच्छृंखल होतो. माझ्यावांचून—या लहानशा देहांत अनुभवास येणाऱ्या अहंकारी चैतन्यावांचून—जगांत दुसरा पदार्थच मला दिसेनासा होतो. त्या वेळीं मी केवळ चैतन्य आहें, मी निःसीम आहें, हा सर्व माझाच खेळ आहे, मी मुक्त आहें इत्यादि सर्व कल्पना पार मावळून जातात.

खरा पूजाविधि हा असिधाराव्रताइतका तीव्र आणि तुटलेल्या कड्यासारखा चढण्यास कठीण असा मार्ग आहे. आजपर्यंत होऊन गेलेल्या संतांनीं अनेक प्रकारें ही गोष्ट आह्मांस पुनःपुनः बजावून सांगितली आहे. 'काम क्रोध आड पडले पर्वत। राहिला अनंत पलीकडे। नुलंघवे मज न सांपडे वाट। दुस्तर हा घाट वैरियांचा ॥' असे उद्गार अनेक महात्म्यांनीं जागोजाग काढिले आहेत. आपल्या मार्गांतील भीतीचीं स्थलें संतांनीं याप्रमाणें निदर्शित करून ठेविलीं आहेत. या खुणांचा योग्य उपयोग करून घेणें हें आपणाकडे आहे. 'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' असें उपनिषद्वचन आहे. हा पहाड अत्यंत दुर्गम आहे खरा; परंतु याच्या पलीकडे असलेलें स्वानंदसाम्राज्य आपणास हवें असेल तर हा चढण्यावांचून दुसरी तोड नाहीं. याच्या भीतीनें आमचें अनंत वैभव आह्मीं गमावूं काय ? नाहीं. खचित नाहीं. आह्मी त्रैलोक्यविजयी वीर आहों. जों जों अडचणी अधिक तों तों आमचें धैर्यहि अधिक होऊन हा पहाड शेवटीं आह्मीं खाचित पादाक्रांत करूं. दैत्यांचे आणि देवांचेहि धनी होण्याची आमची योग्यता आहे. मनुष्याची वास्तविक योग्यता अशी असतां तो दीनवाणा होत्साता दारोदार भीक मागत फिरतो, याचा बोल कोणाकडे आहे बरें! अमृताच्या शोधासाठीं निघालेल्या मनुष्याच्या तोंडांत विष पडावें ही नियति आहे असें तुह्मांस वाटतें काय ? खऱ्या दिलानें शोध मात्र करा, मग अमृताचा जिवंत झरा तुह्मांजवळच तुह्मांस आढळून येईल. 'सर्व धर्मान् परि-

त्यज्य मामेकं शरणं व्रज । अहं त्वा सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।' असें साक्षात् परमात्म्याचें वचन आहे. सर्व धर्मग्रंथांतून परमेश्वरानें अशीं वचनें दिलीं आहेत 'परमेश्वरा, आह्मीं आपलें सर्वस्व तुला अर्पण केलें आहे! आमचीं बरींवाईट सर्व कृत्यें तुला अर्पण केलीं आहेत. आमचीं पुण्य कर्में आणि पाप कर्में अशीं दोन्ही तुला अर्पण असोत. आमचीं दुःखें, आमचा आनंद हीं सर्व तुझ्या पायीं वाहतों.' अशी प्रार्थना आपण मनापासून करावयास पाहिजे. परंतु आह्मां मनुष्याचें चित्त किती क्षणभंगुर आहे! एका क्षणीं आह्मीं आपला सर्व भार त्याच्यावर सोंपवितों आणि दुसऱ्याच क्षणीं क्रोधास वश होऊन 'मी' ह्मणूं लागतों!

सर्व धर्मांचें लक्ष्य एकच आहे. तुमच्यांतील क्षुद्र अहंकार समूळ नाहींसा करून तुह्मांस विश्वव्यापी करावयाचें हेंच सर्व धर्मांचें ध्येय आहे. सर्व धर्मकल्पना या एका साध्यासाठींच निर्माण झाल्या आहेत. 'दुसऱ्याचा मत्सर करणारा मी परमेश्वर आहें. माझ्यावांचून तूं दुसऱ्याचें ध्यान करूं नको' असें हिब्रू धर्मग्रंथांत ह्मटलें आहे. याचा अर्थ हाच कीं जोंपर्यंत तूं अहंकाराचें ध्यान करीत आहेस, जोंपर्यंत अहंकार तुझ्या अंतःकरणांतून नाहींसा झाला नाहीं, तोंपर्यंत माझा (परमेश्वराचा) वास तेथें होणार नाहीं. अंतःकरणांत परमेश्वराचा वास हवा असेल तर इतर सर्व बिऱ्हाडकरूंनां हांकून लाविलें पाहिजे. तेथें दुसरा कोणी रहिवासी आला, तर परमेश्वर दुसरीकडे चालता होईल. 'मी' 'मी' नाहींसें होऊन त्या जागीं 'तूं' 'तूं' आलें पाहिजे. परमेश्वराला स्वतःच्या राहण्याच्या ठिकाणांत भागीदार असलेला खपत नाहीं. अत्यंत अट्टहासानें 'मी' सोडण्याचा प्रयत्न केला तरी केव्हां केव्हां चूक होतेच. आपला पाय केव्हां तरी घसरतोच. अशा वेळीं आपणांस कोणी तरी मदतगार लागतो. अशावेळीं विश्वजननीस आपण हांक मारावी. शेवटच्या ठिकाणीं पोहोंचेपर्यंत आपणांस अनेक जागीं मुक्काम करावयाचा असून 'तुझी मर्जी' ही एक वाटेंतली धर्मशाळा आहे. सर्व कांहीं त्याच्या मर्जीवर सोंपविणें ही मुक्तिसोपानाची एक पायरी आहे. अशी भावना पक्की करण्याचा प्रयत्न करीत असतां मध्येंच हें द्वाड मन उसळी मारतें. '**ज्यों मर्कट तरूपर चढकर। डारडारपर लटकत है। चंचळ मन निसदिन भटकत है। ब्रह्मानंद समीप छोडकर। तुच्छ विषयरस गटकत है॥**' अशी मनाची अवस्था आहे. असें आहे तरी क्षणोक्षणीं या भावनेस चिकटून बसण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. त्यावांचून हें मन आपल्या ताब्यांत येणार नाहीं. मन अत्यंत विश्वासघातकी आहे. आपण याची नोकरी पत्करली तर हें आपणांस केव्हां

आणि कसें खाड्यांत घालील याचा नेम सांगवत नाहीं. याच्या नादीं लागून आपण आपलाच गळा कापून घेत आहों. आपल्या विश्वजननीशीं आपण निमकहराम होत आहों. 'खालस इक भगवान भरोंसे । तनमन क्यौं नहिं छोड दिया ॥' असा प्रश्न अनेक महात्मे आपणांस विचारीत आहेत, त्यांस आपण काय उत्तर देणार! चला, या तुच्छ शरीराच्या आणि विश्वासघातकी मनाच्या नादीं न लागतां आपण आपलें सर्वस्व आपल्या विश्वजननीस अर्पण करूं या. 'परमेश्वरा, तुझी मर्जी' असें वाक्य जो दोनदां उच्चारतो तो पापी असें एका हिंदुतत्ववेत्त्याचें ह्मणणें आहे, तें किती खरें आहे! जी गोष्ट खरी, ती खरीच. तिचा पुन्हां उच्चार करावासा वाटणें ह्मणजे तिच्या सत्यत्वाबद्दल एकवेळ शंका घेण्यासारखें आहे. तिचा पुन्हां उच्चार करण्याची जरूरच नाहीं. आतां आपण हा उच्चार एकच वेळ करूं. 'परमेश्वरा, तुझी मर्जी.' आतां यांतून परत फिरणें ह्मणजे पाप करणेंच आहे.

अनुभवाचा मार्ग.

आपणांस ज्ञानप्राप्ति व्हावी असें ज्यास वाटत असेल, त्यानें शम आणि दम हे गुण अंगीं आणण्यासाठीं मनापासून प्रयत्न केला पाहिजे. शम आणि दम हे जरी दोन निरनिराळे गुण सांगितले आहेत, तरी त्यांचा अभ्यास एकत्र करणें श्रेयस्कर आहे. शम–दम याचा अर्थ इंद्रियांना आपापल्या गोलकांबाहेर जाऊं न देणें असा आहे. आतां येथें इंद्रिय ह्मणजे काय याचा अर्थ न समजण्याजोगा आहे, यासाठीं प्रथम त्याचा अर्थ सांगतों. हे माझे डोळे पहा. हे आपणांस बाहेरून दिसतात व मीहि या डोळ्यांनीं पाहतों; परंतु हे बाहेर दिसणारे डोळे, हें खरें इंद्रिय नव्हे. हें साधन अथवा उपकरण आहे. अंतस्थ गोलकाचा हा बाहेरील दरवाजा आहे. गोलक आपल्या जाग्यावर नसेल तर हे बाह्य डोळे असूनहि मला कांहीं दिसणार नाहीं. तसेंच हें बाहेरील उपकरण आणि गोलक आपापल्या जागीं असून त्यांना मनाची मदत न मिळाली तरीसुद्धां दृष्टीनें होणारें वस्तुज्ञान मला होणार नाहीं. एखादे वेळीं आपलें मन कांहीं विशेष विचारांत गुंतलें असतां आपणांसमोरून हत्ती गेला तरी आपणांस दिसत नाहीं, अशा प्रकारचा अनुभव आपणा सर्वांस आहेच. मनाची मदत गोलकास व गोलकाची बाह्येंद्रियास असल्यावांचून, पाहणें ही क्रिया होऊं शकत नाहीं. याचप्रमाणें आपण जी जी क्रिया करतों तिची गोष्टहि अशीच आहे. प्रत्येक क्रियेंत या त्रयीची मदत अवश्य असलीच पाहिजे. बाहेरील अथवा जड इंद्रिय, त्याचा अंतस्थ गोलक आणि मन हीं आपापल्या जागीं असल्याशिवाय कोणत्याहि क्रिया करणें आपणांस शक्य नाहीं. अशा रीतीनें आपल्या मनाची क्रिया दोन उपकरणांनीं चालू असते. यांत एक उपकरण बाह्य असतें व दुसरें अंतस्थ असतें. आपलें मन या अंतस्थ व बहिरिंद्रियाच्याद्वारें येऊन बाहेरील वस्तु पाहूं लागलें ह्मणजे त्या वस्तूंतच गुंतून राहतें; परंतु डोळे मिटून आपण विचार करूं लागलों कीं मनाची बाह्यक्रिया थांबून तें अंतर्मुख होतें. यावेळीं बाहेरील वस्तूंकडून त्यास चलन मिळत नसल्यामुळें त्याचें कार्य आंतल्याआंत सुरू असतें. डोळे मिटल्यानंतर बाहेरील वस्तूंचें प्रत्यक्ष दर्शन झालें नाहीं तरी त्यांचें चित्र इंद्रियद्वारा मनःपटावर उमटलेलें असतें व मनास चलन देऊन त्याची क्रिया तें थांबूं देत नाहीं. यामुळें मन हें सदोदित कार्य करणारें आहे असें आपणांस दिसून येतें. मी आपणाकडे पाहून बोलतों, त्यावेळीं अंतस्थ गोलक आणि बहिरिंद्रिय अथवा गोलकाचें बाह्य उप-

करण हीं दोन्ही कार्यरत असतात; परंतु डोळे मिटून मीं विचारास सुरवात करतांच उपकरणाचें कार्य थांबतें व फक्त अंतस्थ गोलकाचें कार्य सुरू असतें. बहिरिंद्रिय अथवा उपकरणद्वारा वस्तूंचीं चित्रें सांठवून त्यांच्याद्वारें मनास चलन देणें हें गोलकांचें कार्य होय. एखादा गोलक क्रियाभ्रष्ट झाला तर त्याच्या द्वारें उद्भूत होणारे विचारहि आपोआप बंद पडतील हें यावरून उघड दिसून येईल. आपणांस एखाद्या वस्तूविषयीं विचार करावयाचा झाला तर त्या वस्तूचें चित्र आपल्या अंतश्चक्षूंपुढें असल्यावांचून तिजविषयीं आपणांस विचारच करतां येत नाहीं. त्या वस्तूची कोणत्या तरी प्रकारची प्रतिमा दृग्गोलकापुढें नसेल तर मनास चलन देण्याचें कांहीं हत्यारच त्याजपाशीं नाहीं, असें होऊन मनास चलन देण्याची क्रिया त्याजकडून होणार नाहीं. अंतश्चक्षूंपुढें ह्मणजे दृग्गोलकांपुढें कांहीं प्रतिमा अथवा चिन्ह असल्यावांचून एखाद्या आंधळ्यासहि विचार करतां येणें शक्य नाहीं. सर्व इंद्रियांत डोळे आणि कान हीं इंद्रियें अत्यंत चपल असतात. इंद्रिय हा शब्द येथें गोलक अथवा अंतरिंद्रिय या अर्थी वापरला आहे असें समजावें. शरीरावरील डोळे आणि कान हीं उपकरणें असून त्यांचे गोलक मेंदूंत असतात. जर कांहीं कारणानें हे गोलक क्रियाशून्य झाले, तर बाहेरील डोळे व कान शाबूत असूनहि आपणांस कांहीं दिसणार नाहीं अथवा कांहीं ऐकूंहि येणार नाहीं. यावरून मनाच्या स्वैरपणास आळा घालावयाचा असेल, तर या गोलकांचें नियमन करणें अवश्य आहे, ही गोष्ट आपणांस निःसंशय पटलीच असेल. मनाच्या आणि गोलकांच्या नित्य चालणाऱ्या व्यवसायास आळा घालणें यासच शम-दम अशी संज्ञा आहे. मनाला बाह्य वस्तूंत गुंतूं न देणें याला शम आणि बहिरिंद्रियांस अथवा उपकरणांस निर्व्यापार करणें यास दम असें ह्मणतात. ज्ञानमंदिरास पोहोंचविणाऱ्या सोपानपथाची ही पहिली पायरी आहे.

यानंतर तितिक्षा ही दुसरी पायरी लागते. एकंदर साधनसामुग्रींत तितिक्षा ही प्राप्त करून घेण्यास अत्यंत कठिण आहे. ही प्राप्त करून घेण्याच्या तयारीस आपण लागलों ह्मणजे 'ब्रह्मज्ञान नव्हे लेंकराच्या गोष्टी' असें आपल्या प्रत्ययास येतें. तितिक्षा ह्मणजे पूर्ण क्षमावृत्ति. अप्रतिकाराच्या तत्वाचा निःसीमत्वानें अंगिकार करणें याचें नांव तितिक्षा. आपल्या अंगीं तितिक्षा येण्याकरितां आपण अभ्यासास सुरवात केली ह्मणजे तितिक्षत्व किती कठीण आहे, याचा आपणांस अनुभव येऊं लागतो. कोणाचाहि प्रतिकार न करण्याचें व्रत आपण स्वीकारलें ह्मणजे बहिरिंद्रियांवर आपण कदाचित् ताबा ठेवूं शकूं; परंतु आपलें मन ताब्यांत

आणणें ह्मणजे तें असिधाराव्रतच आहे. कोणी मनुष्य मला कांहीं अपशब्द बोलला तर जीभ आंवरून धरून मी त्यास उलट दुरुत्तर देणार नाहीं; परंतु माझ्या मनाची स्थिति काय होईल बरें ? मला बिलकुल राग आला नाहीं अथवा त्या मनुष्याचा मी यत्किंचित्‌हि द्वेष करीत नाहीं अशीं मी बाह्यतः बतावणी करूं शकेन. परंतु माझें मन मात्र त्या मनुष्याबद्दल सदोदित संतप्तच राहील. अंतस्थ विचारांचा बाह्यतः उद्रेक होऊं नये इतकी खबरदारी, फार तर, मी घेऊं शकेन. परंतु माझें मन अनावर होऊन त्या विचारानें सदोदित संतप्त राहिलें तर मला तितिक्षत्व प्राप्त झालें असें ह्मणतां येणार नाहीं. रागाची यत्किंचित् छटाहि माझ्या चित्तांत उद्भवतां कामा नये. मला त्या मनुष्याबद्दल द्वेषही वाटतां कामा नये; जणूं काय, विशेष असें कांहीं घडलेंच नाहीं असें माझ्या मनास वाटण्या इतकी माझी तयारी झाली ह्मणजे अप्रतिकाराच्या तत्वाची खरी अंमलबजावणी मीं केली असें होईल. जोंपर्यंत रागद्वेषांची यत्किंचित् छटा माझ्या मनांत उद्भवत आहे, तोंपर्यंत बाकीच्या माझ्या बाह्यवर्तनाची किंमत नाटकांतील सोंगापेक्षां अधिक नाहीं. यदृच्छेनें कसल्याहि प्रकारची स्थिति प्राप्त झाली आणि कितीहि संकटें कोसळलीं तरी त्यांचा प्रतिकार करावयाचा नाहीं इतकेंच नव्हे तर त्यांमुळें आपल्या मनांतहि कांहीं चलबिचल होऊं द्यावयाची नाहीं, इतका ताबा ज्या दिवशीं माझ्या मनावर मला चालवितां येईल त्या दिवशीं मला तितिक्षा प्राप्त झाली असें होईल. आपण अशी कल्पना करूं कीं एखाद्या विशिष्ट गोष्टीचा प्रतिकार मीं वेळींच न केल्यामुळें एखादें संकट मजवर ओढवलें. अशा वेळीं, वेळींच प्रतिकार न केल्याचा पश्चात्ताप मला होतां कामा नये. इतका समतोलपणा माझ्या मनास प्राप्त झाला ह्मणजे माझ्या ठिकाणीं तितिक्षा पूर्णपणें बाणली असें ह्मणतां येईल. आपल्या अंगीं तितिक्षा यावी याकरितां आर्यावर्तांतील लोक जो अभ्यास करितात, त्याचें वर्णन ऐकूनच तुह्मांस नवल वाटेल. मनास यत्किंचित्‌हि दिक्कत वाटूं न देतां कित्येक अभ्यासी सूर्याचा आणि अग्नीचा प्रचंड ताप सहन करितात. अंगावर हिमपात झाला तरी त्याची कित्येक पर्वा करीत नाहींत. हें जड शरीर जणूं काय अस्तित्वांतच नाहीं अशा भावनेचा ते अभ्यास करितात. जड शरीराचें जें काय होणें असेल तें यदृच्छेनें होवो; त्याचा व आपला कांहीं संबंधच नाहीं अशा प्रकारचीत्यांची वागणूक असते.

तितिक्षेच्या नंतरची पायरी उपरति ही होय. इंद्रियद्वारा येणाऱ्या संवेदना चित्तांत घोळूं न देणें याचें नांव उपरति. आपलीं बहिरिंद्रियें अथवा उपकरणें

क्रियाशून्य करून आपण स्तब्ध बसलों तरी आपण जे काय उद्योग केले असतील, जें काय पाहिलें असेल, जें काय ऐकलें असेल अथवा दुसऱ्या दिवशीं जें काय पाहण्याचा अथवा ऐकण्याचा संभव आहे, जें काय आपण खाल्लेंप्यालें असेल आणि जेथें आपण गेलों आलों असूं, त्या सर्वांचा आपण विचार करीत बसतों. आपण बाह्यत: अगदीं क्रियाशून्य असतां आपलें मन काशी रामेश्वराचा प्रवास करतें आणि अनेक प्रकारच्या विचारांत गढून गेलेलें असतें. ज्याला वेदांती व्हावयाचें असेल, सम्यग्ज्ञान ज्याला हवें असेल त्यानें ही संवय सोडून दिली पाहिजे. स्वत: स्तब्ध असतां ज्याप्रमाणें या गोष्टींचा विचार करावयाचा नाहीं, त्याच प्रमाणें या गोष्टींविषयीं इष्टमित्रांशीं वाटाघाटहि करावयाची नाहीं, असा निश्चय त्यानें केला पाहिजे.

उपरती नंतरची पायरी श्रद्धा ही होय. श्रद्धा ह्मणजे विश्वास. परमेश्वर आणि धर्म यांजवर ज्यांचा अढळ विश्वास असेल, त्यांसच हा अनुभवाचा मार्ग सांपडेल. ज्याचा हा विश्वास अत्यंत दृढ नसेल त्यानें ज्ञानप्राप्तीची आशाच करूं नये. याचसाठीं '**श्रद्धावांल्लभते ज्ञानम्**' असा सिद्धांत सांगितला आहे. वास्तविक पाहिलें तर कोट्यवधि मनुष्यांत एखाद्याचाच खरा विश्वास परमेश्वराच्या ठिकाणीं असतो असें एका साधु महाराजांनीं मला सांगितलें. मी त्यावर त्यांना विचारिलें 'महाराज असें कसें ह्मणतां? परमेश्वरावर आमचा विश्वास आहे, असें ह्मणणारे किती तरी आढळतात.' महाराज ह्मणाले, 'अशी कल्पना कर कीं एका खोलींत एखादा चोर बसला आहे आणि त्याच्या शेजारच्या खोलींत मोठा द्रव्यनिधि असल्याचें त्याला समजलें, तर त्याची काय स्थिति होईल?' मी उत्तर दिलें 'पापणीला पापणी सुद्धां लावण्याची त्याला इच्छा होणार नाहीं; मग झोपेचें नांवच नको. तें द्रव्य आपल्या हातीं कसें येईल, याशिवाय दुसऱ्या कोणत्याच गोष्टीचें तो चिंतन करणार नाहीं.' माझें हें उत्तर ऐकून महाराज ह्मणाले, 'तर मग परमेश्वराचें अस्तित्व मान्य करणारा मनुष्य त्याला प्राप्त करून घेण्यासाठीं अगदीं वेडा होणार नाहीं काय? ज्या ठिकाणीं दु:खाचें वारेंहि लागूं शकत नाहीं असें एखादें ठिकाण आपल्या हस्तगत होण्याचा संभव आहे असें ज्यास खरोखर मनापासून वाटतें त्याला तें ठिकाण हस्तगत करून घेईपर्यंत दुसरी कोणतीहि गोष्ट सुचणें तरी शक्य आहे काय?' परमेश्वरावर परमावधीचा विश्वास आणि त्याला प्राप्त करून घेण्याची अत्यंत उत्कंठा असणें यालाच श्रद्धा असें ह्मणतात. श्रद्धा ह्मणजे अंधविश्वास नव्हे. कोणत्या तरी एखाद्या ग्रंथांत अथवा

एखाद्या मनुष्यानें कांहीं सांगितलें तर त्याचा अनुभव नसतां तें खरें मानावयाचें ही श्रद्धा नव्हे. श्रद्धा आणि अंधविश्वास यांचा आपल्या डोक्यांत पुष्कळ वेळां घोंटाळा असतो. अंधविश्वास हा खोटया नाण्यासारखा आहे. त्यामुळें प्रसंगीं फजिती पावण्याची वेळ येते. श्रद्धा म्हणजे परमेश्वरप्राप्तीची अत्यंत उत्कंठा, इतकी कीं त्यावांचून दुसरें कांहींच चित्तांत नसणें.

श्रद्धेनंतरची पायरी समाधान ही आहे. समाधान म्हणजे आपल्या मनाची स्थापना सदोदित परमात्म्याच्या ठिकाणीं करणें. परमेश्वरावांचून अन्य कशाचेंहि चिंतन न करणें, सुखप्रसंगींहि त्या सुखाचा विचार सोडून परमेश्वराच्या ठिकाणीं मन लावणें आणि त्याचप्रमाणें दुःखाचा कडेलोट झाला तरी त्यावेळींहि परमेश्वराचेंच चिंतन करणें याला समाधान असें म्हणतात. हें एका दिवसांत प्राप्त होणारें नाहीं. धर्म म्हणजे साखरेची गोळी नव्हे, कीं उचलली आणि टाकली तोंडांत. अविरत आणि अत्यंत कठीण अशा परिश्रमानें हें प्राप्त होणारें आहे. आपलें मन आंवरणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्याइतकेंच सोपें आहे, ही गोष्ट खरी; परंतु हळूहळू प्रयत्न केला तर तें अगदीं असाध्य आहे असें नाहीं. 'असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम्। अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते॥' असें श्रीकृष्णांनीं सांगितलें आहे.

समाधानानंतरची पायरी मुमुक्षुत्व ही होय. मुमुक्षुत्व म्हणजे मुक्त होण्याची इच्छा. सर एड्विन् आर्नोल्ड यांनीं इंग्रजींत लिहिलेलें बुद्धचरित (Light of Asia) तुम्हीं वाचलें असलें तर बुद्धानें केलेल्या उपदेशांतील एक भाग विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखा आहे, तो तुम्हांस स्मरत असेलच. बुद्ध म्हणतो, 'तुम्हीच आपले शत्रु असून स्वतःचें नुकसान करून घेतां; दुसरा कोणी तुमचें नुकसान करीत नाहीं. सर्व आयुष्यभर, मरेपर्यंत दुसऱ्या कोणाचा तुमच्यावर ताबा नाहीं. संसारचक्राबरोबर गरगर फिरून तुम्ही दुःखाला कवटाळतां आणि त्याचें चुंबन घेतां. संसारचक्राबरोबर फिरतां फिरतां तुम्हांस अश्रु गाळण्याचे प्रसंग येतात आणि इतकेंहि करून तुम्हीं काय मिळविलें हें पाहिलें तर कांहीं नाहीं हेंच उत्तर येणार.'

आपणांवर जीं जीं दुःखें कोसळतात तीं तीं आपल्या इच्छेनेंच कोसळतात. आपला स्वभावच असा आहे कीं, जणूं काय दुःखें हीं आपल्या जीविताचा एक घटकच होऊन बसलीं आहेत. दुःखांशिवाय आम्हांस चैनच पडत नाहींसें वाटतें. एका चिनी कैद्याला तुरुंगांत साठ वर्षें ठेविलें होतें. नवा बादशहा गादीवर बसला

त्यावेळीं कांहीं कैदी सुटले त्यांत तो होता. तुरुंगांतून बाहेर पाय ठेवतांक्षणींच त्यानें मोठमोठ्यानें रडण्यास आरंभ केला. त्याचें कारण विचारतां तो ह्मणाला, 'या जगांत मी जिवंत कसा राहणार? येथें माझी काळजी कोण घेईल? माझ्या अंधारकोठडींत मला परत पाठवा. तेथले उंदीर आणि घुशी यांचें मजवर मोठें प्रेम आहे. या उजेडाकडे पाहून मी आंधळा होण्याच्या बेतास आलों आहें. मला माझ्या कोठडींत परत पाठवा अथवा मारून तरी टाका!' त्याला त्याच्या कोठडींत परत पाठविलें तेव्हां तो शांत झाला. आह्मा मनुष्यांची स्थितिहि अशीच आहे. एक दुःख संपलें न संपलें तोंच आह्मी दुसऱ्याच्या पाठीस लागून पळत सुटतों. दुःखमुक्तीचा उपाय कोणीं आह्मांस सांगितला तर तो सांगणारा आह्मी शत्रूसारखा मानतों. एखाद्या सुखाच्या पाठीमागें मोठ्या आशेनें लागावें, तें मिळण्याकरितां दुःखें सोसावीं आणि शेवटीं पाहावें तों तें सुख कोठेंच नसतें. आपण त्याला आतां धरणार असें वाटत असतां असतांनाच तें हातांतून निघून जातें. असे अनेक अनुभव एकामागें एक येत गेले तरी आह्मी शहाणे न होतां व सुखकल्पनांचा पाठलाग सोडून न देतां पुनःपुनः धांवत सुटतों. खरोखर आह्मांसारखे मूर्ख आणि आंधळे आह्मीच! दुसरें काय ह्मणावें! बैलानें लवकर चालावें ह्मणून एका तेल्यानें एक गमतीची युक्ति योजिली होती. बैलाच्या मानेवर जें लांकडाचें जूं असतें त्यावर त्यानें एक काठी आडवी बांधली होती व तिच्या टोंकावर थोडेंसें गवत बांधिलें होतें. ही योजना अशा प्रकारची केली होती कीं ती गवताची पेंढी नेहमीं त्या बैलाच्या डोळ्यांसमोर राहावी. एक वीतभर अंतर आहे तेवढें कमी झालें कीं आपणास गवत खावयास मिळेल असें त्या बैलाला वाटे. तें वितीचें अंतर तुटण्याकरितां त्या बैलानें खूप धांवपळ चालविली; परंतु कित्येक तास फिरूनहि तें वितीचें अंतर कमी झालें नाहीं. आह्मा मनुष्यांची गोष्टहि अशीच आहे. इंद्रियजन्यसुखाचे गुलाम बनून आज अनंत काल कनककामिनीच्या मागें आह्मी धांव घेत आहों. अनंत जन्मांचे फेरे खाऊनहि आज आह्मी पुन्हां जागच्या जागींच आहों. सुख व आह्मी यांमधील वितीचें अंतर अद्यापिहि कमी होत नाहीं. प्रेम, प्रेम ह्मणून आह्मी भ्रमिष्ट होऊन फिरत आहों. प्रेम, प्रेम ह्मणून आह्मी पुत्रकलत्रांच्या गळ्यास मिठी मारतों आणि त्यांनीं उलट मिठ्या मारण्याची इच्छा करतों. एकामेकांच्या पाशांत गुंतलेला आमचा घोळका आज अनंतकाल सुखाच्या पाठीस लागला आहे; पण जों जों आमची धांवपळ अधिक तों तों सुखाचीहि गति अधिक होत जाते, व शेवटीं पाहावें तों

आह्मां दोघांमधील अंतर पूर्वीच्या इतकेंच. आपण सदा सुखी असावें व दुःखानें आपल्या आसमंतात् कोठें राहूं नये अशी आपली इच्छा आहे. या इच्छेनें प्रेरित होऊन आह्मी आंधळ्यासारखे फिरत आहों. मध्यंतरीं कोठें सुखाचा भास होऊन त्याला मिठी मारावयास जावें, तों कांटेरी झाडें हातांस लागतात! आज अनंत-काल हें जग असेंच चाललें आहे. मित्रांनो, आपण आपल्या आजपर्यंतच्या आयुष्यक्रमाचा विचार केला तर आपणांस निरामय सुखाची प्राप्ति एक क्षणभरहि कधीं झाली नाहीं असें आपणांस दिसून येईल. जी गोष्ट आपल्या आजपर्यंतच्या आयुष्यांत प्राप्त झाली नाहीं, ती राहिलेल्या अवधींत प्राप्त होईल, अशी हमी कोणीं दिली आहे काय ? या मृगजलामागें धावतां धावतां आपली तहान मात्र अधिक वाढत आहे.

पूर्वी सोलन या नांवाचा एक तत्ववेत्ता होऊन गेला. त्याला क्रिसस राजा एकदां ह्मणाला, "साऱ्या जगांत आशियामायनर हीच सुखभूमि आहे." सो-लननें विचारलें, "महाराज, या सुखभूमींत अत्यंत सुखी कोण आहे?" राजा ह्मणाला, "मी." यावर सोलन ह्मणाला, "महाराज, आपल्या शिल्लक आयुष्यांत काय प्रकार घडतील हें कोणीं सांगावें?" या गोष्टीला कांहीं वर्षें लोटल्यानंतर इराणी लोकांनीं क्रिससवर स्वारी करून एका लढाईत त्यास पकडलें, व त्यास जि-वंत जाळण्याची तयारी केली. आतां लांकडांस आग लावणार इतक्यांत त्या बिचाऱ्या राजाला सोलनच्या ह्मणण्याची आठवण होऊन तो 'सोलन सोलन' ह्मणून ओरडूं लागला. 'सोलन कोण?' ह्मणून इराणच्या बादशहानें प्रश्न विचा-रल्यावरून क्रीससनें सर्व हकीगत त्याला सांगितली. तेव्हां बादशहाला दया येऊन त्यानें क्रिससला मुक्त केलें.

आपणा सर्वांची गोष्ट अशीच आहे. इंद्रियजन्यसुखाच्या मागें लागल्यामुळें सृष्टीच्या कायद्यांचे आपण दासानुदास बनलों आहों. सुख जवळ येतेंसें वाटतें तों एखादा कायदा जागृत होऊन आह्मांस एका लत्ताप्रहरानें दूर झुगारून देतो; पण त्यानें सावध न होतां आह्मी पुन्हां धांवपळ करूं लागतों. आमची स्थिति कितीहि निराशाजनक असली तरी तींतहि कोठें तरी आशेची जागा आह्मी शो-धीत असतों. या आशेनें आह्मी पूर्ण वेडे बनलों आहों. आह्मांला केव्हांना केव्हां सुखाची प्राप्ति होईल, ही आशा आह्मांस अद्यापिहि सोडून जात नाहीं.

हिंदुस्थानांत एक मोठा राजा पूर्वकालीं होऊन गेला. त्याला एका सत्पुरुषानें विचारिलें, "राजा, जगांत आश्चर्यकारक गोष्ट कोणती?" राजानें उत्तर दिलें

'आशा.' सर्वांत आशा मोठी आश्चर्यकारक आहे. भोंवतालीं अनंत प्रकारचीं दुःखें पसरलेलीं पाहत असतांहि आह्मी सुखाची आशा करतों. मृत्यूचें अविरत साम्राज्य पहात असतांहि आपण सदोदित जिवंत राहूं अशी आशा आपणांस असते. आपणांला कांहीं दुःख होईल अथवा आपणांवर केव्हां तरी मृत्यूचा घाला पडेल असें आपल्या मनांत कधींच येत नाहीं. सध्याच्या स्थितींत सुखप्राप्ति होण्याचा यत्किंचित्‌हि संभव नाहीं असें कोणीं खडे मांडून सिद्ध केलें तरी आमची समजूत पडतच नाहीं. आपल्याभोंवतीं वास्तविक सुखी असा एकहि प्राणी नाहीं. एखादा श्रीमंत असून त्याला खाण्यापिण्याची चंगळ असली तर त्याला बद्धकोष्ठाचा विकार असावयाचा. एखाद्या खाण्याच्या वस्तूकडे पाहण्याबरोबर बिचाऱ्याला उलटी येते! एखाद्याची क्षुधा अत्यंत प्रखर असली, तर त्याला घांसभर अन्न मिळण्याची मारामार! कोणी श्रीमान् संतति नाहीं ह्मणून शोक करितो, तर एखादा भिकाऱ्याच्या मागें मुलांचा एक सबंध तांडा असतो! इतक्या मुलांना खायला काय घालावें या विचारांतच तो सदा चूर असतो! असें कां असावें हा मोठ्या विचाराचा प्रश्न आहे. याचें उत्तर असें कीं सुख आणि दुःख हीं एकाच नाण्याच्या दोन बाजूंसारखीं आहेत. नाणें हवें असलें तर ज्याप्रमाणें राजाच्या मुखवट्याबरोबर उलट बाजूचा शिक्काहि घेतलाच पाहिजे त्याप्रमाणें सुखप्राप्ति हवी असेल तर दुःख भोगण्याचीहि तयारी केलीच पाहिजे. पण आमची अशी समजूत न पडल्यामुळें निर्भेळ सुखाची आह्मी आशा करीत बसतों. या आशेच्या नादीं लागून पळतां पळतां आह्मी इंद्रियांच्या जाळ्यांत मात्र गोंवले गेलों आहों. आमचें धनीपण जाऊन गुलामगिरी आमच्या नशीबीं आली आहे.

मी बोस्टन शहरीं असतां एकेवेळीं एक तरुण मला भेटला. त्यानें एक कागद माझ्या हातीं दिला. ' जगांतील सर्व संपत्ति आणि सुख तुमचेंच आहे. तें कसें मिळवावें हें शिकावयाचें असेल तर माझ्याकडे या. फी रुपये पंधरा.' हा कागद माझ्या हातीं देऊन तो ह्मणाला, 'तुह्मांला हें पसंत पडतें कीं नाहीं?' मीं उलट विचारलें, 'भल्या गृहस्था, हा मजकूर छापून घेण्याइतका पैसा तुजपाशीं नाहीं काय?' माझ्या प्रश्नाचा भावार्थ त्याच्या लक्ष्यांत आला नाहीं. कांहींसुद्धां मेहनत न करतां खूप पैसा आपणांस मिळेल हेंच खूळ त्याच्या डोक्यांत शिरलें होतें. जगाच्या सामान्य व्यवहारांत आपणांस दोन प्रकारचीं माणसें आढळून येतात. आशावादी लोकांना हें जग ह्मणजे केवळ सुखाचें आगर वाटतें.

निराशावादी लोकांना त्यांत कांट्याकुट्यांवांचून कांहींच दिसत नाहीं. लक्षावधि मनुष्यांत एखाद्याला जगाचें बरोबर स्वरूप ठाऊक असतें. बाकीच्यांपैकीं कित्येकांच्या अगदीं विचित्र कल्पना असतात व दुसरे कित्येक एकाच कल्पनेच्या मागें लागून वेडे झालेले असतात. सुदृढ प्रकृतीच्या तरुणांस जगांतील सर्व संपत्ति मिळण्याची आशा वाटत असते. आपण अमुक एक वस्तु मिळवूं शकणार नाहीं, असें त्यांस कधींच वाटत नाहीं; परंतु हेच लोक जगांतील टक्केटोणपे खातां खातां इतके गलितवीर्य होतात कीं वृद्धपणीं त्यांना या जगांत दुष्टपणाशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं. कोठें तरी सांधीकोपऱ्यांत बसून जगाच्या नांवानें खडे फोडावे आणि इतरांस निरुत्साह करावें, इतकाच यांना धंदा उरतो. थोड्याशा दुःखामुळें झुरूं लागावें अथवा तुच्छ सुखकल्पनांमागें धावावें हें आपल्या मनुष्यपणास खरोखर लांछनास्पद आहे. या दोन्ही अवस्था झुगारून देऊन दोहोंच्या मध्यभागीं मेरूसारखें अचल आणि समतोल राहणें यांतच खरें मनुष्यपण आहे. आमच्या स्थितीचा खऱ्या दृष्टीनें विचार केला तर आमचें बाल्य जणूं कधीं संपतच नाहीं ! जरा कोणीं रागें भरल्याबरोबर मूल जसें रडूं लागतें आणि तितक्यांतच कोणीं खाऊ दिल्याबरोबर हंसूहि लागतें, तशीच आह्मां मिशाळ मुलांचीहि अवस्था आहे. जगानें आपलें स्वरूप थोडें उग्र केल्याबरोबर आमचा थरकांप होतो! आणि तेंच स्वरूप थोडें सौम्य होण्यारोबर आह्मांस परमावधीचा आनंद होतो !

शहाणे लोक या दोन्ही स्थितींच्या पलीकडे जाण्याची इच्छा करितात. इंद्रियांस भासमान होणाऱ्या पदार्थसृष्टीचें खरें स्वरूप त्यांस ठाऊक असतें. इंद्रियद्वारा प्राप्त होणारीं सुखदुःखें चिरस्थायी नाहींत ही गोष्ट ते कधींहि विसरत नाहींत. श्रीमंत लोक चैनीच्या नव्या नव्या तऱ्हा काढण्यासाठीं केवढी काळजी वाहतात, हें आपणास ठाऊकच असेल ! आज ज्या पदार्थानें त्यास सुख झालेंसें वाटतें, तोच पदार्थ उद्यां शिळा आणि बेचव होतो ! चैनीच्या नव्या नव्या तऱ्हा रोजच्या रोज किती उत्पन्न होतात त्या पहा, ह्मणजे श्रीमंतांना आपण सुखी आहों असें भासविण्यास केवढी खटपट करावी लागते, याचा तुह्मांस अंदाज होईल. बाकीच्या लोकांत बहुधा मेषवृत्तीचे लोक फार. आघाडीचें मेंढरूं खाड्यांत पडल्याबरोबर बाकीचीं मेंढरें आपण होऊन त्यांत उड्या घेतात ! त्याचप्रमाणें एखाद्या बड्या धेंडानें कांहीं गोष्ट केली कीं इतर त्याचें अनुकरण करूं लागतात. आपण काय करतों याचेंहि त्या बिचाऱ्यांस भान नसतें. जगांतील सुखदुःखांच्या कल्पनांत

वास्तविक तथ्य किती आहे, याचा जर आपण विचार केला तर इंद्रियजन्य-सुखाचे गुलाम होऊन राहणें आपणांस खचित पत्करणार नाहीं. दोन गोड शब्द कोणी बोलला तर आह्मांस आनंद व्हावा आणि दोन कडू शब्दांबरोबर आह्मी दुःखाच्या खाड्यांत पडावें, ही स्थिति खरोखर लाजिरवाणी आहे. आमच्या एकंदर आयुष्यक्रमाचा विचार करतां त्यांत गुलामगिरीवांचून कांहींच आढळत नाहीं. आह्मी पोटाचे गुलाम; आह्मी आमच्या पोषाकाचे गुलाम; आह्मी आमच्या देशाचे आणि देशाभिमानाचे गुलाम; आणि आह्मी कीर्तीचे–मोठ्या नांवाचे–गुलाम. इतक्या अनंत गुलामगिऱ्यांमुळें आमचें ईश्वरत्व विचारें झांकून गेलें आहे. आह्मी आमच्याच हातानें त्यास मूठमाती दिली आहे! अजून आह्मांस या शृंखला जाचक वाटत नाहींत! पिंजऱ्यांतल्या पोपटाला ज्याप्रमाणें चकचकीत पितळी तारांचें आणि बिलोरी वाट्यांचें भूषणच वाटतें, तशीच आह्मां मनुष्यांचीहि गोष्ट आहे. या गुलामगिरीचें खरें स्वरूप समजूं लागलें ह्मणजे सध्याच्या सुखोत्पादक वस्तूंचें खरें स्वरूप दिसूं लागतें; आणि यांतून मोकळें होण्याची आपणांस उत्कट इच्छा होते. धगधगीत निखारा कोणीं आपल्या मस्तकावर ठेविला तर तो काढून टाकण्यास आपण जितके अधीर होतों, तितक्याच अधीरपणानें आपण या सुख-दुःखांबाहेर जाण्याची खटपट करूं लागतों. अशा प्रकारची उत्कट इच्छा होणें याचें नांव मुमुक्षुत्व.

यानंतर मुमुक्षूनें नित्यानित्य विवेक केला पाहिजे. या जगांत नित्य वस्तु कोणती आणि अनित्य वस्तु कोणती–चिरकालिक टिकणारी वस्तु कोणती आणि क्षणभंगुर कोणती–याचा नित्य विचार केला पाहिजे. परमेश्वराशिवाय बाकीचें सर्व विश्व अनित्य आहे, क्षणभंगुर आहे, ही गोष्ट त्यानें सदोदित आपल्या मनावर ठसविली पाहिजे. विश्वांतील प्रत्येक स्थितीला आणि प्रत्येक वस्तूला शेवट आहे. पशुपक्षी आणि मनुष्यें मर्त्य आहेत. सूर्य चंद्र आणि इतर आकाशस्थ गोल यांचाहि एके दिवशीं शेवट होणारच. यांतील प्रत्येक वस्तूंत क्षणोक्षणीं बदल होत आहे. आज जेथें उंच पर्वत आपण पाहतों तेथें उद्यां कदाचित् खोल समुद्र होईल. जगांतील यच्चयावत् वस्तूंत प्रत्येक क्षणीं बदल होत आहे. परंतु ज्याला कोणत्याहि प्रकारचा बदल ठाऊक नाहीं, असा एक परमेश्वर मात्र आहे. आपण प्रत्येक क्षणीं बदलत आहों; पण जसजसे आपण परमेश्वराजवळ जाऊं तसतसें आपल्यांतील फरकाचें प्रमाण कमी कमी होत जाईल. ज्या सृष्टिनियमांच्या ताब्यांत राहून आज आपण गुलामांसारखे राबत आहों ते सृष्टिनियम आपला

दाब हळु हळु ढिला करूं लागतील. आपण परमेश्वराशीं एकरूप झालों ह्मणजे आपली गुलामगिरीची दशा संपून आपण विश्वनियमांचे धनी होऊं. गुलामगिरींतून निघून धनीपणाकडे जाण्याचा हाच मार्ग आहे.

आतांपर्यंत सांगितलेल्या मार्गानें आपण चालूं लागलों तर कोणाच्याहि मदतीवांचून आपणांस हा मार्ग आक्रमण करतां येईल. आपण वस्तुतः सर्वज्ञ आहों. आपला आत्मा स्वभावतःच परिपूर्ण असा आहे. परंतु सृष्टीच्या करड्या अंमलबजावणीनें तो परतंत्र आणि मूर्ख असल्यासारखा दिसतो. आपल्या पूर्ण ताब्यांत आलेल्या या आत्म्यावर सृष्टपदार्थ एकसारखें अज्ञानाचें झांकण घालण्याचाच जणूं काय उद्योग करीत आहेत! अशा स्थितींत आह्मी करावें तरी काय? वास्तविक विचार केला तर आपणांस कांहींच करावयास नको. जो स्वयं पूर्ण आहे, त्याला आणखी पूर्णत्व तें कशानें द्यावयाचें? सर्वज्ञाला कोणीं व कोणतें ज्ञान द्यावयाचें? पूर्णत्वावरचा पडदा दूर झाला कीं स्वतः पूर्ण असलेला आत्मा आपल्या स्वतःच्या संपूर्ण तेजानें प्रकाशेल. हें उत्तर जितकें सोपें वाटतें तितका अनुभवाचा मार्ग मात्र सोपा नाहीं.

आत्म्याला मूळची पूर्णावस्था प्राप्त करून देण्याकरितां आपणांला आपल्या आयुष्याच्या प्रत्येक क्षणाचा योग्य उपयोग करून घेतला पाहिजे. प्रत्येक क्षणीं आपणांस नित्यानित्यविवेक केला पाहिजे. धर्मज्ञानाकरितां इतक्या बंधनांची काय आवश्यकता आहे असें कोणी विचारील, तर त्यास उत्तर इतकेंच कीं परमेश्वरप्राप्तीचा मार्ग अनुभवाचा आहे. तो बुद्धिगम्य मार्ग नव्हे, हें नित्य लक्ष्यांत राहिलें पाहिजे. इंद्रियगम्य ज्ञानानें परमेश्वरप्राप्तीचा मार्ग दिसणें शक्य नाहीं. आपण कानानें जें कांहीं ऐकतों, डोळ्यांनीं पाहतों आणि बुद्धीनें जाणतों त्या ज्ञानानें परमेश्वरप्राप्ति होणार नाहीं. तर जें कांहीं आपण ऐकलें, पाहिलें अथवा जाणलें त्याचा प्रत्यक्ष अनुभव आपण आपल्या ठिकाणीं घेतला पाहिजे. आपण कितीहि धर्मपुस्तकें वाचलीं, जगांतल्या सर्व ग्रंथांचीं पारायणें केलीं तरी खऱ्या धर्मज्ञानाच्या एका शब्दाचाहि बोध आपणांस होणार नाहीं. सारा जन्म वादविवाद केला, तरी त्यामुळेंहि परमेश्वराची प्राप्ति न होतां तो अधिक दुरावण्याचा मात्र संभव आहे. सर्व विश्वांत अत्यंत बुद्धिमान् ह्मणविण्याजोगी बुद्धिमत्ता आपण संपादिली तरी परमेश्वरप्राप्तीच्या मार्गांत एक पाऊलहि पुढें पडणार नाहीं. जें बुद्धीच्या आवांक्यापलीकडे आहे, तेथें बुद्धि पोहोंचणार तरी कशी? आपल्या सर्व शिक्षणाची दिशा पाहिली तर बुद्धि प्रज्वलित करण्याकडे आहे.

अंतःकरणाच्या सात्विक वृत्ति जागृत करण्याकडे आपण केव्हांहि लक्ष्य देत नाहीं. पाश्चात्य संस्कृतींत जे कांहीं दुर्गुण आहेत त्यांत हा मोठा भयंकर दुर्गुण आहे. याचा परिणाम असा झाला आहे कीं, आह्मीं पूर्वीपेक्षां दसपट स्वार्थसाधु मात्र बनलों आहों. आज नाहीं उद्यां, पण या स्वार्थीपणाचे परिणाम आह्मांस खचित अवनतीस नेल्यावांचून राहणार नाहींत. यासाठीं आपल्या अंतःकरणाच्या सात्विक वृत्ती सदोदित जागृत राहतील, असे उपाय आपण योजिले पाहिजेत. जेथें बुद्धि आणि अंतःकरण यांचे मार्ग भिन्न असतात, तेथें बुद्धिगम्य मार्ग सोडून अंतःकरणदर्शित मार्गानें जाणें आपणांस परिणामीं अधिक हितावह आहे. एखादें सत्कर्म करावें अशी इच्छा उद्भवली कीं आपली बुद्धि जागृत होऊन निवडानिवड सुरू करते व तितक्यांत स्वार्थ प्रबल झाला, कीं, अंतःकरणाच्या सात्विकवृत्तीनें राम ह्मटलाच. एखाद्या दुबळ्याला मदत करावीशी इच्छा आपणांस झाली कीं बुद्धि ह्मणते, 'हा लुच्चा तर नसेलना? हा उद्योग कां करीत नाहीं? हा आळशी कां झाला?' अथवा याला सशास्त्र रूप द्यावयाचें ह्मटलें ह्मणजे 'आळशाला मदत कां करावी? त्यामुळें जगांत आळस वाढणार! लोकांना आपण उद्योगी केलें पाहिजे.' झालें. बुद्धीचा निश्चय झाला कीं तो मदतीस पात्र नाहीं. त्या दुबळ्याला पाहून अंतकरणांत उत्पन्न झालेल्या दयेचा प्राण गेला. मित्रांनो, अशावेळीं या बुद्धीच्या नादीं लागून आपण आपली फसवणूक मात्र करून घेतों. यःकश्चित् स्वार्थाला बळी पडून दयेचा खून करण्यास आपण उद्युक्त होतों. अत्यंत बुद्धिमानाला स्वप्नांतहि दिसणार नाहीं अशा ठिकाणीं पोहोंचण्याचें सामर्थ्य एकट्या अंतःकरणास मात्र आहे. जेथें परमेश्वराची व आपली प्रत्यक्ष भेट होते, त्या ठिकाणीं बुद्धि कधींहि पोहोंचूं शकणार नाहीं. तो अधिकार एकट्या अंतःकरणाचाच आहे. 'अल्लाकु मिला चाहे तो तूं मैंकुं बिसर जा। गर इष्कें लिये चाहे तो तूं शिरकुं बिसर जा॥' असा उपदेश साधुसंत आमच्या कानीं कपाळीं ओरडत आहेत. परमेश्वराचा प्रवेश बुद्धींत होत नसून अंतःकरणांत होय, अंतःकरणाची उत्तम वाढ झाली तर तुह्मी अतींद्रिय ज्ञान बोलूं लागाल. ज्याच्या प्रेम वाढतो. अंतःकरणानें ज्ञान जागृत होतें. आपण कोणाशीं अत्यंत त्यामुळें गोष्टी बोलत असतों, त्यावेळीं आपली बुद्धि कोठें असते, याचा विचार केलीं ज्यावर आपलें खरें प्रेम असतें त्याच्याशीं अमुक बोलावें कीं नाहीं, हा विचार आज कधीं तरी करतों काय? 'प्रीतीचिया बोला नाहीं पेस पाड। भलतसें गो़ड करूनी घेई॥' असा अनुभव आपणांस नित्य येत असतो. तेथें बुद्धि जागृत

झाली, कीं, ती प्रेमावर हत्यार धरते. बुद्धीचें काम फक्त निवडानिवड करण्याचें आहे. अंतःकरणाचें काम बुद्धीपलीकडे जाऊन परमेश्वराची भेट घेण्याचें आहे. यावर असा एक प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे कीं, बुद्धिमत्तेचें तेज आमच्या हरघडी प्रत्ययास येतें, आणि अंतःकरणाचें येत नाहीं. असा आमचा अनुभव असतां तुमचें ह्मणणें आह्मीं कां कबूल करावें? याचें उत्तर असें आहे कीं, बुद्धि रजोगुणप्रधान असल्यामुळें तिचें तेज अधिक उघड असतें. अंतःकरण सात्विक असल्यामुळें त्याचा प्रत्यय अंतर्वर्ती असतो. हा प्रत्यय इतरांस न आला तरी ज्याचा त्यास अनुभवानें समजतो. दुसरें असें कीं, अंतःकरणाच्या बाल्यदशेंत त्याचे गुण झांकल्यासारखे असतात. पण तेंच आपल्या पूर्ण तेजानें प्रकाशूं लागलें, कीं, आपणा सर्वांच्या उघड प्रत्ययासहि येतें. आजपर्यंतचे साधू पुरुष पाहिले तर त्यांच्यांत बुद्धीपेक्षां अंतःकरणाचीच वाढ निःसंशय अधिक दिसून येईल. सारें जग ज्यांनीं प्रकाशमान् करून सोडलें, त्यांनीं तें बुद्धीच्या बळावर केलें कीं अंतःकरणाच्या बळावर केलें, याचा आपल्या मनाशीं विचार करा. अत्यंत बुद्धिमान् मनुष्य एखादें भयंकर कृत्य करण्यास मागें पुढें पाहत नाहीं; पण अंतःकरणाची जागृति ज्याला प्राप्त झाली आहे, त्याच्या हातून कोणतेंहि वाईट कृत्य आजपर्यंत कधींही झालेलें नाहीं. यासाठीं परमेश्वरप्राप्ति आपणांस हवी असेल तर बुद्धीच्या वाढीपेक्षां अंतःकरणाची वाढ करण्याकडे आपण अधिक लक्ष्य पुरविलें पाहिजे. आपणांस शेवटीं जी स्थिति प्राप्त करून घ्यावयाची ती बुद्धीनें ास होणारी नसून अंतःकरणानें प्राप्त होणारी आहे, हें नित्य लक्ष्यांत बाळगलें ाहिजे. हें विश्वरूपी दूध आपण आपल्या रवीनें घुसळीत आहों. आपलें ज्ञान, द्धि, तारतम्यज्ञान आणि अंतःकरण हीं रवीच्या पाकळ्यांसारखीं आहेत. हें ध घुसळतां घुसळतां त्यांतून शेवटीं परमेश्वररूपी लोणी निघतें, तें अंतःकरणास ून खालीं राहिलेलें ताकाचें पाणी बुद्धीसाठीं शिल्लक उरतें.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनांत ज्या अनेक पायऱ्या दाखविल्या, त्या तुह्मांस ाप्त करून घेण्याकरितांच आहेत. परमेश्वरप्राप्तीसाठीं कसल्याहि प्रकारच्या शिक्षणाची अपेक्षा नाहीं. परमेश्वराला तुमच्या विद्वत्तेची आवड नसून तःकरणाची आवड आहे. एका साधु महाराजांनीं मला सांगितलें कीं, ऱ्याचा वध करावयाचा असला तर आपल्याजवळ बंदुक किंवा तरवार सारखें हत्यार असावें लागतें; पण आत्महत्या करावयास एखादी सुई सुद्धां पुरी होते. त्याच प्रमाणें ज्याला लोकशिक्षणाचें काम करावयाचें आहे, त्याला

बुद्धीचें हत्यार सज्ज करावें लागतें. स्वतःपुरतें ज्ञानवान् होण्यास बौद्धिक हत्याराची जरूर नाहीं." 'ज्यांचें अंतःकरण पवित्र आहे ते धन्य होत, कारण ते परमेश्वरास भेटतील ' असें बायबलांत सांगितलें आहे. तुमचें अंतःकरण जागृत नसेल, तर जगांत निर्माण झालेलीं सर्व शास्त्रें तुमच्या जिभेवर असलीं तरी तुह्मांस मुक्तीची पाऊलवाटहि दिसावयाची नाहीं. जगांतल्या सर्व ग्रंथांचा ढीग करून त्यांत तुह्मीं स्वतःस पुरून घेतलें, तरी त्यांचा तुह्मांस यत्किंचित्‌हि उपयोग होणार नाहीं. अंतःकरणानें दाखविलेल्या मार्गानें तुह्मी नीट गेलां तर योग्य ठिकाणीं तुह्मी बरोबर पोहोंचाल. बुद्धीला स्वप्नांतहि आढळून न येणाऱ्या गोष्टी अंतःकरणाला दिसतात. यासाठीं जी गोष्ट करावीसें अंतःकरणपूर्वक तुह्मांस वाटेल ती बिनदिक्कत करीत जा. त्याठिकाणीं तसें करण्यास तुमची तारतम्य बुद्धि आड आली तर तिच्या नादीं लागूं नका. एखादें परोपकाराचें कृत्य करावें असें अंतःकरणपूर्वक वाटलें, कीं बुद्धि पुष्कळ वेळां त्याच्या आड येते. असें करण्यानें अमक्याची मर्जी मोडेल, तमका रागावेल आणि तिसऱ्याला वाईट वाटेल असल्या गोष्टी तुमची बुद्धि तुह्मांस सांगूं लागते. पण असल्या गोष्टींना तुह्मी आपले कान बहिरे करा. अंतःकरणदर्शित मार्गानें तुह्मी गेलां, तर खरोखर तुमच्या हातून चुका अशा फारच थोड्या होतील. पवित्र अंतःकरण निर्मळ आरशासारखें आहे. निर्मळ आरशांत ज्याप्रमाणें कोणत्याहि वस्तूचें योग्य प्रतिबिंब पडतें, त्याच प्रमाणें शुद्ध अंतःकरणांत परमेश्वराचें प्रतिबिंब यथास्थित उतरतें. आतांपर्यंत जे अनेकविध उपाय सांगितले, ते चित्तशुद्धीसाठींच होत. अंतःकरण शुद्ध झालें कीं त्यांत त्याचक्षणीं परमेश्वराचें प्रतिबिंब दिसूं लागतें. एकंदर विश्वांत सत्य-स्वरूप ह्मणून जें कांहीं असेल त्याचा उदय शुद्ध अंतःकरणांत ताबडतोब होतो.

विश्वांतील वस्तु ज्या अणु-परमाणूंपासून बनल्या आहेत आणि ज्या नियमांन्वयें हें विश्व चालतें, त्याचा शोध कित्येक युगांपूर्वी ज्यांनीं लाविला, त्यांनीं दुर्बीण आणि सूक्ष्मदर्शकयंत्र डोळ्यांनीं पाहिलेंहि नव्हतें. रसायनशाला ह्मणजे काय, हें त्यांस स्वप्नांतहि कधीं कळलें नाहीं. असें असतां त्यांनीं हे सर्व शोध कशाच्या मदतीनें लावले? त्यांच्या शुद्ध अंतःकरणांत परमेश्वराचा उदय झाल्यामुळें त्यांस अगम्य असें कांहींच राहिलें नाहीं. त्यांनीं आपलीं अंतःकरणें शुद्ध केलीं होतीं. बुद्धीच्या वाढीसाठीं त्यांनीं खटपट केली नाहीं. तेंच करणें आपणांस आज अशक्य आहे काय? जगांत सुखाचा दिवस कधीं काळीं उगवणार असेल तर तो बुद्धिवर्धनानें खचित उगवणारा नसून अंतःकरणशुद्धीनेंच उगवणारा आहे.

विराम पावतील. आजपर्यंत हजारोंनीं परमेश्वराची प्रत्यक्ष भेट घेतली आहे. तुमची इच्छा असेल तर तुह्मांलाहि तो भेटेल; परंतु हें होण्यास तुमचीं इंद्रियें अथवा मनोमयादि कोश हे मात्र तुमच्या उपयोगीं पडणार नाहींत. या सर्वांच्या पलीकडे तुह्मांस गेलें पाहिजे. हें काम विसरूं नका, आणि मध्यंतरीं कोठेंहि थांबूं नका. आजपर्यंत युगानुयुगें जीं कर्में आपण केलीं आहेत, तीं पाशरूप होऊन आपणांस आपल्या मध्यबिंदूपासून लांब लांब ओढीत आहेत. यासाठीं आतांपर्यंत सांगितलेल्या मार्गांनें आपण चालूं लागलों ह्मणजे हे पाश हळू हळू ढिले पडतील आणि ते शेवटीं सर्वथा गळून पडले ह्मणजे आपण ज्या ठिकाणीं जाऊं तें ठिकाण आजपर्यंत कोणीं जागेपणीं, स्वप्नांत अथवा झोंपेंत पाहिलेलें नसून तें या अवस्थात्रयाच्या पलीकडे आहे. अशा स्थितींत आपण विचित्र भाषा बोलूं लागतों; आणि जग त्याला वेडयाची बडबड, असें नांव देतें. कल्पनातीत तत्वाची कल्पना जगाला कोठून असणार ? कल्पनातीत झालेला मनुष्य जगाच्या दृष्टीला वेडा दिसावा यांत नवल नाहीं. जगांत जो जो प्राणी जन्मास आला आहे, त्या प्रत्येकाला ही स्थिति प्राप्त होण्यासारखी आहे. चिखलांत लोळणारा किडाहि ही स्थिति एखादे दिवशीं प्राप्त करून घेईल. मुक्तीच्या मार्गांत कोणालाहि मज्जाव नाहीं. प्रत्येकाला केव्हांना केव्हां ही यशःप्राप्ति होईलच होईल. कित्येक वेळां आपणांस जबर ठेंचा लागतील आणि हातपाय मोडण्याचे प्रसंग येतील; पण शेवटीं 'अहं ब्रह्मास्मि' असें ह्मणण्याची वेळ खास येईल. ज्या आपल्या मूळरूपापासून आपण निघालों आहों, त्या मूळरूपास आपणांस परत जावयाचें आहे. हा मार्ग अखंड मंडलाकार आहे. सरळ रेषेला केव्हांच शेवट येणें शक्य नाहीं हें आपणांस ठाऊकच आहे. यासाठीं प्रत्येक प्राण्याची गति मंडलाकार आहे असा सिद्धांत आहे. मंडलाच्या एका बाजूला असतां एखादा प्राणी खालीं जातांना दिसला तरी तो दुसऱ्या बाजूस आल्यावर वर चढूं लागतो. याकरितां खालीं जाणें आणि वर येणें ही भाषा केवळ सापेक्ष आहे. मंडलाकार फिरणारा प्राणी वस्तुतः मागें अथवा पुढें जात नाहीं. ज्या बिंदूपासून त्याचा प्रवास सुरू झाला, त्याच बिंदूला पुन्हां येऊन मिळण्याची ती गति आहे. याकरितां सर्व एकाच प्रकारानें चालले असल्यामुळें हा क्षुद्र आणि तो मोठा असें ह्मणणें अशास्त्र नाहीं काय? ज्यापासून सर्व सृष्टि व्यक्त झाली, ज्याच्या अधिष्ठानावर तिचें अस्तित्व भासतें आणि ज्याकडे ती परत जात आहे, तेंच परमेश्वराचें स्वरूप.

विवेचकबुद्धि आणि धर्म.

[इंग्लंडांतील व्याख्यान.]

एकेवेळीं नारदऋषी सनत्कुमार मुनींकडे गेले. आपणांस ज्ञान सांगण्याविषयीं त्यांनीं त्यांची प्रार्थना केली. 'आपलें अध्ययन यापूर्वी कोठपर्यंत झालें आहे ?' असा प्रश्न सनत्कुमारांनीं विचारल्यावर नारद ह्मणाले, 'मी वेदपठन केलें आहे. ज्योतिषादि विद्यांचाहि अभ्यास मीं केला आहे; परंतु माझ्या चित्ताची तळमळ अद्यापि शांत होत नाहीं.' सनत्कुमार ह्मणाले, 'नारदा, तूं आजपर्यंत ज्या विद्यांचें अध्ययन केलेंस, त्या सर्व विद्या फारशा महत्वाच्या नाहींत. सर्व लौकिक विद्या आणि शास्त्रें यांचें महत्व आमच्या दृष्टीनें फारच कमी आहे. ज्या विद्येनें ब्रह्मानुभव होतो, तीच खरोखर विद्या या नांवाला पात्र आहे. तेंच खरें ज्ञान.' धार्मिकज्ञानाच्या महत्वाचें यांप्रमाणें वर्णन केलेलें सर्व धर्मांत आपणांस आढळून येतें. कोणत्याहि लौकिकविद्येपेक्षां धर्मज्ञान श्रेष्ठ आहे, असे उल्लेख सर्व धर्मग्रंथांत आढळून येतात. यामुळेंच धर्मज्ञान इतर शास्त्रांपासून आजपर्यंत अलग राहिलें आहे, एवढेंच नव्हे, तर इतर शास्त्रांचें ज्ञान त्यापुढें निर्माल्यवत् आहे, असें सांगण्याचा परिपाठ पडला आहे. लौकिकशास्त्राचा विस्तार केवढाहि मोठा झाला, तरी तो व्यवहारमर्यादेच्या बाहेर जात नाहीं; परंतु व्यवहारापलीकडे नेऊन सत्याशीं तुमची प्रत्यक्ष भेट घालावयाची असा धर्मशास्त्राचा बाणा असतो. धर्मशास्त्राचा हा अभिमान योग्य आहे; परंतु त्यामुळें एक मोठी वाईट गोष्ट झाली आहे. ती ही कीं, धर्मज्ञानानें लौकिकज्ञानास तुच्छता आणिली आहे. त्यामुळें धर्मप्रचारकांत इतर लौकिकविद्यांबद्दल तुच्छतादर्शक भाव उत्पन्न होतो; एवढेंच नव्हे तर कोणत्याहि लौकिक विद्येनें या प्रदेशाकडे ढुंकूनहि पाहूं नये व धर्म जें कांहीं सांगेल, त्याची प्रतीति लौकिकविद्येच्या मापानें न पाहतां तें खरें मानावें, असा धर्मप्रचारकांचा हट्ट असतो. लौकिकविद्येनें एखाद्या सिद्धांताचें प्रतिपादन केलें, तर त्यावर वाटेल तितकी भवति न भवति करण्याची परवानगी असते. आमच्या विचक्षकबुद्धीस तो सिद्धांत न पटला, तर तो कबूल केलाच पाहिजे असें नाहीं. परंतु धर्मसिद्धांताची गोष्ट याहून वेगळी आहे. धर्मानें एखादा सिद्धांत प्रतिपादन केला तर त्यावर प्रश्न विचारण्याची सोय नाहीं. सर्व जगभर हीच प्रवृत्ति आजपर्यंत दिसून आली आहे. यामुळें नवीं भौतिकशास्त्रें व जुनीं धर्म-

शास्त्रें यांजमध्यें लढाईचे प्रसंग वारंवार घडून येतात. धर्मशास्त्राला वाटतें, कीं, आपण उच्च प्रदेशींचे रहिवाशी. आपण म्हणूं तें इतर शास्त्रांनीं मुकाट्यानें मान्य करावें. त्यावर 'कां' हा प्रश्नहि विचारण्याची त्यांची योग्यता नाहीं. धर्मशास्त्राच्या एखाद्या सिद्धांतावर कोणीं आक्षेप घेण्याची छाती केलीच तर त्या विचाऱ्यावर धर्मलंड व नास्तिक असा शिक्का बसतो. परंतु भौतिकशास्त्रांचें हत्यार, धर्माला वाटतें तितकें बोथट नसल्यामुळें अनेक चकमकींत पराभव पावून आपला जीव गमावण्याचीहि पाळी धर्माला आली. इतिहासांत असे अनेक प्रसंग पूर्वी घडून आल्याचें नमूद केलें आहे; इतकेंच नाहीं तर आजमितीसहि अशा प्रकारच्या लहानसहान चकमकी सर्व देशांत चालू आहेत. फ्रेंच लोकांनीं राजसत्ता उलथून पाडून प्रजासत्ताक शासनपद्धति सुरू केली, तेव्हां विवेचकबुद्धीच्या नांवाखालीं तेथें केवढे अत्याचार झाले, हें इतिहासज्ञांस विदितच आहे. त्यावेळीं तेथें ख्रिस्ती धर्माचा लोप होऊन त्याच्या जागीं फ्रेंच लोकांनीं 'विवेचकबुद्धीची देवता' (Goddess of Reason) स्थापिली होती. ख्रिस्ती धर्मप्रचाराकांची अनिरुद्ध सत्ता लोकांनीं साफ झुगारून दिली होती. धर्माविरुद्ध हें बंड त्यावेळीं प्रथमच घडलें नसून त्या पूर्वींहि अनेक वेळां असले प्रकार झाले होते. फ्रान्स देशांतील बंडाचें स्वरूप अतिशय उग्र होतें, इतकेंच. सूक्ष्म विचार करतां सांप्रतकाळींहि धर्मशास्त्र आणि इतर भौतिकशास्त्रें यांजमधील भांडण बऱ्याच उग्र स्वरूपाचें आहे. धर्माच्या बाबतींत पूर्वीपेक्षां अधिक स्वतंत्रता असल्यामुळें सांप्रत रक्तपाताचे प्रसंग येत नाहींत हें खरें, पण त्यामुळें भांडणाचें स्वरूप कमी उग्र आहे, असें मात्र म्हणतां येत नाहीं. भौतिकशास्त्रांची युद्धसामग्री पूर्वीपेक्षां किती तरी पटीनें सुधारली आहे, आणि रोज नव्या शस्त्रास्त्रांची भर त्यांच्या शस्त्रागारांत पडत आहे. उलट धर्माची बाजू पाहतां ती मात्र अधिक लंगडी झाल्याचें आढळतें. भौतिकशास्त्रांनीं धर्माचा पाया बहुतांशीं पोखरून टाकला आहे. आपणांपैकीं बहुतेकांच्या अंतःकरणांत या गोष्टीची जाणीव आहे. एखाद्या सभेंत भाषण करतांना धार्मिकपणाचा आव घालणारे पुष्कळ लोक आढळतील; परंतु त्यांचें अंतःकरण त्यांच्या शब्दांचा कितपत अनुवाद करतें याचा त्यांनीं खऱ्या दिलानें खुलासा केला, तर त्यांतील बहुतेकांस नास्तिक म्हणवून घेण्याचाच प्रसंग येईल ! धार्मिकपणा आपल्या बुद्धीस शिकविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला तरी अनेक शास्त्रांच्या परिचयानें चवचाल झालेली त्यांची बुद्धि त्यांच्याशीं वाद घालूं लागते, त्याला ते काय करणार ! बुद्धि म्हणते, 'अमक्या तमक्यानें

सांगितलें ह्मणून, अथवा अमक्या तमक्या पुस्तकांत सांगितलें आहे म्हणून त्यांच्या म्हणण्यावर मीं आंधळ्यासारखा विश्वास कां ठेवावा ? दुसऱ्यांनीं अमुक एक मत खरें मानलें तरी तूं तें तसेंच मानलें पाहिजेस असें नाहीं ' असा वाद बुद्धीनें सुरू केला म्हणजे तिच्या मालकाची अगदीं त्रेधा उडते यांत नवल काय ? असा वादविवाद नेहमीं उपस्थित होऊं लागला ह्मणजे सध्याचे लोक कंटाळून विचाराची दिशाच सोडून देतात. अमुक एक गोष्ट खरी मानावी, तर आपली बुद्धि आड येते; खोटी मानावी तर लोकांच्या उपहासाच्या भीतीनें तसें करवत नाहीं. अशा प्रकारच्या दुहेरी पेंचांत सांपडलेला मनुष्य विचार करणेंच टाकून देतो, आणि ' रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति ' अशा रीतीची वागणूक करूं लागतो. यामुळें सांप्रतकाळीं धार्मिक ह्मणून ह्मणविणाऱ्या लोकांत वस्तुतः उदासीनांची संख्या वरीच आहे. धार्मिक बाबींचा सांगोपांग विचार न करतां निष्काळजीपणानें वागल्यामुळें त्यांच्या अंगीं धर्माबद्दल पक्की उदासीनता आली आहे. ही स्थिति अशीच राहिली तर धर्माची जुनी इमारत पाया पोकळ झाल्यामुळें, ढांसळून पडल्याशिवाय राहणार नाहीं. धर्ममार्गानें चालणें आपल्या हिताचें आहे अशी खात्री अंतःकरणपूर्वक न वाटेल तर धार्मिकपणाचें सोंग किती दिवस टिकेल ? आणि टिकलें तरी त्याचा उपयोग काय ? ही स्थिति बदलण्यास कांहीं उपाय योजणें अवश्य आहे. विवेचकबुद्धीच्या भट्टींत तावून घेऊन भौतिकशास्त्रें ज्याप्रमाणें आपलें सत्यत्व प्रत्यक्ष सिद्ध करतात, त्याप्रमाणें स्वतःचें खरेपण त्या भट्टींतून निघून सिद्ध करण्याची धर्मशास्त्राची तयारी आहे कीं नाहीं, हा सध्या मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे; आणि या प्रश्नाच्या समाधानकारक उत्तरावर धर्माचें पुढील अस्तित्व अवलंबून आहे. ज्याप्रमाणें भौतिकशास्त्रांतील प्रत्येक सिद्धांताची सत्यता आपण प्रत्यक्ष अनुभवानें सिद्ध करतों, त्याचप्रमाणें धर्मप्रतिपादित सिद्धांतांची सत्यता सप्रमाण सिद्ध न होईल तर ते सिद्धांत भोळेपणानें आणि भाविकपणानें खरे मानणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस कमी होणार असा सध्याचा काळ आहे. माझ्या मतें धर्मशास्त्रानें हा मार्ग शक्य तितक्या लवकर स्वीकारावा हें बरें. बुद्धीच्या प्रखर भट्टींत तापविल्यामुळें जर धर्माचा निःपात झाला, तर तो मुळांतच हिणकस होता, असें आपोआप सिद्ध होईल. असलें हिणकस शास्त्र समूळ नाश पावलें तर त्यांत नुकसान तरी काय आहे ? तें जितकें लवकर नाश पावेल तितकें बरें, असें मला वाटतें. धर्मशास्त्रांत जें कांहीं सत्य असेल त्याचा नाश कधींहि आणि कशानेंहि होणार नाहीं. त्यांत कांहीं हीन द्रव्य

मिश्र झालें असेल तर तें मात्र विवेचकबुद्धीच्या भट्टींत जळून जाईल. भट्टी निवून गेली ह्मणजे तींत बावनकशी सोनें मात्र उरेल. असें करण्यापासून धर्माची कोणत्याहि प्रकारची हानी नसून त्याचें स्वरूप अधिक उज्ज्वल मात्र होईल. पदार्थविज्ञान अथवा रसायनशास्त्र यांची सिद्धि जशी प्रत्यक्ष प्रमाणानें होते, त्याचप्रमाणें धर्मंहि प्रमाणसिद्ध शास्त्र होईल; एवढेंच नव्हे, तर त्याची योग्यता भौतिकशास्त्रांहून निखालस वरच्या दरज्याची ठरेल. कर्मेंद्रियांपेक्षां ज्ञानेंद्रियांची योग्यता जशी निःसंशय अधिक आहे, त्याचप्रमाणें जड भौतिकशास्त्रांपेक्षां ज्ञानप्रधान धर्मशास्त्राची योग्यता आपोआपच अधिक ठरेल. भौतिकशास्त्रांची सिद्धि केवळ इंद्रियांच्याच आधारावर अवलंबून आहे; पण धर्मशास्त्राची सिद्धि त्यापलीकडे जाऊन तुमच्या अंतरात्म्याची भेट घेते, व ह्मणूनच त्या शास्त्राची सिद्धि अधिक योग्यतेची व अधिक आवश्यक आहे.

विवेचकबुद्धीच्या ताजव्यानें धर्म जोखणें मूर्खपणाचें आहे, असें ह्मणणाऱ्या लोकांस ते काय बोलतात, हें त्यांचें त्यांसच समजत नसतें. आपण असें समजूं कीं, एक ख्रिस्तानुयायी आणि एक मुसलमान यांजमध्यें धर्माच्या श्रेष्ठतेबद्दल वाद झाला. ख्रिस्ती ह्मणतो, 'माझा धर्म खुद्द परमेश्वरानें येशूस सांगितला.' मुसलमान ह्मणतो, 'माझाहि धर्म ईश्वरप्रणितच आहे.' यावर ख्रिस्ती ह्मणतो, 'तुझ्या धर्मपुस्तकांत कित्येक खोट्या गोष्टी लिहिल्या आहेत. उदाहरणार्थ, प्रत्येक मनुष्याला जुलमानेंहि मुसलमान करावें व तो मुसलमान न झाला तर त्यास ठार मारावें. त्याला मारणारा मुसलमान कितीहि पापी असला तरी त्याला स्वर्ग मिळेल, असें तुझ्या धर्मपुस्तकांत सांगितलें आहे.' मुसलमान ह्मणतो, 'माझ्या धर्मपुस्तकांत सांगितलें तें बरोबर आहे.' ख्रिस्ती पुन्हां प्रत्युत्तर करतो, 'माझ्या धर्मपुस्तकांत तसें सांगितलें नाहीं, त्या अर्थी तें खोटें आहे.' मुसलमान ह्मणतो, 'तुझ्या पुस्तकांत काय सांगितलें आहे तें पाहण्याची मला गरज नाहीं. सर्व काफरांस ठार मारावें असें जें माझ्या पुस्तकांत सांगितलें आहे, तें खोटें असें ह्मणण्यास तुला तरी काय अधिकार आहे? तूं जसें ह्मणतोस कीं, ख्रिस्तानें सांगितलें तें बरोबर, तसेंच मीहि ह्मणतों कीं, माझें पुस्तक अल्लानें लिहिलें आहे ह्मणून तें बरोबर आहे.' परंतु अशा प्रकारच्या प्रश्नोत्तरांनीं त्या दोघांचेंहि समाधान न होतां ते परस्पर धर्मांची तुलना करावयास पाहतात. कुराणांतील नीतितत्वें अधिक श्रेष्ठ कीं बायबलांतील तत्वें श्रेष्ठ याबद्दल त्यांच्यांत वाद सुरू होतो. पण या वादाचा निकाल कोणीं लावावयाचा हा महत्वाचा

प्रश्न आहे. या ठिकाणीं त्या दोघांचा परस्परांच्या धर्मपुस्तकांवर विश्वास नसल्यामुळें पुस्तकांचें वचन निरुपयोगी होतें. ह्मणजे या वादाचा निकाल लावण्याचें काम दोघांच्याहि विवेचकबुद्धीकडे आपोआप येतें. यावरून एक गोष्ट निःसंशय सिद्ध होते, ती ही कीं, कोणत्याहि धर्मपुस्तकांपेक्षां अधिक बलवान् अशी शक्ति असून तिचा निकाल आपणा सर्वांस मान्य होण्यासारखा असतो. एखाद्या धर्मपुस्तकावर आपला विश्वास नसला तरी त्यांतली एखादी गोष्ट आपल्या विवेचकबुद्धीस पटली ह्मणजे आपण निमूटपणें ती मान्य करतों. वस्तुतः ज्याला आपण विश्वास असें ह्मणतों तोहि विवेचकबुद्धीच्या संमतीनेंच उत्पन्न झालेला असतो; मग ही वस्तुस्थिति आपल्या लक्ष्यांत आली असो अथवा नसो. आतां येथें एक प्रश्न उद्भवतो, तो असा कीं, दोन महात्म्यांनीं दोन निरनिराळीं अथवा विरोधी वचनें सांगितलीं असतां त्यांचें परीक्षण करून त्यांत बरें वाईट ठरविण्याचें सामर्थ्य आमच्या तारतम्यबुद्धीस आहे कीं काय ? त्याचप्रमाणें धर्मासारख्या केवळ इंद्रियातीत शास्त्राची परीक्षा करण्याचें सामर्थ्य तिला आहे कीं काय ? आमच्या तारतम्यबुद्धीला जर हें सामर्थ्य नसेल तर अनेक धर्ममतांच्या भांडणांत शेवटला निकाल देण्याचें तिच्यानें होणार नाहीं. एवढेंच नव्हे, तर या निरनिराळ्या धर्ममार्गांची कधीं कालीं तरी एकवाक्यता होईल ही आशाच नको. धर्मशास्त्रांची सत्यता आमच्या तारतम्यबुद्धीनें पटण्यासारखी नसेल तर धर्मशास्त्रें ह्मणजे वेड्याची बडबड आणि भाराभर खोट्यानाट्या गोष्टींचे गाबाळग्रंथ याहून त्यांची कांहीं अधिक किंमत आपणांस वाटणार नाहीं.

मानवी अंतःकरणाच्या विकासाचें धर्म हें फळ आहे. ज्याप्रमाणानें अंतःकरण विकास पावूं लागलें त्याप्रमाणानें धर्ममार्ग रूढ होत गेले. अशी वस्तुस्थिति असल्यामुळें धर्माचें प्रामाण्य पुस्तकांवरून ठरवावयाचें नसून अंतःकरणानें ठरवावयाचें आहे. पुस्तकें हीं मनुष्यांच्या अंतर्वृत्तींच्या विकासाचीं. दृश्य स्वरूपें होत. मनुष्याच्या अंतःकरणाची वाढ पुस्तकांस अनुसरून होत नाहीं. तर अंतःकरणाच्या वाढीस अनुसरून पुस्तकें निर्माण झालीं आहेत. मानवी अंतःकरणाची वाढ हें कारण, आणि ग्रंथ हें कार्य आहे. स्वतः कारणरूप होऊन अंतःकरणाचा विकास हें कार्य करणारे ग्रंथ निर्माण झाले नाहींत. ज्याप्रमाणें ग्रंथ, हें मानवी अंतःकरणाच्या विकासाचें कार्य आहे, त्याप्रमाणेंच विवेचकबुद्धि ही सुद्धां त्याच अंतःकरणाच्या विकासाचें कार्य आहे. यामुळेंच, समजून अथवा न समजतांहि, आपण आपली कृति आपल्या तारतम्यबुद्धीस अनुसरून असावी-

अशी इच्छा करीत असतों. यासाठीं धर्मशास्त्राचें प्रामाण्यहि आपल्या विवेचक-बुद्धीस अनुसरून ठरविणें हें हानिकारक नाहीं.

आतां तारतम्य बुद्धि ह्मणजे काय, हें प्रथम पाहिलें पाहिजे. भौतिकशास्त्रांच्या शोधांमुळें व्यवहारामध्यें ज्या सिद्धांतांचा प्रत्यक्ष अनुभव आपणांस होतो त्याच सिद्धांतांनीं धर्मशास्त्राच्या सिद्धांतांचें प्रामाण्य ठरविणें, असा तारतम्यबुद्धीचा अर्थ अलीकडच्या सुशिक्षित स्त्रीपुरुषांस मान्य झाला आहे. हाच अर्थ मान्य करून आपण पुढें विचार करूं. कोणतीहि एखादी गोष्ट घडली तर ती तशी कां घडली, याचा विचार आपण करूं लागलों ह्मणजे तशाच प्रकारच्या दुसऱ्या अनेक कार्यांशीं ती विशिष्ट गोष्ट आपण आपल्या मनांत ताडून पाहतों. या अनेक कार्यांचीं अमुक कारणें ह्मणून आपल्या बुद्धीचा पूर्वींच निश्चय झालेला असतो. त्याप्रकारच्या कारणांशीं सदृश असें एखादें कारण, विचारार्थ हातीं घेतलेल्या गोष्टीच्या मुळाशीं आढळलें तर आपलें समाधान होतें. ह्मणजे अमुक कारणामुळें अमुक गोष्ट घडली, असा आपल्या तारतम्यबुद्धीचा निश्चय झाला, कीं आपलें समाधान होतें. एका गोष्टीचा कार्यकारणभाव, तिच्याशीं सदृश अशा दुसऱ्या अनेक गोष्टींवरून आपण ठरवितों. अशाच रीतीनें हें विचाराचें क्षेत्र वाढवून, आपण अमुक नियम विश्वव्यापी आहे असें ह्मणतों. अशा अनेक प्रकारच्या कार्यपरंपरा पुनःपुनः पाहून त्यांवरून आपण जे नियम आपल्या मनांत बांधून ठेविले आहेत, त्यांस अनुसरूनच एखादी विशिष्ट गोष्ट घडली असें आपणांस समजलें ह्मणजे आपलें समाधान होतें. एखादी गोष्ट घडलेली आपण पाहिली, व ती आपल्या चित्तांत ठरविलेल्या नियमांस अनुसरून घडली नाहीं असें आपणांस वाटत असतें तोंपर्यंत आपल्या चित्तांत असमाधान असतें; परंतु ती गोष्ट पूर्वींच्या अनेक गोष्टींस विसदृश नाहीं, असें आपणांस कोणीं दाखवितांच आपलें समाधान होतें. झाडावरून सुटलेलें एक फळ खालीं पडतांना पाहून न्यूटनचें चित्त बावरलें; पण प्रत्येक निराधार वस्तु पृथ्वीवर पडते हें त्याच्या लक्ष्यांत आल्याबरोबर प्रत्येक निराधार वस्तूस पृथ्वी आपल्याकडे ओढते, हा नियम आहे असें तो ह्मणूं लागला. असें होणें हा नियम आहे--कायदा आहे, असें त्यास वाटल्याबरोबर त्याचें समाधान झालें. मानवीज्ञानाचें हें एक तत्वच आहे. रस्त्यांत एखादा मनुष्य मीं पाहिला ह्मणजे एकंदर मनुष्यजातीशीं त्याचें साम्य मी आपल्या चित्तांत ताडून पाहतों आणि ही व्यक्ति मनुष्य आहे असा माझ्या चित्ताचा निश्चय होतो. रोजच्या संवयीनें ही क्रिया

इतक्या जलद होते कीं, तिचे निरनिराळे दुवे आपल्या लक्ष्यांत येत नाहींत. परंतु एखादा ताडमाडाइतका उंच अथवा अत्यंत ठेंगणा असा मनुष्य आपण पाहिला तर आपणांस एकदम हंसूं येतें; याचें कारण काय? याचें कारण इतकेंच कीं मनुष्यप्राण्याची जी प्रतिमा आपण आपल्या चित्तांत दुसरीं अनेक मनुष्यें पाहून ठरविली होती, त्या प्रतिमेशीं विसदृश असें स्वरूप पाहिल्याबरोबर तें नियमाविरुद्ध वाटून आपणांस हंसूं येतें. अशा रीतीनें एका गोष्टीचें. प्रामाण्य अनेक गोष्टींवरून, व त्या अनेक गोष्टींचें प्रामाण्य त्यांहून कित्येक पटीनें अधिक गोष्टींवरून आपण ठरवीत असतों व हें क्षेत्र अत्यंत वाढून शेवटीं आपण विश्वव्यापी नियमांची रचना करतों. आपल्या मनांत ही क्रिया सदोदित चालू असते. अशाच रीतीनें अनंत अस्तित्वाची कल्पना आपल्या चित्तांत ग्रथित झाली आहे. विश्वाच्या अस्तित्वाची कल्पना ही आपल्या कल्पनाशक्तीची परमावधि आहे. आपण एका मनुष्याविषयीं कल्पना केली कीं, तो विशिष्ट मनुष्य मनुष्यजातीच्या समष्टीपैकीं एक व्यष्टी आहे, अशी कल्पना आपल्या मनांत येते. मनुष्य, मांजर आणि कुत्रें अशा निरनिराळ्या जातींच्या व्यष्टींविषयीं विचार आपल्या मनांत आला ह्मणजे समष्टीविषयींची आपली पूर्वीची कल्पना अधिक विस्तृत होऊन एकंदर सचेतन प्राणिजातीच्या समष्टीपैकीं या व्यष्टि आहेत असें आपण मनांत ठरवीत असतों. एका मनुष्याविषयीं विचार करतांना केवळ मनुष्यजातीची समष्टि आपल्या चित्तांत होती, तीच विस्तृत होऊन एकंदर सचेतन प्राणीवर्ग ही समष्टि झाली. आतां मनुष्य, मांजर, कुत्रें आणि झाड यांविषयीं विचार येतांच सचेतन आणि अचेतन अशा जीवांची कल्पना चित्तांत उद्भूत होऊन आपल्या चित्तांतील समष्टि पूर्वीहूनही अधिक विस्तृत होते. हे सर्व प्राणी आणि यांजबरोबरच इतर जडपदार्थांची कल्पना आपल्या चित्तांत येतांच आपली समष्टींची कल्पना अत्यंत विस्तार पावून ती विश्वरूप होते. या एकंदर विवेचनावरून मुख्य ध्यानांत ठेवण्याचा मुद्दा हा कीं, एखाद्या विशिष्ट गोष्टीविषयीं आपण विचार करूं लागलों कीं, तिजशीं सदृश अशा आपल्या चित्तांतील अनेक गोष्टींशीं तिची आपण तुलना करीत असतों. एखाद्या कपाटाला ज्याप्रमाणें अनेक लहान लहान खण असतात व त्यांत ज्याप्रमाणें निरनिराळ्या प्रकारच्या वस्तु सांठविलेल्या असतात, त्याचप्रमाणें आपलें मन जणूं एक विश्वव्यापी कपाट असून त्यांत अनेक प्रकारच्या चिजा आपण सांठवून ठेविल्या आहेत. बाह्य जगांतील एखादी गोष्ट पाहून तिजविषयीं विचार आपल्या चित्तांत उद्भूत झाल्याबरोबर हे खण उघडून तुलनेची

क्रिया सुरू होते. तिच्याशीं सदृश अशी वस्तु लवकर सांपडली कीं आपलें समाधान होतें व ती पाहिलेली वस्तु अमुक आहे, असें ज्ञान आपणांस झालें असें आपण ह्मणतों. परंतु तिच्याशीं सदृश अशी वस्तु आपल्या मनांत लवकर सांपडली नाहीं ह्मणजे आपलें चित्त क्षुब्ध होतें व ती वस्तु सांपडेपर्यंत आपणांस खरें समाधान प्राप्त होत नाहीं. अशावेळीं आपल्या मनाचा कोनाकोंपरा धुंडाळण्याची आपली क्रिया चालू असते व जरूरीची वस्तु मिळाल्याबरोबर आपलें समाधान होतें. ज्ञान होणें ह्मणजे बाह्यवस्तूशीं सदृश अशी वस्तु आपल्या चित्तांत सांपडणें असें आहे, हें आपल्या लक्ष्यांत आलें असेलच.ज्ञान होणें या क्रियेचें आणखीहि एक स्वरूप आहे. आकाशांत मेघांचा गडगडाट झाला ह्मणजे त्याचें कारण विचारलें तर मुलें ह्मणतात 'ह्मातारी हरभरे भरडते' किंवा 'लढाई करणारे राक्षस आरोळ्या मारतात.' परंतु हें उत्तर बालबुद्धीसच शोभणारें आहे, हें उघड आहे. कोणतीहि क्रिया घडली तर तिचा संबंध दृश्य कर्त्याशीं जोडल्याशिवाय बालबुद्धीचें समाधान होत नाहीं. कोणत्याहि क्रियेचें एखादें अंतर्वर्ती कारण असूं शकेल ही गोष्ट अल्पबुद्धीच्या लक्ष्यांत न आल्यामुळें त्या क्रियेचें कारण एखाद्या प्रत्यक्ष कर्त्याकडे जोडण्याचा कल होतो.परंतु बुद्धीची प्रगल्भता वाढत गेली ह्मणजे अशा प्रकारच्या कारण-कार्यांनीं तिचें समाधान होणें शक्य नसतें. प्रत्येक क्रियेचें कारण बाह्य कर्त्याकडे नसून तें त्या क्रियेंतच असतें व तें शोधून काढीपर्यंत प्रगल्भबुद्धीचें समाधान होत नाहीं. झाडावरून सुटलेलें फळ खालीं कां पडलें याचें उत्तर 'अदृश्य राक्षसानें तें खालीं ओढलें' असें दिलें असतें तर तेवढ्यानें न्यूटनच्या प्रगल्भबुद्धीचें समाधान होणें शक्य नव्हतें. यामुळें त्याचें कारण त्या फळांतच कोठें तरी शोधण्याकडे तिची प्रवृत्ति आपोआपच झाली. दुसऱ्या पदार्थास ओढण्याची शक्ति प्रत्येक पदार्थांत असते हें अंतर्वर्ती कारण सांपडतांच न्यूटनच्या प्रगल्भबुद्धीचें समाधान झालें. यावरून ज्ञान ह्मणजे क्रियेचें अंतर्गत कारण शोधून काढणें असें आहे. भौतिकशास्त्रांची सर्व वाढ याच व्याख्येस अनुसरून झाली आहे. अनेक पदार्थांचें पृथक्करण करून त्यांचें मूलरूप शोधून काढण्याच्या प्रयत्नांत एखाद्या रसायनशास्त्रज्ञाला राक्षसाचें किंवा भुताचें साहाय्य घ्यावें लागत नाहीं. त्याचें सर्व लक्ष्य वस्तुगत कारणें शोधण्याकडे वेधलेलें असतें. अनेक प्रकारांनीं दृश्यमान होणाऱ्या शक्तीच्या क्रियांचीं कारणें, पदार्थविज्ञानशास्त्री त्या क्रियांतूनच शोधून काढतो. त्याला बाह्य कारणें अथवा उपकरणें शोधण्याचें कारण पडत नाहीं. यावरून आपल्या चिकित्सकबुद्धीचें समाधान ज्ञानानें होतें, असें आपण

ह्मणतों, त्याची शास्त्रीय व्याख्या काय आहे, याचा तुह्मांस उलगडा झालाच असेल. धर्मशास्त्रालाहि हीच कसोटी लावून त्याचें प्रामाण्य सिद्ध करा, असें आव्हान अर्वाचीन जग आह्मांस करूं लागलें आहे. धर्मशास्त्राला जगण्याची इच्छा असेल तर त्यानें या आव्हानाचा आनंदानें स्वीकार करून त्यास प्रत्युत्तर दिलें पाहिजे. आजपर्यंत धर्मशास्त्रानें या आव्हानाची निवळ अवहेलना केल्यामुळेंच सांप्रतची दुर्दशा त्यास प्राप्त झाली आहे. भौतिकशास्त्रांच्या प्रचंड तोफखान्यानें त्याच्या किल्ल्यास जागोजाग मोठालीं खिंडारें पाडलीं आहेत. क्रियागत अथवा पदार्थगत कारणें शोधून काढून त्यांची उपपत्ति लावण्याकडे प्रत्येक भौतिकशास्त्राचा कल असतां धर्मशास्त्रानें मात्र या मार्गाची उपेक्षा केली. धर्मशास्त्राचा अगदीं आरंभापासूनचा इतिहास पाहिला तर जगच्चालक ह्मणून एक सर्व शक्तिमान् प्राणी या विश्वाच्या बाहेर राहून विश्वकार्य करतो, ही कल्पना अगदीं जुन्या काळापासून रूढ झाल्याचें आढळून येतें. विश्वाच्या बाहेर राहून केवळ स्वतःच्या इच्छाशक्तीनें विश्व निर्माण करून त्याचें नियमन करणारा कोणी तरी आहे, असें मानल्यावांचून अनेक प्रश्नांचा समाधानकारक निकाल लागतच नाहीं, अशा प्रकारच्या सिद्धांताचें चर्वितचर्वण धर्मशास्त्र आजपर्यंत करीत आलें आहे. हा सिद्धांत सांगण्यांचे प्रकार अनेक असतील, तथापि हाच सिद्धांत पुनःपुनः सांगण्याचा धर्मशास्त्राचा हट्ट आहे. यानंतर, विश्वाबाहेर राहून विश्वाचें नियमन करणाऱ्या या परमेश्वरावर दुसऱ्याहि कांहीं गुणांचा आरोप करण्यांत आला. तो परमदयाळू आहे असेंहि सांगण्यांत येऊं लागलें; पण तो दयाळू असतांहि दुःख आणि असमता यांचा वास जगांत असल्याचें प्रत्येकक्षणीं आपल्या अनुभवास येतें. धर्मशास्त्राचें सोपपत्तिक विवेचन करूं पाहणाऱ्या तत्वज्ञाचा असल्या प्रकारच्या गोष्टींशीं वास्तविक कांहीं संबंध असण्याचें कारण नाहीं; पण विश्वबाह्य परमेश्वराची कल्पना प्रथमपासूनच त्याच्या चित्तावर ठसविली गेली असल्यामुळें असमता वस्तुगत असून परमेश्वराकडे तिचा दोष नाहीं असें तो ह्मणूं लागला. पण या उत्तरानेंहि समाधान होण्यासारखें नाहीं हें उघड आहे. जर प्रत्येक वस्तु परमेश्वरानेंच निर्माण केली आणि जर तो दयाळू आहे, तर असमता आणि तज्जन्य दुःख यांची उत्पत्ति कां व्हावी, हा प्रश्न शिल्लकच राहतो. या विश्वाचें मूळ कारण काय ? या प्रश्नाला ईश्वराची मर्जी असें उत्तर तो देऊं लागला. परमेश्वराचें वास्तव्य कोठें आहे, हा प्रश्न येथें आपोआपच उपस्थित होतो. त्याला त्याचें उत्तर असें आहे कीं, तो विश्वाच्या बाहेर राहून विश्व चालवितो ! झाडावरून सुटलेलें फळ कां पडलें, या प्रश्नाला

'जमिनीवरील अदृश्य भुतानें तें खालीं ओढलें.' अशा उत्तराच्या मासल्याचेंच वरील उत्तर आहे. निराधार वस्तू पृथ्वीवर कां पडतात, याचें अधिक समाधानकारक उत्तर दिल्यामुळें पदार्थविज्ञानशास्त्राची वाढ झाली आणि धर्मशास्त्रानें हें उत्तर देण्याची टाळाटाळ केल्यामुळें त्याची पिछेहाट झाली.

प्रत्येक क्रियेचें कारण बाह्य पदार्थांवर अवलंबून नसून त्या त्या क्रियेच्या अंतरंगांतच असतें व तें शोधून काढलें पाहिजे, अशी प्रवृत्ति भौतिकशास्त्रांनीं रूढ केल्यानंतर उत्क्रांतिवाद अस्तित्वांत आला. उत्क्रांतिवाद हा या प्रवृत्तीचेंच साक्षात् फल आहे. प्रत्येक पदार्थ आपल्या पूर्वींच्या स्थितीचेंच रूपांतर आहे, हा उत्क्रांतिशास्त्राचा मूलभूत सिद्धांत आहे. उदाहरणार्थ, ऊंस हा गवताच्या काडीपासून निर्माण झाला असें उत्क्रांतिशास्त्राचें मत आहे. या उदाहरणांत गवताच्या काडीचे जे घटक आहेत, त्यांचेंच परिस्थितीनें रूपांतर होऊन, त्यांना उंसाचें स्वरूप प्राप्त झालें, असें उत्क्रांतिशास्त्राचें मत आहे. ह्मणजे गवत हें कारण आणि ऊंस हें कार्य असें असून कारणाचेंच रूपांतर, परिस्थितीमुळें कार्यांत झालें. कारण आणि कार्य यांचे घटक भिन्न नसून परिस्थतीमुळें त्यांच्या दृश्य स्वरूपांत मात्र फरक पडतो व आपण एकाला कारण आणि दुसऱ्याला कार्य अशीं वेगळीं नांवें देतों, इतकेंच. हा उत्क्रांतिशास्त्राचा मूलभूत सिद्धांत आहे. दृश्य कार्यांचे सर्व घटक सूक्ष्म रूपानें कारणांतच वास करीत असून अनुकूल परिस्थितीमुळें तेच घटक दृश्य स्वरूपास येऊन कारणच कार्यरूप होतें. यावरून जे पदार्थ आज अस्तित्वांत आल्याचें दिसत आहे, ते नवीन उत्पन्न झाले नसून पूर्वींच्या सूक्ष्म घटकांचीं रूपांतरें मात्र आहेत, असें सिद्ध झालें. याचा अर्थ असा आहे कीं, विश्वांतील प्रत्येक कार्य, पूर्वींच्याच कारणाचें परिस्थित्यनुरूप झालेलें रूपांतर आहे. एकंदर विश्वांत हीच कारणकार्यपरंपरा चालू असून तिचें कारण शोधण्यास आपणास विश्वाच्या बाहेर जावयास नको. सर्व कारणकार्यें विश्वांतर्गत आहेत. अनेक वस्तू आणि परिस्थिती यांचें कारण विश्वबाह्य नसून त्या त्या वस्तूंत व परिस्थितींत अंतर्भूत झालेलें आहे. या गोष्टी उत्क्रांतिशास्त्रानें सिद्ध केल्यामुळें जे धर्म विश्वबाह्य परमेश्वराचें अस्तित्व मानतात, त्यांचें महत्व आपोआपच कमी होऊन, ते ढांसळवायास सुरवात झाली.

भौतिकशास्त्राचे सिद्धांत मान्य करूनही स्वतःचे सिद्धांत अबाधित आहेत असें दाखविणारा एखादा धर्म असेल, तर त्याची जरूर सध्याच्या काळीं आहे. ज्ञान या शब्दाची वास्तविक व्याख्या काय आहे, याचें विवेचन आपण नुकतेंच केलें आहे. ज्ञानाच्या त्या व्याख्येस, व उत्क्रांतिशास्त्रांच्या तत्वांस जुळणारा

असा एखादा धर्म असला तर भौतिकशास्त्रांच्या माऱ्यानें त्याची इमारत मोडकळीस येणार नाहीं; एवढेंच नव्हे, तर उलट तिला दुजोरा मात्र मिळेल. वेदांत धर्मानें वरील दोन्ही अटी पाळून आपला मार्ग काढिला आहे असें आढळून येतें. सनातनधर्मांत 'ब्रह्म' ह्मणून जें सांगितलें आहे, तेंच भौतिकशास्त्रें आज सिद्ध करूं पाहत आहेत. अनेक प्रकारच्या कारणकार्यपरंपरांचा शोध करतां करतां आपणांस 'ब्रह्म' हेंच शेवटचें कारण सांपडतें. तें गुणविशिष्ट नाहीं. तें अमुक असें दाखवितां येत नाहीं अथवा पाहतांहि येत नाहीं. तें गुणातीत आहे. त्यामुळें फार तर, त्याला 'अस्तित्व' इतकीच संज्ञा लावितां येईल. अस्तित्वाची कल्पना आली कीं तिजबरोबर प्रकाशरूप ज्ञानाची व आनंदाची कल्पना आलीच. ह्मणून 'ब्रह्म' याची व्याख्या 'सच्चिदानंद' एवढीच आहे. जगांत दृष्टीस पडणाऱ्या सर्व पदार्थांस नाम–रूप आहे. हें नाम–रूप नष्ट झालें तरी त्यांचें अस्तित्व राहील असें भौतिकशास्त्रांनीं सिद्ध केलें आहे. कोणत्याही वस्तूचा संपूर्ण नाश कधींच होत नसून (nothing is lost) फक्त रूपांतर मात्र होतें. यामुळें दृश्य रूप नष्ट झालें, तरी अस्तित्व राहणारच हें उघड आहे. या अस्तित्वाला 'अमुक प्रकारचें अस्तित्व' अशा प्रकारची कांहीं संज्ञाहि देतां येणार नाहीं. अशा प्रकारच्या केवलस्वरूपाच्या अस्तित्वापलीकडे आपल्या मनाची धांव जाऊं शकत नाहीं. अस्तित्वाच्या कल्पनेची ही शेवटली पायरी होय. ब्रह्म याचें दुसरें स्वरूप ज्ञान हें आहे. येथें ज्ञान या शब्दानें आपलें सामान्य व्यावहारिक ज्ञान असा बोध होत नाहीं हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. ज्ञान ह्मणजे अस्तित्वाची जाणीव होण्यापुरतें चैतन्य एवढेंच समजावयाचें. ज्याप्रमाणें केवलस्वरूपाचें अस्तित्व गुणातीत–किंबहुना कल्पनातीत–आहे, त्याचप्रमाणें केवलस्वरूपाचें ज्ञान अथवा चैतन्यहि कल्पनातीत आहे. विश्वांतील वस्तूंत अनंत भेद दिसत असतांहि त्यांच्या अंतर्यामीं अस्तित्वाची आणि चैतन्याची एकतानता आहे हें आपल्या प्रत्ययास येतें. वस्तूंत अनेक रूपांतरें झालीं तरी ती नष्ट होत नाहीं, असा सिद्धांत असल्यामुळें अस्तित्वाची आणि चैतन्याची एकतानता आपोआपच सिद्ध होते. वस्तूंचें रूपांतर झालें तरी तो फरक केवळ बाह्यतः होणारा असल्यामुळें अंतस्थ चैतन्य आणि अस्तित्व यांस बाध येत नाहीं. अनेक प्रकारचीं भौतिकशास्त्रें एकच गोष्ट निरनिराळ्या प्रकारांनीं सिद्ध करीत आहेत. ती ही कीं, आपण सर्व चैतन्यानें, मनानें व शरीरानेंहि एकच आहों! आपण शरीरानेंहि एकच आहों, हें ह्मणणें आरंभीं हास्यास्पद वाटेल; पण तसें वाटणें

चुकीचें आहे. आपण निवळ जडवादी आहों असें गृहीत धरलें, तर आपल्या मतें सर्व दृश्य विश्व ह्मणजे अनेक जड पदार्थांचा एक मोठा समुद्र आहे, हाच आपला शेवटचा सिद्धांत होईल. समुद्रांत ज्याप्रमाणें निरनिराळ्या लाटा उत्पन्न झालेल्या दिसतात, त्याचप्रमाणें तुह्मी, मी आणि इतर लोकहि या प्रचंड जड-समुद्रांतील लहानलहान लाटांसारखेच आहों असें ह्मटलें पाहिजे. एकच प्रकारचे जडपदार्थ एकत्र येऊन कांहीं वेळ लाटेसारखे दिसतात आणि ती लाट फुटल्यावर ते पुन्हां विस्कळित होतात, असेंच मानणें भाग आहे. समुद्रांत लाटा उत्पन्न झाल्या आणि मोडल्या ह्मणजे सर्व पाणी एकत्र मिसळलें जातें; आणि पुन्हां लाटा उठूं लागल्या ह्मणजे पहिल्या लाटांच्या पाण्याची अदलाबदल होतेच. त्यांत अमुक पाण्याच्या अमुक लाटा अशी निवडानिवड करणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें पूर्वी आपण सर्व निरनिराळ्या लाटा होतों. मध्यंतरीं आपण विस्कळित स्वरूपास गेलों; आणि आतां पुन्हां लाटांच्या रूपानें उद्भवलों. अशा स्थितींत माझ्यांतील जडपदार्थ सूर्यांत अथवा तुमच्यांतील जडपदार्थ एखाद्या वनस्पतींत गेले नसतील असें कोणीं ह्मणावें ? ह्मणजे अशारीतीनें तुमच्या आमच्यांतील व विश्वांतील यच्चयावत् सृष्ट पदार्थांत अदलाबदल चालू असतां आपण शरीरानें तरी भिन्न कसे असणार ? अशारीतीनें आपलीं शरीरें भिन्न दिसत असतांहि त्यांत एकतानता आहे ही गोष्ट सिद्ध होते. अशाच रीतीनें चैतन्यांतहि एकतानता आहे हें सिद्ध करणें कठीण नाहीं. अनेक विचारतरंगांचा जो एक समुद्र आहे, त्यांतील कांहीं विचार एकत्र होऊन माझें मन, तुमचें मन व इतर लोकांचीं मनें तयार झालीं आहेत. अंतर्यामीं या सर्वांची अत्यंत एकतानता आहे. फार लांब कशाला ? मी आतां बोलत आहें व आपण ऐकत आहां; आणि याचवेळीं आपल्या विचारांची झपाट्यानें अदलाबदल होत आहे, हें थोड्या विचाराअंतीं आपल्या लक्ष्यांत येण्याजोगें आहे. अशारीतीनें आपणा सर्वांत बाह्यतः भेद दिसला तरी वस्तुतः आपण सर्व विचारानें एकरूपच आहों असें सिद्ध होतें. ज्या अर्थीं आपण शरीरानें व मनानें एकच आहों, त्या अर्थीं हीं दोन्ही ज्या मूळस्वरूपापासून उद्भवलीं आहेत तें आमचें मूळरूपहि एकच असलें पाहिजे हें उघड होत नाहीं काय ? यावरून आमचें निराळेपण हा केवळ दृश्याभास असून आपण सर्व वस्तुतः एकरूपच आहों, असें निःसंशय सिद्ध होतें. आजपर्यंत भौतिकशास्त्रांनीं जितके शोध लाविले तितक्या सर्वांचें पर्यवसान शेवटीं याच सिद्धांतांत होणार, अशीं उघड चिन्हें आज दिसूं लागलीं आहेत. छाती काढून आपल्याच डौलांत चाल-

णारा मनुष्य आणि गटारांत लोळणारा सूक्ष्म जंतु हे भौतिकशास्त्रज्ञांच्या दृष्टीनें एकरूपच आहेत. दोघांतहि एकाच जातीच्या घटकांचा वास आहे असें भौतिकशास्त्रें त्या गर्विष्ठ मनुष्यास निक्षून सांगत आहेत. आह्मी पौर्वात्य शास्त्रज्ञ यापुढेंहि आणखी एक पाऊल टाकून असें ह्मणतों कीं तो गर्विष्ठ मनुष्य एकेकाळीं किड्याच्या रूपानें खरोखरच गटारांत लोळत होता. आणि त्यानंतर दुसरे अनेक जन्म घेऊन तो सध्या मनुष्य झाला आहे. जगांत जें जें दृश्यास आलें आहे त्या सर्वांचें एकस्वरूप पाहणें, किंबहुना आपण स्वतःच इतक्या अनंतरूपानें नटलों आहों, हा अनुभव घेणें ही मानवी ज्ञानाची परमावधि आहे. आपणा सर्वांना शिकण्यासारखें जें कांहीं आहे तें हेंच. आपला गर्व नेहमीं अशा अनुभवाच्या आड येत असतो. एखाद्या मोठया मनुष्याची व आपली योग्यता एकच आहे असें ह्मणवून घेणें आपणांस भूषणास्पद वाटतें; पण आपलें साम्य किड्याशीं आहे असें कोणीं ह्मटल्याबरोबर आपणांस क्रोध येतो. मनुष्याचें भयंकर अज्ञान त्याच्या स्वतःच्या उन्नतीच्या प्रत्येक मार्गांत आडवें पडून त्यास पुढें पाऊल टाकूं देत नाहीं. आपला एखादा पूर्वज श्रीमान् असला तर आपण अमक्या श्रीमानाचे खापरपणतू असें लोकांना सांगण्यांत आपणांस भूषण वाटतें. त्यानें तो पैसा चोऱ्या करून अथवा दरवडे घालून मिळविला असला तरी त्याच्या कौशल्याची आणि धाडसाची आपण तारीफ करीत सुटतों. पण आपला पूर्वज एखादा नीतिमान् पण भिकारी मनुष्य असला तर त्याच्या नांवाशीं आपला कांहीं संबंध नाहीं असें दाखविणें आपणांस भूषणरूप वाटतें.

भौतिकशास्त्रांचा जों जों उत्कर्ष होत जाईल तों तों आमच्या डोळ्यांवरचें एक एक पटल गळून पडेल यांत संशय नाहीं. सत्य आपला मार्ग, हळू हळू पण निश्चयानें, आक्रमूं लागलें आहे. सनातनधर्माच्या दृष्टीनें हा मोठा विजयच आहे. आज कित्येक शतकें हीच गोष्ट आमचा अद्वैत सिद्धांत सर्व जगास सांगत आहे. माझ्या आत्म्याचें जें मूलरूप तेंच वस्तुतः सर्व विश्वाचें रूप आहे; येवढेंच नव्हे तर सर्व पदार्थ मूलतः एकरूपच आहेत व दृश्याभासामुळें ते वेगळे आहेत असें दिसतें, हेंच अद्वैतसिद्धांताचें सांगणें आहे. आमचा अद्वैतसिद्धांत प्रत्येकाला ह्मणतो ‘ तत्वमसि ’ ‘ तेंच तूं आहेस.’ तूं विश्वापासून आपणास निराळा समजून दुःख भोगतोस. तुला सुखरूप व्हावें असें वाटत असेल तर या एकतानतेचा अनुभव घे. ज्याला या एकात्मकतेचा अखंड अनुभव असेल त्यालाच अखंड सुखाची प्राप्ति होईल.

यावरून वेदांतधर्मानें सांगितलेलीं तत्वें भौतिकशास्त्रांच्या सिद्धांतांविरुद्ध नाहींत; एवढेंच नव्हे तर तेच सिद्धांत वेदांताच्या आधारानें अधिक चांगल्या प्रकारें सिद्ध होतात. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' असा वेदांताचा सिद्धांत आहे. ब्रह्म हेंच सर्वांचें अधिष्ठान असून त्याबाहेर कांहीं राहूं शकत नाहीं. ब्रह्म विश्वबाह्य नसून विश्वांतील यच्चयावत् पदार्थांत भरून राहिलें आहे किंबहुना सर्व दृश्य सृष्टि हें ब्रह्माचेंच व्यक्तरूप आहे. पुरुषांत आणि स्त्रींत एकाच ब्रह्माची व्याप्ति आहे. आपल्याच गर्वांत छाती काढून चालणारा तरुण बांड जसा ब्रह्मरूप आहे, तसाच पाठीची कमान झालेला व काठीच्या आधारानें पाउलें टाकणारा वृद्धहि ब्रह्मरूपच आहे. आपण जें जें कांहीं पाहतों, व ज्याला ज्याला स्पर्श करतों तें सर्व ब्रह्मच आहे. आपण सर्व ब्रह्मांत वास करतों, सर्व व्यवहार करतों व त्याच्याच आश्रयानें जगतों. या प्रकारची कल्पना नव्या करारांतहि आढळून येते. विश्वांत चोहोंकडे परमेश्वराची व्याप्ति आहे, तो सर्व दृश्याचें सत्वसार आहे व वस्तुमात्राचा अंतरात्मा तोच आहे, ही कल्पना नव्या करारांतहि ग्रथित केली आहे. जग दृश्य स्वरूपास येतें याचा अर्थ असा आहे कीं अव्यक्त ब्रह्म व्यक्तस्वरूपास येतें. सच्चिदानंदस्वरूप व्यक्त होण्याचे आपण सर्व मार्ग आहों. आपल्या या शरीररूपी लहान लहान प्रवाहांनीं ब्रह्मच वाहत आहे. मनुष्यामनुष्यांत, देवदूतांत आणि मनुष्यांत, मनुष्यांत आणि पशूंत, पशूंत आणि वृक्षांत व वृक्षांत आणि दगडांत जो भेद दिसतो, तो मूलस्वरूपाचा भेद नव्हे. या सर्वांतील सारभूततत्व एकच असल्यामुळें त्या सर्वांची जात एकच असें ह्मणण्यास हरकत नाहीं. फरक दिसतो तो कमीअधिक परिमाणामुळें उत्पन्न झालेला आहे. माझ्या व्यक्तपणाचें परिमाण कमी असलें तर मला कमी दर्जाचा असें समजतात. याच रीतीनें व्यक्तपणाच्या अधिक परिमाणामुळें तुह्मी माझ्यापेक्षां कदाचित् अधिक उच्च दर्जाचे असाल. येथें दर्जा कमीअधिक वाटतो त्याचें कारण मूलतत्वांतील उच्चनीच भाव नव्हे; तर त्याच्या व्यक्त होण्याच्या परिमाणांतील कमीअधिकपणा हेंच त्याचें कारण आहे. तुमच्यांत माझ्यांत काय अथवा पशूंत आणि दगडांत काय, एकाच परमात्मरूपाची व्याप्ति आहे. याकरितां तुह्मी, मी आणि इतर सर्व सृष्टि वस्तुतः परमात्मरूपच आहे. परमेश्वररूप असणें हा जसा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे तसाच माझाहि आहे. तुह्मी केवळ पावित्र्याचे पुतळे आहांत आणि मी केवळ पापमूर्ति आहें, तथापि तुमच्या पुण्यरूपांत आणि माझ्या पापरूपांत एकच सच्चिदानंद भरून राहिला आहे. तुमच्या व्यक्तपणाचें परिमाण

आज अधिक दिसत आहे; पण एक दिवस असा येईल कीं आजचा पापमूर्ति जो मी तोच त्यादिवशीं वंदनीय सत्पुरुष ह्मणवीन. कारण जें पूर्णरूप तुमच्यांत आहे तेंच माझ्यांतहि ओतप्रोत भरून राहिलें आहे. माझा दर्जा कमी कां आणि तुमचा अधिक कां, या प्रश्नास उत्तर देण्याकरितां विश्वबाह्य सैतानाची अथवा परमेश्वराची अपेक्षा करावी लागत नाहीं. वस्तुगत पदार्थांतूनच या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. अर्वाचीन भौतिकशास्त्रांच्या पद्धतीनेंच हें उत्तर आपणांस मिळालें आहे. विश्वांत जें जें कांहीं दिसतें तें सर्व परमेश्वररूपच आहे. सर्व जड पदार्थांतहि परमेश्वरच भरला आहे असें म्हटलें, म्हणून परमेश्वर जडरूप आहे असें मात्र समजूं नये; तर ज्या इंद्रियांच्या द्वारा आपण परमात्म्याचें रूप पाहतों, त्यांच्या दोषामुळें परमात्म्याचें स्वरूप जड आहेसें भासतें, असें समजावें. परमात्मा वस्तुतः सर्वत्र एकसारखाच व्यक्त झाला असतांहि इंद्रियांच्या दोषांमुळें त्याच्या स्वरूपांत भिन्नता उत्पन्न होते. बाह्येंद्रियें बंद करून केवळ मनानें त्याला अवलोकन केलें तर तोहि मनोमयस्वरूपाचा दिसतो. मनाचाहि त्याग करून केवळ चैतन्यद्वारा त्याचा अनुभव घेतला तर तो केवळ चैतन्यरूप आहे असा अनुभव येतो. तो जडपदार्थ नाहीं, तर जडांतील सत्यांश तो आहे. आपण असें समजूं कीं, अर्धवट अंधार आहे अशा जागीं मी गेलों तों समोर मला कांहीं पदार्थ दिसला. काडी ओढून पाहिली तों ती खुर्ची आहे, असा माझा निश्चय झाला. या उदाहरणांत 'खुर्ची आहे' अशी प्रतीति होण्यास दोन कारणें लागतात. तेथें कांहीं तरी असणें हें एक कारण; व प्रकाश उत्पन्न करून तो पदार्थ 'अमुक आहे' असा निश्चय करणें हें दुसरें कारण. पहिल्या कारणानें केवळ अस्तित्वाचा बोध होतो. हेंच परमात्म्याचें रूप. दुसऱ्या कारणानें 'तें अमुक' असा मी निश्चय करतों. हें माझ्या इंद्रियद्वारा घडलें आहे ह्मणून तें परमात्म्याचें सत्यरूप नसून मीं त्यावर नामरूपाचा आरोप केला असें होतें. अशाच रीतीनें परमात्मस्वरूपावर अनेक प्रकारचे आरोप करून आपण खुर्ची, खोली, घर, जग, चंद्र, सूर्य आणि तारे इत्यादि पदार्थ इंद्रियद्वारा उत्पन्न करतों. 'मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना। मत्स्थानि सर्वभूतानि नचाहं तेष्ववस्थितः ॥ न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम्। भूतभृन्नच भूतस्थो ममात्मा भूतभावनः॥' अशी परमेश्वरस्वरूपाची व्याप्ति आहे. आतां येथें एक प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. तो प्रश्न असा कीं, आपणा सर्वांस अमुक पदार्थ खुर्ची, अमुक चंद्र आणि अमुक घर असा एकच बोध कां होतो? जर आपण आपल्या

इच्छेनें परमात्मपटावर हीं चित्रें रंगवितों, तर तीं सर्वांचीं एकसारखींच कशीं उठतात? याचें कारण असें आहे कीं आपण सर्व एकाच मानसिक परिस्थितींतले असल्यामुळें भिन्नशरीरी असतांहि वस्तुतः एकच प्राणी आहों. यामुळें आपण रंगविलेलीं चित्रेंहि एकाच प्रकारचीं दिसतात. मानसिक परिस्थितींत अत्यंत साम्य असल्यामुळें एकाच परिस्थितींत अनुभवांची भिन्नता उत्पन्न होत नाहीं. यामुळें 'चंद्र' ह्मटल्याबरोबर आपणा सर्वांसमोर एकच चित्र उभें राहतें. आपल्या आजच्या मानसिक परिस्थितींत दगड आपणांस जडवस्तु दिसते; परंतु आपली ती परिस्थिति बदलली तर दगडांतील चैतन्य आपणांस दिसूं लागून तो जड-वस्तु नाहीं असें आपण ह्मणूं. आपणांस जे पदार्थ ज्या स्वरूपाचे दिसतात त्याहून त्यांचीं भिन्न रूपें पाहणारे अनेक लोक या भूतलावर असतील. जडपदार्थांचें बाह्यतः दिसणारें जडस्वरूप सत्य नसून त्यांचें खरें स्वरूप सूक्ष्म आहे, असें सिद्ध करण्याकडे पदार्थविज्ञानशास्त्राचा कल होऊं लागला आहे, हें आपणांस ठाऊक असेलच. असो. एकंदर विवेचनाचा मथितार्थ हा कीं, भौतिकशास्त्रांच्या भट्टींत तावून सुलाखून सुरक्षितपणें बाहेर पडण्याचें सामर्थ्य कोणा धर्मांत असेल तर तें वेदांतधर्मांतच आहे. आपल्या सूक्ष्म विवेचकबुद्धीच्या कसोटीवर त्याला तुह्मीं घांसलें तरीहि तें बावनकशी सुवर्णच आहे असें तुमच्या प्रत्ययास येईल. सर्वव्यापी तत्वाचा शोध अद्वैतमतानेंच लाविला आहे. एकंदर पदार्थमात्रांतील चिरस्थायी तत्वाचा निश्चय दुसऱ्या कोणत्याहि मतानें केलेला नाहीं. विश्वबाह्य परमेश्वराची कल्पना अत्यंत प्रखर अशा विवेचकबुद्धीस कधींहि मान्य होणार नाहीं. परमेश्वर विश्वबाह्य ह्मटला कीं, त्यावर अनेक गुणांचा आरोप करावा लागणारच. कारण गुणांवांचून उत्पत्ति करणेंच शक्य नाहीं. तो 'दयाळु आहे, पवित्र आहे' इत्यादि अनेक गुणांचा आरोप त्याजवर करावा लागेल. पण दयाळु आणि पवित्र अशा परमेश्वरानें उत्पन्न केलेल्या जगांत आह्मांस पुण्य आणि पाप व सुख आणि दुःख इत्यादि द्वंद्वें दृष्टीस पडतात. आपणांस जें जें कांहीं बरें वाटतें, त्या सर्वांची एक मूस तयार करून आपण परमेश्वरास बनवितों असाच 'विश्वबाह्य परमेश्वर' या कल्पनेचा अर्थ होईल! या दृष्टीनें परमेश्वराची व्याख्या पूर्ण करावयाची ह्मटलें तर 'तो चोर नाहीं, तो दुष्ट नाहीं, तो आततायी नाहीं' असेंहि ह्मणावें लागेल. आपल्या दृष्टीनें सद्गुण ह्मणून वाटणाऱ्या गुणांचा जर त्याजवर आरोप करावयाचा तर त्याबरोबरच दुर्गुणांचा बाधहि करणें आवश्यक नाहीं काय? परमेश्वर विश्वबाह्य असून तो सद्गुणैक मूर्ति

आहे असें ह्मणणारे लोक अन्य रीतीनें परमेश्वराच्या व्याख्येची अशीच पूर्तता करीत असतात. परमेश्वर जसा सद्गुणैक मूर्ति तसाच सैतान दुर्गुणैकमूर्ति. सद्गुण आणि दुर्गुण इत्यादि द्वंद्वें प्रतीत होत आहेत त्या अर्थी दोन्ही गुणांचे पुतळे जोडीनेंच वास करतात, असें मानण्यावांचून गत्यंतर नाहीं. यावरून सद्गुणैक मूर्ति परमेश्वराचें अस्तित्व मानणें चुकीचें आहे असें आपणांस दिसून येतें. परमेश्वराचें सत्यस्वरूप पाहण्यास आपणांस गुणांच्या पलीकडे जाणें भाग आहे. या दृष्टीनें विचार केला ह्मणजे आपणांस असें आढळून येईल कीं, चांगलें आणि वाईट हीं एकाच वस्तूचीं दोन अंगें आहेत. एकच वस्तु दोन निराळ्या स्वरूपांनीं व्यक्त झाली आहे.

खऱ्या दृष्टीनें पाहतां चांगलें आणि वाईट असा भेद पाहणें ही दृष्टीच खोटी आहे. हा फरक वस्तूंत नसून आमच्या दृष्टीमुळें उत्पन्न झाला आहे. अमुक चांगलें आणि तमुक वाईट ही भावना रूढ झाल्यानें मानवजातीचें भयंकर नुकसान मात्र झालें आहे. वाईट आणि चांगलें हीं वस्तुतः भिन्न आहेत. व तीं चिरकाल भिन्नच राहणार, ही कल्पना आमच्यांत अनेक भेद उत्पन्न करण्यास मात्र कारण झाली. अमुक वस्तु अनंतकाल चांगली राहील अथवा तमुक वस्तु चिरकाल वाईट राहील असें कोणी मला सिद्ध करून दाखवील, तर त्याला मी शतशः प्रणाम करीन. जगांतील अमुक एक आढळणारी वस्तु अथवा परिस्थिति चिरकाल एकाच स्वरूपाची राहील असें छातीवर हात ठेवून कोणास सांगतां येणें शक्य आहे काय? आज जें कांहीं चांगलें ह्मणून आपण ह्मणतों, तेंच उद्यां परिस्थिति बदलली तर आपणांस वाईट दिसूं लागेल. तसेंच आजचें वाईट उद्यां चांगलें वाटण्याचाहि संभव आहे. तसेंच तुह्मी ज्याला वाईट असें नांव देतां तेंच माझ्या विशिष्ट परिस्थितीमुळें मला हितकर असूं शकेल, व त्यामुळें मी त्याला चांगलें ह्मणेन. एकंदरींत, ध्यानांत ठेवण्याचा मुख्य मुद्दा हा कीं, एकंदर जगाच्या उत्क्रांतीबरोबरच चांगल्याची व वाईटाचीहि उत्क्रांति होत आहे. उत्क्रांतितत्वास अनुसरून प्रत्येक वस्तूंत प्रत्येक क्षणीं रूपांतर सुरू आहे. यामुळें एकाच वस्तूच्या एका विशिष्ट रूपास आपण चांगलें ह्मणतों व त्याच वस्तूच्या दुसऱ्या स्वरूपास आपण वाईट असें नांव देतों. प्रचंड झंझावात सुटला आहे अशा वेळीं त्या वातामुळें उपडलेलें झाड माझ्या एखाद्या मित्राच्या डोक्यावर पडून त्याचा प्राण गेला तर तें वादळ वाईट असें मी ह्मणतों; परंतु त्या वादळामुळें हजारों रोगकारक जंतूंचा नाश होऊन त्यामुळें कित्येकांचे प्राण वांचले असतील!

ह्मणजे एकाच्या दृष्टीनें जें वाईट तेंच दुसऱ्याच्या दृष्टीनें चांगलें झालें, असें नाहीं काय ? याकरितां चांगलें आणि वाईट, सुख आणि दु:ख व पुण्य आणि पाप हीं द्वंद्वें वस्तुगत नसून केवळ आपल्या दृष्टीमुळें उत्पन्न झालीं आहेत, हें नि:संशय सिद्ध होतें. साकार व सगुण परमेश्वराची व्याप्ति नेहमींच सापेक्ष असणार. ह्मणजे जगांत कांहीं तरी वाईट आहे व तें नित्य वाईट राहणार ह्मणून अशा स्थितीच्या अपेक्षेनें परमेश्वर विश्वबाह्य, साकार व सगुण मानावा लागतो. परंतु वेदांतधर्मानें प्रतिपादिलेल्या निर्गुण व निराकार ब्रह्माचें स्वरूप सापेक्ष नाहीं. तें केवलरूप आहे. ह्मणून तें बरेंहि नाहीं व वाईटहि नाहीं. तें गुणाच्या पलीकडचें रूप आहे. याकरितां चांगलें ह्मणजे परमात्मपदाच्या अधिक जवळ पोहोंचलेलें रूप आणि वाईट ह्मणजे परमात्मपदापासून अधिक लांबचें रूप, इतकेंच फार तर ह्मणतां येईल.

निर्गुण आणि निराकार ब्रह्माचीच व्याप्ति सर्वत्र आहे असें मानलें, तर त्यापासून आमचा अधिक फायदा काय होईल ? त्रिविध तापांनीं पोळलेल्या आह्मां प्रापंचिकांस त्यापासून समाधानाची प्राप्ति होईल काय ? आह्मी दुर्बळ अंत:करणाचे आहों असा आह्मांस नित्य अनुभव येतो. अशा प्रसंगीं आह्मांस कोणाच्या तरी मदतीची अपेक्षा वाटते. अशा वेळीं तुमच्या निर्गुण आणि निराकार ब्रह्मापासून आह्मांस मदत काय होणार आणि शांति काय मिळणार ? एखादें संकट आलें ह्मणजे कोणाची तरी मदत मागण्याची इच्छा आमच्या अंत:करणांत उद्भवते, ती नष्ट होईल काय ? असे अनेक प्रश्न उद्भवण्याचा संभव आहे. त्यांस आमचें उत्तर असें आहे कीं, मानवी अंत:करणाची दुर्बलता कायम आहे तोंपर्यंत सगुण आणि साकार परमेश्वराची त्याची भावना कायम राहील; पण फरक इतकाच कीं, तिच्यांत सध्या जो निवळ भोळेपणाचा भाग आहे तो नष्ट होऊन ती भावना अधिक सशास्त्र होईल. नि:सीम आणि केवळ सच्चिदानंदरूप ब्रह्माच्या भावनेमुळें सगुण आणि साकार परमेश्वराविषयींची भावना अधिक शुद्ध अतएव अधिक दृढ होईल. केवळ सगुण आणि साकार परमेश्वराचें अस्तित्व मानलें तर त्यावर अनेक आक्षेप निघून त्याचें अस्तित्व बाधित होतें, हें आपण नुक्तेंच पाहिलें आहे. निर्गुण आणि निराकार ब्रह्माची व्याप्ति कबूल केल्यावांचून सगुण आणि साकार परमेश्वराचें अस्तित्वच सिद्ध होऊं शकत नाहीं. विश्वाच्या बाहेर राहून, सगुण आणि साकार परमेश्वरानें हें विश्व निर्माण केलें, ही उपपत्ति सिद्ध होत नाहीं, हें अगोदर दाखविलेंच आहे. परंतु सकल विश्वांतर्गत, निर्गुण आणि

निराकार ब्रह्माची व्याप्ति कबूल केली तर त्याच्या पोटांत सगुण आणि साकार परमेश्वराची व्याप्ति राहूं शकेल. विश्व या संज्ञेनें ज्या कांहीं वस्तूंचा आपणांस बोध होतो, तीं वास्तविक एकाच निराकार वस्तूचीं अनेक रूपें आहेत. आमच्या पंचेंद्रियद्वारा तिचें जें कांहीं रूप दिसतें त्याला आपण जडजग अशी संज्ञा देतों. माझ्या पांच इंद्रियांनीं मला शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असा पांच प्रकारचा बोध होतो. एखाद्या वस्तूकडे मीं अवलोकन केलें ह्मणजे तिच्यांतील पांच गुण या पांच इंद्रियांनीं मी अनुभवतों व ती वस्तु अमुक असें मी ह्मणतों. आतां या पांच इंद्रियांहून कांहीं अधिक इंद्रियें एखाद्याला असलीं तर तीच वस्तु त्याला निराळी दिसेल हें उघड आहे. आपणांपैकीं एखाद्याला विद्युत् इंद्रियाची प्राप्ति झाली, तर त्याला हें सर्व विश्व कांहीं निराळ्याच प्रकारचें प्रतीत होईल. वस्तु एकच असतां ती अनेक प्रकारांनीं प्रतीत होत आहे व सगुण आणि साकार परमेश्वराची प्रतीति ही त्याच वस्तूची अत्युत्कृष्ट प्रतीति आहे. वस्तुज्ञान करून घेण्याचें जें सामर्थ्य मानवीबुद्धींत वास करीत आहे, त्या सामर्थ्याची ही अगदीं अत्युच्च दशा आहे. याकरितां मन, बुद्धि इत्यादि अंतर्वृत्ती शिल्लक आहेत, तोंपर्यंत, जशी ही खुर्ची खरी आहे आणि जसें हें जग खरें आहे त्याचप्रमाणें सगुण आणि साकार परमेश्वराचें अस्तित्वहि सर्वथैव खरेंच आहे; पण मन हरवलें, बुद्धि लुप्तप्राय झाली आणि अहंकार मावळला तर काय होईल ? तर खुर्चीचें खुर्चीपण जाईल, जगाचें जगपण नष्ट होईल आणि त्याचप्रमाणें सगुण आणि साकार परमेश्वराचें परमेश्वरत्वहि नष्ट होऊन शेवटीं जें कांहीं उरेल तें केवलरूप मात्र उरेल. ज्या इंद्रियांच्या द्वारानें जगाची प्रतीति होते त्या इंद्रियांनीं आपापलीं कामें सोडल्यावर 'हें विश्व आहे' इतकीहि प्रतीति होणार नाहीं; मग सगुण आणि साकार परमेश्वराची व्याप्ति तरी राहणार कोठें ? मुळापासून उपटलेल्या वृक्षाचीं पानें, फुलें आणि फळें आपोआप गळून पडलीं तर त्यांत नवल तें काय ? याकरितां, सगुण आणि साकार परमेश्वराची भावना ही अत्युच्च कोटीची भावना असली तरी ती भावनाच आहे. तें निर्भेळ सत्य नव्हे. या भावनेचें खरें स्वरूप इतकेंच कीं, निर्गुण निराकार आणि सत्यस्वरूपावरच या भावनेचें अस्तित्व आहे ह्मणून तिच्यांत सत्यत्व आहे. तिचें सत्यत्व निरपेक्ष नसून सापेक्ष मात्र आहे. मी मनुष्यप्राणी आहें हें जितकें खरें आहे तितकेंच, सगुण आणि साकार परमेश्वराचें अस्तित्वहि खरें आहे. माझें अस्तित्व खरें आहे आणि खोटेंहि आहे. मी असें ह्मणतों याचें आपणांस आश्चर्य वाटावयास नको; त्याबद्दल

आपण आपली खात्री करून घ्या. माझ्या भोंवतीं असलेल्या वातावरणाची या क्षणीं जी स्थिति आहे, त्या स्थितींत माझें एक विशिष्टरूप तुह्मांस दिसतें, पण ही स्थिति बदलली तर मी तुह्मांस कांहीं वेगळाच दिसूं लागेन. वातावरणाच्या व उजेडाच्या निरनिराळ्या अवस्थेंत एकाच मनुष्याचे निरनिराळे फोटो घेतले तर त्यांत फरक पडतो, हें आपणांस अनुभवानें समजण्याजोगें आहे. याकरितां वातावरण आणि तुमचें इंद्रियजन्य प्रतीतीचें ज्ञान यांवर माझ्या चेहऱ्याचा खरेपणा, अवलंबून आहे. या दोहोंत कांहीं फरक झाला तर माझा तोच चेहरा तुह्मांस निराळा दिसूं लागेल. मग ज्याचें सत्यत्व केवळ सापेक्ष आहे, तो माझा चेहरा खरा कीं खोटा ? पण असें असलें तरी, केव्हांहि न बदलणारें असें एक तत्व माझ्यांत आहे ही गोष्टहि खरीच आहे. तें तत्व निराकार असून तेंच माझें सत्यस्वरूप आहे, व तेंच अनेक वेळां अनेक रूपांनीं आकाराला येऊन प्रतीत होतें. ह्मणजे निराकार 'मी' सदैव सत्य व न बदलणारा असून त्यावरच तरंगरूपानें भासणारे अनेक 'मी' आकार बदलणारे आणि ह्मणून खोटे आहेत. पाळण्यांत पडून रडणारा 'मी', त्याहून थोडा मोठा 'मी,' तारुण्याच्या भरांत जगाला तुच्छ समजणारा 'मी' आणि वृद्धावस्थेंत त्याच जगाच्या मदतीची अपेक्षा करणारा 'मी', हे सर्व 'मी', एकाच निराकार आणि सत्य 'मी'चे अनेक साकार, बदलणारे आणि ह्मणून असत्य असे तरंग आहेत. माझें शरीर आणि माझे विचार प्रत्येक दिवशीं बदलत आहेत याचा अनुभव येत असतांहि या बदलणाऱ्या आकाराच्या मुळाशीं एक न बदलणारें आणि अविनाशी तत्व आहे, याचाहि मला अनुभव येतो. याच अविनाशी आणि न बदलणाऱ्या तत्वावर मी अनेक देह धारण करतों. याचप्रमाणें अनेकधा दिसणाऱ्या या विश्वाच्या मुळाशीं एक अविनाशी व न बदलणारें तत्व आहे. या विश्वरचनेकडे पाहिलें तर त्यांतील प्रत्येक पदार्थाचें प्रत्येक क्षणीं रूपांतर होत आहे असें आपणांस आढळून येतें. असें असतांहि विश्वाच्या सर्वसामान्य स्थितींत अनंतकालापासूनहि कांहीं बदल झाला नाहीं हेंहि आपणांस कळतें. गति हा शब्द सापेक्ष आहे. अमक्या पदार्थाला गति आहे असें आपण ह्मणतों त्यावेळीं त्या कल्पनेच्या मुळाशीं दुसऱ्या स्थिर पदार्थाची कल्पना आपल्या मनांत असतेच. ही खुर्ची स्थिर आहे. कां ? तर मला गति आहे ह्मणून. भोंवतालच्या स्थिर पदार्थांकडे पाहून मी स्वतःला गति आहे असें ह्मणतों. जर एकसमयावच्छेदेंकरून आपण या विश्वाकडे अवलोकन केलें तर तें स्थिर आहे, असेंच आपणांस ह्मणावें लागेल. त्याच्याशीं ताडून पहाण्यास

दुसरा पदार्थच नाहीं. अशा स्थितींत तें चल आहे असें तरी कसें ह्मणतां येईल? कोणताहि पदार्थ स्थिर अथवा चल ह्मणविला जाण्यास त्याला दुसऱ्या पदार्थांच्या तुलनेची अपेक्षा असते. ह्मणजे स्थैर्य आणि चलन हीं परस्पर सापेक्ष आहेत. मग अशी तुलना करणें शक्य नसल्यामुळें विश्वाला गति नाहीं असेंच ह्मटलें पाहिजे. यावरून जें न बदलणारें तें विश्वाचें सत्यरूप असून दृश्यरूप हें केवळ तरंगाकार व बदलणारें आहे. समष्टिरूपानें असलेलें विश्व न बदलणारें असून तेंच अनेक व्यष्टींच्या रूपानें भासलें ह्मणजे त्यांत तृणादि क्षुद्र पदार्थांपासून तों थेट सगुण परमेश्वरापर्यंत अनेक पदार्थांचा सामावेश होतो. सगुण परमेश्वर ही अत्युच्च दर्जाची व्यष्टि असून त्याला आपण विश्वाचा शास्ता, विश्व उत्पन्नकर्ता असें ह्मणतों; व त्याचीच प्रार्थना करतों, अथवा त्याजपुढें गुडघे टेंकतों. यावरून सगुण परमेश्वराचें अस्तित्व केवळ बुद्धिगत असून तें निराकार मूळरूपावरील एका तरंगासारखें आहे. या तरंगाचा दर्जा फार मोठा आहे, ही गोष्ट खरी; तथापि तो तरंगच आहे हेंहि विसरतां येत नाहीं. आमच्या बुद्धीचें अस्तित्व आहे तोंपर्यंत त्याचेंहि अस्तित्व आहे. पण बुद्धीचें बुद्धिपण गेलें ह्मणजे त्या तरंगाचेंहि अस्तित्व संपलेंच. माझ्या तुमच्यासारखे सामान्य जन हे त्याच निराकाररूपावरील क्षुद्र तरंग आहेत आणि या सापेक्ष दृष्टीनें सगुण परमेश्वर अत्युच्च महत्वाचा तरंग आहे. सर्व मनुष्यें परमात्मरूप आहेत असें जें वेदांतमत आहे, त्याचा अर्थ तीं सगुण परमेश्वराचीं रूपें आहेत असें समजूं नये. उदाहरणार्थ, एका मातीच्या गोळ्यांतून कांहीं भागाचा एक प्रचंड हत्ती तयार केला आणि शिल्लक उरलेल्या मातीचा एक लहानसा उंदीर केला, तर त्या उंदराला हत्तीचें रूप कधीं तरी प्राप्त होण्याचा संभव आहे काय? परंतु दोघांसहि पाण्यांत बुडविलें आणि त्यामुळें ते आपल्या मूळरूपास गेले तर दोघांचाहि एकच चिखल बनेल. केवळ वस्तुतः विचार करतां दोघेहि मातीचे बनविलेले ह्मणून एकरूपच होत; परंतु एकच माती हत्ती आणि उंदीर अशा द्विधा रूपास गेली कीं, त्या दोन रूपांत फरक उत्पन्न होऊन तो कायम राहणारच. त्याचप्रमाणें ब्रह्म हें त्या मातीसारखें आहे. त्यांतून सगुण परमेश्वर आणि आपण उत्पन्न झालों. सगुण परमेश्वर तुह्मां आह्मांपेक्षां अधिक महत्वाची व्यष्टि असल्यामुळें तो जगाचा शास्ता आणि आपण त्याचे दास असें झालें. ज्याप्रमाणें मातीचा हत्ती आणि उंदीर यांची फिरून माती होईपर्यंत त्यांच्या महत्वांत कायमचा फरक राहणार, त्याचप्रमाणें आह्मी देहधारी मनुष्यें आहों तोंपर्यंत सगुण परमेश्वर

आमचा धनी आणि आह्मी क्षुद्र मानव त्याचे दासानुदास हें नातें कायम राहणार. या एकंदर विवेचनावरून जगाचें अस्तित्व आहे, तोंपर्यंत सगुण परमेश्वराचेंहि अस्तित्व राहणार हें सिद्ध झालें. वेदांतमताच्या प्रसारानें पूर्वींच्या धर्मांची कोणतीहि हानी न होतां जग आणि परमेश्वर यांचे संबंध अधिक पायाशुद्ध होऊन अधिक दृढ मात्र होतील. याकरितां, आपल्या स्वतःच्या समाधानासाठींच वेदांतमत उत्तम रीतीनें समजावून घेणें अवश्य आहे. अनेक वस्तूंचीं कारणें आणि कार्यें पाहून त्यांवरून एका वस्तूचा कार्यकारणभाव ठरविण्याकडे आपल्या विवेचकबुद्धीचा जात्याच कल आहे, याचें विवेचन एकवार झालेंच आहे. यासाठीं त्या बुद्धीच्या समाधानार्थ निर्गुण ब्रह्मापर्यंतचे सिद्धांत अवलोकन करणें आपणांस भाग आहे. आपणांस निर्गुण ब्रह्मापर्यंतचे सिद्धांत समजले ह्मणून सगुणाची उपासना टाकून द्यावयास पाहिजे असें नाहीं; तर ही उपपत्ति बरोबर समजली ह्मणजे सगुणोपासनेचा खरा मार्ग आपणांस सांपडेल. सध्याची आपली उपासनापद्धति किती पोरकट आहे याचा विचार करा. आपल्या क्षुद्र वासनांची तृप्ति होण्याकरितां परमेश्वराची आराधना आपण कित्येक वेळां करतों! अंतःकरणांत कुजून राहिलेल्या तुच्छ वासनांचा पाढा परमेश्वरापुढें वाचण्यापेक्षां आपण अधिक कांहींच करतांना आढळत नाहीं! 'प्रार्थना' 'उपासना' अशीं शोभिवंत नांवें दिलीं ह्मणून ती प्रार्थना अथवा उपासना होत नाहीं. वेदांतमताचा प्रसार झाला, तर असल्या मूर्खपणाच्या प्रार्थना कोणी करणार नाहीं, एवढी मात्र गोष्ट खरी. वेदांतमताप्रमाणें निर्गुण ब्रह्मभावनेंत उपास्य–उपासक असा संबंधच होऊं शकत नाहींत. इतर धर्मांचा विचार करतां त्यांत कित्येकांनीं विभूतिपूजा सांगितल्याचें आढळतें व तें योग्यहि आहे. रोमनक्याथलिक पंथाचे ख्रिस्ती लोक संतोपासना करतात, हेंहि योग्य आहे. परंतु परमात्मरूपाची प्रार्थना करावयाची हें मात्र मूर्खत्व आहे. सर्वसमर्थाकडे जाऊन ह्मणावयाचें काय? तर मला 'चांगली हवा दे,' 'पाऊस चांगला पाड' किंवा 'माझ्या बागेंत यंदां फळफळावळ पुष्कळ होऊं दे.' यापेक्षां संतोपासना शतपट अधिक चांगली. संत झाले तरी ते तुह्मां आह्मांसारखेच देहधारी व क्षुद्र प्राणी होते. त्यांची मदत मागणें अगदींच वावगें नाहीं; पण विश्वाच्या शास्त्याकडे जाऊन 'अरे परमेश्वरा, माझें डोकें दुखणें बंद कर' असें ह्मणणें पोरालाहि शोभणारें नाहीं. हजारों संतांचे आत्मे तुमच्या भोंवतालच्या वातावरणांत आहेत त्यांची मदत मागा; परंतु सर्वेश्वराकडून अशा मदतीची अपेक्षा करणें आपणांस शोभत नाहीं. सर्व ताप-

हारिणी भागीरथीच्या कांठीं राहून विहीर खणण्यासारखाच हा शहाणपणा आहे. हीरकमण्यांच्या खाणींत राहून 'मला कांचेचा लोलक कोणीं देईल काय?' असें ह्मणावयाचें हें शहाणपणाचें लक्षण आहे काय?

लौकिक वस्तूंची हांव धरून त्या दृष्टीनें परमेश्वराची प्रार्थना करणें यासारखा मूर्खपणा दुसरा कोणताच नाहीं. सर्वेश्वरापाशीं आपण ज्ञानाची याचना करावी, निर्हेतुक प्रेमाची याचना करावी अथवा दृढश्रद्धेची याचना करावी. 'अमुक वस्तूशिवाय माझें अडेल,' 'अमका माझें बरें करील' अथवा 'तमका माझ्या उपयोगी पडेल' अशा प्रकारचें दौर्बल्य आणि परावलंबित्व मानवी हृदयांत आहे तोंपर्यंत क्षुद्र जिनसांसाठीं परमेश्वराची प्रार्थना करण्याची त्याची इच्छा राहीलच; परंतु सशास्त्र आणि पायाशुद्ध ज्ञानानें ज्यांची खरी श्रद्धा बळावली आहे, अशा मनुष्यांना लौकिकसुखाची प्रायः चाडच उरत नाहीं. मग ते असल्या प्रकारची प्रार्थनाहि करणार नाहींत हें उघडच आहे. त्यांच्या ठिकाणचें 'मी' नष्ट होऊन त्या जागीं 'तूं' आलेलें असतें. ज्यांची इतकी तयारी झाली असेल ते निराकाराच्या मार्गास लागण्यास योग्य झाले असें समजावें. निराकाराच्या उपासनेचा मार्ग ह्मणजे गुलाम आणि धनी अशा नात्याचा नाहीं. 'मी दुर्बल आहें, पापी आहें,' आणि 'तूं समर्थ, पुण्यात्मा आहेस' ही निराकाराची उपासना नव्हे. हा निराकाराच्या उपासनेचा मार्गच नव्हे. 'मी' नष्ट होऊन सर्व 'तूंच' राहिल्यावर पापी कोण आणि पुण्यवान् कोण!

फारशी भाषेंतील एका कवितेचें इंग्रजी भाषांतर तुमच्या वाचण्यांत आलें असेलच. एकेवेळीं कोणी पुरुष आपल्या प्रियेस भेटण्याकरितां तिच्या घरीं जाऊन त्यानें दारावर थाप मारली. तेव्हां तिनें 'कोण आहे?' असा प्रश्न विचारला. तो ह्मणाला, 'मी अमुक तुझा प्रियकर.' उत्तर देऊन दार उघडेल अशी त्याला अपेक्षा होती; पण ती पुरी न होतां दार बंदच राहिलें. कांहीं दिवसांनीं तो पुन्हां गेला व तींच प्रश्नोत्तरें पुन्हां झालीं व पुन्हांही दार बंद राहिलें. तिसऱ्या वेळीं तो पुन्हां गेला व त्यानें दारावर पुन्हां थाप मारली. पुन्हां आंतून तोच प्रश्न. 'कोण आहे?' त्यावर 'तूंच दाराबाहेर उभी राहून हांका मारीत आहेस. तूं आणि मी हीं दोन नसून एकच आहों' या उत्तरानें शेवटीं दार उघडलें. निराकाराची उपासना केवळ सत्यमार्गानेंच करतां येते. भक्त स्वतः ब्रह्मरूप असल्यामुळें त्यानें या भावनेचा केव्हांही त्याग न करणें हाच सत्य मार्ग. त्याचें सदोदित चिंतन 'अहं ब्रह्मास्मि' हेंच असलें पाहिजे. मी आणि तूं भिन्न

असें त्यानें ह्मणणें हेंच पातक. 'हें सर्व विश्व जसें तूंच आहेस, त्याचप्रमाणें मीहि तूंच आहेस,' असें चिंतन सदोदित करणें हीच निराकार ब्रह्माची उपासना. 'माझ्या इंद्रियद्वारा दिसणारें सर्व विश्व मी, माझ्या भोंवतालचें वातावरण मी, चंद्रसूर्यादि तेजोगोलांतलें तेज मी, सर्व प्रकाश मी, ज्याला इतर लोक चुकीच्या समजुतीमुळें अनेक रूपानें पाहतात, परंतु जें वास्तविक एकच आहे तें ब्रह्म मी आणि सृष्टींतील यच्चयावत् प्राण्यांच्या अंतःकरणांतील 'मी' ही भावना सुद्धां मीच. मला मृत्यु नाहीं आणि निद्राहि नाहीं. मी सदोदित जागा असतों. मी अमर असून माझें सामर्थ्य कधींहि उणें होत नाहीं,' असें चिंतन सदोदित करणें—याशिवाय अन्य कोणतीहि भावना शिल्लक न उरणें, हीच परब्रह्माची उपासना होय. असें चिंतन तुह्मी सदोदित करूं लागलां तर तुमचा जीवन-प्रवाह सगळा बदलून जाईल. आपणा सर्वांना जर आज कशाची अत्यंत जरूर असेल तर ती अत्यंत दृढ अशा श्रद्धेची जरूर आहे. श्रद्धाहीन अंतःकरणें नेहमींच दुर्बळ असतात. मानवी अंतःकरणांत जें दौर्बल्य आहे, तें श्रद्धेच्या अभावामुळें उत्पन्न झालेलें आहे. ब्रह्माच्या उपासनेनें आपल्या अंतःकरणांतील दौर्बल्य समूळ नष्ट होईल. ही उपासना अत्यंत बळावली ह्मणजे आकाश कोसळलें तरी तुमच्या आनंदांत उणेपणा येणार नाहीं. सर्प आणि वाघ यांचें इतरांना भय वाटलें तरी तुह्मी निर्भय व्हाल. सर्प आणि वाघहि तुह्मीच. मग आपलें आपल्यालाच भय कसें वाटेल ? ब्रह्माशीं एकरूप झालेला असेल तोच खरा वीर. त्याचेंच अंतःकरण खरें निर्भय. त्यावांचून इतर कोणीहि निर्भय नाहीं. भगवान् येशु ख्रिस्ताला विश्वासघातानें ज्यांनीं ठार केलें, त्यांनांहि त्यानें आशीर्वाद दिला. खऱ्या निर्भय अंतःकरणाशिवाय ही गोष्ट करणें शक्य आहे काय ? 'मी आणि माझा पिता एकच.' हीच दृढ भावना असल्यावर तेथें भयाचा प्रवेश कोठून होणार ? हीच खरी उपासना. सर्व विश्वाशीं एकरूप होणें हीच आपल्या जीविताची इतिकर्तव्यता. हें समजावयाला बाहेरच्या पुराव्यांचीहि जरूरी नाहीं. आपलें शरीर, आपलें मन आणि आपले विचार हे जितके आपल्या संनिध आहेत, त्याहूनहि परमेश्वराचें सांनिध्य अधिक आहे. तो आहे ह्मणून विचार उद्भवतात आणि मनाला मनपण प्राप्त होतें. कोणत्याहि वस्तूचें यथास्थित ज्ञान मला व्हावयाचें असेल तर तें ब्रह्मज्ञानाशिवाय होणार नाहीं. आपल्या अंतःकरणांतील अत्यंत गूढ अशा भागांत त्याचें वास्तव्य आहे. शरीरें येतात व जातात, सुखें व दुःखेंहि येतात व जातात आणि युगामागें युगहि निघून जातें; पण आपल्या अंतः-

करणांतील तें अत्यंत गूढ तत्व मात्र अमर आहे. 'अहं ब्रह्मास्मि' हें कालस्थलाबाधित सत्य आहे. तें सत्य आहे ह्मणूनच बाकीच्यास सत्यत्व आलें आहे. त्याच्याच आधारानें आपण पाहतों, ऐकतों, आणि विचार करतों. हें तत्व केवळ माझ्या अथवा तुमच्याच अंतःकरणांत आहे असें नाहीं, तर तें अत्यंत क्षुद्र कीटकापर्यंत आणि सर्व अचल सृष्टींतहि भरून उरलें आहे. सत्पुरुषांच्या अंतःकरणांत जसा त्याचा वास आहे, तसाच चोराच्या अंतःकरणांतहि त्याचाच वास आहे. ज्या दिवशीं आपणांस हा अनुभव प्रत्यक्ष येईल, त्या दिवशीं सर्व संशयनिरसन होईल. विश्व हें आपणांस आज मोठें कोडें वाटत आहे; पण 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हेंच त्या कोड्याचें उत्तर तुह्मांस शेवटीं सांपडेल. हें एकवेळ समजलें ह्मणजे आणखी समजावयाचें असें कांहींच उरत नाहीं. आज सर्व भौतिकशास्त्रांनीं उत्पन्न करून ठेवलेलें ज्ञान हें ज्ञानमार्गाचा शेवट नव्हे. खरें ज्ञान त्यापलीकडे आहे. भौतिकशास्त्रांचें ज्ञान हें खऱ्या ज्ञानमंदिराच्या पायरीसारखें आहे. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' असा अनुभव होणें हेंच खरें ज्ञान.

आर्यज्ञानमंदिराची सोपानपंक्ति.

कोणत्याही धर्माचा अगदीं आरंभकालचा इतिहास अवलोकन केला तर त्यांत 'ईश्वरी प्रेरणा' अथवा 'ईश्वरानें दिलेला ग्रंथ' अशा प्रकारच्या कल्पनांचा उद्भव झाल्याचें आढळून येतें. अगदीं रानटी स्थितींतील लोकांच्या धर्मकल्पनांशीं आपणास कांहीं कर्तव्य नाहीं, हें उघडच आहे; कारण त्यांना धर्म ही संज्ञाहि देणें मुष्किलीचें आहे. परंतु धर्म या संज्ञेस पात्र असलेल्या कल्पनांचा इतिहाससुद्धां आरंभीं सांगितल्याप्रमाणें आहे. परमेश्वराच्या अस्तित्वाची कल्पना ही एकंदर धर्मविषयक कल्पनांच्या मुळाशीं असल्याचें आढळतें. आपल्या नजरेनें दिसणारें हें विश्व निर्माण करणारा कोणी तरी असावा, ही कल्पना एकंदर धर्मकल्पनांच्या पायासारखी असून, पुढील सर्व इमारत याच मूलभूत पायावर रचिली गेली. यानंतर आत्म्याच्या कल्पनेचा उद्भव झाला. शरीर जड आहे असा अनुभव असल्यामुळें त्यांत चैतन्यरूप असा आत्मा त्याहून निराळा असला पाहिजे ही कल्पना साहजिक रीतीनेंच उत्पन्न झाली.

या कल्पना धर्मांच्या आरंभकालाच्या द्योतक आहेत. हिंदुधर्माच्या इतिहासांतहि अशा प्रकारच्या कल्पनांचा उद्भव झाला होता; परंतु त्यांचें स्वरूप लवकरच बदललें. तें इतकें कीं तो काल आतां निवळ कल्पनेनेंच जाणला पाहिजे. सांप्रतच्या हिंदुधर्माचा आरंभ या कल्पनांपासून झाला नसून त्यांचें विशिष्टस्वरूप अगदीं वेगळ्या प्रकारचें आहे. हिंदुधर्माला धर्म ह्मणून जें विशिष्टरूप प्राप्त झालें तें आरंभकालच्या ईश्वरविषयक कल्पनांमुळें नसून त्यानंतर जो कल्पनासमूह अस्तित्वांत आला त्यावरून प्राप्त झालें आहे. सृष्टीच्या उत्पत्तीबद्दलची पहिली कल्पना पाहिली, तर ती शून्यांतून परमेश्वरानें निर्माण केली, अशा प्रकारची आहे. सृष्टीच्या पूर्वी केवळ शून्य होतें आणि परमेश्वरानें केवळ आपल्या इच्छेनें सृष्टि निर्माण केली. ही आरंभींची सृष्टीच्या उत्पत्तीची कल्पना आहे; परंतु कांहीं काल लोटल्यानंतर या कल्पनेच्या सत्यत्वाबद्दल शंका येण्यास सुरुवात झाल्याचें आढळून येतें. आरंभीं कांहींच नव्हतें, तर त्यांतून सृष्टीची उत्पत्ति झाली कशी? ही शंका उपस्थित झाली. तोच वेदांतमताचा * आरंभकाल होय. विश्वाला

* वेदांत या शब्दानें सामान्यतः अद्वैतमताचा बोध होतो; तथापि द्वैत आणि विशिष्टाद्वैत या अद्वैतमताच्याच खालच्या पायऱ्या आहेत असें स्वामीजींचें मत असल्यामुळें त्यांनीं 'वेदांत' या शब्दानें या तिन्ही मतांचा समुच्चयानें उल्लेख येथें केला आहे.

अस्तित्व असेल तर तें कशांतून तरी निर्माण झालें असलें पाहिजे. कारण केवळ नास्तित्वांतून अस्तित्व उत्पन्न होणें शक्य नाहीं, हा आपणांस नित्याचा अनुभव आहे. आपणांला कांहीं वस्तु निर्माण करावयाची असली तर तिचे निरनिराळे घटक आपणांस आपल्या हातानें जमवून एकत्र करावे लागतात. एखादें घर बांधलें अथवा एखादें जहाज तयार केलें, तर त्या त्या वस्तूंना लागणारें कच्चें सामान पूर्वींच तयार असतें व ज्या हत्यारांनीं ती वस्तु आपण निर्माण केली, तीं हत्यारेंहि त्या वस्तूच्या पूर्वींच अस्तित्वांत असतात. अशी कारणपरंपरा एकत्र करून तिच्या साहाय्यानें आपण ती विशिष्ट वस्तु उत्पन्न करतों. ह्मणजे कार्यरूप वस्तूच्या आरंभीं कारणरूप वस्तूचें अस्तित्व असलेंच पाहिजे, हा आपणांस नित्य अनुभव आहे. याकरितां जग हें शून्यांतून निर्माण झालें, ही कल्पना विवेचकबुद्धीच्या कसोटीस उतरण्यासारखी नसल्यामुळें ती निकालांत काढली गेली, आणि जग या कार्यरूप वस्तूच्या कारणरूप वस्तू काय असाव्या याचा शोध पुढें चालू झाला. धर्मांचा इतिहास पाहिला तर वस्तुतः या मूळ वस्तूच्या शोधांतच सर्व धर्म गुंतले आहेत असें आढळून येईल. हें जग परमेश्वरानें निर्माण केलें असें घटकाभर गृहीत धरलें तरी त्यानें तें कशांतून निर्माण केलें, हा प्रश्न शिल्लक उरतोच. अनेक तत्वशास्त्रांनीं आपापल्यापरी या एकाच प्रश्नाचें चर्वितचर्वण केलें आहे. कोणी असें ह्मणतात कीं, सृष्टि, परमेश्वर आणि आत्मा (जीव) हीं तिन्ही सत्यरूप असून अनाद्यनंत आहेत. यांपैकीं एकासहि अंत नाहीं. तसेंच सृष्टि आणि जीव हीं परमेश्वरावर अवलंबून असून परमेश्वराचें अस्तित्व मात्र स्वतंत्र आहे. ज्याप्रमाणें सृष्टींतील एखाद्या जड परमाणूचें अस्तित्व परमेश्वराच्या मर्जीवर अवलंबून आहे, त्याचप्रमाणें जीवाचें अस्तित्वहि परमेश्वरावरच अवलंबून आहे. हें एका पक्षाचें ह्मणणें झालें. यांपैकीं फक्त जीवविषयक कल्पनेचाच आपण सध्या विचार करूं. आर्यावर्तांत जरी अनेक मतें आणि दर्शनें प्रचलित आहेत, तरी त्या सर्वांना सांख्यदर्शन हें सारखेंच मान्य आहे. किंबहुना सर्व मतांची उभारणी सांख्यमताच्याच पायावर झाली आहे. आपणांस कोणत्याहि वस्तूचा बोध होतो तेव्हां ती वस्तू प्रथम बाह्येंद्रियास गोचर होऊन त्यांच्याद्वारें त्या इंद्रियांचे गोलक अथवा अंतरिंद्रियें जागीं होतात. हीं अंतरिंद्रियें मनास चेतवितात, मन बुद्धीवर आघात करतें आणि तो आघात बुद्धि आत्म्यास पोहोंचविते. इतकी परंपरा पूर्ण झाली ह्मणजे आत्म्याला त्या वस्तूची जाणीव उत्पन्न होते, असें सांख्यांचें मत आहे. वस्तुबोध ज्या ज्या इंद्रियांनीं होतो त्या त्या इंद्रियांचे स्वतंत्र गोलक

(centres) मेंदूंत असतात, ही गोष्ट अर्वाचीन शास्त्रांनीं सिद्ध केल्याचें आपणांस अवगत आहेच. या गोलकांत दोन प्रकार असल्याचें अर्वाचीन शास्त्रांनीं सिद्ध केलें आहे. सांख्यमताच्या अंतरिंद्रिय आणि मन या प्रकारांशीं त्या दोन प्रकारांचें अत्यंत साम्य आहे. परंतु या दोहोंचाहि चालक असा मध्यवर्ती पदार्थ अर्वाचीन शास्त्रांस अद्यापि सांपडला नाहीं. मेंदू तपासून पाहिला तर त्यांत बाह्येंद्रियांचे गोलक सांपडतात ही गोष्ट खरी; पण त्या सर्वांच्या जागा निरनिराळ्या असून मेंदूंत कोठें तरी ते एकत्र होत असल्याचें आढळून येत नाहीं. तसेंच अमुक एक गोलक (centre) मध्यवर्ती असून इतर त्याच्या अनुरोधानें चालतात असेंहि आढळून येत नाहीं. हिंदु तत्ववेत्त्यांचें ह्मणणें खोडून काढण्यास अर्वाचीन शास्त्रांजवळ पुरेशी सामुग्री नाहीं असें एवढ्यापुरतें तरी कबूल करणें भाग आहे. या सर्वांचा चालक असा कोणी तरी असला पाहिजे हें निर्विवाद आहे. नाहीं तर सर्वांची फाटाफूट होऊन देहबंधहि उरणार नाहीं. असा चालक माझ्या देहांत नसला तर तुह्मांकडे पाहून 'हे अमुक' असा निश्चय कोण करतो ? 'हें चित्र' 'हा मनुष्य' इत्यादि निश्चय करणारा कोणी तरी मध्यवर्ती चालक असलाच पाहिजे. मेंदूंतील गोलक प्रत्येकीं स्वतंत्र असते तर आपल्या अनेक क्रिया एकाच वेळीं चालणें अशक्य झालें असतें. पाहत असतां आपणांस ऐकूं आलें नसतें आणि श्वासोच्छ्वास करीत असतां पाहण्याची क्रिया बंद पडली असती. अशा रीतीनें आपली प्रत्येक क्रिया दुसरीपासून अगदीं स्वतंत्र रीतीनें घडून आली असती. यावरून गोलक प्रत्येकीं स्वतंत्र असणें शक्य नाहीं हें सिद्ध होतें. एवढेंच नव्हे तर ते सर्व जेथें एकत्र होतात व ज्याच्या अनुरोधानें ते आपापल्या क्रिया सरळ रीतीनें पार पाडतात असें एक ठिकाण असलें पाहिजे, हें निर्विवाद सिद्ध होतें.

हा आपला देह अनेक परमाणूंचा बनला असून तो जड व निर्विकार्य आहे. ज्याप्रमाणें हा स्थूल देह जड आहे, त्याचप्रमाणें याच्या आंत एक सूक्ष्म देह आहे असें वेदांतशास्त्राचें मत आहे. हा आंतला देहहि सूक्ष्म असला तरी जडच आहे. तो अत्यंत विरल पदार्थांचा बनला असून स्थूल देह त्याहून अधिक घन पदार्थांचा बनला आहे एवढाच त्यांच्यांत फरक आहे. सूक्ष्म देह इतका विरल आहे कीं, अत्युच्च प्रतीच्या सूक्ष्मदर्शक यंत्रांतूनहि तो दिसणार नाहीं. सूक्ष्मतरंग एकत्र सांठवून ठेवणें हें त्या देहाचें कार्य आहे. ज्याप्रमाणें स्थूल देह स्थूल पदार्थांचें आश्रयस्थान आहे त्याचप्रमाणें सूक्ष्म देह हा सूक्ष्म ह्मणजे अत्यंत विरल—केवळ तरंगरूप—अशा पदार्थांचें आश्रयस्थान आहे. याच पदार्थांस विचार

ही संज्ञा आपण देतों. स्थूल देह ज्या वस्तूंचा बनला आहे, त्या वस्तु जड असून त्यांच्याद्वारें प्रकट होणारी शक्ति ही सुद्धां जडरूपच आहे. शक्तीचा प्रत्यय स्थूल पदार्थांच्या आश्रयावांचून होत नाहीं. शक्ति ही पदार्थाश्रित आहे. जी शक्ति स्थूलरूपानें स्थूल देहांत प्रत्ययास येते, तिचेंच अस्तित्व सूक्ष्मरूपानें सूक्ष्म देहांत असतें. तिचें रूप सूक्ष्म असतें तेव्हां त्यास आपण विचार ही संज्ञा देतों व तोच विचार स्थूल देहांत स्थूलरूपानें प्रत्यक्ष दिसला ह्मणजे त्यास क्रिया ह्मणतों. कोणास मारावें असा विचार माझ्या मनांत उद्भवला कीं त्या विचारशक्तीचें स्थूल देहांत स्थूलरूपानें रूपांतर होऊन ती शक्ति आघातरूपानें दृग्गोचर होते. मूळशक्ति विरलरूपानें सूक्ष्म देहांत होती, तेव्हां तिला विचार हें नांव होतें; व तीच स्थूलरूपांत आल्याबरोबर क्रिया ही संज्ञा पावली. शक्तीचा स्थूल अथवा सूक्ष्म प्रत्यय येण्यास तिला स्थूल अथवा सूक्ष्म पदार्थांचा आश्रय करावा लागतो. यारीतीनें शक्ति मूलतः एकरूप असतां भिन्न पदार्थांच्या आश्रयामुळें ती भिन्नरूपानें असते इतकेंच. तसेंच सूक्ष्म देह आणि स्थूल देह यांतहि वस्तुतः कांहीं फरक नाहीं. हे दोन्ही ज्या पदार्थांचे बनले आहेत, ते पदार्थ विधर्मी नाहींत. त्यांत फरक इतकाच कीं त्या पदार्थांचें एक रूप अत्यंत विरल असल्यामुळें दिसत नाहीं व दुसरें रूप घन असल्यामुळें दिसतें. ह्मणजे त्यांतील भेद गुणधर्ममूलक नसून दृष्टिमूलक मात्र आहे. पाणी घनरूप असल्यामुळें दिसतें, पण त्याचीच वाफ अत्यंत विरलरूप झाली ह्मणजे ती दिसत नसूनहि गुणधर्मदृष्ट्या तें जसें पाणीच असतें, त्याप्रमाणें सूक्ष्म देह आणि स्थूल देह यांत एक अदृश्य असून दुसरा दिसतो इतकाच फरक आहे. आतां या देहद्वयांत जी शक्ति प्रत्ययास येते, ती कोठून येते, या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. वेदांतमताप्रमाणें एकंदर सृष्टींत दोन पदार्थ आहेत. एक आकाश आणि दुसरा प्राण. यांपैकीं आकाश अत्यंत विरल परंतु जडस्वभाव आहे आणि प्राण हा शक्तिस्वभाव आहे. आपण जें कांहीं पाहतों, ऐकतों अथवा ज्याला आपण स्पर्श करूं शकतों, ते सर्व पदार्थ आकाशांतून निर्माण झाले आहेत. प्राणशक्तीशीं संयोग झाला ह्मणजे आकाशच विरल अथवा घनस्वरूप धारण करतें. आकाश सर्वव्यापी आहे. तें नाहीं असें ठिकाणच कोठें नाहीं. त्याचप्रमाणें प्राणहि सर्वव्यापी आहे. आकाशाला पाण्याची उपमा दिली तर पृथिव्यादि सर्व दृश्य पदार्थ बर्फासारखे आहेत असें ह्मणतां येईल. बर्फाचे लहान मोठे व निरनिराळ्या आकाराचे तुकडे ज्याप्रमाणें पाण्यांत तरंगत असतात त्याचप्रमाणें पृथिव्यादि जड पदार्थ

आकाशांत तरंगत असून ते प्राणाच्या संयोगानें आकाशांतूनच निर्माण झाले आहेत. स्थूल देह हें आकाशाचेंच स्थूलरूप असून त्यांत प्राणाची स्थूलशक्ति, हंसणें, बोलणें, धांवणें इत्यादि जडरूपानें प्रत्ययास येते. त्याचप्रमाणें सूक्ष्मदेहहि आकाशाचेंच सूक्ष्मरूप असून त्यांतून मननचिंतनादि सूक्ष्म प्राणव्यापार प्रत्ययांस येतात. स्थूल देह हा बाहेरचा दृश्यदेह असून त्यांत स्थूलशक्तीचा दृक् प्रत्यय येतो, त्याच्या आंत सूक्ष्म देह असून त्यांत सूक्ष्मशक्तीचा प्रत्यय येतो; व त्या पलीकडे या शक्तीचा मध्यवर्ती चालक जीव हा असतो. आपलीं नखें आपण पुनःपुनः काढून टाकलीं तरी त्यांची जशी पुनःपुनः वाढ होते व तीं जशीं आपल्या स्थूल देहाचाच भाग असतात, त्याचप्रमाणें स्थूलदेह हा सूक्ष्मदेहाचाच भाग आहे. मला ज्याप्रमाणें आपलीं नखें कितीहि वेळां काढून टाकतां येतात त्याप्रमाणें स्थूल देहाचा त्यागहि मला अनेक वेळां करतां येतो. स्थूल देह नाहींसा झाला तरी त्याबरोबर सूक्ष्मदेह मात्र जाणार नाहीं. प्रत्येक मनुष्याला स्थूल व सूक्ष्म देह आहेत असें ह्मटलें ह्मणून ते दोन परस्पर भिन्न देह आहेत असें समजूं नये. अमुक हा स्थूल देह, हें जसें अंगुलिनिर्देशानें दाखवितां येतें, त्याप्रमाणें सूक्ष्म देह दाखवितां येणार नाहीं. कारण त्याचें अस्तित्व निराळें नसून तो स्थूलदेहाला सर्वत्र व्यापून आहे. अशारीतीनें प्रत्येक मनुष्यांत स्थूलदेह, सूक्ष्मदेह आणि जीव अशी त्रयी वास करीत आहे. यांपैकीं स्थूल देह हा लवकर नष्ट होणारा असून सूक्ष्म देह हा बराच काल टिकणारा आहे. आणि जीव हा अमर आहे. परमेश्वर ज्याप्रमाणें अनाद्यनंत आहे, त्याचप्रमाणें जीवहि अनाद्यनंत आहे असें वेदांताचें मत आहे. त्याचप्रमाणें सृष्टीहि अनाद्यनंत आहे, परंतु तिच्या रूपांत बदल होत असतो. त्याचप्रमाणें ज्यांची ही सृष्टि बनली आहे ते प्राण आणि आकाश हीं सुद्धां अनाद्यनंत असून त्यांच्या स्वरूपांतहि एकसारखा बदल सुरू आहे. परंतु जीव हा, आकाश आणि प्राण यांपासून बनला नसून तो केवळ चैतन्यरूप व अनाद्यनंत आहे. आकाश आणि प्राण यांच्या मिश्रणानें जीवाची उत्पत्ति झाली नाहीं ह्मणूनच तो अमर आहे. कारण मिश्रपदार्थांत कालेंकरून बदल होत जातो व शेवटीं तो आपल्या कारणास परत जातो. मिश्रपदार्थांचें रूपांतर न होणें हें अपरिहार्य आहे. यासाठीं स्थूल देह हा केव्हांना केव्हां अदृश्य होणारच. त्याचप्रमाणें सूक्ष्मदेहहि कालेंकरून नष्ट होईल. पण जीव मात्र केवळ मूलरूप असल्यामुळें—मिश्र पदार्थ नसल्यामुळें—नष्ट होणार नाहीं. याच कारणाकरितां जीव अजन्मा आहे.

जें स्वतः केवलरूप–मूलरूप–आहे त्याला जन्म शक्य नाहीं व म्हणून तो मरणारहि नाहीं. मिश्रपदार्थांतच जन्म आणि मृत्यु हीं संभवतात. कोट्यवधि जीवांवर ईश्वराचा तावा आहे. परमेश्वर निराकार, सर्वव्यापी, आणि सर्वांतरात्मा असा आहे. सृष्टि हें त्या परमेश्वराचें उपकरण असून त्याच्याद्वारें घडामोडीचा अखंड उद्योग तो करीत आहे. हें सर्व विश्व त्याच्या इच्छेवरच अवलंबून आहे, अशाप्रकारचें द्वैतवाद्यांचें मत आहे. हें त्यांचें म्हणणें कबूल केलें तर साहजिकच असा प्रश्न उद्भवतो कीं, जर परमेश्वर या सर्वांचा शास्ता आहे तर जगांत इतका दुष्टपणा शिल्लक कसा राहिला आणि आपणा सर्वांस अनेक प्रकारचीं दुःखें कां भोगावीं लागतात? यावर द्वैतवादी म्हणतात ‘ हा परमेश्वराचा अपराध नाहीं. आपणच आपल्या दुःखाचें कारण आहों. जसें पेरावें तसें उगवतें हा न्यायच आहे. मनुष्यावर संकटें यावीं ही परमेश्वराची इच्छा नाहीं. पूर्वींच्या जन्मीं केलेल्या कृत्यांस अनुसरून त्यास चालू जन्म मिळाला आहे. जीव हा अजन्मा आहे. त्यास कोणीं उत्पन्न केलें नाहीं. तो स्वतः जीं कर्में करतो त्याचींच फळें त्यास भोगावीं लागतात. अनंतकाल तो अनंत कर्में करीत असून त्यांचीं फळें भोगीत आहे. त्यानें चांगलीं कर्में केलीं तर त्यास सुखाची प्राप्ति होते आणि कुकर्मांनीं त्यास दुःख प्राप्त होतें. अशारीतीनें अनंतकाल सुखदुःखांची यात्रा जीव करीत आहे.’

जीव हा स्वभावतः पवित्र आहे, ही गोष्ट सर्व वेदांत्यांस कबूल आहे. जीव स्वभावतः पवित्र असून अज्ञानानें तो आवृत झाला आहे. कुकर्में ज्याप्रमाणें अज्ञानास कारण होतात त्याचप्रमाणें शुभ कर्मेंहि अज्ञानास कारण होतात. कालांतरानें स्वतःचें खरें स्वरूप त्यास समजतें. जीव हा ज्याप्रमाणें वस्तुतः अजन्मा आणि अमर त्याचप्रमाणें तो स्वभावतः पवित्र आहे.

सत्कर्मांच्या आचारानें दुष्कर्मांचे परिणाम नष्ट होतात आणि जीव अधिक शुद्ध स्वरूप होऊन देवयानांत प्रवेश करतो. त्याचीं सर्व इंद्रियें मनांत लीन होऊन राहतात. शब्दहि मनांत लीन होऊन राहतो. शब्दाबरोबर विचारहि आपोआप लीन होतात. शब्दांवांचून आपणांस विचार करतां येत नाहीं, ही गोष्ट आपल्या अनुभवाची आहे. जेथें विचार उत्पन्न होतो तेथेंच शब्दहि उत्पन्न होतो. या रीतीनें शब्द आणि विचार आपणांत लीन करून घेऊन मन स्वतः प्राणांत लीन होतें आणि प्राण जीवांत लीन होतात. इतकी तयारी झाली म्हणजे त्या दशेस आपण मृत्यु असें नांव देतों. मृत्यूनंतर जीव देहांतून बाहेर पडून

सूर्यलोकास जातो. सृष्टिमालिकेंत अनेक लोकांचा अंतर्भाव झालेला आहे. आपण ज्यावर आहों तो मृत्युलोक; त्यानंतर सूर्यलोक आहे; आणि त्यानंतर चंद्रलोक असून त्याच्यापुढें विद्युल्लोक आहे. येथें त्यास त्याच्याहून अधिक पवित्र जीव भेटून तो सर्वांत उच्च अशा ब्रह्मलोकास घेऊन जातो. येथें ज्या जीवाचा प्रवेश होतो तो जन्ममृत्यूंतून सुटून त्याचा ब्रह्मलोकांत चिरकाल वास असतो. तेथें त्यास सर्व सिद्धी प्राप्त होतात; परंतु सृष्टि निर्माण करण्याचें सामर्थ्य मात्र त्यास नसतें. विश्वाचा उत्पन्नकर्ता एकटा परमेश्वरच आहे. कोणत्याहि जीवास परमेश्वर होतां येत नाहीं. मनुष्य परमेश्वर होऊं शकतो असें ह्मणणें पापात्मक आहे असें द्वैतवाद्यांचें मत आहे. जीवाला सर्व प्रकारचें सामर्थ्य प्राप्त झालें तरी त्यास जग उत्पन्न करण्याचें सामर्थ्य मात्र कधींहि प्राप्त होणार नाहीं. फार झालें तर आपल्या इच्छेप्रमाणें शरीरधारी होऊन त्यास जगांत अवतरतां येतें. त्याला कोणत्याही देवांस अथवा स्वतःच्या पितरांस भेटण्याची इच्छा झाली तर त्याच्या शब्दाबरोबर ते जीव त्याच्यापुढें हजर होतात. त्याला कोणत्याहि प्रकारचें दुःख प्राप्त होत नाहीं व त्याची इच्छा असल्यास अनंतकाळपर्यंत त्याला ब्रह्मलोकांत राहतां येतें. परमेश्वराच्या अत्यंत कृपेंतला असा तो जीव असतो. त्याला कोणतेंहि कर्म करावयाचें नसतें. तो अत्यंत पवित्र आणि निःस्वार्थी असा झालेला असतो. त्याचें काम ह्मटलें तर फक्त परमेश्वराचें भजन करणें इतकेंच. याच्या खालच्या पायरीचे पवित्र जीव कार्यरत असतात व त्या कार्यांपासून फलप्राप्ति व्हावी अशी त्यांची इच्छा असते. कोणाला कांहीं दान केलें तर त्याबद्दल स्वर्गप्राप्ति व्हावी असें त्यांस वाटत असतें. असे लोक मृत्यूनंतर चंद्रलोकास जातात व तेथें पुष्कळ काळपर्यंत सुखानें राहतात. चांगल्या कर्मांचीं फळें संपेपर्यंत त्यांचा तेथें वास होतो. चांगलीं फळें भोगून झाल्यानंतर ते पुनः मृत्युलोकांत परत येतात व शिल्लक राहिलेल्या फळांप्रमाणें त्यांस बरा वाईट जन्म येतो. चंद्रलोकांत गेलेल्या जीवास आह्मी देव ही संज्ञा लावतों. खिश्चन किंवा मुसलमान लोकांत देवदूतांची (Angel) जी कल्पना आहे तिच्याच तोडीची ही देवांची कल्पना आहे. हिंदूंच्या पुराणांत जीं देवांचीं वर्णनें आहेत, त्यांवरून त्यांस मिळालेलीं नांवें पदवीचीं दर्शक आहेत असें आढळून येतें. जसें इंद्र या नांवानें एका विशिष्ट पदवीचा बोध होतो. ती पदवी प्राप्त होण्यास जरूर असणारीं कर्में करून कोणासहि इंद्राची पदवी प्राप्त करून घेतां येते. वेदांनीं सांगितलेलीं विशिष्ट कर्में केलीं ह्मणजे तो मनुष्य इंद्रपदास योग्य

होतो; व तोंपर्यंत पूर्वीच्या इंद्राचीं शुभ फळें संपून तो पुन्हां मनुष्य होतो. ज्याप्रमाणें आपल्या या मृत्युलोकांत राजांच्या अदलाबदल्या होतात, त्याचप्रमाणें देवलोकांतहि तशाच प्रकारच्या घडामोडी नित्य सुरू असतात. आपणांस ज्याप्रमाणें मृत्यु येतो, त्याप्रमाणें देवांसहि मृत्यु गांठतो. ज्या ठिकाणीं मृत्यूचें वारें नाहीं, अशी जागा ह्मटली तर एक ब्रह्मलोकच आहे. मृत्युलोकांत आणि देवलोकांत फारसा फरक नाहीं असें पुराणांतरीं लिहिलेल्या कथांवरून आढळून येतें. देवलोकांत देवांचीं आणि दानवांचीं युद्धें नेहमीं चालू असतात. दानवांनीं देवांचा अनेक वेळां पराभव केला असल्याचें दिसून येतें; तथापि देवांनीं आपलें वर्चस्व नेहमीं कायम ठेवल्याचें दिसतें. असें आहे तरी देवांनीं दानवांपेक्षांहि अधिक वाईट कृत्यें केल्याचे दाखले सांपडतात. देव स्त्रियांचे मोठे चहाते होतेसें दिसतें. अशा रीतीनें सर्व सत्फलांचा व्यय झाला ह्मणजे देवलोकीं गेलेले जीव पर्जन्याच्या पाण्यांतून अथवा अन्य प्रकारें मृत्युलोकास येऊन पुन्हां मनुष्यजन्मास येतात. जगांत दुष्कर्में करणारीं माणसें पशूंच्या योनींत जन्म घेतात. त्यांचीं दुष्कर्में अगदींच वाईट प्रतीचीं असलीं तर त्यांस अगदीं क्षुद्र प्राण्यांचा अथवा वनस्पतींचा जन्म येतो.

देवयोनी ही मनुष्यापेक्षां अधिक उच्च दर्जाची असली तरी ती केवळ भोगयोनी आहे. मनुष्ययोनीप्रमाणें ती कर्मयोनी नाहीं. कर्म ह्मणजे ज्यापासून पुढील स्थितीवर कांहीं परिणाम होतो तें कर्म. मनुष्ययोनींत केलेल्या कर्मानुसारें कोणी एखादा देवयोनींत गेला, तर तेथें केलेल्या कर्मांचीं फळें भोगण्यापेक्षां त्यास कांहीं अधिक कर्तव्य नसतें. देवयोनींत असतां नवीन फलदायक असें कोणतेंहि कर्म करतां येत नाहीं. चांगल्या कर्मांचीं फळें भोगून संपलीं ह्मणजे सामान्य कर्में फलद्रूप व्हावयास लागून त्याला पुन्हां मानवयोनींत जन्मास घालतात. तेथें त्यानें चांगलीं कर्में करावीं आणि ब्रह्मलोकास जावें. देवयोनींत असतां ब्रह्मलोकाची प्राप्ति होणें शक्य नाहीं.

अगदीं खालच्या कोटींतून उच्चतर कोटीकडे प्रवास करीत असतां प्राण्यास मध्यें पशुयोनीचा आश्रय करावा लागतो. तेथून क्रमाक्रमानें तो प्राणी मनुष्ययोनीस प्राप्त होतो. पशूंची संख्या कमी होत आहे आणि मनुष्यांची वाढत आहे, ही गोष्ट येथें विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. याचें कारण पशूंचे आत्मे हळुहळू मानवयोनींत प्रवेश करीत आहेत हेंच आहे. पशूंच्या कित्येक

जाति नामशेष झाल्या आहेत; त्या कोठें गेल्या ? त्यांचा प्रवेश आतां मानवयोनींत झाला आहे.

वेदग्रंथांतून नरकाचा उल्लेख सांपडत नाहीं. परंतु पुराणांत अनेक प्रकारच्या नरकांचें वर्णन सांपडतें. जणूं काय नरकवर्णनावांचून धर्मास पूर्णत्व येत नाहीं ! कित्येक यातनांचेंहि वर्णन पुराणग्रंथांतून केलें आहे. कित्येक नरकांत मनुष्यांस अर्धेअर्धे कापण्यांत येतें. कित्येक ठिकाणीं त्यांस भाजण्यांत येतें. पण एवढ्या सपाट्यांतहि त्या प्राण्यास मरण येत नाहीं. पण अशा यातनांचाहि शेवट होण्याचा काळ केव्हां तरी येत असल्याचें आश्वासन पुराणांनीं दिलें आहे, ही त्यांची मोठी मेहेरबानीच ह्मणावयाची ! अशा स्थितींत वाईट कर्मांचीं फळें भोगून संपल्यावर ते प्राणी पुन्हां मानवयोनींत जन्मतात. अशा रीतीनें मानवयोनी ही सर्व योनींत श्रेष्ठ गणली गेली आहे. ब्रह्मलोकप्राप्तीचा संभव मानवयोनीहून इतर कोणत्याहि योनींत नाहीं. मानवयोनी ही कर्मयोनी असून तेथें सुख अथवा दुःख यांची प्राप्ति करून घेणें आपल्याच हातीं असतें. अखंड मंडलाकार मायाचक्रांत सांपडलेल्या जीवांस मानवयोनी हें विश्रांतिस्थानासारखें असून येथून पुढील मार्ग ठरवावयाची त्यांस मुभा मिळालेली आहे. यामुळेंच मानवयोनी ही देवयोनीपेक्षांहि श्रेष्ठ मानण्यांत आली आहे.

येथवर द्वैतमताचें सामान्य निरूपण केलें. आतां यापुढें वेदांतांतील अधिक उच्च मताचा विचार करूं. द्वैतमतावर जे आक्षेप येतात, त्यांचें सामान्य दिग्दर्शन येथें करावयास पाहिजे. परमेश्वर हा अनंत आहे, तसेंच सृष्टि अनंत आहे आणि जीवहि अनंत आहे, हें तुमचें ह्मणणें कबूल करतां येण्याजोगें नाहीं. तसें कबूल केलें तर अनेक वस्तु अनंत आहेत असें ह्मणणें भाग पडून अनवस्था दोष होतो. असें ह्मणणें न्यायशास्त्रासहि अनुसरून नाहीं. याकरितां परमेश्वर विश्वबाह्य मानणें योग्य नाहीं. तो विश्वांतच असून त्याचें प्रत्यक्ष कारण आहे. विश्व त्याच्या बाहेर नसून तोच विश्वरूपानें दिसूं लागला असें मानणें युक्तीस अधिक धरून आहे. यावर असा एक आक्षेप निघतो कीं, ' परमेश्वर भिंत, टेबल, डुक्कर, चोर इत्यादि झाला आहे काय ? परमेश्वराच्या ठिकाणीं इतक्या दुर्गुणांचा वास संभवतो काय ?' त्यावर आमचें उत्तर असें आहे. मला आत्मा आहे आणि शरीरहि आहे ही गोष्ट खरी; तथापि हें शरीर ह्मणजे खरा 'मी' नव्हे. मी बालतारुण्यादि अवस्थांतून वार्धक्यांत प्रवेश करतों. अशा रीतीनें माझें शरीर बदललें तरी खरा ' मी ' ह्मणजे आत्मा मात्र केव्हांहि बदलत

नाहीं. माझ्या बाल्यावस्थेंत जें माझ्या आत्म्याचें स्वरूप असतें. तेंच तारुण्यांत आणि वार्धक्यांतहि असतें. त्याचप्रमाणें हें सर्व दृश्य विश्व आणि कोट्यवधि जीव मिळून परमात्म्याचें एक शरीरच आहे. या सर्वांत त्याचाच वास आहे. शरीरांत बदल झाला ह्मणून परमात्मस्वरूपांत बदल झाला पाहिजे असें नाहीं. जीवाच्या आणि सृष्टीच्या स्वरूपांत बदल होत असला तरी परमात्म्यांत त्यामुळें यत्किंचितहि बदल होण्याचें कारण नाहीं. सृष्टींत बदल होतो असें आपण ह्मणतों, पण बदल होतो याचा अर्थ काय ? याचा अर्थ इतकाच कीं सृष्टपदार्थांचें रूपांतर होतें. एकरूप बदलून त्याजागीं दुसरें रूप येतें इतकेंच. पण आत्म्याचें असें रूपांतर कधींच होत नाहीं. अज्ञानाच्या आवरणानें त्याचें स्वरूप आकुंचित दिसतें; आणि ज्ञानानें तें प्रसरण पावल्यासारखें दिसतें. आत्म्याच्या स्वरूपांत बदल ह्मटला तर इतकाच. वाईट कर्मांनीं आत्म्याचें आकुंचन होतें. ज्या कर्मांनीं आत्म्याचें पूर्णरूप आकुंचित होतें, तीं सर्व कर्में पापकर्में होत; तसेंच ज्या कर्मांनीं आत्म्याचा प्रकाश अधिक उज्वल होण्यास मदत होते तीं सत्कर्में होत. सर्व जीवात्मे प्रथम पवित्रच होते. पापकर्मांच्या आश्रयानें ते आकुंचन पावले आहेत; परंतु सत्कर्मांनीं परमात्म्याची कृपा त्यांनीं संपादन केली ह्मणजे ते पुन्हां पवित्र होतील. अशा रीतीनें स्वतःस पवित्र करून घेणें प्रत्येक जीवात्म्यास शक्य आहे. अशा रीतीनें जीवात्मा, पूर्ण व पवित्र झाला, तरी बाकीची सृष्टि पूर्वीप्रमाणेंच अनंतकाल चालू राहील. वेदांतांतील ही पुढची पायरी आहे. पूर्वी सांगितलेल्या मतास द्वैत अशी संज्ञा असून या दुसऱ्या मतास विशिष्टाद्वैत अशी संज्ञा आहे. विशिष्टाद्वैतमताप्रमाणें परमात्मा, सृष्टि आणि जीव या त्रयीचें मिळून एक परमात्मशरीर बनलें आहे. ही द्वैताच्या वरची पायरी आहे. द्वैतमताप्रमाणें सृष्टि ही एखाद्या यंत्राप्रमाणें असून परमेश्वर या यंत्राचा चालक आहे. विशिष्टाद्वैतमताप्रमाणें परमेश्वर विश्वबाह्य नसूनं विश्वांतच भरून राहिला आहे.

या दोन मतांनंतरची पायरी अद्वैतमताची आहे. परमेश्वर विश्वांतच भरून राहिला आहे, हें विशिष्टाद्वैताचें ह्मणणें अद्वैतमतासहि मान्य आहे. परंतु सृष्टि आणि जीवात्मे हे परमात्म्याच्या शरीरासारखे असून त्यांत बदल होतो व परमात्म्यांत बदल होत नाहीं हें विशिष्टाद्वैतमताचें ह्मणणें अद्वैतवादी कबूल करीत नाहींत. त्यावर ते अशी शंका घेतात कीं परमात्मा जर या विश्वाचें प्रत्यक्ष कारण असेल तर कारण व कार्य यांच्या स्वभावांत फरक कां व्हावा ? कारण आणि कार्य हीं नेहमीं एकस्वभाव असतात. परिस्थितीनें कारणाचेंच कार्यांत रूपांतर होतें. मग

परमेश्वर या सृष्टीचें कारण आहे, हें आपण कबूल केलें, तर कारणच कार्यरूप होऊन ही सृष्टि निर्माण झाली हें आमचें ह्मणणें तुह्मांस कबूल केलेंच पाहिजे. ह्मणजे सृष्टि ही परमात्म्याचेंच दृश्यरूप आहे असें अद्वैतमत आहे. असें असेल तर तुह्मी, मी आणि इतर सर्व वस्तु परमेश्वररूपच आहेत असें ह्मटलें पाहिजे. सर्वच परमेश्वर हें ह्मणणें कित्येकांस कसेंसेंच वाटतें. पण तसें वाटण्याचें कारण नाहीं. वस्तुस्थिति तशीच आहे. माझ्या हातांतलें हें पुस्तक परमेश्वर, माझें शरीर परमेश्वर, माझें मन परमेश्वर आणि माझा आत्माहि परमेश्वरच आहे. तर मग हे सर्व जीव निरनिराळे कसे उत्पन्न झाले ? परमेश्वराचे असंख्य तुकडे होऊन इतके जीव उत्पन्न झाले काय ? एकच परमेश्वर अनंत जीवरूपानें दिसतो काय ? हें झालें तरी कसें ? एकाच विश्वात्मक शक्तीचे इतके तुकडे कसे झाले ? अनंताचे तुकडे करणें शक्य आहे काय ? केवळ पवित्ररूप परमात्मा विश्वरूपानें कां अवतरला ? जर आज तो विश्वरूप झाला असें मानलें तर उद्यां तो तिसरेंच एखादें रूप घेणार नाहीं याचा काय भरंवसा ? जर अशा रीतीनें त्याचें रूपांतर होतें तर रूपांतर पावणाऱ्या प्रत्येक पदार्थास अंत आहे असें आपण पाहतों; मग परमात्म्याचाहि अंत होणार कीं काय ? तसेंच सर्व परमात्मा विश्वरूप झाला, कीं, त्यांतील कांहीं भाग विश्वरूप झाला ? इत्यादि अनेक प्रकारच्या शंकांस अद्वैतमत उत्तर देतें कीं 'अरे जें झालेंचि नाहीं। त्याची वार्ता पुससी काई ॥' हें दृश्य विश्व भ्रमरूप आहे. हें झालेंच नाहीं. हें सर्व स्वप्न अथवा मृगजल यासारखें आहे. जीव असा पदार्थच कोठें नाहीं. मग अनंत जीवांचा विचारच नको. तें एकच 'अनंत' सर्वत्र आहे. दंवाच्या हजारों बिंदू-वर पडलेल्या प्रतिबिंबामुळें हजारों सूर्य दिसले तरी खरा सूर्य एकच. तसेंच हजारों मनांत प्रतिबिंबित होणारा परमात्मा एकच आहे. हजारों मनें हीं दंवाच्या हजारों बिंदूसारखीं आहेत व त्यांत प्रतिबिंबित झालेला परमात्मा हजारों सूर्यो-सारखा दिसतो. यासाठीं सृष्टि ही स्वप्नवत् आहे, असें अद्वैतमताचें प्रतिपादन आहे. पण स्वप्नांत तरी खऱ्या वस्तूच दिसतात. हत्ती आपण स्वप्नांत पाहिला तरी हत्ती खरा असल्यावांचून त्याचें स्वप्न तरी कसें पडेल ? यासाठीं परमात्म-स्वरूप खरें असून स्वप्नांत तशीं हजारों रूपें आपण पाहत आहों. शरीर, मन आणि जीव या रूपानें तुह्मी स्वप्नवत् आहां ही गोष्ट खरी, तरी सच्चिदानंद या रूपानें तुह्मी खरेच आहां. या साऱ्या विश्वाचा परमात्मा तूंच. तूंच हें सर्व विश्व निर्माण केलें आहेस आणि याचें अधिष्ठानहि तूंच आहेस. तुझा जन्म, तुझें मरण आणि तुझा

संसार हा सर्व मायेचा खेळ आहे. तूं अनंत आहेस. तुझ्या चैतन्यसामर्थ्याशीं तुलना केली तर सूर्य, चंद्र आणि तारे हे तुझ्या प्रचंड झोतांतून उडालेल्या तुषारांसारखे आहेत. तुला जन्म नाहीं, आणि मृत्युहि नाहीं. तुला जन्म कधीं झालाच नाहीं. मग मृत्यु तरी कोठचा ? 'न मृत्युर्न शंका न मे जातिभेदः पिता नैव मे नैव माता च जन्म । न बंधुर्न मित्रं गुरुर्नैव शिष्यश्चिदानंदरूपः शिवोहं शिवोहम् ॥' असेंच तुला झटलें पाहिजे, असें अद्वैतमताचें आपणा सर्वांस सांगणें आहे. अद्वैतमताप्रमाणें स्वर्गलोक, देवलोक आणि ब्रह्मलोक हे सर्व स्वप्नाप्रमाणें आहेत. स्वप्नांतून जागें झाल्यावर त्यांतील सुखाची अथवा दुःखाची किंमत सारखीच; तसेंच या प्रचंड स्वप्नांतून आपण एकवार जागे झालों झणजे ब्रह्मलोकाची तरी मातब्बरी काय आहे ? जीवात्मा मुक्त होऊन स्वतःच्या सच्चिदानंदपदीं आरूढ होणें, हें अद्वैतमताचें ध्येय आहे. अशा आत्म्यास कधीं क्षुद्रसुखाची तहान लागत नाहीं. आपल्या या क्षुद्र देहांत प्रत्ययास येणाऱ्या चैतन्याचा रसास्वाद कसा आहे, याचा अनुभव प्रत्यहीं आपणांस येतो. मग याच देहांत विश्वचैतन्याचा आस्वाद अनुभवितां आला तर तो आनंद कसा असेल हें कल्पनेनेंहि जाणतां येणार नाहीं. हेंच अद्वैत मीमांसेचें सार आहे.

वेदांतसोपानाला तीन पायऱ्या आहेत. अद्वैतमत ही शेवटची पायरी असून तिच्या पलीकडे जाणें शक्यच नाहीं. सर्व सृष्टीचें मूळ सांपडल्यावर त्यापलीकडे सृष्टीचा शोध कोठें लावणार ? एकाच पदार्थांतून हे सर्व पदार्थ निर्माण होतात, असें सिद्ध झाल्यावर रसायनशास्त्रास शोधावयाचें असें काय उरणार ? त्याचप्रमाणें विश्वचैतन्याची एकात्मकता सिद्ध झाल्यावर तत्वज्ञान तरी शोध कशाचा करणार ?

हा अद्वैतसिद्धांत सर्वांसच पटतो असें नाहीं. केवळ बुद्धीनेंहि तो पूर्णपणें समजणें प्रथम कठीण आहे. अत्यंत कुशाग्र आणि निर्भय विवेचकबुद्धि असली तर तिचा प्रवेश येथें केव्हां तरी होण्याची आशा आहे. याच कारणामुळें सामान्य जनतेचा कल अद्वैताकडे फारसा नसतो. याकरितां आपण द्वैतापासून आरंभ करावा. द्वैतसिद्धांताचा विचार कुशाग्रबुद्धीनें आपण करूं लागलों ह्मणजे विशिष्टाद्वैतमार्ग आपोआप दिसूं लागतो. ज्याप्रमाणें कित्येक शतकांच्या अनुभवानें शहाणें होत होत एखादें राष्ट्र संस्कृतीचें शिखर गांठतें, त्याचप्रमाणें एका व्यक्तीलाहि अनुभवानें आणि कित्येक वर्षांच्या प्रयत्नानें हें शिखर गांठलें पाहिजे. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यांत असा अनुभव आपणांस घ्यावाच लागतो.

आज जे अद्वैतमतवादी असतील त्यांनीं चालू आयुष्यांतील आपला पूर्वानुभव चाळून पाहिला तर पूर्वीं एकेवेळीं आपण पक्के द्वैती होतों, असें त्यांस आढळून येईल. हा देह ह्मणजेच आत्मा असा अध्यास आपणांस असेल, तोंपर्यंत जग स्वप्नरूप आहे असें ह्मणण्यांत तात्पर्य नाहीं. नाणें हवें असेल तर जसें त्याच्या दोन्ही बाजू घेतल्याच पाहिजेत, तसेंच हें आहे. हें जग खरें आहे असें वाटत आहे, तोंपर्यंत परमेश्वराचें साकार अस्तित्व मान्य केलेंच पाहिजे. कारण जगाचें अस्तित्व जर खरें, तर त्याचा कर्ता कोणी तरी असलाच पाहिजे. त्या कर्त्यालाच परमेश्वर असें नांव आहे. अमुक गोष्ट कार्यरूप आहे असें वाटतें तोंपर्यंत तिचें कारणहि असलेंच पाहिजे. जगाचें अस्तित्व संपेल तेव्हां साकार परमेश्वराचें अस्तित्वहि संपेल. तुह्मीच ब्रह्मरूप झालां ह्मणजे तुमच्यावांचून निराळें असें कांहीं उरणारच नाहीं. जोंपर्यंत देहाध्यास शिल्लक आहे, तोंपर्यंत आपणांस जन्ममृत्यूपासून सुटका नाहीं. पण हा अध्यास संपला ह्मणजे विश्वरूप स्वप्नांतूनहि तुह्मी आपोआप जागे व्हाल. आज आपणांस जें कांहीं विश्वरूपानें भासत आहे, तेंच ब्रह्मरूपानें दिसूं लागेल. विश्वाची जाणीव शिल्लक असतां जो परमेश्वर विश्वबाह्य वाटत होता तोच विश्वांत भरून आहे असा अनुभव येईल. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ।' हेंच अद्वैतमत आणि हीच वेदांताची शेवटची पायरी.

वेदांतमताचे जगावर घडलेले सुपरिणाम.

(अमेरिकेंतील बोस्टनशहरीं दिलेलें व्याख्यान.)

आजच्या विषयास आरंभ करण्यापूर्वी प्रथम तुह्मां सर्व मंडळीचे आभार मानणें इष्ट आहे असें मला वाटतें. आज तीन वर्षें मी तुमच्या सहवासांत घालविलीं. मीं अमेरिकेच्या बहुतेक भागांत प्रवास केला आणि आतां मी आपल्या देशास परत जावयास निघणार, अशा वेळीं तुह्मांबद्दल जो आदरभाव माझ्या अंतःकरणांत वसत आहे, तो व्यक्त करून दाखविणें हें योग्य आहे. मी तुमच्या देशांत येऊन थोडे दिवस झाल्यावर तुमच्या देशाचा एखादा इतिहास मी लिहूं शकेन असें मला वाटलें; पण आतां तीन वर्षें येथें राहिल्यावर मला असें आढळून आलें कीं, एखादें पान भरेल इतकाहि मजकूर मला लिहितां येणार नाहीं; मग एखाद्या मोठ्या ग्रंथाचें नांवच नको. कोणत्याहि देशांत आपण प्रथमच गेलों ह्मणजे तेथें सर्व जग नवें असल्यासारखें दिसूं लागतें. पण तुमच्या या देशांत बराच प्रवास केल्यावर एक विशेष गोष्ट माझ्या लक्ष्यांत आली, ती ही कीं, वरवर विचार करणारास निरनिराळ्या लोकांत कितीहि भेद दिसला तरी वस्तुतः मनुष्यस्वभाव येथूनतेथपर्यंत एकच. एखाद्या देशांत कांहीं खाण्यापिण्याचे अथवा पोषाखाचे निराळे प्रकार असले, तरी त्या पोषाखाच्या आंतील मनुष्य मात्र साऱ्या जगभर एकसारखाच आढळतो. सामान्य मनुष्यस्वभावांत बाह्य गोष्टींमुळें फरक पडत नाहीं. असें असलें तरी देशोदेशींच्या चालीरीतींतहि कांहीं विशिष्ट गोष्टी आढळून येत नाहींत असें नाहीं. तुमच्या या देशांत मला एक विशिष्ट गोष्ट अशी आढळून आली कीं, लोकांची रिकामी उठाठेव करीत बसण्याकडे तुमची प्रवृत्ति नाहीं. अमुक मनुष्य काय खातो अथवा काय पितो असल्या क्षुद्र बाबींच्या चौकशींत तुह्मी सहसा कधीं पडत नाहीं. कोणीहि मनुष्य असो; तो मर्द असला कीं तुमचें त्याच्यावर प्रेम जडतें. त्याला तुमच्या अंतःकरणांत जागा मिळते. या बाबतींत जगांतील इतर कोणत्याही देशांची तुमच्याशीं तुलना होणार नाहीं.

आमच्या वेदांतधर्माची तुह्मांस माहिती करून द्यावी, यासाठीं मी तुमच्या देशीं आलों. वेदांतधर्म हा अत्यंत प्राचीन धर्म आहे. जगांतील अत्यंत प्राचीन ज्ञान ज्या श्रुतींत सांठविलें आहे, त्याच श्रुतींपासून वेदांताची उत्पत्ति झाली आहे.

एखाद्या वृक्षाचा अत्यंत मनोहर आणि उपयुक्त भाग ह्मटला तर मोहोर हाच होय. हीच उपमा वेदांतालाहि लागू पडते. कित्येक शतकें वाढत असणाऱ्या ज्ञानवृक्षाचा, वेदांत हा मोहोर होय. कवितेच्या भाषेंत बोलावयाचें ह्मटलें तर 'एथ चातुर्य शाहणें झालें । प्रमेय रुचीस आलें । आणि सौभाग्य पोखलें । सुखाचें एथ ॥' असेंच ह्मणावें लागेल. वेदांतमतासंबंधीं आज कांहीं विशिष्ट गोष्टी तुह्मांस सांगावयाच्या आहेत. त्यांत प्रथम सांगण्यासारखी गोष्ट ही कीं, वेदांतमत हें एखाद्या विशिष्ट व्यक्तीचें मत नाहीं. परमेश्वराचा अमुक एक दूत आला आणि त्यानें वेदांत सांगितला असें नाहीं. कित्येक धर्मांत अथवा पंथांत ज्याप्रमाणें कोणी मध्यवर्ती महात्मा असतो, तसा वेदांतमताचा कोणींहि महात्मा अथवा प्रवर्तक नाहीं. वेदांतधर्म व्यक्तिप्रवर्तित नसला तरी तशा धर्मांशीं अगर पंथाशीं वेदांताचा कांहीं वादहि नाहीं. हिंदुस्थानांतहि बुद्ध अवतरून त्याच्यामुळें नवा धर्म स्थापला गेला, व त्यानंतरहि आजपर्यंत अनेक पंथ अस्तित्वांत आले. या सर्व पंथांचे अथवा धर्मांचे आद्यप्रवर्तक ह्मणून कोणी तरी विशिष्ट व्यक्ती होत्या. तसेंच ख्रिस्ती आणि महंमदी धर्महि एकाएका विशिष्ट व्यक्तीमुळेंच उत्पन्न झाले. या प्रत्येक धर्मांत अगर पंथांत पूजनीय अशी एक व्यक्ति आहे व त्या धर्मानुयायांतहि त्या विशिष्ट धर्ममतांपेक्षां व्यक्तीबद्दलच अधिक पूज्यभाव आढळून येतो. परंतु वेदांताचा कोणी एकच असा प्रवर्तक नाहीं. तसेंच वेदांतानें या धर्मांचा अगर पंथांचा कधीं द्वेषहि केला नाहीं. एवढेंच नव्हे, तर वेदांतधर्म इतर धर्मांस थोडाबहुत उपयुक्तच झाला आहे.

मनुष्य हा वास्तविक परमात्मरूप आहे, हें वेदांताचें मत जगांतील सर्व धर्मांस मान्य आहे. तसेंच आपणाभोंवतीं दृग्गोचर होणारें सर्व विश्व परमात्म्यामुळेंच दृश्य स्वरूपास आलें आहे, हेंहि सर्व धर्मांस मान्य आहे. मनुष्यांतील सर्व सद्गुण आणि सर्व सामर्थ्य हीं विश्वचैतन्याचाच भाग असून त्या दृष्टीनें मनुष्यामनुष्यांतहि कांहीं महत्वाचा फरक नाहीं. सर्वांच्या चैतन्याचें स्वरूप एकच. अपार समुद्रांत ज्याप्रमाणें अनेक ठिकाणीं लाटा उत्पन्न होतात, त्याचप्रमाणें मनुष्यें हीं चैतन्यसमुद्रावर उठलेल्या लाटा होत. आपणांपैकीं प्रत्येकजण वस्तुतः अपार समुद्ररूप असून प्रत्येकाची खटपट ही वस्तुस्थिति प्रत्यक्ष सिद्ध करण्याकरतांच सुरू आहे. आपणांपैकीं प्रत्येकजण सच्चिदानंदसमुद्र असून बाह्यतः दिसणारा भेद उपाधींच्या कमीअधिकपणामुळें उत्पन्न झाला आहे. याकरतां वेदांताचें ह्मणणें असें आहे कीं, एखादा मनुष्य मूर्ख असला अथवा त्याच्या अंगीं

दुसऱ्या उणीवा आढळल्या, तरी त्यांवरून त्याची किंमत कमी न समजतां त्याच्यांतील चैतन्यस्वरूपाकडे लक्ष द्या. कोणाहि मनुष्याला 'तूं पापी' असें ह्मणून त्याचा उपमर्द न करतां त्याचें चैतन्य पूर्णरूपानें प्रकाशेल असें करणें हें धर्मशिक्षकाचें खरें काम आहे, असें वेदांताचें प्रतिपादन आहे.

त्याचप्रमाणें जनसमूहांत प्रत्ययास येणारें चैतन्याचें सामर्थ्य हें सुद्धां मानवी मनांतील चैतन्याचेंच दृश्य स्वरूप असून, तें मानवी मनांतूनच निर्माण झालें आहे. मानवी मन हें वस्तुतः ज्ञानस्वरूपच आहे. आपापल्या धर्मप्रवर्तकांस खुद्द परमेश्वराकडून ज्ञानसंदेश मिळाला होता, असें सर्व धर्मांचे अनुयायी ह्मणतात. परंतु वेदांताचें तसें मत नाहीं. मानवी मनांतून उत्पन्न झालेलें अदृश्य चैतन्य या महात्म्यांच्या रूपानें दृश्य झालें, असें वेदांताचें मत आहे. अनेक मनुष्यें आपापलें निःसीम चैतन्य प्रत्यक्ष व्यक्त करण्याकरतां खटपट करीत असतात व त्या खटपटीचेंच महात्मे हें एक दृश्य फल आहे, असें वेदांताचें मत आहे. मनुष्य परमेश्वरस्वरूप आहे, ही गोष्ट ज्यांस समजत नाहीं अथवा मान्य नाहीं अशा धर्मांशीं वाद घालण्याचीहि वेदांतांची इच्छा नाहीं; कारण प्रत्येक मनुष्याची खटपट, समजून अथवा न समजतांहि पूर्णत्वाकडे जाण्याकरितांच आहे असें वेदांतमताचें प्रतिपादन आहे. ही गोष्ट आज एखाद्यास न समजली तरी ती उद्यां त्याला समजेलच. यामुळें वादाचें कांहीं प्रयोजनच उरत नाहीं.

मनुष्यप्राणी हा एका लहानशा डबींत भरलेल्या कमानीसारखा आहे. ही डबी लहानशी दिसली, तरी आंतील कमान मात्र अनंत आहे. ती कमान त्या डबींतून सुटण्याची खटपट करीत आहे. या खटपटीमुळेंच हा सारा व्यवहार निर्माण झाला आहे. व्यवहारांत सर्वत्र दिसून येणारी अहमहमिका, दुष्टपणा आणि इतर दुर्गुण हे मात्र या खटपटीमुळें उद्भवलेले नाहींत. व्यवहारांत हरघडीं प्रत्ययास येणारीं दुष्कर्में, हीं या खटपटीचीं कार्येंहि नाहींत आणि कारणेंहि नाहींत. एक हिंदु आचार्य ह्मणतातः—उंच जागीं असलेल्या एखाद्या तलावांतील पाणी त्याच्या खालच्या सपाटीवरील शेतास द्यावयाचें असलें ह्मणजे त्या तलावांतून एक पाट शेतापर्यंत आणून सोडतात. त्या पाटाच्या मुळाशीं एक दार केलेलें असतें. तें दार उघडल्याबरोबर पाणी जोरानें त्या पाटावाटे उतरूं लागतें. त्यावेळीं पाटांतील सर्व धूळ आणि कचरा यांवरून तें पाणी जाऊं लागून गढूळ दिसूं लागतें. पण ही धूळ त्या पाण्यानें निर्माण केली असें नसून पाण्यामुळें तिचें मळकट स्वरूप उघड झालें इतकेंच. त्याचप्रमाणें मनुष्यांतील ईश्वरांश

प्रकट होण्यामुळें दुर्गुण उत्पन्न झाले असें नाहीं. या परस्परविरुद्ध अवस्था अनादि आहेत. एकीमुळें दुसरी उद्भवली असें नाहीं.

जगांतील सर्व धर्मांस ही कल्पना मान्य आहे, असें वेदांताचें मत आहे. मग तो धर्म हिंदुस्थानांत जन्म पावलेला असो, अगर इतर देशांतला असो. कित्येक धर्मांत ही गोष्ट पौराणिक गोष्टींच्या रूपानें दर्शित केली आहे व दुसऱ्या कित्येकांत कांहीं विशिष्ट चिन्हांच्या द्वारें दर्शविली आहे. अमुक एका विशिष्ट व्यक्तीच्या चित्तांत परमेश्वरानें जन्म घेतला आणि त्या व्यक्तीच्या द्वारें धर्म निर्माण झाला असें वेदांताचें मत नाहीं. एकच तत्त्व असंख्य मानवी मनांच्या द्वारें व्यक्त होऊं पाहत आहे व अशा मनांच्या समवायी चिंतनानें धर्म व धर्मप्रवर्तक निर्माण झाले असें वेदांताचें मत आहे. त्याचप्रमाणें परोपकारादि भावना आणि सर्व नीतितत्वें हीं सुद्धां त्याच अद्वितीय चैतन्याचीं व्यक्त रूपें आहेत. या शरीरांत प्रत्ययास येणारा ' मी ' वास्तविक त्या शरीराइतका क्षुद्र नसून त्याचें अनंताशीं साधर्म्य आहे. याचा अनुभव सामान्य मनुष्यासहि कित्येक वेळां येत असतो. परक्याच्या दुःखानें कळवळून त्यास मदत करूं जाणाऱ्याची जी स्थिति त्या विशिष्ट क्षणीं असते, तिचा विचार केला तर तो स्वतःचें अस्तित्व विसरून त्या परक्याशीं एकजीव झालेला असतो, असें आढळून येईल. परक्याचें दुःख तें आपलेंच दुःख असें त्यास त्या क्षणीं वाटत असतें. सर्व मानवी मनांची एकतानता नसती तर सहानुभूति वाटणें आणि परोपकाराची इच्छा उद्भवणें, या गोष्टी अशक्यच झाल्या असत्या. सहानुभूति, परोपकार आणि प्रेम हाच सर्व नीतिग्रंथांचा मूळपाया आहे. सर्व नीतिग्रंथांचें सार वेदांतानें ' **तत्त्वमसि** ' या एकाच सूत्रांत व्यक्त केलें आहे.

' तत्त्वमसि ' हेंच वेदांताचें प्रत्येक व्यक्तीला सांगणें आहे. तुझें सर्व विश्वाशीं ऐक्य असल्यामुळें सर्व प्राण्यांचे आत्मे ह्मणजे तुझ्याच आत्म्याचीं अनेक रूपें आहेत. सर्व बाह्य शरीरेंहि तुझ्या शरिराहून भिन्न नाहींत. तूं कोणाला दुखविलेंस तर तें स्वतःला दुखाविण्यासारखेंच आहे. तूं कोणावर प्रेम केलेंस तर तेंहि स्वतःवर प्रेम करण्यासारखेंच आहे. कोणाच्याहि द्वेषाचा विकार तुझ्या चित्तांत उद्भवला तर तो इतरांस जितका हानिकारक होईल तितकाच तुला स्वतःलाहि तो हानिकारक होईल. इतरांवर केलेलें प्रेमहि तुझें तुला अवश्य परत मिळेल. तूंच विश्व आहेस. तूंच अनंत आहेस. या क्षणीं जरी तुझ्या अनंतत्वाचा तुला

विसर पडला आहे, तरी एका काळीं तूं पूर्णत्व पावशील आणि त्यावेळीं तुझ्या अनंतत्वाचा तुला प्रत्यय येईल.

वेदांताचें आणखी एक सांगणें असें आहे कीं अनेक धर्ममार्ग असणें, हेंच आपणा सर्वांच्या वाढीस अवश्य आहे. सर्वांना एकाच धर्माचे अनुयायी करण्याचा प्रयत्न करूं नका. प्रत्येकाला त्याच्यापरीनें अंतिम साध्य सिद्ध करण्यास मुभा देणें हेंच सर्वांस हितकर आहे. सर्वांचें साध्य एकच असल्यावर मार्ग व्यक्तिशः निराळे झाले तरी काय बिघडलें ? वेदांत ह्मणतो ' **आकाशात् पतितं तोयं यथा गच्छंति सागरम् । सर्वदेवनमस्कारः केशवंप्रति गच्छति ॥**'

या अत्यंत प्राचीन धर्मामुळेंच बौद्ध धर्माचा उदय झाला. बुद्धानें आपले शिष्य जगभर पाठवून निद्रितांस जागृत केलें. वेदांतमताचा ख्रिस्तीधर्मावरहि पर्यायानें बराच परिणाम झाला आहे. मध्ययुगांतील तत्ववेत्त्यांच्या चित्तावरहि वेदांतमतानें परिणाम केल्याचे दाखले आहेत. शेवटीं शेवटीं जर्मन तत्ववेत्त्यांवरहि त्याचा परिणाम होऊन तत्वज्ञांच्या विचारसरणींत बरीच क्रांति घडून आली. अशा रीतीनें वेदांतमताचा वस्तुतः साऱ्या जगभर जय झाला असतांहि तें काम अत्यंत शांततेनें आणि कोणत्याहि प्रकारचा गाजावाजा न होतां तडीस गेलें. रात्रीच्या वेळीं वनस्पतींवर पडून त्यांस टवटवी आणणाऱ्या दंवाचा नाद ज्याप्रमाणें कोणासहि ऐकूं येत नाहीं, त्याचप्रमाणें वेदांतधर्मानें जगभर पसरून मानवजातीवर उपकार करण्याचें काम अत्यंत शांत आणि अगदीं निःशब्द अशा रीतीनें पार पाडलें. अशोक राजाच्या कारकीर्दीतील कित्येक लेखांवरून बौद्धधर्माच्या प्रसाराचें कार्य कसें चालत असे, याचें अनुमान होतें. त्याच्या वेळीं चीन, इराण, अलेक्झांड्रिया इत्यादि लांबलांबच्या मुलखांत धर्मोपदेशक पाठविण्यांत येत असत. या गोष्टी ख्रिस्ताच्या जन्मापूर्वी तीनशें वर्षांवर घडल्या आहेत. ' परधर्माचा अनादर बुद्धीनें उल्लेख करूं नका. सर्व धर्मांचें मूळ एकच आहे. तुमच्याकडून होईल तितकी मदत परकीयांस करा. तुह्मांला येत असेल तें त्यांस अवश्य शिकवा. पण त्यांना अपकार होईल असें कांहीं करूं नका.' अशा प्रकारच्या आज्ञा त्यावेळीं सर्व बौद्ध धर्मोपदेशकांस दिल्या जात.

वेदांतमताच्या प्रसारामुळेंच हिंदुस्थानांत कोणाचाहि धर्मछळ असा झालाच नाहीं. उलट सर्व धर्मांबद्दल हिंदूंच्या मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली. स्वतःच्या देशास मुकलेल्या यहुदी लोकांना हिंदूंपासून आश्रय मिळाला. मलबार किनाऱ्यावर त्यांचे वंशज आज हयात आहेत. पारसीकांचा छळ झाला तेव्हां त्यांनींहि

हिंदुस्थानच्या भूमीचाच आश्रय केला. मुंबईचे प्रसिद्ध पारशी लोक हे त्यांचेच वंशज आहेत. सेंट टॉमस बरोबर कित्येक ख्रिस्ती लोक आले असल्याचें सांगतात. सेंट टॉमस हा खुद्द येशूच्या शिष्यांपैकींच एक होता. त्यांसहि आर्यावर्तात आश्रय मिळाला व त्यांचेहि वंशज आजमितीस हिंदुस्थानांत आहेत. परकीयांबद्दलची आदरबुद्धि हिंदु लोकांच्या मनांतून सध्याहि नष्ट झाली नाहीं, व ती पुढेंहि कधीं नष्ट होण्याचा संभव नाहीं.

आपण सर्व मनुष्यें ज्या अर्थी एकाच साध्याकरितां खटपट करीत आहों, त्या अर्थी एकमेकांचा अनादर करण्याचें आपणांस यत्किंचित्‌हि कारण नाहीं, असें वेदांतधर्माचें आग्रहाचें सांगणें आहे. एखादा मनुष्य आज कमी बुद्धीचा दिसत असला म्हणून त्याचा द्वेष करणें आणि त्याला तुच्छ लेखणें आपणांस उचित नाहीं. आमच्या नेत्रांवरील पडदा कालेंकरून दूर झाला आणि आमचें अंतःकरण शुद्ध झालें म्हणजे आपण सर्व एकच आहों असा आपणांस प्रत्यय येईल.

अशी अत्युच्च स्थिति ज्याला प्राप्त झाली असेल, ही स्त्री आणि हा पुरुष, हा भेदहि ज्याच्या दृष्टीस दिसेनासा झाला असेल, हा आपला आणि हा परका ही जाणीव ज्याच्या चित्तांतून नष्ट झाली असेल, हे सर्व भेद ओलांडून जो परतीरावर प्रविष्ट झाला असेल आणि ज्याला सर्व मनुष्यें परमेश्वररूप दिसूं लागलीं असतील, तोच खरा विश्वबंधु आणि तोच खरा वेदांती.

खासगी पत्रें.

खासगी पत्रें.

पत्र १ लें.

न्यूयॉर्क, ता. ९ एप्रिल १८९४.

प्रिय—

सेक्रेटरीसाहेब आपल्या पत्रांत मला तिकडे येण्याविषयीं लिहितात. ते म्हणतात, "तुमचें कर्तव्यक्षेत्र हिंदुस्थानच आहे" ही गोष्ट खरी आहे. परंतु साऱ्या हिंदुस्थानभर जागृति उत्पन्न होईल असें करावयाचें हें आपणांस लक्षांत ठेविलें पाहिजे. यासाठीं कोणत्याहि गोष्टींत घाई उपयोगाची नाहीं. भगवंताची कृपा असेल तर सर्व गोष्टी ठीकठाक होतील.

अमेरिकेंतील पुष्कळ मोठ्या शहरीं माझीं व्याख्यानें झालीं. येथें मला मित्रही बरेच मिळाले आहेत, आणि त्यांत कित्येक फार वजनदार गृहस्थ आहेत. आतां ही गोष्ट खरी आहे कीं, जुन्या पद्धतीचे ख्रिस्ती दीक्षित माझ्याविरुद्ध आहेत. तात्विक विचाराच्या बुद्धिवादांत माझ्याशीं दोन हात करणें ही गोष्ट सोपी नाहीं हें ते पूर्णपणें जाणून असल्यामुळें, माझ्या मार्गांत अडथळा आणणें, मला गालिप्रदान करणें व शक्य त्या रीतीनें माझी नाचक्की होईलसें करणें, अशा मार्गांचा त्यांनीं अंगिकार केला आहे. परमेश्वर त्यांना सुखी करो! कोणतेंहि सत्कार्य आपण करूं लागलों म्हणजे त्यांत अडथळे हे येणारच. असल्या अडथळ्यांनां न जुमानतां एकसारखें पुढें पाऊल टाकणारा धीर पुरुष मात्र नेहमीं यशस्वी होतो.

एक जात, एक धर्म, शांति व मित्रभाव हीं ज्या कालीं जगांत एकत्र नांदूं लागतील तेंच सत्वयुग. ही सत्वयुगाची कल्पना भरतभूमींत रुजली म्हणजे तिला जागृति येईल.

उठा, माझ्या मुलांनो, आणि एकदम या कार्यास लागा!

जुन्या हिंदुधर्मांचा जयजयकार असो! तुम्ही कामास सुरवात केलीं कीं यश हें ठेवलेलेंच. आपण कामास एकवेळ सुरवात केली, कीं ढोलकें बडवणारे वाटेल तितके मिळतील. परंतु कामाशिवाय नुसती बडबड मला नको आहे. ईश्वर आपणांस सुखी राखो.

आपला,

विवेकानंद.

पत्र २ रें.

प्रिय—

कलकत्याच्या टाऊन हालांत सभा भरून पास झालेल्या ठरावांची नक्कल मला मिळाली. तसेंच माझ्या देशबांधवांनीं मला पाठविलेला प्रेमसंदेशहि पोहोंचला.

माझ्या हातून जी थोडीबहुत सेवा होत आहे, ती तुम्ही गोड करून घेतां याबद्दल मी तुमचा अत्यंत ऋणी आहें.

इतर राष्ट्रांशीं अगदीं तुटून राहावयाचें, असा बाणा बाळगणारें कोणतेंहि राष्ट्र जिवंत राहावयाचें नाहीं, अशी माझी पक्की खात्री झाली आहे. स्वतःच्या मोठेपणाच्या खोट्या कल्पनांनीं, अथवा ऐहिक फायद्याकरितां राजनीति म्हणून, अथवा स्वतःचा पवित्रपणा कायम राखण्यासाठीं जेव्हां एखाद्या राष्ट्रांत वरील वृत्तीचा उदय होतो तेव्हां तें राष्ट्र विनाशाच्या मार्गास लागलें म्हणून समजावें.

शेजारच्या बौद्धधर्मी राष्ट्रांचा संपर्क आपल्या हिंदुत्वास बाधक होईल म्हणून विशिष्ट जातिबंधनांचा तट ज्या कालीं हिंदुसमाजाभोंवतीं उभारला गेला, तेव्हांच त्याच्या कोंडमाऱ्यास सुरुवात झाली असें मला वाटतें. अशा कोंडमाऱ्याचा अवनति हा निश्चित परिणाम आहे.

परकीयांचा द्वेष जो आमच्या हाडींमाशीं खिळला आहे, त्याला कितीहि धार्मिक रूप दिलें, तरी द्वेषाचा निश्चित परिणाम जी अवनति, ती टाळतां येणें शक्य नाहीं. कोणत्याही कारणासाठीं कां होईना, तुम्ही परद्वेष करूं लागलां म्हणजे तुमचीच अवनति होणार ही नियति आहे. जो देश एकाकाळीं सर्व भूगोलाचा पुढारी व मार्गदर्शक होता, तोच आतां इतर राष्ट्रांचा हास्यविषय होऊन बसला आहे ! जणूं काय वरील सिद्धांताची सत्यताच तो कंठरवानें सांगत आहे ! जो सिद्धांत आमच्या पूर्वजांनीं शोधून काढिला व ज्याचा सर्वत्र प्रसार केला त्या सिद्धांताचें उल्लंघन केल्याचा काय परिणाम होतो, हें जणूं काय आम्ही वस्तुपाठदर्शनानें जगास शिकवीत आहों !

परस्पर विनिमय अथवा 'दे वाण घे वाण' हा विश्वाचा नियम आहे. आणि आपली उन्नति व्हावी असें वाटत असेल तर आपणांपाशीं असलेला निधि उघडून पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांनीं त्याचा उपयोग करावा, अशी परवानगी भरतभूमीनें दिली पाहिजे; तसेंच इतर राष्ट्रांपाशीं जें जें म्हणून घेण्याजोगें आढळेल, त्याचा तिनें स्वीकार केला पाहिजे. दिवसेंदिवस वाढत जाणें, मोठें होत जाणें हें जीवंतपणाचें चिन्ह आहे. तसेंच आकुंचित होणें हें मृत्युपंथास लागणें होय. अजात-

शत्रुत्व हें खरें जीवित आणि परद्वेष हा ठराविक मृत्यु होय. ज्या दिवशीं आम्ही परकीयांचा द्वेष करूं लागलों, त्याच दिवशीं आमच्या राष्ट्रपुरुषाच्या नाड्या बंद पडण्यास सुरुवात झाली; आणि आतां तो मार्ग सोडून आम्ही परत न फिरलों तर निश्चयानें मृत्यु येणारच.

भूतलावरील सर्व जातीच्या लोकांशीं मिळून मिसळून आम्हांस वागलें पाहिजे. यासाठीं जो जो हिंदुमात्र परराष्ट्रगमन करितो, तो आपल्या जन्मभूमीचा खरा मित्र आहे. गवताच्या गंजीवरील कुत्र्याप्रमाणें स्वतः खावयाचें नाहीं व दुसऱ्यास खाऊं द्यावयाचें नाहीं असा बाणा बाळगणारे खुळसट धर्ममार्तंड आपल्या मातृभूचे खरे शत्रु होत. ज्या इमारतीकडे पाहून तोंडांत बोट घालावें, असली राष्ट्रीय इमारत पाश्चात्य राष्ट्रांनीं सध्याच्या काळीं उठविली आहे. उत्कृष्ट दानत असणारीं माणसें हीं या इमारतीचे आधारस्तंभ आहेत; आणि अशीं हजारों-लक्षावधि–माणसें आमच्यांत निर्माण होईपर्यंत या अथवा त्या पाश्चात्य राष्ट्राविरुद्ध गिल्ला करून फळ काय ?

दुसऱ्यांस स्वातंत्र्य देण्यास जे तयार नाहींत, ते स्वतः स्वातंत्र्यास योग्य आहेत काय ? शांत मनानें आणि खऱ्या मर्दपणाला उचित अशा मार्गानें आपण सारे कामास लागूं या. निष्कारण तंटेबखेडे आणि परद्वेष आतां पुरे. जो कोणी ज्या स्थितींत राहण्यास अंगच्या गुणांनीं योग्य झाला, त्याला ती स्थिति प्राप्त होऊं न देण्याची शक्ति या साऱ्या विश्वरचनेंत कोणाच्याहि अंगीं नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री झाली आहे. गतकालीं आम्ही वैभवशाली होतों हें खरें, पण भविष्यकाळीं त्याहूनहि अधिक मोठे आम्ही होणार असें माझें मन मला सांगत आहे. शांतता, धीर आणि अविरत काम करण्याचा उत्साह, भगवान् शंकराच्या कृपेनें आम्हांमध्यें सदैव राहो इतकीच माझी प्रार्थना आहे.

आपला,

विवेकानंद.

पत्र ३ रें.

ता० ३० नोव्हेंबर १८९४.

प्रिय—

धर्मप्रसाराचें काम करण्याकरितां तयार झालेल्या संघाची नियमबद्ध रचना असावी हें चांगलें; परंतु ही नियमबद्धता निवळ व्यावहारिक कामांपुरतीच असली पाहिजे. धार्मिक बाबींसंबंधीं अशा नियमबद्धतेचा उपयोग केला, तर त्यामुळें नवाच धार्मिक पंथ उत्पन्न होण्याची भीति असते. नवा धर्मपंथ होऊं नये अशाबद्दल आपण खबरदारी घेतली पाहिजे.

भगवान् श्रीरामकृष्णांचें चरित्र लिहिण्याची कोणास इच्छा असली तर कोणत्या कार्यासाठीं ते अवतरले व त्यांनीं कशाचा बोध केला हें कळण्याजोगें तें चरित्र पाहिजे नाहीं तर किरकोळ गोष्टींचें वर्णन करून त्यांच्या चारित्र्याचें भलतेंच स्वरूप लोकांपुढें त्यानें मांडूं नये. त्यांचें प्रेममय जीवित, त्यांचें ज्ञान, त्यांचा उपदेश आणि त्यांचा धर्ममय. आयुष्यक्रम हीं ज्यांत व्यक्त होतील असें चरित्र के—नें लिहावें. हिंदुधर्माचें वास्तविक स्वरूप काय आहे, हें प्रत्यक्ष स्वरूपानें कळावें, याकरितांच त्यांचा प्रखर जीवितदीप प्रज्वलित झाला होता. शास्त्रांनीं जें परोक्ष ज्ञान सांगितलें, तेंच ज्ञान रोजच्या सामान्य आचरणांत कसें व्यक्त करावें, याचा वस्तुपाठ त्यांच्या आयुष्यक्रमावरून मिळण्याजोगा आहे. पूर्वकालीं जे अवतार झाले व अनेक ऋषि उत्पन्न झाले, त्यांचें वास्तविक कार्य काय होतें, तें भगवानांच्या चरित्रामुळें आपणांस आज कळण्याजोगें आहे. शास्त्रांतील अव्यक्त ज्ञानतत्वांचें व्यक्तरूप—व्यावहारिक रूप—ह्मणजे श्रीरामकृष्णांचें चरित्र होय. भारतीय राष्ट्रपुरुषानें जें ज्ञान पांच हजार वर्षांत मिळविलें, त्याचें व्यक्तस्वरूप ५४ वर्षांच्या आयुरवधींत प्रगट करून भावी पिढ्यांकरितां तो ज्ञानमार्ग भगवान् रामकृष्णांनीं प्रकाशित करून ठेविला आहे. व्यक्तीच्या अधिकारपरत्वें ज्ञानमार्गाचें स्वरूप बदलतें असें भगवानांचें मत होतें व हें मत आपण लक्ष्यांत ठेविलें ह्मणजे वेद व शास्त्रें यांत परस्परविरुद्ध भासणाऱ्या सिद्धांतांची एकवाक्यता होते. परकीयांचा आयुष्यक्रम आपणांस न पटला तरी त्यासंबंधीं केवळ उदासीन न राहतां आपण शुद्ध बंधुप्रेमानें त्याच्याशीं वागलें पाहिजे असें भगवान् ह्मणत असत. आणि सर्व धर्मांचा मूलभूत सिद्धांतहि हाच आहे. भगवानांच्या चरित्राची ही रूपरेषा ध्यानांत धरून त्यांचें सुंदर आणि परिणामकारक चरित्र लिहितां येईल. असो; योग्य वेळीं सर्व गोष्टी होतील.

आपण आतां पुढील कर्तव्यास स्वतःच्या हिंमतीवरच सुरुवात करा. स्वयंपाक तयार झाला म्हणजे पंक्तिबारगीर हवे तितके जमतील. आतां काळजीपूर्वक कामास लागा.

आपला,
विवेकानंद.

पत्र ४ थें.

ता. ३० नोव्हेंबर १८९४.

प्रिय के—

भगवान् श्रीरामकृष्णांनीं काय काय चमत्कार केले, हें प्रसिद्ध करणाऱ्या मूर्खांच्या नादीं आपण लागूं नये. त्या गोष्टी खऱ्या आहेत; पण असल्या मूर्खपणानें चरित्राचा प्रमुख भाग आणि गौण भाग यांचा घोंटाळा मात्र होतो. चमत्कारांसारख्या अप्रस्तुत आणि निरर्थक गोष्टी सांगून काय फायदा ? वास्तविक त्यांनीं जो ज्ञानोपदेश केला तोच सांगितला पाहिजे. चमत्कारांनीं कोणतेंहि प्रमेय सिद्ध होत नाहीं. जड गोष्टींनीं चैतन्याची सिद्धि होत नाहीं. परमेश्वराचें स्वरूप आणि अस्तित्व, आत्म्याचें स्वरूप व नित्यता इत्यादि प्रमेयें आणि चमत्कार यांचा कांहीं तरी परस्परसंबंध आहे काय ? भगवानांचा ज्ञाननिर्झर लोकांसाठीं मोकळा करा. जें ज्ञानामृत पिऊन तुझी तृषा शांत झाली, तेंच ज्ञानामृत इतरांस पाज. चमत्कारांविषयीं विचार करून आपला मेंदू व्यर्थ शिणवूं नको, आणि असल्या वेडगळ गोष्टी सांगून इतरांसही त्रास देऊं नको.

तुझा,
विवेकानंद.

पत्र ५ वें.

प्रिय—

माझ्यासंबंधीं मिशनरी पत्रांत वेडावांकडा मजकूर लिहिलेला असतो असें कधीं कधीं माझ्या कानीं येतें; परंतु त्याकडे मी कधींहि लक्ष्य देत नाहीं. हिंदुस्थानांतल्या पत्रांतील असे उतारे तुम्ही मला पाठविले तर त्यांस मी खचित केराच्या टोपलींत टाकीन. आमच्या कार्याकडे लोकांचें लक्ष्य लागावें म्हणून थोडासा गाजावाजा पाहिजेच होता; परंतु आतां त्याचा अतिरेक होऊं देतां उपयोगी नाहीं. आतां माझी कोणीं निंदा अथवा स्तुति केली तरी दोहींकडे तुम्ही लक्ष्य देऊं नये, हें बरें.

तुम्हीं आपलें काम करीत असावें, हें बरें. कोणीं कांहीं म्हटलें तरी 'न हि कल्याण कृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति' हें भगवान् श्रीकृष्णाचें वचन आपण नेहमीं ध्यानांत ठेवावें. माझ्या धर्मशिक्षणाचें रहस्य समजून घेऊं इच्छिणारांची संख्या येथें दिवसेंदिवस वाढत आहे. 'जो निंदेतें नेघे। स्तुति न श्लाघे।' अशा प्रकारचें वर्तन ठेवण्याचा निश्चय मीं केला असल्याचें आपणांस पूर्वी कळविलें आहेच आणि आतांहि कळवितों. मला कोणीं असले उतारे पाठविले तर ते मी 'भस्मसात्' करितों आणि आपणहि तसेंच करावें. आपण आपलें कर्तव्य खऱ्या अंतःकरणानें करीत असलें ह्मणजे शेवटीं सर्व गोष्टी सुरळीत होतात. 'सत्यमेव जयते' हा नेहमींचाच सिद्धांत आहे.

आपणाविषयीं लोकांचा गैरसमज होण्याजोगे लेख ख्रिस्ती मिशनरींनीं लिहिले तर त्यांजकडे आपण लक्ष्य देऊं नये, हा उत्तम पक्ष. अशा लेखांची पूर्ण उपेक्षा करणें हेंच त्यांस खरें उत्तर आहे.

एस्—यांस आपल्या संघाचे अध्यक्ष करा. ते दिलदार आणि खऱ्या अंतःकरणापासून काम करणारे गृहस्थ आहेत. आतां माझ्याकडून मदतीची फारशी अपेक्षा न करितां कामास सुरुवात करा. मी तिकडे केव्हां परत येईन हें आज मला सांगतां येत नाहीं. मी येथें जें कार्य करीत आहें तेंहि माझ्या मातृभूमीसाठींच आहे. सर्वांस माझा पूर्ण आशीर्वाद सांगावा. ईश्वर आपलें कल्याण करो.

आपला,

विवेकानंद.

पत्र ५ वें.

शिकागो, ता.—९४.

प्रिय—

तुमचें पत्र आतांच पावलें. दोन तीन वर्षें व्याख्यानें देऊन पैसे मिळविणें हें या देशांत फारसें कठीण नाहीं. यासंबंधीं मीं थोडासा प्रयत्न करून पाहिला. पैशाच्या दृष्टीनें माझा प्रयत्न यशस्वी होईल इतका पाठिंबा लोकांकडूनही मला मिळाला; परंतु ही गोष्ट मला स्वतःलाच अप्रशस्त व माझ्या संन्यस्तवृत्तीला कमीपणा आणणारी वाटूं लागली.

हिंदुस्थानांतील कांहीं पत्रांनीं मजवर केलेली टीका माझ्या अवलोकनांत आली. परंतु अशी टीका होणें, हें भरतभूमीच्या सध्याच्या स्थितींत रीतसरच आहे.

गुलामगिरींत वाढलेल्या समाजांत परोत्कर्षासहिष्णुता उत्पन्न होणें, हें रास्तच आहे. या दुर्गुणाच्या जोडीस भेदभाव येऊन मिळाला ह्मणजे गुलामगिरीच्या शृंखलेचे सांधे पक्के होतात. हिंदुस्थानांतून बाहेर पडून इतर देशांच्या स्थितीचें अवलोकन केलें ह्मणजे वरील सिद्धांताची सत्यता चांगली पटते. पाश्चात्यांना चोहोंकडे जो एकसारखा जय येत आहे, त्याचीं मुख्य कारणें परस्पर विश्वास आणि संघशक्ति हीं होत. कोणतेंही राष्ट्र एकवेळ दुर्बळ आणि भेकड झालें ह्मणजे विश्वासघाताच्या पातकाचें बीं तेथें चांगलें रुजूं लागतें.

माझ्या बाळा, गुलामगिरींत खितपत असलेल्या जनसमाजाकडून तूं कसल्याहि मदतीची अपेक्षा करूं नको. सध्यांची परिस्थिति अत्यंत बिकट–अत्यंत निराशाजनक आहे, ही गोष्ट खरी, परंतु तिजविषयीं माझें ह्मणणें मोकळेपणानें मीं तुह्मां सर्वांस सांगतों. आमच्या सध्यांच्या समाजास कसली महत्वाकांक्षाच उरली नाहीं. भविष्यकालीं आपण आपली स्थिति उच्च प्रतीची करूं असा आत्मविश्वास तर त्यांच्या ठिकाणीं नाहींच; पण दुसरा कोणी त्यांच्यासाठीं मनापासून खटपट करूं लागला, तर त्याच्या मार्गांत कांटे पसरण्याचें काम करण्यास मात्र हवे तितके लोक तयार होतात. असल्या मृत्पिंडांच्या समाजांत थोडें तरी चलनवलन–थोडी तरी जीवनकला–उत्पन्न करण्याचें सामर्थ्य तुमच्यांत आहे काय ? एकादें अत्यंत हट्टी मूल औषध पितांना जसें वैद्याला लाथा मारितें, तसा आमचा समाज आहे. त्या वैद्याचें चातुर्य तुमच्या अंगीं आहे काय ? एखादा अमेरिकन अथवा युरोपियन गृहस्थ परदेशांत आपल्या देशबांधवाला नेहमीं मदत करीत असतो.

'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।' या भगवंताच्या वाक्याचें मी पुन्हां एकवेळ तुला स्मरण देतों. परिस्थिति कशीहि असो, आपण नेहमीं पर्वताप्रमाणें अढळ राहिलें पाहिजे. सत्याचा जय केव्हां ना केव्हां तरी होणारच. भगवान् श्रीरामकृष्णांच्या मुलांस उत्तम आत्मविश्वास प्रथम पाहिजे. आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या विरुद्ध केव्हांहि वागावयाचें नाहीं असा पक्का निश्चय पाहिजे; ह्मणजे सर्व कांहीं सुरळित होईल. आपल्या कार्यांचा उत्तम परिपाक स्वतःच्या डोळ्यांनीं पाहण्याइतकें आयुष्य कदाचित आपणांस प्राप्त होणार नाहीं, पण आपल्या कार्यांचा शेवट उत्तम होणार, याबद्दल तिळमात्र शंका नको. भरतभूमीच्या मृतप्राय देहांत चैतन्य भरेल, तिला नवजीवन प्राप्त होईल असे प्रयत्न सध्या हवे आहेत. असे प्रयत्न यशस्वी होण्यास अधिक काळ लागेल हें उघडच

आहे. आपण अशा प्रयत्नांस सुरुवात केली आहे, या विचारांतच सध्या आपण आनंद मानिला पाहिजे. 'देहं वा पातयेत् अर्थं वा साधयेत्' अशा प्रकारची श्रद्धा, अंतःकरणाचें पावित्र्य आणि कामाची शिकस्त इतकी तयारी तुझ्याजवळ जय्यत पाहिजे. भगवान् रामकृष्णांच्या शिष्यवर्गांत कांहीं विशेष गुण ह्मटला, तर खरें अंतःकरण हा पाहिजे. असलीं शंभर माणसें मला मिळालीं व तीं मीं दर्शविलेल्या मार्गानें कार्य करूं लागलीं, ह्मणजे माझें कर्तव्य संपलें असें मला वाटेल व समाधानानें हा देह ठेवण्यास मी तयार होईन. परमेश्वराची मर्जी असेल तर तसें होईल ! अज्ञ लोकांनीं तुझ्याविरुद्ध कितीहि बडबड केली तरी त्यांच्या ह्मणण्याकडे तूं लक्ष्य देऊं नको. आपण कोणाकडून मदतीची अपेक्षा करूं नये; पण ती चालून आली तर तिचा त्यागहि करूं नये. आपण भगवंताचे पट्टेवाले आहों, हें विसरतां कामा नये. क्षुद्र कीटकांनीं त्रास देण्याचा यत्न केला तर त्याकडे उपेक्षा दृष्टीनें पहावें. पुढें, एकसारखें पुढें चला. सत्यमार्गांतला एक शब्दहि फुकट जात नाहीं. राखेच्या दडपणांत अग्नि जसा गुप्त राहतो, तसा तो शब्द कदाचित् युगानुयुगेंहि गुप्त राहील; परंतु त्यांतील प्रखरता यत्किंचित्हि कमी होणार नाहीं. त्याचा प्रकाश पडण्याची वेळ केव्हांनाकेव्हां तरी येईलच. सत्य, सद्गुण आणि पावित्र्य हीं आत्म्याप्रमाणेंच अच्छेद्य आणि अदाह्य आहेत. खऱ्या अंतःकरणानें काम करणारा एकहि मनुष्य मला पुरे. खोगीर भरतीचीं हजारों मनुष्यें माझ्या कामाचीं नाहींत. माझ्या मुला, तूं आपल्या कर्तव्याला पक्का चिकटून रहा. तुझा पाठीराखा परमेश्वर असतां, व तो तुला मदत देण्यास तयार असतां मनुष्यांच्या मदतीची इच्छाच तूं करूं नयेस. जोंपर्यंत तुझ्या अंतःकरणांत आत्मविश्वास पक्का आहे आणि परमेश्वरावरचा तुझा भरंवसा पक्का आहे, तोंपर्यंत तुझा मार्ग सरळच आहे असें तूं समज. तुझें नुकसान करण्यास कोणीही समर्थ नाहीं. परमेश्वराला अंतःकरणापासून आळव ह्मणजे भोंवतीं गाढ अंधकार पडला असला तरी तुला दीपदर्शन होईल आणि तुझा मार्ग तुला स्पष्ट दिसेल. मी तुझ्या बऱ्यासाठीं रोज प्रार्थना करितों तसेंच तूंहि माझ्याकरितां रोज करीत जा. खोटीं धर्मबंधनें, जुलूम आणि दारिद्र्य या त्रिविध तापांनीं पोळून गेलेल्या आपल्या कोट्यवधि बांधवांसाठीं आपणांपैकीं प्रत्येकानें रोज प्रार्थना करीत राहिलें पाहिजे. खऱ्या धर्माची जरूरी सध्या श्रीमंत आणि मोठे लोक यापेक्षां माझ्या गरीब बांधवांसच अधिक आहे. मी कांहीं चमत्कार करून दाखविणारा योगी नाहीं, तत्ववेत्ता नाहीं आणि साधुहि नाहीं. तर मी एक अगदीं कंगाल मनुष्य आहें,

आणि ह्मणूनच माझें कंगाल मनुष्यांवर प्रेम असणें साहजिक आहे. या देशांतील गरीब लोक आणि त्यांच्या बऱ्याकरितां खटपट करणारे हे माझ्या अवलोकनांत येत आहेत. आमच्या हिंदुस्थानची स्थिति येथील स्थितीशीं ताडून पाहतां केवढें अंतर दिसूं लागतें! दारिद्र्यांत आणि अज्ञानपंकांत रुतून गेलेल्या कोट्यवधि लोकांची यत्किंचित् तरी काळजी वाहणारे हिंदुस्थानांत किती लोक आहेत? घरोघर फिरून त्यांस ज्ञानदान करणारा कोणी हरीचा लाल आहे काय? गाढ अंधकारांत प्रकाशाचा एक किरण तरी त्यांस पोहोंचविण्यास कोणी तयार आहे काय? निदान मनानें तरी त्यांच्या बऱ्यासाठीं चिंतन करणारा कोणी आहे काय? ज्यांची आजपर्यंत सर्वत्र उपेक्षा झाली आहे, अशा रंजल्यागांजलेल्यांस तूं आपले ह्मण, त्यांच्या बऱ्यासाठीं प्रार्थना कर आणि सुचेल तें काम करण्यास सुरुवात कर, ह्मणजे परमेश्वरच तुझा वाटाड्या होईल. 'जे का रंजले **गांजले। त्यांसि ह्मणे जो आपुले। तोचि साधु।'** तोच महात्मा; आणि इतर साधूसारखे दिसणारे लोक दुरात्मे होत! परमेश्वराचें स्मरण करून आपण सारेच उद्योगास लागूं या. आपल्या कृतीला दृश्य फळ कदाचित् लवकर येणार नाहीं. आपल्याकरितां कोणी आनंदप्रदर्शक सभा भरविणार नाहीं; फार काय, आपण मृत्युवश झालों तर आपणाकरितां एक अश्रुढाळणाराहि कोणी मिळणार नाहीं. पण असें झालें तरी आपली कृति फुकट गेली, फलहीन झाली असें तुला वाटूं देऊं नको. कृतीच काय, पण मनांत उद्भूत झालेला एक विचारहि फुकट जात नाहीं हें लक्ष्यांत ठेव. लवकर अथवा उशिरां त्याचा परिणाम झालाच पाहिजे. मित्रा, माझें अंतःकरण आतां अगदीं भरून आलें आहे. माझ्या अंतःकरणांतील विचार व्यक्त करण्याचें सामर्थ्य शब्दांत नाहीं. परंतु तुला सर्व ठाऊक आहेच; आणि कल्पनेनें तें तुला जाणतां येतें. माझे कोट्यवधि बांधव निरक्षर आणि बुभुक्षित असतां त्यांच्याच खर्चानें सुशिक्षित होऊन त्यांची यत्किंचित्‌हि काळजी न करणाऱ्या प्रत्येक मनुष्यास मी देशद्रोही—बंधुद्रोही समजतों. भुकेनें कंठाशीं प्राण आलेल्या माझ्या बांधवांकरितां यत्किंचित्‌हि काळजी न करतां नटून सजून कोंबड्याप्रमाणें छाती वर करून चालणाऱ्यांस धिःकार असो. प्रियबंधु, आपण भिकारी आहों, अगदीं क्षुद्र आहों, ही गोष्टी खरी; परंतु आपण 'मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरीम्।' अशाचे चाकर आहों, हें विसरूं नको. ईश्वर तुह्मा सर्वांचें कल्याण करो.

आपला,

विवेकानंद.

पत्र ६ वें

प्रिय— न्यूयॉर्क.

यंदां येथें अतिशय थंडी पडली होती, तरी या देशाच्या बऱ्याच भागांत मीं प्रवास केला. थंडीमुळें मला फार त्रास होईलसें वाटलें होतें पण तसें झालें नाहीं. तुझ्या कामाला यश येईल अशी आशा करूंया. '**बहुजन हिताय, बहुजन सुखाय**' ज्याचा अवतार झाला त्याचा तूं ताबेदार. मग अपयश तुला शिवेल तरी कसें?

ख्रिस्ती धर्मांचा उपदेश करण्याची जी पद्धत आपणांस हिंदुस्थानांत दिसून येते, त्याहून इकडील पद्धत निराळी आहे. येथील अनेक मतांच्या धर्माधिकाऱ्यांत कित्येक माझे चांगले स्नेही झाले आहेत, हें ऐकून तुला खचित नवल वाटेल. हिंदुलोकांप्रमाणें परधर्मसहिष्णु आणि खरे उदारमतवादी असे ख्रिस्ती धर्मोपदेशक येथें किती तरी आहेत. ज्याला धर्मज्ञानाची खरी लालसा आहे, असा मनुष्य कोठेंहि जन्मास आला तरी तो अंतःकरणानें उदारच असणार. धर्मप्रेम अंतःकरणांत उद्भवलें ह्मणजे त्याचे विचार आपोआपच उदार होतात. धर्मज्ञानदान ह्मणजे पोटाचा एक व्यवसाय असें झालें ह्मणजे इतरांशीं मत्सर, चढाओढ, निंदकवृत्ति, अनुदारता इत्यादि अनेक दुर्गुण अंतःकरणांत आपोआप उद्भवूं लागतात.

आपला,

विवेकानंद.

पत्र ७ वें.

न्यूयॉर्क—१८९४.

प्रिय—

आज एक जुनी दंतकथा मी तुला सांगणार आहें, तिजकडे नीट लक्ष्य दे.

एके दिवशीं कोणी एक आळशी मनुष्य एका वृद्ध गृहस्थाच्या दाराशीं जाऊन त्याला एका गांवाचा रस्ता विचारूं लागला. परंतु त्याच्या प्रश्नास त्या वृद्ध गृहस्थानें कांहींच जवाब दिला नाहीं. तोच प्रश्न त्या मनुष्यानें पुनःपुनः कित्येक वेळां विचारला, परंतु त्या वृद्ध गृहस्थाचें तोंड उघडलें नाहीं. त्या वृद्धाच्या या कृतीचा त्या मनुष्यास फार राग येऊन तो तेथून जाण्यास निघाला. तेव्हां वृद्ध ओरडून ह्मणतो, "अहो, तें गांव येथून समोरच एक मैलावर आहे." आळशी मनुष्य ह्मणतो "आजोबा, मीं जेव्हां आपणास प्रथमच प्रश्न केला, तेव्हां आपण

उत्तर कां दिलें नाहीं. ? " वृद्ध ह्मणतो, "बाबा, तुला खरेंच त्या गांवास जावयाचें आहे असें मला तुझ्या विचारण्याच्या पद्धतीवरून वाटलें नाहीं. तूं खरोखरच जावयास निघालास तेव्हां तुला योग्य मार्ग दाखविणें मला भाग पडलें."

माझ्या मुला, ही गोष्ट तूं सदोदित लक्ष्यांत बाळग. तूं मनापासून कामास आरंभ केलास कीं तुला मार्गदर्शक भेटेलच भेटेल. ' अनन्याश्चिंतयंतो माम् ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ १ ॥' असें भगवान् श्रीकृष्णांनीं गीतेंत वचन दिलें आहे. तें सत्य आहे, हें नेहमीं लक्ष्यांत ठेव. हें वचन ह्मणजे स्वप्नांत दिलेलें वचन असें समजूं नको.

लोकांस खऱ्या धर्ममार्गाचा उपदेश करणें व अडचणीच्या प्रसंगीं कायावाचामनानें त्यांच्या उपयोगी पडणें हें सांप्रतचें तुमचें कर्तव्य आहे. दर आठवड्यास एकत्र जमण्यासाठीं एखादी लहानशी जागा घेऊन तेथें उपनिषदादि धर्मग्रंथांचें सटीक वाचन सुरू करा. अशा रीतीनें आत्मशिक्षण आणि परसेवा हीं एकत्र चालूंद्या. तुह्मीं काम करण्यास सुरुवात केली ह्मणजे सर्व सुरळीत चालूं लागेल. —बद्दल ह्मणशील तर तो लवकर विकारवश होतो. तूं शांतवृत्तीचा आहेस, यासाठीं तुह्मी दोघे एकत्र काम करा. कांहीं करावयाचें असलें तर तें मनापासून करावयाचें अशी वृत्ति सदोदित असावी.

कोणत्याहि व्यक्तीला काय अथवा राष्ट्राला काय, आपली उन्नति व्हावी असें वाटत असेल, तर त्यानें स्वतःच कंबर बांधून उद्योगास लागलें पाहिजे. खऱ्या हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करण्याकरितां अमेरिकेंतून पैशाची अपेक्षा करणें ह्मणजे मृगजळानें तहान भागविण्यासारखेंच आहे.

मद्राससारख्या एखाद्या शहरीं तुह्मी आपला मुख्य मठ करा. असा मध्यवर्ती मठ असणें कोणत्याहि कार्यास फार अनुकूल असतें. अशा मध्यबिंदूपासून उत्साहवर्धक ज्ञानकिरण सर्वत्र पसरूं द्या. आरंभ अगदीं लहानशा प्रमाणावर असला तरी हरकत नाहीं. प्रथम अगदीं थोडीं माणसें असलीं तरी एकवेळ कार्यास आरंभ केला ह्मणजे तुमच्या कार्यास आपलें आयुष्य वाहणारे दुसरे अनेक मिळतील. अशा कार्यांत प्रमुखत्वानें काम करणाऱ्या व्यक्तीनें एक गोष्ट मात्र सतत लक्ष्यांत बाळगिली पाहिजे. ती ही कीं, दुसऱ्यावर अंमल गाजविण्यासारखी कोणतीहि गोष्ट त्यानें करूं नये. आपण प्रमुख असलों तरी इतरांसारखेच एक सामान्य मनुष्य आहों असें इतरांस वाटण्यासारखें त्यानें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे. ज्याला परसेवेचें तत्व उत्तम रीतीनें अवगत झालें आहे, तोच मनुष्य

खरोखर एखाद्या सार्वजनिक संस्थेचा प्रमुख होण्यास लायक असतो. जिवावर बेतलें तरी आत्मविश्वास–श्रद्धा–सोडूं नको. आपणास पैशासाठीं अथवा मोठेपणाच्या कीर्तीसाठीं काम करावयाचें नाहीं. मद्रासमध्येंच कांहीं पैसा या कार्यासाठीं मिळविण्याची खटपट करा. तुमची वृत्ति खरोखर ‘वसुधैव कुटुंबकम्’ अशी झाली, ह्मणजे यश हें ठेवलेलेंच.

आपल्या कार्यपूर्तीसाठीं धडाडून पेटलेल्या आगींत उडी घालण्याची वेळ आली तरी पाऊलहि मागें घेणार नाहीं, अशीं माणसें मला हवीं आहेत. सध्या कामास सुरुवात करा. तात्विक वादविवाद करण्यास पुढें पुष्कळ वेळ मिळेल. अंत:करणाचें पावित्र्य, धीरवृत्ति आणि दृढनिश्चय एवढ्या भांडवलावर उद्योगास सुरुवात करा.

मी हिंदुधर्मासंबंधीं सध्या कांहीं पुस्तक लिहीत नाहीं. धर्मसंबंधीं सुचणारे कांहीं विचार नुसते टांचून ठेवण्याचें काम मी सध्या करीत आहें. हे विचार पुस्तकरूपानें प्रसिद्ध करावे कीं काय, याबद्दल माझा निश्चित असा कांहींच बेत नाहीं. कवडीमोल असे भाराभर ग्रंथ जगांत अगोदरच नाहींत काय? त्यांत आणखी एकाची भर कशाला हवी? धर्मप्रसारासाठीं एखादें मासिक सुरू केलें तर त्यानें अधिक चांगलें कार्य होईल. त्यांत नेहमीं निश्चयात्मक पद्धतीनें लिहीत जा. तुमच्या लेखावरून प्रतिपाद्य विषयाचा निश्चित बोध झाला पाहिजे. तसेंच दुसऱ्यावर टीका करण्याच्या फंदांत पडूं नये हें चांगलें. जें कांहीं तुला जनांस सांगावें असें वाटेल, तें सांगून मोकळा हो. तें लोकांस पटतें कीं नाहीं वगैरे विचार करण्याच्या भानगडींत तूं पडूं नको.

वर्तमानपत्रांतले उतारे यापुढें मला तूं पाठवीत जाऊं नको. त्यांतील निंदास्तुतीकडे लक्ष्य न पुरविण्याचा मीं निश्चय केला आहे. येथेंहि निंदाप्रचुर लेखांस उत्तर न देण्याचा माझा निश्चय आहे. माझ्या कार्याची त्यामुळें हानी होणार नाहीं हें मला पक्कें ठाऊक आहे.

जर तुह्मी खरोखर माझीं मुलें असाल तर आतां पाउलभरहि मागें न येतां कामास सुरुवात करा. सिंह जसा निधड्या छातीनें शत्रूवर तुटून पडतो तसल्याच छातीनें तुह्मीं कार्यास लागलें पाहिजे. हिंदुस्थानांतच काय, पण साऱ्या जगांत आपणांस जागृति उत्पन्न करावयाची आहे. आतां तुह्मांस कार्यास लागलेंच पाहिजे. नकाराची भाषाहि आतां यापुढें बोलूं नको. देहपातापर्यंत गुरूचा हुकूम पाळणें, हीच खरी गुरुभक्ति. ती तुमच्या अंगीं आहे काय? तुमच्या अंगीं ती आहे असें मला मनापासून वाटतें. तर आतां उठा, आणि माझा विश्वास

अनाठायीं नव्हता असें सिद्ध करून दाखवा. तुमच्या प्रत्येक पावलाबरोबर मी चालत आहें हें ध्यानांत धरा. तुह्मी कोठेंही असलां आणि कांहींहि करीत असलां तरी माझी दृष्टि तुमच्यावर आहे. प्रत्येकाशीं शांतवृत्तीनें वागत जा.

हिंदुस्थानांत इतक्यांतच परत येण्याचा माझा बेत नाहीं. येथें होत असलेल्या धर्मजागृतीस कांहीं तरी चिरस्थायित्व यावें अशा दृष्टीनें मी सध्या येथें काम करीत आहें. अमेरिकन लोकांचा माझ्यावर दिवसेंदिवस अधिक विश्वास बसत आहे. साऱ्या जगांत जागृति उत्पन्न करण्याची महत्वाकांक्षा बाळगणारांनीं आपली दृष्टि जगद्व्यापी केली पाहिजे. तसेंच आपल्या इच्छा व आशा बारिकसारीक गोष्टींत गुंतून न राहतां साऱ्या जगाच्या हिताचा विचार करितील इतक्या उदार केल्या पाहिजेत. संस्कृताचा अभ्यास सुरू असूं दे. विशेषतः वेदांतावरील प्रमुख तीन आचार्यांच्या भाष्यांचा तरी अभ्यास उत्तम केला पाहिजे. आपल्या कर्तव्यपूर्तीसाठीं अनेक मार्गांचा मी विचार करीत आहें. यासाठीं आतां तुह्मींही कंबर बांधून तयारी केली पाहिजे. माझ्या मुला, व्याख्याता होण्याची तुझी इच्छा असली तर त्या कलेचा विशेष अभ्यास करून लोकचित्ताकर्षक असा वक्ता तुला बनलें पाहिजे. तूं कोणतीहि गोष्ट पक्क्या आत्मश्रद्धेनें व भक्तीनें केलीस तर त्यांत अवघड असें कांहींच नाहीं, हें तुझ्या प्रत्ययास येईल. सर्वांना माझें हेंच सांगणें आहे. माझे सर्वच गुरुबंधु असे श्रद्धावान् आहेत कीं, त्यांचें कार्य पाहून सारें जग थक्क होईल, अशी कृति करण्यास ते कधींहि मागें घेणार नाहींत अशी माझी खात्री आहे.

तुह्मीं आरंभ चांगल्या रीतीनें केला आहे. आतां एखाद्या अडचणीनें हताश न होतां व आत्मविश्वास ढळूं न देतां अखंड कार्यव्यापृत राहणें, हेंच तुमचें काम आहे. तें तुह्मीं केलेंत ह्मणजे त्याचीं सुंदर फळें दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर तुमच्या नजरेस येतील.

कोणत्याहि गोष्टीविषयीं लोकांबरोबर वादविवाद करण्याच्या भरीस पडूं नका. अशा रीतीनें अकारण शत्रु उत्पन्न करण्यांत फायदा नाहीं. अमकातमका खिस्ती झाला ह्मणून वाद उपस्थित करून रणें माजवावीं यांत अर्थ काय? असल्या वादाच्या फंदांत आपण पडूं नये. परधर्मसहिष्णुता हा आह्मा हिंदूंचा जातिस्वभाव आहे. तो सदोदित अंगीं बाळगून शांतवृत्तीनें आणि चिकाटीनें काम केलें ह्मणजे यश शेवटीं येणारच येणार.

आपला,
विवेकानंद.

पत्र ८ वें.

शिकागो, ता. ३ जानेवारी १८९५.

प्रियमित्र—यांस.

मी तुह्मांस पत्र लिहावयास बसलों तेव्हां तुमची आठवण होऊन प्रेम आणि कृतज्ञता यांनीं माझें हृदय भरून आलें. धर्मतत्वांविषयीं ज्यांची श्रद्धा कांहीं तरी पक्की झाली आहे, अशांपैकींच तुह्मी आहां, याबद्दल माझी खात्री झाली आहे. श्रद्धा, प्रेम इत्यादि अंतःकरणाचे सात्विक गुण आणि तत्वज्ञान यांच्या संयोगाचा सुंदर परिपाक तुमच्या ठिकाणीं झाला आहे. विशेषतः धर्मतत्वांना कृतींत मूर्तस्वरूप कसें द्यावें याची हातोटी तुह्मास चांगली साधली आहे. जें कांहीं करावयाचें तें शुद्ध अंतःकरणानें व श्रद्धेनें करावयाचें अशी तुमची वृत्ति असल्यामुळें माझें हृदय तुमच्यापाशीं आज उघडें करावें असें मला वाटतें.

हिंदुस्थानांत धर्मजागृति थोड्याबहुत प्रमाणावर सुरू झाली आहे; परंतु ती आतां येथेंच थांबतां उपयोगी नाहीं. आतां यापुढें तिचें प्रमाण वाढतें राहील, अशा प्रकारचे उद्योग आपण सुरू केले पाहिजेत. बरेच दिवस विचार करून माझें जें कांहीं मत झालें आहे, तें मी आपणास कळवितों. धर्मसंबंधीं शिक्षण देणारें एखादें कॉलेज मद्रासेंत स्थापून त्याचें कार्यक्षेत्र हळू हळू वाढवावें. हिंदुस्थानांतील तरुण पिढीस वेदांतधर्माचें तात्विक ज्ञान उत्तम रीतीनें मिळण्याकरितां प्रस्थानत्रयी आणि तीवरील प्रमुख आचार्यांचीं भाष्यें यांचा सांगोपांग अभ्यास तरुणांकडून करविला पाहिजे. तसेंच जगांतील इतर धर्म आणि तत्वज्ञान यांचा अभ्यासहि त्याबरोबरच चालू ठेवणें श्रेयस्कर होईल. अशा प्रकारच्या कॉलेजामार्फत तत्वज्ञानविवेचक असें एखादें पत्र अथवा मासिक पुस्तकहि सुरू केल्यास चांगलें. अशा प्रयत्नाचा आरंभ अगदीं लहान प्रमाणावर झाला तरी त्यापासून पुढें मोठीं कार्यें खचित निर्माण होतील. आमचें प्राचीन तत्वज्ञान आणि सध्याची पाश्चात्य जागृति यांचें प्रमाणबद्ध मिश्रण सध्या मद्रासेंत दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें आहे.

आमची सध्याची समाजरचना आमूलाग्र बदलली पाहिजे, हें सध्याच्या सुशिक्षितांचें मत मलाहि ग्राह्य वाटतें. परंतु हें करावयाचें कसें ? या दृष्टीनें सुधारकांनीं 'मूले कुठारः' ह्मणून जे मोडतोडीचे प्रयत्न केले ते सपशेल फसले आहेत. समाजरचना नियमबद्ध करण्याकरितां ज्या कांहीं गोष्टी आह्मीं पूर्वी केल्या त्या वाईट आहेत असें मला मुळींच वाटत नाहीं. आमची समाजरचना

वाईट तर नाहींच नाहीं. उलट ती फार चांगली आहे असें माझें मत झालें आहे. ती आहे याहून अधिक चांगली करण्याचाच प्रयत्न आम्हांस आतां करावयाचा आहे. पूर्वींची चूक आतां सुधारावयाची अथवा पूर्वींच्या पातकांचें आतां निरसन करावयाचें असा प्रकार नसून पूर्वी केलेल्या चांगल्या गोष्टींहून अधिक चांगल्या गोष्टी करावयाच्या. पूर्वींचा सत्यमार्ग अधिक उज्ज्वल करावयाचा अशासाठींच आमचे प्रयत्न आहेत. माझ्या देशबांधवांनीं पूर्वी कांहीं चुका केल्या असें नसून समाजसंस्कृतीची घटना त्यांनीं उत्तम रीतीनें केली आहे असें माझें मत मी त्यांस खुल्या दिलानें जाहीर करतों. आतां याहून अधिक चांगली कृति करून दाखवा एवढेंच त्यांस माझें सांगणें आहे.

आपण जातिभेदाचेंच उदाहरण घेऊं. जाति हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ 'उत्पन्न झालेलें' असा आहे. आतां सृष्टि कशी निर्माण झाली–उत्पत्ति कशी झाली–याचा विचार केला पाहिजे. याबद्दल श्रुति सांगते कीं 'एकोऽहं बहुस्याम्।' म्हणजे सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी ब्रह्म 'एक–अद्वितीय' होतें, तें सृष्टीनंतर अनेकशः झालें. ' एकम्' ही स्थिति सृष्टीच्या पूर्वींची आहे. ब्रह्म अनेकशः विभागलें जाणें –विचित्रता दिसूं लागणें–म्हणजेच सृष्टि उत्पन्न होणें. जर ही विचित्रता–विविधता –भेद–नाहींसे झाले तर सृष्टीच नाश पावेल हें उघड आहे.

जोंपर्यंत कोणताहि मानवसमूह जिवंत असून उत्क्रमण स्थितींत आहे, तोंपर्यंत त्यांत विविधता–विचित्रता–उत्पन्न व्हावी हें सृष्टिनियमास अनुसरूनच आहे. तोच समूह अशी विविधता–विचित्रता–जातिभेद–निर्माण करण्यास असमर्थ असा दिसूं लागला तर तो मृत्पिंड होण्याच्या मार्गास लागला, असें खचित समजावें.

समाजांतील प्रत्येक व्यक्तीस स्वतःच्या निरनिराळ्या परिस्थितीप्रमाणें निरनिराळ्या मार्गानें उत्क्रांत होण्यास अवकाश सांपडावा या हेतूनें जातिभेदाची कल्पना उत्पन्न झाली. यामुळें प्रत्येकास आपल्या प्रकृतीस अनुरूप–जातीस अनुसरून–अशी स्वतःची वाढ करण्यास अवकाश सांपडला. या तत्वास अनुसरून चाललेल्या समाजांत जातिभेदाची कल्पना हजारों वर्षें जीवंत राहिली हें युक्तच आहे. श्रुतिस्मृतींचा विचार केला तर निरनिराळ्या जातींत रोटीबेटी व्यवहाराला आडकाठी आहे असें दिसून येत नाहीं. तर मग भरतभूमीच्या अवनतीस सुरुवात केव्हां व कशी झाली, हा प्रश्न उपस्थित होतो. ज्या वेळेस जातिभेदाची ही मूळ कल्पना लुप्त झाली तेव्हां हिंदुसमाज मृतप्राय होण्याच्या

मार्गास लागला. जातिभेद नष्ट झाला तर जग नष्ट होईल असें जें भगवान् श्रीकृष्णांनीं ह्मटलें, त्याचाहि अर्थ हाच आहे.

सांप्रतचा जातिभेद हा खरा जातिभेद नसून खरा जातिभेद उत्पन्न करण्याच्या मार्गांत तो एक मोठा अडथळा होऊन बसला आहे. त्यामुळें खरा जातिभेद उत्पन्न होण्यास ह्मणजे व्यक्तिशः उत्क्रांति होण्यास अडचण पडूं लागली आहे. जातिभेद जन्मजात आहे, ही कल्पना प्रचारांत आली ह्मणजे निरनिराळ्या अनेक व नव्या नव्या जाति उत्पन्न होण्यास अवकाश न सांपडल्यामुळें असा समाज कुजूं लागून मरणाच्या पंथास लागतो. माझ्या प्रिय देशबांधवांनो, जातिभेदाच्या या मूळ कल्पनेचा तुह्मीं त्याग केल्यामुळेंच सांप्रतच्या अवनत स्थितीस पोहोंचलां आहां. जन्मजात जातिभेदाच्या शृंखलांनीं जखडून बांधलेला समाज खरे जातिभेद उत्पन्न होण्याच्या आड नेहमींच येत असतो. हा खरा जातिभेदच नव्हे. खरा जातिभेद–विचित्रता–विविधता–उत्पन्न होण्याच्या मार्गांतील हे अडथळे दूर करा, ह्मणजे पुन्हां उत्क्रांतीच्या–उन्नतीच्या–मार्गास तुह्मी निःसंशय लागाल. यूरोपांत जेव्हां व्यक्तीच्या मार्गांतील अडथळे दूर होऊन ही विविधता अधिक व्यक्त होऊं लागली, तेव्हां यूरोपच्या उदयास आरंभ झाला असें तुह्मांस दिसून येईल. यूरोपापेक्षांहि अमेरिकेंत असा जातिभेद निर्माण होण्यास अधिक अवकाश असल्यामुळें त्यांची उन्नति युरोपियन लोकांपेक्षांहि अधिक झपाट्यानें होत आहे.

प्रत्येक मुलाचा अथवा मुलीचा जन्म झाला ह्मणजे ज्योतिषी लोक त्याचें जातक वर्तवून त्याचा वर्ण अथवा जाति ठरवितात. याचाहि वास्तविक अर्थ हाच आहे. त्या विशिष्ट व्यक्तीची वाढ कोणत्या मार्गानें होण्याचा संभव आहे, त्याचा सूक्ष्म देह कशा प्रकारच्या गुणकर्मांनीं युक्त आहे हेंच ते ठरवितात. याचमुळें ब्राह्मणकुलांत उत्पन्न झालेल्या व्यक्तीचा क्षत्रिय अथवा वैश्यवर्ण आहे असें ज्योतिषी सांगतात. मीं वर सांगितलेलें जातिभेदाचें तत्व ज्योतिषासहि मान्य आहे असें दिसतें. या तत्वास अनुसरून खरी जातिभेद संस्था आपण निर्माण केली, तर आपल्या उन्नतीस आपण नवजीवन दिल्यासारखें होणार आहे.

जातिभेद ह्मणजे व्यक्तीची जन्मजात उच्चनीचता दाखविणारी परिस्थिति नव्हे, अथवा त्यामुळें व्यक्तीला कांहीं जन्मजात असे अधिकार प्राप्त होतात असेंहि नाहीं. माझ्या देशबांधवांस मला जें कांहीं सांगावयाचें आहे तें हेंच कीं, बाबांनों, हजारों वर्षांच्या गुलामगिरीनें तुमची जातिभेदसंस्था नष्ट झाली आहे, तिला

प्राचीन ऋषींनीं दाखविलेल्या मार्गानें नवजीवन द्या. तुमचें पूर्वींचें कांहीं टाकून द्या असें माझें मुळींच सांगणें नसून पूर्वींचा मार्ग पत्करा असें माझें सांगणें आहे. मुसलमानांनीं साऱ्या जगभर धुमाकूळ माजविला व त्याची एक लाट आह्मांकडे आली, त्यावेळीं आह्मांस उत्क्रांत होण्यास–आमची वाढ करण्यास–अवकाशच नव्हता. अधिक चांगलें कसें व्हावें हा तेव्हां प्रश्न नसून जगावें कसें इतकाच विचार तेव्हां कर्तव्य होता. आतां ती परिस्थिति साफ बदलली आहे. तेव्हां आतां पूर्वींच्या मार्गानें चालून एकेक पायरी पुढें गेलें पाहिजे. सध्यांच्या धर्ममार्तंडांनीं आंखून दिलेल्या मार्गानें समाजाचा नाश होणार हें उघड दिसत आहे. तर तो सोडून त्यांच्याहून अधिक वंदनीय व पूज्य अशा ऋषिप्रणीत मार्गाचें अवलंबन आपण पुन्हा करूं या.

सध्या जो आमचा समाज अगदीं मोडल्यासारखा व बेडौल दिसत आहे, याचें कारण त्याची इमारत अद्यापि पूर्णपणें बांधली गेली नसून अर्धवट स्थितींत राहिली आहे हें होय. ताजमहालासारखी इमारत बांधिली जात असतां अर्धवट स्थितींत कोणीं पाहिली तर तिच्या समग्र, सौंदर्याची कल्पना पाहणाराच्या मनांत कितपतशी उतरेल बरें ! तीच इमारत पूर्ण झाली ह्मणजे प्रेक्षकांच्या हृदयास तल्लीन करून सोडणारी होते. तसेंच आमच्या समाजाची इमारत सध्याच्या अर्धवट स्थितींतून निघून पूर्णावस्थेस पोहोंचली ह्मणजे सर्व भाग आपआपल्या जागीं यथोचित बसून एकंदर इमारतीस अपूर्व शोभा प्राप्त होईल. आमच्या समाजाच्या भावी इमारतीचा माझ्या दृष्टीप्रमाणें दिसणारा नकाशा आज मीं तुह्मांपुढें मांडिला आहे. हा नकाशा बरोबर आहे अशी माझी स्वतःची खात्री आहे.

प्रत्येक राष्ट्राच्या उन्नतीचे वेगवेगळे मार्ग आंखलेले असतात. भारतीय राष्ट्राच्या उन्नतीचा पाया ह्मटला ह्मणजे धर्म हा होय. या पायावर तुह्मी पुढील इमारत रचण्यास आरंभ करा, ह्मणजे ती चिरस्थायी होईल. माझ्या मुख्य हेतूच्या सफलतेसाठीं मीं आंखलेल्या मार्गापैकीं एक तुह्मांस आज सांगितला आहे. माझ्या जन्मभूमीच्या बऱ्यासाठीं खटपट करणें माझें कर्तव्य आहे; तरी सांप्रत येथेंहि मला माझें उद्दिष्ट कार्य करावयाचें आहे. विशेषतः हिंदुस्थानांतील माझ्या कार्यासाठीं ज्या मदतीची मी अपेक्षा करीत आहें, ती मदत मला फक्त येथेंच मिळेल असें वाटतें. यासाठीं आतां माझ्या कार्यास तेथें तुह्मी सुरुवात करा. मीं

स्वतःला आतां परमेश्वराच्या आधीन केलें आहे. तो सांगेल तेथें कार्य करीत रहावयाचें इतकेंच माझें काम.

संपत्तीच्या शोधांत त्रिखंड भटकत असतां, परमेश्वरा, तुजसारखें विनमोल रत्न मला लाभलें. तुझ्यासाठीं माझ्या सर्वस्वाचा मी त्याग करितों.

कोठें तरी खरें प्रेमस्थान असावें ह्मणून भटकतां भटकतां अखेर तूं सांपडलास. परमेश्वरा, ' तूं माउलीहून मायाळ । चंद्राहुनी शीतळ । पाण्याहून पातळ । असती कल्लोळ प्रेमाचा ॥ आतां दुजी तुज उपमा । काय देऊं पुरुषोत्तमा । ओंवाळोनि तुझिया नामा । वरुनि टाकितों ॥ ' माझ्या मित्रा, परमेश्वर सदैव तुला सुखी ठेवो.

आपला,
विवेकानंद.

पत्र ९ वें.

शिकागो,
ता० ११ जानेवारी १८९५.

प्रिय—

तुमचें पत्र आतांच मिळालें. जगांतील सर्व धर्मांपेक्षां ख्रिस्ती धर्म श्रेष्ठ आहे हें सिद्ध करण्याकरितां सर्व धर्मांची परिषद् भरविण्याची कल्पना अमेरिकेंत निघाली. परंतु तात्विक हिंदुधर्माच्या इमारतीस या सभेमुळें यत्किंचित्‌हि इजा झाली नाहीं. डॉक्टर बी–अथवा त्याच्याच जातीचे इतर अनुदार मताचे लोक यांजपासून आपण कसल्याच मदतीची अपेक्षा करूं नये हें बरें. परमेश्वराची इच्छा असली तर येथें मला पुष्कळ स्नेही मिळतील; किंबहुना हल्लींहि रोज मिळत आहेत. परमेश्वर त्यांचें बरें करो.

बोस्टन आणि न्यूयॉर्क यांच्या दरम्यान हल्लीं माझ्या बऱ्याच फेऱ्या सुरू आहेत. या देशांत हीं मोठीं प्रसिद्ध शहरें आहेत. यांपैकीं बोस्टन हें सरस्वतीचें आणि न्यूयॉर्क हें लक्ष्मीचें निवासस्थान आहे. या दोन्ही ठिकाणीं माझें कार्य माझ्या कल्पनेपेक्षांहि अधिक फलद्रूप झालें आहे. वर्तमानपत्रें माझ्याबद्दल काय ह्मणतात इकडे मी लक्ष्य देत नाहीं. यासाठीं वर्तमानपत्रांतील उतारे तुह्मांस पाठविण्याचें माझ्यानें होणार नाहीं.

—यास पत्र लिहून आपल्या कार्याची रूपरेखा त्यास कळविली आहे, ती तुलाहि समजली असेलच. तर आतां तुमच्यांत काय कर्तबगारी आहे ती दिसूं द्या. भाटासारखी बडबड आतां पुरे झाली. आतां या पुढें सर्व बडबड कृतींत उतरविली तरच तिचा उपयोग. हिंदु लोकांनीं पुष्कळ सभा भरवून मोठीं व्याख्यानें दिलीं, आणि कृतींत कांहीं नाहीं अशी स्थिति झाली तर तुमच्या वायफळ बडबडीकडे कोण लक्ष्य देणार ! बोलण्याप्रमाणें कृति नसेल तर असला मनुष्य कोणाच्याहि मदतीस पात्र नाहीं. माझें कार्य ह्मटलें ह्मणजे सत्यमार्गाचा उपदेश करणें एवढेंच. त्याला हिंदुस्थान काय आणि अमेरिका काय, सारखेंच !

माझी अथवा तुझी कोणीं निंदा अथवा स्तुति केली तर दोहींकडेहि तूं लक्ष्य देऊं नको. सिंहासारख्या निधड्या छातीनें कार्य करीत रहा, ह्मणजे परमेश्वराचा तुला आशीर्वाद मिळेल. मरेपर्यंत मी माझें कार्य करीत राहीन आणि हा देह पडल्यानंतरहि जगाच्या बऱ्यासाठीं मी उद्योग करीन. सत्य आणि सद्गुण स्वतःच असे जड बुडाचे आहेत कीं, त्यांच्या आधारानें तुला दुसऱ्या कशाच्या मदतीशिवाय आपलें कार्य करितां येईल. त्यांच्या प्रसाराच्या आड कांहीं आलें तर केवळ आपल्या वजनानें त्याचा चक्काचूर उडविण्यास ते समर्थ आहेत.

येथें हजारों लोक माझ्याबद्दल काळजी वाहणारे आहेत, ही गोष्ट तुला ठाऊकच आहे. सर्व वर्तमानपत्रांनीं गिल्ला केला तरी त्याचा कांहीं परिणाम होणार नाहीं इतकें महत्व येथें मला हळू हळू प्राप्त होत आहे.

जोंपर्यंत माझें अंतःकरण पवित्र आहे आणि माझें कार्य सत्यासाठीं आहे, तोंपर्यंत माझें काडीमात्र नुकसान करण्यास कोणीहि समर्थ नाहीं. माझें चित्त शुद्ध असेपर्यंत मला कशाचीहि भीति नाहीं हें विसरूं नको. नुसत्या पुस्तकी ज्ञानाच्या प्रदर्शनानें जनतेवर कधींहि खरें वजन पडत नसतें. आपलीं उच्च तत्वें ज्या मानानें आपल्या रोजच्या वागणुकींत प्रत्यक्ष दिसूं लागतात त्या मानानें आपणांबद्दल लोकांचा आदर व पूज्यभाव वाढत जातो. लोहचुंबका शेजारीं लोखंड ठेविलें तर तें जसें अपरिहार्यपणें लोहचुंबकाकडे धांव घेतें तसेंच उच्च तत्वें ज्याच्या कृतींत मूर्तरूपानें दिसूं लागलीं आहेत, त्याजकडे सामान्य जनतेचीं मनें आपोआप आकर्षण होत असतात. तर हीं तत्वें आपल्या अंगीं निदर्शनास येतील अशा उद्योगास लागा. उच्चतत्वांच्या प्रत्यक्ष आचारास सुरुवात करा. तुमच्या नुसत्या वटवटीचा आतां मला मनापासून कंटाळा आला आहे. घटका गेली, पळें गेलीं, असें करतां करतां काळ आपणास केव्हां गट्ट करील याचा कांहीं नेम

आहे काय ? मग अत्यंत मोलाचें असें आपलें आयुष्य रिकाम्या चकाट्या पिटण्यांत आणि एरंडाचीं गुऱ्हाळें लावण्यांत कां व्यर्थ घालवावें ?

प्रत्येक व्यक्तीला तसेंच प्रत्येक राष्ट्राला आपल्या उन्नतीचे मार्ग स्वतःच शोधिले पाहिजेत, हें कितीवेळ तुह्मास सांगावें ! मदतीसाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहून काय होणार ! येथें अविरत उद्योग करून तुमच्या कार्यासाठीं थोडाबहुत पैसा मी पाठवीन; परंतु याहून अधिक मदतीची अपेक्षा तुह्मीं करूं नये. येथून विशेष मदत मिळून आपण आपलें कार्य करूं असें तुह्मांस वाटत असेल तर अशा कार्यास हात घालण्यापेक्षां अगोदर त्याचा आरंभच करूं नये हें चांगलें. माझ्यासंबंधीं ह्मणाल तर माझ्या कल्पना रुजण्यास हीच भूमि फार योग्य आहे. जे जे कोणी परमेश्वराचे अव्यभिचारी भक्त असतील त्या सर्वांच्या पायाचा मी सेवक आहें. मग ते जातीनें हिंदु, ख्रिस्ती अथवा मुसलमान असले तरी मला सारखेच.

अगदीं यत्किंचित्हि गाजावाजा न करितां काम करीत राहणें, मला पसंत आहे. माझ्या पावलावर पाऊल टाकून माझ्या मागें येण्याची तुमची इच्छा असेल तर शुद्ध अंतःकरणानें, पूर्ण संन्यस्तवृत्तीनें आणि अत्यंत विमल आचरणानें तुह्मीं वागलें पाहिजे. तुह्मी असे असलां तर तुमच्या कार्यास माझा आशीर्वाद सदोदित आहेच. मित्रा, आपल्या कार्यांच्या मानानें पाहिलें तर आपलें आयुष्य इतकें थोडें आहे कीं, आतां अधिक विचाराला आणि परस्परांची स्तुति करण्यांत फुकट वेळ घालविण्याला आपणाला थोडासाहि अवधि उरला नाहीं. कार्यसमाप्तीनंतर परस्परांची स्तुति करण्यास वाटेल तेवढा वेळ मिळेल. तर आतां ओंठ शिवून टाकून कार्यास आरंभ करा. अद्यापपर्यंत कायमस्वरूपाचें असें कांहींसुद्धां तुह्मीं केल्याचें दिसत नाहीं. एखाद्या मध्यवर्ति मठाची स्थापना तुह्मीं केली नाहीं. एखादें देऊळ अगर दुसरी इमारतहि बांधली नाहीं. फार काय, पण आपल्या कार्यांत खांद्याशीं खांदा भिडवून काम करणारा असा एक मित्रसुद्धां तुह्मीं अद्यापि पैदा केला नाहीं. आतांपर्यंतच्या कामाचा आढावा काढला तर वटवट—बडबड—यावांचून कांहीं सुद्धां अधिक आढळून येत नाहीं; आणि त्या बडबडीचा इत्यर्थ पाहिला तर 'आह्मी एके काळीं मोठे होतों, अनुकरणीय होतों' ही आत्मस्तुति. आपण पूर्वी कसें होतों, हें मला ठाऊक नाहीं पण सध्या मात्र शुद्ध मृत्पिंड बनलों आहों हें मला ठाऊक आहे. हिंदुस्थानांत पाहिलें तर खऱ्या कार्यासाठीं आपणास वाहून घेणारांपेक्षां कीर्तीच्या, पदव्यांच्या, अथवा दुसऱ्या असल्याच तिरस्कर-

णीय भावनांच्या आधीन झालेले लोक अधिक आढळतात. असल्या क्षुद्र जीवांसाठीं मी तरी कशाला धडपड करावी? धर्माचा झेंडा उभारण्यास वाटेल तें करणारे शेंकडों वीर मला पाहिजेत. ते कोठें तुला आढळतात काय? जा, त्यांचीं निवासस्थानें शोधून काढून त्यांस बाहेर आण. आतांपर्यंत मला जी काय मोठी आशा तुह्मीं लाविली, ती मोठ्या नांवाची आणि कीर्तीची. नांव आणि कीर्ति! असल्या क्षुद्र गोष्टींचा माझ्यासमोर पुन्हा उच्चार करूं नको. यापेक्षां माझ्या कार्यासाठीं हातावर शीर घेणारे शेंकडों वीर मला मिळवून देण्याचें वचन द्या. कार्यास आरंभ करा अशी ओरड आणखी किती वेळ मी करूं? छे छे, तुमच्या हृदयास अद्यापि पीळ पडला नाहीं. माझ्या हृदयांत धडाडून पेटलेल्या आगीच्या ठिणगीचीहि आंच तुह्मांस अद्यापि लागली नाहीं, हेंच खरें. अरेरे! माझ्या स्थितीची तुह्मांस नीटशी कल्पनाहि आली नाहीं. नाहीं तर व्यर्थ चकाट्या पिटण्यांत, आळसांत आणि चैनींत तुह्मीं आयुष्य फुकट घालविलें नसतें. आतां तरी डोळे उघडा. चैन करण्याची ही आपली वेळ आहे काय? उठा; आतां देहाचा होम करून हजारों लोकांचीं अंतःकरणें भक्तीनें आणि प्रेमानें भरून जातील असें कांहीं करून दाखवा. तुमच्या अंतःकरणांत या कार्याची प्रेरणा व्हावी, कार्यपूर्तीची थोडीशी तरी खरी आंच तुह्मांस लागावी आणि याच कार्य-क्षेत्रावर तुह्मांस शूरास उचित असें मरण यावें हीच माझी इच्छा आहे.

आपल्या कामाबद्दल गोमाजी कापशे अथवा तिमाजी पितळी दरवाजे काय ह्मणतात याकडे आतां लक्ष्य पुरवूं नका असा माझा निरोप माझ्या सर्व मित्र-मंडळीस सांगा.

आपला,
विवेकानंद.

पत्र १० वें.

ता. १२ जानेवारी १८९५.

प्रिय—

कीर्तीसाठीं आणि लोकांत मोठें नांव करण्यासाठीं कोणतेंहि काम करण्याची माझी इच्छा नाहीं, हें पुन्हां एकवार आणि शेवटचें माझें तुह्मांस सांगणें आहे. जगाच्या कल्याणासाठीं माझ्या कल्पनांचा प्रसार मला करावयाचा आहे. तुह्मीं तेथें जें काय आतांपर्यंत केलें त्यानें माझें नांव तेथें प्रसिद्ध झालें ही गोष्ट

खरी; परंतु असल्या गोष्टीकडे लक्ष्य देण्यास आतां मला वेळ कोठें आहे ? अशा रीतीनें आयुष्य व्यर्थ घालविण्यापेक्षां त्याचें अधिक चीज करण्याची माझी इच्छा आहे. माझ्या कल्पनांचा अधिक प्रसार व्हावा, त्यांना अधिक मूर्तस्वरूप यावें, अशासाठीं तुह्मीं आजपर्यंत काय काय केलें ? या दृष्टीनें तुमच्या कामाचा आढावा काढिला तर शून्य, महाशून्य, अति मोठें शून्य हाच निघावयाचा.

परस्पर विश्वास वाढवावा, परस्परांच्या कार्यांत मदत करावी आणि कोणींहि थोडेंसें चांगलें काम केलें तर त्याला उत्तेजन द्यावें हें आमच्या लोकांस शिकविणारी एखादी शाळा अवश्य पाहिजे ! येथें मी करीत असलेल्या कामाची प्रशंसा करण्यास कलकत्त्याच्या सभेंत पांच हजार लोक जमले होते ह्मणतां ! वा ! फार आनंदाची गोष्ट आहे. परंतु इतक्या लोकांजवळ प्रत्येकीं एक एक आणा आपल्या कार्यासाठीं मागा ह्मणजे जाग्यावर एक इसम तरी शिल्लक राहील तर शपथ ! आपलें राष्ट्र अद्यापि लोकांनीं हातीं धरून चालविण्याच्या वयाचें आहे ! तुह्मांला भूक लागली तर वाढलेलें ताट तुमच्यापुढें कोणी ठेवील तर बरें. विशेषतः तुह्मांला कोणी भरवील तर त्याहून बरें, असें वाटण्याच्या स्थितींत सध्यां तुह्मी आहां. असले परावलंबी जीव जगण्यापेक्षां मेलेले बरे !

मागसलेल्या जातींत शिक्षणाचा प्रसार करण्याची कल्पना सध्या मीं सोडून दिली आहे. या गोष्टीलाहि पुढें हळू हळू सुरवात करतां येईल. सध्या चोहोंकडे जी निराशा व निरुत्साह पसरला आहे, तो नाहींसा करून लोकांत चेतना उत्पन्न करण्याजोगे खंबीर वक्ते हवे आहेत. सर्व धर्मांचें तुलनात्मक शिक्षण देण्याकरितां मद्रासेंत एखादें कॉलेज आपणास स्थापिलें पाहिजे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या तत्वमतांचें तसेंच संस्कृत आणि निरनिराळ्या युरोपियन भाषा यांचें शिक्षण तरुणांस त्या कॉलेजांत दिलें पाहिजे. तसेंच आपल्या मतांचा प्रसार करण्याकरितां इंग्रजी व देशी भाषेंत वर्तमानपत्रें सुरू केलीं पाहिजेत. जर तुह्मीं यांपैकीं कांहीं करून दाखवाल तर खऱ्या कार्यास तुह्मीं आरंभ केला असें मी समजेन. आतां बोलण्यापेक्षां कांहीं करण्याची तयारी प्रत्यक्षपणें तुह्मीं माझ्या नजरेस आणून द्या. यांपैकीं कांहींच जर तुमच्यानें तेथें करवत नसेल, तर माझें नांव सोडून द्या. माझ्या मनाप्रमाणें मी आपलें कार्य येथें होईल तेवढें करीन. माझें ह्मणणें ऐकून घेणारे आणि तें त्यांच्या बुद्धीला पटलें तर त्याप्रमाणें प्रत्यक्ष आचरण करून दाखविणारे हजारों लोक येथेंच आहेत.

धर्मसिद्धांतांनीं आंखून दिलेल्या मार्गानें चालण्याची ज्यांची ज्यांची तयारी आहे ते सर्व माझेच आहेत.

माझें नांव मोठें व्हावें, माझी कीर्ति वाढावी या उद्देशानें तुह्मी काहींच करूं नका. मोठ्या नांवापेक्षां माझ्या कल्पना मूर्तरूपानें पाहण्यांत मला अधिक संतोष होईल. आजपर्यंत पुष्कळांच्या हातून अशीच चूक झाली. लोकांस सन्मार्ग दाखविण्याच्या बुद्धीनें उपदेश करण्यास प्रथम सुरवात करावी. नंतर लोकांत नांव जरा मोठें होऊं लागलें ह्मणजे कीर्तीच्या पाठीस लागून तत्वविचार सोडून द्यावा. असेंच आजपर्यंत अनेकांच्या हातून झालें आहे. ह्मणजे धान्य गेलें आणि भूस राहिलें असें झालें आहे. भगवान् श्रीरामकृष्णांच्या शिष्यांनीं असली चूक होऊं देऊं नये. कोणाचेंहि नांव मोठें करण्याकरितां नव्हे, तर त्याच्या मतांचा प्रसार करण्याकरितां खटपट केली पाहिजे.

परमेश्वर आपणांस सुखी ठेवो.

आपला,
विवेकानंद.

पत्र ११ वें.

ता० १७ फेब्रु० १८९५.

प्रिय—

देहपात होण्याची वेळ आली तरी आपल्या कार्यक्रमांत व्यत्यय येऊं द्यावयाचाच नाहीं असलीं भगिरथाच्या निश्चयाचीं माणसें मला हवीं आहेत. यश अथवा अपयश हा प्रश्न आपला नाहीं. आपल्या कार्याचें पर्यवसान वाटेल तें होवो. निश्चयानें कार्य करणें येवढेंच आपलें काम, असें समजणारीं माणसें मला हवींत. तसेंच आपल्या कार्यांत सोंगढोंग वगैरे कांहीं उपयोगी नाहीं. जें कांहीं करावयाचें तें चवाठ्यावर उभें राहून करावयाचें. माझें कार्य अशा रीतीनें चाललें तरच करावयाचें; नाहींपेक्षां त्याची कल्पनाच सोडावी हें मला अधिक प्रशस्त वाटतें.

सध्याच्या स्थितींत अत्यंत बिकट अशा कामाला आपण हात घातला आहे. आणि जों जों त्याचा परीघ विस्तृत होत जातो, तों तों तें अधिकच कठीण होत जातें.

सध्या मला बरेच दिवस विश्रांति मिळाली तर पाहिजे आहे. तथापि इंग्लंडांत जाणेंहि फार लांबणीवर टाकितां येत नाहीं. असो. धीराधीरानें सर्वकांहीं

करतां येईल. कोणतेंहि मोठें कार्य अडचणीवांचून सिद्धीस जात नाहीं, असा नियमच आहे. तुझ्या कल्पनेबाहेर आपल्या कार्यास शेवटीं यश येईल अशी माझी खात्री आहे. धीर आणि चिकाटी सदोदित जवळ असलीं ह्मणजे आज नाहीं उद्यां यश हें येणारच.

न्यूयॉर्क शहर हें सर्व बाबतींत अगदीं मध्यबिंदूसारखें आहे. कोणत्याहि कल्पनेचा प्रसार तेथें झाला ह्मणजे तेथून ती कोळ्याच्या जाळ्यासारखी सर्वत्र पसरते. माझ्या कल्पना पक्क्या रुजविण्यासाठीं येथें मला माझें सर्व बळ खर्चावें लागलें. बीज चांगलें रुजून त्याचीं मुळेंहि खोल गेलीं आहेत. आतां त्याचा मोठा वृक्ष होणें हें फक्त कालावधीचें काम आहे.

प्राचीन आर्यतत्वज्ञान सोप्या इंग्रजी भाषेंत आणणें हें मोठें कठीण काम आहे. पौराणिक ग्रंथांतील दंतकथांची गुंतागुंत सोडविणें आणि नवीन मनुष्यास अगदीं भांबावून टाकणारे सिद्धांत साध्या आणि सुलभ भाषेंत आणून त्यांच्याद्वारें धर्मास साधें व्यावहारिक स्वरूप देणें हें किती कठीण काम आहे, याची कल्पना, ज्यांनीं अशा कार्यास हात घातला असेल त्यांसच येईल. अद्वैतसिद्धांतांतील परोक्षज्ञान प्रत्यक्ष–व्यवहार्य–करतां येईल अशा भाषेंत समजावून दिलें पाहिजे. दंतकथांची गुंतागुंत सोडवून त्यांतील नीतितत्वें सहज रीतीनें समजतील आणि तीं आचरणांत आणण्याची शक्यता सिद्ध होईल, अशा रीतीनें त्या दंतकथांची मांडणी केली पाहिजे. योगमार्ग ह्मणजे सामान्य मनुष्यास अगदीं अगम्य, अगदीं अव्यवहार्य, किंबहुना त्याज्य अशी जी समजूत झाली आहे, ती बदलून तो व्यवहार्य आहे, कार्यकारण भावांनीं बांधिलेलें असें तें शास्त्र आहे, ही गोष्ट साध्या व सोप्या भाषेंत सांगितली पाहिजे. एखाद्या लहान मुलासहि समजण्यासारखें स्वरूप या गोष्टींस द्यावयाचें, हीच माझ्या आयुष्याची इतिकर्तव्यता आहे. यांत मला कितपत यश येईल, हें परमेश्वरास ठाऊक. खटपट करीत राहणें इतकेंच आपल्या हातांत आहे. ती आपण करूं. यशापयशाचा विचार आपला नव्हे. आपल्या अत्युच्च कल्पनांस चिकटून राहणें आणि खरें वैराग्य पूर्णपणें अंगीं बाणून ब्रह्मानुभव होईपर्यंत मार्गभ्रष्ट न होणें हें मुमुक्षूस सध्याच्या कनक-कामिनीच्या युगांत अत्यंत दुष्कर आहे.

येथें माझ्या कामास चांगलें यश येत आहे, ही परमेश्वराची कृपा ह्मणावयाची. ख्रिस्ती धर्मोपदेशक आणि त्याच जातीचे येथील इतर लोक यांचा माझ्याबद्दल गैरसमज झाला, याबद्दल त्यांसहि फारसा दोषां देत येत नाहीं. कनक

आणि कांता यांस अगदीं तुच्छ समजणारा मनुष्य येथें त्यांच्या पाहण्यांत कोणीच आला नव्हता. तेव्हां मी ढोंगी आहें, अशी त्यांची सहजच कल्पना झाली. पावित्र्य आणि ब्रह्मचर्य यांजबद्दल हिंदूंच्याप्रमाणेंच पाश्चात्त्यांच्या कल्पना आहेत असें तुह्मी समजूं नका. या गुणांस प्रथमस्थान देण्याऐवजीं त्यांच्या जागीं सद्गुण आणि धैर्य यांची त्यांनीं स्थापना केली आहे. आतां येथें बरेच अनुयायी मला मिळत आहेत. कनक आणि कांता यांच्या सपाट्यांत न सांपडतां राहतां येणें शक्य आहे, अशी त्यांची खात्री होऊं लागून या गुणांबद्दल पूज्यभावहि त्यांजमध्यें हळू हळू उत्पन्न होऊं लागला आहे. धीरानें आणि निश्चयानें आपलें काम करीत राहिलें ह्मणजे यश केव्हां तरी येतेंच. परमेश्वर सदैव आपणांस सुखी ठेवो.

आपला,
विवेकानंद.

पत्र १२ वें.

न्यूयार्क—९५.

प्रिय—

सामाजिक सुधारणा या नांवानें चालू असणाऱ्या चळवळींत केव्हांहि न पडण्याची तुह्मी खबरदारी घ्या. धर्मतत्वांचा प्रसार होऊन त्यांतील तत्वें मनांत पक्कीं बाणून तीं रोजच्या व्यवहारांत प्रत्यक्ष दिसूं लागल्याशिवाय कोणतीहि सुधारणा शक्य नाहीं हें विसरूं नका. लोकांच्या चालीरीति, धर्मभोळेपणा इत्यादि गोष्टींचा उल्लेख करून त्यांजवर टीका करीत बसण्याचें आपलें काम नव्हे. धार्मिक जीवन आणि परमेश्वरी मार्ग यांची ओळख लोकांस करून देणें हें आपलें काम आहे. हें करीत असतां आपले सद्गुरु आणि परमेश्वर यांजवरील विश्वास यत्किंचित्हि ढळूं देतां उपयोगी नाहीं. हा विश्वास दृढ बाळगून धैर्यानें काम करीत राहिलें ह्मणजे तुमच्या केंसासहि धक्का लावण्याची कोणाची छाती नाहीं. माझा उत्साह आणि सामर्थ्य दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर आहे. माझ्या शूर मुलांनो, आतां कामास आरंभ करा.

तुमचा स्नेही,
विवेकानंद.

पत्र १३ वें.

प्रिय—

रोजच्या वागणुकींत धर्माचा कांहीं संबंध येतो याची कल्पनाहि अमेरिकन लोकांना नाहीं. या बाबतींत हिंदूंना अधिक ज्ञान आहे. पैसा कसा मिळवावा याचें ज्ञान अमेरिकन लोकांस अधिक आहे. यासाठीं येथें पाया पक्का करणें हेंच मोठें कठिण काम आहे; आणि हें केल्याशिवाय मला येथून हालतां येत नाहीं. कोणतेंहि काम झालें तरी तें पायाशुद्ध आणि पक्कें करावें.

भगवान् श्रीरामकृष्ण असे होते आणि तसे होते हें लोकांस सांगण्यापासून कांहीं फायदा नाहीं. त्यांच्या धर्मज्ञानाचा परिचय लोकांस करून दिला तर त्याचा उपयोग अधिक होईल. बाकी जगाची दृष्टि पाहिली तर एखाद्या सद्गुरूच्या तत्वज्ञानापेक्षां त्यानें काय काय चमत्कार केले आणि तो कसा राहत होता इत्यादि किरकोळ गोष्टींची त्यांस अधिक आवड असते.

मोठमोठ्या गोष्टी करण्याबद्दल नुसते बेत करीत बसण्यापेक्षां एखाद्या क्षुल्लक गोष्टीसही एकदम आरंभ करणें अधिक श्रेयस्कर आहे. लहानसहान गोष्टींतहि अनेक अनुभव येऊन आत्मविश्वास वाढतो. यासाठीं मोठमोठे बेत करीत न बसतां लहानसहान गोष्टी करण्यास एकदम आरंभ करावा. सदोदित उद्योगरत राहिलें ह्मणजे पुढील मार्ग आपोआप दिसूं लागतो. कसलाहि गाजावाजा न करितां शांत पण अविरत उद्योग चालूं द्या. रोम शहर एका दिवसांत बांधलें गेलें नाहीं अशा अर्थाची इंग्रजींत ह्मण आहे तिचा अर्थ हाच आहे.

ह्मैसूरचे महाराजांस देवाज्ञा झाल्याचें कळलें. त्यांच्या मृत्यूनें आपला एक आधारस्तंभच नाहींसा झाला आहे. असो. परमेश्वराची मर्जी ! आपल्या मदतीसाठीं त्यानें दुसऱ्या कोणाची योजना केली असेल !

मिळाल्यास कांहीं दर्भासनें जरूर पाठवावीं.

आपला,
विवेकानंद.

पत्र १४ वें.

प्रिय—

आपलें पत्र आतांच मिळालें. माझ्या कार्यांत व्यत्यय आणण्याचा येथें कोणीं प्रयत्न केला, तर त्यांत त्यास यश येईल अशी भीति तुह्मी यत्किंचित्‌हि बाळगूं नका. माझें रक्षण परमेश्वर करीत आहे, तोंपर्यंत माझें कोणाच्यानेंहि कांहीं वांकडें होणार नाहीं.

अमेरिका देशाबद्दल आपणास नीटशी कल्पना करतां येणार नाहीं. हा देश विस्तारानें बराच मोठा आहे. येथील लोकांपैकीं बराचसा भाग धर्माविषयीं फारशी काळजी न करणारा असा आहे. आपणास ख्रिस्तानुयायी ह्मणविणें हा एक देशाभिमानाचा भाग समजला जात असल्यामुळेंच ख्रिस्ती धर्म अद्यापि येथें जीव धरून आहे. आपण तेथील कार्यास झपाट्यानें सुरवात करावी. इकडील काळजी नको. वेदांतसूत्रें आणि त्यांजवरील निरनिराळ्या मतांच्या आचार्यांच्या टीका उपलब्ध असतील तितक्या पाठवाव्या.

मी हिंदुस्थानांत परत येऊन काय करूं? माझा देह मीं परमेश्वराच्या चरणीं अर्पण केला आहे. त्याचें कार्य जेथें अधिक प्रमाणावर होईल तीच माझी भूमि. हिंदुस्थानांत येऊन माझ्या कल्पनांस मूर्तस्वरूप देतां येईल अशी मला आशा नाहीं. येथें माझें ह्मणणें ऐकून घेणारे आणि तें पटल्यास त्याप्रमाणें वागण्यास तयार होणारे अनेक आहेत. येथून हालण्याविषयीं परमेश्वराचा हुकूम होईल तेव्हां मी येथून दुसरीकडे जाईन. तर आतां मजबद्दल अधिक काथ्याकूट करण्यांत वेळ घालवूं नका. कार्यास हळू हळू आणि शांततेनें आरंभ करा. विद्यार्थ्यांस वेदांत आणि भाष्यें शिकविण्याकरितां एखाद्या मठाची स्थापना शक्य तितक्या लवकर करा. आपण क्षुद्र, आपल्या हातून काय होणार, असल्या दुर्बल विकारांचें वारेंहि आपल्यास कधीं लागूं देऊं नका. असल्या हृदयदौर्बल्यानें व्यक्तीचें नुकसान तर होतेंच, पण ज्या कार्यांत तो पडला असेल त्या कार्याचीहि हानि झाल्यावांचून रहात नाहीं. परमेश्वरावर अत्यंत दृढ—अगदीं अढळ—असा विश्वास आणि आपण कोणतेंहि कार्य पार पाडूंच पाडूं अशी धमक असेल तरच यश मिळण्याची खात्री.

आपण सदोदित परमेश्वराजवळ आहों, अशी भावना दृढ करून नेहमीं आनंदांत राहावें. आपल्या भावनेपासून कधींहि च्युत न होण्याची पक्की खबरदारी

बाळगली ह्मणजे क्षुद्र विचारांनीं मन दुर्बल होत नाहीं. तसेंच 'परोपदेशे पांडित्यं' असें कधींहि होऊं देऊं नये. आपण जगाचे गुरु नसून शिष्य आहों–चाकर आहों, हें सदोदित ध्यानांत धरिलें पाहिजे.

आपला,
विवेकानंद.

पत्र १५ वें.

ता० ६ मे १८९५.

प्रिय—

आपलें पत्र आणि श्रीरामानुजाचार्यांच्या भाष्याची प्रत आज सकाळींच पावली. तेथें येऊन हिंदुधर्मावर हल्ला करणारांशीं वादविवाद करावा असें मला वाटत नाहीं. हिंदु लोक जर यासंबंधी स्वतः उदासीन आहेत आणि ते जर खुशाल घोरत पडले आहेत तर ही त्यांची कामगिरी करण्यावांचून माझें काय खोळंबलें आहे? हिंदुस्थानांतील लोकांस आपल्या धर्माचा मोठा अभिमान आहे असें ह्मणतां. मग तीस कोटि लोकांपैकीं आपल्या धर्मावर होणाऱ्या हल्ल्यापासून त्याचें संरक्षण करण्यास कोणीच तयार होत नाहीं हें काय? विशेषतः आपणांस पंडित ह्मणविणाऱ्या व्यक्तींचें हें काम आहे. असे पंडित ह्मणविणारे तेथें शेंकड्यानें मोजतां येण्याइतके आहेत. हें वाग्युद्ध करण्याचें काम त्यांच्याकडे सोंपवून मला आपलें काम करण्यास मोकळा राहूं द्या. परक्या लोकांत येऊन आणि हाडांचीं काडें करून मी येथें कांहीं कार्य करीत आहें. अशा वेळीं कांहीं थोडीशी तरी मदत तुह्मीं मला करावयास नको होती काय? पण हिंदुस्थानानें मला काय मदत केली आहे? अरेरे! हिंदुस्थानांतील लोकांइतके देशाभिमानशून्य लोक साऱ्या जगांत कोठेंहि आढळणार नाहींत.

उत्तम सुशिक्षित आणि खंबीर मनोवृत्तींचे कांहीं थोडे लोक इकडे पाठवून कांहीं वर्षें त्यांनां येथें राहतां येईल, अशी तजवीज जर तुह्मीं कराल, तर आपल्या जन्मभूमीची केवढी मोठी सेवा केल्याचें पुण्य तुह्मांस लाभेल! हिंदुस्थानाबद्दल प्रेम आणि आदर येथें उत्पन्न झाला तर केवढें मोठें पाठबळ आपणांस मिळेल याची कल्पना तुह्मांस नाहीं. हिंदु लोक ह्मणजे अर्धनग्न स्थितींतले रानटी लोक आहेत, आणि मारून मुटकून तुमच्यांत सुधारणा केली पाहिजे, अशीच अद्यापि पाश्चात्यांपैकीं पुष्कळांची तुमच्याबद्दल कल्पना आहे. ही कल्पना अगदीं चुकीची

आहे अशी तुह्मीं प्रत्यक्ष प्रमाणानें त्यांची खात्री करून दिली पाहिजे. इतक्या लांबच्या पल्ल्यावर येऊन माझ्यासारखा एकटा मनुष्य काय काय करूं शकणार आहे ? वास्तविक विचार केला तर मीं केलें इतकेंहि काम करून घेण्याची तुमची किंमत नाहीं.

आजपर्यंत जे जे हिंदु लोक इकडे आले, त्यांनीं त्यांनीं हिंदुस्थानाची आणि हिंदुधर्माची निंदाच केली. कीर्तिलाभ आणि द्रव्यलाभ व्हावा इतक्याच उद्देशानें ते येथें आलेले होते. मग हे लाभ कोणाच्या निंदेनें होतात अथवा स्तुतीनें होतात, हें पाहण्याचें त्यांस कारणच नव्हतें. मी येथें द्रव्यासाठीं आलों नाहीं अथवा कीर्तिसाठींहि आलों नाहीं, हें तुह्मांस ठाऊकच आहे. माझी इच्छा नसतांहि या दोहोंचा येथें मला लाभ झाला. मी हिंदुस्थानास परत येऊन काय करूं ? तेथें मला एक तरी मदतगार मिळणार आहे काय ? घरदार, बायकापोरें वगैरे सोडून देऊन खऱ्या संन्यस्तवृत्तीनें धर्मप्रसाराचें काम करावयास मद्रासेंत कोण कोण तयार आहेत, तें मला एकवार कळवाल तर वरें होईल. माझ्या आजपर्यंतच्या मेहनतीनें हिंदुधर्माबद्दल येथील लोकांच्या पूर्वकल्पना साफ बदलून गेल्या आहेत. हिंदुमनुष्यापासून इतके उदात्त धर्मविचार ऐकावयास सांपडतील ही कल्पनासुद्धां त्यांस प्रथम नव्हती. कांहीं झालें तरी माझी पाठ सोडणार नाहींत, अशा शेंकडों बंधूंची येथें मला प्राप्ति झाली आहे. येथें आणखी कांहीं वर्षें मी राहिलों तर माझ्या कल्पना चांगल्याच फलद्रूप होतील, असा मला पक्का भरंवसा वाटूं लागला आहे. येथें एक विश्वधर्ममंदिर बांधण्याचा बूट निघाला होता, पण त्याचें पुढें काय झालें तें समजलें नाहीं. असो. न्यूयॉर्क शहरांत माझें बस्तान चांगलें जुळलें आहे; आणि तें अमेरिकेंतील अगदीं प्रमुख शहर असल्यामुळें माझा कार्यभाग आतां सुरळीतपणें खचित पार पडेल. माझ्या शिष्यशाखेपैकीं कित्येकांस बरोबर घेऊन एका आश्रमांत मी लवकरच जाणार आहें. तेथें त्यांस योग, भक्ति आणि ज्ञान यांजवर व्याख्यानें द्यावयाचीं आहेत. ही माझी मंडळी लवकर तयार होण्याजोगी आहे आणि ती तशी तयार झाली ह्मणजे माझ्या कार्यांत माझ्या बरोबरीनें काम करण्यास या मंडळीचा मला चांगलाच उपयोग होईल.

आपलें वर्तमानपत्र सुरू करण्यास लागणारा पैसा आणखी सुमारें एक महिन्यानें मी पाठवूं शकेन. या कामासाठीं भिकारड्या हिंदू लोकांच्या दारांत जाऊन तोंड वेंगाडूं नको. परमेश्वराची मजवर कृपा आहे. त्यानें मला उत्तम विचार-

शक्ति आणि कोदंड मोडण्यासारखे सामर्थ्यवान् भुजदंड दिले आहेत. मग मी दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा कां करूं? माझे सर्व बेत मी एकटाच स्वतःच्या सामर्थ्यावर पार पाडीन.

वेदांतमतापर्यंत हिंदुतत्वज्ञानाच्या एकंदर तीन पायऱ्या आहेत. त्या तीन पायऱ्या ह्मणजे द्वैत, विशिष्टाद्वैत आणि अद्वैत ह्या होत. एकामागून एक असा यांचा क्रम आहे. मनुष्याच्या धार्मिक जीवनाचा आरंभ द्वैतांत आणि पर्यवसान अद्वैतांत होतें. द्वैतास आरंभ करून आपल्या शक्तीप्रमाणें एक एक पायरी चढतां चढतां तो शेवटीं पूर्ण अद्वैती बनतो. धर्माचें हेंच तात्विक स्वरूप आहे. हींच तत्वें निरनिराळ्या चालीरीतींत प्रत्यक्ष गोचर होऊं लागून सांप्रतचा हिंदुधर्म बनला आहे. मानवी धर्मबुद्धीचा प्रथम द्वैतांत उदय होतो. द्वैतमार्गाचें जें स्वरूप युरोपखंडांत व्यक्त झालें, त्यास खिस्ती धर्म अशी संज्ञा प्राप्त झाली. पौर्वात्य देशांत प्रकटलेलें स्वरूप मुसलमानी धर्म या नांवानें ओळखलें जातें. अद्वैतांतील शुद्ध योगमार्गाचें स्वरूप ह्मणजे बौद्ध धर्म होय. निवळ धर्म या शब्दाचा अर्थ मी 'वेदांत' असा करतों. भोंवतालची परिस्थिति आणि गरजा यांच्या संगानें तो निरनिराळ्या स्वरूपानें प्रगट झाला इतकेंच. शाक्त, शैव इत्यादि निरनिराळे पंथवालेहि वेदांतांतील तत्वांचाच आपल्या मताला व आचाराला आधार घेतात.

तुह्मी जें मासिक पुस्तक सुरू करणार आहां, त्यांत याच धोरणानें एकसारखे लेखामागें लेख तुह्मांस लिहिले पाहिजेत. धर्मतत्वांच्या या तीन निरनिराळ्या पायऱ्या असून त्यांत सर्वत्र एकवाक्यता आहे, ही गोष्ट प्रमुखपणें तुह्मीं लोकांच्या नजरेस आणिली पाहिजे. निरनिराळ्या मतवाल्यांच्या आचारांवर टीका करण्याचें आपलें काम नाहीं. तत्वज्ञानाचें पूर्ण विवरण करून तें लोकांच्या मनांत ठसेल असें करणें हें आपलें काम आहे. हें तत्वज्ञान प्रत्यक्ष व्यवहारांत कसें आचरावें, हें ज्याचें त्यानें आपआपल्या परिस्थितीप्रमाणें ठरवावें. वर दाखविलेल्या रूपरेखेस अनुसरून मला एक ग्रंथ लिहावयाचा होता, व याचसाठीं तिन्ही प्रमुख आचार्यांचीं भाष्यें मी मागविलीं होतीं. सध्या मला फक्त रामानुजाचार्यांचें भाष्य मिळालें आहे. मी कांहीं मोठा पट्टीचा लेखक नाहीं हें तुह्मांस ठाऊकच आहे. असो.

दारोदार भीक मागत फिरणें माझ्या स्वभावाला आवडत नाहीं. कांहीं काम नसलें तर मी घरीं स्वस्थ बसून राहतों. कांहीं काम आपण होऊन चालून आलें, तर तें करावयाचें, नाहीं तर स्वस्थ बसावयाचें, हा माझा नित्यक्रम

आहे. दांभिकपणानें स्वतःचा बडेजाव जर मला वाढवावयाचा असता तर येथें एखादी मोठी धर्मसंस्था अथवा पंथ काढणें मला फारसें अवघड गेलें नसतें. हाय ! हाय ! कनक आणि कांता यांचें साम्राज्य अमेरिकेसारखें दुसऱ्या कोठेंहि नसेल. धर्मोपदेशकांचा वर्ग पाहिला तर 'कवडी कवडी माया जोडी, रुपिया लाख करोड' हेंच त्याचें पालुपद. व्यावहारिक लोकांना धनतृष्णा तर अत्यंत आहेच पण कामिनीच्या हव्यासाचीहि त्यांत आणखी भर पडली आहे. इंद्रियजन्य सुखावर लाथ मारून केवळ परमेश्वराचे अव्यभिचारी भक्त मला अशा लोकांतून निर्माण करावयाचे आहेत. हीच माझी येथील कामगिरी आहे. हें कार्य अगदीं हळू हळू सिद्ध होणार हें उघडच आहे. तुह्मी आपल्या हिंदुस्थानांतील कामगिरीस सुरुवात करा.

आपण जें वर्तमानपत्र काढणार आहों, त्यांत आपल्या कार्याशीं संलग्न नसलेले असे कोणतेहि विषय येऊं न देण्याविषयीं तुह्मीं पूर्ण खबरदारी घेतली पाहिजे. यासाठीं आपल्या कार्याचें भव्य स्वरूप आणि मोठा दर्जा यांचा कधींहि विसर पडूं देऊं नको. कसलेले आणि ओजस्वी अशाच लेखकांचा संग्रह तुह्मीं केला पाहिजे. तसेंच अहंकार पूर्णपणें विसरून अत्यंत सावधगिरीनें पण निश्चयानें एक एक पाऊल तुह्मीं पुढें टाकीत राहिलें पाहिजे. भीति आणि अश्रद्धा यांस आपल्या हृदयांतून प्रथम हद्दपार करा. आपण मोठाले कार्यभाग खचित उठविणार आहों. लोकांचे पुढारी होण्याची इच्छा बाळगूं नका. त्यामुळें मी मोठा आणि इतर माझे अनुयायी असला दुष्ट अहंकार हृदयांत शिरतो. आपण सर्वांचे सेवक–सर्वांचे पट्टेवाले–आहों अशीच आपली भावना सदोदित राहिली पाहिजे. सर्वांनीं माझें ऐकिलें पाहिजे असा दुरभिमान झाला ह्मणजे त्यामुळें परोत्कर्षासहिष्णुतादि अनेक विकार आपल्या हृदयांत माहेरघर करतात आणि त्यामुळें शेवटीं सर्व कार्याचा नाश होतो.

तुह्मीं कार्याचा आरंभ चांगला केला आहे. आतां चिकाटीनें एक एक पाऊल तुह्मीं पुढें टाकलें पाहिजे. आपणास कोणाशींहि शत्रुत्व करावयाचें नसून सर्वत्र मित्रभाव वृद्धिंगत करावयाचा आहे. आपण पुढारी ह्मणून कार्यास आरंभ केला तर एखादें कुत्रेंसुद्धां आपल्या मदतीस येणार नाहीं. यासाठीं आपलें कार्य यशस्वी व्हावें असें वाटत असेल तर अहंकार सोडला पाहिजे.

आपला,

विवेकानंद.

पत्र १६ वें.

न्यूयॉर्क, ता० १४ मे ९५.

प्रिय—

न्यूयॉर्क येथें आपल्या कार्याचा पाया आतां बहुतेक मजबूत होत आला असून माझ्या पाठीमागें तें चालू ठेवण्यासारखे अनुयायीहि मला बरेच मिळाले आहेत. सध्या येथील वर्तमानपत्रांत येणारे लेख वाचून तुह्मांस माझ्या येथील कार्याच्या स्थितीची खरी कल्पना होणार नाहीं. मी येथून निघून गेल्यानंतर माझें कार्य सतत चालू राहील अशी व्यवस्था मला करावयाची आहे आणि परमेश्वर कृपा करील तर हें लवकरच घडून येईल, असा भरंवसा मला वाटूं लागला आहे. अशा कार्यांसाठीं खऱ्या मर्दांची जरूर असते. साऱ्या जगांतला पैसा एका ठिकाणीं केला तरी शूर माणसांच्या अभावीं असलीं कार्यें कुजत पडतात.

माझ्याबद्दल निरर्थक काळजी करीत बसूं नका. मी अयोग्य वेळीं येथून बाहेर गेलों तर इतके दिवसांचे माझे श्रम पाण्यांत जातील. असें होऊं देतां उपयोगी नाहीं.

माझी नाचक्की करण्याकरितां भल्याबुऱ्या वाटेल त्या उपायांची योजना करणारे येथें जरी बरेच लोक आहेत, तरी उलटपक्षीं माझ्या जिवास जीव देणारेहि अनेक मित्र मला मिळाले आहेत.

अत्यंत पवित्रता, अत्यंत स्थैर्य आणि अत्यंत सहनशीलता हींच यशाचीं मुख्य साधनें आहेत.

आपला,
विवेकानंद.

पत्र १७ वें.

न्यूयॉर्क, ता० २२ जून १८९५.

प्रिय—

मी हिंदुस्थानांत कधींच परत येणार नाहीं असा तुमचा समज झालेला दिसतो. परंतु तो समज खरा नाहीं. तिकडे लवकरच परत येऊन माझ्या जन्मभूमीची सेवा करण्याची माझी इच्छा आहे. कोणत्याहि कार्यांत अपयश घेऊन मागें फिरणें मला पसंत नाहीं. येथें जें वृक्षारोपण मीं केलें आहे, त्याला नुक-तीच कोठें पालवी फुटूं लागली आहे. अशा वेळीं गुरांढोरांच्या तोंडांपासून त्याचें

संरक्षण करणें अवश्य नाहीं काय? त्याचीं मुळें जोमदार होऊन गुरेंढोरें व सोसाट्याचे वारे यांजपासून स्वतःचें संरक्षण करतां येण्याइतका तो मोठा होई-पर्यंत माळ्याची नजर त्याजवर असली पाहिजे.

कोणतेंहि कार्य घाईनें बिघडतें. 'सहसा विदधीत न क्रियाम् । अविवेकः परमापदांपदम् ॥' हें कविवचन नित्य लक्ष्यांत बाळगून सदैव कार्यमग्न हो. परमेश्वर माझा मार्गदर्शक असतां काय होईल आणि कसें होईल याची काळजी कां करूं? सर्व नीट होणारच यांत संशय नाहीं.

तुमची सदैव प्रेमवृद्धि इच्छिणारा,

विवेकानंद.

पत्र १८ वें.

ता० १ जुलै १८९५.

प्रिय—

पुन्हां एकवार मी तुला सांगून ठेवतों कीं, या जगांत आपल्या संरक्षणासाठीं आपणच कंबर बांधली पाहिजे. तुह्मी असें लहान मुलांसारखें कां करतां? तुमच्या धर्मावर कोणीं हल्ला केला, तर त्याचें संरक्षण तुह्मींच केलें पाहिजे. माझ्याबद्दल काळजी करण्याचें तुह्मांला कारण नाहीं. मला येथें शत्रूंपेक्षां मित्रच अधिक आहेत. खरें ह्मणशील तर या देशांत खरे ख्रिस्ती असे सुमारें तृतियांश लोक आहेत. त्यांतून मिशनऱ्यांबद्दल प्रेम असलेले असे लोक सुशिक्षितांत तर फारच थोडे आहेत. उलट मिशनरी लोकांनीं एखाद्याची निंदा केली तर तेवढ्यामुळेंच त्या गोष्टीचें कौतुक करणारे असे लोक येथें पुष्कळ आहेत. मिशनरी लोकांचें वजन येथें (अमेरिकेंत) दिवसेंदिवस कमीच होऊं लागलें आहे. ते हिंदुधर्मा-विरुद्ध बोलतात याचें तुला इतकें वाईट वाटत असेल तर त्यांना जबाब देण्या-इतकें सामर्थ्य तुला नाहीं काय? कोणी रागें भरल्याबरोबर लहान मूल जसें आई-कडे रडत जातें, तसेंच तूंहि करावेंस, हें मला योग्य दिसत नाहीं. इतकी बाल-बुद्धि असणें हा कांहीं खरोखर सद्गुण नाहीं.

येथें मला बरेच अनुयायी मिळाले आहेत. आतां याच अनुयायांची सुसंबद्ध रचना करण्याच्या विचारांत मी आहें. एकवेळ अशी रचना झाली ह्मणजे माझ्या पाठीमागेंहि माझें कार्य येथें सुरळीत चालेल. इतकी व्यवस्था पक्की झाल्यावर मी

हिंदुस्थानांत आलों, तरी माझें येथील कार्य चालविण्यास व शिवाय मला हिंदुस्थानांतहि मदत करण्यास योग्य असे गृहस्थ येथें मिळतील. यासाठीं, माझ्याबद्दल यत्किंचित्‌हि काळजी करण्याचें तुह्मांस कारण नाहीं. मिशनरी लोक हिंदुधर्माविरुद्ध भाषणें करतात, हें पाहून आपलींच मनगटें चावण्यापलीकडे तुह्मीं काय केलें आहे ? हिंदुधर्माचें पायाशुद्ध ज्ञान लोकांस तुह्मीं कां देऊं नये ? तसें करण्यास तुमचीं तोंडें कोणीं बांधलीं आहेत काय ? माझ्यासारखा एकटा संन्यासी किती गोष्टी करूं शकेल ? तुह्मीं निव्वळ लांकडाचे ठोकळे आहांत ! तुह्मांकडे पाहून मला खरोखर हंसूं येतें. तुमच्यासारख्या वृद्ध मुलांस मी मदत तरी कशाची करूं ?

तुह्मा सजीव पुतळ्यांस मारून झोडपून खऱ्या मनुष्याच्या स्थितीस आणण्याचें अवघड कामहि मलाच करावें लागणार, हें मी जाणून आहें. खरें ह्मणशील तर हिंदुस्थान देश सध्यां लांकडी पुतळ्यांनीं भरला आहे. यासाठीं आपलें डोकें फिरविण्यांत अर्थ नाहीं. तेथें येऊन कांहीं कार्य करावयाचें ह्मटलें, तर त्याची जुळवाजुळव येथें केली पाहिजे. पैशासंबंधी वगैरे सर्व मदत मला येथूनच मिळविली पाहिजे. अशा मदतीची खात्री झाल्याशिवाय तेथें येऊन निःसत्व माणसांच्या हातीं पडल्यासारखें मात्र होईल. आतां स्वतःस अधिक त्रास करून न घेतां तुझ्यानें जें थोडेंबहुत कार्य होईल तेंच कर. येथून तेथपर्यंत सर्व कामें शेवटीं माझ्या एकट्याच्या गळ्यांत पडणार हें मला ठाऊकच आहे ! कांहीं हरकत नाहीं. माझा पाठीराखा सदोदित जवळ उभा असतां मला भय कसलें आणि काळजी तरी कसली ? कोणत्याहि गोष्टींत तुह्मांस स्वतःचें संरक्षण करतां येतें, एवढें जरी तुह्मीं मला दाखविलें, तरी मला फार समाधान होईल. आपलें बुद्धिसामर्थ्य तुह्मी प्रत्यक्ष कृतींत अल्प प्रमाणावर जरी प्रकट केलें तरी मला त्याचें फार कौतुक वाटेल. माझ्यासंबंधीं कोणींहि कांहीं बरें वाईट बोलला तर तें मला कळवून उगीच त्रास देऊं नको. जगांतल्या प्रत्येक मूर्खाच्या न्यायासनासमोर आपली योग्यता सिद्ध करण्याची माझी इच्छा नाहीं. प्रचंड उद्यमशीलतेनें, मोठ्या धैर्यानें आणि अखंड चिकाटीनेंच मोठालीं कार्यें पार पडतात, हें अद्यापि न समजण्यासारखें तुझें वय आहे काय ?

कोणतीहि गोष्ट पार पाडण्यास अंगांत धमक असावी लागते. दुबळ्याच्या हातून या जगांत एखादें लहानसें कार्यहि पार पडावयाचें नाहीं. मग मोठ्या कार्यांबद्दल तर बोलावयासच नको. तुह्मी तोंडानें 'अरे परमेश्वरा' असें ह्मणतां, पण त्याचवेळीं परमेश्वर खरोखर अस्तित्वांत तरी आहे कीं नाहीं, याची तुह्मांस

शंका असते. मी स्वतःस आतां माझ्या भगवंताच्या स्वाधीन केलें आहे. जोंपर्यंत मी पवित्र आहें आणि जोंपर्यंत मी त्याचा हुकूम बजावीत आहें, तोंपर्यंत कोणीं कितीहि खटपट केली तरी माझ्या डोक्याचा एक केंसहि त्याच्यानें वांकडा करवणार नाहीं. 'लोक मदत करीत नाहींत' ही तुमची नेहमींचीच रड आहे. पण लोकांकरितां तुह्मीं तरी काय केलें आहे, याचा कांहीं विचार करा. खरोखर लोकांकरितां असा एखादा उद्योग तुह्मीं आरंभिला तर लोकहि तुह्मांस खचित मदत करतील. जन्म आणि मृत्यु हे एकेकदांच येतात. त्यांच्या अवधींत कांहीं तरी कार्य करून न दाखविलें तर **'अजागलस्तनस्येव तस्य जन्म निरर्थकम्'** असें ह्मणून घ्यावें लागतें. माझ्या शिष्यांत असा कोणी निपजूं नये अशी माझी इच्छा आहे.

तुह्मां सर्वांवर सदैव प्रेम करणारा,
विवेकानंद.

पत्र १९ वें.

(खेत्रीच्या महाराजांस लिहिलेलें.)

ता० ९ जुलै १८९५.

मी हिंदुस्थानांत लवकर यावें अशी माझ्या मित्रमंडळीची इच्छा असल्याचें समजलें. कोणतेंहि काम अर्धवट ठेवण्याची मला संवय नाहीं. एखाद्या कामांत मी पडलों तर तें शेवटास जाईपर्यंत स्वस्थ बसावयाचेंच नाहीं, असा माझा स्वभाव आहे, हें महाराजांस ठाऊकच आहे. मी येथें जें बीजारोपण केलें आहे, तें आतांच जमिनींतून वर येऊं लागलें आहे व त्याचा लवकरच चांगला वृक्ष होईल अशी मला उमेद आहे. सध्या मला बरेच अनुयायी मिळाले आहेत, पण आणखी बरेच संन्याशी येथें होईपर्यंत मला तिकडे येतां येत नाहीं. येथून मी निघून गेलों तरी माझें कार्य माझ्या मागें सतत चालू राहण्याची व्यवस्था मला केली पाहिजे. ख्रिस्ती धर्मोपदेशकांकडून बराच अडथळा होत आहे; पण यामुळें येथील माझ्या आगमनाची खूण माझ्या मागेंहि राहील असें करण्याची माझी इच्छा बळावली आहे.

मी अद्यापि लंडनास गेलों नाहीं; पण मला तेथें कित्येक मित्र अगोदरच मिळाले आहेत. येत्या ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस लंडनला जाण्याचा माझा बेत आहे. लंडन आणि न्यूयॉर्क यांच्या दरम्यान फेऱ्या करण्यांत बहुतकरून

सर्व हिंवाळा निघून जाईल असें वाटतें. परमेश्वराची कृपा असेल, तर एवढ्या अवधींत येथें बरेच लोक मिळून माझ्या पाठीमागें माझें कार्य सतत चालू राहील असें मला वाटतें. कोणतेंहि महत्कार्य ह्मटलें कीं त्याला अडथळे हे यावयाचेच. लोक प्रथम चेष्टा करतात; नंतर अडथळ्यांस सुरवात होते; पण या दोन दिव्यांतून तें कार्य उत्तम रीतीनें पार पडलें ह्मणजे त्याच कार्याच्या पूर्तीसाठीं लोक आपण होऊन मदतीस पुढें येतात. चालू परिस्थितीच्या पलीकडे ज्याची नजर पोहोंचली आहे, अशा मनुष्याबद्दल सामान्य लोकांत प्रथम गैरसमज झाला तर त्यांत नवल नाहीं. यासाठीं अडथळे आणि लोकांकडून होणारा छळ हीं आनंदानें सहन केलीं पाहिजेत. लोकांनीं माझा कितीहि छळ केला तरी माझें अंतःकरण धुतलेल्या तांदुळासारखें असेल आणि परमात्मपदीं माझा दृढ भरंवसा असेल तर कालेंकरून सर्व विघ्नें विलय पावतील, यांत मला तिळमात्र शंका वाटत नाहीं.

आपला,

विवेकानंद.

पत्र २० वें.

ऑगस्ट १८९५.

प्रिय--

माझें हें पत्र तुला पोहोंचेल त्या सुमारास मी पारीस शहरीं असेन. या सालीं बराच कार्यभाग झाला आहे, व पुढील सालींहि बरेंच कार्य करण्याची मला उमेद आहे. मिशनऱ्यांबद्दल अधिक विचार करीत बसण्यांत तात्पर्य नाहीं. त्यांच्या पोटांत कळ येते, यांत काय नवल आहे ? त्यांचें अस्तित्वच जर संपुष्टांत येऊं लागलें तर त्यांनीं माझ्याविरुद्ध ओरड करावी हें रास्तच आहे. त्यांना इकडून मिळणाऱ्या रकमेंत यंदां बराच खाडा पडला आहे, आणि हा खाडा अधिक रुंदावत जाण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. पण असें असलें तरी मिशनरी संस्था बंद पडाव्या अशी माझी इच्छा नाहीं. त्यांनाहि यश यावें हीच माझी इच्छा आहे. आपला सर्व भार परमेश्वर आणि सद्गुरु यांच्या चरणीं अर्पण करून खुशाल असावें. त्यांच्या चरणीं आपली श्रद्धा दृढ आहे तोंपर्यंत आपणांस कशाचेंहि भय बाळगण्याचें कारण नाहीं. पण यांपैकीं कोणत्याहि एकावरील आपली श्रद्धा ढळली तर मात्र आपले हाल कुत्रा खाणार नाहीं.

हिंदुस्थानापेक्षां पाश्चात्य देशांतच माझ्या कल्पना अधिक चांगला जीव धरतील असें तूं ह्मटलेंस तें अक्षरशः खरें आहे. खरोखर पाहिलें तर ज्या हिंदुस्थानासाठीं मीं इतका उद्योग केला, त्या हिंदुस्थानानें मात्र मला योग्य मदत केली नाहीं. आपला मार्ग खरा असला ह्मणजे आपणांस वाटतील तितकीं कार्यकारी माणसें मिळतात अशी माझी खात्री आहे, आणि मला अनुभवहि अगदीं तसाच येत आहे. येथें मला कित्येक शिष्य रोज येऊन मिळत आहेत. आणि ते चेले ह्मणजे असेतसे नसून प्रसंगीं आपल्या गुरूसाठीं प्राणहि देण्यास तयार असे आहेत. सत्य हाच माझा परमेश्वर आणि विश्व हाच माझा देश. 'कर्तव्य' ह्मणून तुह्मीं काय ह्मणतां तें मी ओळखीत नाहीं. मला 'कर्तव्य' ह्मणून भेडसावूं पहातां काय ? कर्तव्याचें जूं संसाऱ्यांनीं वाटेल तर वहावें. 'अहं निर्विकल्पी निराकाररूपी । विभुत्वाच्च सर्वत्र सर्वेंद्रियाणाम् । न चासंगतं नैव मुक्तिर्न मे यः । चिदानंदरूपः शिवोहं शिवोहम् ।' असें ह्मणणाऱ्या संन्याशाला आतां 'कर्तव्य' असें काय उरलें आहे ? 'कर्तव्य' हा संसारी मुलांलेंकरांचा बागुलबोवा आहे. '**मरण माझें मरोनि गेलें**' असा अनुभव आल्यामुळें मी सर्व बंधनांतून आतां मुक्त झालों आहें. आतां देह राहिला काय आणि गेला काय, मला त्याचा विधिनिषेध नाहीं.

आतांपर्यंत तूं मला अगदीं बिनमोल मदत केली आहेस. ईश्वर तुला त्याबद्दल बक्षिस देईल. हिंदुस्थानानें अथवा अमेरिकेनें माझा गौरव करावा आणि मजवर स्तुतीचा वर्षाव करावा अशी इच्छा मला कधींच झाली नाहीं. स्तुतीची किंमत पाण्यावरील बुडबुड्याहून अधिक नाहीं, अशी माझी खात्री असतां ती मिळविण्याची इच्छा मला होईल कशी ? सत्यमार्ग लोकांस दाखवावा इतकेंच माझें काम. मी माझ्या परमेश्वराचें लेंकरूं. त्याची आज्ञा प्रमाण मानून कार्य करावें इतकेंच मला समजतें. ज्या माझ्या भगवंतानें मला सत्यमार्ग दाखविला, तोच मला अनुयायीहि मिळवून देईल. ते अनुयायी कसे ? तर मानवीवृक्षाचा मोहोर. अरे हिंदूंनो ! परमेश्वर आपला कार्यभाग पाश्चात्य देशांत कसा पार पाडतो याचा तुह्मांस लवकरच अनुभव येईल. तुह्मीं हिंदुलोक ह्मणजे पूर्वकालच्या यहुद्यांसारखे आहांत. खरोखर, तुह्मीं गवताच्या गंजीवरील कुत्र्यासारखे आहां. तुमच्याजवळ आहे तें तुह्मी स्वतःहि खाणार नाहीं दुसऱ्याला देणारहि नाहीं. अरे, तुह्मी कसले धार्मिक ? तुह्मांस खरोखर कांहीं धर्मच नाहीं. तुह्मांला दोन वेळ चमचमीत भोजन मिळालें कीं देव पावलासें वाटतें ! स्वयंपाकघर हेंच तुमचें देवघर.

हांड्याभांड्यांचा आवाज हाच तुमचा वेदघोष. असो. पण तुझ्यासारखे कांहीं थोडे मर्दहि मधून मधून आढळत नाहींत असें नाहीं. माझ्या शूर मुलांनो, आतां आपआपल्या कामास असेंच चिकटून रहा. माझ्या मुलांत भेकड कोणीहि निपजूं नये अशी माझी इच्छा आहे. मोठीं कामें अडथळ्यावांचून कधीं तरी पार पडलीं आहेत काय ? धीर, चिकाटी आणि अनिवार्य इच्छाशक्ति हीं एकवटून चाललीं ह्मणजे या त्रयीचा परिणाम केव्हां तरी होणारच. दुसऱ्या कित्येक गोष्टी तुला सांगितल्या तर तुला आनंदाच्या अगदीं उकळ्याच फुटतील; पण जाऊंद्या. सारें आजच नको. ' वज्रादपि कठोराणि ' अशा हृदयांचीं माणसें मला हवींत. आकाश फाटलें तरी त्याची यत्किंचितहि क्षिती ज्यांना वाटणार नाहीं, अशीं मनुष्यें मला हवीं आहेत. परमेश्वर तुह्मांवर कृपा करो इतकीच इच्छा बाळगणारा

तुह्मा सर्वांचा,

विवेकानंद.

पत्र २१ वें.

पॅरिस, ता० ९ सप्टेंबर १८९५.

प्रिय—

तुझें पत्र पाहून मला खरोखर नवल वाटलें. कोणाच्याहि टीकेनें तुह्मीं इतके घाबरून कां जातां ? मीं माझें खाणें अगदीं हिंदुपद्धतीचें ठेवावें असें तुह्मां लोकांस वाटत असेल तर इकडे एक आचारी व पुरेसा पैसा, एवढें पाठवा पाहूं. तुमच्याकडून एका फुटक्या कवडीचीहि मदत कोणाला होणार नाहीं. मग तुमच्या सव्वाहात बाता ऐकून मला हंसूं आलें तर नवल काय ? संन्यासाश्रमाच्या मुख्य अटी दोन. अकिंचनता आणि पवित्र वर्तन. यांपैकीं एखादी अट मीं मोडली असें कोणीं तुह्मांस सांगितलें तर ते निःसंशय खोटें बोलत आहेत असें तुह्मीं समजा. माझ्या वर्तनाबद्दल तुला......नें सांगितलें त्यावर तूं विश्वास ठेवूं नको. त्याला माहिती कोठून मिळाली आणि माझें वर्तन कोणकोणत्या प्रसंगीं अनुचित होतें, याची लेखी यादी त्याजपाशीं माग. ह्मणजे त्याच्या तोंडास आपोआप कुलुप बसेल.

आतां माझ्याविषयीं ह्मणशील तर कोणाच्याहि सांगण्यानें बांधला जाणारा मी नव्हें. माझा जन्म कोणत्या कार्यासाठीं झाला आहे तें मला ठाऊक आहे. माझें कार्य जितकें हिंदुस्थानाकरितां तितकेंच इतर जगाकरितांहि आहे. याबद्दल वितंडवाद करण्यांत फायदा नाहीं. तुमच्यासाठीं माझ्यानें कांहीं झालें तें मीं करून चुकलों आहें. आतां यापुढें तुमची तुह्मींच कंबर बांधली पाहिजे. एखाद्या

विशिष्ट देशानें मजवर काय ह्मणून हक्क सांगावा? हिंदुस्थानाला मदत करायची ह्मणजे तुह्मा लोकांची गुलामगिरी मीं पत्करिली आहे काय? अरे चार्वाकाच्या शिष्यांनो, आतां यापुढें तुमची बडबड बंद करा.

मला मिळाला तितका सारा पैसा मीं कलकत्त्यास आणि मद्रासेस पाठवून दिला. तुमच्यासाठीं एवढी खटपट केली. आतां तुमची वायफळ बडबड मीं कां ऐकून घेऊं? माझ्या वर्तणुकीवर मूर्खपणाची टीका करतांना तुह्मांला कांहीं लाज वाटत नाहीं काय? तुमचें मी काय लागतों? तुमच्या स्तुतीची जर कवडीभर किंमत मला वाटत नाहीं, तर तुमच्या निंदेला तरी मी काय भीक घालणार आहें! गड्या, मी एक अगदीं दुनियेवेगळा विक्षिप्त मनुष्य आहें. मी कोण आहें आणि कसा आहें याची तुलासुद्धां अद्यापि पुरती पारख झाली नाहीं! तुमच्यानें कांहीं उद्योग झाला तर करा. पण आपलें मूर्खत्व माझ्यावर लादण्याचा उद्योग मात्र करूं नका. माझ्या पाठीमागें मानवीसामर्थ्याहून आणि परमेश्वरी सामर्थ्याहूनहि महत्तर अशी ज्योति उभी आहे. मला कोणाच्याहि मदतीची अपेक्षा नाहीं. लोकांना मदत करण्याचाच उद्योग मीं माझ्या साऱ्या आयुष्यभर केला.

भगवान रामकृष्ण परमहंसांसारख्या अद्वितीय मनुष्याच्या कार्याची पूर्ति करण्यासाठीं थोडेंसें द्रव्यहि तुमच्यानें जमवलें नाहीं; आणि अशा लोकांनीं दुसऱ्यास शहाणपण शिकविण्यास तोंडें उघडावीं! आपल्या हातून ज्यानें तुह्मांस शक्य ती मदत केली त्याचे उपकार असे फेडतां काय? असो. जगाची ही रीतच आहे.

जातिभेदानें तुमचा समाज चाळणीसारखा करून टाकला आहे! तुमचा धर्म ह्मणजे भोळसरपणा! निर्दयता, दांभिकपणा आणि भेकडपणा यांच्याशीं तुमचें कायमचें सख्य! ईश्वरावर तर तुमचा काडीइतकाहि विश्वास नाहीं. तुमच्याच सारखा होऊन मी राहावें आणि एक दिवस मरून जावें अशी तुमची इच्छा आहे काय? तुह्मां सुशिक्षित हिंदु लोकांत वरील गुणांचा मात्र सध्यां सुकाळ झाला आहे. भेकडपणाचा मला पक्का तिटकारा आहे. तसेंच राजकीय बाबतींचाहि मला मनापासून कंटाळा वाटतो. परमेश्वर आणि सत्य हीच माझी राजनीति. याखेरीज जें कांहीं उरलें, त्याची किंमत धुळीइतकीसुद्धां मी समजत नाहीं. उदईक मी लंडनास जाईन.

आपला,
विवेकानंद.

द्वितीय खंड.

द्वितीय खंडांत संपूर्ण **राजयोग,** दुसरीं कित्येक व्याख्यानें आणि कांहीं खासगी पत्रें यांचा सामावेश होईल. सर्व विद्यांत अध्यात्मविद्या श्रेष्ठ, आणि अध्यात्मविद्येंत **राजयोग** श्रेष्ठ, अशा अभिप्रायानें भगवान् श्रीकृष्णांनीं राजयोगास सार्वभौमपद दिलें आहे. याच सार्वभौमाला स्वामी विवेकानंदांनीं मुकुटराजंदडादि नवीं भूषणें स्वहस्तें लेवविलीं असल्यामुळें तो अतुल तेजानें चमकत आहे. सार्वभौमाच्या भेटीचा योग साऱ्या आयुष्यांत एखादेवेळींच येणारा आहे ! आमच्या वाचकांनीं ही संधि साधावी.